भारतीय फिल्म का प्रारंभ मूलतः धार्मिक रहा, उस समय ऐसे कथानक बनाये गए जिनसे भारतीय जनमानस एवं दर्शको में पूर्व ज्ञान था एवं वे पूर्व से ही इससे परिचित थे। किन्तु तीसरे दशक के प्रारंभ में बोलती हुई फिल्मों के निर्माण में चर्चित धार्मिक कथानकों के साथ ही जागृत समाज की अभिव्यक्ति की फिल्म दिखाने का प्रयास प्रारंभ हुआ। जो हिंदी फिल्मो की लोकप्रियता को नया आयाम देने के लिए पर्याप्त थी। "वे एक फिल्म में अनेकों प्रकार के सामाजिक मुद्दे दिखाते हैं और यह लोगों को सीधे प्रभावित करता है। यह उन्हें सोचने और कुछ करने में मदद करता है।"[9] विभिन्न मुद्दों जैसे विदेशी नियंत्रण, राजनीतिक मुद्दों, सांस्कृतिक क्रान्ति के फलस्वरूप समाज के बदलते समाजशास्त्र और मनोविज्ञान की कूट अभिव्यक्ति की स्पस्ट झलक हिंदी सिनेमा में मिलना शुरू हुई। हिंदी फिल्मो ने लोगो में देश के प्रति मर मिटने की भावना, लाने का प्रयाश शुरू किया। "अब समाज पर फिल्मों का इतना प्रभाव या यह कहने नौजवान पीढ़ी पर पड़ा की वह वही करने लगे जो फिल्मों मे होता है। मुझे याद आता है एक इसी प्रकार का किस्सा। एक फिल्म मे जैकी श्राफ मैकेनिक बने थे और एक अमीर लड़की जो अपनी कार ठीक कराने आती है, दोनों प्यार मे डूब जाते हैं। अब उन्ही दिनो की बात है, हमारे पड़ोस मे एक डाक्टर के घर के बाहर सड़क पर एक स्कूटर मैकेनिक अपनी दुकान लगा कर काम करता था और डाक्टर की बेटी अपना स्कूटर उससे ठीक करवाती थी, एक दिन दोनों घर छोड कर भाग गए।"[10]

हिंदी सिनेमा का समाज पर सकारात्मक प्रभाव

हिंदी सिनेमा ने एक ऐसी लहर पैदा की जिसने भारतीय समाज के जन मानस मे देश, समाज एवं परिवार के प्रति पूर्व त्याग, निष्ठा, बलिदान आदि भावपूर्ण फिल्में बनायी गयी जिसने हिंदी सिनेमा की लोकप्रियता को जन जन तक फैलाया। हिंदी सिनेमा का ऐसा प्रयास एक मनोवैज्ञानिक पहल ही थी। जो आज के समाज के लिए भी उपयोगी है।

देश के स्वतंत्रता होने के बाद भारत के नव निर्माण के लिए सामंतशाही, मालिक, मजदूर, कामगार, इत्यादि के संघर्षो पर बहोत सी फिल्मे बने गई। ऐसी फिल्मो ने तात्काली समाज में व्याप्त कुरीतियों के प्रति लोगो को जागरूक किया एवं समाज के हर वर्ग को अंधविश्वास से दूर करने का प्रयाश किया। हिंदी सिनेमा का ऐसा कार्य मनोवैज्ञानिक

रूप से सकारात्मक एवं सराहनीय कार्य रहा। "सिनेमा साहित्य की ही एक विधा है। सिनेमा को भी उन्हीं तकाजों को पूरा करना चाहिए जो दूसरी साहित्यिक विधाएं पूरी करती हैं। सिनेमा प्रचार या प्रोपेगेंडा नहीं है। वह अपने दर्शक को सुख को सुख प्रदान करता है और इस सुख से वह समाज को स्वस्थ बनाने की लड़ाई लड़ता है। जो फिल्म इस कर्तव्य का निर्वाह नहीं करती, समझ लेना चाहिए कि उसमें कहीं न कहीं कोई त्रुटि है।"[11] उस समय मदर इंडिया ऐसी सशक्त हिंदी फिल्म बनी जिसने एक तरफ भारतीय 'लोक-संस्कृति' की वास्तविकता को प्रस्तुत किया। इसी दौरान भारतीय समाज सांस्कृतिक मूल्यों, परिवार मित्रता आदि संबंधों में मधुरता को अनेक चल चित्रों के माध्यम से चित्रित करते हुए गुलजार, ऋषिकेष मुखर्जी, वासु भट्टाचार्य जैसे निर्देशकों ने घटनाओ की यथार्थता को समझकर अपनी सशक्त कलात्मक फिल्म अभिव्यक्तियाँ प्रस्तुत की जो नविन भारतीय समाज के सृजन में सहयोगी रही।

हिंदी सिनेमा का समाज पर नकारात्मक प्रभाव

भारत देश की आजादी के बाद पाले गये स्वराज्य के स्वप्न का भ्रम धीरे-धीरे भारतीय जनता की आंखों में चुभने लगा था। पहले गोरे अंग्रेज मालिक थे, अब अपने ही रक्त, वर्ण के काले भारतीय अमीर मालिक बन गये थे। भारतीय समाज में ग्रामों से शहरों की ओर पलायन निरंतर बढ़ने लगा। शिक्षा एवं रोजगार प्राप्ति के लिए आजाद भारत का किसान खेतिहर होना नहीं चाहता था। वह भी अपने बच्चों को ऊंची रोजगारपरक शिक्षा दिलाकर हाथ में कलम पकड़ने वाले प्रसाशनिक अधिकारी बनाने का ख्वाब पालने लगा। प्रतिस्पर्धात्मक जीवन की जद्दो जहद, शहर का व्यक्तिवादी, असहयोगी और आत्माविहीन माहौल तथा रोजगार की तलाश नें युवाओ में उनमे कुंठा और तनाव को पैदा किया । शहरी जीवन की भागदौड़ भरी, अस्त-व्यस्त जीवन शैली, प्रशासनिक लापरवाही, लालफीताशाही, नौकरशाही, अयोग्य पात्रों को मिलती सफलता ने युवा मन में आक्रोश भरना शुरू कर दिया । भारतीय जनमानस की इन्ही भावनात्मक अभिव्यक्तियों को फिल्म में सजीव होता देख आक्रोशित मन क्षणिक सुखवाद में डूबता चला गया। जंजीर, शोलें, त्रिशूल, मुकद्दर का सिकंदर, अंधाकानून, अर्धसत्य, अंकुश, अंकुर, सात खून माफ, माफिया, कोयला, बैन्डिट क्वीन, शंघाई, राजनीति, चक्रव्यूह, आदि फिल्मों को इसी भारतीय युवा मन के आक्रोशित मनो भावों का चित्रण करती हैं।

हिंदी फिल्मों में अमीर लड़की, गरीब लड़का, वर्ग, जाति, धर्म, संस्कार स्तर आधारित मतभेदों पर परिवार एवं समाज का विरोध, मारधाड़, हिंसा तथा प्रेम न पाने पर बलात्कार, यौन-हिंसा हॉलाकि यह कुत्सित प्रेम भाव हिंदी फिल्मों में खलनायकों तक ही सीमित रहा। आदि द्वारा स्त्री प्राप्ति यही सिनेमाई प्रेम का सुपरहिट फार्मूला संभवतः आज तक है। फिर भी इस दौरान शुद्ध प्रेम पर आधरित फिल्मों की चर्चा करें तो सुजाता, बन्दिनी, अमृत, देवदास, वीरजारा, जैसी फिल्मों भी हैं जो जीवन के अंतिम समय तक यथार्थ प्रेम का एकभाव लिए रहती हैं।

"सिनेमा दुनिया भर के हर आयु वर्ग के लोगों के मनोरंजन का एक प्रमुख स्रोत रहा है। फिल्मों की विभिन्न शैलियों का निर्माण किया जाता है और ये विभिन्न तरीकों से जनता को प्रभावित करती हैं। चूंकि फिल्में सभी द्वारा खोजी जाती हैं, वे समाज को बहुत प्रभावित करते हैं। यह प्रभाव नकारात्मक और सकारात्मक दोनों हो सकते हैं।"[12]

निष्कर्ष:

सिनेमा समाज की मनोभावों की अभिव्यक्ति का साधन है। "चलचित्र ज्ञान के भी स्त्रोत होते हैं। अनेक देशों की भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक तथा धार्मिक विचारधाराओं को इनसे जाना जा सकता है। अनेक वैज्ञानिक अनुसंधानों एवं प्रयोगों को भी समझा जा सकता है। प्राकृतिक दृश्यों का आनंद भी इनसे मिलता है।"[13] वर्तमान समय में कम से कम समय में अधिक से अधिक बॉक्स ऑफिस कलेक्शन की चाह ने कब धीरे धीरे भारतीय आम जनमानस को भावना, मूल्य, संस्कार के प्रति तटस्थ और उदासीन बना दिया शायद उसे भी पता नहीं । लेकिन आज आवश्यकता इस बात की भी है कि उपनिवेशवाद, डॉलर की चमक, ओवरसीज मार्केट कलेक्शन, भारतीय दर्शकों की थियेटर मॉल में उमड़ती भीड़ के बीच दर्शक की संवेदना कितनी जागृत है इस बात का भी मूल्यांकन हो , कि आज संवाद का सबसे सशक्त कलात्मक माध्यम सिनेमा का रचनात्मक प्रभाव मृत प्राय हो चुका है। इसलिए आवशयक है की हिंदी फिल्मो में नए आयामों को आत्मसात करते हुए उसे उसे ज्यादा से ज्यादा समाजोपयोगी बनाया जाये।

संदर्भ ग्रंथ:

1. जी न्यूज़ : डर का मनोविज्ञान-डर का मनोविज्ञानहैं करते पसंद क्यों देखना फिल्म हॉरर हम :? इन्टरनेट विषयवस्तु https://zeenews.india.com/hindi/science/psychology-of-fear-why-do-we-love-watching-horror-movies/271205

2. रीना जी सिने ,Hindi library India :मा और समाज पर निबंध । Essay on Cinema and Soci etyइन्टरनेट विषयवस्तु कुमार गौरव : जीवन में सिनेमा के प्रभाव पर निबंध, इन्टरनेट विषयवस्तु, हिंदी की दुनिया डॉट काम 06 Oct 2022 https://www.hindikiduniya.com/essay/essay-on-impact-of-cinema-in-life/

3. इन्द्रेश कुमार उनियाल : हिन्दी सिनेमा का समाज पर प्रभाव, इन्टरनेट विषयवस्तु, नवभारत टाइम्स 18 Apr 2016 https://readerblogs.navbharattimes.indiatimes.com/JaiJawanJaiKisan/%E0%A4%B9-%E0%A4%A8-%E0%A4%A6-%E0%A4%B8-%E0%A4%A8-%E0%A4%AE-%E0%A4%95-%E0%A4%B8%E0%A4%AE-%E0%A4%9C-%E0%A4%AA%E0%A4%B0-%E0%A4%AA-%E0%A4%B0%E0%A4%AD-%E0%A4%B5/

4. डॉ 0 मंजू रानी : सिनेमा और समाज, अन्तर्संबंध एवं प्रभाव, मासिक पत्रिका गर्भनाल, 01 Jul 2021, https://www.garbhanal.com/sinema-aura-samaja-anatarasanbandha-evan-parbhava

5. विकास सिंह : सिनेमा के प्रभाव पर निबंध, द इंडियन वायर 03 Aug 2019, इन्टरनेट विषयवस्तु, मोटी वेसनल स्टोरीज इन हिंदी डॉट कॉम : सिनेमा के लाभ और हानि व सिनेमा का समाज पर प्रभाव https://www.motivationalstoriesinhindi.in/2017/03/cinema-se-labh-or-hani.html

राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० और महिला सशक्तिकरण

माया कनासे
सहायक प्राध्यापक (समाजशास्त्र) शा. महाविद्यालय, मेहंदवानी जिला डिंडोरी

सारांश —
वर्तमान समय में वैश्विक स्तर पर शिक्षा के क्षेत्र में कई परिवर्तन हो रहे हैं। भारतीय शिक्षा को इसके लिए उपयोगी बनाने, शिक्षा की गुणवत्ता बढ़ाने, नवाचार और अनुसंधान को बढ़ावा देने के लिए रोजगार केन्द्रित शिक्षा नीति को लगभग ३४ वर्षों के बाद लागू किया गया है, जिसमें शिक्षा के सभी स्तरों पर महत्वपूर्ण परिवर्तन किए गए हैं। इन सभी पहलुओं के साथ ही साथ महिलाओं के लिए भी इस शिक्षा नीति में प्रावधान किए गए हैं, जो उन्हें सशक्तता प्रदान करेंगे।

शब्द कुंजी — शिक्षा नीति, गुणवत्ता, कौशल, सशक्तिकरण।

उद्देश्य —
प्रस्तुत शोध—पत्र का मुख्य उद्देश्य राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० में महिला सशक्तिकरण हेतु किए गए प्रावधानों का अध्ययन करना है।

परिकल्पना—
प्रस्तुत शोध—पत्र हेतु निम्न परिकल्पना परिकल्पित की गई है —
'नवीन राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० के माध्यम से महिला सशक्तिकरण संभव हो पाएगा।'

अध्ययन पद्धति —
प्रस्तुत शोध—पत्र को पूर्ण करने के लिए द्वैतीयक स्त्रोतों का उपयोग किया गया है। शोध—विषय से संबंधित जानकारी विभिन्न समाचार पत्र—पत्रिकाओं, शोध—पत्रों एवं सरकारी दस्तावेजों से एकत्र की गई है।

स्वतंत्रता के पश्चात् भारत सरकार ने १९८६ एवं १९८६ में शिक्षा लागू की थी, जिसमें आंशिक संशोधन १९९२ में भी किया गया था। वर्ष २००९ में संविधान में संशोधन कर शिक्षा का अधिकार अधिनियम लाया गया जिसका उद्देश्य ६ से १४ वर्ष के बच्चों को प्राथमिक शिक्षा अनिवार्य रूप से उपलब्ध कराना था। शिक्षा प्रणाली में गुणात्मक सुधार लाने के लिए समय—समय पर कई आयोग और समितियों का गठन किया गया। वर्तमान समय की आवश्यकताओं की पूर्ति के लिए एक नवीन शिक्षा नीति की आवश्यकता अनुभव की गई और व्यापक विचार—विमर्श और सुधारों के उपरांत एक नवीन शिक्षा नीति लागू की गई, जिसे **राष्ट्रीय शिक्षा नीति २०२०** के नाम से जाना जाता है। इसी के साथ ही मानव संसाधन विकास मंत्रालय का नाम बदलकर शिक्षा मंत्रालय कर दिया गया है। राष्ट्रीय शिक्षा नीति में विद्यालयीन स्तर पर पाठ्यक्रम और मूल्यांकन प्रणाली में कई सुधार किए गए हैं साथ ही उच्च शिक्षा के पाठ्यक्रम में परिवर्तन किया गया है। कौशल विकास और करीकुलर एक्टिविटी के साथ ही महिलाओं को सशक्त करने हेतु कुछ विशेष प्रावधान भी किए गए हैं। आज भी देश में महिलाओं के सामाजिक—आर्थिक सशक्तिकरण की आवश्यकता अनुभव की जा रही है। जब तक महिलाओं को शिक्षा प्राप्त नहीं होगी तब तक महिलाओं के सशक्तिकरण की कल्पना करना व्यर्थ ही होगा। राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० में बालिकाओं को शिक्षा के क्षेत्र में आने वाली कठिनाईयों का अनुभव कर उन्हें दूर करने का प्रयास किया गया है और इस दिशा में निम्न प्रयास किए गए हैं —

विद्यालय स्तर पर किए गए प्रयास—
(१) पूर्व से संचालित कस्तूरबा गांधी विद्यालय को और अधिक सशक्त किया जाएगा और सामाजिक—आर्थिक रूप से पिछड़े वर्ग की बालिकाओं को गुणवत्तापूर्ण शिक्षा प्रदान करने के लिए इन विद्यालयों को कक्षा १२वीं तक बढ़ाया जाएगा, जिससे अधिक से अधिक संख्या में ग्रामीण और पिछड़े वर्ग की बालिकाओं को शिक्षा प्राप्ति में आने वाली बाधाएँ दूर हो सकेंगी। राष्ट्रीय शिक्षा नीति के अध्याय तीन में बालिकाओं के लिए सुरक्षित छात्रावास और यातायात के साधनों को उपलब्ध कराने का प्रावधान किया गया है।

(२) ग्रामीण अंचलों, पहाड़ी और दुर्गम क्षेत्रों, दूरदराज क्षेत्रों में जहाँ विद्यालय अधिक दूरी पर स्थित हैं, वहाँ पर नि:शुल्क बालिका छात्रावासों का निर्माण किया जाएगा और उनकी सुरक्षा के समुचित प्रबन्ध किए जाएँगें।

(३) नई शिक्षा नीति में यह भी प्रावधान किया गया है कि विद्यालयों में नामांकित सभी विद्यार्थी विशेषकर बालिकाएँ, किशोरों द्वारा किए जाने वाले उत्पीड़न, भेदभाव, बालिकाओं के अधिकारों का हनन आदि जैसे मामलों का उल्लंघन किए जाने पर बालिकाओं को प्राथमिकता प्रदान की जाएगी।

(४) विद्यालयों में बालिकाओं के लिए सशक्त वातावरण निर्मित करने के साथ ही भौतिक सुविधाएँ जैसे स्वच्छता, शौचालय आदि का विशेष ध्यान रखा जाएगा। सह–शिक्षा वाले विद्यालयों में बालिकाओं के लिए पृथक शौचालय की व्यवस्था की जाएगी साथ ही उनकी सुरक्षा का भी ध्यान रखा जाएगा।

(५) नई शिक्षा नीति में व्यावसायिक विषयों के साथ स्थानीय भाषाओं, चित्रकला, संगीत, कविता, कहानी, नाटक, इनडोर–आउटडोर खेल गतिविधियों, कठपुतली, संगीत आधारित गतिविधियों को सम्मिलित किया जाएगा जिससे विद्यार्थियों विशेषकर बालिकाओं में रूचि उत्पन्न होगी और वे विद्यालय से जुड़ी रहेंगी।

(६) राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० में यह प्रावधान किया गया है कि सामाजिक और आर्थिक रूप से वंचित वर्ग की शिक्षा के लिए समुचित सरकारी निधि का निर्धारण किया जाएगा। सामाजिक–आर्थिक रूप से वंचित छात्राओं को और अधिक वित्तीय सहायता और छात्रवृत्तियाँ उपलब्ध कराई जाएगी।

उच्चतर शैक्षणिक स्तर पर किए गए प्रयास –

(१) उच्च शिक्षा स्तर प्रवेश प्रक्रिया में जेंडर संतुलन को बढ़ावा देने का प्रयास किया जाएगा। इस बात के विशेष प्रयास किए जाएँगे की प्रवेशित विद्यार्थियों में बालिकाओं की संख्या अधिक से अधिक हो।

(२) शैक्षणिक परिसर में बालिकाओं को विशेष रूप से सुरक्षा उपलब्ध कराई जाएगी। इस हेतु शैक्षणिक संस्थान में बालिकाओं के साथ किए जाने वाले भेदभाव और उत्पीड़न के लिए बनाए गए नियमों का सख्ती से पालन किया जाएगा और बालिका शिक्षा हेतु अनुकूल वातावरण का निर्माण किया जाएगा।

(३) उच्च शिक्षण संस्थाओं को सॉफ्ट स्किल्स सहित विभिन्न कौशलों तथा लोक विधाओं में सीमित अवधि के सर्टिफिकेट कोर्स करवाने की भी अनुमति होगी, जिससे उच्च शिक्षण संस्थाओं में महिलाएँ अपनी रूचि और सुविधा के अनुरूप कौशल प्राप्त कर सकेंगी।

(४) महिलाओं को आत्मनिर्भर बनाने के लिए व्यावसायिक शिक्षा प्रदान करने का प्रावधान किया गया है। यह शिक्षा प्राथमिक स्तर से उच्चतर स्तर तक रहेगी, जिसमें छात्र विशेषकर महिलाएँ किसी एक व्यवसाय से जुड़े कौशल को चुनकर आत्मनिर्भर बन सके।

(५) राष्ट्रीय शिक्षा नीति में मल्टीपल एंट्री एवं एक्जिट व्यवस्था को अपनाया गया है। इसके अनुसार ३ या ४ वर्ष के स्नातक कार्यक्रम में छात्र कई स्तरों पर पाठ्यक्रम को छोड़ सकते हैं – एक वर्ष के पश्चात् प्रमाण–पत्र, दो वर्ष के पश्चात् एडवांस डिप्लोमा, तीन वर्ष के पश्चात् स्नातक की डिग्री और चार वर्षों के पश्चात् शोध के साथ स्नातक। इसी के अनुसार उन्हें उपाधि या प्रमाण–पत्र प्रदान किया जाएगा। यह सुविधा छात्र और छात्राओं के लिए समान रूप से है, किन्तु इसका अत्यधिक लाभ छात्राओं को प्राप्त होगा जो कई पारिवारिक कारणों, विवाह होने या अन्य कारणों से अपना अध्ययन बीच में ही छोड़ देती हैं। इस प्रकार उच्च शिक्षा में महिलाओं की भागीदारी जो अभी बहुत कम रहती है, उसे बढ़ाने का प्रयास किया जाएगा।

(६) राष्ट्रीय शिक्षा नीति महिलाओं की शिक्षा की पूर्णता पर विशेष बल देती है। नवीन स्नातक पाठ्यक्रम को महिलाएँ पूरा करे या न कर पाए, किन्तु उन्होंने जितना भी अध्ययन किया है, उनके पास उनकी उपलब्ध डिग्री एक महत्वपूर्ण दस्तावेज होगा, जिससे वे उस स्तर पर नौकरी या रोजगार के लिए सक्षम हो सकेंगी।

(७) राष्ट्रीय शिक्षा नीति में एकेडेमिक बैंक ऑफ क्रेडिट एंड स्किल डेवलपेंट की सुविधा प्रत्येक महिला को आर्थिक रूप से स्वतंत्र बनाने में सहायक होगी।

राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० में महिलाओं की शिक्षा में आने वाली बाधाओं का समुचित अध्ययन कर उन्हें दूर करने का प्रयास किया गया है। यह कदम महिलाओं की शिक्षा में भागीदारी बढ़ाएगा। कई महिलाएँ अपनी पारिवारिक आर्थिक स्थिति ठीक नहीं होने के कारण पढ़ाई बीच में ही छोड़ देती हैं, क्योंकि वे समय पर फीस जमा नहीं कर पाती हैं, पाठ्यपुस्तकें, गणवेश, जूते आदि खरीद नहीं पाती हैं। कई महिलाएँ अपने परिवार की आर्थिक स्थिति में सहयोग करने के लिए घरेलू आर्थिक कार्यों में उन्हें सहयोग भी करती हैं, इस कारण वे अध्ययन नहीं कर पाती हैं। नई शिक्षा नीति में जेंडर समावेशी कोष राज्यों को उपलब्ध कराया जाएगा जिससे उनको ऐसी नीतियों, योजनाओं, कार्यक्रमों आदि को लागू करने में सहायता मिलेगी, साथ ही महिलाओं को शैक्षणिक परिसर में अधिक सुरक्षापूर्ण वातावरण उपलब्ध हो सकेगा। आज के समय में अपराध की बढ़ती घटनाओं के संदर्भ में अभिभावकों को बालिकाओं की सुरक्षा की चिंता अधिक रहती है। इस शिक्षा नीति में बालिकाओं की सुरक्षा के समुचित प्रबंध किए गए हैं, इससे विद्यालयों में उनका प्रवेश निश्चित रूप से बढ़ेगा।

निष्कर्ष —

राष्ट्रीय शिक्षा नीति २०२० वर्तमान समय के लिए आवश्यक थी। इस शिक्षा नीति में विद्यालयीन और महाविद्यालयीन स्तर पर आमूलचुल परिवर्तन किए गए हैं, जिससे शिक्षा का स्तर उच्च होगा और उसमें गुणात्मक सुधार की अपेक्षा भी की जा सकती है। महिलाओं के लिए किए गए प्रावधानों से निश्चित ही इसके सकारात्मक प्रभाव हमें निकट भविष्य में देखने को मिलेंगे। बालिकाओं और महिलाओं की शिक्षा में भागीदारी बढ़ाने और उन्हें व्यावसायिक शिक्षा प्रदान कर आत्मनिर्भर बनाने में राष्ट्रीय शिक्षा नीति में कई पहलुओं का विस्तार से समावेश किया गया है। शिक्षा के सभी स्तरों पर लिंग–संतुलन, दूरदराज के ग्रामीण अंचलों में विद्यालय और छात्रावासों का निर्माण, सामाजिक–आर्थिक रूप से कमजोर वर्ग की महिलाओं को गुणात्मक शिक्षा उपलब्ध कराने एवं शैक्षणिक परिसरों में उनको विशेष रूप से सुरक्षा उपलब्ध कराए जाने के कारण यह शिक्षा नीति महिला सशक्तिकरण की दिशा में महत्वपूर्ण भूमिका का निर्वाह करेगी।

संदर्भ–

१. https://thesimplehelp.com

2. https://pmmpdiyojnay.in

३. राष्ट्रीय शिक्षा नीति २०२०, मैन्युअल, मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार

४. आहूजा राम, भारतीय समाज, रावत पब्लिकेशन, जयपुर, २०००

५. भारत २०२२, सूचना और प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, नई दिल्ली

संविधान एक गतिशिल आणि जिवंत दस्तऐवज

डॉ. रमेश वाघमारे

सहाय्यक प्राध्यापक, लोक प्रशासन विभाग प्रमुख, गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय अंबड जिल्हा जालना.

प्रस्तावना :

भारतीय संविधान निर्मात्यांनी अथक परिश्रम घेऊन देशाला एक मौलीक असा ठेवा दिलेला आहे. संविधान एक मौलिक कायदा आहे, जो देशाला संचलित करण्यासाठी म्हणजेच सरकारच्या विविध घटकांची रूपरेखा आणि कार्यप्रणाली तथा, नागरिकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी नियम /संहिता दर्शवीत असते. प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राला आपले एक संविधान असते, जे लिखित असो अथवा अलिखित, ते सरकारच्या तिन्ही घटकाचे म्हणजेच कार्यकारी मंडळ, कायदे मंडळ आणि न्यायमंडळ यांचे निर्माण व कार्य आणि संचलन तसेच त्यांचे अधिकार व जबाबदारी निश्चित करण्याचे कार्य करते. कोणत्याही देशाच्या संविधानाला त्या देशाचा आत्मा म्हटले जाते, कारण संविधानामध्येच त्या देशाची मूळ भावना व कर्तव्य निहित असतात. संविधान निर्मात्यांनी संविधान निर्माण करण्यासाठी जगातील अनेक राष्ट्राच्या संविधानाचा अभ्यास केलेला आहे. संविधान लिखीत असो किंवा अलिखित, शिवाय संविधानामध्ये भूतकाळातील अनुभव, वर्तमान काळातील स्थिती आणि भविष्यात निर्माण होणारे अनेक विविध प्रश्न यांचा विविध अंगी अभ्यास करून एक गतीशिल आणि जिवंत दस्तावेज निर्माण केलेला आहे . अनेक राजवटी, सरजांमशाही, साम्राज्यशाहीची असलेली सत्ता, यामुळे या प्रदेशातील जनतेची होणारी पिळवणूक व भौतिक/ नैसर्गिक संसाधनाची अतोनात केलेली लूट, यामुळे झालेली देशाची दैनिय अवस्था यावर भविष्यात कायद्याद्वारे मर्यादा घालण्यासाठी संहिता तयार करण्याचे कार्य केले गेले.भारत हा विविधतेने नटलेला देश मानला जातो, या देशात विविध जाती, धर्माचे, पंथाचे लोक राहतात, तसेच विविध संस्कृतीचे जतनही केले जाते. सर्व घटकांना एकत्रित बांधून ठेवणारा एक गतिशील स्वरूपाचा दस्तऐवज या संविधानाच्या माध्यमातून तयार केलेला आहे.संविधान निर्मात्यांनी भविष्यात होणाऱ्या बदलाचा दूरदृष्टीकोणातून अभ्यास करून त्याचे पूर्ण प्रतिबिंब संविधानात अधोरेखित केलेली आहेत. म्हणूनच आज 75 वर्षानंतर ही संविधानाला कुठलाच धोका निर्माण झालेला नाही. जरी संविधान बदलविण्याची भाषा केली जात असली तरी त्यामध्ये सुधारणा केली जाईल, परंतु संविधानाच्या मूळ संरचनेला धक्का लावता येणार नाही, हे खरे संविधानाच्या गतीशीलतेचे व जिवंतपणाचे लक्षण आहे.

कोणत्याही लोकशाही राष्ट्राचा मुख्य आधार हा संविधान असतो . यामध्ये देशातील महत्वपूर्ण व्यक्ती द्वारा राष्ट्राचे प्रशासन चालविण्यासाठीच्या नियमाचे नियमन केले जाते. ज्यामुळे सत्तेचा दुरुपयोग रोखला जाऊ शकतो. संविधान हे जनतेच्या, समाजाच्या बदलत्या परिस्थितीनुसार बदलत व विकसित होत असते. मानवाच्या जीवनात वास्तविक अर्थ भरीत असते. संविधान व्यक्तीच्या जीवनात मूलभूत अधिकाराला एक मौलिक अधिकार म्हणून सुनिश्चित करतो. संविधानाची निर्मिती ही भारतातील लोकांच्या गरजा व अधिकार लक्षात घेऊनच भारतीय नागरिकांनीच बनविलेला आहे, ना की इतर कोणाकडून किंवा कोण्या राष्ट्राकडून किंवा सत्तेकडून सोपीविलेले नाही.

संविधान निर्मात्यांची भूमिका ही दूरदर्शीपणाची होती, कारण वर्तमान काळातील संदर्भ, भविष्यकाळातील बदल लक्षात घेऊनच तिची रचना केलेली आहे. शिवाय संविधानाच्या वैशिष्ट्यामध्ये संविधानाची ताठरता व लवचिकता यांना प्राधान्य दिले आहे. त्यातूनच संविधान निर्माण कतत्याचे महत्त्व लक्षात येते. याशिवाय भारतीय संविधानामध्ये वेळ काळानुरूप परिस्थिती आणि गरजेनुसार बदलण्याची तरतूद देखील केलेली आहे. त्यामुळे यामध्ये जिवंतपणा राहतो . दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या राष्ट्राचा विचार करता म्हणजेच भारतासारख्या राष्ट्राचा विचार करता,

या सर्व घटना, शासन , प्रशासन आणि नागरिकांची स्थिती विचारात घेऊन एका राष्ट्राला नियंत्रित व व्यवस्थितरित्या संचलित करण्यासाठी काही नियम आणि संहिता ही संविधानाद्वारे तयार केली जाते, आणि ती केली गेली. शिवाय एखाद्या राष्ट्राचे संविधान बनविले म्हणजे त्यात बद्दलच झाले नाही पाहिजेत, किंवा बदल करण्याची आवश्यकताच नाही असे नसून, या संविधानात संविधान निर्मात्यांनी काळाच्या पुढच्या गरजा ओळखून यामध्ये भरीव अशी मौलीक ठेवा दिलेला आहे. प्रस्तुत शोध - निबंधामध्ये संविधानाची म्हणजे काय, जागतिक- ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि तो एक गतिशील जिवंत दस्तावेज कसा आहे याचा मागोवा घेण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

शोधनिबंधाचा उद्देश :-

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये संविधान म्हणजे काय जाणून घेणे. संविधान हे गतिशील दस्तावेज कसा आहे समजून घेणे हा या शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय साधन सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व प्रकाशित साहित्य, जर्नल्स, मासिके, पक्षीके, वर्तमानपत्रे, वेबसाईट, इत्यादीचा आधार घेतला जाणार आहे.

संविधान म्हणजे काय :-

"संविधान म्हणजे केवळ काही नियम किंवा कायद्याचे जाळे किंवा प्रक्रिया नव्हे, तर ते एक शासन स्थापन करण्यासाठीची नैतिक बांधिलकी (Moral Commitment) आहे."

"संविधान एक मौलिक कायदा आहे जो देशाला संचलित करण्यासाठी म्हणजे सरकारच्या विविध घटकांची रुपरेखा आणि कार्यप्रणाली हिताचे रक्षण करण्यासाठी नियम संहिता दर्शवित असते"

अशाप्रकारे प्रत्येक संविधान हे देशातील सर्व यंत्रणा व व्यवहाराला नियंत्रित करणारी असल्यामुळे त्यास देशाचा आत्मा देखील म्हटले जाते. पर्यायाने त्यास सर्व देशवासीयांच्या जीवन व्यवहाराशी जोडले जाते.

गतिशील किंवा जिवंत दस्तावेज म्हणजे काय?

भारताचे संविधान हे केवळ कायदा, नियम यांचा संग्रह नसून तो या देशातील व्यक्तीला केंद्रस्थानी माणून स्वातंत्र्य आणि समतेची आस धरणारा एक जिवंत गतिशील दस्तावेज आहे. भारतीय संविधान न्यायालयीन निकाल व राजकीय वर्तन व्यवहार या दोन्ही कारणामुळे संविधानाच्या परिपक्वतेचे आणि लवचिकतेचे दर्शन घडविलेले आहे. त्यामुळे आपले संविधान केवळ कायद्याचे एक जाड पुस्तक न राहता एक जिवंत दस्ताऐवजाच्या स्वरूपात विकसित झालेले आहे. या संविधानाला जिवंत दस्तावेज बनविण्यासाठी तीन बाबी महत्वपूर्ण आहेत. यामध्ये संविधान संशोधन, विस्तारपूर्वक खंड आणि सर्वोच्च न्यायालयाचे निकाल. अनुभव आणि दूरदृष्टीच्या भावनेतून जे संविधान निर्माण केले गेले किंवा बनविले गेले, त्यास जिवंत दस्तावेज मानले जाते. जिवंत दस्तावेज म्हणजे, जिवंत म्हणजे जिव, मनुष्य जेव्हा समस्याचा सामना करतो, तेव्हाच त्यास बदलाच्या परिस्थितीचा मागवा घ्यावा लागतो. संविधानाला जिवंत ठेवण्यामध्ये न्यायपालिकेची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. जर नायपालीकाच राजकारण्यांची बटीक बनली तर मात्र संविधानाचे आणि देशाचे काय होईल हे सांगणे कठीण आहे.

संविधानाची वैशिष्ट्ये :-

भारतीय संविधानाच्या वैशिष्ट्यामधील एक वैशिष्ट्य म्हणजे, भारतीय संविधान हे एक जिवंत दस्तावेज आहे. याचा अर्थ म्हणजे संविधानामध्ये काळानुरूप काही केले जाऊ शकते. यामुळे यास जिवंत दस्तावेज म्हटले गेलेले आहे.

* यास भविष्यकाळात परिवर्तनाला सामोरे जाणारी घटना म्हटलेले आहे. भविष्यात काही समस्या निर्माण झाल्यास दुसरे संविधान न बनविता संशोधन करून यास जिवंत करू शकतो.

* यासाठी हे संविधान काही प्रमाणात लवचिक तर काही प्रमाणात ताठर आहे.

* न्यायिक बाबतीत व राजनीतिक वर्तन व्यवहारांमध्ये आणि अमलबजावणीमध्ये संविधानाने आपली परिपक्वता दर्शविलेली आहे. आपले संविधान हे कायद्याचे एक बंद व जाड पुस्तक नसून एक जिवंत दस्तऐवजाच्या रूपाने विकसित झालेली आहे.

* संविधान निर्मात्यांनी भविष्यात उद्भवणाऱ्या अनेक समस्यांचा दूरदृष्टीने विचार करून अशा प्रकारच्या तरतुदीचा अंतर्भाव केलेला आहे. त्यासाठी संविधान भविष्यातील कोणत्याही आव्हानाचा सामना करण्यास सक्षम आहे.

* आपले संविधान निर्माते हे जाणून होते की, भविष्यात संविधानामध्ये संशोधनाची आवश्यकता पडणार आहे. यासाठी यास पवित्र दस्तावेज मानले. त्याचबरोबर याच लवचिकही बनविले. त्यामुळे यामध्ये आवशयकते नुसार बदल घडून आणले जातील. या वरील संविधानाच्या वैशिष्ट्यांचा महत्व पूर्ण उद्देश म्हणजेच, संविधान हे एक जिवंत आणि गतीशील दस्तावेज आहे, हे सुद्धा एक संविधानाचेच वैशिष्ट्य आहे. यामुळे संविधानाला गतिमान व क्रियाशील करण्याचा महत्त्वपूर्ण उद्देश, या वैशिष्ट्याच्या माध्यमातून स्पष्ट होतो.

जागतिक परिस्थितीचा किंवा पातळीवरचा विचार करता जवळपास सद्यस्थितीत जगामध्ये 200 च्या वर देशांमध्ये संविधान अस्तित्वात आहेत. काही देशाचे संविधान पूर्णतः लिखित किंवा अंशतः लिखित स्वरूपात आहेत. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. त्यामानाने इतर देशाचा विचार करता सोवियत संघाचे संविधान 1918 मध्ये बनवले गेले. त्यानंतर यामध्ये चार वेळा बदल केले गेले न की संशोधन केले. यानंतर सोवियत संघाचे पतन होऊन त्याचे विविध तुकडे झाले. यानंतर रूस ने 1993 मध्ये एक नवीन संविधान बनवले व आजपर्यंत त्यानुसारच कार्यभार चालतो. फ्रान्समध्ये सुद्धा जवळपास पाच वेळेस संविधानामध्ये बदल केले गेले. मात्र भारताने ब्रिटन, अमेरिका, आयर्लंड, रुस, ऑस्ट्रेलिया,जर्मनी इत्यादी राष्ट्राच्या संविधानाचा अभ्यास करून व काही बाबी स्वीकारून तसेच ब्रिटिश शासनाच्या अनेकविध नियमाची प्रेरणा घेऊन संविधान निर्माण केले.

संविधान एक गतिशील व जिवंत दस्तऐवज :-

भारतीय संविधानाचे वर्णन जिवंत दस्तावेज किंवा गतिशील दस्तऐवज असे केले जाते, यांचा अर्थ काय? हे समजून घेणे गरजेचे आहे, जसे एखाद्या सजीवाप्रमाणे संविधान देखील अवतीभोवती घडणाऱ्या विविध घडामोडींना, अनुभवांना प्रतिसाद देत असते. आधुनिक समाजात अनेक बदल होऊ नये आपले संविधान परिणामकारकपणे कार्यरत आहे, याचे कारण म्हणजे तिचा गतिशील पणा आणि जिवंतपणा हे होय. शिवाय ती बदलत्या परिस्थितीला प्रतिसाद देण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते. गतिशीलता किंवा जिवंतपणा हा संविधानाला निश्चितपणे गतिमान बनवीत असतो.याचे कारण म्हणजे आजपर्यंत देशात अनेक विघातक, अन्यायपूर्वक आणि संविधानाची पायमली करणारे कृत्य, कर्म घडलेले आहेत.शिवाय संविधानात घटनात्मक अधिकारानुसार संशोधन करण्याच्या पद्धतीचा स्वीकार करून आजपर्यंत 107 घटनादुरुस्त्या झालेल्या आहेत, त्या कशा व कोणत्या हेतूने यावर संशोधन होऊ शकते. ते देखील याच संविधानाचे गतीशील व जिवंतपणाचे लक्षण आहे. मुळात संविधानाच्या गतिशीलतेला आणि संशोधनाला राजकीय परिपक्वता अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. देशातील प्रत्येक नागरिकांनी आपली बुद्धिमत्ता व तर्कशक्तीच्या आधारावर संविधानाला योग्य पद्धतीने समजून घेतलेले आहे. व याच परिपक्वतेचा फायदा हा देशासाठी व वेगवेगळ्या घटकांच्या हितासाठी निश्चितपणे झालेला आहे. संविधानामध्ये संशोधन करणे म्हणजे संविधानिक मूलभूत ढाच्याला धक्का न लावता आवश्यकतेनुसार दुरुस्ती केली जाते. आजपर्यंत जवळपास 105 घटनादुरुस्त्या झालेल्या आहेत. यामध्ये राष्ट्रहित, जनहित लक्षात घेऊन हे महत्वपूर्ण संशोधन केले गेले. जगातील अवघ्या सदतीस हजार लोकसंख्या असलेल्या मोनॅको या देशाचे संविधान शब्दसंखेच्या बाबतीत सर्वात लहान आहे. तसेच सॅम मॅरीनो या इवल्याच्या देशाचे संविधान गेल्या चारशे वर्षांहून अधिक काळ टिकलेल्या व लागू असणाऱ्या संविधानामध्ये मोजले जाते.ते लॅटीन भाषेत

लिहिल्या गेलेली आहे. जगातील काही देशाचे संविधान हे अलिखित आहेत. कॅनडा, ऑस्ट्रेलिया,इर्जाईल,सौदी अरेबिया,न्युजिलंड,इ. कॅनडा जगातील सर्वात शिक्षित मानल्या जाणारा देश आहे, येथेही अलिखित संविधान आहे. अलिखित संविधान असणे म्हणजे शासन कारभार कसा चालतो यावर काही प्रश्न निर्माण होतात, तर तेथे काही कायदे, नियम पूर्वीचेच बनविलेले असतात आणि त्या आधारेच तेथे कारभार चालतो.

सारांश :-

संविधानाद्वारे सरकारच्या उद्देशांना स्पष्ट केले जाते. शासनाच्या रचनेला स्पष्ट केले जाते. नागरिकांच्या अधिकार व स्वातंत्र्याचे रक्षण केले जाते. राजांना वैचारिक समर्थन, वैधता प्रदान केली जाते. भविष्यकालीन किंवा दूरदृष्टीने एक आदर्श शासन रचना निर्माण केली जाते. यामुळे यास एक दस्ताऐवज म्हटलेले आहे. यामध्ये जिवंतपणा किंवा गतिशीलता आहे असे का म्हटले गेले, याचे जिवंत उदाहरण म्हणजे या संविधानाच्या माध्यमातून नागरिकांचे अधिकार सरकारचे अधिकार व शक्ती आणि त्यांचे कामकाज, तसेच कामकाजाच्या पद्धती याचे नियमन व निर्धारण केले जाते. शिवाय हे परिवर्तनशील आहे, ही स्थायी किंवा गतीहीन नाही. वेळेनुसार काळानुसार येथील प्रावधाननामध्ये संशोधन केले जाते. यामध्ये राजकीय हेतू किंवा सोय ही न पाहता काळाची गरज प्रमुख मानली जाते. म्हणून भारतीय संविधानाच्या बाबतीत बदल करण्याच्या कितीही वावड्या उठविल्या जात असल्या तरी, कलम 368 नुसार यामध्ये संशोधन करण्यासाठीची तरतूद करून ठेवलेली आहे न की बदल करण्याची.

संदर्भ :-

1. काश्यप सूभाष,1995, हमारा संविधान, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली.
2. गायकवाड जयदेव,2008, संविधान सभेत डॉक्टर आंबेडकर, पद्म गंगा प्रकाशन, पुणे.
3. गायकवाड प्रदीप(संपा), 2014, संविधान सभेतील वाद-विवाद, समता प्रकाशन, नागपूर.
4. जोशी /शिरापूरकर,2022, भारतीय राज्यघटना तत्व आणि व्यवहार, युनिक अकादमी पब्लिकेशन्स, पुणे.
5. के सागर/पाटील,2001, भारताची राज्यघटना, सागर पब्लिकेशन्स ,पुणे.

महिलांना व्यावसायीक करीअरची संधी

डॉ.सतिश हरलाल पारधी

कै.न्हानाभाऊ मन्साराम तुकाराम पाटील कला महाविद्यालय,मारवड ता.अमळनेर जि.जळगांव (महाराष्ट्र

ई मेल—satishprd82@gmail.com, भ्रमणध्वनी—९९६०९४१२०३

प्रस्तावना—

देशाच्या प्रगतीबरोबरच महिलांनी देखिल आत्मनिर्भर होण्याची इच्छाशक्ती निर्माण केली आहे. जागतिक स्तरावर स्त्री—पुरूष असा लिंगभेद केला जात नाही. घरकामगार म्हणूनच महिलांची ओळख केली जाते. परंतू न्युयॉर्क हे अमेरीकेतील पहिले असे राज्य ठरले की जेथे घरकामगारांच्या हक्कासाठी,न्यायासाठी २०१० मध्ये कायदा पास करण्यात आला. घरकामगारांच्या हक्कासाठी ब्राझील,दक्षिण आफ्रिका,स्पेन,उरूग्वे या देशांमध्ये आधीपासूनच कायदे करण्यात आले. याचा अर्थ महिलांच्या अधिकारासाठी त्यांना न्याय व त्यांच्या हक्कासाठी आंतरराष्ट्रीय स्तरांवर देखिल मोठया प्रमाणात चळवळ सुरू झाली आहे. निसर्गत:च स्त्रि—पुरूष स्वंतत्र आहे. भारतात वर्षानुवर्षे चालत आलेल्या रूढी,पंरपरा,चालिरीती,अंधश्रध्दा यामूळे स्त्रिला नेहमी दुय्यम स्थान दिले गेले. स्त्रिला देखिल मन आणि भावना आहेत. ती आपले मत व्यक्त करण्यासाठी स्वतंत्र आहे याची आज तिला जाणीव झाली आहे. प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे आणि मोफत केल्यामूळे मुला—मुलींना शिक्षणाची नवी दिशा मिळाली आहे. भारत हा खेडयांचा देश आहे. खेडयात पायाभूत सुविधांचा अभाव असल्यामूळे मुलींच्या साक्षरतेचे प्रमाण कमी होते. परंतू आज परीस्थिती बदलली आहे. मुलांपेक्षा मुलींमध्ये शिक्षणाविषयी जाणीव निर्माण झाली आहे. एकेकाळी शिक्षणाच्या प्रवाहापासून लांब असणाऱ्या मुली उच्च शिक्षण घेवून देशाच्या विकासात आपली कामगिरी पार पाडत आहे. पुर्वीच्या काळी स्त्रियांना मिळणारा दर्जा पुरूष वर्गाच्या तुलनेत निम्न स्वरूपाचा होता. घरातील सर्व निर्णय पुरूषांकडून घेतले जायचे. परंतू आज बदल होत गेला आणि पुरूषांप्रमाणेच महिलांना देखिल निर्णय घेण्यात स्थान प्राप्त झाले आहे. नागरी भागातील महिला चार भिंतीच्या आत न राहता प्रत्येक क्षेत्रात त्यांनी आपली कामगिरी दाखविली आहे. महिलांवर अनेक प्रकारचे अन्याय,अत्याचार होत गेले. महिलांनी फक्त ''चूल आणि मूल '' सांभाळावे अशी सर्वसामान्य विचार लोकांमध्ये रूढ असल्याचे दिसत होता. सासरी गेलेल्या मुलीविषयी बहिणाबाई चौधरी आपल्या कवितेतून लिहितात

'' उठ सासुरवाशिन बाई
सुरू झाली वटवट कातवली वो सासू
पुस डोयांमधले आसू
उठ सासुरबाशिन बाई
घे सोसीशन घे घालू नको वो वाद
कर माहेरची याद''

सासरी गेलेल्या मुलींवर अनेक प्रकारचे अन्याय,अत्याचार,छळ हा केला जात असे. ज्यामूळे महिलांवरच्या अत्याचारात वाढ होत होती. आज कायद्यात अपेक्षित बदल होत गेला याचा परीणाम अत्याचाराच्या घटना काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे—

१. महिलांना देखिल पुरूषांच्या बरोबरीने काम करण्याची संधी मिळाली आहे याचा अभ्यास करणे.
२. महिलांनी स्वयंरोजगारातून आर्थिक उन्नतीचा मार्ग निवडला आहे याची चिकित्सा करणे.
३. महिला स्वत: पुढाकार घेवून आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्न करीत आहे याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहिते—

१. समाजामध्ये पुरूष—महिला असा लिंगभेद न राहता पुरूषाप्रमाणेच महिलांनी देखिल सर्वच क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे.
२. महिलांनी पुढाकार घेवून आपल्या न्याय व हक्कासाठी पुढे सरसावल्या आहे.

संशोधन पध्दती—

प्रस्तुत शोधनिबंधाच्या लेखनासाठी प्राथमिक सामुग्रीतून निरीक्षण तंत्राचा व द्वितीयक सामुग्रीतून प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ,मासिके इंटरनेट यासारख्या स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाचे महत्व—

प्रस्तुत संशोधनातून महिलांनी आत्मनिर्भर होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करण्यात आला आहे. महिलांसाठी तर संशोधन कार्य उपयुक्त तर आहेच शिवाय पुरूषांसाठी देखिल मार्गदर्शक ठरेल. समाजातील प्रत्येक घटक विद्यार्थी, संशोधक,शासनकर्ते यांच्यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य उपयुक्त आहे. बचत गट,महिला शेतकरी,विविध व्यवसायात काम करणाऱ्या महिला, नोकरी अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी फक्त 'चूल आणि मूल' न सांभाळता आत्मनिर्भर होण्यासाठी टाकलेले पाऊल समाजासाठी दिशादर्शक आहे.

बचत गटातून साकारला महिलांनी आर्थिक उन्नतीचा मार्ग—

बचत गटाच्या माध्यमातून महिलांना विविध प्रकारचे व्यवसाय सुरू करण्यास प्रेरणा मिळाली आहे. पुरूषांप्रमाणेच महिला देखिल कुंटुब प्रमुख म्हणून आपली भूमिका पार पाडू शकते हे बचत गटाच्या माध्यमातून उभ्या केलेल्या व्यवसायातून त्यांनी दाखवून दिले आहे. समाजातील बहुतेक मुली या शिक्षणापासून वंचित असून त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाही. अशावेळी शेतमजूरी,पाल्या—भाज्यांची विक्री,डिंक,मध यांची विक्री करून आपला उदरनिर्वाह करण्याचा ते प्रामाणिक प्रयत्न करतांना दिसतात. परंतू त्यांना देखिल आत्मसन्माने रोजगार मिळविण्याची संधी उपलब्ध झाली पाहिजे व आपल्या परीवाराच्या आवश्यक गरजा पूर्ण करू शकतील एवढे उत्पन्न त्यांना मिळण्याची अपेक्षा असते.

दारीद्रय रेषेखालील महिलांना जीवन जगण्याचा मार्ग मिळावा यासाठी प्रा. चंद्रकला भार्गव यांनी घेतलेली भूमिका महत्वाची आहे. आपली वैवाहिक जबाबदारी सांभाळत असतांनाच त्यांनी पुणे आणि लातूर या दोन जिल्हयामध्ये अध्यापनाचे कार्य केले. दारिद्रयात जीवन जगणाऱ्या महिलांचे आर्थिक प्रश्न सोडविले पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न करायला सुरूवात केली. आपल्या परीसरातील खेडयात जीवन व्यतीत करणाऱ्या अनेक महिलांना देखिल स्वावलंबी होण्याचा मार्ग मिळाला पाहिजे या विचारामूळे त्यांनी १९७६ साली ''आदर्श महिला गृह उद्योग'' लातूर येथील संस्थेच्या अध्यक्षा म्हणून त्यांनी आपली जबाबदारी पूर्ण केली. महिलांना सामाजिक,आर्थिक,राजकीय शैक्षणिक संधी बरोबरच आरोग्यविषयक सुविधा मिळाल्या पाहिजे यासाठी त्यांनी आपले कार्य केले. शिवाय समाजात सतत होणारे महिलांवरील अन्याय,अत्याचार बंद झाले पाहिजे यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले.

ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्या महिलांना देखिल रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजे. त्यांच्यात व्यवसायभिमुखता निर्माण झाली पाहिजे यासाठी ३५० बचत गटात ४,००० महिलांना सदस्यत्व दिले. विशेष बाब म्हणजे यात ७० टक्के महिला या दारीद्रयरेषेखालील व मागासवर्गीय आहे.

कोणताही व्यवसाय सुरू करावयाचा असेल तर सुरूवातीला त्याचे प्रशिक्षण देणे गरजेचे असते यासाठी त्यांनी विविध व्यवसायाच्या प्रशिक्षणासाठी शिबीरांचे आयोजन केले. दुग्धव्यवसाय,कुक्कुटपालन,चपलांचे दुकान,वीटभट्टी,बांगडयांचे दुकान,शिलाई,ज्युट बॅग,मशीन एम्ब्रॉयडरी,रीबीन वर्क,संगणक,ब्युटी पार्लर,फॅशन डिझायनिंग या महत्वपूर्ण व्यवसायाच्या प्रशिक्षणांवर भर देवुन महिलांमध्ये स्वंयरोजगारासाठी आत्मविश्वास निर्माण केला. शेतीच्या शाश्वत अशा विकासावर देखिल या बचत गटाच्या माध्यमातून लक्ष केंद्रीत केले गेले. यात गांडूळखत निर्मिती,कंपोस्ट खत,सेंद्रीय शेती बरोबरच आयुर्वेदिक वनस्पती लागवडीच्या माध्यमातून रोजगाराची निर्मिती झाली आहे. बचत गटाच्या माध्यमातून प्रा.चंद्रकला भार्गव यांनी दारीद्रयरेषेखालील व मागासवर्गीय महिलांमध्ये एक नवीन आत्मविश्वास निर्माण केला. रोजगार,उत्पन्न,राहणीमानात सुधारणा झाल्यामूळे महिला स्वाभिमानाने जीवन जगु लागल्या.

महिला शेतकऱ्यांनी घेतली गगणभरारी—

भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान आहे. एकूण लोकसंख्येच्या सुमारे ५५ टक्के लोकसंख्या ही कृषीवर अवलंबुन आहे. असे असतांना शेतीचे मान्सुन स्वरूप,बी—बीयाणांच्या वाढत्या

किंमती,खतांच्या वाढत्या किंमती, वाढती शेतमजूरी,वाढते कर्जबाजारीपणा,अन्नधान्य व भाजीपाल्याला मिळणारी कमी किंमत या व इतर कारणांमूळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ न होता शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरूच आहे.

शेतीतील प्रतिकूल परीस्थितीत बदल घडवुन आणण्यासाठी महिला शेतकरी पुढे सरसावल्या आहे. कमी कष्टाची कामे महिलांनी तर अधिक कष्टाची कामे पुरूषांनी केली पाहिजे असा विचार समाजात रूढ असल्याचे चित्र दिसते. परंतू आता परीस्थिती बदलली आहे. महिलांनी प्रत्येक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे. त्यात शेती क्षेत्र मागे नाही. महिलांनी शेती क्षेत्रातील बदल घडवुन आणण्यासाठी जमिनीची सुपीकता कशी टिकवून राहिल यावर भर दिला आहे. यासाठी बी—बीयाणे,सेंद्रीय खते,नैसर्गिक किटकनाशके,जलसिंचनाच्या सुविधा याचा अभ्यास करून शेती ही पोषकतेबरोबरच विषमुक्त कशी होईल आणि जमिनीच्या आरोग्याबरोबरच मानवी आरोग्याचा देखिल त्यांनी विचार केला. वारंवार रासायनिक खतांचा वापर केल्यामूळे जमिनीची सुपिकता खालावते हे महिला शेतकऱ्यांनी जाणले. किडीचा प्रादुर्भाव झाल्यास लिंबोण्या,गोमुत्र आणि मिरची पावरडरचा वापर केला जावून यामूळे पिकांवर आलेल्या किडीवर नियंत्रण मिळविता येते हे त्यांनी ओळखले आहे.

जमिनीतील सुक्ष्म—जीवजंतुचे देखिल संगोपन झाले पाहिजे ज्यामूळे जमिनीतील सुपीकता टिकून राहिल हे त्यांच्या लक्षात आले. शेतीबरोबरच शेतीपूरक अशा व्यवसायातून रोजगाराबरोबरच शेतीला आवश्यक असणारे सेंद्रीय खत देखिल मिळते म्हणून त्यांनी शेळया—मेंढया,गाय,म्हैस,कोंबडीपालन व्यवसाय देखिल सुरू करून आपले करीअर घडवित आहे. गांडूळखत निर्मितीवर भर देवून जमिनीची सुपीकता टिकवली. महिलांनी पुढाकार घेवून सेंद्रीय खत तयार करणे, गावराण बी—बीयाणे, निसर्गत: उपलब्ध घटकांच्या मदतीने किटकनाशके तयार करून पोषणयुक्त अशा शेतीवर भर दिला आहे. मराठवाडयातील सुमारे २०,००० महिला शेतकऱ्यांनी आपला यशस्वी प्रयोग करून आपला उन्नतीचा मार्ग निवडला आहे. काही वर्षापुर्वी या भागातआलेल्या भूकंपानंतर 'स्वयशिक्षण प्रयोग' नावाची संस्था स्थापन करून या संस्थेमार्फत महिलांनी केलेल्या कामाची दखल एक्केटोर प्राइज २०१७ हा जागतीक पातळीवरचा सन्मान देवून महिलांचा गौरव करण्यात आला. महिला या नोकरी बरोबरच अनेक व्यवसायात सक्रियरीत्या भाग घेत असल्यामूळे त्यांना रोजगार,उत्पन्न,राहणीमानाबरोबरच समाजामध्ये पुरूषांच्या बरोबरीने सर्व अधिकार मिळत आहे.

सारांश—

समाजात महिलांना हक्काची जाणीव झाली पाहिजे यासाठी युनोने स्त्रिदशकाच्या निमित्ताने जाहिर केले की, जगातील व्यवस्था ही स्त्रियांच्या विरोधातली आहे व याची जाणीव स्त्रियांना होण्यासाठी १९७५ मध्ये मेक्सीकोतील पहिली जागतिक महिला परीषद,१९८० मध्ये कोपनहेगन येथे दुसरी जागतिक महिला परीषद,१९८५ मधील नैरोबी येथील महिला परीषद आणि १९९५ मधील चीन येथे पार पडलेली जागतिक महिला परीषद. या परीषदांमध्ये जास्तीत जास्त महिलांना सहभागी करून महिलांच्या समस्यांवर चर्चा करण्यात आली. यातून महिलांना देखिल आपल्या अधिकाराची जाणीव झाली. भारत सरकारने महिला सबलीकरणाचे वर्ष म्हणून २००१ वर्ष घोषीत केले.

महिला संयुक्त कुटुंबाचा एक भाग होत्या परंतू त्यांना आत्मनिर्भर होण्याची संधी कमी प्रमाणात उपलब्ध होती. त्यांनी घरातील कामे सांभाळावी ही त्यांची जबाबदारी मानली जायची. परंतु महिलांनी आज संयुक्त कुटुंबापेक्षा स्वंतत्र परीवारास प्राधान्य दिल्याचे चित्र दिसते. स्त्रिशिक्षणाबरोबरच स्त्रियांना त्यांचे अधिकार द्यायचे असेल तर पुरूषांनी देखिल स्त्रियांना आदराचे स्थान दिले पाहिजे. स्त्रियांविषयी चालत आलेले मत पुरूषांनी परीवर्तन केले पाहिजे आणि तीला देखिल आत्मनिर्भर बनण्यासाठी, तीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी संधी दिली पाहिजे. बऱ्याचशा महिलांनी कुठल्याही प्रकारचे औपचारीक शिक्षण न घेता देखिल त्यांनी व्यवस्थापन आणि वस्तुच्या विक्रीचे कौशल्य आत्मसात केले आहे. महिलांनी अनेक व्यवसायात आपले अनमोल असे योगदान दिले असून उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटविला आहे. महिला आता उद्योजक होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विविध तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण घेत आहे. येणाऱ्या काळात महिला उद्योजकांची संख्या मोठया प्रमाणात देशात

होईल असा आत्मविश्वास त्यांच्या कार्यातून दिसून येतो. जलद गतीने देशाचा विकास होण्यासाठी स्त्रियांना देखिल पुरूषांप्रमाणे सर्व अधिकार प्राप्त झाले पाहिजे.

संदर्भ—

१. चौधरी बहिणाबाई(२०१२),बहिणाबाईची गाणी,सुचित्रा प्रकाशन,मुंबई पृ.क्र.६०
२. बाळ विद्या(२०१७), मिळून साऱ्याजणी,गीताली वि.म.पिक्सो प्रिंटर्स,पुणे पृ.क्र.२२—२३
३. बाळ विद्या(२०१७), मिळून साऱ्याजणी,गीताली वि.म.पिक्सो प्रिंटर्स,पुणे पृ.क्र.३४—३६
४. बाळ विद्या(२०१७), मिळून साऱ्याजणी,गीताली वि.म.पिक्सो प्रिंटर्स,पुणे पृ.क्र.१४—१५
५. बोबडे प्रकाश(२००१),भारतीय समाजरचना पारंपरीक व आधुनिक,श्री मंगेश प्रकाशन,नागपूर, पृ.क्र. २५७—२६८
६. देशपांडे विजय,बर्दापुरकर(१९९८),भारतीय सामाजिक संरचना,विद्या बुक्स पब्लिशर्स,औरंगपुरा,औरंगाबाद पृ.क्र.१५७—१६३
७. बाळ विद्या (फेब्रुवारी २०१५), मिळून साऱ्याजणी,गीताली वि.म.पिक्सो प्रिंटर्स,पुणे पृ.क्र.४६—४७
८. बाळ विद्या (में २०१५), मिळून साऱ्याजणी,गीताली वि.म.पिक्सो प्रिंटर्स,पुणे पृ.क्र.२५
९. कच्छल दिपीका(सप्टेंबर २०१६),योजना,भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून प्रकाशन,नवी मुंबई पृ.क्र.४०

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CCCXCVI) 396
ISSN : 2278-9308
February, 2023

समर्थाच्या शब्दातुन व्यवस्थापनाचे सुत्र

डॉ. अनिल श्री खांडेकर
भारतीय महाविद्यालय, अमरावती.

प्रस्तावना

ज्या समाजाचे पुनरूत्थान झाले तेथे ज्ञान आणि शक्तीची पूजा यांनाच महत्व दिले गेले. त्यांच्या संदेश जपानच्या पुर्ण निर्मितीस फार उपकारक सिध्द झाला. इटली, जापान, जर्मनी, अमेरिका आणि आजचा संपन्न चिन ही सर्व ज्ञान व शक्ती उपासनेतुन स्पष्ट झालेली राष्ट्रे आहेत.

समर्थाच्या विचारात नेतृत्वाला सर्वात महत्वाचे स्थान आहे. तर संघटन हे महत्वाचे क्षेत्र आहे. या संदर्भात थिओडोर रूझवेल्ट यांचे विचार समर्थाच्या विचारांशी आजच्या काळात कालसंगत आणि उपयुक्त वाटतात. नेत्या अभावी रूंजी घालावी, मार्गदर्शन प्राप्त करावे मक किस्नेन या संघटन विकासाच्या प्रक्रियेला त्यांच्या मते जेथे नेतृत्व आणि अनुयायी यांच्या मनात एकरूपता असते. नेता गुंणवत, आचारवंत, आणि क्रियावंत असावा. नेतृत्वाविषयी अपेक्षा पुढील शब्दातुन केली.

अखंड सावधान असावे । दुश्चित कदापि नसावे
तजविजा करीत बसावे । एकांत स्थळी
काही उग्र स्थिती सोडावी । काही सौम्यता धरावी
चिंता लागावी परावी। अंतर्यामी
मागिल अपराध शमावे । कारभारी हाता धरावे
सुखी करुनी सोडावे । कामाकडे

नेतृत्वाची वैशिष्टे :—

नेत्याने विविध देशांत, विविध जनस्थानावर लोक पाहून अभ्यासावे. जेथे जग असते तेथे जगन्नायक असतो. समर्थांनी महंत नायकाची (Leader) कल्पना मांडली आहे. त्यांचे नेतृत्वाचे प्रतिमान विविध गुण — वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. त्यांचे वैशिष्टये पुढील प्रमाणे तो नि:स्पृह आणि विरक्त आहे निस्वार्थी आणि सश्रध्द आहे. तो लोकांच्या सुखाचा विचार करणारा आहे. तो उद्योगशिल आहे. इतरांच्या हितांचा विचार करणारा आहे. तो स्वत: प्रचिती घेऊन इतरांना शिकविणारा आहे. अखंड सावधानता व लोकसंग्रहाची कुशलता तसेच कल्याणाच्या विविधयोजना आणि मार्ग शोधणारा तो दृष्ट आहे.

उपाधीपासुन सुटला । तो नि:स्पृहपणे बळावला
जिकडे अनुकूल तिकडे चालिका । साधकास
किर्ती पाहता सुख नाही । कोठे तऱ्ही
धीर सांडीता काय होते । अवघे सोसावे लागते
नाना दु:खी नाना मते । शहाणा जाणे ।

या ओव्यांवरून समर्थाची नेतृत्वाची कल्पना अगदी सुस्पष्ट होते.

उदिष्ट :—

१. समर्थांच्या शब्दातून व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.
२. समर्थांनी सांगितलेल्या काव्यातुन नेतृत्व गुणाविषयी चर्चा करणे.
३. व्यवस्थापनातील गाढे अभ्यासक व समर्थांनी मांडलेल्या विचारांची एकरुपता अभ्यासणे.

संशोधन मर्यादा :—

सदरहू संशोधन हे विविध जर्नलर्ज वेबसाईट, वृत्तेपत्रे, कार्यवृत्त, पुस्तक यांचा माध्यमातुन प्राप्न दूय्म माहितीवर आधारीत असून या संदर्भात उपलब्ध माहितीच्या तथ्यांशाचि पडताळणी केलेली नाही.

नेतृत्वाची रचना :—

रामदासांनी नेतृत्वाची संकल्पना आखतांना त्याच्या विविध अंगांचा विचार केला त्या विचारातील आदर्श नेतृत्व, ज्ञानसंपन्न आणि चारित्रसंपन्न आहे या आकृतीवरून त्यांच्या मनातील आदर्श नेतृत्वाची संकल्पना स्पष्ट होते. जॉर्ज होमान्स यांनी नेतृत्वाची खरी कसोटी काय यांचे उलर

देतांना गुणग्राहकता, सावधानता, योग्य मार्गदर्शन करण्याची क्षमता, आत्मसन्मानाची भावना व सचोटी हे गुण महत्वाचे मानले आहे. समर्थांचे मेहंत नेता होमान्स व खिस अर्याटीस यांनी आदर्श मानलेले नेता या मधील साम्य पुढील प्रमाणे

नेतृत्व महंताचे गुण	होमान्स अर्याटीस यांचा व्यवस्थापक नेता
अखंड सावधानता	व्यवस्थापकाने समग्र परिस्थितीचे आकलन केले पाहिजे
समन्वयाची क्षमता	अशक्य वाटणारे आदेश देऊ नये
समुहानुवती	व्यवसायात, संघटनेत शिस्त आणण्याचे कार्य नेतृत्वाचे आहे.
चरित्र	नेत्याने स्वत:ला ओळखले पाहिजे
स्वतंत्रवृत्ती	नेतृत्वाने स्वत:चे महत्व व त्याग कायम राखले पाहिजे
संदेशवहनाचे कौशल्य	आदेश देण्यासाठी, माहितीच्या आदान—प्रदानात औपचारिक मार्गाचा वापर करावा
संघवृत्ती	नेत्याने समुहाच्या विचारांचा आदर करावा

समर्थाच्या पूर्वोपासूनच सतत चारशे वर्ष महाराष्ट्र सांस्कृतिक धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक अध:पात सातत्याने होत होता या समाजाला सावरण्यासाठी केवळ पारमार्थिक उन्नतीचा विचार पुरेसा नाही. धर्म, समाज संघटीत ही असला पाहिजे शक्तीशाली झाला पाहिजे राजकरण, धर्मकारण, समाजकारण यांची सांगड घातली जावी यासाठी लोकसंग्रह आणि लोकसंघटन हा त्या काळाला वेगळा वाटणारा प्रभावी विचार मांडला संघटन केवळ धर्म व संप्रदायाच्या विस्तारासाठी नाही. समाज उन्नतीसाठी हा समाजसापेक्ष विचार पटवून दिला महाराष्ट्र धर्म समाजाच्या विकासाच्या संघटीत प्रयत्न होता नेता हा योजक आहे आचार, विचार, प्रचार, व्यवहार, लोकोत्तर दृष्टीकोन (परमार्थ) या सर्वच निकर्षावर चांगले व्यक्तिमत्व निर्माण व विकसित असणे आवश्यक आहे बौध्दिक दृष्ट्या श्रेष्ठ दर्जाचा व गुणनायक हवा रिचर्ड स्टोम यांनी व्यवस्थापकीय वृत्तीचे खरे रहस्य मांडले आहे.

कर्मचारी व्यवस्थापन :—

समर्थांनी ज्या प्रकारे अनुयायी विकासाचा विचार केला तसा शास्त्रीयरीत्या युगात कोणी केला नाही. व्यक्ती या दृष्टीने जे स्वभावसिध्द सद्गुण आहेत त्यांचा विचास करण्यावर त्यांनी प्राथमिकतेने भर दिला. व्यक्ति गत स्वार्थाच्या पलीकडे जाऊन विचार, प्रत्यक्ष कृती यांचा मेल समाजहिता मध्ये झाला पाहिजे आपल्या मनाला संघ हितापेक्षा अधिक महत्व देऊ हा विचार वारंवार मांडला.

त्याची उत्पादकता आणि कार्यक्षमता कमी आहे. त्याला आपले कार्य आत्मीयतेने करावेसे वाटत नाही, त्याची कामा प्रती निष्ठा नाही आणि तो स्व:ताला व्यवस्थापनाचा, व्यवसायाचा घटक मानण्यात तयार नाही. अशा वेळी समर्थांनी व्यवस्थापनातील सूत्रे खरोखर आचरणीय आहेत.

१ज्ञान हाच देव मानावा आणि सतत काहीतरी शिकत राहावे.

२संघटनेतील स्वत:वर सोपविलेले कार्य, भूमिका आणि मर्यादा प्रत्येकाने नित्य ध्यानात ठेवाव्यात.

३उत्तम अनुयायी स्वत:ची प्रतिमा निर्माण करण्यावर भर देतात व सर्वसमावेशक धोरण स्विकारणे.

४वक्तशिरपणा, नियमांचे पालन, सुसूत्रपणे वागण्याची पद्धत आणि संस्थेवर निष्ठा हि संघटनेची चतु:सुत्री आहे.

५उत्कृष्ट कर्मचारांची वर्तणूक, चालणे, बोलणे, आणि शिष्टाचार यामध्ये एक सावधपणा, नेमकेपणा असतो.

'' राखावी बहूतांची अंतरे ! भाग्य येते तदनतरे यावर तो विश्वास ठेवावा.

६चांगल्या कर्मचारांच्या मनात संघटेनविषयी एक निश्चित जाणीव असते. तिचे संगोपन करणे हेच चांगल्या संघटेनेचे वैशिष्टय आहे.

महंत आणि यशस्वी व्यवस्थापक यामधील साधर्म्यदर्शक

निस्पृहवृत्ती
चातुर्य आणि धूर्तपणा
अनुयायी निर्मिती
ज्ञानत्राप्ती आणि ज्ञानर्जनाची क्षमता
विवेकवादी दृष्टीकोन
पुर्वानुमत आणि भवितव्याचा वेध घेण्याची कला
आचार, विचार, प्रचार आणि व्यवहार यांचा योग्य पध्दतीने वापर करणारा योजक

आधुनिक व्यवसायातील नितीमुल्ये व समर्थाचा विचारातील एकरुपता —

आधुनिक व्यवस्थापनात विशेषत: २१ व्या शतकाच्या प्रारंभी तरी व्यावसायिक नीतीमूल्यांची संकल्पना विशेष महत्वाची मानण्यात येत आहे.

१लोकजागृती :— समर्थ कालीने तत्वे

खरा नायक जनजागृती करणारा असतो तो आपल्या अनुयायांना विवध घटकांना पुढे नेण्याचे काम करतो. त्यांना चैतन्यवत करण्याचे कार्य करतो.

व्यवस्थापकानातील तत्वे —

व्यवस्थापकाने देखील आपल्या संस्थेप्रती तिची उप्तादने व सेवा याबाबत जागृती निर्माण करावी हि अपेक्षा उच्च व्यवस्थापनाव्दारे व्यक्त केली.

२गुणग्राहकता :— समर्थ कालीने तत्वे

इतरांतील चांगले गुण पारखून त्यांना उत्तेजन देणे महतांचे खरे कार्य आहे.

व्यवस्थापकानातील तत्वे —

व्यवसायातील सर्वच सहकारी व अनुयायांचे गुण ओळखुन त्यांना श्रेष्ठ कार्यासाठी प्रेरणा देले. त्यांच्या लायकी व क्षमतेचा पूर्ण वापर करणे. हे आव्हान आहे.

३कार्यतत्परता :— समर्थ कालीने तत्वे

समर्थाचा सर्वाधिक भर कार्यतत्परतेवर आणि कार्यक्षमतेवर आहे. तत्पर व झपाट्याने कामे करणारी, आळशी नसणारे माणसे महंताना योग्य वाटतात.

व्यवस्थापकानातील तत्वे —

आजच्या आधुनिक व्यवस्थापनाचा परवलीचा शब्द कार्यक्षमता हाच आहे कार्यक्षम आणि तत्पर व्यवस्थापक अनेक संकटावर मात करतो तो सामान्य समस्यांचे योग्य प्रकारे निराकरण योग्य प्रकारे करू शकतो.

४संदेशवहनातील :— समर्थ कालीने तत्वे —

समर्थाचा योग्य आणि मृदू संदेशवहनावर पुर्ण विश्वास आहे. संदेशवहन संवाद साधणारे असावे योग्य प्रकारे विचारांचे आदानप्रदान करता येणे हे श्रेष्ठ जीवनमूल्य आहे.

व्यवस्थापकानातील तत्वे —

आधुनिक व्यवस्थापनात देखील संदेशवहना इतके महत्वपुर्ण व्यवस्थापकिय कार्य दुसरे कोणतेच नाही व्यवस्थापकीय समस्यांचे मुळ कारण संदेशवहनातील दरी आहे असे मानले जाते.

एकाग्रता आणि कष्टाळुपणा :— समर्थ कालीने तत्वे —

कोणत्याही कार्याचे यश, सातत्य, कष्ट आणि एकाग्रतेच्या त्रिसुत्रीवर आधारीत असते. समर्थांच्या मते जीवनात आणि सामाजिक कार्यात तीन गुणांची कास धरणारी माणसे मोठी मजल मारतात.

व्यवस्थापकानातील तत्वे —

व्यावसायीक व्यवस्थापनात देखिल कष्टाळू वृत्ती, जिद्द, सातत्य आणि एकाग्रता हेच गुणविशेष महत्वाचे आहेत व्यवस्थापक यासाहाय्याने यशाचा मोठा पल्ला गाठतात व सर्वाधिक यशस्वी होतात.

निकर्ष :—

व्यवस्थापनाला नैतिकतेचे अधिष्ठान असले पाहिजे. व्यवसायाचे व्यवस्थापन करतांना कोणत्या नीतीतत्वांचा आग्रह धरण्यात यावा. तत्कालीन नितीमत्तेची व जीवनाची आधारभूत मानण्यात आलेली मुलतत्वे आणि आजच्या व्यवस्थापकीय संदर्भात प्रमाण मानण्यात आलेली मुल्य व तत्वे याचे विवेचन केले जाते. समाजातील विविध घटक आणि माणसे एकत्र यावयास हवी त्यांना एकत्र आणणारे नेतृत्व हवेच. यासाठी समर्थांनी कुशल नेतृत्वाची योजना महत्वाची मानली आहे. व्हर्जीनिया ॲलन यांनी देखील नेतृत्वाची खरी कसोटी म्हणजे समाजात परिवर्तन घडवुन आणणे हीच मानली जाते.

संदर्भ ग्रंथ सुची :—

१समर्थांचा व्यवस्थापन बोध प्रकाशन श्री अक्षर ग्रंथ प्रकाशन बोरिवली — डॉ. संजय कप्तान

२व्यवसाय प्रबंध के सिद्धांत डॉ. आर सी. गुप्ता

३औद्योगिक प्रबंधक एवं उद्यमीयता विकास — संजय कुमार गुप्ता

4 Prinicipal of business management Dr.S.C.Saksena sahitya bhavan publication.

समाजातील स्त्रिया, दर्जा व अधिकार

प्रा डॉ दीपक आनंदराव चौरपगार

प्रमुख समाजशास्त्र विभाग गुलाम नबी आझाद कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बार्शीटाकळी जि. अकोला

deepakchaurpagar@gmail.com 9767771662

प्रस्तावणा

स्त्रिया या जगाच्या लोकसंख्येमध्ये अर्धा हिस्सा म्हणून समजल्या जाते तीला मोठ्या पेमाणे अर्धांगिनी म्हटले जाते. मात्र अजूनही स्त्रियांच्या मानवी हक्कांचे हणन सातत्याने होत असल्याचे दिसून येते. त्यामध्ये लिंग भेद असेल लिंगभेदावरून होत असलेल्या हिंसा असेल हे मोठ्या प्रमाणात समाजात भेडसावत आहेत. भारतातीलज्ञान, परंपरा आणि स्त्री शिक्षणाचा आढावा घ्यायचा झाल्यास आपल्याला प्राचीन कालीन स्त्रीयाचं जीवन पाहणे आवश्यक आहे. भारतीय समाजव्य वस्थेत वेदकाळातील स्त्रिया मानाने जीवन जगत होत्या. पुरुषा प्रमाणे स्त्रियांनाही स्वातंत्र्य होते. जीवनाला समृध्द करणारे शिक्षण त्या मुलांच्या बरोबरीने घेत असत. त्यामुळे स्त्रीची एक उज्वल प्रतिमा त्या काळात होती. स्त्रीला सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक स्वातंत्र्य तर होतेच पण जोडीदार निवडण्याचे ही पुरे पुर स्वातंत्र्य होते. त्यामुळे समाजाकडून ती सुर क्षित होती. पण मध्ययुगीन समाजव्यवस्थे मध्ये स्त्रीयांवर अनेक बंधने लादल्या गेली. त्यानं स्त्रियांची स्थिती बऱ्यापैकी सुधारली डॉ. बाबासाहेब आंबेडकराने भारतामध्ये असणारी अर्धी शक्ती जर आपण प्रवाहात आणली नाही तर आपली प्रगती होऊ शकत नाही हे ओळखले म्हणून स्त्रियांना शिक्षणाच्या प्रवाहा मध्ये आणण्यासाठी अनेक योजना संविधानाच्या माध्यमातून राबविल्या. त्यामुळे ही अर्धी शक्ती खऱ्या अर्थाने भारत स्वातंत्र्य झाल्या नंतर प्रवाहात आणल्या गेली. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने काम करताना आपण पाहतो आहे .याच संपूर्ण श्रेय घटनाकारांना जाते. हा प्रगतीचा वेग असा आपल्याला महासत्ता बनण्यापासून कोणी ही रोखू शकत नाही

उद्देश:

1. स्त्री जिवणाच्या विविध विकासावर चर्चा करणे.
2. भारतातील स्त्री व तिचा दर्जा चा आढावा घेणे.

भारतामध्ये करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणानुसार दर २४ मिनिटाला एक स्त्री आजही लैंगिक शोषणामध्ये ती अटकत आहे म्हणजेच दर ४३ मिनिटांनी अपहरण तर ५४ मिनिटाला बलात्काराने ते बळी ठरत आहेत अशा या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अशा या संवेदनशील वातावरणामध्ये अशा या धर्मनिरपेक्ष भारतामध्ये संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार दर आठ सेकंदाला एक स्त्री लैंगिक शोषणाला बळी पडताना दिसत आहे. एकूणच या आकडेवारीवरून जगामध्ये स्त्रियांच्या मानवी हक्कांचे किती मोठ्या प्रमाणात आज आनंद केल्या जात आहे याचे भयानक दृश्य आज या समाजामध्ये पाहायला मिळते लिंग भेदावरील झालेले विषमता त्याचप्रमाणे सामाजिक आर्थिक धार्मिक असमानतेचे कितीतरी कारणे आपल्याला पाहायला मिळतील भारत हा पुरुषप्रधान संस्कृतीने नटलेला देश आहे एकूणच स्त्रिया आणि पुरुषांच्या भूमिका ह्या असमान पद्धतीने म्हणजेच विषमतेवर आधारलेली आहे जेव्हा स्त्रीकडे धन किंवा संपत्ती किंवा भोगविलास ही साधन म्हणून तिच्याकडे पाहिलं जाते तेव्हा तिची लैंगिक शोषणाची प्रवृत्ती ही समाजामध्ये उफाळून येते. नवे स्त्रियांनी देखील लिंगभेदावरील भेदभावाच्या परंपरांना कधी परिस्थिती तर कधी अनिश्चिततेने अपरिहार्य वास्तव स्वीकारलेले आहे मात्र आता परिस्थिती बदलत आहे भारतीय संविधानाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र रात्रंदिवस मेहनत करून मानवी हक्काच्या बाबतीत संविधानामध्ये अशा तरतुदी केलेल्या आहेत

स्त्रियांच्या मानवी हक्काच्या हाणण्याची प्रक्रिया ही स्त्रीभ्रूणहत्या म्हणून समाजात रूढ होत आहे भारतामध्ये या झालेल्या प्रकाराला समाजच जबाबदार असल्याचं निदर्शनास येते स्त्रियांचा जीवन जगण्याचा मूलभूत हक्कही याच समाजाने हिरावून घेतलेला आहे ज्या मुली वाचतात त्यांना पुढे आयुष्यभर आपल्या मानवी हक्काच्या पूर्ततेसाठी संघर्ष करावा लागतो त्यांना कुटुंबात मुलगी म्हणून भेदभावाची वागणूक दिल्या जाते मुलाला जो सन्मान आदर प्राप्त होतो तो मुलीच्या वाटेला येत नाही आजही मुलींच्या जन्माला ओझं म्हणून समजल्या जाते नव्हे पुरस्कार मुलाच्या जन्माचा केला जातो मध्ययुगीनस्त्रीशिक्षण/जीवन:

मध्ययुगीन स्त्री जीवन:

मध्ययुगीन समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांची स्थिती अतिशय केविलवाणी आणि हिन झाली होती.वेदकाळातील तिचे स्वातंत्र्य पूर्णपणे नष्ट झाले होते. केवळ भोगदासी होऊन प्राजोत्पादनाचे एकसाधन म्हणून पुरुषांच्या संरक्षणाखाली जगणे तिच्या वाट्याला आले. याकाळात मुलाचा जन्म झाला तर आनंदोत्सववव मुलीचा जन्म झाल्यास दु:खव्यक्त करणे आणि मुलासाठी देवाची प्रार्थना करणे हे अथर्ववेदातील सुक्तावरुन दिसूनयेते .यावरुन मुलांचे कौतुक आणि मुलीचा राग असे पक्षपाती जगणे स्त्रीच्या वाट्याला लहानपणापासूनच येत असे.त्यामुळे ती स्वत:ला दुर्देवी अबलासमजत असे. स्त्री जन्म म्हणजे अतिशय कष्टदायक बाब असल्यामुळे वेदकाळात मुलांच्या बरोबरीने शिक्षण घेणारी स्त्री ही मध्ययुगात शिक्षणापासून वंचीत राहिली आणि अधिका धिक सामाजिक, धार्मिक बंधनात ती जखडल्या गेली. याच काळात बाल विवाहा ची पध्दतरु ढझाली. मुलीचा विवाह आठव्या, नवव्या वर्षी होऊ लागला. वेद काळात स्वतंत्रपणे जीवन जगणारी स्त्री बालविवाहामुळे पराधीन झाली तीला जीवंतपणी जाळून घेणारी सती प्रथारुढ झाली. धर्माने पवित्र आणि अपवित्र मानलेली स्त्री 'सती' यानावाने ओळखली जाऊ लागली.

स्त्रियांच्या मानवी हक्काचे सहजपणे आनंद होत असताना आपल्याला सर्वत्रीकडे पाहायला मिळते स्त्री व पुरुषाला समान हक्काचे समान वेतन न देणे स्त्रियांचे शारीरिक मानसिक शोषण करणे असे प्रकार सातत्याने समाजामध्ये पाहायला मिळतात जसे की पुरुषप्रधान संस्कृती स्त्रियांसाठी कमालीची ते एक

मुसलमानी अंमल व स्त्री जीवन :अकराव्या शतका पासून भारतावर मुसलमानी स्वाऱ्या केल्या या स्वाऱ्या चा परिणाम जनसामान्यावर झाला तसाच तो स्त्री स्वातंत्र्यावरही झाला.मुसलमान राज्यकर्त्यांनी हिंदूमुलींना व हिंदूस्त्रियांना आपल्या जनानखाण्यात ओढून घेण्याचा सपाटा लावला. मुसलमानाचा अंमल भारतवर्षात सुरु झाल्या पासून स्त्रियांच्या सामाजिक जीवनाला उतरती कळा लागली. कित्येक घरातून गोषापध्दत आली आणि उजळमाथ्याने समाजात वावरण्याची मोकळीक स्त्रियांना राहिली नाही. त्यामुळे समाजात अस्वस्थता निर्माण झाली.

निष्कर्ष:भारतातील ज्ञान परंपरा आणि स्त्री शिक्षणाचा वेगवेगळ्या कालखंडात जेव्हा आपण आढावा घेतो तेव्हा प्राचीन आणि वेदकाळामध्ये असणारी स्थिती मध्ययुगीन भारतीय समाजामध्ये पार लयाला गेली होती. नंतर स्त्रीयांची स्थिती बऱ्या पैकी सुधारली नंतर मुसलमानी समाजव्यवस्थे मध्ये स्त्रियांची स्थिती अतिशय दयनीय झाली. पण खऱ्या अर्थाने भारत स्वतंत्र झाल्या नंतर स्वतंत्र भारताच्या संविधानाने स्त्रियांना प्रवाहात आणण्यासाठी खुप मोलाची भर घातली आहे.

संदर्भसूची:

१) मेहेत्रे स्मिता. - *भारतीय स्त्री आणि मानवाधिकार* .नागपूर:श्रीसाईनाथप्रकाशन.

२) लांजेवार ज्योती. - *भारतीयसमाज आणि स्त्री.* पुणे:सुगावा प्रकाशन.

३) देशमुख अलका . - *विविधांगी आयामातून स्त्री.*नागपूर: श्रीसाईनाथ प्रकाशन.

४) पवार दीपक. - *महिलांचे राजकीय सक्षमिकरण.* नागपूर: श्रीसाईनाथप्रकाशन

५) पी. के. कुलकर्णी - आरोग्य आणि समाज डायमंड पब्लिकेशन पुणे – ३०

६) त्रिवेणी फरकंडे, सौ.सुलभा गोंगे – विवाह आणि कौटुंबिक संबंध

उद्योग 4.0 किंवा चौथी औद्योगिक क्रांती

डॉ.रुपाली मानसराम देवरे

एल.व्ही.एच कॉलेज पंचवटी, नाशिक. ,ईमेल - rupdeore007@gmail.com, मोब - 9970456989.

गोषवारा - चौथी औद्योगिक क्रांतीहा शब्द प्रथम जागतिक आर्थिक मंच (WEF) चे कार्यकारी अध्यक्ष क्लॉस श्वाब ,जर्मन सरकारसाठी उच्च-तंत्रज्ञान धोरण विकसित करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या संघाने सादर केला. पहिली औद्योगिक क्रांती स्टीम पॉवर आणि वॉटर पॉवरच्या वापराद्वारे श्रम उत्पादन पद्धतींपासून मशीनमध्ये संक्रमणाद्वारे चिन्हांकित केली गेली. दुसरी औद्योगिक क्रांती ही तांत्रिक क्रांती म्हणूनही ओळखली जाते. डिजिटल क्रांती म्हणून ओळखली जाणारी तिसरी औद्योगिक क्रांती 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात दोन महायुद्धांच्या समाप्तीनंतर झाली, ज्याचा परिणाम औद्योगिकीकरण आणि मागील कालखंडाच्या तुलनेत तांत्रिक प्रगती मंदावल्याने झाला. सेन्सर्स आणि इन्स्ट्रुमेंटेशन केवळचौथी औद्योगिक क्रांती4.0 साठीच नव्हे तर स्मार्ट उत्पादन, स्मार्ट मोबिलिटी, स्मार्ट घरे, स्मार्ट शहरे आणि स्मार्ट कारखाने यासारख्या इतर "स्मार्ट" मेगाट्रेंड्ससाठीही नावीन्यपूर्ण शक्ती चालवतात.

मुख्य शब्द - औद्योगिक क्रांती, स्मार्ट फॅक्टरी.

परिचय - चौथी औद्योगिक क्रांती21 व्या शतकात वाढत्या इंटरकनेक्टिव्हिटी आणि स्मार्ट ऑटोमेशनमुळे तंत्रज्ञान, उद्योग आणि सामाजिक पद्धती आणि प्रक्रियांमध्ये जलद बदलाची संकल्पना मांडते . हा शब्द वैज्ञानिक साहित्यात मोठ्या प्रमाणावर वापरला गेला आहे आणि क्लॉस श्वाब यांनी 2015 मध्ये वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक आणि कार्यकारी अध्यक्ष म्हणून लोकप्रिय केले होते. श्वाब यांनी असे प्रतिपादन केले की पाहिलेले बदल हे केवळ कार्यक्षमतेत सुधारणा करण्यापेक्षा अधिक आहेत परंतु औद्योगिक भांडवलशाहीमध्ये लक्षणीय बदल व्यक्त करतात .औद्योगिक बदलाच्या या टप्प्याचा एक भाग म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या तंत्रज्ञानाचा समावेश प्रगत रोबोटिक्समध्ये जीन संपादन जे भौतिक, डिजिटल आणि जैविक जगांमधील रेषा स्पष्ट करते.

आधुनिक स्मार्ट तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणात मशीन-टू-मशीन कम्युनिकेशन (M2M) आणि इंटरनेट वापरून पारंपारिक उत्पादन आणि औद्योगिक पद्धतींच्या चालू स्वयचलन जागतिक उत्पादन आणि पुरवठा जाळे कसे कार्य करते यात मूलभूत बदल होत आहेत . या एकात्मतेचा परिणाम स्वयचलीत यंत्रात सुधारणा करून संवाद, स्व-निरीक्षण आणि स्मार्ट मशीनच्या वापरामध्ये वाढ होते जे मानवी हस्तक्षेपाशिवाय समस्यांचे विश्लेषण आणि निदान करू शकतात.

शोधनिबंधाची उद्दिष्टे -

१. *चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या* संकल्पनेचा अभ्यास करणे

२. *चौथ्या औद्योगिक क्रांतीमुळे औद्योगिक* क्षेत्रातझालेल्या बदलांचा अभ्यास करणे

संशोधन पद्धती- प्रस्तुत संशोधनाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे.

माहिती संकलन - कोणत्याही संशोधनात माहिती किंवा तथ्य हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. तथ्य संकलनासाठी दुय्यम स्रोत वापरले जातात.विविध संदर्भ पुस्तके, प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्य, आर्थिक सर्वेक्षण अहवाल, केंद्रीय अर्थसंकल्प विवरणपत्रे, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे यांचा वापर करण्यात आला आहे.

इतिहास-

जर्मन सरकारसाठी उच्च-तंत्रज्ञानाची रणनीती विकसित करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या टीमने प्रथम *चौथी औद्योगिक क्रांती* हा वाक्यांश सादर केला. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम (WEF) चे कार्यकारी अध्यक्ष क्लॉस श्वाब यांनी प्रकाशित केलेल्या 2015 च्या लेखात हा वाक्यांश व्यापक प्रेक्षकांसमोर आणला . दावोस- क्लोस्टर्स स्वित्झर्लंडमधील जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक सभेची 2016 ची थीम " चौथी औद्योगिक क्रांती मास्टरिंग" होती. 10 ऑक्टोबर 2016 रोजी फोरमने सॅन फ्रान्सिस्कोमध्ये चौथ्या औद्योगिक क्रांतीसाठी केंद्र उघडण्याची घोषणा केली. हा देखील श्वाबच्या 2016 च्या पुस्तकाचा विषय आणि शीर्षक होता. श्वाबमध्ये या चौथ्या युगातील तंत्रज्ञानाचा समावेश आहे जे हार्डवेअर, सॉफ्टवेअर,जीवशास्त्र आणि संप्रेषण आणि जोडणी मधील प्रगतीवर जोर देते. या युगात रोबोटिक्स सारख्या क्षेत्रातील उदयोन्मुख तंत्रज्ञानातील प्रगतीने चिन्हांकित केले जावे अशी श्वाबची अपेक्षा आहे. कृत्रिमबुद्धिमत्ता , नॅनोटेक्नॉलॉजी , क्वांटम कम्प्युटिंग , बायोटेक्नॉलॉजी , गोष्टींचे इंटरनेट द इंडस्ट्रियल इंटरनेट ऑफ थिंग्ज , विकेंद्रित सहमती पाचव्या पिढीतील वायरलेस तंत्रज्ञान 3D प्रिंटिंग आणि पूर्णपणे स्वायत्त वाहने . WEF *च्या* ग्रेट रिसेट प्रस्तावामध्ये *चौथ्या*

औद्योगिक क्रांतीचा समावेश कोविड-19 साथीच्या आजारानंतर अर्थव्यवस्थेची शाश्वतपणे पुनर्बांधणी करण्याच्या उपायामध्ये धोरणात्मक बुद्धिमत्ता म्हणून करण्यात आला आहे .

पहिली औद्योगिक क्रांती- पहिली औद्योगिक क्रांती स्टीम पॉवर आणि वॉटर पॉवरच्या वापराद्वारे श्रम उत्पादन पद्धतींपासून मशीनमध्ये संक्रमणाद्वारे चिन्हांकित केली गेली. नवीन तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीला बराच वेळ लागला, त्यामुळे युरोप आणि युनायटेड स्टेट्समध्ये 1760 ते 1820 किंवा 1840 या दरम्यानचा कालावधी होता. त्याचे परिणाम कापड उत्पादनावर झाले, ज्याने प्रथम अशा बदलांचा अवलंब केला तसेच लोखंड उद्योग, शेती आणि खाणकाम यांवर देखील परिणाम झाला, जरी त्याचे सामाजिक परिणाम देखील मजबूत मध्यमवर्गावर झाले . त्याचा परिणाम ब्रिटिश उद्योगावरही झाला होता.

दुसरी औद्योगिक क्रांती-

दुसरी औद्योगिक क्रांती ही तांत्रिक क्रांती म्हणूनही ओळखली जाते, हा 1871 आणि 1914 दरम्यानचा कालावधी आहे ज्याचा परिणाम व्यापक रेल्वेमार्ग आणि टेलिग्राफ नेटवर्क्सच्या स्थापनेमुळे झाला ज्यामुळे लोक आणि कल्पनांचे तसेच वीजेचे जलद हस्तांतरण होऊ शकले. वाढत्या विद्युतीकरणामुळे कारखान्यांना आधुनिक उत्पादन मार्ग विकसित करण्याची परवानगी मिळाली. उत्पादकता वाढीसह मोठ्या आर्थिक वाढीचा हा काळ होता, ज्यामुळे अनेक कारखान्यातील कामगारांची जागा मशीनने घेतल्याने बेरोजगारीतही वाढ झाली.

तिसरी औद्योगिक क्रांती-

डिजिटल क्रांती म्हणून ओळखली जाणारी तिसरी औद्योगिक क्रांती 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात दोन महायुद्धांच्या समाप्तीनंतर झाली, ज्याचा परिणाम औद्योगिकीकरण आणि मागील कालखंडाच्या तुलनेत तांत्रिक प्रगती मंदावल्याने झाला. बायनरी फ्लोटिंग-पॉइंट नंबर आणि बुलियन लॉजिक वापरणाऱ्या Z1 कॉम्प्युटरचे उत्पादन , एका दशकानंतर अधिक प्रगत डिजिटल विकासाची सुरुवात होती. दळणवळण तंत्रज्ञानातील पुढील महत्त्वपूर्ण विकास म्हणजे सुपर कॉम्प्युटर आणि उत्पादन प्रक्रियेतील यंत्रसामग्रीमध्ये संप्रेषण तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करून मानवी शक्तीची गरज रद्द करण्यास सुरुवात केली.

चौथी औद्योगिक क्रांती-

सायबर-फिजिकल सिस्टम (CPS) IOT, औद्योगिक इंटरनेट ऑफ थिंग्ज, क्लाउड कॉम्प्युटिंग , संज्ञानात्मक संगणन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांचा समावेश असलेल्या उत्पादन तंत्रज्ञान आणि प्रक्रियांमध्ये ऑटोमेशन आणि डेटा एक्सचेंजकडे कल आहे .चौथी औद्योगिक क्रांती कल्पनेच्या युगाची सुरुवात दर्शवते .

ट्रेंड-

स्मार्ट उद्योग ही उत्पादन वातावरणाची दृष्टी आहे ज्यामध्ये उत्पादन सुविधा आणि लॉजिस्टिक सिस्टम मानवी हस्तक्षेपाशिवाय आयोजित केले जातात.स्मार्ट फॅक्टरी ही आता दूरदृष्टी राहिलेली नाही. वेगवेगळे मॉडेल कारखाने व्यवहार्य असल्याचे दर्शवत असताना, अनेक उपक्रम स्मार्ट फॅक्टरी कशा प्रकारे कार्य करतात ते उदाहरणांसह स्पष्ट करतात.

स्मार्ट फॅक्टरी , इंटेलिजेंट फॅक्टरी - ज्या तांत्रिक पायावर आधारित आहे त्या सायबर-भौतिक प्रणाली आहेत ज्या इंटरनेट आणि सेवा वापर करून एकमेकांशी संवाद साधतात. या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे उत्पादन आणि उत्पादन मार्गातील माहितीचे देवाणघेवाण. हे पुरवठा साखळीचे अधिक कार्यक्षम करते आणि कोणत्याही उत्पादन वातावरणात अधिक चांगले संघटन सक्षम करते.

चौथी औद्योगिक क्रांती ज्याला "स्मार्ट फॅक्टरी" म्हटले जाते त्यास प्रोत्साहन देते. स्मार्ट कारखान्यांमध्ये सायबर-भौतिक प्रणाली भौतिक प्रक्रियांवर नजर ठेवतात आणि भौतिक जगाची आभासी प्रत तयार करतात आणि विकेंद्रित निर्णय घेतात. इंटरनेटवर सायबर - भौतिक प्रणाली संवाद साधतात आणि एकमेकांशी आणि मानवांशी सक्रमित वेळेत अंतर्गत आणि मूल्य शृंखलेतील सहभागींद्वारे मागणी केलेल्या आणि वापरल्या जाणाऱ्या संस्थात्मक सेवांवर काम करतात .

भविष्यसूचक देखभाल-

इंडस्ट्री 4.0 तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आणि भविष्यसूचक देखभाल देखील प्रदान करू शकते. प्रेडिक्टिव मेंटेनन्स – जी लाइव्हमध्ये मेंटेनन्स समस्या ओळखू शकते. मशिन मालकांना किफायतशीर मेंटेनन्स करण्याची आणि यंत्रसामग्री अयशस्वी होण्याआधी किंवा खराब होण्याआधी ते निर्धारित करण्याची परवानगी देते. उदाहरणार्थ, सिंगापूरमधील उपकरणाचा तुकडा असामान्य वेगाने किंवा तापमानाने चालत असल्यास लॉस एंजेलिसमधील कंपनी समजू शकते. त्यानंतर ते दुरुस्त करणे आवश्यक आहे की नाही हे ठरवू शकतील.

3D प्रिंटिंग-

थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानावर व्यापक अवलंबित्व असल्याचे म्हटले जाते . उद्योगासाठी 3D प्रिंटिंगचे काही फायदे असे आहेत की 3D प्रिंटिंग अनेक भौमितिक रचना मुद्रित करू शकते तसेच उत्पादन डिझाइन प्रक्रिया सुलभ करू शकते. हे तुलनेने पर्यावरणास अनुकूल देखील आहे. कमी-खंड उत्पादनामध्ये ते पुष्कळ वेळा आणि एकूण उत्पादन खर्च देखील कमी करू शकते. शिवाय ते लवचिकता वाढवून गोदाम खर्च कमी करू शकते आणि कंपनीला मोठ्या प्रमाणात वातनुकूलित व्यवसाय धोरण स्वीकारण्यास मदत करू शकते. याव्यतिरिक्त, स्पेअर पार्ट्स प्रिंट करण्यासाठी आणि स्थानिक पातळीवर स्थापित करण्यासाठी 3D प्रिंटिंग खूप उपयुक्त असू शकते म्हणून पुरवठादार अवलंबित्व कमी करते आणि पुरवठ्याचा वेळ कमी करते. निर्धारक घटक म्हणजे बदलाची गती. तांत्रिक विकासाच्या गतीचा परस्परसंबंध आणि परिणामी मानवी जीवनाशी सामाजिक-आर्थिक आणि पायाभूत संरचनात्मक परिवर्तने आपल्याला विकासाच्या गतीमध्ये गुणात्मक झेप घेण्यास अनुमती देतात जी नवीन काळातील संक्रमणास चिन्हांकित करते.

स्मार्ट सेन्सर्स -

स्मार्टउत्पादन, स्मार्ट मोबिलिटी , स्मार्ट घरे, स्मार्ट शहरे आणि स्मार्ट कारखाने यासारख्या इतर "स्मार्ट" मेगाट्रेंड्ससाठीही नवकल्पना केंद्रस्थानी आणतात .स्मार्ट सेन्सर ही अशी उपकरणे आहेत जी माहिती व्युत्पन्न करतात आणि स्वयं-निरीक्षण आणि जटिल प्रक्रियांच्या स्थिती निरीक्षणापर्यंत पुढील कार्यक्षमतेस अनुमती देतात. वायरलेस कम्युनिकेशनच्या क्षमतेमुळे ते साठवणुकीसाठी प्रयत्न मोठ्या प्रमाणात कमी करतात आणि सेन्सर्सची दाट श्रेणी जाणवण्यास मदत करतात.

कृषी आणि अन्न उद्योग -

या दोन क्षेत्रातील स्मार्ट सेन्सर्स अद्याप चाचणीच्या टप्प्यात आहेत. हे नाविन्यपूर्ण कनेक्टेड सेन्सर प्लॉट्समध्ये उपलब्ध माहितीचा (पानांचे क्षेत्र, वनस्पती निर्देशांक, क्लोरोफिल, हायग्रोमेट्री, तापमान, पाण्याची क्षमता, किरणोत्सर्ग) व्याख्या करतात आणि संप्रेषण करतात. या वैज्ञानिक माहितीआधारे, परिणाम, वेळ आणि खर्चाच्या दृष्टीने प्लॉट व्यवस्थापनाला अनुकूल करणाऱ्या सल्ल्यासह स्मार्टफोनद्वारे रिअल-टाइम मॉनिटरिंग सक्षम करणे हे उद्दिष्ट आहे. शेतात या सेन्सर्सचा वापर पिकाच्या टप्प्यांचा शोध घेण्यासाठी आणि योग्य वेळी आदाने आणि उपचारांची शिफारस करण्यासाठी केला जाऊ शकतो. तसेच सिंचनाची पातळी नियंत्रित करणे.अन्न उद्योगाला अधिकाधिक सुरक्षितता आणि पारदर्शकता आणि संपूर्ण कागदपत्रांची आवश्यकता असते. हे नवीन तंत्रज्ञान ट्रॅकिंग सिस्टीम म्हणून तसेच मानवी आणि उत्पादन माहिती संकलन म्हणून वापरले जाते.

ज्ञानाच्या अर्थव्यवस्थेत प्रवेगक संक्रमण -

ज्ञान अर्थव्यवस्थेत ही एक आर्थिक प्रणाली आहे ज्यामध्ये उत्पादन आणि सेवा मुख्यत्वे ज्ञान-केंद्रित क्रियाकलापांवर आधारित असतात ज्या तांत्रिक आणि वैज्ञानिक प्रगतीच्या वेगवान गतीमध्ये तसेच जलद अप्रचलिततेमध्ये योगदान देतात. इंडस्ट्री 4.0 भौतिक आदाने किंवा नैसर्गिक संसाधनांपेक्षा बौद्धिक क्षमतांवर अवलंबून राहून ज्ञानाच्या अर्थव्यवस्थेत संक्रमणास मदत करते.

औद्योगिकक्रांतीचेफायदे -

1.उच्च उत्पादकता-

हे प्रत्येक औद्योगिक क्रांतीसह घडते आणि वरवर पाहता प्रत्येक औद्योगिक युगाची उत्पादकता मागील युगाच्या तुलनेत 50 पट वाढते. पुढील 5-10 वर्षांत उत्पादकता 5-8% ने वाढेल असा अंदाज आहे. हे प्रामुख्याने वाढलेल्या ऑटोमेशनमुळे आहे.

2.जीवनाचा दर्जा सुधारला-

तंत्रज्ञानामुळे आपल्या वैयक्तिक जीवनाची कार्यक्षमता आणि आनंद वाढवणारी नवीन उत्पादने आणि सेवा शक्य झाल्या आहेत. एका चॅनलचे सीईओ बर्नार्ड फोर्ड हे उदाहरण देऊन "कॅब ऑर्डर करणे, फ्लाइट बुक करणे, एखादे उत्पादन खरेदी करणे, पैसे देणे, संगीत ऐकणे, चित्रपट पाहणे, गेम खेळणे आणि अगदी आमच्या घरातील दिवे आणि तापमान नियंत्रित करणे" कसे असू शकते याचा उल्लेख करून याचे उदाहरण देतात. दूरस्थपणे केले." हे सांगायला नको की लवकरच आमच्याकडे पूर्णपणे स्वायत्त कार असतील किंवा कदाचित आम्ही आधीच करत आहोत - तुम्ही हे कधी वाचत आहात आणि आणखी काय कोणास ठाऊक यावर अवलंबून आहे.

3.नवीन बाजारपेठ-

क्लॉस श्वाब यांनी नमूद केले की "भौतिक, डिजिटल आणि जैविक क्षेत्रांमधील रेषा स्पष्ट करणाऱ्या तंत्रज्ञानाचे मिश्रण" नवीन बाजारपेठ आणि वाढीच्या संधी निर्माण करेल. हे नवीन उत्पादन किंवा नवीन सेवा तयार करण्यासाठी पूर्वी विभक्त केलेल्या अनेक क्षेत्रामधील सुधारणांचे मिश्रण करेल. केवळ अधिक ज्ञानी कामगारच नाहीत, तर नवीन क्षेत्रातील ज्ञान कामगारही असतील.

4.उद्योजकतेसाठी कमी अडथळा-

प्रोटोटाइपिंगसाठी 3D प्रिंटिंग सारख्या नवीन तंत्रज्ञानामुळे शोधक आणि बाजारपेठांमधील अडथळे कमी झाले आहेत हे आपण आधीच पाहू शकतो. उद्योजक आता त्यांच्या कंपन्या स्थापन करू शकतात आणि पारंपरिक प्रोटोटाइपिंग पद्धतींसह पारंपारिक वेळ आणि खर्चाच्या मर्यादांशिवाय कमी स्टार्ट-अप खर्चासह विविध उत्पादनांची चाचणी करू शकतात. एंट्रीमधील ठराविक अडथळे उद्योजकता समीकरणातून काढून टाकले जातात. **चौथ्या औद्योगिकक्रांतीचे तोटे-**

1. असमानता -

या तंत्रज्ञानाचे फायदे कोणाला मिळतात आणि ते तयार करण्यात मदत करणारे परिणाम कोणाला मिळतात हे सर्व आहे. वास्तविकता अशी आहे की सर्वात मोठे लाभार्थी हे बौद्धिक आणि भौतिक भांडवल (भागधारक, गुंतवणूकदार आणि नवोन्मेषक) प्रदान करणारे असतात. उच्च-उत्पन्न असलेल्या देशांतील बहुसंख्य लोकसंख्येचे उत्पन्न थांबले किंवा अगदी कमी होण्याचे मुख्य कारण तंत्रज्ञान हे आहे. धक्कादायक आहे ना? उच्च कुशल कामगारांची मागणी वाढली आहे तर कमी शिक्षण आणि कमी कौशल्य असलेल्या कामगारांची मागणी कमी झाली आहे आणि त्यांच्यामधील दरी होऊ लागेल. त्यामुळे यामुळे नोकरीचे नुकसान होण्याची शक्यता आहे. विकसनशील देशांसमोर तांत्रिक आणि पायाभूत सुविधांची आव्हाने आणि कौशल्य आव्हाने आहेत ज्यावर मात करणे सोपे नाही हे देखील सांगायला नको.

2. सायबर सुरक्षा धोका-

जेव्हा सर्वकाही जोडलेले असते तेव्हा डेटा हॅक करण्याचा आणि त्याच्याशी छेडछाड करण्याचा किंवा दुर्भावनापूर्ण हेतूसाठी वापरण्याचा धोका आता अधिक प्रचलित आहे. ती पूर्वीसारखी नसते. हे अधिकाधिक वारंवार होत आहे की आम्ही नवीन डेटा सुरक्षा उल्लंघनाच्या भयानक बातम्या ऐकतो. त्यामुळे अनेकदा खरं की आता आपल्याला धक्का बसत नाही. विशेषत: डेटा ॲनालिटिक्स आणि मशीन लर्निंगच्या वाढत्या वापरामुळे ओळख आणि गोपनीयतेच्या स्वरूपाला ते आव्हान देते हे सांगायला नको.

3. मुख्य उद्योगांमध्ये व्यत्यय-

टॅक्सी ,उबेर आणि लिफ्टशी स्पर्धा करत आहेत, पारंपारिक टेलिव्हिजन आणि सिनेमा नेटफ्लिक्स आणि यूट्यूबशी स्पर्धा करतात, एअर बीएनबीसह हॉटेल उद्योग आणि कोणतेही स्टोअर ॲमेझॉनशी स्पर्धा करत आहेत. यामध्ये ऑफर केल्या जाणाऱ्या सेवांचा प्रकार आणि त्या ज्या मॉडेलद्वारे ऑफर केल्या जातात तसेच त्यांच्याशी संबंधित नोकऱ्यांमध्ये परिणाम होतो.

4. नैतिक समस्या-

सुधारित AI अनुवांशिक अभियांत्रिकी, आणि वाढीव नवीन नैतिक चिंता आणि नैतिकतेचे प्रश्न आहेत जे आधीपासूनच वैयक्तिकरित्या भिन्न आहेत. एखाद्या व्यक्तीबद्दल आणि व्यक्तींच्या गटाबद्दल अधिक माहितीमध्ये प्रवेश केल्याने वैयक्तिक फायद्यासाठी आणि हाताळणीसाठी त्याचा वापर करण्याचा धोका अधिक असतो. मला असे वाटते की 2018 च्या सुरुवातीस केंब्रिज ॲनालिटिकल माहिती घोटाळा आपल्या सर्वांना आठवत आहे जेव्हा हे उघड झाले होते की केंब्रिज ॲनालिटिकलने लाखो लोकांच्या Facebook प्रोफाइलचा वैयक्तिक माहिती त्यांच्या संमतीशिवाय काढला होता आणि त्याचा वापर राजकीय जाहिरातींसाठी केला होता. शिवाय हे फक्त त्या माहितीच्या गैरवापराचे उदाहरण आहे ज्याबद्दल आम्हाला माहिती आहे.

आव्हाने-

उद्योग 4.0 च्या अंमलबजावणीतील आव्हाने

आर्थिक-

- उच्च आर्थिक खर्च
- व्यवसाय मॉडेल अनुकूलन
- अस्पष्ट आर्थिक लाभ/अति गुंतवणूक

सामाजिक-

- गोपनीयतेची चिंता
- पाळत ठेवणे आणि अविश्वास
- भागधारकांद्वारे बदलण्यास सामान्य अनिच्छा
- कॉर्पोरेट आयटी विभागाच्या रिडंडंसीचा धोका
- स्वयंचलित प्रक्रिया आणि आयटी-नियंत्रित प्रक्रियांमुळे अनेक नोकऱ्यांचे नुकसान , विशेषत: ब्लू कॉलर कामगारांसाठी

- एआय सह बदलण्याची शक्यता असलेल्या नोकरीच्या भूमिका असलेल्या व्यवसायांमध्ये लैंगिक असमानतेचा वाढलेला धोका

राजकीय-

- नियमन, मानके आणि प्रमाणपत्रांचे स्वरूप यांचा अभाव
- अस्पष्ट कायदेशीर समस्या आणि डेटा सुरक्षा

संघटनात्मक-

- IT सुरक्षा समस्या, जे पूर्वी बंद उत्पादन दुकाने उघडण्याच्या अंतर्निहित गरजेमुळे मोठ्या प्रमाणात वाढतात
- मशीन-टू-मशीन कम्युनिकेशन (M2M) साठी आवश्यक असलेली विश्वासार्हता आणि स्थिरता अत्यंत कमी आणि स्थिर विलंब वेळेसह.
- उत्पादन प्रक्रियेची अखंडता राखणे आवश्यक आहे.
- औद्योगिक माहितीचे संरक्षण करणे आवश्यक आहे
- चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या दिशेने संक्रमण जलद करण्यासाठी पुरेशा कौशल्य-संचांचा अभाव
- कमी शीर्ष व्यवस्थापन बांधिलकी
- कर्मचाऱ्यांची अपुरी पात्रता

टीका आणि अनुमान -

गेल्या दशकभरात आपल्या दैनंदिन जीवनात भविष्यातील ऑटोमेशनची चिंता वाढत चालली आहे, ज्यामध्ये वैद्यकीय पुरवठा आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांसारख्या आपल्या आधुनिक गरजा पूर्ण करण्यासाठी विशिष्ट उत्पादनांवर जास्त अवलंबून राहणे समाविष्ट आहे. ऑटोमेशनवर अधिकाधिक अवलंबून राहिल्याने अनेक उत्पादक ' IKEA इफेक्ट टी' कडे लक्ष वेधतात. आमची स्वतःची वैयक्तिक साधने आणि फर्निचर कसे तयार केल्याने तुम्हाला ऑटोमेशनद्वारे उत्पादित केलेल्या उत्पादनांच्या तुलनेत तयार केलेल्या वस्तूंकडे अधिक आकर्षण वाटेल. इतर अभ्यासातून असे दिसून आले आहे की वाढत्या ऑटोमेशनमुळे अशा क्षेत्रांमध्ये नोकऱ्या कमी होतात ज्यांना यापुढे मानवांना कामगिरी करण्याची आवश्यकता नाही.

निष्कर्ष-

इथे आपण चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या काठावर आहोत ज्याचा आपल्या दैनंदिन जीवनावर आमूलाग्र परिणाम होतो. हे आर्थिक आणि ज्ञानाच्या वाढीचे आणि आपण जगण्याच्या आणि कार्य करण्याच्या पद्धतीमध्ये सुधारणांचे युग असू शकते परंतु आपण त्याच्या व्यत्यय संभाव्यतेपासून कंटाळले पाहिजे आणि हे धोके कमी करण्याचे मार्ग शोधले पाहिजेत.

संदर्भ-

1. द टाइम्स ऑफ इंडिया, 15 मे 2018.
2. लोकसत्ता , 21 मार्च 2021.
3. महाराष्ट्र टाइम्स 10 जुलै 2021.
4. भारत सरकारचे आर्थिक सर्वेक्षण (2021).

छात्रों के शैक्षणिक प्रदर्शन पर विद्यालय वातावरण का प्रभाव- एक समाजशास्त्रीय अवलोकन

डॉ.शालू अ.घोडेस्वार

प्राचार्या के.डी.पवार शिक्षण महाविद्यालय सावनेर,जि.नागपूर

मोब.न.८९२८७८८४२७ ,ई.मेल.shalinighodeswar@gmail.com

शोधसार:

एक स्कूल को आम तौर पर 'ऐसे स्थान के रूप में परिभाषित किया जाता है जहाँ एक बच्चे के पास सीखने के लिए अनुकूल वातावरण होता है'. इस अनुकूल वातावरण का अर्थ है हाथों-हाथ अनुभव के माध्यम से तनाव मुक्त शिक्षा. स्कूल की शुरुआत इस सोच के साथ की गई थी कि अगर ऐसी शिक्षा हो जाए तो वाकई आसान शिक्षा होगी. शिक्षा का उचित माध्यम मातृभाषा है. इस बात को ध्यान में रखते हुए कि हर बच्चा अलग होता है, यह स्कूल बच्चे की मौलिकता को बनाए रखता है, उसकी जिज्ञासा को स्वतंत्रता देता है, अपने विचारों को व्यक्त करने की स्वतंत्रता देता है, बच्चे के शारीरिक, बौद्धिक और मानसिक विकास के लिए पोषण का माहौल बनाता है, आसान शिक्षा की वकालत करता है. हर बच्चा अलग होता है यानी उसकी सीखने की रुचि, गति, क्षमता अलग होती है और इसलिए उसकी जरूरत के हिसाब से पढ़ने-पढ़ाने के तरीके के साथ-साथ बच्चे के विकास की समीक्षा करने का तरीका भी अलग होना चाहिए. माता-पिता की भागीदारी से बच्चे के इस समग्र विकास को समृद्ध करने के लिए माता-पिता का एक अच्छा संबंध आवश्यक है. प्रस्तुत शोधपत्र में, छात्रों के शैक्षणिक प्रदर्शन पर विद्यालय वातावरण के प्रभाव को दर्शाया गया है.

सूचकशब्द: विद्यालय वातावरण, शैक्षणिक प्रदर्शन,अध्ययन,शिक्षा विकास

प्रस्तावना:

शिक्षा की परंपरा हजारों साल से चली आ रही है. शिक्षाशास्त्र समय के साथ विकसित हुआ. पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तकों, शिक्षण विधियों में परिवर्तन हुए. बच्चों के भावनात्मक, मानसिक और बौद्धिक विकास के साथ-साथ पोषक तत्वों के अनुरूप तकनीकों पर विचार और विस्तार किया गया. धीरे-धीरे स्कूल की अवधारणा मजबूत होती गई. बच्चों को क्या सीखना चाहिए इसके अनुसार शिक्षा में मुख्य रूप से विचार किया जाता था कि उन्हें क्या सीखना चाहिए. एक ज़माने में, स्कूल जेल हुआ करते थे जहाँ बच्चों को बंदी बनाकर रखा जाता था. अनुशासन के नाम पर मासूम बच्चों को डराना और सजा देना जैसी बातें की जाती थीं. गुरुजी कहेंगे कि पुरोदिशा. यह एक ऐसी स्थिति थी जहाँ बच्चे चुप रहते थे, सवाल नहीं करते थे, समझते थे या नहीं, वे जैसे थे वैसे ही उत्तर को किताब में उलझा कर लिख सकते थे और अंक अर्जित कर स्मार्ट बन जाते थे. सभी घोड़ों के बारह प्रतिशत को स्कूल नामक एक बंद डिब्बे में पढ़ाया जाता था. बच्चों के झुकाव, रुचि और क्षमताओं को ध्यान में रखने वाले शिक्षकों की संख्या अधिक नहीं थी. इसी तरह के पारंपरिक स्कूलों के छात्रों की आमद को ध्यान में रखते हुए, कविवर्य टैगोर ने 1901 में शांति निकेतन में पांच बच्चों के साथ इस स्कूल की शुरुआत की. शिक्षा तरल और परिवर्तनशील है. बदलती राजनीतिक, सामाजिक और आर्थिक आवश्यकताओं के अनुसार शिक्षा में निरंतर परिवर्तन होते रहते हैं. शिक्षा, अनुसंधान और बदलते समय को ध्यान में रखते हुए प्रयोग नए विचारों को वास्तविकता में ला रहे हैं. अब स्कूल सीखने को सुखद और छात्र-केंद्रित बनाने के लिए सक्रिय शिक्षण पर ध्यान केंद्रित कर रहे हैं. बच्चों को ज़ेपेलिन, पेलवेल और शिक्षकों को पढ़ाने के लिए पाठ्यचर्या, पाठ्यपुस्तकें विकसित की जा रही हैं. रटने के बजाय बच्चों द्वारा सीखे गए ज्ञान को वास्तविक जीवन से जोड़ा जा सकता है. इन बातों को महत्व दिया जाता है. बच्चे अब एक ऐसा पाठ्यक्रम सीख रहे हैं जो छात्रों में क्षमता का निर्माण करता है और उन्हें कौशल हासिल करने के लिए प्रोत्साहित करता है. अब परीक्षा स्कोरबोर्ड और अंकों की प्रतियोगिता के बजाय बच्चे की क्षमताओं और उसके विभिन्न कौशलों की समग्र समझ पर आधारित है. शिक्षा हर स्तर पर, अलग-अलग स्तरों पर, अलग-अलग क्षेत्रों से बदल रही है. जैसे-जैसे समाज में सामाजिक और सांस्कृतिक परिवर्तन हो रहे हैं, वैसे-वैसे शिक्षा में भी परिवर्तन आ रहा है. यह शिक्षा प्राप्त करने के साथ-साथ इसे प्रदान करने के तरीके में भी होता है. अब दूरसंचार के क्षेत्र में एक महान क्रांति हुई है. रेडीओ, टी.व्ही, कॉमप्यूटर, मोबाईल में बहुत से बदलाव आ गए हैं. शिक्षा में इन सभी माध्यमों का काफी हद तक

उपयोग किया जा रहा है ज्ञानार्जन कभी भारतीय संस्कृति में एक संस्कार था. ज्ञान प्राप्त करना एक पवित्र कार्य माना जाता था. अब ऐसा है या नहीं यह शोध का विषय है. वर्तमान में यही स्थिति अनेक स्थानों पर देखने को मिलती है, कुछ अपवादों को छोड़कर ज्ञान देने में कोई रूचि नहीं है. छात्रों और शिक्षकों दोनों में शिक्षा के लिए पूर्व ललक नहीं देखी जाती है. इसके कारणों पर विचार किया जाना चाहिए. वैश्वीकरण की वर्तमान दर पर, सभी के जीवन स्तर में सुधार हुआ है. नई तकनीक मनुष्य के लिए ज्ञात हो गई है. मनुष्य के हाथों में विशाल सूचनाओं का प्रवाह रुक गया. मोबाइल में क्रांति ने दुनिया को पूरी तरह बदल कर रख दिया है. सोशल मीडिया का इस्तेमाल हद से ज्यादा हो गया है.

वर्तमान शैक्षिक स्थिती:

पिछले दो साल में छात्रों की पढ़ाई का काफी नुकसान हुआ है. सरकारी रिपोर्ट सहित कई संगठनों की रिपोर्ट से इसकी पुष्टि हुई है. इसलिए, यदि हम शैक्षिक गुणवत्ता की दिशा में फिर से यात्रा करना चाहते हैं तो कदम उठाने होंगे. स्थानीय स्तर पर शिक्षक, विद्यालय, प्रबंधन समिति, स्थानीय प्रशासन अपने-अपने स्तर पर कार्यक्रम को लागू करने का प्रयास कर रहे हैं. एक राज्य के तौर पर सरकार ने भी गंभीर कदम उठाए हैं. सरकार ने विभिन्न पहलों को लागू करके गुणवत्ता में सुधार के लिए इस वर्ष को गुणवत्ता सुधार वर्ष घोषित किया है. इसलिए शिक्षा विभाग के सामने खोई हुई गुणवत्ता को ऊपर उठाने की चुनौती है. स्कूलों के सामने छात्रों को कक्षा में सीखने, पढ़ाने और मूल्यांकन के साथ-साथ सीखने की प्रक्रिया से जोड़े रखने की एक बड़ी चुनौती है. ऐसा नहीं है कि छात्रों की पढ़ाई प्रभावित हुई है, बल्कि यह चिंता जताई जा रही है कि पढ़ाई के प्रति रुझान कम हो रहा है. इसलिए उम्मीद है कि सरकार द्वारा बताई गई पहल के माध्यम से न्यूनतम बुनियादी ढांचा की अवधारणा को भर दिया जाएगा और छात्र शिक्षा से अलगाव को दूर करने में सफल होंगे. कोरोना से हुए नुकसान की भरपाई करने के साथ ही उस दौरान कई कारणों से छात्र स्कूल से बाहर हो गए हैं. चुनौती उन्हें स्कूल में दाखिला दिलाने की है. इसके लिए जीरो आउट ऑफ स्कूल स्टूडेंट कैंपेन शुरू किया गया है. राज्य शैक्षिक अनुसंधान एवं प्रशिक्षण परिषद द्वारा ब्रिज कोर्स का क्रियान्वयन शुरू कर दिया गया है. आवधिक मूल्यांकन की घोषणा की जाती है. साथ ही निपुण भारत अभियान के तहत बुनियादी साक्षरता एवं अंकज्ञान अभियान की दृष्टि से गुणवत्ता सुधार के प्रयास के लिए कदम उठाए जाएंगे. लक्ष्य यह है कि देश का प्रत्येक बच्चा शैक्षणिक वर्ष 2026-27 तक तीसरी कक्षा के अंत तक आवश्यक बुनियादी साक्षरता और अंकज्ञान हासिल कर लेगा. जिन बच्चों ने अभी तक बुनियादी भाषा और गणित कौशल हासिल नहीं किया है, उन्हें आवश्यक दक्षताओं को प्राप्त करने के लिए व्यक्तिगत शिक्षक मार्गदर्शन और समर्थन, साथियों के समर्थन और आयु-उपयुक्त और श्रेणीबद्ध पूरक अध्ययन सामग्री के माध्यम से सीखने की प्रक्रिया में सक्रिय रूप से शामिल होने की आवश्यकता है.

विद्यालय का बदलता वातावरण:-

- ❖ विद्यालय का वातावरण छात्रों के निहित कौशलों, 21 वीं सदी के विभिन्न कौशलों के विकास के लिए अनुकूल होना चाहिए.
- ❖ पाठ्यचर्या में विषयवार, वर्गवार, आयुवार पर्याप्त और प्रबंधनीय शैक्षिक सामग्री होनी चाहिए.
- ❖ सह-पाठ्यचर्या और पाठ्येतर गतिविधियों का प्रभावी कार्यान्वयन आवश्यक है.
- ❖ जैसा कि नई राष्ट्रीय शिक्षा नीति 2020 में उल्लेख किया गया है, यह अपेक्षा की जाती है कि छात्रों की जन्मजात और व्यावसायिक क्षमता की पहचान की जाए और उस क्षमता के विकास के अनुसार विभिन्न गतिविधियों और कार्यक्रमों का आयोजन किया जाए.
- ❖ भविष्य में उच्चतम पेशेवर मांग की भविष्यवाणी करके प्रासंगिक मामलों में प्रारंभिक प्रशिक्षण की व्यवस्था करने की उम्मीद है.
- ❖ स्कूल में सुरक्षा, स्वास्थ्य और स्वच्छता के संबंध में नियम और प्रणालियाँ होनी चाहिए.

विद्यालय का वातावरण और शैक्षिक चुनौतियाँ:

जहाँ एक ओर महत्त्वपूर्ण परिवर्तन हो रहे हैं, वहीं विद्यालय प्रणाली की निश्चित रूप से कुछ सीमाएँ हैं. अलग-अलग परिवारों, अलग-अलग वातावरण, अलग-अलग क्षमताओं, रुचियों और प्राथमिकताओं वाले कई बच्चों को एक सामान्य पाठ्यक्रम में एक साथ रखा जाता है, सभी विषयों को एक निश्चित स्तर तक पढ़ाना, एक निश्चित समय सीमा के भीतर पाठ्यक्रम को पूरा करना, ऐसी चीजें अंतर्निहित को गुंजाइश नहीं दे सकतीं विभिन्न प्रेरणाएँ, अव्यक्त प्रतिभाएँ, बच्चों में रचनात्मकता. किसी पसंदीदा विषय के गहन अध्ययन की सीमाएँ हैं. यदि बच्चे स्वेच्छा से कोई कार्य करना चाहें

तो भी यह संभव नहीं है. क्योंकि स्कूल एक निश्चित दायरे में काम करता है. प्रत्येक प्रणाली का एक ढांचा होता है. स्कूली शिक्षा के मामले में बहुत लचीलापन संभव है. स्कूली व्यवस्था में जहां एक तरफ बच्चों को औपचारिक किताबी शिक्षा दी जाती है, वहीं जीवन में जरूरी कई चीजें सीखी जा सकती हैं. बच्चों की प्रतिभा को बढ़ावा देने के लिए स्कूलों में विभिन्न स्कूल और इंटर स्कूल गतिविधियों का आयोजन किया जाता है. नृत्य, नाटक, संगीत, खेल प्रतियोगिताएं, चित्रकला, निबंध-कविता लेखन, शिविर, यात्राएं, उन्हें प्रोत्साहित करने, राष्ट्रीय दिवस मनाने, छात्र सेना, स्काउट-गाइड, विज्ञान प्रदर्शनियों, देशभक्ति, राष्ट्रवाद, आत्मबल के आयोजन के पीछे बच्चों की सराहना भरोसे, श्रम संस्कार जैसे महत्व, वैज्ञानिक सोच-चिकित्सीय दृष्टिकोण से प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रूप से किया जाता है. दूसरों से सीखने का अवसर मिलता है.पूर्व में राजा, राजकुमार, जमींदार जैसे प्रतिष्ठित और बहुत धनी परिवार अपने बच्चों के लिए घर पर ही शिक्षा की व्यवस्था करते थे. यह भी विचार किया जाना चाहिए कि हमारे बच्चों के लिए अन्य सामान्य बच्चों के साथ पढ़ना गरिमापूर्ण नहीं है. यह भी होमस्कूलिंग का एक रूप था. रवींद्रनाथ टैगोर को अलग-अलग शिक्षक घर पर सुबह 7 बजे से रात 8 बजे तक निश्चित समय पर पढ़ाते थे. इसमें सभी विषयों को शामिल किया गया था. होमस्कूलिंग में स्कूल प्रणाली की सीमाएँ नहीं हैं. एक बच्चा अपनी गति से तनाव मुक्त वातावरण में रुचि के साथ सीख सकता है. स्कूल, पढ़ाई, शौक और आराम की कमी के कारण अपर्याप्त समय इसके लिए सामने रखा गया कारण है. अब जबकि आपको घर पर ही पढ़ाई करनी है, तो आप अपने पसंदीदा विषय का और अच्छी तरह से अध्ययन कर सकते हैं. शौक के लिए अधिक समय देने के कुछ फायदे हैं. लेकिन हमें उन बच्चों के बारे में सोचना चाहिए जो सहजीविता को याद करते हैं.

समारोप:

सामान्य विद्यालयों में बच्चों की व्यक्तिगत आवश्यकताओं की उपेक्षा, विद्यालयों में बच्चों की अधिक भीड़, प्रदूषित वातावरण, शिक्षण की खराब गुणवत्ता, असंतोषजनक पाठ्यक्रम, कार्यान्वयन की कमी, विशिष्ट धार्मिक और नैतिक शिक्षा की आवश्यकता को भी इसका कारण बताया गया है. कुछ माता-पिता महसूस करते हैं कि उन्हें अपने बच्चों के सीखने और विकास की प्रक्रिया में शामिल होना चाहिए. कुछ लोग चाहते हैं कि बच्चे क्या और कैसे सीखते हैं, इस पर हमारा सीधा नियंत्रण हो. साथ ही इसके पीछे यह विचार भी हो सकता है कि बच्चों की व्यक्तिगत कुशलता और क्षमता के अनुसार ही शिक्षा दी जानी चाहिए. कुछ लोगों का यह भी मानना है कि एक शिक्षक द्वारा एक समय में अनेकों को पढ़ाने की तुलना में एक-से-एक शिक्षण अधिक प्रभावी होता है. भारत में भी मुख्यधारा की स्कूली शिक्षा से अलग एक वैकल्पिक प्रणाली शुरू करने के प्रयास किए गए हैं. गुरुवर्य रवींद्रनाथ टैगोर के शांतिनिकेतन और विश्वभारती विश्वविद्यालय, श्री अरबिंदो के अंतर्राष्ट्रीय शिक्षा केंद्र, महात्मा गांधी की बुनियादी शिक्षा, जे. पी. नाइक और चित्रताई नाइक का गरगोती विद्यापीठ, लीलताई पाटिल का सृजन आनंद विद्यालय, विद्याताई पटवर्धन का अक्षरनंदन इसके कुछ प्रमुख उदाहरण हैं. ये प्रचलित शिक्षा प्रणाली के प्रति असंतोष से किए गए शैक्षिक प्रयोग हैं. इसका महत्व बहस योग्य है. इसके पीछे महत्वपूर्ण विचार यह है कि शिक्षा प्रक्रिया नीरस और बंद न हो और प्रायोगिक बनी रहे.

संदर्भ-सूची:

- पारसनाथ राय - अनुसंधान एरिचय , लक्ष्मीनारायण पब्लिकेशन आगरा.
- शर्मा , आर.ए- शैक्षिक अनुसंधान एवं सांख्यिकीः इन्टरनेशनल पब्लिशिंग हाउस , मेरठ.
- गैरेट ई हेनरी- शिक्षा और मनोविज्ञान में सांख्यिकी के प्रयोगः कल्याणी पब्लिशर्स , नई दिल्ली.
- कौल लोकेश- मैथोडोलोजी आफ एजेकेशनल रिसर्च विकास पब्लिशिंग हाउस , नई दिल्ली.
- बालिया शिरीष , अरोडा रीटा- शिक्षा में मापन एवं मूल्यांकन राजस्थान हिन्दी ग्रन्थ
- http://www.allresearchjournal.com/archives/2017vol3issue5/PartK
- https://www.coursehero.com/file/24116637/ThePractical-and-Theoreticalpdf.

नाक्याची शाळा म्हणजे रानमेव्याची अस्सल खान तेथील दुर्दम्य अनुभव

शंकर देवराव लेकुळे
प्राथमिक शिक्षक जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा कोंढुर ता. कळमनुरी जि. हिंगोली पिनकोंड -431702

माझी नाक्याची शाळा ही शिक्षकी पेशातील एक अविस्मरणीय आणि सुंदर अशी आठवण आहे की जी कधीच विसरता न येणारी आहे. व्यक्ती जन्माला आल्यानंतरच ठरवत असतो की भविष्यात आपल्याला कोणते क्षेत्र निवडायचे आणि कोणती सेवा स्वीकाराची त्यातूनच मी दहावी पास झाल्यानंतर काही दिवसातच आपली कुवत,पुढील शिक्षणासाठी लागणारा खर्च,आपल्या आवडीला योग्य वाव देत शिक्षकी पेशाच स्वीकारायचा हे ठरवलं होतं. तयारीही सुरू केली. डीएड पास केल्यावर अवघ्या दोन महिन्यातच शिक्षक म्हणून जिल्हा परिषद शिक्षण विभाग हिंगोली येथे म्हणून रुजू झालो तत्पूर्वी ४०० रुपयाची पास काढून संपूर्ण महाराष्ट्र राज्य पालथा घातला की कुठे शिक्षकी पेशासाठी जागा रिकामी आहे काय हे शोधण्यासाठी पण शेवटी यावे लागले ते आपल्याच जिल्ह्यात. ती तारीख होती 19 डिसेंबर २००७ आपल्याला नियुक्ती भेटलेलं गाव होतं मराठवाड्याची शेवटची सीमा हैदराबाद ते औरंगाबादच्यामध्ये निजामाचे मुख्य ठिकाण म्हणजे डोंगरगांव नाका. हे ठिकाण डोंगरावर वसलेले असल्यामुळेच या गावाला डोंगरगाव नाका असं नाव प्राप्त झालं. निजामच्या काळात याच ठिकाणी सर्व महसूल,शेतसारा जमा केला जायचा.ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेल्या या गावाला माझी नेमणूक झाली होती.हे गाव माझ्या गावापासून 19 किमी अंतरावर होते.येण्या-जाण्यास सकाळी ८ :३० ला जाणारी आणि ५:३० ला परत येणारी अशा दोनच बस गाड्या होत्या. मध्यंतरी खाजगी जीप,गाडी होत्या पण पूर्णपणे अनियमित. गावाचे ठिकाण पूर्णपणे दुर्गम,डोंगरी दर्याखोऱ्यात,नाक्याच्या कुशीत वसलेले होते. बस गावापर्यंत येणे शक्यच नव्हते कधीकाळी मी नियुक्त व्हायच्या अगोदर बस येत होती म्हणायचे पण नंतर काही कारणास्तव बंद झाली. कळमनुरी पासून निघाल्यावर नाक्याला येताना 16 किमी अंतरावर एक चौफुली लागते ईसापुर धरण ,वाकोडी ,कळमनुरी आणि डोंगरगाव नाका असा चौरंगी संगम झिरो फाट्यावर होत असतो.या ठिकाणावरून उतरून ३ किमी पैदल जावे लागे, अधिकारी आला तरी याच ठिकाणी उतरून तो पायी येत असे.या गावाला येण्याचा दुसरा पर्याय म्हणजे विदर्भातील शेंबाळपिंपरी या गावी उतरून त्या ठिकाणावरून ५ किमी अंतराने कच्या रस्त्याने पश्चिम दिशेने शेंबाळेश्वर मंदिराच्या मार्गे चालत यावे लागते दरम्यान गावाच्या बाजूला असणाऱ्या पैनगंगा नदीतून कमरेइतक्या पाण्यातून यावे लागे,कपडे पूर्ण भिजायचे येथे खरा कस लागला जायचा. हा रस्ता फक्त हिवाळा आणि उन्हाळा या दोनच ऋतूत चालू असतो पण पावसाळ्यात पुर सदृश्य परिस्थिती असल्याने प्रवास करणे शक्य नव्हते. अशावेळी शेंबाळपिंपरी ईसापुर धरणाच्या गेटवरून पैदल किंवा दुचाकीने येणे हा एकमेव पर्याय होता ज्या गावात माझी प्रथम नियुक्ती झाली होती ते गाव मराठवाड्याच शेपूट होतं. गावाची लोकसंख्या १००० च्या जवळपास होती. गावात मराठा,हटकर तेली, भोई, बौद्ध, मातंग,गवळी अशा जातींची बहुसंख्या घरे होती. गावात पाचवीपर्यंत वर्ग ,११२ विद्यार्थी आणि दोनच शिक्षक कार्यरत होते तर दोन पदे रिक्त होते. गावात एक अंगणवाडी सौ निर्मलाताई गजानन मारणीय ह्या त्या अंगणवाडीच्या मदतीस म्हणून काम पाहत होत्या.गावाला गांगापूर या गावासोबत ग्रुपग्रामपंचायत अस्तित्वात होती. त्यावेळेस गावचे सरपंच श्री सुरेश भाऊराव मस्के होते तर ग्रामसेवक म्हणून श्री तवर साहेब काम पाहत होते.या गावचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या गावातील एकही विद्यार्थी बाहेरगावी शिक्षणासाठी नव्हता आणि शाळेला चांगले शिक्षक लाभल्याने शाळेचे गुणवत्ता खूप चांगली राहिली आहे असे गावच्यांचे म्हणणे होते.गावात पाचवी पर्यंत वर्ग होते त्यानंतर मात्र मुलांची शिक्षणासाठी खूप त्रेधा तिप्पट व्हायची ती म्हणजे त्यांना सहावीला प्रवेश घेण्यासाठी कळमनुरी किंवा शेंबाळपिंपरी,

ईसापुर धरण याशिवाय पर्याय नव्हता काहीजण तर आपल्या नातेवाईकांकडे शिकायला जात असत कोणी वस्तीग्रहात प्रवेश घेत असता. प्रवेश कुठेही घ्या पैदल चालण्यावाचून त्यांना पर्यायच नव्हता. कळमनुरीच्या शाळेत प्रवेश घेतला तर झिरो फाट्यापर्यंत ३ किमी पैदल आणि तिथून बसची दोन- दोन तास वाट पाहत थांबावे लागे. शाळा सकाळी १२:३० ला असायची पण सकाळी ९ वाजता आपली भाजी भाकरीचा डब्बा सोबत घेऊन त्यांना जावे लागायचे. ईसापुरच्या शाळेत प्रवेश घेतला तर ५ किमी पैदल नदीतून जावे लागेल अशी अवघड परिस्थिती असल्याने मागासवर्गातील काही मुलींची तर सातवा वर्ग झाला की लग्नही उरकून टाकली जायची. गावात बालविवाहाचे प्रमाणही थोड्या प्रमाणात होते.गावाच्या वायव्य दिशेला असणाऱ्या नाक्याच्या खालीच शाळेची जागा होती. शाळेच्या मैदानातच सुप्रसिद्ध दत्त मंदिर होतं . या मंदिराचाही खूप मोठा इतिहास होता. मंदिरात फेसो फेस बसेल अशी दत्त मूर्ती होती. फार फार प्राचीन काळी या ठिकाणी दत्त प्रकट झाले होते त्यांची पूजा करण्यासाठी एक साधू बाबा राहत होते.मंदिराचे तोंड पूर्वेकडे असल्याने साधू बाबा रोज नदीचे पाणी दिवस उजडायच्या अगोदर आणून दत्त यांचा जलाभिशेख,पूजा करत होता अशी आख्ययिका सांगण्यात येते. दरवर्षी दत्त जयंतीला खूप मोठा सप्ताह या गावात शाळेच्या मैदानात भरतो. लेकिबाळी अतिशय उत्साहाने माहेरी येऊन सहभागी होतात. आमचे पाचवी ते सहावीची सर्वच विद्यार्थी पारायणाला बसत असल्याने शिक्षण काही होतच नसे. परिपाठाच्या मैदानात चुलखंड खणली जात होती सप्ताह संपला की साफ सफाई करताना आमच्या नाकी नऊ यायचे.

या गावची जमीन सुपीक असल्याने केळी हे बागायती पीक त्यावेळी मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. एक वेळ तर अशी होती की केळीला मागणी कमी झाल्याने व्यापारी केळी घेऊन जाण्यास तयार नव्हते. त्यामुळे कोल्हे, पाहुणे यांच्यासाठी एक उत्तम मेजवानीच ठरू लागली. गावातील लोक रोजच पिकलेल्या केळयांचा एक घड शाळेत शिक्षकांना खाण्यासाठी आणू लागले. याशिवाय या गावात कापूस, तूर, मूग,हरभरा,गहू उडिद,सोयाबीन अशी पिके ही सर्रास घेतली जात होती. ज्या लोकांची शेतजमीन नदीच्या काठावरती होती त्यांना मात्र एका हंगामाला नक्कीच मुकावे लागे. दत्त मंदिरासोबतच 50 मी अंतरावर एक हनुमान मंदिर असे दोनच मंदिर सुरुवातीला गावात होती कालांतराने एक डोंगरेश्वरांचे मंदिरही २०१६ या वर्षी बांधण्यात आले.

गावाच्या शाळेबाबत बोलायचे झाल्यास पाच वर्ग आणि तीनच खोल्या होत्या एक वर्ग ग्रामपंचायत कार्यालयात भरला जायचा तर दुसरा वर्ग दत्त मंदिराच्या पाठीमागे असणाऱ्या खोलीत भरला जात असे. ही खोली तयार होण्याच्या अगोदर या ठिकाणी लोक शौचाला बसत असत,या ठिकाणी वर्ग होईल किंवा ज्ञानदानाचे कार्य होईल असा गावकऱ्यांचा पुसटचाही विचार नव्हता पण या ठिकाणी शासकीय अनुदानातुन एक सुंदर अशी खोली तयार झाली होती याच खोलीत मुख्याध्यापक कक्ष, शालेय पोषणाचे साहित्य आणि पाचवा वर्ग भरला जायचा ही खोली म्हणजे मुख्य खोली होती. तिसरी खोली दत्त मंदिराच्या समोर होती अतिशय जीर्ण जीर्ण झाली होती पावसाळ्याच्या दिवसांत तिच्यात गुडघाभर पाणी साचायचे,ही इमारत धोका दायक म्हणून जाहीर झाली होती. या खोलीत कधी कधी घोरपड यायची. गावाला चांगले आणि कडक शिस्तीचे, भोक्ते शिक्षक लाभल्यानेच मुलांनाही कडक शिस्त लागली होती.२००७ च्या अगोदर श्री शिंदे सर,श्री चौधरी सर,श्री कदम सर असे काही शिक्षक लाभून गेले होते सध्या श्री राठोड देविदास रामसिंग हे मुख्याध्यापक तर श्री सचिन चितांबरराव जाधव हे शिक्षण सेवक म्हणून कार्यरत होते दोघेही सक्रिय आणि सकारात्मक विचारांचे शिक्षक होते

शाळेत अध्यापन करत असताना एक चांगले कडक शिस्तीचे शिक्षक म्हणून माझी ओळख निर्माण झाली होती. गावात एकही शाळाबाह्य विद्यार्थी नव्हता. पावसाळ्याच्या दिवसात तर निसर्गरम्य अनुभवाची शिदोरी या गावाला बांधली जायची. मी तरुण असल्याने शाळेतील मुलांना याचा नक्कीच फायदा व्हायचा. पावसाळ्याच्या दिवसात अतिवृष्टी झाल्यास ईसापुर धरण पूर्णपणे भरले की त्याचे काही गेट सोडले जायचे आणि नाक्याच्या भोई समाजाच्या

लोकांची दिवाळी साजरी व्हायची. या लोकाना जास्त जमीन नव्हती आणि घरचा सगळा उदरनिर्वाह हा मासेमारीवर चालायचा. धरण भरून ओसंडून वाहू लागल्यावर नदीच्या पात्रात हजारो नव्हे टनाने मासे रात्रंदिवस राबून ते लोक मासे पकडतात.अव्वाच्या सव्वा भावात त्या विकल्या जायच्या. चांगला भाव लागला असता तर चांदीच झाली असती पण तरीही ते अवघ्या एका महिन्यात ७० ते ८० हजार रु कमावतात पण प्रत्येकाच्या सोबतच हे घडतेच असे नव्हे तर काहीना २०,००० रुपयांतही समाधान मानाव लागत होत पण हे कधी घडतं तर धरण भरल्यावरच अन्यथा आपल पोट भरणही त्यांना अवघड जात होतं याच समाजातील माधव सटवा शिरफुले, प्रल्हाद तुकाराम शिरफुले, अमोल गिरगुले, पवन बबन शिरफुले, संदीप तुकाराम शिरफुले,कृष्नंद आनंदा शिरफुले, अनिता शिरफुले, संदीप नथू शिरफुले, पूजा, प्रसाद विठ्ठल शिरफुले आरती शिरफुले,सूरज ,अजय शिरफुले असे विद्यार्थी होऊन गेले. २००९ यावर्षी तर धरणाचा एकही गेट सुटला नाही म्हणून पोटाची खळगी भरण्यासाठी जास्तीत जास्त भोई समाजातील लोकांनी मुंबई, पुणे आदी ठिकाणी आपले स्थलांतर केलं होतं. धरणाचे गेट सुटल्यावर पाण्याच्या प्रवाहाचा खळ खळ आवाज माझ्या वर्गात यायचा. दहा ते बारा गेट सुटल्यावर तर गावाच्या खालचा भाग म्हणजे बौद्ध गल्लीतील लोक राहण्यासाठी आमच्या शाळेत यायचे.नदी शेजारील लोकांच्या शेतातील पीक होत्याचं नव्हतं व्हायचं अशा स्थितीत मुलांत मूल होऊन आम्ही रमायचो. दुपारच्या सुट्टीत नाक्यावर जाऊन तेथील भल्यामोठ्या तीन-चार दगडावर बसले की सगळे दुःख विसरून जायचं. गांगापूर वाझगव्हाण ,वाकोडी, इसापूर धरण, शेंबाळपिंपरी, शिऊर कॅम्प गाव सहज म्हणजे अलगत दिसायची तेथून पुराचा नयनरम्य देखावा देखने लायक होता. हिरवेगार शेत,शेतीत राबणारे लोक, महिला पाहून तोंडातून गाण्याचे मंजुळ स्वर निघायचे यातून स्वप्निल रणखांब सारखा गायक विकसित झाला असावा अस वाटू लागले.त्या दिवसांत मासे खूप कमी भावात विकले जायचे.सकाळी मासे पकडून दिवसभर विकायचे असा या लोकांचा दिनक्रम असायचा.याकामी यातच ते मासे आणण्यासाठी घरामध्ये जी पिशवी, चिरकुट मिळेल ते घेऊन त्यात मासे आणत यातच ते आपल्या मुलांचे दप्तराची पिशवी मासे आआणण्यासाठी घेऊनही जायचे.एकदा काय झाले एका मुलाचा झोऱ्या / दप्तर त्याच्या बापाने मासे पकडायला नेला आणि त्यात मासे टाकून घरी आणले. मुलगा शाळेत जायची वेळ झाली मग दप्तर इकडे तिकडे शोधू लागला त्याच्या सगळा प्रकार लक्षात आला पण काय करणार हा रोजचाच प्रकार असल्याने घरी आल्यावर त्याने मासे बाहेर काढून पिशवी रिकामी केली. त्यात आपली २,३ पुस्तक, वही टाकून शाळेत आणले .मी माझ्या रोजच्या दिनक्रमाप्रमाणे शिकवायला सुरुवात केली. माझ्या चौथा वर्ग मारुती मंदिरासमोराच्या खोलीत बसला होता. वर्गात खूप माशा गोंगाट करू लागल्या सगळया मुलांचं लक्ष विचलित होऊ लागल्याने वर्ग झाडून काढला तरी माशा काही कमी होत नव्हत्या.अखेर अक्षय बोलला, "सर यांच्या दफ्तरापाशी खूपच माशा यायल्यात" मग त्याच्याजवळ जाऊन त्याचे दप्तर तपासणी केली त्याचे दफ्तर उंडले तर वह्या पुस्तकासोबत दोन बारीक बारीक वाळलेल्या मासोळया बाहेर पडल्या.आम्ही दिवस- रात्र याच कामात राहतो हेच या प्रसंगावरून दिसून आले. सगळी मुले पोटभर हसली पण ज्याच्या दप्तरात हे घडलं तो मात्र कावराबावरा झाला होता. अशा मुलांमध्येच माधव सटवाजी शिरफुले हा खूपच तापड मुलगा होता.राठोड सरांनी जसे शिकवले तसेच डफ वाजवण्याचे कौशल्य त्यांन अवगत करून घेतलं होतं.शाळेत जर राठोड सर नसतील तर तोच लेझीमचे प्रकार घ्यायचा. शाळेत जरी कमी हुशार असला तरी इतर कामात मात्र तो तरबेज होता.आई नसल्याने घरची सगळी कामे त्यांलाच करावी लागत.गावातील कोणाच्या शेतात कोणती खाण्याची वस्तू आहे? याचा त्यास सुगाव पटकन लागायचा आणि गुरुजींना येऊन सांगायचा.दिवाळीच्या सुट्ट्या लागायच्या थोड अगोदर जांब /पेरू पिकण्याचे दिवस होते. आमच्या मामाच्या शेतात तीन पेरूची झाडे होती. मी माझ्या सहकारी शिक्षकांना दुपारी तिकडे फळ खाण्यासाठी घेऊन जायचो. झाडावर चढून तेथील फळ तोडून देण्याचे काम करायचो.या पेरूची तुलना अमेरिकन पेरूशी करावीशी वाटायची.ते चवीला गोड तर होतीच पण मधला पांढरा शुभ्र गर मनाला वेगळीच चटक लावून जायचा.त्याला

दुधाळजांब म्हटले जायचे.एखाद्या बाळातीन बाई प्रमांने झाड फळांनी वाकायचे त्याची फळ पूर्ण गाव खायचा तरी संपायची नाही आम्ही पोटभर खाऊन दस्तीत टाकून घरी घेऊन जायचो.अस्सल रानमेवा फक्त या मुलांमुळे आम्हाला खायला मिळायचा. त्यामुळे हा प्रसंग मी कधीच विसरू शकणार नाही.कालांतराने लोकांचा त्रास व धान्याची नासाडी यामुळे ते दोन्ही झाड तोडून टाकले असे काही दिवसांपूर्वीचसमजले.शाळेत वर्गात शिकवताना मुलांना पुस्तकी ज्ञानाबरोबर चांगले वागण्याचे,शाळेवर परिसरासोबत कसे वागायचे ? याचे शिक्षण दिले जायच. जी मुले दिलेला अभ्यास पूर्ण करून येत नाहीत अशा मुलांना न कळत शिक्षाही करत होतो त्यामुळे मुळात एक वेगळीच भीती निर्माण झाली होती. शाळेनंतर आपला अभ्यास करत बसावे कुणी इकडे-तिकडे भटकत जाऊ नये असे मुलांना सुचवले जायचे.एका दिवशी शाळा सुटली मुले दप्तर घेऊन घराकडे पळाली.मीही घरी गेलो आणि कपडे बदलून विरंगुळा करण्यासाठी व्यंकटेश भाऊजीच्या गावाला लागून असलेल्या शेतात एक पुस्तक वाचन करण्यासाठी घेऊन गेलो .जवळच एक विस्तीर्ण वेळूचे झाड त्या खाली बसून थोडा वेळ आराम केला. वाचायला सुरुवात केली.सगळीकडे शांतता होती आजूबाजूला कोणीही नव्हते.अशा स्थितीत मला मुलांच्या बोलण्याचा आवाज आला. उभा राहून आवाजाच्या दिशेने वाटचाल केली बघतो तर काय तेथेच वेळूच्या झाडाच्या पाठीमागे एक लिंबाचे झाड होतं त्या झाडाच्या शेंड्यावर माधव चढला होता खाली अमोल गिरगुले, संदीप अशी काही मुले होती. माधव मोहोळ काढण्याच्या तयारीत असावा असा माझा अंदाज होता माधव झाडावर होता आणि इतर मुले त्याला मोहोळाच्या दिशेने जाण्यास मार्गदर्शन करत होती. सोबत गप्पा मारत होती त्यांच्या गप्पा कोणत्या तर शाळेतल्याच "लई मजा आली सरांनी आज मला शिक्षा केली" असे तो म्हणू लागला. मी त्या ठिकाणी आहे याची त्यांना भणकही नव्हती आणि असेल याची शक्यताही नव्हती. तो एवढया अवघड जागी गेला होता की सर्वसाधारण व्यक्ती तर त्या ठिकाणी जाऊ शकत नव्हता. त्याच्या बोलण्यातून मला जाणवले की माझी त्याच्या मनात खूप मोठी भीती आहे मी त्याचे सगळे बोलणे ऐकून घेतले थोडसं जवळ गेलो तोच माधवची नजर माझ्यावर गेली आणि तो एकदाच म्हटला "अरे बापरे! लेकुळे सर आले,पळा रे"आणि तो जेथे होता तेथून त्याने उडी मारली. सगळी मुलं एका सेकंदात वाऱ्यासारखी गायब झाली. माधवने ज्या उंचीवरून उडी मारली ते झाड दहा - बारा फूट उंच असेल आजच्या काळातील एखाद्या व्यक्तीने एवढ्या उंचीवरून उडी मारली पडला तर तो खंगळाच झाला म्हणून समजा. मला त्यांना शिक्षा द्यायची नव्हती तर फक समजवायचं होतं पण त्या अगोदरच त्यानी ओळखून तिथून पोबारा केला होता.माझा वर्ग 100% उपस्थित असायचा पण पुढील तीन दिवस ते काही वर्गात आले नाहीत.त्याचे मुख्य कारण मला समजले नंतर चौथ्या दिवशी मला त्यांच्या घरी जाऊन पालकांना समजावून शाळेत आणावे लागले आणि झालेल्या प्रकाराबद्दल वर्गात एकही शब्द काढला नाही झाकली मूठ सव्वा लाखाची म्हणतात तेच झालं होतं.

संदर्भ ग्रंथ

1)माझी नाक्याची शाळा एक अविस्मरणीय आठवण – शंकर देवराव लेकुळे
2)माझी शाळा माझे उपक्रम — शंकर देवराव लेकुळे

डॉ. धोंडो केशव कर्वे यांचे महिला विषयक विचार

प्रा. मनोहर शामराव वागतकर

श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी बु. अकोला

मो.क्र. ९८९०९७२५३०, E-mail :manoharwagatkar@gmail.com

प्रस्तावना :

महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा जन्म १८ एप्रिल १८५८ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील मुरूड या गावी झाला. (मुरूड गावापासून १५ मैलावरील शेरवली या गावी आजोळी जन्म झाला) मुरूड हे गाव मूळवट ग्राम या नावाने पूर्वी ओळखले जायचे. पुढे मूळवट चा अपभ्रंश होऊन मुरूडझाले अशी नोंद १८६५ साली रा. सा. मंडलिकांनी केली आहे.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांचा मातृवंश म्हणजे रँगलर परांजपे यांचे घराणे होय. महादेव परांजपे हे धोंडो केशव कर्वे यांचे खापर पणजोबा (आईच्या वडिलांचे वडील) तर पितृवंश (वडिलांचे वडील) रघुनाथ भट कर्वे अग्निहोत्री होय. रघुनाथ भट यांना दाजीबा व बापूनाना ही दोन मुले झाली. बापूनाना यांना सखाराम, केशव व बल्लाळ अशी तीन मुले होती.

केसोपंतांचा स्वभाव निगृही होता. आणि काही विशेष प्रसंग असला म्हणजे तो जाणवे. भिकाजीपंत यांची मुंज झाली, तेव्हा मुरूड गावात समाराधना घालण्याविषयी त्यांनी पत्नीने आग्रह धरला तेव्हा केसोपंतांनी त्यांना निक्षून सांगितले की, "माझ्या आटोक्याबाहेरची गोष्ट मी करणार नाहीष पण पुढे धोंडो केशव कर्वे यांच्या मुंजीच्या वेळी केसोपंतांनी आपल्या पत्नीची इच्छा पूर्ण केली.

केसोपंत गेल्यानंतर उतारवयात त्यांच्या विधवा पत्नीला कष्ट करावयाचे कारण राहिले नव्हते. जन्मस्वभावाने ती नेहमी काम करत राही. केसोपंतानंतर सव्वीस वर्षे गृहदेवतेप्रमाणे कुटुंबातील सर्व सदस्यांना आनंद देऊन व सर्वांच्या उपयोगी पडून चौत्र शुद्ध २, शके १८२७ रोजी ऐंशी वर्षाची होऊन तिचे निधन झाले. निधन होण्यापूर्वी पंधरा दिवस तिने चूल दुसऱ्याच्या हाती दिली. तोपर्यंत दोनशे पावलांवरच्या विहिरीचे पाणी आपल्या हाताने आणून स्वयंपाक स्वत: केल्यावाचून ती कधी राहिली नाही.

विधवांच्या उद्धाराचे कार्य

धोंडो केशव कर्वे यांनी पुनर्विवाह करून विधवांची समाजातील स्थिती सुधारण्याचे पहिले पाऊल टाकले होते आणि म्हणून श्आधी आचार मग प्रचारश अशी त्यांच्या कार्याची सुरुवात होती. त्यावेळी दक्षिणी लोकांत विधवा विवाहाच्या कार्यासाठी झटणारी संस्था, मुंबई, महाराष्ट्र व वऱ्हाड या कोणत्याही ठिकाणी नव्हती. तेव्हा अशा स्थितीत आपण या कार्यासाठी एक संस्था स्थापन करावी असे विचार धोंडो केशव कर्वे यांच्या मनात घोळू लागले. आणि जातिभेदाचा अत्यंत बिकट प्रश्न बाजूला ठेवून निर्भेळ पुनर्विवाहाच्याच कार्यासाठी झटण्याचा निश्चय त्यांनी केला.

त्याप्रमाणे १८५६ च्या कायद्यान्वये पुनर्विवाहाचा प्रचार करू इच्छिणारे व मध्य प्रांतातील पुनर्विवाहित गृहस्थांच्या विचाराने ३१ डिसेंबर १८९३ रोजी वर्धा येथे वा. वि. परांजपे यांच्या घरी एक सभा भरविली. सभेला एकूण १४ गृहस्थ होतेय पण त्यापैकी तीव्र कळकळीचे सातच होते. त्यात ह. गो. पाध्ये, वा. म. कोल्हटकर, श्री. ग. परांजपे, वा. वि. परांजपे, शं. सी. फडके, भा.स. गोवंडे, धों. के. कर्वे इत्यादी. या सभेत सर्वानुमते घटनेसंबंधी २५ नियम ठरले. अशा रीतीने संस्थेची घटना होऊन व तिचे धोरण आखले जाऊन धोंडो केशव कर्वे व इतर केली. मंडळी पुण्याला परत आली व व्यवस्थित रीतीने त्यांनी कामाला सुरुवात

पुनर्विवाहित गृहस्थांमध्ये विधवा विवाहाच्या कार्यासाठी जितकी कळकळ असू शकेल तितकी सामान्यत: इतरांमध्ये उत्पन्न होणे शक्य नाहीय पण एकदा ही पायरी चढल्यावर या कार्यासाठी झटणे हा त्यांचा स्वार्थच होऊन बसतो हे सूत्र लक्षात घेऊन धोंडो केशव कर्वे यांनी कुटुंबमेळे भरविण्याची योजना आखली. पुनर्विवाहित गृहस्थ दूरदूर राहणारे असल्यामुळे त्याजमध्ये संघटन होऊन काही सहकार्य व्हावे हा या मेळ्यांचा हेतू होता.

पहिला मेळावा पुण्यात मेहेंदळे यांच्या बागेत २१ मे १८९४ रोजी झाला. या मेळाव्यात

पुनर्विवाहित गृहस्थ व त्यांची पुनर्विवाहापासून झालेली संतति मिळून २२ लोक हजर होते. तर दुसरा मेळावा सन १८९७ साली उमरावती (आताचे अमरावती) येथे डिसेंबरच्या अखेरीस झाला. या मेळाव्यात एकूण ह्मघ लोक हजर होते. तर तिसरा मेळावा, सदाशिव पेठेत मळेकरांच्या वाड्यत १९१३साली भरला व चौथा मेळावा १९१५ मध्ये मे महिन्यात प्रांतिक सामाजिक परिषद भरली, त्याच मंडपात भरला होता.

२५ जुलै १८५६ रोजी पुनर्विवाहाचा कायदा पास झाला. त्यानंतर धोंडो केशव कर्वे यांनी विधवा विवाहाचे कार्य जितके लोकमताला न दुखवता करणे शक्य असेल तितके करावे असे योजले होते. २० ऑगस्ट १८९५ रोजी भरलेल्या मंडळीच्या सभासदांच्या विशेष सभेत पूर्वीचे शविधवा विवाहोत्तेजक मंडळीश हे बदलून शविधवा—विवाह प्रतिबंध निवारक मंडळीश असे नामकरण करण्यात आले. गरीब पुनर्विवाहितांच्या मुलामुलींना मदत करण्याचे काम या विधवा प्रतिबंध— निवारण मंडळी ने अंगावर घेतले होते. त्यासाठी पैशाची आवश्यकता होती. आणि म्हणून धोंडो केशव कर्वे यांनी जोमाने काम करण्यास सुरूवात केली.

धोंडो केशव कर्वे फर्डे वक्ते नव्हतेय पण ते जेव्हा बोलत तेव्हा त्यांच्या शब्दाशब्दातून तळमळ व्यक्त होत असे. श्नीतिसंबंधीचे नियम स्त्रिया व पुरूष यांना सारखेच लागू करण्यात यावेत, विधवांना पुन्हा विवाह करण्यास जो प्रतिबंध करण्यात येतो तो त्यांच्यावर अन्याय आहे व म्हणून तो दूर केलाच पाहिजे, आपली कन्या शोभेल अशा मुलीशी लग्न ही शुद्ध पशुवृत्ती आहे, वगैरे विचार ते अत्यंत तळमळीने आणि कळकळीने मांडीत.

धोंडो केशव कर्वे यांनी पुनर्विवाह केला तेव्हा त्यांना भयंकर त्रास सहन करावा लागला होता. त्यांचे वडील बंधू भिकाजीपंत यांना वेड लागण्याची वेळ आली होती. आईवडिलांना पुण्यात आल्यानंतर त्यांना भेटता येत नसेय लोकनिंदेमुळे, आईच्या मृत्यूच्यावेळी आपला मुलगा जवळ असावा अशी आईची अपेक्षा असतांना, धोंडो केशव कर्वे यांना जवळ राहता आले नाही. आई मृत्युशय्येवर असताना तिची अखेरची भेट सुद्धा त्यांना घेता आली नाही. तरी धोंडो केशव कर्वे समाजावर खवळून तुटून पडत नसत की समाजावर रागवत नसत. मात्र आपल्या आईच्या मृत्यूच्या वेळी सुद्धा आपल्याला तिला भेटता येऊ नये याचे शल्य त्यांच्या हृदयाला बोचत होते.

स्त्री शिक्षणाचे कार्य

विधवा—विवाह प्रतिबंध—निवारण मंडळी चे काम करीत असतांना धोंडो केशव कर्वे यांना अनेक मतांचे लोक भेटले. त्यामुळे विधवा विवाहाने जेवढ्य विधवांचा उद्धार करता येईल, त्यापेक्षा अधिक विधवांचा उद्धार त्यांना शिक्षण दिल्यानेच होऊ शकेल ही अतिशय महत्त्वाची गोष्ट धोंडो केशव कर्वे यांच्या लक्षात आली. शिवाय त्या काळात विधवांना शिक्षण देण्याच्या बाबतीत धर्मश्रद्धा दुखविण्याचा प्रश्न तीव्र स्वरूपात नव्हता. त्यामुळे त्याबाबतीत लोकांना समजावणे अधिक सोपे झाले होते. शिवाय पंडिता रमाबाईंच्या शारदाश्रमाने धोंडो केशव कर्वे यांना स्फूर्ती दिली होती. त्यामुळे दिवसेंदिवस हा विषय त्यांच्या मनात घर करून रहात होता. सुरूवातीच्या काळात शारदाश्रमाची प्रचंड वेगात भरभराट झालीय पण त्यातल्या दहा स्त्रियांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यानंतर श्शारदाश्रमश विरूद्ध लोकक्षोभ उसळला होता. पण अशी एखादी विधवा शिक्षणासाठी कार्य करणारी स्वतंत्र संस्था स्थापन करणे धोंडो केशव कर्वे यांना आवश्यक वाटत होते.

१ जानेवारी १८९९ रोजी अनाथ बालिकाश्रमाची सुरूवात झाली व अडीच वर्षांनी सदाशिव पेठेत पेरू गेटजवळ गोरे यांच्या वाड्यत आश्रमाचे काम सुरू झाले. तेव्हा एकच विधवा या आश्रमाची विद्यार्थिनी होती व वर्षाच्या अखेरीस 4 विधवा विद्यार्थिनी झाल्या. तर दुसऱ्या वर्षाच्या अखेरीला ७ होत्या आणि तिसऱ्या व चवथ्या पाचव्या वर्षाच्या अखेरीस ही संख्या अनुक्रमे ११, १४ व २१ अशी झाली.

अशा रीतीने आश्रमाची सुरूवात पुण्यातच झाली खरी, परंतु धोंडो केशव कर्वे यांचा मूळ आश्रमाचा विचार कायम होता. ही स्त्रियांची नाजूक संस्था, तेव्हा ती शहरापासून दूर असणेच बरे असे त्यांना मनापासून वाटे.

आश्रमासाठी वर्गणी जमविणे अत्यंत आवश्यक असल्याने धोंडो केशव कर्वे यांनी संबंध कोकण परिसरात पायपीट केली. शिवाय मुंबईमध्ये त्यांनी चाळी चाळींमधून सभा घेऊन आश्रमाच्या कामाची माहिती लोकांपर्यंत पोहोचवली. त्यामुळे त्यांच्या कार्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन

बदलत चालला होता.

एकदा धोंडो केशव कर्वे आणि त्यांचे ओळखीचे एक गृहस्थ वर्गणी गोळा करीत असतांना एका दानशूर गृहस्थाकडे गेले. त्या गृहस्थाने यांना वाटाण्याच्या अक्षता लावल्या. तो दानशूर गृहस्थ म्हणाला, ष्तुम्ही जिकडे तिकडे भ्रष्टाचार माजविला आहे व तुमच्या मार्गाने गेल्यास समाज रसातळाला जाईल" धोंडो केशव कर्वे अत्यंत सहनशील होते ते अशा लोकांना कधी दुरुत्तरे करीत नसत. मग ते दोघे एका मराठी शाळेच्या मास्तरकडे गेले. मास्तर धोंडो केशव कर्वे आणि बरोबरच्या गृहस्थाला म्हणाले ष्तुम्ही ज्या गोष्टीसाठी प्रयत्न करीत आहात त्याचा परिणाम काय होईल हे मला माहीत नाहीय पण तुमच्याविषयी आदरभाव उत्पन्न होतो व तो हा एक रुपया देऊन मी व्यक्त करीत आहेष धोंडो केशव कर्वे यांचे मन गहिवरून आले. कारण मास्तरांनी दिलेल्या त्या एक रुपयाची किंमत कितीतरी अधिक होती. अशीच चिकाटी धोंडो केशव कर्वे यांनी पुढेही ठेवल्यामुळे अनेक थोर गृहस्थांनी स्वयंस्फूर्तीने आश्रमाला मोठाल्या देणग्या पाठवून दिल्या होत्या.

१९०२ पर्यंत आश्रमाचे काम धोंडो केशव कर्वे त्यांची पत्नी आनंदीबाई आणि मेव्हणी इतकी माणसे मिळून कसेबसे चालवीत होती. १९०२ च्या अखेरीला श्रीमती पार्वतीबाई आठवले आश्रमाला येऊन मिळाल्या. त्या आश्रमाच्या लेडी सुपरिटेंडेंट झाल्या व पुढे त्यांच्या कामाला अधिक योग्य स्त्रिया मिळाल्या. त्या निष्ठावंत तर होत्याचय पण निरूस्वार्थी कार्यकर्त्यांची भूमिका त्यांनी बजावली. त्यात श्रीमती काशीबाई देवधर, श्रीमती वेणूबाई नामजोशी, श्रीमती कृष्णाबाई फाळके, कुमारी कृष्णाबाई या व अशांसारख्या अनेक स्त्रिया अत्यंत तळमळीने आणि कळकळीने आश्रमासाठी धडपड करीत, कष्ट करीत, समाजाची सेवा करीत होत्या.

महिला विद्यालय व निष्काम कर्म मठ

सुरूवातीला अनाथ बालिकाश्रमाचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. विधवा किंवा कुमारिका विद्यार्थिनी व त्यांच्या बहिणी एवढ्यंनाच आश्रमात प्रवेश होताय पण नंतर विशिष्ट फी घेऊन कोणत्याही कुमारिकांना व सुवासिनींना प्रवेश देण्यात येऊ लागला. त्यामुळे अशा विद्यार्थिनींची संख्या प्रचंड वाढू लागली. परंतु आश्रमाच्या मूळ उद्दिष्टाला धक्का लागू नये म्हणून अविधवा विद्यार्थिनींची संख्या एक तृतीयांश नसावी असा नियम करण्यात आला.

पण असे असले तरी शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या इतक्या विद्यार्थिनींना शिक्षणाचे दरवाजे बंद व्हावेत हे धोंडो केशव कर्वे यांना मनोमन अस्वस्थ करणारे होते. ही अस्वस्थता त्यांनी आश्रमाच्या कमिटीसमोर मांडलीय पण उपयोग झाला नाही. शेवटी ४ मार्च १९०७ रोजी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या मालकीच्या जुन्या वाड्यत सहा विद्यार्थिनी घेऊन धोंडो केशव कर्वे यांनी महिला विद्यालयाची सुरूवात केली.

या महिला विद्यालयाची काही उद्दिष्टे धोंडो केशव कर्वे यांनी समोर ठेवली होती. ती पुढीलप्रमाणे होती :—

१) गृहिणीपदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या मनावर पूर्णपणे ठसतील व समाज विषयक कर्तव्याची जाणीव होईल असे शिक्षण देणे.

२) मुलींना वयाच्या ह्यञ व्या वर्षापर्यंत शिक्षण देणे. नंतर त्यांनी गृहिणीपदाची जबाबदारी अंगावर घ्यावी.

३) उदार हिंदुधर्माचे शिक्षण देणे. साधी राहणी व उच्च विचारसरणी निर्माण करणे. भिन्न धर्म, भिन्न जाती व भिन्न मते याबद्दल उदारवृत्ती उत्पन्न करणे व कर्तव्य जागृती करणे या गोष्टी यात अंतर्भूत आहेत.

समाजातील विवाहपद्धती सदोष असल्यामुळे मुलींचे पालक योग्य वर शोधता शोधता अगदी कंटाळून जात. अशा वेळी या पालकांना महिला विद्यालय मोठा आधार वाटे. शिवाय काही पालक अधिक जागरूक असत व त्यांना मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा वाढवावी असे प्रामाणिकपणे वाटे. प्रौढ वयात मुलींना शिक्षण द्यावयाचे म्हणजे पुढे लग्नाचा योग जमला नाही तरीही त्या स्वावलंबी बनून समाजकार्य करू शकतील. त्यामुळे अशा लोकांना महिला विद्यालय हा एक आधार वाटू लागला.

१९१० मध्ये त्यांनी निरूस्वार्थीपणे कार्य करणाऱ्या सेवक सेविकांची सभा घेतली व मठाचे नियम ठरविले. श्करवेल तेवढा स्वार्थत्यागश हे मठाच्या कल्पनेचे मुख्य अंग होते. आणि या

कल्पनेला अनुसरूनच आश्रमाच्या लाईफमेंबर स्त्रियांचे वेतन निर्वाहाला आवश्यक तेवढेच ठेवून लाईफ मेंबराची घटना श्मठश या नावाने नव्हेय पण त्यांत प्रतिबिंबित झालेल्या तत्त्वांवर व्हावी अशी धोंडो केशव कर्वे यांची इच्छा होती.

श्निष्काम कर्म मठाश चे ध्येय फार उच्च होते. निष्ठेने आणि सातत्याने परोपकार करीत राहायचे आणि तेही कोणत्याही फलाची अपेक्षा न धरता हे काम फार कठीण होते व आहे. आणि म्हणून हा मठ फार काळ क्रियाशील राहू शकला नाही. बऱ्याच लोकांचा व आश्रमाच्या व्यवस्थापक मंडळींचा देखील गैरसमज झाला. मठ ही श्सहेंट्स ऑफ इंडिया सोसायटीश अगर एखादे मिशन याहून यत्किंचितही भिन्न नव्हती. सेवक सेविकांनी अंगीकारावयाची व्रते अक्षरशरू सर्व्हेंट्स ऑफ इंडिया सोसायटीच्या नियमांतून घेतली होती. त्या सोसायटीचे ध्येय वेगळे व मठाचे ध्येय वेगळे एवढाच काय तो फरक होता.

आश्रम आणि विद्यालय या संस्था जशा अनुकरणीय होत होत्या त्याचप्रमाणे श्मठश ही संस्था अनुकरणीय करून दाखविण्याची धोंडो केशव कर्वे यांना उमेद होती. श्मठश ही पवित्र संस्था व्हावी यासाठी धोंडो केशव कर्वे यांची धडपड चालली होती. अखेर त्यांनी आश्रम, मठ व विद्यालय यांच्या कार्यकारी मंडळात तडजोड केली व तिन्हींची मिळून एक नवीन संस्था अस्तित्वात आणली व नव्या संस्थेत आश्रम, विद्यालय व मठ या तिन्हीचाही संगम झाला व एक जोम, उल्हास आला.

महिला विद्यापीठाची स्थापना

वर्तमानकाळातील स्त्रियांच्या शारीरिक व मानसिक स्थितीला अनुरूप होईल असा अभ्यासक्रम तयार करण्याच्या उद्देशानेच जपानमध्ये स्त्रियांकरिता निराळी युनिव्हर्सिटी स्थापन करण्यात आली. स्त्रीचे मुख्य कार्यक्षेत्र तिचे घर हेच आहेय पत्नी व माता यांची कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडण्यासाठी शिक्षण देणे जसे आवश्यक आहे, तसेच आपण मानव जातीचे व राष्ट्राचे घटक आहोत व त्या दृष्टीनेही आपल्या काही जबाबदाऱ्या आहेत, ही जाणीव त्यांच्यात निर्माण होणे जरूरीचे आहे. या जपान विमेन्स युनिव्हर्सिटीच्या मताशी प्रा. धोंडो केशव कर्वे सहमत होते.

प्रा. धोंडो केशव कर्वे यांच्या दृष्टीने स्त्री शिक्षणच्या बाबतीत चार गोष्टी महत्त्वाच्या होत्या. त्या पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) स्त्रियांमध्ये स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचा विकास व आत्मविश्वास निर्माण करणे आवश्यक आहे.
२) कुटुंबातील स्त्रीचे स्थान लक्षात घेऊन त्या जबाबदाऱ्या पार पाडण्याचे शिक्षण देणे जरूरीचे आहे.
३) राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करणेही तितकेच आवश्यक आहे.
४)ज्या स्त्रियांना संसारात पडू नये, असे वाटते, अशा स्त्रियांनी आपले जीवनातले ध्येय निश्चित करावे व त्याला अनुरूप असे शिक्षण त्यांना देण्यात यावे.

आपल्या देशातही देशी भाषांतून शिक्षण देणाऱ्या स्त्रियांच्या युनिव्हर्सिटी स्थापन झाल्याशिवाय स्त्री शिक्षणाचा पाया भक्कम होणार नाही असे प्रा. धोंडो केशव कर्वे यांचे ठाम मत होते. शिवाय मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम असले पाहिले व इंग्रजी हा विषय आवश्यक असला पाहिजे या गोष्टींवरही त्यांचा कटाक्ष होता.

१३ फेब्रूवारी १९१६ रोजी आश्रमाच्या कमिटीची सभा झाली व त्या सभेत संकल्पित विद्यापीठाला श्भारत वर्षीय महिला विद्यापीठश किंवा श्इंडियन विमेन्स युनिव्हर्सिटीश असे नाव सुचविण्यात आले. या संदर्भात डॉ. रविंद्रनाथ टागोरना प्रा. धोंडो केशव कर्वे यांनी पत्र लिहून या प्रयत्नाविषयी माहिती दिली. आणि त्यावर त्यांना उत्तेजनपर उत्तर मिळाले. त्यामुळे प्रा. धोंडो केशव कर्वे यांचा उत्साह दुणावला होता. याचप्रमाणे त्यांनी लोकमान्य टिळकांचाही पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केलाय पण त्यांना अपयश आले. पुढे महात्मा गांधी यांना जेव्हा प्रा. धोंडो केशव कर्वे भेटले तेव्हा गांधींना त्यांची ही योजना आवडली. उच्च शिक्षणात सुद्धा मातृभाषेला बोधभाषा करणे, गणित विषय ऐच्छिक ठेवणे, प्रपंचशास्त्र व आरोग्यशास्त्र हे विषयक आवश्यक ठेवणे वगैरे गोष्टी महात्मा गांधीजींना आवडल्या. पण इंग्रजी हा विषय आवश्यक ठेवणे हे त्यांना मान्य झाले नाही. परंतु प्रा. धोंडो केशव कर्वे यांचा हेतू उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना ज्ञानाचे दरवाजे मोकळे झाले पाहिजेत व त्यासाठी निदान उच्च शिक्षणाकरिता तरी इंग्रजी विषय आवश्यक असावा असा होता.

विद्यापीठाच्या उभारणीसाठी प्रा. धोंडो केशव कर्वे यांनी अहमदाबाद, मद्रास, बंगलोर, दिल्ली, जालंदर, कलकत्ता वगैरे ठिकाणी जाऊन व ठिकठिकाणी व्याख्याने देऊन महिला विद्यापीठाची

आवश्यकता समजावून सांगितली. त्यावर लोक उपहास व विरोध करीतय पण त्यावर प्रा. धोंडो केशव कर्वे चिडत नसत.

या कामात त्यांना त्यांच्या मित्रांचीही मदत झाली. प्रा. धोंडो केशव कर्वे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ठिकठिकाणी हिंडून बाराशे पदवीधर मतदार मिळविले. त्यातून ६० सभासदांचे सिनेट निवडण्यात आले. स्वावलंबन व स्वाभिमान यांच्या आधारावर केवळ ३—४ महिन्यातच प्रा. धोंडो केशव कर्वे आपल्या योजनेला मूर्त स्वरूप देऊ शकले.

विद्यापीठ व महाविद्यालय यासाठी निधी गोळा करण्यासाठी आणि स्त्रीशिक्षणाच्या कार्याचा प्रसार करण्याकरिता बरीच खटपट करणे प्रा. धोंडो केशव कर्वे यांना आवश्यक वाटत होते. आणि म्हणून विद्यापीठाच्या प्राचार्यपदी श्री. नारायण महादेव आठवले यांची व रजिस्ट्रार म्हणून श्री. हरी रामचंद्र दिवेकर यांची नेमणूक करण्याची व्यवस्था त्यांनी केली आणि निधी गोळा करण्यासाठी पुन्हा प्रा. धोंडो केशव कर्वे स्वत: बाहेर पडले. क्तह्व टक्के स्त्रियांना उपयोगी पडेल, असा अभ्यासक्रम आखून महिला विद्यापीठाचे काम प्रा. धोंडो केशव कर्वे करू लागल्याबरोबर काही पुरोगामी मंडळींचा विरोध होऊ लागला. त्यांचे म्हणणे होते की, प्रा. धोंडो केशव कर्वे यांचे हे शैक्षणिक धोरण प्रतिगामी आहे आणि यामुळे स्त्रियांचा दर्जा कमी होणार आहे. शिवाय विद्यापीठाला सरकारी मान्यता नसल्यामुळे प्रथम काही वर्षे या विद्यापीठाकडे लोक आकृष्ट होत नव्हते. आणि याचे कारण म्हणजे समाज नेहमी रूळलेल्या, मान्यता मिळालेल्या प्रतिष्ठित मार्गाने जात असतो आणि म्हणून नव्या मार्गाकडे तो प्रथम झुकत नाही.

संदर्भ :—

१. भारतरत्न डॉ. धोंडो केशव कर्वे, प्रात्र शैलेश त्रिभुवन, पायल पब्लिकेशन, पुणे
२. महर्षी धोंडे केशव कर्वे, विलास खोले, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाउस

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान

प्रा.डॉ. लखपती वा. गायकवाड

कार्यकारी प्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख महिला कला महाविद्यालय, उमरेड, जि. नागपूर४४१२०३

मो.नं. ९६०४४९४६७६

प्राचीन भारतीय संस्कृती पासून आजपर्यच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला असता भारतातील सावित्रीबाई फुलेच्या पूर्वी कोणत्याही भारतीय महिलेने शिक्षिका म्हणन काम केल्याचे उदाहरण दिसून येत नाही. म्हणून भारतात महिला शिक्षिका दिसून येत नाही. म्हणून भरताता महिला शिक्षिका होण्याचा पहिला मान क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले हयांच्याकडे जातो. म्हणूनच त्यांना आपल्या देशातील आदय महिला शिक्षिका असे म्हणू शकतो. यावरूनच त्यांचे शैक्षणिक व त्यांनी केलेले सामाजिक कार्यावरूनच त्यांना आजच्या पिढीला प्रेरणादायी ठरेल असे योगदार दिले आहे?

ज्ञानदानाच्या कार्याला सुरूवात करीत असतांना सावित्रीबाई फुले यांना खूप त्रास झालेला असता तरी त्यांनी शिक्षण कार्य सुरूच ठेवले चार वर्षाच्या काळात पुणे आणि पुण्याच्या ग्रामीण भागत एकुण अठरा शाळा काढलेल्या होत्या. निव्वळ शाळा काढणे सोपे असते. पण चालविणे फार कठीण असते तरी त्यांनी हया गोष्टी सोप्या केल्या होत्या. त्यातूनच त्यांनी शाळाा स्वखर्चाने यशस्वीपणे चालविल्या होत्या. सावित्रीबाई यांनी शाळा चालविण्याकरीता अविश्रांत परिश्रम घेतले व शिक्षण कार्य दिवस—रात्र सुरू ठेवले. सावित्रीबाईचे हे कार्य म्हणजे त्या काळातील परिस्थितीत एक चमत्कारच होता असे आपल्याला म्हणता येईल. कारण या काळात अशा शाळा चालविणे म्हणजे अशक्य गोष्टी होत्या. आपल्या भारतातील पहिल्या शिक्षिका तर होत्याच तरीपण त्यांना पौढ शिक्षणाच्या पुरस्कर्त्या म्हणूनही ओळखल्या जात असत. सावित्रीबाई फुले स्त्री मुक्ती चळवळीच्या पहिल्या पुढारी होत्या तशा प्रकारे सावित्रीबाई दिन दलितांच्या व पददलितांच्या कैवारी होत्या.

सावित्रीबाई फुले मुळात अशिक्षित असून देखील नंतर त्या शिक्षण घेऊन सुशिक्षित तर झाल्याच परंतू शिक्षिका बनून त्यांनी कित्येक वर्ष अज्ञान व अंध:कारात असणाऱ्या स्त्रीया आणि महार, मांग, चांभार, ढोर इ. गुंडाना शिक्षणाचा प्रकाश दाखविला ही गोष्ट सामान्य नाही. भारताच्या ज्ञान इतिहासात ही अपूर्ण अशा प्रकारची घटना आहे. सावित्रीबाई कतृव्य म्हणजे सामाजिक क्षेत्रात केलेले पदार्पन होय. दुष्काळात अन्न न मिळाल्याने अनेक लोक तडफडत असता हजारो जिवांच्या पोटाला अन्न देण्यासाठी अन्न छत्रालये चालवून त्यांचे प्राण वाचविले सर्व समाज सुसंस्कृत करण्यासाठी त्यांनी अहोरात्र प्रयत्न केले. जनावरांपेक्षाही मानहानीचे जीवन जगणाऱ्या पद—दलितांना सावित्रीबाईनी माण्सांत आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांना माणूस म्हणून जगण्यास शिकविले. त्या काळातील उच्च वर्गाकडून त्यांना त्यांना खूपच त्रास सोसावा लागला. स्वत:च्या अंगावर चिखल, शेण व दगड ऐकूण मारीत तरी त्यांनी आपले ध्येय सोडले नाही यातूनच त्यांच्या कार्याचे योगदान आपल्याला कळते.

सावित्रीबाईनी अलौकीक व युगपत्रवर्तक असे थोर कार्य केले. स्त्रिया व शुद्र यांची स्थिती अत्यंत हीन व दीन स्वरूपाची होती. त्यांना पशूपेक्षाही खालच्या दर्जाची वागणूक मिळत होती. बहुसंख्य समाज रूढी, परंपरा, धर्म आणि कर्म हयांच्या चक्रात गोवून ठेवला. उच्चवर्गानी धर्माच्या नावाखली कर्म रूढी व परंपरा यांच्या वर्चस्वात समाजाला दाबून ठेवून वाईत चालिरिती समाजात सुरू होत्या. त्याला स्त्रिया व शुदत्र समजणरा समाज हा त्याचा बळी ठरत होता. त्यांना अत्यंत वाईट व अन्यायी वागणूक मिळत होती. तो काळच असा होता की, स्त्रीने शिकणे हे महापाप समजे होते. सावित्रीबाई आदर्श मुख्याध्यापिका समाजसेविका, दिनदलितांच्या उध्दारक, शेतकऱ्याच्या उध्दारक आणि पतीच्या निधनानंतर सत्यशोधक शोक व दु:ख करीत न बसता सत्यशोधक समाजाचे नेतृत्व स्वीकारून कार्य जोरात चालविते रोगांच्या साथीमध्ये दिवस—रात्र सर्व गावात जावून रोग्यांची सेवा करीता प्लेगच्या साथीमध्ये त्यांनी आपल्या कडेवर व खांद्यावर आपल्या दत्तक मुलाला होवून रोग्यांना दवाखान्यात नेत.

सावित्रीबाई फुलेंनी जोतीरांवाच्या त्यांच्या आयुष्यातील अखेरच्या प्रवासापर्यंत साथ दिली. परंतू जोतीरावांच्या निधनांनंतरही त्यांचे कार्य आपल्या जीवनाच्या अखेरच्या क्षणपर्यंत सुरू ठेवले

त्यातच सावित्रीबाईचा खरा मोठेपणा आपल्या दिसून येत आणि त्यांच्या कार्याची प्रेरणा आपल्याला होते. शिखनजवळील नायगाव गावागात सावित्ररीबाईचा एका शेतकरी कुटूंबात जनम झाला. त्या गावात शंभर—सव्वाशे घरे असून त्या गावाला शिक्षणाचा कोणताही गंध नव्हता. निरक्षर कुटूंबतील मुलगी अवघ्या नऊ वर्षची असतानाच तिचा जोतीरावांशी झालेला विवाह त्यांच्या हाताखली शिक्षण घेवून एका ज्ञानयोगिनी बनली.

जोतीराव फुले हयांचे निधन झाल्याने त्यांच्या अत्ययात्रे समोर मडके धरण्यास त्यांच्या दत्तक घेतलेल्या मुलास म्हणजे यशवंतराव काहीनी विरोध करताच सावित्रीबाईनी सर्व रूढी व परंपरा यांना तिलांजली देवून स्वत: पुरूषच्या हिमतीने अत्ययात्रेच्या पुढे मडके धरले. म्हणजेच आचाराने व विचाराने सावित्रीबाई या काळाच्या कित्येक वर्ष पुढे गेलेल्या होत्या हे त्यांच्या कृतीवरून दिसून येते? सावित्रीबाईची प्रतिमा अस्पष्ट न दिसता उलट प्रभावी दिसून येते? कारण सावित्रीबाईचे शैक्षणिक प्रभावी दिसून येते. कारण सावित्रीबाईचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रांतील कार्य अदभूत असूनअशक्य असतांना सुध्दा शक्य करून दाखविले. गोरगरीब मजूरांसाठी रात्रीच्या शाळा चालू करणे, वाट चुकलेल्या स्त्रियांच्या पोटी जन्मलेल्या मुलांसाठी बालहत्या प्रतिबंधक गृह काढणे, आधुनिक तत्राने शेती पिकविण्यासाठी शेतकऱ्यांना जागृत करणे विधवांचे जबरदस्तीने केशवपन करावयास लावणाऱ्या उच्च वर्गाविरूध्द न्वावी समाजाला संच करावयास लावणे दारूबाजी व देवदासी या वाईट प्रथेविरूध्द आवाज उठवून त्या प्रथा बंद केल्या हे त्याचे कार्य म्हणजे काळयाकुटट भयान रात्री कोसळणाऱ्या विजेच्या ताराप्रमाणे सर्वांना चकित करणारे कार्य होते.

सावित्रीबाई फुले हया प्रतिभा संपन्न लेखिका व कवयित्री होत्या त्यांच्या कविता संग्रहावरून आपल्याला म्हणता येईल. स्त्रियांच्या वर होणारे अन्याय व अत्याचार हा त्यांच्या काव्याचा विषय होता. सावित्रीबाई फुलेचे काव्य म्हणजे एक उत्कृष्ठ गीताविष्कार असलयाचे आढळते सावित्रीबाई फुले आपल्या काव्यातून जातीय विषमतेचा ज्या प्रकारे धिक्कार करतात त्याचप्रकारे स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या अन्यायासुध्दा निषेध करतात. सावित्रीबाई फुलेच्या काव्याव्यन त्यांच्या मनाची, बौध्दीक पातळीची आणि इच्छाश्क्तीची चांगली ओळख होते. सावित्रीबाई फुले यांनी सत्यशोधक चळवळीच्या २० व्या परिषदेत त्या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. सावित्रीबाई फुले यांची प्रवृत्ती दिवसे—दिवस ढासळत होती. त्यातच त्याची प्राणज्योत अनंतात विलिन झाली. दीनदलित, गोरगरीब शेतकरी, कष्टकरी, यांचा आधार नाहीसा झाला. सावित्रीबाई फुले जरी शरीररूपाने अनंततात विलिन झाल्या असल्या तरी त्याच्या कार्याने, कर्तृत्वाने, विचाराने आदर्शाने त्यांची किर्ती सदैव आज तागायत दुमदुमत आहे त्यांनी स्त्रियांसाठी गोरगरीब जनतेसाठी शुद्रासाठी केलेले शैक्षणिक व सामाजिक कार्य आज देखील प्रेरणा ठरले आहे.

संदर्भ ग्रंथ :—

१) सामाजिक क्रांतीच्या अग्रदूत सावित्रीबाई फुले — अशोकराव शिंदे संस्कार
२) थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले — प्रेमा गोरे
३) जोतिकांता सावित्री — डॉ. पा.स. गजघाटे
४) सावित्रीबाई फुले — माधुरी साकुळकर
५) सामाजिक क्रांती की वाहक सावित्रीबाई फुले—सुशिला कुमारी

बंजारा लोकगीतातील स्त्रीजीवन

अमोल अमरसिंग चव्हाण

(संशोधक विद्यार्थी) शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.

बंजारा समाजात पुरूषप्रधान कुटुंबपद्धती अस्तित्त्वात आहेत. स्त्रियांना कुटुंबामध्ये दुय्यम स्वरूपाचे स्थान असते पण घराची व्यवस्था, स्वच्छता, उत्पादन यामध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान असते. बाळंतपण, मुलांचे संगोपन, कष्टाची कामे बंजारा स्त्रिया करीत असतात. आपला परिवार सांभाळून या स्त्रिया दिवाळी, होळी, विवाह, तीज उत्सव, विविध विधीप्रसंगी तसेच खेळनृत्याप्रसंगी गीते गातांना दिसतात. अशा या स्त्री गीतांमधून स्त्रीमनाचे व स्त्रीजीवनाचे दर्शन घडते. बंजारा स्त्रीची वेगळी अशी एक ओळख आहे. आकर्षक अशा वेशभूषेमुळे बंजारा स्त्री ओळखून दिसते. बंजारा स्त्री अपार कष्ट करणारी व आपल्या लोकगीतांच्या माध्यमातून शेकडो वर्षापासून बंजारा संस्कृतीचे रक्षण करणारी आहे. बंजारा स्त्रियांमध्ये अपार माया, प्रेम, ममता असते.

बंजारा लोकगीतांची जोपासना स्त्रियांनी केलेली असल्यामुळे स्त्रीजीवनाचे दर्शन आपल्याला बंजारा लोकगीतांतून पहावयास मिळते. बंजारा लोकगीतात कौटुंबिक, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक आशय असलेली लोकगीते आहेत. हेच लोकगीत शेकडो वर्षांपासून जीवापाड जोपासण्याचे महत्त्वाचे कार्य बंजारा स्त्रियांनी केलेले आहे. बंजारा स्त्रीगीतांतून व्यक्त होणाऱ्या स्त्रीजीवनाबरोबर कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाचे संदर्भ पहावयास मिळतात. लग्न, संसार, कुटुंबातील सुखदु:खाचे अनुभव, पती सहवासाचे सुख, कुटुंबातील जबाबदारी, बंधणे, काबाडकष्ट करताना शेतातील आणि संसारातील विविध येणारे सुखदु:खांचे अनुभव या साऱ्यांचा अविष्कार बंजारा लोकगीतांतून झालेला दिसून येतो.

बंजारा समाजात जन्म, विवाह, मृत्यू हे महत्त्वपूर्ण संस्कार समजले जातात. विवाहानंतर निसर्गाप्रमाणे येणारा प्रसंग म्हणजे अपत्यप्राप्ती. मुलांचा जन्म झाला असेल तर 'वेकळपणो' या विधीचे आयोजन केले जाते. ज्यांच्या घरी मुल जन्माला आलेले असते त्यांच्या दारासमोर स्त्रिया वर्तूळ करून उभ्या राहतात व गीत म्हणतात.

"वेयी माता माऊली हरोभरो रकाड
वेयी माता बाळ हरोभरो रकाड
हसती हसती वर आयेस
रोती रोती पर जायेस"[1]

या गीतांतून स्त्रिया देवीमातेला प्रार्थना करतात की, हे माता जन्मलेला बाळ व बाळाची आई सुखी राहो. नंतर लहान मुलाचे संगोपन करण्यासाठी घरातील आजी-आजोबांची मदत घेतली जाते. शेतीच्या कामासाठी जाताना टोपलीत बाळाला रानात घेऊन जातात. बाळाला झोपवण्यासाठी बाळाला खालील अंगाई गीत गाते-

"हालो करू हालकोडी
माळेम बेटी चलकोडी
चलकोडी क म वडजावू
बाळा क म सोजावू
तू सोजारे मारो नानो बाळकिया"[2]

अशा प्रकारचे अंगाई गीत गाऊन बाळाला झोपवतात.

बंजारा जमातीत मोठ्या प्रमाणात मद्यपान करतात. विविध सणउत्सवाला खास पेय म्हणून दारूचा उपयोग करतात. पण कधी कधी अतिरेक होतो. त्यावेळी त्याच स्त्रीला किती वेदना होतात? व दु:खाला सामोरे जावे लागते याचे चित्रण पुढील गीतावरून आपल्याला लक्षात येईल.

"दारू मत पीरे मारो सोजन पती
तारी कुण लिये रं जमानती
दारू माई वेचनाको घरेर घटी
मारं मारं लाथ से तोडनाको तटरी
दरिंदरेर लागगी साडेसाती
तू दारू मत पिरे सोजन पती
दारू सारू वेचनाको घरेरी खेती
बालबचान लगाये भिकेती
पिवं पिवं दारू सुकागी छाती
तू दारू मत पिरे सोजन पती"[3]

दारूड्या पतीस पत्नी म्हणते तू जिवाभावाचा माझा पती आहेस. दारूपायी घरचे जाते विकलेस. लाथा मारून घरचे ताटवे तोडलेस. या दारूपायी घरात दारिंद्र्यांची साडेसाती लागली आहे. दारूसाठी तू घरची शेती विकलीस. मुले बाळं भिकेस लागली. एवढी वाईट अवस्था दारूने केली. त्यामुळे तूझी छातीपण सुकत आहे. हे माझ्या सज्जन राजा तू फक्त दारू पिऊ नकोस. अशा या लोकगीतावरून बंजारा लोकगीताचे व तिच्या संसाराचे चित्रण आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. दारूमुळे तिच्या संसाराची दुर्दशा झाली आहे.

"मारो तो विरा बाई वासम बेपारीये
वासमेती पेटी पुचायो बाईये
ओ पेटीम बाई वायलेरी लोवडी
सण तेवारेनं ओडू बाईये
मारोतो विरा बाई पुसद बेपारी
पुसदेती पेटी पुचायो बाईये
ओ पेटीम मसुरूरो घागरो
सणे तेवारेनं पेरू बाईये"

वरील लोकगीतांतून बहिणीने भावाबद्दलचे प्रेम व्यक्त केले आहे. माझा भाऊ वाशिमचा व्यापारी आहे. त्याने माझ्यासाठी पेटी पाठवून त्या पेटीत ओढणी आहे. ती ओढणी सणउत्सवाला घालीन तसेच माझा भाऊ पुसदचापण व्यापारी आहे. त्याने पुसदहून पेटी घागरा पाठवला आहे आणि ते मी सणाला घालते.[4] या गीतातून माहेरची ओढ आहे असे दिसून येते.

बंजारा स्त्रीया या अतिशय काबाडकष्ट करणाऱ्या असतात. त्यांच्या वाट्याला सुखापेक्षा दु:ख अधिक असल्याचे दिसून येते. हे त्यांचे दु:ख जात्यावर दळण दळताना अधिक बोलके होते. आपल्या संसारामधील असंख्य दु:ख ती त्या जात्याला सांगते.

"घरे आंग तुळशी लगाई बाईये।
रोज करूचू ओरी पुजा बाईये।
हटेनी गरीबी हमारी बाईये।

रोज हात जोडूचू बाईये

कना जाए गरीबी हमारी बाईये"[5]

या लोकगीतांतून स्त्री आपल्या गरीबीचे दु:ख व्यक्त करताना दिसते.

"आदलीक पिसू बाई पालीक पिसू ये

सासू मारी सदेती बोलेनी ये

आळी आळी मं गऱ्हांळो करछ बाई ये

उठ परभातीन पाणी भरण सडा सरवण करू छू।

सासुरे पेटेमं कपट बाई ये।

सासू मरजांणू, ससरो मरजांणू

देवरेन म्हसोबा खांजाणू

नणद मरजांणू, जेठेण आसराई खाजांणू बाई ये

कलप-किली हात आवजांणू बाई ये"[6]

सासू-सुनांचे भांडण हे प्रत्येक जातीत असते. बंजारा स्त्रीने या लोकगीतांतून सासू-सासरे, दीर-नणंद यांच्या जाचाविषयी कुरकूर व्यक्त केली आहे.

बंजारा स्त्रियांच्या वाट्याला खडतर जीवन आलेले दिसून येते. या स्त्रियांच्या वाट्याला पिढ्यांन्पिढ्या यातनाच आल्या आहेत. या यातनांतून बाहेर पडता यावे यासाठी स्त्रीया मनाला विरंगुळा गाणारी गीते गातात. बंजारा स्त्रिया, मुली विवाह तीज सणाच्या विविध प्रसंगी डफाच्या तालावर गीते म्हणतात. डफ वाजविणारा डफ व्यवस्थित वाजवित नसेल तर गाण्यातून त्या म्हणतात ते गीत,

"डपडा वाजाए वाळो, कोर छीक गोर रे..

डपडा सुदो वजारे मांदा

तारे डपाडन जोडू दोहेरी फुंदा

गळेम पडगो काचिया ये

ऊ डपडा वजाय वाळो नाचीया ये"[7]

डफ वाजवणारा इतर जातीतील व्यक्ती (कोर) आहेस की बंजारा (गोर) आहेस डफ चांगला वाजव डफ वाजवणारा नाचणारा नाचिया आहे. असे वरील लोकगीतांतून बंजारा स्त्रिया डफ वाजविणाऱ्याविषयी म्हणतात.

बंजारा समाज हा लदेणीचा व्यवसाय करीत होता. या व्यवसायाला खीळ बसल्यानंतर हा समाज शेतीकडे वळला. शेती ही कोरडवाहू असल्यामुळे पावसाच्या आगमनावर अवलंबून असते. या पावसाची आतुरतेने ते वाट पाहतात. जेव्हा मृग नक्षत्राचा पहिला पाऊस मोठ्या जोरात पडतो तेव्हा बंजारा स्त्रिया या पावसाचा आनंद आपल्या पारंपारिक लोकगीतांतून व्यक्त करतात.

"झरमरिया वरसोये नानी मोठी बुंदे पड

रंग रंगडा रंगरोये लोवडिरी भाते घड

झरमरिया वरसोये नानी मोठी बुंदे पड

सोनरिडा घडरोये भुरियारे भाते पड

झरमरिया वरसाये नानी मोठी बुंदे पड

सोनरिडा घडरोये टोपलिरे भाते घड

या पावसामुळे जणू स्त्रियांच्या नाकातील नथ (भूरीया), गळ्यातील अलंकार (हसलो), डोक्याच्या केसात गुंफण्याचा अलंकार (टोपली) त्याची निर्मितीच घडवतो.[8] अशा या लोकगीतांतून स्त्रिया व्यक्त होतात.

बंजारा स्त्री ही निसर्गाच्या सान्निध्यात राहत असल्यामुळे ती झाडांना, डोंगरदऱ्यांना, पशुपक्षांना आपल्यामाहेरची माणसे आहेत असे समजून आपल्या मनातील सर्व भावना ती गाण्यातून व्यक्त करते.

झाडी मारी याडी, डोंगर मारो बापू
उंडे खोळाम मोर वीरा बोलोये या.[9]

जंगल झाडी माझी आई, पहाड माझे वडील तर पहाडीच्या दरीत बोलणारा मोर माझा भाऊ आहे असे या लोकगीतातून बंजारा स्त्री व्यक्त होते.

बंजारा स्त्रीमध्ये 'ढावलो' हा प्रकार विशेष आहे. बंजारा स्त्री जेव्हा रडते ती तेव्हा ती गात-गात रडते. त्याला ढावलो असे म्हणतात. रडताना गात असलेली स्त्री आपले दु:खच सांगत नाही तर रडता-रडता संबंधिताना उपदेश करते, वचन देते. आपल्या भावना त्या 'ढावलोतून' व्यक्त करीत असतात. बंजारा स्त्री आपल्या भावाचा निरोप घेताना खालील ढावलो म्हणतात-

"विरेळा, आ हियॉं
तारी भेन छ करन
वळ वाटेन, सुद वाट करन
सौ कोसेन कोस समजन
सात समुद्रेन पार करन
तारी भेनेर खबर लेयेन आयेस वीरा
ऑं हियॉं.[10]

वरील छावलोतून स्त्री आपल्या भावाला म्हणते की, तुझी बहिण आहे म्हणून तू शंभर कोसाला एक कोस समजून सात समुद्र पार करून तुझ्या बहिणीची खबर बातमी घ्यायला येतो. यातून बहिण-भावाचे प्रेम आपल्याला दिसून येते.

बंजारा स्त्री लोकगीतांतून आढळून येणाऱ्या विविध पैलू स्पष्ट होताना दिसतात. कलह, अलंकार, नातीगोती, रूसवेफुगवे यातून बंजारा संस्कृतीचे दर्शन घडते. त्याचप्रमाणे बंजारा स्त्रीला कोणत्याही शुभकार्यात मोलाचे स्थान असते. अनेक विधी तिच्याशिवाय केले जात नाही. बंजारा स्त्रियांच्या लोकगीतांतून त्यांनी एका संस्कृतीचे दर्शनच घडविले आहे.

संदर्भग्रंथ सूची :-

1. राठोड, गणपत, "बंजारा लोकगीतों मे नारियों का योगदान", नेहा प्रकाशन, अंबाजोगाई, 2011, पृ.क्र. 60
2. पवार, रूख्मिणी, "बंजारा लोकजीवन पद्धती", कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, 2005, पृ.क्र. 103
3. राठोड, सुनिल, "बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते", मधुराज पब्लिकेशन, 2012, पृ.क्र. 111
4. तत्रैव, पृ.क्र. 114
5. उनि, राठोड, गणपत, पृ.क्र. 115
6. राठोड, सुभाष, "बंजारा समाज गोरबोली आणि मौखिक वाङ्मय" राष्ट्रीय बंजारा परिषद, मुंबई, 2016, पृ.क्र. 163
7. उनि, राठोड, सुनिल, पृ.क्र.200
8. तत्रैव, पृ.क्र. 184
9. राठोड, राजकुमार, "गोर बंजारा राज", कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद, 2021, पृ.क्र.26
10. उनि, पवार, रूख्मिणी, पृ.क्र. 142

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CCCXCVI) 396

ISSN : 2278-9308 February, 2023

धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न ?

मुकूंद आनंदराव कवडकार
पीएच.डी. स्कॉलर,
रिसर्च सेंटर, पातूर

डॉ. व्ही.एन. जायले
प्राचार्य, डॉ. एच.एन. सिन्हा
महाविद्यालय, पातूर

प्रस्तावना :

धनगर जमात एक आदिम वन्यजमात असल्याचे प्राचीन इतिहसावरून स्पष्ट होते. परंतू तरिदेखील मुळ आदिवासी असलेला धनगर समाज त्यांच्या आधिकारापासून दूर आहे. याच कारणामूळे त्यांच्यावर शैक्षणिक व आर्थिक अरिष्ठ ओढावले आहे. स्वातंत्र्यापूर्व व स्वतंत्र्यप्राप्तीनंतरही धनगर समाजाची भटकंती थांबली नाही. आजच्या आधूनिक युगामध्ये जग मंगळावर जाऊ पाहत आहे. अशा परिस्थितीत अज्ञानाच्या खाईत खितपत पडलेला, रानावनात जीवन व्यतित करणारा, नागरी संस्कृतीपासून दूर असलेला, कायम दरिद्री व गरिबी नशिबी आलेला धनगर समाज मात्र विकासाच्या प्रवाहापासून दूर फेकल्या गेला. मागील ७० वर्षापसून धनगर समाज अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळावे म्हणून सरकारकडे सातत्याने मागणी करत आहे. ही न्याय्य मागणी सरकारने मान्य करून एस.टी. आरक्षणावर शिक्कामोर्तब करावे. जेणेकरून या समाजाचा सामाजीक मागासलेपणा दूर होउन त्यांचे जीवनमान उंचावेल.

धनगर जमात एस.टी. असल्याचे अनेक विचारवंत व अभ्यासकांचे ठाम मत आहे. संशोधकांनी आपल्या संशोधनातून धनगर समाज मुलनिवासी असून तो आदिवासी असल्याचे सिध्द केले आहे. विचारवंत व अभ्यासकांच्या या गोष्टीकडे दुर्लक्ष करत महाराष्ट्र सरकारने मनमानी धोरण अवलंबून भटक्या जमाती-क या प्रवार्गात त्यांना स्थान देउन ३.५% एवढा तुटपूंजा आरक्षणाची तरतूद केली आहे. महाराष्ट्रातील अनूसूचित जमातीच्या यादी अ.क्र. १४ वर धनवार आणि अ.क्र. ३६ वर ओरॉन, धनगड असा स्पष्ट उल्लेख आहे. या दोन्ही जमातीतील आद्याक्षर `धन` हे धनगर या जमातीशी मिळते आहे. धनाचे आगर म्हणून धनगरांचा उल्लेख होतो. महाराष्ट्रात केवळ धनगर हीच एकमेव आदिवासी जमात असून धनवार, धनगड, धांगड ही पर्यायी नावे स्वर्गातील परिकथांसारखी आहेत. मुळच्या आदिवासी असलेल्या धनगर समाजाला आदिवासींचे आरक्षण मिळू नये म्हणून मुद्दाम अक्कल, हूशारीने धनगर ऐवजी धनगड, धनवार, धांगड अशी नावे टाकली. घटनेचा सुक्ष्म अभ्यास न करता केवळ कागदी घोडे नाचवत वकिली पायंडा मिरवून `धनगर` आणि `धनगड` ह्या दोन जमाती मध्ये कुठलेही साम्य नसून त्यामध्ये पूर्णपणे भिन्नता असल्याचे समर्थन महाराष्ट्र सरकारने केले आहे. `र` आणि `ड` या नव्या प्रश्नाचा अध्याय उघडून गेल्या ७० वर्षापासून धनगर समाज त्यात गुरफटला आहे. त्यांच्या आज्ञानाचा व भोळेपणाचा फायदा घेउन स्वार्थी राजकारण्यांनी आपला डाव साधत `र` आणि `ड` च्या जाळयात धनगर समाजाला अडकवून त्यांना आदिवासीच्या आरक्षणापासून दूर ठेवले. मात्र उशिरा का होईना धनगर समाज आता जागा झाला आहे. धनगड, धनवर, धांगड म्हणजेच धनगर आणि धनगर म्हणजेच आदिवासी असा सरळ अर्थ निघतो. एस.टी. आक्षणाच्या दृष्टीकोनातून घटनात्मक तरतूदी, विविध चळवळी, निकष व पूरावे, जनगनणा अहवाल व महत्वपूर्ण संदर्भ ग्रंथाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

उद्देश-

संविधानीक तरतुदीनुसार केंद्रामध्ये दोनच वर्गासाठी आरक्षणाची तरतूद केलेली आहे. त्यामध्ये कलम १६ ला अनुसरून सरकारी नोक-या व शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी आरक्षणाची तरतूद केली अहे. तर कलम ३३० व ३३२ नुसार राजकीय आरक्षणाची तरतूद केली आहे.

धनगर समाजाला महाराष्ट्रामध्ये भटक्या जमाती-क या प्रवार्गात ३.५% आरक्षण देण्यात आले अहे. धनगर समाज मागासलेला व भटक्या जमातीत मोडत असल्यामुळे या समाजाची सामाजिक स्थिती मागासलेली आहे. त्यामुळे या समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करून आरक्षण देण्याची मागणी केली जात आहे. धनगर समाजाचे मागासलेपण आणि त्यांच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मागणी त्याचबरोबर धनगर जमात मुळात आदिवासी असून सरकारने त्याची अमंलबजावणी करावी. प्रस्तुत बाबींचा अभ्यास करणे हा या शोध निबंधाचा मुख्य उद्देश आहे.

आदिवासी आणि धनगर यातील साम्य:-

आदिवासी आणि धनगर यामध्ये मुलत: भेद नाही परंतु महाराष्ट्रामध्ये धनगर ही एक भटकी जमात म्हणून उल्लेखीत आहे. म्हणून एस.टी. आणि एन.टी.सी. यामध्ये कशाप्रकारे समानता आहे हे जाणून घेणे महत्वाचे वाटते. अनुसूचित जमातींना आदिवासी, मूलनिवासी, आदिम जाती व टोळया, वन्यजाती व गिरिजन अशा वेगवेगळया नावाने ओळखले जाते. त्यापैकी आदिवासी हे नाव राष्ट्रीय परिभाषेत अधिक प्रचलीत आहे.

व्याख्या- "नागरी संस्कृतिपासून दूर व अलिप्त राहिलेल्या संबंधीत प्रदेशातील मुळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय" जंगल व दूर्गम भागात सूसंस्कृत समाजापासून ते दूर राहतात. त्यांना वनवासी किंवा आदिवासी असेही म्हणतात. ते डोंगरात राहत असल्यामुळे गिरिजन म्हणूनही त्यांची वेगळी ओळख आहे. एका विशिष्ट आदिवासी गटास जमात म्हणूनही ओळखले जाते.

"गावगाडयाबाहेर राहुन उदर निर्वाहासाठी पशुपालनावर अवलंबून राहणारा विशिष्ट सांस्कृतिक जीवन जगणारा लोकसमुह म्हणजे धनगर समाज होय". किंवा धनगर म्हणजे जगाच्या पाठीवर शेळया मेंढयांचा व्यवसाय करणा-या मूळ मानववंशातील मानव होय. थोडक्यात सांगायचे म्हणजे आदिवासी आणि धनगर हे दोन्ही मूलनिवासी असून दोन्हींची वौशिष्टये समान आहेत.

पशुपालक ते धनगर-

ब्रिटीशपूर्व काळात अनेक आर्य टोळया भारतात दाखल झाल्या. त्यांनी मुळच्या अनार्य लोकांवर हल्ले चढविले. आर्यांनी आपली दहशत निर्माण करत मुळच्या द्रविड लोकांकडील जमिन हस्तगत केली. त्यांना आपले गुलाम बनविले. यामध्ये जे लोक भितीपोटी जंगलात पळून गेले त्यांनी आपली वेगळी संस्कृती विकसीत केली. हेच मुळ निवासी द्रविड किंवा अनार्य म्हणून ओळखले जातात. तेच आजचे आदिवासी होत. उपजिवीकेसाठी कुठले तरी साधन आवश्यक आहे. या गोष्टीची जाणीव झाल्यानंतर त्यांनी जंगलात राहुन पशुपालन व्यवसायाला सुरूवात केली. त्यामध्ये गाई, शेळया, मेंढया इ. प्राण्यांणा मानसाळून ते त्यांच्या सानिध्यात राहू लागले. त्यातुनच पुढे शेती करण्याकडे त्यांचा कल गेला. त्यातील पशुपालन करणारा समाज हाच आजचा धनगर समाज होय. महाराष्ट्रातील सातवाहन हे मुळचे पशुपालक होते. शिंग्रोबा, विरोबा, धूळोबा, खंडोबा, इ. धनगर दैवत ही पशुपालकच होती. हाच पशुपालक समाज आजच्या धनगर, गोपाळ, शेतकरी व अन्य जाती जमातींचे पुर्वज असल्याचे मत संजय सोनवणी यांनी मांडले आहे. त्यामुळे धनगर ही आदिम वन्यजमात असून ती अनुसूचित जमातीतील एक जमात आहे.

धनगर ही एक अनुसूचित जमात:-

धनगर ही अनुसूचित जमातीत मोडणारी महाराष्ट्रातील मेषपालन करणारी भटकी वन्यजमात आहे. धनगर समाजाचा अभ्यास करणा-या विविध अभ्यासकांनी धनगर अनुसूचित जमात असल्याचे पुराव्यानिशी स्पष्ट केले आहे. १९११ च्या जनगणना अहवालात, १९३१ च्या अहवालात सन १९०८ च्या इम्पीरियल गॅझेटमध्ये, १९४१ च्या होळकर राज्याच्या जनगणना अहवालामध्ये धनगर जमात मागासलेली असल्याचे दर्शाविले आहे. होळकरांची कैफियत या मराठी ग्रथांत धनगरांचा मागासवर्गीय म्हणून उल्लेख आहे. याचाच अर्थ ही जमात सामाजिक दृष्टया अत्यंत महत्वाची आहे. यावर विचारमंथन होणे आवश्यक वाटते.

प्रसिध्द जर्मन संशोधक डॉ. गुन्थर डी. सोन्थायमर यांनी धनगर ही मुळातच आदिवासी जमात असल्याचे म्हटले आहे. डॉ. आर.एन. सक्सेना व जे.एच. चिंचाळकर यांनी `धनगर ॲण्ड गडरिया` हा प्रबंध लिहून त्यात धनगर समाज आदिवासी असल्याचे विविध पूरावे दिले आहेत. त्याचप्रमाणे रसेल, इन्थोवेन, इरावती कर्वे यांनी धनगर समाज अगदी प्राचीन काळापासून आदिवासी असल्याचे मत मांडले आहे. `द ट्राईब्ज ॲण्ड कास्टस् ऑफ बॉम्बे` या ग्रथांत इंन्थोवेनने धनगर समाजाला प्राचीन इतिहास लाभला असून ह समाज आदिवासी म्हणून गणल्या गेल्याचे मत मांडले आहे. `इनसाइक्लोपिडिया इन ट्रायबल इंडिया` मध्ये मेहता पी.के. यांनी धनगर समाज आदिवासी असल्याचे मत व्यक्त केले आहे. `The Tribes and Castes of the central province of India (Volume 1&2)` या पुस्तकात धनगर आदिवासी असल्याचे नमुद आहे. त्यांची स्वत:ची स्वतंत्र अशी वेगळी संस्कृती असल्याचे त्यांनी म्हटले आहे. स्वातंत्र्यापुर्व व नंतरही शासकीय गॅझेटमध्ये धनगरांची अनुसुचित जमातीमध्ये नोंद असल्याचे स्पष्ट होते. १९५२-५३ मध्ये काकासाहेब कालेलकर आयोगानेही धनगर जमात अनुसूचित जमात असल्याचे स्पष्ट केले आहे.

प्रसिध्द साहित्यीक, विचारवंत संजय सोनवणी यांनी धनगर ही जात नसून ती जमात असल्याचे `जातींचा इतिहास` या ब्लॉगवरिल `धनगरांच्या पूणरूत्यानासाठी` या लेखामध्ये स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे रिसले, डॉ.

आर.एन.सक्सेना, डॉ.के.सी.मल्होत्रा, डॉ.गुन्थर, डॉ.डींगरे, डॉ. शामसिंह शशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीधर व्यंकटेश केतकर, डॉ. घुर्वे इ. अभ्यासकांनी सुक्ष्म अध्ययन करून धनगर ही एक आदिवासी वन्यजमात असल्याचे मत मांडले आहे.

वरिल सर्व पुरावे धनगर अनूसूचित जमात असल्याचे सिध्द करतात. परंतु तरी देखिल महाराष्ट्र राज्यात त्यांना अनुसुचित जमात म्हणून स्थान मिळालेले नाही. धनगर ही आदिम मेंढपाळ जमात आहे, त्यामुळे अभ्यासकांनी धनगर समाजाचे धनगर आणि आदिवासी हे वेगळे नसून ते एकच असल्याचे विविध पुराव्यानिशी स्पष्ट केले आहे. राज्य सरकारने या गोष्टीकडे गांभीर्यतापूर्वक लक्ष देण्याची गरज वाटते. एस.टी. आणि एन.टी. यामधील T हा इंग्रजी शब्द Tribes म्हणजेच 'जमाती' या अर्थाने अहे. त्यामुळे आदिवासी जमात आणि धनगर जमात यातील जमात हा शब्द सारखा आहे. त्यामुळे आदिवासी आणि धनगर यांच्यामध्ये निश्चितच सहसंबंध आहे. त्याशिवाय एवढा उहापोह होऊ शकत नाही. यावरून हेच स्पष्ट होते की धनगर ही जात नसून ती जमात आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यात एस.टी. प्रवर्गाच्या यदीत धनगर, धनगड प्रमाणेच धनगर या जमातीचा देखिल तातडीने समावेश करावा अशी मागणी होत आहे.

आदिवासींसाठी आवश्यक निकष-

एखादा समाज आदिवासी आहे किंवा नाही याकरीता केंद्र सरकारने पाच निकष ठरविले आहेत. 1) प्राचीन जीवननमान 2) भौगोलिक अलिप्तता 3) भिन्न संस्कृती 4) स्वभावातील बूजरेपणा आणि 5) मागासलेपणा. प्रस्तुत निकष धनगर समाजाला लागू पडतात. या आशयाचा अहवाल महाराष्ट्र धनगर समाज महासंघाने आयूक्त अदिवासी संशोधन केंद्र व प्रशिक्षण संस्था पुणे यांना सूपूर्द केला आहे. ज्याप्रमाणे आदिवासी समाज कुठल्याही गावासोबत संपर्क न ठेवता गांव कुसाबाहेर वाडया वस्त्याच्या स्वरूपात दूर रानावनात राहतात. त्याचप्रमाणे धनगर देखील गावाकूसाबाहेर शेळया मेंढया घेउन रानावनात वास्तव्य करतात. त्यामुळे आदिवासीचे निकष धनगर समाजाला लागू पडतात.

सामाजिक चळवळी आणि आयोग-

धनगर समाज मुलनिवासी वन्यजमात असूनही त्याला अनुसुचित जमातीच्या यादीत समाविष्ठ केल्या गेले नाही. महाराष्ट्र शासनाने त्या संबंधी ठराव करून केंद्र शासनाला शिफारस केली पाहिजे. त्यांच्या सर्वांगीण विकासातील हा प्रमुख अडथळा असल्याचे समजते. धनगर जमात आदिवासी असल्याचे ठाम मत धनगर समाजाचे आहे. त्यामुळे १९५५ पासून एस.टी. चे आरक्षण मिळावे म्हणून धनगर समाज सातत्याने प्रयत्न करित आहे. त्यातूनच विविध समाजिक चळवळींचा उदय होण्यास सुरवात झाली. यामध्ये सर्वप्रथम `अखिल भारतीय धनगर समाज `संघटनेंची स्थापना करण्यात आली. १९६९ साली स्व.श्री. शिवाजी (बापू) शेंडगे यांच्या नेतृत्वाखाली `धनगर समाज मंडळ` स्थापन करण्यात आले. १९९२ मध्ये अन्ना डांगे यांच्या नेतृत्वाखाली `धनगर समाज महासंघ` या संघटनेची स्थापणा करण्यात आली. धनगर ही मुळातच आदिवासी जमात आहे, ती अनुसूचित जमातीच्या यादी क्र. ३६ वर धनगड म्हणून उल्लेखित आहे. त्याची सक्षमपणे अमंलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी प्रस्तुत संघटनेने पुढाकार घेउन समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट हेाते. त्यानंतर बापूसाहेब कोकरे यांनी युवा नेतृत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने `यशवंत सेना` स्थापन केली. पुढे या संघटनेची धूरा महादेव जानकरांनी अतिशय समर्थपणे सांभाळली. जवळपास १९९० पासून आदिवासी समाजाचे आरक्षण मिळावे याकरिता महाराष्ट्रात विविध संघटना प्रभाविपणे कार्य करित आहेत.

आयोग-

पहिल्या मागासवर्गिय अहवालाचे अध्यक्ष काकासाहेब कालेलकर आयोगाने धनगर समाजाचा विशेष उल्लेख करून हा समाज अतिमागास असल्याचे मत मांडले आहे.

२० जानेवारी २००४ रोजी अटल बिहारी वाजपेयी यांनी धनगर समाजाला अनु. जमातीचे आरक्षण मिळावे म्हणून पंढरपूर येथील महामेळाव्यात आयोग स्थापन करण्याचा निर्णय घेण्याचे जाहीर केले या आयोगाच्या अध्यक्षपदी न्यायमूर्ति बी. मोतीलाल नायक होते.

बालकृष्ण रेणके यांच्या अध्यक्षतेखाली २००८ मध्ये रेणके आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये धनगर समाजाची लोकसंख्या निहाय जनगणना न झाल्यामुळे लोकसंख्येबाबत निश्चित आकडा माहित नसल्यामूळे आरक्षणाचा मुद्दा दूर्लक्षित राहिला.

२०१६-१७ मध्ये धनगर समाजाला एस.टी. चे आरक्षण मिळावे म्हणून सखोल अभ्यास करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने `टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्सेस` म्हणजेच `टिस` या संस्थेची स्थापना केली. त्यांनी आपला अहवाल २०१७ साली सादर केला. परंतु या अहवालाने देखील निराशाच केली. केवळ मनसमाधानी म्हणून सरकारने `टिस` या संस्थेची नेमणूक करून वेळकाढूपणाचे धोरण स्विकारत धनगर समाजाची बोळवण केली. बनवा बनवीचा एक भाग म्हणून केवळ भावनांशी खेळण्याचा हा प्रकार होता.

धनगर समाज आदिवासी आहे याकरिता विविध आयोग नेमूनही किंवा वारंवार पाठपूरावा करूनही महाराष्ट्र सरकार मात्र मूग गिळून गप्प आहे. केवळ आश्वासने देउन तोंडाला पाने पूसत आहे. धनगर समाजाला एस.टी. आरक्षण लागू व्हावे याकरिता केंद्र सरकारकडे या बाबतीत कुठलाच पाठपूरावा राज्य सरकार करीत नसल्याचे स्पष्ट होते.

पुरावे-

१९३१ मध्ये जातीनिहाय जनगणना करण्यात आली त्यामध्ये `ओरॉन` या जमातीची संमकक्ष जमात म्हणून धनगर जमातीचा उल्लेख केला आहे. केंद्र सरकारच्या १९६१ च्या जनगणना अहवालात धनगर जमात अनुसूचित जमातीत समाविष्ट असल्याचे नमूद आहे. १९६८ साली केंद्र सरकारने प्रसिध्द केलेल्या Bibliography of SC, S.T.. & marginal tribes (प्र.क्र. २९४) वर धनगर (धनगड नव्हे) अनुसूचित जमात आहे. असा स्पष्ट उल्लेख आहे. केंद्र सरकारने नेमलेल्या मंडल आयोगाने `धनगर` आणि `धनगड` वेगळे नसून एकच आहेत असे अहवालात स्पष्ट केले आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाने २००९ साली दिलेल्या निकालात म्हटले आहे की, धनगर ही जमात उत्तर प्रदेश आणि प.बंगाल या राज्यात एस.सी. म्हणून तर महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात एस.टी. म्हणून ओळखली जाते.

बॅकवर्ड क्लास कमिशन व अनुसूचित जाती व जमाती आदेश (दूरूस्ती) कायदा १९७६ मध्ये एस.टी. च्या यादी क्र.३६ वर ओरॉन, धनगड अशी नोंद आहे. जनजातिय कार्य मंत्रालय, भारत सरकार वार्षीक रिपोर्ट २००७-०८, २००८-०९ मध्ये महाराष्ट्रातील अनुसूचित जमाती यादी अ.क्र. ३६ वर `ओरॉन धनगड` अशी नोंद आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ परिशिष्टामध्ये अनुसूचित जमाती (१३/०२/१९७८ पासून) अनु. जाती व जमाती आदेश (सुधारणा) अधिनिमय १९७६ (१९७६ चा कायदा क्र.१०८) मधील परिशिष्ट १ मधील भाग ९ मध्ये नमुद केलेल्या यादी अ.क्र. ३६ वर ओरॉन असे मराठीत नोंदविले आहे. सहसंचालक, संख्याशास्त्र विभाग, नॅशनल सर्वे ऑरगनाइझेशन, नवी दिल्ली यांनी ८ सप्टेंबर १९८९ चे ऑल इंडिया धनगर समाज महासंघाला लिहिलेल्या पत्रात महाराष्ट्रातील `धनगड`, धनगर व ओरॉन हा समाज अनुसूचित जमातीत समाविष्ठ असल्याचे कळविले आहे. `सुंबरान मांडल` या सदरामध्ये हरिश पाटणे सातारा यांनी "धनगर` व `धनगड` मध्ये शासनाकडून गफलत" या लेखाच्या माध्यमातून वरील महत्वपूर्ण पूरावे सादर करण्याचा प्रयत्न केला आहे.

इतर राज्यात एस.टी. चे आरक्षण-

भारतातील महाराष्ट्र राज्य सोडून बहूतांश राज्यामध्ये धनगर ही जमात आदिवासी जमात म्हणून नोंदविली आहे. बिहार राज्यात अनु. जमाती यादी अ.क्र. २६ वर oraon, Dhangar, झारखंड अ.क्र. २५ वर oraon, Dhangar, ओडिसा अ.क्र. ५३ वर oraon, Dhangar, Uran, छत्तीसगड अ.क्र. १४ वर धनगर, गूजरात अ.क्र. ८ वर धनका, जम्मू काश्मिर अ.क्र.1 वर बकरवाल, मध्यप्रदेश अ.क्र. १४ वर धनवार, महाराष्ट्र अ.क्र.१४ वर धनवार, अ.क्र. ३६ वर oraon, Dhangad, वेगवेगळया राज्यात oraon ची समकक्ष म्हणून धनगर जमातीचा उल्लेख आहे. इग्रजीतील Dhanwar हा शब्द हिंदीत धनवर तर मराठीत धनवार असा होतो. तर Dhangad हा शब्द हिंदीत धांगड तर मराठीत धनगड असा होतो. धनवर आणि धनगड हे दोन्ही शब्द धनगर या शब्दाला पर्यायीवाचक शब्द म्हणून दिशाभूल करण्याच्या हेतूने एस.टी. च्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले. महाराष्ट्रात धनगड नावाची कोणतीच जमात उपलब्ध नसून उलटपक्षी धनगर हीच जमात बहूसंख्येने आहे. त्यामूळे धनगड आणि धनगर यामध्ये कुठलाच भेद नसुन धनगर समाजाच्या न्याय्य मागणीला केंद्र सरकारने कायदेशिर दर्जा प्राप्त करून द्यावा.

घटनात्मक तरतुद-

केंद्र सरकारने केवळ अनु. जाती व जमाती या दोनच जाती-जमातींना आरक्षणाच्या दृष्टीने महत्व दिले आहे. परंतु घटनेतील काही तरतूदीमध्ये सामाजिक दृष्टीने मागासलेल्या इतर घटकांसाठी आरक्षणाची सोय केलेली आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. धनगर समाज आरक्षणाचे सर्व निष्कर्ष पूर्ण करत असल्यामुळे त्यांना राज्य तसेच

केंद्रामध्ये अनु. जमातीचा दर्जा मिळावा ही न्याय मागणी धनगर समाजाची आहे. जो समाज आजपर्यंत दारिद्र्यात आपले जिवन कंठत आहे. ज्यांच्यावर वर्षानूवर्ष अन्याय झाला आहे, त्यांच्या क्षमतांचे खच्चीकरण झाले आहे. त्यांच्या भरपाईसाठी आरक्षणाची तरतूद करणे ही समान संधीची खरी व्याख्या ठरेल, असे सतीश कातम यांनी `घटना आरक्षण आणि राजकिय विकृती` या लेखात म्हटले आहे. सामाजिक मागासलेपणा हाच एकमेव निकष आरक्षणाचा प्रमुख केंद्रबिंदू असल्याचे मंडल प्रकरणी दिलेल्या निर्णयात एक वगळता आठ न्यायमूर्तींनी सांगितले आहे. धनगर समाज ही अट पुर्ण करतो.

पूर्वीच्या वर्णव्यवस्थेची जागा आजच्या जाती व्यवस्थेने घेतली आहे. यातील चवथा वर्ण `शुद्र` जातीव्यवस्थेत आजही खालच्या स्थानावर आहे. या घटकाकडे कायम दूर्लक्ष झाल्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास झाला नाही. यासाठी क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी दि. १९ आक्टोंबर १८८२ रोजी हंटर शिक्षण आयोगाला मागासवर्गीयांसाठी नोकरित आरक्षणाची तरतुद असावी याकरिता निवेदन दिले होते. त्यानंतर छत्रपती शाहू महाराज यांनी २६ जूलै १९०२ रोजी ५०% जागा मागासलेल्या जातींसाठी राखून ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेत आरक्षणाची स्वतंत्र तरतूद करून ठेवली.

भारतीय संविधानाच्या ३४१ व ३४२ या अनुच्छेदानुसार अनुसुचित जाती व अनु. जमाती मागासलेपणाच्या दृष्टीने अधिक महत्वाच्या गणल्या गेल्या आहेत. या शिवाय महाराष्ट्र सरकारने आणखी दोन गटांना मागासलेले म्हणून मान्यता दिली आहे. यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि नवदिक्षीत बौध्द व आर्थिक दृष्टया मागासलेले यांचा समावेश होतो. घटनेतील कलम १५ आणि १६ ही दोन्ही कलमे घटनेच्या तिस-या प्रकरणात म्हणजेच मुलभूत हक्कात येतात. घटनेच्या कलम १५ पोटकलम ४ मध्ये अशी व्यवस्था केलेली आहे की, जो घटक सामाजिक शैक्षणिक दृष्टीने मागास असेल किंवा एस.सी., एस.टी. असेल त्यांच्यासाठी विशेष आरक्षणाची सोय करता येते. कलम १६ मध्ये समानतेची संधी देण्याचे तत्व समाविष्ट आहे. ज्या जाती-जमाती सामाजिक उन्नत स्थरावर पूरेशा प्रमाणात दिसत नाहीत, त्यांच्यासाठी नोकरीक्षेत्रामध्ये आरक्षणाची तरतूद केली आहे. यामध्ये प्रामुख्याने त्यांचा सामाजिक मागासलेपणा, शौक्षणिक मागासलेपणा, वर्णभेद इ. चा विचार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे दूर्गम भागात राहणा-या, शिक्षणाची सोय नसणा-या जाती-जमातींकरीता शौक्षणिक संस्थामध्ये कलम १५ च्या पोटकलम ५ नुसार अग्रक्रमाने प्रवेश देण्याची सोय करण्यात आली आहे. कलम ३८ नुसार सामाजिक कल्याण, सामाजिक न्याय, आर्थिक व राजकीय दृष्टया मागासलेला घटक पूढे जावा असे नमुद आहे. घटनेच्या ३३० ते ३४२ अनुछेदान्वे अस्पृश्यासह सर्व मागास जातींना (एस.सी., एस.टी.) संरक्षण प्रदान केले आहे. अनुच्छेद ३४० अन्वये भारतातील सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या वर्गाची स्थिति सुधारण्यासाठी संरक्षण दिले आहे.

घटकात्मक तरतुदींचा आढावा घेतला असता असे निदर्शनास येते की, आरक्षणाच्या दृष्टीने धनगर समाज सामाजिक मागासलेपणाचे सर्व निकष पूर्ण करतो. त्यामुळे राज्य सरकारने धनगर जमातीला केंद्रामध्ये आदिवासी म्हणून आरक्षणाची सोय करावी. गेल्या ७० वर्षापासून सुरू असलेल्या आरक्षणाच्या लढयाला पूर्ण विराम द्यावा, हीच धनगर समाजाची प्रामाणिक अपेक्षा आहे.

संदर्भ ग्रंथ -

१) मराठी विश्वकोष खंड (२)- तर्कतीर्थ श्री लक्ष्मण शास्त्री जोशी (संपा), १९७६ पृ.क्र. २८

२) भटक्या धनगर समाजाचे वास्तव - अभिजीत कैलासराव नजन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद

३) मराठी विश्वकोष खंड (१) - तर्कतीर्थ श्री लक्ष्मण शास्त्री जोशी (संपा), १९७६ पृ.क्र. ६३३

४) ॲनसियंट धनगर हिस्ट्री - विनयकुमार मदने ब्लॉग पोस्ट, २४ डिसें. २०१६

५) जातींचा इतिहास - संजय सोनवणी (ब्लॉग पोस्ट) ११ सप्टेंबर, २०१२

६) धनगर व धनगड मध्ये शासनाकडून गफलत - (सुंबरान मांडल) हरीश पाटने, सातारा

७) धनगर आरक्षण - महाराष्ट्र टाईम्स मधील लेखावर प्रतिक्रीया, प्रकाश लालासाहेब पोळ, कराड, जि. सातारा दि. २० ऑगस्ट २०१४

८) धनगरांच्या आदिवासी असल्याचे पुरावे - धनगर समाज आणि परिवर्तन (ब्लॉग पोस्ट) संजय सोनवणी, २६ जूलै २०१४

९) घटना, आरक्षण आणि राजकीय विकृती - सतिश कामत, महाराष्ट्र टाइम्स, १६ ऑक्टोबर, २०१५.

१०)आरक्षण धोरण - डॉ बाबासाहेब आंबेडकर, संशोधन व प्रकाशन संस्था (बार्टी) पुणे २६ जाने २०१६.

११)अनुसुचीत जाती व जमाती - मराठी विश्वकोष गोखले शरदचंद्र, कुलकर्णी मा.गु.

१२) आरक्षण आणि राज्यघटना - अॅड. भास्करराव आव्हाड, महाराष्ट्र टाईम्स, ५ ऑगस्ट , २०१८

पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वतीय क्षेत्रातील कुपोषण समस्येवर भौगोलिक घटकांचा प्रभाव : वैद्यकीय भूगोल दृष्टीकोन

डॉ. संजय नारायणराव कपले
जी. टि. पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार

सारांश :

पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी अशक्तपणाची व आजारपणाची परिस्थिती निर्माण होते तिला कुपोषण असे म्हणतात व त्या व्यक्तीला कुपोषित म्हणतात. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगामध्ये या समस्येने थैमान मांडले आहे. कुपोषण ही जागतिक समस्या असून आफ्रिका, आशिया खंडामध्ये या समस्येचे प्रमाण अधिक आहे. भारतात पहाडी क्षेत्रामध्ये जेथे आदिवासी जमातींची लोकसंख्या अधिक आहे अश्या प्रदेशात ही समस्या प्रामुख्याने अधिक आहे.

महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वतीय क्षेत्रामध्ये आदिवासी बहुल लोकसंख्या असून येथे अन्नाची कमतरता मोठ्या प्रमाणात आहे. यामागील महत्वाचे कारण म्हणजे येथील आदिवासी लोकांची अशिक्षितता, रोजगाराच्या सीमित संधी, शेतीयोग्य जमिनीचा अभाव ई. आहे. परिणाम स्वरूप कुपोषण ही समस्या अधिक असल्याचे दिसून येते.

संज्ञा:

कुपोषण (Malnutrition), आरोग्य (Health), आरोग्य केंद्र (Health Centre)

प्रस्तावना :

आरोग्य आणि कुपोषणाचा जवळचा संबंध दिसून येतो. आरोग्य ठणठणीत राहण्याकरिता योग्य पौष्टिक आहाराची आवश्यकता असते परंतु जर व्यक्तीचे विशेषता बालकांचे योग्य पोषण न झाल्यास त्यांना कुपोषणासारख्या समस्यांना बळी जावे लागते.

"कुपोषण म्हणजे शरीरासाठी आवश्यक असणारे पोषण मूल्यांची कमतरता होय" अशी सर्वसाधारण व्याख्या केली जाते.

शरीराच्या वाढीसाठी आवश्यक योग्य पोषण मूल्यांची असलेली आहारची कमतरता व भूकमारीने होणारी मनुष्याच्या (विशेषतः अल्पवयीन बालके) शरीरांची स्थिती होय.

"पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे जी अशक्तपणाची व आजारपणाची परिस्थिती निर्माण होते तिला कुपोषण असे म्हणतात व त्या व्यक्तीला कुपोषित म्हणतात".

`"शरीरातील एक किंवा एकापेक्षा अधिक पोषक तत्त्वांच्या अभावाचा प्रभाव कुपोषण आहे"

अभ्यास क्षेत्र :

प्रस्तुत अभ्यासासाठी पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वत क्षेत्राची अभ्यासक्षेत्र म्हणून निवळ करण्यात आली आहे. या प्रदेशाला पश्चिम विदर्भातील सातपुडा क्षेत्र असे संबोधले जाते, हे क्षेत्र अमरावती विभागाच्या उत्तरेकडे असून मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अंबाबरवा अभयारण्य म्हणून ओडखले जातो. या प्रदेशाची उत्तरेकडील सीमा महाराष्ट्राची राज्याची सीमारेषा आहे तर दक्षिणेकडील सीमा सातपुडा पर्वताची समुद्रसपाटीपासून ३५० मीटर उंची असलेले क्षेत्र सिमारेषा म्हणून घेतले आहे. पूर्वेकडील सीमा नागपूर, वर्धा, अमरावती जिल्ह्यांनी तर पश्चिमेकडील सीमा जालना, बुलढाणा जिल्ह्यानी सिमांकित केली आहे. पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वतीय क्षेत्राचा विस्तार ७६'२१'४५ पूर्व रेखांश ते ७८,२३'५१" पूर्व रेखांश तर अक्षवृत्तीय विस्तार २१'०१'३२" उत्तर अक्षांश ते २१'४४'०२" उत्तर अक्षांश आहे. या संपूर्ण प्रदेशाचे एकूण क्षेत्रफळ ६७९३ चौ.कि.मी आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे :

१) पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वत क्षेत्रातील आरोग्य सुविधा केंद्रांचा अभ्यास करणे.
२) आरोग्य सुविधा केंद्राच्या अंतर्गत कुपोषण या समस्येचा प्रभाव अभ्यासणे.
३) पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वतीय क्षेत्राचा कुपोषण समस्येवर पडलेल्या प्रभाव अभ्यासणे.

४) पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वत क्षेत्रातील कुपोषित बालकांच्या समस्येचा अभ्यास करून योग्य उपाय योजना सुचविणे.

सांख्यिकीय आणि संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोध निबांधासाठी पश्चिम विदर्भातील सातपुडा क्षेत्रातील आदिवासी आरोग्य सुविधा केंद्रांचा लोकसंख्या आकारानुसार तालुक्यातील कुपोषित व्यक्तीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करताना प्रत्यक्ष पाहणीनुसार मिळालेल्या आकडेवारीचा उपयोग केला आहे. पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वत क्षेत्रातील आरोग्य विषयीची इतर माहिती जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्हा, जिल्हा परिषद आरोग्य विभाग अमरावती, अकोला, बुलढाणा इत्यादीं मधून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. वरील प्रत्येक घटकांची विभागणी तीन ते चार गटांमध्ये करण्यात आली असून प्रत्येक घटकातील सहसंबंध हा प्रतिगमन आलेखाद्वारे तपासण्यात आला आहे. त्यासाठी स्पिअरसन यांची सहसंबंध पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सहसंबंधाची सार्थकता तपासण्यासाठी t-Test चा उपयोग करण्यात आला आहे. जीआयएस (GIS) प्रणालीद्वारे नकाशे अधोरेखित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यासासाठी प्राथमिक स्वरूपात संकलित केलेल्या माहितीवर आधारित आहे. यासाठी निरीक्षण, मुलाखती या तंत्राचा वापर केला आहे त्यासाठी प्रत्यक्ष अभ्यासक्षेत्राला भेटी देऊन माहिती संकलित केली आहे.

सातपुडा पर्वत क्षेत्रातील कुपोषणाची श्रेणी निहाय वर्गवारी.

१) साधारण श्रेणी निहाय वर्गवारी :

पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वतीय क्षेत्रातील ० ते ६ वयोगटातील सर्वेक्षित बालकांमध्ये वय व उंचीनुसार अपेक्षित वजन असणाऱ्या बालकांचा समावेश साधारण श्रेणीनिहाय वर्गवारी अंतर्गत होतो. मुख्यतः ही बालके कुपोषण या घटका अंतर्गत मिळत नाहीत अभ्यासाच्या दृष्टीने साधारण श्रेणी या वर्गवारीचे खालील तीन गटात वर्गीकरण करण्यात येते.

अ.क्र.	तहसील	० ते ६ वयोगटातील सर्वेक्षित बालकांची टक्केवारी	साधारण टक्केवारी	मध्यम / कमी वजनाचे टक्केवारी	तीव्र कमी वजनाचे टक्केवारी
१	धारणी	८५	६१.१	२९.३०	९.६०
२	चिखलदरा	८३	६४.१	२७.५०	७.६०
३	वरूड	९३	८८.४	१०.६०	१.००
४	मोर्शी	९७	९२.८	६.१०	१.००
५	चांदूर बाजार	९८	९०.६	८.६०	०.८०
६	अचलपूर	९८	९१.१	८.१०	०.८०
७	अंजनगाव सूर्जी	१००	९६.१	३.४०	०.५०
८	अकोट	८५.२८	९२.१७	६.८४	०.९९
९	तेल्हारा	८१.१६	९३.५८	५.६१	०.८१
१०	संग्रामपूर	९९.९४	८९.२४	९.२४	१.००
११	जळगाव जामोद	१००	८१.६६	१६.२६	२.१०

स्त्रोत: राजमाता जिजाऊ माता – बाल आरोग्य व पोषणमिशन,महाराष्ट्र राज्य मुंबई.

पश्चिम विदर्भातील सातपुडा पर्वत क्षेत्र
आदिवासी जमातीतील कुपोषीत बालकांची वर्गवारी



नकाशा क्र. ६.४

I. जास्त साधारण श्रेणी असलेले क्षेत्र :

या अंतर्गत ९० % पेक्षा जास्त प्रमाण असणाऱ्या क्षेत्राचा समावेश होतो. सारणी व नकाशाचे विश्लेषण केल्यास असे स्पष्ट होते की जास्त साधारण श्रेणी असलेल्या क्षेत्रांमध्ये वरुड या पर्वतपदीय तालुक्याला वगळता इतर सर्व पर्वतपदीय तालुक्यांच्या क्षेत्राचा समावेश आहे. ज्यामध्ये मोर्शी, चांदूर बाजार, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, अकोट आणि तेल्हारा इत्यादीं तालुका क्षेत्रांचा समावेश होतो.

II. मध्यम साधारण श्रेणी असलेले क्षेत्र :

सारणी व नकाशाचे विश्लेषण केल्यास असे आढळून येते की, मध्यम साधारण श्रेणी असलेल्या क्षेत्रांतर्गत ८० ते ९० % साधारण श्रेणी असणाऱ्या बालकांचा समावेश होतो. व रुड या तालुक्यांमध्ये एकूण सर्वेक्षित बालकां पैकी ८८.४ % बालके हे साधारण श्रेणीमध्ये आहे. याचा अर्थ या क्षेत्रामध्ये थोड्याफार प्रमाणात कुपोषित व्यक्ती असण्याची शक्यता वर्तवण्यात येते. याचबरोबर संग्रामपूर आणि जळगाव जामोद या दोन तालुक्यांचा सुद्धा समावेश या मध्ये होतो.

III. कमी साधारण श्रेणी असलेले क्षेत्र :

या अंतर्गत एकूण सर्वेक्षित बालकांपैकी ८० टक्के पेक्षा कमी संख्या असणाऱ्या तालुका क्षेत्राचा समावेश होतो. सारणी व नकाशाचे विश्लेषण केल्यास असे स्पष्ट होते की, या क्षेत्रामध्ये धारणी आणि चिखलदरा या पर्वतीय क्षेत्रांचा म्हणजेच आदिवासी बहुल क्षेत्रांचा समावेश होतो.

२) कमी / मध्यम वजनाचे श्रेणीनिहाय वर्गवारी :

कमी वजनाचे श्रेणीनिहाय वर्गवारीमध्ये अभ्यास क्षेत्रातील सर्वेक्षित ० ते ६ वयो गटातील बालकांचे वजन व वयानुरूप आवश्यकते पेक्षा कमी असलेल्या बालकांचा समावेश होतो. ज्यांना MAM (Moderate Acute Malnutrition) असे म्हणतात. जगातील ३९ मिलियन बालके यांनी प्रभावित झालेले आहे. अभ्यास क्षेत्रातील कमी वजनाचे श्रेणीनिहाय वर्गवारीचा अभ्यासाच्या दृष्टीने खालील गटांमध्ये वर्गीकृत करण्यात आले आहे.

I. जास्त संख्या असलेले कमी वजनाचे क्षेत्र :

या क्षेत्रांतर्गत ० ते ६ वयोगटातील कमी वजन असणाऱ्या बालकांचा तालुका निहाय अठरा टक्के पेक्षा जास्त तालुका क्षेत्रांचा समावेश यात होतो. ज्यामध्ये धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यांचा समावेश आहे. धारणी तालुक्यामध्ये कमी वजनाचे श्रेणीनिहाय वर्गवारी मध्ये सर्वेक्षित ० ते ६ वयोगटातील २९.३% बालकांचा समावेश आहे. तर चिखलदरा तालुक्यामध्ये कमी वजनाचे श्रेणीनिहाय वर्गवारी मध्ये सर्वेक्षित ० ते ६ वयोगटातील २७.५% बालकांचा समावेश आहे. म्हणजेच या दोन्ही तालुक्यातील एक चातुर्थांश बालक कुपोषणाची शिकार होताना आढळून

येते. याचा अर्थ या क्षेत्रातील चार पैकी एक बालक मंद कुपोषणाचे शिकार झाले असून त्यांच्या स्थितीमध्ये सुधार करण्याची आवश्यकता आहे.

II. मध्यम संख्या असलेले कमी वजनाचे क्षेत्र :

या अंतर्गत ८% ते १८% प्रमाण असलेल्या मध्यम कमी वजनाच्या श्रेणीतील बालके असणाऱ्या तालुक्यांचा समावेश होतो. ज्यामध्ये वरुड, चांदुर बाजार, अचलपूर, संग्रामपूर इत्यादी तालुक्यांचा समावेश आहे. या क्षेत्रामध्ये आदिवासी लोकसंख्या कमी असून इतर जाती-धर्मांच्या लोकांची संख्या अधिक आढळून येते.

III. कमी प्रमाण असलेले कमी वजनाचे क्षेत्र:

या क्षेत्रांतर्गत ८ % पेक्षा कमी वजनाचे बालके असणाऱ्या तालुक्यांचा समावेश आहे. यामध्ये अंजनगाव सुर्जी, अकोट, तेल्हारा इत्यादी तालुक्यांचा समावेश होतो. या तालुक्यांचा समावेश पर्वत पदीय क्षेत्रांमध्ये असल्याने या क्षेत्रामध्ये शेती व्यवसाय मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे पोषणाची समस्या पर्वतीय क्षेत्रापेक्षा कमी आढळून येते.

३) तीव्र कमी वजनाचे तीव्र कुपोषित श्रेणीतील बालके ;

सर्व साधारणतः अन्नाच्या कमतरतेमुळे तसेच पौष्टिक आहाराच्या अभावामुळे तीव्र कमी वजनाचे तीव्र कुपोषित बालकांची समस्या निर्माण होते. तीव्र कुपोषित बालकांची जीवन जगण्याची क्षमता फारच कमी असते कारण अशा बालकांमध्ये रोगप्रतिकारक शक्ती कमी प्रमाणात असल्याने त्यांचे आजारी राहण्याचे प्रमाण अधिक असते. भारतात तीव्र कुपोषित बालकांचे प्रमाण जगात सर्वाधिक आढळून येते. तीव्र कुपोषित बालकांची ओळख SAM (Severe Acute Malnutrition) म्हणून होते.

I. तीव्र कुपोषित बालके असलेले जास्त प्रमाणाचे क्षेत्र :

[6]. Stephen, Cynthia. 2017. Ambedkar's 'enlightened economics'. June 15, 2017. https://bit.ly/2Xo1aZQ (accessed April 24, 2020).

[7]. Jadhav, Narendra. 1991. "Neglected Economic Thought of Babasaheb Ambedkar." Economic and Political Weekly 26, no. 15: 980-982

Significance of Intellectual Property and its protection under Indian Laws

Shweta Shiraskar

Abstract: Intellectual property plays vital role in scientific and economic development of world. It paves the way in promoting innovation and creativity. Intellectual property rights IPR refers to the legal rights granted to the inventor or manufacturer to protect their invention or manufacturer product. Its relevance has been increasing day by day. This Article highlights the crucial role of protecting intellectual property rights and encouraging innovation and creativity. It is also necessary to focus on opportunity to promote public understanding of intellectual property rights and its importance for social, scientific and economic development.

Introduction: Ronald Reagan who was an American politician and served as the 40th President of the United States rightly express that "There are no great limits to growth because there are no limits of human intelligence, imagination and wonder.

Meaning of intellectual property rights: Any original thought or an idea which has transformed into a creative work such as literature, music or an invention etc. can thus be referred to an "Intellectual Property" or in Short IP. There are some laws enacted in India to protecting legal rights of the person or an entity to protect its intellectual work from being misused or exploited. Intellectual property rights are kind of intangible property as it arises from human intellect and a product of human creation.

Types of Intellectual property: The four main *types* of *intellectual property* are patents, trademarks, copyrights, and trade secrets.

IP Laws in India mainly protect Intellect + Property + Rights i.e. Intellectual property right
Ideas and expression are protected under the head of Copyright,
Idea, Innovation, Invention protected under the head of Patent,
Idea, Quality, Identity protected under the head of Trademark
Idea, Appearance protected under the head of Design
Idea, Confidentiality, non-disclosure protected under the head of Trade Secrets
So the concept of protection of intellectual property right is to encourage human being to think away from the set box and generate ideas and own them

Need of protection of intellectual property rights:

Legal protection of IP rights safeguard and reward intellectual work and encourages and motivates creativity and innovations in the country. It also provides a safe and secure environment where the creator needs not to worry that his idea may be copied or imitated. As one invested a considerable amount of money and time in developing innovative products and earn higher returns on investment through exclusive IP rights.

Scientific significance of Intellectual Property rights: In this modern era in our day today life, we are always dealing with intellectual property like latest mobile phone, Apps, Technology, software's etc. IP rights allow scientists, inventor or organizations to earn the proper recognition and also the proper financial benefits from these inventions.Discoveries made through scientific research can have great value to researchers in advancing knowledge, to governments in setting public policy, and to industry in developing new products. Researchers should be aware of this potential value and of the interest and benefiting from a new idea may require establishing intellectual property rights through patents and copyrights, or by treating the idea as a trade secret. Intellectual property is a legal right to control the application of an idea in a specific context (through a patent) or to control the expression of an idea (through a copyright). Patent and copyright protections are legal mechanisms that seek to strike a balance between private gains and public benefits. They give researchers, nonprofit organizations, and company the right to profit from a new idea. In return, the property owner must make the new idea public, which enables others to build on the idea.

Economic significance of intellectual property rights: IP contributes enormously to our national and State economics. Lots of industries across our economy rely on the adequate enforcement of their patents, trademark, and copyrights, while consumers use IP to ensure they are purchasing safe, guaranteed products. IP industries also provide good job opportunities. Risk and occasional failure are the lifeblood of the innovative economy. IP rights facilitate the free flow of information by sharing the protected know how through assignment and licensing. This process leads to new innovations and

improvements on existing ones. All lifesaving drugs come from pharmaceutical industry that depends on patent protection. Agricultural companies also earn good profit from farmer products IP green technology will helps to improve quality and climate change.

Socialsignificance of intellectual property rights: The intellectual property has a very important role both in economic and social development of mankind. It allowing humans as consumers to improve and develop a better lifestyle by providing a technical solution to an existing problem or simply satisfying a need.

Intellectual Property Law in India

History: Intellectual Property and India has a good long history dating back to the ancient years of Indus Valley Civilization. Evidences show that in the Ancient Era, especially during the Indus Valley Civilization era, activities of town planning, entertainment industries, musical industry and others were highly prevailing and also trademarks have been used to differentiate the products of the producers from one to another. If we take a look at the present scenario, Intellectual Property like trademarks, are used mainly by every market competitors to differentiate ones product from another. So it is safe to say that the idea to protect one's product or service from another has been prevailing since the ancient times in India. Intellectual Property Law was first brought to mainstream in India by the British Empire by implementing the British Patent Act, 1852 when an applicant named George A. De Pennings made the first application for a patent in India in the year of 1856, which subsequently gave effect in the making of the Act VI of 1856. The recognition of Intellectual Property as a property by the Indian Constitution is vague and unambiguous. The Constitution of India does not openly declare an Intellectual Property as a property but at the same time it also does not reject the same.

The Indian constitution in its preamble permits mixed economy system and recognises the economic liberty as one of the most important liberty. This has been ensured through property system. If the term "property" used in the Indian Constitution is analyze it may mean any tangible property but it has a wider concept. Though, it absolutely includes intellectual property but indirectly. There was a time when "Right to Property" was a fundamental right enshrined in the Indian Constitution under Article 19 (f) but later it was substituted through the 44th amendment. However the substitution of Article 19 (f) didn't mean the end of "Right to Property", the insertion of another Article i.e. Article 300A through the 44th Amendment, changed it to a Constitutional right from fundamental right and due to this change any legislation violating the constitutional "Right to Property" could now be challenged only in High Courts and not directly in the Supreme Court. However, Intellectual Property as a form of property can be put under Article 300A dealing with property and be entitled to a legal right. Unlike the Indian Constitution, the United States Constitution specifically protects the Intellectual Property Article 1(8) of the U.S. Constitutions which provides "To promote the progress of science and useful arts, by securing for limited times to authors and inventors the exclusive right to their respective writings and discoveries". However, there is no such intellectual property clause in the Indian Constitution. While this means that Intellectual Property does not have special Constitutional status, it also means that there are no Constitutional restrictions on the power to make laws on intellectual property. Article 300A of the Indian Constitution provides constitutional safeguards against unlawful deprivation of property, it is Article 253 that plays an important role in the context of intellectual property rights as it mandates the recognition of the international aspect of laws.Legislationsand agreementsempowers the Indian parliament to enforce the international treaties through law making process. Certain provision in Article 372 also validates the pre-constitutional law subject to certain condition laid down in the provisions. For instance Article 372 (1) states that all the laws in force in the territory of India immediately before the commencement of this constitution shall continue in force therein until altered or repealed or amended by a competent legislature or other competent authority".

Thus due to the presence of these Articles it became possible for the pre-constitutional intellectual property rights laws to be in force in India and the adoption of various international treaties on intellectual property laws by the Indian legislation. For example, the repealing of 1911 Patent Act and the passage of new Patent Act, 1970 was due to Article 372 (1) of the Indian Constitution which authorizes the legislature or any competent body to repeal, alter or amend the pre-constitutional laws. Also, majority of the present intellectual property laws are influenced by the international laws, such as the present patent laws is the result of various international instruments like Budapest treaty, TRIPS agreement, UN convention on Biodiversity and others.

Article 31A protected the legislations providing for acquisition of estate or any right therein or their modification on the ground that it took away or abridged any of the rights conferred by Part III of the Constitution. Article 31B restricted the scope for challenge on the plea of violation of fundamental rights. Traditionally only a few items were included in the category of intellectual property. At present, generally copyright, designs, patents, and trade mark are classified as intellectual property. But by the development of arts, science and technology, many new items have been included in this category.Further, the mention of Intellectual Property system in the Entries of the Indian Constitutional further provide us with clues that Intellectual Property is indeed recognized by the Indian Constitution.

Entry 12, 13, 14 has been rightly included in the List 1 of the 7th Schedule

12. United Nations Organisation.

13. Participation in international conferences, associations and other bodies and implementing of decisions made thereat.

14. Entering into treaties and agreements with foreign countries and implementing of treaties, agreements and conventions with foreign countries.

Of the Indian Constitution. Entry 49 of List I

49. Patents, inventions and designs; copyright; trade-marks and merchandise marks.

Entry 49 recognizes only patents designs, copyright, trademarks and others. However, it does not recognize the concept of traditional knowledge, biodiversity, geographical indications and others but these categories of intellectual property rights can be included within the existing one. If we look into entry 97 of List I which read as follows "any other matter not enumerated in List II or List III including any tax not mentioned in either of those lists" and

Article 248 reads as "parliament has exclusive power to make any law with respect to any matter not enumerated in the concurrent List or State List". (Residuary powers)Thus, it is safe to assume that traditional knowledge can be included among other intellectual properties and are recognized by the Indian Constitution as Intellectual property.

Existing Indian laws to protect IPR: Broadly, the following laws deal with the protection of intellectual property, Trade Marks Act, 1999. The Patents Act, 1970 (as amended in 2005) The Copyright Act, 1957. India has adequate copyright laws, and in July 2018, India acceded to the WIPO Internet treaties, namely the WIPO Copyright Treaty (WCT) and WIPO Performances and Phonograms Treaty (WPPT). In 2019, India ratified the Lisbon, Nice and Locarno Agreements on classification of various types of IP.

Conclusion

The Constitution of India provides the necessary safeguard to protect the right to property in general and the agricultural property in particular. For example, The Protection of Plant Varieties and Farmers Right Act, 2001 is framed to make available a number of special safeguard measures to protect and promote the interests of the farmers in order to encourage the accelerated growth of the agricultural sector which will ultimately result into the overall growth of the Indian economy. Also the Biodiversity Act, 2002 is framed to provide safeguards to various biological resources like "plants, animals and microorganisms and their genetic material and by-products (excluding value added products) with actual or potential use or value, but not human genetic material against being misused and other unfair commercial or non-commercial activities. In general it is enacted to protect against bio-piracy. A case of such bio-piracy occurred when the US Patent Office granted the patent (Patent No. 5, 401 and 504) for turmeric to two expatriate Indians at University of Mississippi Medical Centre in 1995 which was subsequently challenged by the Indian Council for Scientific and Industrial Research (CSIR) on the ground of "prior art" or "existing public knowledge". Although, the CSIR won their battle, this incident shows how traditional knowledge is vulnerable to bio-piracy and thus the need to protect it has grown increasingly.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CCCXCVI) 396

ISSN : 2278-9308 February, 2023

बौद्धकालीन राजकीय विचार

डॉ. बेलखेडे महादेव बारसुजी

राज्यशास्त्र विभाग प्रमुख पानसरे महाविद्यालय अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड

मो. नं. ९७६४३०१६१२

प्रस्तावना:-

भारतीय इतिहासाची व संस्कृतीची पाश्चात्य जनास ओळख झाल्यानंतर अनेक वर्ष असा अपसमज प्रचलित होता की भारताच्या राजकीय विचार मूळात नाहीतच परंतु काही काळानंतर विद्वानांच्या परिश्रमाने पुरातत्वाविषयी जे जे साहित्य उपलब्ध झाले त्यावरून वरील समज निराधार असल्याचे सिद्ध झाले. धर्म,अध्यात्म, तत्त्वज्ञान याकडे भारतीय मनाचा ओढा असली तरी त्यांची बुद्धी चौफेर होती तिची पोहोच सर्वत्र होती, विज्ञान वास्तुशास्त्र कलाकुसर संगीत, चित्रकला, कृषी, उद्योग, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या भिन्न भिन्न क्षेत्रात भारतीयांनी बौद्धिक प्रगल्भता नव्हे तर, प्रयोग प्राविण्यही दाखविले. नव्हे तर मानवाच्या संघटनांच्या समस्या गंभीरपणे समजून घेऊन त्यातील सामाजिक विकासाचे व्यावहारिक प्रश्न हाताळण्यात त्यांनी खूप प्रगती केली यामध्ये बौद्ध काळाचा सिंहाचा वाटा असल्याचे दिसून येते.

बौध्द कालीन राजकीय साहित्य :-

बौद्ध धर्माच्या बुद्धिमान अनुयायांनी विस्तृत वांङःमय निर्माण केली आहे आणि सामाजिक व राजकीय क्षेत्रात नवे सिद्धांत प्रतिपादले आहे. बौद्ध काळातील त्रिपीठक जाचककथा, निकायांपैकी दीर्घ, मध्यम, संयुक्त निकायकथासंग्रह विशेष महत्त्वाचे आहे. त्यासोबतच आर्यसुरांची जातक माला अश्वघोषाचे व सौरदानंदचे काव्य, बुद्ध चरित्रकाव्य इत्यादी मध्ये राज्या संबंधी विचार स्पष्ट आहेत. राजा, राज्य व शासन व्यवस्था सार्वभौमत्ता, न्याय व्यवस्था, प्रशासन व्यवस्था, आणि त्याची कार्यपद्धती इत्यादी विषयी महत्त्वाची अशी माहिती प्राप्त होते. आणि ती आजही महत्त्वाची आहेत.

राज्यशास्त्राची व्याप्ती :-

समग्र जीवनाकडे एकात्मतेने पाहण्याची वृत्ती व भेदातून समन्वय साधण्याची वृत्ती ही बौद्ध काळातील वैचारिक प्रवृत्तीचे विशेष वैशिष्ट्ये होय. बौद्ध काळात सार्वजनिक जीवनात धर्माच्या अनुरोधाने व अनुषंगानेनीतीचा मागोवा घेत विचार करण्याची दृष्टी रुढ होती. त्यामुळे राज्यशास्त्राच्या स्वरूपावर व अध्ययनावर धर्माचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही परिणामता बौद्ध धर्म सखोल मानव जातीस व्यापून राहिला आणि त्यातून जीवनाचे कोणतेही अंग सुटलेले दिसत नाही धर्म आचार प्रायचित्त त्याच बरोबरीने सामाजिक व राजकीय सिद्धांत इत्यादीचा उहापोहा केलेला दिसून येतो. नव्हे तर राज्यशास्त्र म्हणजे संबंध समाजाचे नीतिशास्त्र, मानवाच्या अखिल संबंधात परिस्थितीत कर्तव्याचे दर्शन घडवून आणणारे शास्त्र इतपत त्याची व्याप्ती आणि विस्तार असल्याचे स्पष्ट होते.

काल्यणकारी राज्य :-

भारतातील बौद्ध काळ म्हणजे तथागत गौतम बुद्ध आणि त्याच्या विचाराने प्रभावित झालेला काळ होय. तथागत गौतम बुद्ध एक महान व्यक्ती होते ते ईश्वर नव्हते. बुध्दाच्या काळात व्यक्तीला व तिच्या व्यक्तीमत्वाला विशेष महत्व होते. त्याचाच बोध बुध्दाच्या अत-दिप-भव या संदेशातून स्पष्ट होते. त्यासाठी त्यांनी स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव या चतुसूत्रीवर आधारित समाजाची उभारणी करायची होती, त्यातूनच गणराज्य व्यवस्था निर्मितीची प्रक्रिया सुरू होते हे त्याच्या लक्षात आले म्हणूनच त्यांनी सारनाथ येथील आपल्या पहिल्या प्रवचनात"अशा विचाराचा प्रचार करा जे प्ररंभी कल्याणकारी आहे, त्याचा मध्य कल्याणकारी आहे आणि शेवटही कल्याणकारी आहे" असा संदेश देतात. कल्याणकारी राज्य व्यवस्था निर्माण करून 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या मंत्राची अंमलबजावणी करावी असे प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणाची जबाबदारी राजकीय व्यवस्थेने स्वीकारली पाहिजे असा त्याचा आग्रह दिसतो. नव्हे तर 'बहुजन सुखाय बहुजन हिताय' या मंत्राचा उपयोग करून कल्याणकारी राज्यव्यवस्था

निर्माणकरावी असा त्यांचा आग्रह होता. हे जणू काही कल्याणकारी राजकीय व्यवस्था निर्मितीची प्रक्रियाच त्यांनी स्पष्ट केली आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

राज्याचा उदय :-

राज्यशास्त्रातील सर्वात महत्त्वाची संकल्पना म्हणजे राज्यसंस्था ही होय. त्या संस्थेचा उदय कसा झाला यासंबंधीचा अतिशय कर्कशुद्ध सिद्धांत बौद्ध काळात मांडला गेला. इतिहासाच्या एका युगात लोक इतक्या पूर्णत्वास पोहचले होते की, त्यांना शारीरिक अस्तित्वही जवळजवळ नव्हते. अशा दिव्य व्यक्तीतेजाने तळपळत शांतता व प्रकाश अनुभवत हा आनंद व शांतता युगान-युगे टिकून होती, परंतु अखेरीस या शुद्ध पावित्र्याचा लोप झाला. स्त्री-पुरुष, रंगभेद, वर्णभेद प्रकट झाले त्यात दिव्य जीवनाचा -हास होऊन शारीरिक पातळीवर पतन झाले. आता सर्वांना आसरा व अन्नाची गरज निर्माण झाली.आपापसात करार करून त्यांनी कुटुंब, संपत्ती या संस्था निर्माण केल्या. धनसंचायाला प्राधान्य दिले गेले, त्याचबरोबर द्वेष, मत्सर, आधीभाव निर्माण झाले. तुझे-माझे ठरविले जाऊ लागले, कालांतराने चोऱ्या होऊ लागल्या व इतरही प्रकारचे समाज जीवनाविरोधी वर्तन घडू लागले तेव्हा लोकांनी समाजात शांततानिर्माण करण्यासाठी,सुव्यवस्थाराखण्यासाठीव न्यायरीत्या अपराध्यास शिक्षाकरण्यासाठी प्रमुख निवडण्याचे ठरविले. त्याला महासामंत असे नाव दिले तो म्हणजे राजा होय. या राजाने व्यवसाय करणाऱ्या लोकांना त्यांना आवश्यकतेनुसार अन्नधान्य, भांडवल व वेतन देऊन राज्याचे उत्पन्न वाढविले व सर्वत्र शांतता सुव्यवस्था निर्माण केली. लोकांनीही त्या बदल्यात आपल्या पिकाचा एक हिस्सा देण्याचे कबूल केले. राज्याच्या अशा प्रकारच्या कार्यामुळेराजा लोकांचा पुढारी व मार्गदर्शक झाला. अशा पद्धतीने राज्यसंस्था निर्माण झाली, असे स्पष्ट नमुद केले आहे.

'राजपद' जनसंमतीचा आधार :-

बौद्धकालीन काव्य सौदरानंद मध्ये काही राजपुरुषांनी एका नगराची स्थापना केली. त्यातून त्याचे व्यवहार सुरळीत चालवायचे असतील तर राजाची नेमणूक झाली पाहिजे असे त्याचा लक्षात आले. राजाखेरीज पृथ्वी म्हणजे चंद्राखेरीज नभोमंडल हे लक्षात आल्यावर त्यांनी आपल्यापैकी एकासप्रभुतेचा अधिकार दिला. (आज ज्याला आपण सार्वभौमत्व म्हणतो) असा राजा वयाने आदरणीय, विनीत व विविध विद्यास व कलात निष्णात होता.एकत्र आलेल्या राजपुरुषांनीआपल्यापैकी एकाची राजा म्हणून निवड केली. तो सर्वाकडून निवडला असल्यामुळे महासंमत, तो सर्व क्षेत्राचा मालक झाला त्यामुळे क्षत्रिय, धार्मिक कार्याने तो सर्वांना संतोष देत असल्यामुळे राजन अशा नावाने संबोधले जात होते.या विश्लेषणावरून राजाचे मूळ एहीक घटनात होते आणि'राजपद' समाजाच्या संमतीवर विसंबून असे, नव्हे तर राजदंड हा सद्गुनाच्या समर्थनासाठी धारण करण्यात आला होता असे स्पष्ट होते.

राजाचे गुण :-

राज्याच्या भरभराटीसाठी राजा गुणवान असावा असे म्हटले आहे. सर्वप्रथम राजाने प्रजेचे सुख हेच आपले सुख व तिचे दुःख हेच आपले दुःख असे समजावे. राजाचे जीवन धार्मिक व न्यायी असावे त्याने तितिक्षा साध्य करावी, स्वभाव मनमिळावू असावा तो सत्यप्रिय, सदाचारी,नितीमान असावा. त्याने भ्रष्ट, क्रूर व मधवी असू नये त्यांनी कुणास पीडा देऊ नये सदाचार व सत्यप्रियता हे गुण राजासाठी महत्त्वपूर्ण असतात. राजाने त्याचा त्याग केल्यास तोच नव्हे तर सारे जग विनाश पावेल असे वर्णन आढळून येते त्यामुळे राजाला उत्साही, दोरणी, भारधस्तव शक्तीमान अशी विशेषणे बौद्ध काळात वाचायला मिळतात. यावरुन राज्यकर्ते कसे असावे याची कल्पना येते.

राजाची कर्तव्य :-

समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुत्व या चतुसूत्री महत्त्वाचे म्हणून ओळखली जाते. या चतुसूत्रीच्या आधाराने समाज निर्मिती व्हावी यासाठी राज्याच्या कर्तव्याचा उल्लेख आढळतो ती दहा कर्तव्य पुढील प्रमाणे.

१) राजाने प्रजेस परचक्रीपासून व अंतर्गत दंगे, धोपे, दडपशाही यापासून वाचवावे.(त्यांच्या रक्षणासाठी राजाने कायद्याचा तसेच तलवारीचा प्रयोग करावा. राजाची तलवार अलंकाराप्रमाणे असायची इतर राजे त्यांच्या तैनात असल्यामुळे तिचा उपयोग करण्याचा क्वचितच प्रसंग येत असे.)

२) पूर्वापार चालत आलेल्या प्रथा व परंपरा चालू ठेवाव्यात.

३) इतिहासाचा आधार असलेले कायदे सहसा नष्ट करु नये मात्र काहीच आधार नसलेले कायदे रद्द करावेत.

४) सत्याची व न्यायाची बाजू घ्यावी.

५)वडीलधा-यास मान द्यावा त्याचे ऐकणे हे आपले पहिले कर्तव्य समजावे.

६) स्त्रियांना सक्तीने ठेवून घेऊ नये, पळवून नेऊ नये याकडे लक्ष द्यावे.

७) सदर वर्तनाचे नियम पाळण्याचे आदेश द्यावे.

८) सज्जनास पारितोषिके द्यावे आणि अपराध्यास शिक्षा द्यावे.

९) धार्मिक ग्रंथाबद्दल दयाबुद्धी दाखवावी,निपक्षपातीपणे न्याय द्यावा.

१०) लोक सत्ताकांच्यापूर्ण मंडळाच्या वारंवार बैठकी घ्याव्यात,बैठकीच्या निर्णयात सुसंवाद असावा वज्जीचे हित ज्यात आहे असेच निर्णय द्यावेत.

राजाकडूनवरीलकर्तव्य जोवर पाळले जातील तोपर्यंत राज्य संस्थेत धोका नाही याशिवाय रुग्णालये, धर्मशाळा,दानमंदिरे, जलसिंचन, रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी सावली देणारी झाडे, पाणी पुरवठ्याची व्यवस्था इत्यादी गोष्टी राजाने राज्यसंस्थेमार्फत पुरवाव्यात अशा गोष्टीकडे लक्ष देण्यात आले आहे.

राजकीय व्यवस्था :-

राजाला राज्यकारभार करण्यासाठी आणि त्याची अमलबजावणी करण्यासाठी राजाची एक संघटना होती. या राजापैकी प्रत्येकाला एक स्वताचे राज्य होते. व त्या राज्यात त्याची सत्ता सर्वोच्च होती. प्रत्येक राजास एक उपराजा व सेनाव्यवस्था होती. या लोक समितीची, लोकसंघटनेची दोन सदने होती ती म्हणजे या संघटनेची वरिष्ठ व कनिष्ठ सदने होती. त्यांचे परराष्ट्र धोरणावर नियंत्रण असे मध्यवर्ती समितीत आवश्यक त्यावेळी राजकीय बाबीवर चर्चा होत असे एरवी तिच्यात धार्मिक व सामाजिक प्रश्न चर्चिले जात समितीचा कारभार उरकण्यासाठी एक विशिष्ट कार्यपद्धती होती परंतु निर्णय मुद्द्यावर मतदान होत असे आणि किमान गणपुर्तीची तिची संख्या ही ठरलेली होती, मध्यवर्ती समितीच्या अध्ययाच्या हिमतीस एक कार्यकारी मंडळ होते तिच्या धर्म दरम्यान खात्याची पद्धतशीर विभागणी झालेली असायची समितीचा आकार मोठा असल्यास तिची छोट्या समितीत विभागणी होत असे आणि मोठ्या समितीच्या अध्यक्षावर निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी होती.

न्याय व्यवस्था :-

बौद्ध काळात न्यायदानाची योग्य व्यवस्था असल्याचे लक्षात येते. न्याय निपक्षपातीपणे दिला जावा याकडे अधिक लक्ष पुरविण्यात येत असे त्यासाठी खटल्याची योग्य ती चौकशी करून निर्णय द्यावा कायदा मोडणाऱ्यास हवे तसे वागू नये बेवारस संपत्ती राजाकडे जमा करावी अर्थात न्यायाधीशा राजाचा मित्र व सल्लागार असतो ,त्यांच्यावरच ती जबाबदारी राजाने सोपवावी असे म्हटले आहे.

प्रशासकीय व्यवस्था :-

अशोकाच्या शिरालेखात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी देशाचे दौरे करावे,प्रजेला धर्मविषयक प्रशिक्षण द्यावे, कायदे पाळले जातात की नाही ते पाहावे, न्यायदान कशाप्रकारे चालू आहे त्याचे निरीक्षण करावे, राजा आपल्या प्रजेस पित्यासारखा असतो तो प्रजेवर स्वतः प्रमाणे प्रेम करतो प्रजाही त्यांना पित्याप्रमाणे लेखते याची जाणीव करून देण्याची जबाबदारी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे असे नव्हे तर ते अधिकाऱ्याचे नियोजित कार्य समजण्यात येईल अशी मदत करण्यासाठी मंत्री व सेनापती यांचा उल्लेख सापडतो.

वर्ण व्यवस्थेला विरोध:-

अश्वघोषाच्या वज्रसूत्री ग्रंथात अखिल मानव प्राणी सुख-दुख, प्रेम, आंतर दृष्टी वर्तन, मृत्य भय व जीवित या सर्व बाबतीत सारख्याच असतात त्यामुळे वर्णव्यवस्था अनैसर्गिक ठरते असे स्पष्ट केले आहे. कोणतीही व्यक्ती जन्माने श्रेष्ठ नसतो तथा ती कनिष्ठ ही नसतो. गुण आणि कर्माने तो श्रेष्ठ बनतो. म्हणून त्याची वर्णव्यवस्थेला विरोध आणि गण व्यवस्थेचे समर्थन केले आहे.

समारोप :-

थोडक्यात बौद्ध काळात व्यक्तीला आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाला विशेष महत्त्व होते, हे बुद्धाच्या अत दीप भव या संदेशातून स्पष्ट होते. ज्ञान आणि विज्ञानावर आधारित असल्यामुळे त्याचा प्रभाव आजही दिसून येतो. या काळात नैसर्गिक साधनाचे विशेषीकरण करताना बुध्दिनिष्ठतेला अधिक स्थान आहे. राजकीय विचारातही मानव उपक्रमशीलता आणि त्याचे कृतुत्व यावर भर आहे. भूतकाळातील आदर्श राज्याची संकल्पना अधिक लोकप्रिय असली तरी, वास्तव सृष्टीत उतरून समोर दिसणाऱ्या घटनाचे बुद्धिग्राही विवेचन केलेले दिसून येते. बौद्ध काळातील राजकीय व्यवस्था,

तत्त्वज्ञान, तर्क, विज्ञानवादी असल्यामुळे अखिल मानव जातीला भारताने दिलेली देणगी ठरत आहे. आपल्या आजच्या भारतीय राजकीय व्यवस्थेचा अभ्यास केल्यास बरेच साम्य असल्याचे स्पष्ट होते. दुसऱ्या भाषेत आजची भारतीय राजकीय व्यवस्था म्हणजे बौद्ध काळातील राजकीय व्यवस्थेचे विकसित प्रारूपच होयअसे म्हटल्यास वावगे ठरू नये.

संदर्भग्रंथ सूची

१) बुध्द तत्वज्ञान – संपादक – डॉ. पंजाब चव्हाण, प्रा.रामचंद्र भिसे, प्रा.हानमंत जवळगे

२) कौटिल्याचे अर्थशास्त्र (मराठी भाषांतर) – ह.अ.भावे

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यक्ती आणि वांङःमय – संपादक पंकज कुमार

४) पंचायत राज संस्थाएँ अतित वर्तमान और भविष्य – डॉ. सुरेंद्र कटारीया

५) पंचायत राज व्यवस्था – डॉ. विजय करण सिंह

६) प्राचीन भारतीय राज्य विचार –डि.का.गर्दे

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CCCXCVI) 396
ISSN : 2278-9308
February, 2023

शाश्वत कृषी काळाची गरज

प्रा. दिनकर आत्माराम चव्हाण
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती

प्रस्तावना :

संयुक्त राष्ट्र संघाने जाहीर केलेली शाश्वत विकासाची उद्दिष्टे पाहता त्यात दारिद्र्य निर्मूलन, अन्नसुरक्षा, पोषक आहार, पर्यावरण, वातावरणातील बदल, राष्ट्रीय शाश्वत विकास आणि शाश्वत कृषी इत्यादी महत्त्वपूर्ण घटकावर अधिक भर देण्यात आले असून शाश्वत अन्नधान्य व्यवस्था निर्माण करण्यासाठी कृषी उत्पादकता व उत्पादन वाढविणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने विचार केल्यास शेती हा विकासाच्या केंद्रस्थानी असलेला विषय आहे. भारतीय शेतीचे स्वरूप पाहता कोरडवाहू शेतीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असल्यामुळे भारतीय शेतीच्या प्रश्नाने उग्ररूप धारण केल्याचे दिसून येते. शेती हा भारतातील लोकांचा मुख्य व्यवसाय असल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात, एकूण रोजगारात, औद्योगिक विकासात आणि आर्थिक विकासात कृषी क्षेत्राचे महत्त्वाचे स्थान आहे.एकंदरीतच मानवी जीवनाचे अस्तित्व व त्याचा विकास हा कृषी क्षेत्रामुळेच झाल्याचे पहावयास मिळतो.

भारतात उदयास आलेली स्वयंपूर्ण खेड्यांची जीवनपद्धती ही शेतीवरच अवलंबून होती.त्यानंतरच्या काळात म्हणजेच १८ व्या शतकात इंग्लंड या देशात औद्योगिक क्रांती घडून आली.याचा दूरगामी परिणाम जागतिक अर्थकारणावर व जीवनशैलीवर झाला आणि त्यातूनच भारतात उद्योग धंदे व यांत्रिकीकरण निर्मानाला चालना मिळाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात वाढत्या अन्नधान्याचा तुटवडा पूर्ण करण्यासाठी,अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता निर्माण करणे, पारंपारिक शेतीचे आधुनिकीकरण करणे आणि शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या उद्देशाने आधुनिक शेती पद्धतीवर जास्त भर देण्यात आला. भारतात आधुनिक शेती पद्धती चा स्वीकार केल्याने सुरुवातीच्या काळात शेती क्षेत्रात सकारात्मक परिणाम घडून आला. मात्र अलीकडच्या काळाचा आढावा घेतल्यास आधुनिक शेती पद्धतीमुळे शेती क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे दिसते.जसे की रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके,सुधारित व संकरित बियाण्यांचा अवाजवी वापर शेती कसण्यासाठी केल्याने जमिनीतील सुपीकतेचा ऱ्हास होत आहे, जैविक घटकांची संख्या कमी होत आहे, कीटकनाशकाचा अनियमित व अति वापरामुळे मानवी आरोग्यावर दुष्परिणाम वाढत आहे,संकरित वाणामुळे स्थानिक व दुर्मिळ जाती नष्ट होताना दिसत आहे आणि दिवसेंदिवस पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याचे दिसत आहे, त्यामुळे शेती क्षेत्रातील या वाढत्या समस्यावर नियंत्रण करण्यासाठी देशाला शेतीच्या शाश्वतीकरण्याची गरज निर्माण झाली आहे.

संशोधनाचा उद्देश :

1. शाश्वत शेती संकल्पनेचा अभ्यास करणे.
2. भारतातील बदलत्या पीक पद्धतीचा अभ्यास करणे.
3. भारतातील शेती समस्यांचा अभ्यास करणे.
4. शाश्वत शेतीच्या माध्यमातून कृषी विकास अभ्यासणे.

संशोधन पद्धती :

हा संशोधन प्रबंध दुय्यम समकावर आधारलेला असून या शोधनिबंधासाठी विविध प्रकाशित व अप्रकाशित पुस्तके,अग्रलेख, शासनाची विविध मासिके, साप्ताहिके,वर्तमानपत्रे, योजना मासिके, विविध तज्ञांचे शोधनिबंध,विकिपीडिया,इंटरनेट इत्यादी साहित्य ग्रंथाचा आधार घेण्यात आला आहे.

शाश्वत शेतीची संकल्पना (Concept of sustainable agriculture) :

शाश्वत कृषी या शब्दाचा सर्वप्रथम प्रयोग ऑस्ट्रेलियन कृषी वैज्ञानिक Gordon Mcclymont यांनी १९७० च्या दशकात केला. गॉर्डन यांनी शाश्वत शेतीचे वर्णन करताना म्हटले की, शाश्वत शेती ही कृषी क्षेत्रातील अशी एक पद्धती आहे की ज्यामध्ये पर्यावरण शास्त्राच्या (Ecology) सिद्धांताचा प्रयोग करून मानवाच्या दीर्घकालीन लाभाला (Long term benefit) अधिक महत्त्व दिले जाते.

व्याख्या :

खाद्य व कृषी संघटनच्या मते,

"शाश्वत कृषी म्हणजे कृषी संसाधनाच्या सफल व्यवस्थापनाने पीक उत्पादनात निरंतर वृद्धी करून मानवाच्या आवश्यक गरजा पूर्तीसह पर्यावरण आणि प्राकृतिक संसाधनाला भविष्यात सुरक्षित ठेवणे होय "

डॉ. एम. एस. स्वामीनाथांच्या मते :

" विश्वातील वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करण्यासाठी, पर्यावरणातील असमतोल, तापमानातील वृद्धी,नैसर्गिक आपत्ती सारख्या विभिन्न विषमतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी,कृषी उत्पादकता स्तरात नियमित वाढ करण्याच्या उद्देशाने केली जाणारी शेती म्हणजेच शाश्वत शेती होय. "

भारतात संक्रमणाच्या काळात मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढ घडून आली.वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याचा पुरवठा कमी व मागणी जास्त असी विपरीत परिस्थिती निर्माण झाली, त्यामुळे कृषी क्षेत्रातील अन्नधान्य, फळे व भाजीपाला यांचे कमी कालावधीत जास्त उत्पादन घेण्यासाठी पारंपारिक शेती ऐवजी रासायनिक पद्धतीने शेती कसण्यावर जास्त भर देण्यात आला. भारतात १९५०-६० च्या काळापर्यंत शेतीत पूर्णतः नैसर्गिक पद्धतीने म्हणजेच सेंद्रिय पद्धतीचा वापर करून उत्पादन घेतल्या जात असे. परंतु लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढत होती त्या प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन होत नव्हते. त्यामुळे बऱ्याच प्रमाणात देशाला दुसऱ्या देशावर अन्नधान्य बाबत निर्भर रहावे लागायचे. वाढत्या अन्नधान्याची समस्या कमी करण्यासाठी आणि अन्नधान्यात स्वयंपूर्णता निर्माण करण्याच्या उद्देशाने भारत सरकारने १९६० च्या दशकापासून रासायनिक खते, कीटकनाशके व तननाशके, सुधारित व संकरित बियाण्यांच्या वापरावर अधिक भर द्यायला सुरुवात केली. संशोधन,शिक्षण आणि विस्ताराच्या माध्यमातून कृषी विद्यापीठ तसेच संशोधन केंद्रातील तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी सरकारकडून विशेष प्रयत्न करण्यात आले. केंद्र सरकारने केलेल्या या प्रयत्नाला समय दृष्टिकोनातून तीन चरणात विभाजित करण्यात आले.

1. सामान्य चरण (general phase)(१९४७ ते १९६१): या चरणात आधारित संरचना निर्माणा करिता नवीन सडक निर्माण, बहुउद्देशीय परियोजना, सिंचन सुविधा,कर्जाची उपलब्धता,सामुदायिक विकास कार्यक्रम अशा विविध योजना सुरू करण्यात आल्या.
2. गहन चरण (Intensive phase)१९६१ ते १९६५) : यामध्ये गहन कृषी जिल्हा कार्यक्रम अंतर्गत १९६१ मध्ये देशातील सात राज्यातील सात जिल्ह्यात कृषी उत्पादनात अधिक वाढ करण्याच्या दृष्टीने हे चरण सुरू करण्यात आले
3. विशेष्टीकृत चरण (Specielized phase)(१९६५ नंतर) : या चरणात १९६६ मध्ये खाद्य उत्पादनात वाढ करण्यासाठी High Yield Veriety Programme (HYVP) सुरु करण्यात आला.

केंद्र सरकारने या तिन्ही चरणात विविध कार्यक्रमांतर्गत शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी संकरित बियाणे, नवीन उपकरणाचा वापर करणे, बहुपीक पद्धत,सिंचनाची सुविधा आणि कीटकनाशकाचा योग्य वापर करण्यावर अधिक भर दिल्याने भारतात १९६६-६७ या काळात पंजाब, हरियाणा,उत्तर प्रदेश व गुजरात या राज्यातील कृषी उत्पादनात लक्षणीय वाढ घडून आली. या विविध उपक्रमाच्या यशस्वी परिणामामुळेच खाद्य उत्पादनात विशेषता गहू आणि तांदूळ उत्पादनात आश्चर्यजनक वृद्धी घडून आली.भारतातील या उत्पादन वृद्धीत झालेला बदल पाहून

१९६८ मध्ये अमेरिकेचे वैज्ञानिक विल्यम गाड (William Gadd)यांनी याला 'हरितक्रांती'(Green Revolution) असे नाव दिले. १९६० नंतर केंद्र सरकारने शेतीची उत्पादकता व सुपीकता वाढविण्याच्या उद्देशाने रासायनिक शेती पद्धतीला अधिक महत्त्व दिल्याने शेती क्षेत्रात व्यापारी दृष्टिकोणाला विशेष प्राधान्य मिळाले.

शेती क्षेत्रात रासायनिक शेती पद्धतीत वाढ झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी रासायनिक खताचा वापर, कीटकनाशके व संकरित बियानाचा अधिक उपयोग, आधुनिक तंत्रज्ञान व तननाशकाचा अतिवापर केल्याने शेती क्षेत्रात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. जसे कि ,जमिनीतील सुपीकता कमी झाली आहे,जैविक घटकांची संख्या कमी होणे,मृदा प्रदूषणात वाढ,स्थानिक जाती नष्ट होणे, पर्यावरणात असंतुलन निर्माण होणे, शेतकऱ्यांच्या शेती खर्चात होत जाणारी वाढ अशा अनेक समस्या वर्तमानात वाढल्याचे निदर्शनात आले आहे.

शाश्वत शेतीची आवश्यकता / गरज :

रासायनिक शेतीमध्ये रासायनिक खताचा भडीमार मोठ्या प्रमाणात केला जातो.उत्पन्न अधिक मिळावे यासाठी जमिनीची गरज न बघता रासायनिक खताचा व कीटकनाशकाचा अवाजवी वापर व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जातो त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होत जाते आणि जमिनीची उत्पादन क्षमता कमी होत जाते. अशा अनेक समस्या आधुनिक शेती पद्धतीमुळे निर्माण झाले आहेत त्यामुळे या समस्येवर नियंत्रण करण्यासाठी खालील घटकांचा विचार करणे आवश्यक आहे.

1. उत्पादन खर्चात बचत : अठराव्या शतकात औद्योगिक क्रांतीमुळे जागतिक स्तरावर सकारात्मक बदल घडून आले या सकारात्मक बदलाचा परिणाम म्हणून आपल्या देशाने विदेशी शेतीचे प्रारूप व तंत्रज्ञान जसेच्या तसे स्वीकारले.या जनुकीय संस्कारीत तंत्रज्ञानाचा भर हा (High External Input -High output -High Risk) या गृहीतावर आधारलेला आहे त्यामुळे गरीब शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली पहावयास मिळते. त्यामुळे आपल्या देशात शेती विकासासाठी व शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी शाश्वत शेती प्रणित (बाह्य साधनाचा किमान वापर -पर्याप्त उत्पादन- किमान धोका)low External -Input Optimum Output -Low Risk) हे प्रारूप स्वीकारन्याची गरज निर्माण झाली आहे. कारण शाश्वत शेतीचा स्वीकार केल्यास शेती तंत्रज्ञानावर होणाऱ्या खर्चाचे प्रमाण कमी होऊन शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चाची बचत होईल व शेतकऱ्यांचे आर्थिक हित साधला जाऊ शकेल.

2. मातीचे स्वास्थ संरक्षण : शाश्वत शेती पद्धतीमध्ये शेतीची जैविक व आर्थिक स्थिरता राखली जाते. शाश्वत शेतीमुळे शेतीला अनुकूल असलेल्या योग्य प्रजातीचे संरक्षण होते , जमिनीचे स्वास्थ टिकून राहते व मातीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवण्यासाठी पोषक वातावरण तयार केले जाते. मातीत अनेक प्रकारचे सूक्ष्मजीव आढळतात हे सूक्ष्मजीव कचरा, पालापाचोळा, विष्ठा या सर्व घटकांचे मातीत रूपांतर करीत असतात आणि त्यामुळे मातीचे स्वास्थ संरक्षण होते व वाढत जाणारे मृदा प्रदूषण शाश्वत शेतीमुळे कमी केल्या जाऊ शकते.

3. विषमुक्त अन्नाची शाश्वती : रासायनिक शेतीचा विचार केल्यास या पद्धतीमध्ये हानिकारक कीटकनाशके व रासायनिक खताचा अधिक वापर केला जातो. त्यामुळे मानवी आरोग्यावर त्याचे हानिकारक परिणाम होत आहे.मात्र शाश्वत शेतीमध्ये हानिकारक कीटकनाशके व रासायनिक खते टाळली जाते. पशुधनाच्या शेणखताचे काळजीपूर्वक योग्य व्यवस्थापन केले जाते. पिकावर पडणाऱ्या किडीच्या रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी नैसर्गिक घटकांवर अधिक भर दिला जातो त्यामुळे शाश्वत शेती ही मानवी समुदायाला सार्वजनिक आरोग्याची सुरक्षा देऊन विषमुक्त अन्नाची शाश्वती देऊ शकते.

4. पर्यावरणाचा समतोल राखणे : कृषी कार्यादरम्यान कृषी ज्वलंनातून निघणारा धूर हा पर्यावरणाला प्रदूषित करतो. शाश्वत शेतीमध्ये कीटकनाशक औषधांचा कमी वापर केला जातो.शेतीतील पालापाचोळ्याचे नैसर्गिक

प्रक्रियेद्वारे कुजविल्या जाते. रासायनिक कीटकनाशक व खताएवजी सेंद्रिय खते, गांडूळ खते व शेणखतावर अधिक भर दिला जातो ज्यामुळे पर्यावरणाचे प्रदूषणापासून संरक्षण केल्या जाते त्या कारणाने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शाश्वत शेतीची आवश्यकता आहे.

5. उत्पादन क्षमतेत वाढ : शाश्वत शेती पद्धतीमध्ये शेणखत, गोबर गॅस पासून तयार केलेले कंपोस्ट खत, विविध पशुधनाची विस्टा,पालापाचोळा, उसाचे अवशेष व इतर पिकांच्या अवशेशाचा वापर करून जमिनीला पोषक वातावरण तयार केले जाते त्यामुळे जमिनीची उत्पादकता व उत्पादन वाढवले जाते.. अर्थातच पिकांच्या गुणवत्तेत सातत्य टिकून ठेवण्यासाठी शाश्वत शेती पद्धतीचा स्वीकार करणे आवश्यक झाले आहे.

6. अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी :- सध्याच्या वर्तमान परिस्थितीमध्ये आपल्या देशात ज्या प्रमाणात लोकसंख्या वाढत आहे त्या तुलनेत कृषी लागवडीखालील जमिनीचे प्रमाण हे कमी कमी होत चालले आहे.या परिस्थितीचा अभ्यास करूनच अनेक आंतरराष्ट्रीय संस्था कडून भविष्यात लोकसंख्या जास्त आणि अन्नधान्याचे उत्पादन कमी अशी उलट परिस्थिती निर्माण होण्याचे संकेत वर्तवण्यात आले आहे. त्यामुळे भविष्यातील वाढत्या लोकसंख्येच्या अन्नधान्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी शाश्वत शेती हे एक उत्तम उपाय ठरू शकते म्हणून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे गरजेचे आहे.

7. आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी :- आंतरराष्ट्रीय स्तरावर बऱ्याच देशानी

रासायनिक पदार्थाचे प्रमाण जास्त असलेल्या पिकांवर प्रतिबंध लावले आहे. परंतु युरोप, अमेरिका, चीन इत्यादी विकसित देशाकडून शाश्वत शेतीने तयार केलेल्या पिकांना जागतिक स्तरावर मागणी वाढत आहे.कारण शाश्वत शेतीने तयार केलेल्या पिकांमध्ये हानिकारक रसायनाचे प्रमाण कमी असते आणि ते गुणवत्तापूर्ण व टिकाऊ असल्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर शाश्वत शेतीच्या पिकांना चांगली मागणी निर्माण होत असल्याचे दिसत आहे.म्हणूनच शाश्वत शेतीच्या पिकांना भविष्यात एक चांगली आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध होण्याचे संकेत वर्तवण्यात आले आहे.

निष्कर्ष : भारतीय कृषी क्षेत्रातील वर्तमान परिस्थितीचे अवलोकन केल्यास भारतीय शेती क्षेत्र हे पर्यावरणीयदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या धोक्यात आले आहे. गेल्या काही वर्षात रासायनिक कीटकनाशकाचा सतत आणि बेसुमार वापरामुळे कीटकनाशकांचे अंश हे फळे, भाजीपाला व अन्नधान्यामध्ये दिसू लागले आहेत ज्याचा परिणाम हा मानवी आरोग्यावर झाल्याने कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याची बाब काही सर्वेक्षणानंतर पुढे आली आहे.अर्थातच रासायनिक पद्धतीचा अधिकतम वापर झाल्यामुळे जमिनीच्या गुणवत्तेत ऱ्हास , नैसर्गिक घटकांच्या संख्येत घट, मृदेतील प्रदूषणात वाढ , पर्यावरणात असंतुलन, शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ अशा अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. ह्या समस्यामुळे शेतीची नापिकी वाढली असून शेतकऱ्यांचे उत्पादन कमी व खर्च जास्त अशी दयनीय अवस्था झाल्याने शेतकरी वर्ग कर्जाच्या जाळीत अडकत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दृष्टिकोनातून सक्षम करण्यासाठी शास्वत शेतीचा अवलंब करणे आवश्यक झाले आहे. कारण शाश्वत शेतीमध्ये कृषी व्यवसायातील पारंपारिक संसाधनाचा व पशुधनाचा पूर्ण क्षमतेने वापर केला जातो, शेतीतील निती मूल्यांचे संवर्धन केल्या जाते, पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धनाला वाव दिला जातो,मृदा स्वास्थचे संरक्षण केल्या जाते,मानवाचे शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी करून पिकांचे उत्पादन केले जाते. असे अनेक फायदे शाश्वत शेतीच्या माध्यमातून प्राप्त होऊ शकते. त्यामुळे आपल्या देशाला शेतीविषयक धोरणात अमुलाग्र स्वरूपाचे बदल करण्यासाठी आणि शेती क्षेत्राचा विकास करण्यासाठी शास्वत शेतीचा स्वीकार करून त्याला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे.

संदर्भसूची :

1. शाश्वत शेतीच्या दिशेने, सुरेश तलाशिलकर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन.

2. संकल्पना शाश्वत शेतीची, डॉ. दत्ता देशकर, जलसंवाद प्रकाशन.
3. समृद्धीसाठी,सेंद्रिय शेती दिलीप देशमुख, गोडवा कृषी प्रकाशन, पुणे.
4. भारतीय अर्थव्यवस्था दत्त यम सुंदरम एस चंद अँड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड,नई दिल्ली.
5. कृषी शास्त्र आणि कृषी विकास, रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन, चौथी आवृत्ती.
6. कुरुक्षेत्र योजना,सप्टेंबर 2015.
7. कुरुक्षेत्र योजना, मार्च 2016.
8. www.wikipidiya.org.in
9. www.Krishimaharashtra.gov. in

मानवतेच्या सुखाची तळमळ : एक हरिपाठ

प्रा. डॉ. विनोद उत्तमराव भालेराव.

सहयोगी प्राध्यापक मराठी विभागप्रमुख बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय,मोहपा.

त. कळमेश्वर.जि.नागपूर ४४१५०२

Email: drvbhalerao78@gmail.com Mobile: 9767657660

प्रस्तावना :—

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहून सर्व समाजास उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले. अमृतानुभव लिहून जाणत्या लोकांना आत्मानुभावाचा प्रत्यय आणून दिला ज्ञानेश्वर हे वारकरी पंथात माऊली म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांच्या कीर्तनात 'रुप पाहता लोचनी'या अभंगापासून निरुपणास प्रारंभ होतो. ज्ञानेश्वरांचे 'हरिपाठांचे अभंग' वारकरी संप्रदायात सद्यप्रमाणे म्हटले जातात. वारकरी लोकांना या हरिपाठाच्या अभंगाचे फारच महत्त्व असल्याने हे त्यांच्या नित्यपठणात व चितंनात असतात. श्री. संत ज्ञानदेवांनी जगाच्या कल्याणासाठी सगुन भगवत्भक्तिचा मार्ग दाखविण्याकरिता हरिपाठाची रचना केलेली आहे. संसार किंवा प्रपंच हा असा आहे. संसारात अनेक प्रकारची दु:खे आहेत, क्लेष आहेत. या दु:ख किंवा क्लेषापासून मुक्त होण्यासाठी प्रत्येकच जीव धडपडत असतो. पण त्याला योग्य असा मार्ग सापडत नाही. त्यामुळे तो संसारात गटांगळया खातो. अशा या मुढ जनांच्या उध्दारासाठी संत ज्ञानेश्वरांनी, हरिपाठाच्या अभंगातून सरळ आणि सोपा मार्ग सांगितला आहे. भावसंसारातून तरुन जाण्यासाठी हा योग्य मार्ग होय. अशाच हरिजपाचे किंवा नामस्मरणाचे महात्म्य पुढे पाहू या.

नामाचा महिमा :—

प्रारंभीच संत ज्ञानेश्वर म्हणतात

''देवाचिया व्दारी उभा क्षणभरी! तेणे मुक्ती चारी साधियेल्या ''

हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा! पुण्याची गणना कोण करी'' १

असे म्हणून देवाचा संबंध नामाशी जोडलेला आहे. नामाचा संबंध आला की, रुपाचा संबंध हा येतोच, अशा नामरुपयुक्त स्वरुपाला सगुन म्हटलेले आहे. देहधारी मनुष्याला अव्यक्ताची उपासना करण्यापेक्षा सगुनाची उपासना करणे सुलभ जाते. आणि म्हणूनच सर्वसामान्य भोळया भाविकांना सगुण भक्तिचा नाममहिमा श्री ज्ञानदेवांनी हरिपाठातून सांगितला आहे.

श्रीहरीची प्राप्ती कशाने होते? हदयस्थ असणाऱ्या हरीशी एकरुपता कशाने साधते. या प्रश्नाचे साधे, सोपे व सरळ उत्तर ज्ञानदेवाच्या हरिपाठात आलेले आहे.''हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी''२ हेच एक भागवत धर्मीय तत्त्वज्ञानाचे सार आहे. प्रत्येक अभंगानंतर हेच पालूपद म्हणण्याचा प्रघात असल्याने हरिपाठाचे सार हेच मानावे लागते. श्रीहरीच्या नामाचा पाठ नित्य करीत राहिल्याने श्रीहरीची प्राप्ती होते हा या अभंगाचा सारांश आहे. आत्मप्रचिती, तत्त्वज्ञान, बोध, श्रीहरीचे सगुन—निर्गुणरुप, अव्दैत—यांचा स्वच्छ उलगडा या अभंगातून आहे. यज्ञयोग, तीर्थयात्रा, जपतपादी कष्टसाधने, कर्मकांड यांच्यापेक्षा प्रपंचात राहूनही. नित्य हरि स्मरणात रंगणे याहून दुसरा मोक्ष साधूसंतांना वाटत नाही. नामस्मरणाने हरिचिंतनाने मृत्युलोकालाच वैकुंठाचे महत्त्व प्राप्त होते. सारे शरीरच ब्रम्हरुप होऊन जाते. 'याचि देही याचि डोळा' नामस्मरणाने मुक्तीचा सोहळा अनुभवास येतो. नाम व ते घेणारा भक्त यांच्यात अभेद असल्याचा प्रत्येय येतो. श्रीगुरुच्या मुखातून आलेल्या मार्गाने नामस्मरणात तल्लील व्हावे, श्रीहरीला प्रेमाने वश करावे, दया क्षमा—क्षमा शांती यांच्या आसऱ्याने संत्सगती धरावी, नामामृतापुढे इतर सारे सोडून द्यावे, असा मोठा स्वानुभावी ठेवा ज्ञानदेवाच्या हरिपाठात असल्याने वारकऱ्याच्या दृष्टीने फार महत्त्व आलेले आहे. 'साधूचे सांगाती तरणोपाय, सर्वाघटी पूर्ण एक हरि नांदे, प्रपंच निवाले साधूसंगे, भावबळे आकळे येऱ्हवी नाकळे! करतळी आवळे तैसा हरी, काळवेळ नाम उच्चारिता नाही, नामापरते तत्त्व नाही रे अन्यथा अशी अनेक विचारमौक्तिके हरिपाठाच्या अभंगात असल्याने त्यांचे अनुभूतिसौदंर्य नित्यं चिंतनाने दुणावत राहते.

श्री भागवत भगवत्नामाचा महिमा वर्णन करतांना श्री ज्ञानदेव एक दृष्टांत देतात. ज्या प्रमाणे गवतास अग्निचा स्पर्श झाला म्हणजे गवत अग्निरुप होते. त्या प्रमाणे नाम हे साधकास हरिरुप बनविते. हरीच्या नामाच्या उच्चाराने भूतबाधा होत नाही. ज्ञानदेव म्हणतात, जो नित्यनेमाने हरिपाठ करतो भगवत् नामस्मरणात गुंग असतो. त्याला कळीकाळही स्पर्श करीत नाही. श्री. भगवत्नाम हे सार आहे आणि प्रपंच असार आहे. या नाशिवंत प्रपंचाचा विसर पाडण्यासाठी एकमेव साधन म्हणजे परमेश्वराचे नामस्मरण होय. भगवान व्यासांनी परमेश्वर प्राप्तीकरिता नामस्मरण ही गुप्त खुणगाठ पांडवांना सागितली आणि पांडवांनी सुध्दा दृढ विश्वासाने वागून भगवान श्रीकृष्णाला आपल्या घरचा करुन ठेवले.

नामस्मरणाचा महिमा सर्वच धर्मग्रंथानी म्हणजेच चार वेद, सहा शस्त्रे, आठ पुराणे यांनी वर्णन केलेला आहे. प्रपंचातून मुक्त होण्यासाठी प्रत्येकाची धावपळ असते. परंतु त्यासाठी योग्य मार्गाची निवड करणे आवश्यक असते. म्हणूनच ज्ञानदेवांनी हरिपाठातून नामस्मरणाचा महिमा जनजीवनाच्या कल्यानासाठी वर्णन केलेला आहे. नामस्मरणाचा महिमा पुढे वर्णन करतांना ज्ञानदेव म्हणतात. भगवान शंकर या रामाला आपला आत्मा मानतात. त्या रामकृष्णाचे नाव प्रत्येकाने आपल्या मुखात आणि हृदयात त्यांच्याविषयी श्रध्दा असू द्यावी नामस्मरनाच्या साधनाने श्रोताचे बंधन बांघत नाही हे एक तत्त्व माणसाला साध्य होते. योग्यांना जी समाधी प्राप्त होते व तिचा ते आनंद घेतात त्याच प्रमाणे वैष्णवांना ती गोडी नामामृतातून मिळते.नामस्मरण हे अत्यंत सुलभ असे साधन आहे. पण ते यथार्थतेने जाणणारा असला पाहिजे.

श्री. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, नारायणाच्या नामस्मरणाने आत्मरुप मानधनाची प्राप्ती होते. नामस्मरणाने प्रपंचाची भाषाच बंद होते तसेच हरिनामाच्या परंपरेने साधकाचे कुळ शुध्द होण्यास मदत होते. भ्रमर ज्या प्रमाणे कमलकलिकेवर तुटून पडतात त्या प्रमाणे हरिभक्त हरीच्या नामस्मरणात दंग होऊन स्वत:चे आत्मकल्यान करुन घेतात. दुखा:ला कारणीभूत ठरणाऱ्या पापकर्माचा नाश करुन सुखाची प्राप्ती करुन देण्याकरिता नामस्मरणादी हरिजपाचा सोपा उपदेश जीवनाला हरिपाठातून केला आहे. ''नित्य सत्य मित हरिपाठी ज्यासी! कठिकाळ त्यासी नातळती''३

श्री. ज्ञानदेव हरिपाठात वर्णन करतात की, जो नित्यनेमाने अंत करणातून हरिणाचे स्मरण करतो त्यालाकळीकाळही वाकडया नजरेने पाहत नाही. तसेच आपल्या मुखाने रामकृष्ण नामाचा जप केल्यास पुण्याचे ढीगच्या ढीग जमा होऊन त्यांच्याच पुण्याईने कितीही पापे केली असली तरी ती नष्ट होऊन जातात. भगवान शिव देखील या नामजपाला पारखे नाहित तर ते सुध्दा हरी मंत्राचाच जप करतात. म्हणून जे कोणी वाणीने हरिपाठाचा उच्चार करीत असतील, त्यांना खात्रीने मोक्ष प्राप्ती होते अशी ग्वाही श्री.ज्ञानेश्वर माऊली हरिपाठातून व्यक्त करतात.

मनुष्याला जर मोक्ष हवा असेल तर त्याने सर्वप्रथम संतावर विश्वास ठेवावा व नंतर त्याच्या वचनावर संतांनी सांगितलेल्या मार्गाने जर आपण गेलो तर मोक्ष निश्चित समजावा नाम हे आवडीने व भक्तिभावाने घ्यायला हवे. अन्यथा वाचेने एक अणि मनाने दुसरेच असे सर्व घटाघटात राम भरला आहे. या विषयी विवेचन करतांना श्री. ज्ञानदेव म्हणतात.

''जप तप कर्म क्रिया नेम धर्म! सर्वाघटी राम भाव शुध्द''४ म्हणजे सर्वच वस्तुमानांत राम भरुन राहिला आहे. हा शुध्द भाव निर्माण करण्याकरिता जप, तप, कर्मे, क्रिया इ. चर्चा धार्मशास्त्रात करतात. या साधनाचा अवलंब केल्यास सर्वकाही श्रीहरीच आहे. असा भाव जागृत होतो.

संत्संगाचा महिमा:—

श्री. संत ज्ञानदेव म्हणतात, संतांच्या समागमामुळे ज्ञानाची प्राप्ती होते आणि या ज्ञानाने मनुष्य देहाभान विसरुन जातो. देहाभिमान विसरल्यामुळे देवाभिमान जागृत होतो. मनुष्याची जीवदशा पार मावळून जाते.हरिभक्त हा जेव्हा साधूच्या संगतीत येतो तेव्हा मोक्ष त्याच्या पायाशी उभा राहतो. हे भाग्य भगवत्भक्ताला संतांच्या कृपेनेच प्राप्त होत असते. संत कोणास म्हणावे या विषयी ज्ञानदेव सांगतात,''ज्यांना शब्दबोधाने आपण आत्मस्वरुप आहोत असे वाटते व ज्यांनी साधनेने त्याचा साक्षात अनुभव घेतला असे संत आणि त्यांनाच शरण गेल्याने ते जो आत्मतत्त्वाचा बोध करतात त्यामुळे साधकाचा देहाभिमान नष्ट होण्यास मदत होते''५ साधूंच्या ज्ञानाचा बोध झाल्याबरोबर आपले खरे स्वरुप आपल्याला कळून चुकते आणि विश्वाचे भान नाहिसे करुन परमात्माप्राप्ती फक्त साधुंच्या संगतीत घडून येऊ शकते.

संत समागमामुळे सगुन श्रीहरी हा आपला आत्माच होय असे कळून येते आणि मग त्याचेवरच आपले आत्मव्रत् प्रेम पडते. एवढेच नव्हे तर त्यांच्या नावावर प्रेम पडते अशारीतीने नामधारक भगवन्नामय होऊन नामाच्या व्दारे या परमेश्वराच्या ठिकाणी अखंड समरस होऊन राहतो. वाचेने हरिनाम स्मरण करणे हेच जीवनाचे शुध्द प्रेम स्वरुप आहे. भगवंताचे नाम हेच खरे प्रेम आहे आणि हे अमृत मिळविण्याकरिता संतसमागमाची आवश्यकता आहे. असे ज्ञानदेव हरिपाठातून विशद करतात. पुढे ज्ञानदेव सांगतात, एका नामस्मरणाने प्रल्हाद पूर्ण भगवंत स्वरुप झाला.कारण त्याला नारदासारखे सद्गुरु भेटले होते. उद्वाचा उध्दार श्रीकृष्णाच्या उपदेशाने झाला म्हणून संताचा महिमा अगाध आहे.

भावबळाने श्री हरीची प्राप्ती :—

''भावबळे आकळे येन्हवी नाकळे!
करतळी आवळे!तैसा हरि!!''[६]

म्हणजेच माणसाच्या अंत: करणात जर भाव नसेल तर तीर्थयात्रा, व्रतवैकल्य कामाचे नाही. त्याला भगवंताची प्राप्ती होणार नाही. ज्याप्रमाणे हातावर ठेवलेला आवळा आपल्याला स्पष्ट दिसतो श्री. ज्ञानदेव म्हणतात, जमिनीवरील पडलेला पाऱ्याचा थेंब उचलण्याचा कितीही प्रयत्न केला तरी ते अशक्य आहे. त्याचप्रमाणे शुध्द भावाशिवाय केलेल्या साधनांनी भगवंतांची प्राप्ती होणे कठीण आहे.

ज्याला भगवंत आपलासा करुन घ्यायचा असेल त्याने श्री. ज्ञानदेवाच्या सांगण्यानुसारच वागावे लागेल. तीर्थयात्रामध्ये हा कर्तृभाव म्हणजे मी चे शेपूट सोडून द्यावे लागेल आणि सर्व काही त्या भगवंतापित्यर्थ आणि त्याच्या आज्ञामुळेच चाललेला आहे असा भाव जर परमार्थात बाळगला तरच त्याचा योग्य उपयोग होईल संसाररुपी सागर तरुन जाण्यासाठी श्री. ज्ञानदेव म्हणतात, कर्तुत्त्व नसेल तर भोकर्तृत्वही नाही आणि भोगर्तृत्त्वही नसेल तर पुनर्जन्मही नाही.

परमेश्वराची प्राप्ती हे कर्माचे फळ आहे असा अनेकांचा समज आहे. पण ते खोटा आहे. कारण कर्म हे नाशिवंत आहे. म्हणून त्याचे फळही नाशिवंत राहणार.परमेश्वर तर नित्य आहे. म्हणून त्याच्या प्राप्तीचेही साधनही नित्यच असले पाहिजे. भगवंताशिवाय दुसरी कोणतीही नित्य वस्तू नाही. भक्तीत अहंकाराला मुळीच थारा नाही. ज्या ठिकाणी अहंकार आला. तेथे भगवंत राहत नाहीत. नामस्मरणाच्या प्रयत्नामध्ये साधन व साध्य एकच आहेत. इतर साधनेत मात्र साधन वेगळे व साध्य वेगळे अशी परिस्थिती असते. एकदंरीत श्रीहरीला प्राप्त करुन घ्यायचे असेल तर तो भावाच्या बंधनामुळेच प्राप्त होऊ शकते.

सारांश :—

अशा प्रकारे 'हरिपाठाच्या अभंगातून श्री. ज्ञानदेवांनी नामाचे महत्व विविध दृष्टांतांच्या माध्यमाने व उदाहरणाने पटवून दिले आहेत. श्री. ज्ञानदेवाचे 'हरिपाठ' अभंग माहित नाही असा म्हणणारा मानव महाराष्ट्रामध्ये एखादाच असेल, हरिपाठाची भाषा अत्यंत प्रासादिक आहे.सकळ जनांच्या उध्दारासाठी नामस्मरण सोपा व कोणत्याही, केव्हाही आचरता येणारा धर्म हरिपाठातून सांगितला आहे.

हरिपाठाची कीर्ती म्हणजेच हरिणामस्मरणाची कीर्ती संतांनी रचलेल्या हरिपाठाची कीर्ती जो कोणी आपल्या मुखाने गायील त्याचा देह हा परमपवित्र होईल आणि नामस्मरणाचे महात्म्य गातांना त्याला अनंत पुण्य प्राप्त होईल. त्यामुळे त्याचे अस्तित्त्व श्रीहरी स्वरुपच होईल. अर्थात हरिणाम स्मरण करणारा व हरिपाठाचे पाठ करणारा दोघेही अत्यंत निष्पाप होऊन भगवंताला अत्यंत प्रिय होतील असा भाव संत ज्ञानदेवांनी हरिपाठातून व्यक्त केला आहे. जेवढे अगाढ सामर्थ्य या हरिपाठामधील हरिनाम सामर्थ्यामध्ये आहे. तेवढेच सामर्थ्य आपल्याला इतर साधनामध्ये दिसणार नाही. याने सर्व कुळाचा उध्दार होईल व मोक्ष प्राप्त होईल हाच आशय हरिपाठातून ज्ञानदेवांनी व्यक्त केला आहे.

संदर्भ ग्रंथ सूची:—

१. कुलकर्णी, डॉ.मदन कुलकर्णी,डॉ.आरती (संपादक) 'हरिपाठाचे अभंग'साहित्य प्रसार केंद्र,नागपूर,२००१,पृ.क्र.४०.
२. ततैव. पृ.क्र.३५.
३. ततैव.पृ.क्र.३२.

४. ततैव.पृ.क्र.३७.
५. ततैव. पृ.क्र.४२.
६. तत्रैव.पृ.क्र.७०.
७. गोडबोले,म.शं.(संपादक) 'अमृतानुभव' प्रसाद प्रकाशन, पुणे २००१.
८. डॉ.कोत्तापल्ले,डॉ.भोसले.(संपादक) 'ज्ञानेश्वरांचे निवडक शंभर अभंग'मेहता पब्लिकेशन हाऊस,पुणे २००३.
९. कुलकर्णी,श्री.मा.(संपादक)'ज्ञानेश्वरी—अध्याय बारावा' सूवर्ण प्रकाशन,पुणे २००४
१०.चांगदेव पासष्टी,(संपादक)स्वामी नित्यबोधानंदतीर्थ,म.स.सा.आणि संस्कृती मंडळ.
११.

Concept and Types Of Digital Resources, What Are The Benefits Of Consortia Approach In Collection Development ?

Dr. Sarla P. Nimbhorkar
Librarian G. S. Gawande College, Umarkhed
M. No. 8830073934

Abstract :-
Sharing resources is nothing more than sharing library resources by certain participating libraries between them on the basis of the principle of cooperation. This is applicable when sharing documents, labor, services, space and equipment. This document mainly highlights what are you sharing resources? Why share resources? Forms, means and methods: definition, Objectives, needs, areas of cooperation and exchange of resources, components, requirements. Concept, advantages, criticism, barrier, steps to promote the exchange of resources through the network. Library Consortium and its types and functions. Advantages and disadvantages.

Keywords:-Digital resources.

Introduction :-

या भारत भुमीवर मानवी कल्याणासाठी आजपर्यंत तीन धम्मचक्र प्रवर्तन घडुन आले. पहिले धम्मचक्र प्रवर्तन भगवान गौतम बुध्दाने सारनाथ येथे भिक्षुंना उद्देशुन जो धम्म सांगितला हे होय, ज्यास उत्क्रांतीचा सिध्दांत ही म्हटल्या जाते. कलींगच्या युध्दातील भयंकर रक्तपात पाहुन द्रवलेल्या व्यथित झालेल्या मनाने सम्राट अशोकाने याच भारत भूमीवर दुसरे धम्मचक्र प्रवर्तल घडवुन आणले. हे धम्मचक्र प्रवर्तन म्हणजे मावी हृदय परिवर्तन होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धम्मचक्र प्रवर्तन हे तिसरे धम्मचक्र प्रवर्तन होय की ज्यामुळे लाखो जीवांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला. डॉ. आंबेडकर यांचे विचार आज सर्वस्पर्शी झाले आहेत. जगात त्यांच्या विचारांची कास धरुन या विचाराप्रमाणे जग बदलतांना दिसत आहे. कारण आंबेडकरांचे व्यक्तिमत्व सा-या जगाला ठाऊक आहे. त्यांनी मांडलेले विचार मग ते सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, ऐतिहासिक असो की राजकीय अशा कितीतरी पैलूंवरील विचार समाजाला व देशाला प्रगतिच्या दिशेने वाटचाल करायला प्रोत्साहीत आणि दिशादर्शक ठरले आहेत.

येथे विचार करण्याचा हा मुद्दा आहे की, डॉ आंबेडकरांना तिसरे धम्मचक्र प्रवर्तन करण्याची गरज कां भासली. याचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, वैचारीक दहशतीमुळे बुध्द काळात वर्णजातीच्या अमानवीय शिकवणुकीमुळे माणसा-माणसातील सामाजिक सुसंबंध संपुष्टात आले होते. वर्णजीतीची उच्चनिचतेची व भेदभावयुक्त शिकवणीमुळे एका वर्णाचा माणूस दुस-या वर्णाच्या माणसाच्या कार्यानुसार भेदभाव करुन, एक दुस-यांचा प्रचंड व्देष, तिरस्कार, मत्सर, असुया, क्रोध, प्रतिशोध करु लागला. उच्चवर्गीयांत प्रचंड अहंकार, वर्ण वर्चस्वाची भावना तर दुस-यात पोसलेली न्युनगंडता, उच्चवर्णीयांकडे सर्वच अधिकारांचे केंद्रिकरण, तर दुसरे अधिकारहीन, गूढवादाची प्रचंड पेरणी, अतार्किक कर्मकांडाचा सुळसुळाट, यज्ञातील पशु मानव हत्या व राजमान्यता, भेदभावात्मक अमानवीय बंधनामुळे माणासाठी माणसापासून समूळ झालेली ताटातुट, कुत्र्याचे मुके घेणारी आणि माणसास हाड! हाड ! करण्यात तयार झालेले विषाक्त मन , ही मनोवस्था आजही तशीच कार्यरत आहे. जणू काही माणसाचा जन्म त्यासाठीच झालेला आहे. या तिस-या धम्मक्रांतीचा किंवा प्रवर्तनाचा विचार करतांना बाबासाहेबांच्या जन्मापुर्वीच्या समाजाच्या विचार करणे फार आवश्यक बनुन जाते. तर यांच्या जन्मापुर्वीपासूनच भारतीय समाजव्यवस्था ही वर्णभेद, जातीभेद, उच्चनीचता यांनी व्यापलेली होती. स्वत:ला उच्चवर्णीय समजल्या जाणा-या समाजव्यवस्थेतील व्यक्ती या धर्मग्रंथांचा आधार घेऊन समाजातील इतर व्यक्तींना आपल्याहुन निच मानायचे. वेद, स्मृती, पुराणे इत्यादी धर्मग्रथांतून चातुर्वण्याचा जन्म झाला. या चातुर्वण्याचा विषवृक्षाला असंख्य उच्चनीय जातीची कडू फळे आली. या धर्मग्रथांत शूद्र, अतिशूद्र, चांडाळ, दास, अशी हीन जातीचा जन्म झाला. त्यांनाच तुच्छ लेखण्यात आले आणि अस्पृश्य मानले गेले. अस्पृश्य वर्गाला समाजातून निष्कासीत करण्यात आले. त्यांचे स्थान गावकुसाबाहेर होते. त्यांच्या वाटयाला हीन, ओंगळ, घाणेरडी, हलक्या प्रतीची कमी दर्जाची कामे आली. त्यांनी ती काम करण्यात जर काही कसूर केला, त्या नियमांचे उल्लंघन केले तर त्यासाठी कडक, कठोर शिक्ष ठरविल्या गेल्या.

अपमानाचे जीवन जगतांना अस्पृश्यवर्गाचे जीवन करपून गेले. अस्पृश्य मनुष्य हा इतर मनुष्याप्रमाणेच असून देखील त्याला माणूस म्हणन समजले जात नव्हते. तो माणूस असून त्याना माणुसकीचे हक्क नव्हते. माणसामाणसात भेद करुन त्यांना स्पृश्य समाजापासून इतक्या लांब ठेवण्यात आले की, त्याची सावली देखील सवर्णाच्या अंगावर पडता कामा नये, अस्पृश्यांना कुत्र्या, मांजरापेक्षाही नीच मानले गेले. इतका भयंकर एका वर्गाचा दुस-या वर्गावर अन्याय होत होता की, एकाप्रकारे ही माणुसकीची विटंबनाच होय. अस्पृश्यांना ना शान ना सम्मान केवळ त्यांच्या वाटयाला आली ती घृणा आणि अपमान वरील तिन्ही वर्गाची चाकरी करणे, गुलामीची कामे करणे, स्वत: घाम गाळुन, मेहनत करुन उच्चवर्णीयांना सुखसोयी प्रदान करणे आणि स्वत: अन्नाच्या तुकडयाकरीता आशेने त्यांच्याकडे पाहत बसणे, त्यांनी वाढले काय किंवा न वाढले काय तरी कष्ट करीतच राहिले पाहिजे. मरेपर्यंत त्यांची त्यातुन सुटका होत नसे, अशाप्रकारे मरणयातना सहन करुन तो जगत होता किंबहुना, जिवंतपणीच तो नरकयातना भोगत होता. अशा समाज व्यवस्थेत डॉ. बाबासहेब आंबेडकरांचा जन्म झाला. त्यांनी त्यांच्या जन्मापासुनच अपमानाचे चटके सोसले. संपुर्ण समाजाची दैनावस्था, गुलामीचे जीवन, सवर्णांचे अन्याय आणि अत्याचार यांचे ज्वलंत चित्र त्यांच्या समोर होते. स्वत: त्याचा अनुभव घेत घेतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मोठे झाले. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर हयांचे घराणे महार जातीचे. महार जात ही हिंदु समाजातील अस्पृश्य, अदृश्य नी ज्यांच्याजवळ जाऊ नये हया अर्थ

अतंतत्व मानला जाई. हया अस्पृश्य समाजाची लोकसंख्या सहा कोटींवर असावी. म्हणजे हिंदु समाजातील प्रत्येक पाचवा घटक, पुरुष, स्त्री व मुले अस्पृश्य मानण्यात येई.

भारताच्या विविध भागात कोणी त्यांना बहिष्कृत, अस्पृश्य, परिया किंवा अतिशुद्र म्हणत, तर कोणी त्यांनी जीवन शापून कलंकित केले होते. सवर्ण हिंदूंना कुत्रा, मांजर, गाय हया पाळीव जनावरांच्या स्पर्शाचा विटाळ वाटत नसे. स्पृश्य हिंदू मुंग्यांना साखर अर्पित, परंतु हया स्वधर्मीयांचा स्पर्श ते अपवित्र मानित. त्यांना त्यांच्या सवालीचाही विटाळ होई. त्यांची वाणी कानावर पडली तर त्यांना अशुभ वाटे. सार्वजनिक पानवठयावर त्यांना पाणी भरण्यास प्रतिबंध असे. त्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश नसे. देवळात देवदर्शनास त्यांना बंदी असे. वस्तुस्थिती अशी होती की, जातीभेदाच्या उच्चनीचतादर्शक शिडीच्या खालच्या पाय-यांवर अपमानित जीवन कंठीत असणारे न्हावी नी धोबी हे सुध्दा महार मांगांचा विटळ मानित असत.

अस्पृश्यतेसंबंधी विचार करतांना असे म्हणता येईल की, डॉ. आंबेडकरांनी हिंदू-धर्मग्रंथांचा जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था यांचा अभ्यास करुन हिंदुधर्म अस्पृश्यांना कसा कमी लेखतो ते त्यांनी स्पष्ट केले आणि अस्पृश्यतेविषयी, हिंदूधर्माविरुध्द लढा देण्यास सुरुवात केली. अस्पृश्य वर्गाला वर्णव्यवस्थेतूनच मुक्त करुन त्याला समता, बंधुता, स्वातंत्र्य, न्याय यांच्या मोकळया वातावरणात आणले पाहिजे यासाठी त्यांनी संघर्ष करण्यास सुरुवात केली. या संघर्षाची पहिली सुरुवात त्यांनी महाडपासून केली. महाड येथील तळावर हरिजनांना पाणी भरु दिले पाहिजे. यासाठी हा सत्याग्रह होता. हा सत्याग्रह पाण्यासाठी नव्हता तर ख-या अर्थाने तो सामाजिक समतेसाठी होता असे म्हणावे लागेल. याच वेळी त्यांनी "मनस्मृती" या ग्रंथाचेही दहन करुन हिंदू समाजाला हादरा दिला. मनुस्मृती जाळण्याचे मुख्य कारण म्हणजे मनुस्मृतीने जातीव्यवस्थेचा पुरस्कार करुन अस्पृश्यांना हीन लेखले होते.

त्या काळात अस्पृश्यांना हिंदूच्या देवळात प्रवेश मिळत नव्हता. हिंदुच्या मंदीरात प्रवेश मिळावा म्हणुन त्यांनी नाशीक येथे सत्याग्रह सुरु केला. नाशीक येथेच सत्याग्रह सुरु करण्याचे कारण हिंदूंच्या पूज्य धर्मस्थानापैकी नाशिक हे महत्तवाचे स्थान होते हे होय व तेथील रामाच्या मंदीरात जर प्रवेश मिळाला तर हिंदुच्या मनात आणि विचारात परिवर्तन होईल असे आंबेडकर यांना वाटत होते. यावेळी डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, मंदीरात प्रवेश केल्यामुळे आमचे प्रश्न सुटणार नाहीत. आमच्या प्रश्नाचे स्वरुप व्यापक आहे. त्याचे स्वरुप राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि शैक्षणिक अशा स्वरुपाचे आहे. महिदरात प्रवेश करण्याचा उद्देश एवढाच की हिंदु समाज माणसाला माणूस म्हणुन जगु देण्यास तयार आहे किंवा नाही याची परीक्षा पाहण्याचा होता. अस्पृश्यवर्गीयांना मोक्ष मिळावा म्हणुन देवदेव करीत राहण्यासाठी आंबेडकरांना मंदीर प्रवेश नको होता. अस्पृश्यांना मानवी हक्काची जाणीव व्हावी व त्यासाठी झगडण्याची इच्छा आणि चिकाटी निर्माण व्हावी म्हणून त्यांनी मंदीर प्रवेशाचा झगडा केला होता. परंतु एकाएकी त्यांनी आपल्या धोरणात बदल केला. त्यांनी असल्या चळवळीचे चक्र निराळया दिशेकडे फिरविले. आपल्या लोकांनी राजकीय हक्कांकडेच अधिक लक्ष द्यावे, असे ते आग्रहाने प्रतिपादू लागले. कारण धार्मिक हक्क आपल्याला पोटाची खळगी भरण्यासाठी काहीही मदत करीत नाही. जातीय भेदामुळे हिंदु एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेस मुकले आहेत, देशभक्तिच्या नी ऐक्याच्या भावनेस मुकले आहेत. या सत्याग्रहानंतर मुखेड, पुणे व विदर्भातील अमरावती इत्यादी अनेक ठिकाणी मंदीर प्रवेशासाठी सत्याग्रह करण्यात आले. परंतु या सत्याग्रहाचा परिणाम उलट झाला. हिंदु समाजाने याच्या उलट प्रतिक्रिया व्यक्त केली. अस्पृश्यता दुर करण्याऐवजी उलट अधिक पक्की होऊ लागली. परिणामत: डॉ. आंबेडकरांना राजकीय तसेच परिवर्तनाच्या मार्गाचा अवलंब करावा लागला.

अस्पृश्ता नष्ट करुन व स्पृश्यास्पृश्य भेद संपवून भंगलेला व दुर्बल झालेला हिंदू समाज अभंग, अखंड, संघटित व सामर्थ्यवान व्हावा, असाच त्यांच्या सत्याग्रहाचा, हिंदू समाजाच्या व आपल्या राष्ट्राच्या हिताचा मुळ उद्देश होता. म्हणूनच काही जागृत स्पृश्य विचारवंत देखील त्यांच्या सत्याग्रहाला मनापासून सक्रिय सहाकार्य करीत राहीले होते. डॉ. आंबेडकर यांनी आपल्या अस्पृश्योध्दाराच्या जीवित कार्यासंबंधीची सत्याग्रहरुपी पहिली कृती राष्ट्रहिताचीच होती, हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट होते. तसेच डॉ. आंबेडकर आपल्या राष्ट्राच्या अखंडतेची सुरक्षिततेची आणि स्वातंत्र्याची निरंतर काळजी करणारे दुरदृष्टिचे जागरुक राष्ट्रभक्त नेता होते. [1]

व्यक्तिविकासासंदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात की, व्यक्तिविकासासाठी तीन गोष्टींची आवश्यकता असते, त्या म्हणजे सहानुभूति, समता आणि स्वातंत्र्य हिंदू धर्मात या तीनपैकी एकतरी बाब तुमच्याकरीता उपलब्ध आहे काय? माणूस केवळ भाकरीवर जगत नाही, त्याला श्रध्देचीही जोड हवीच, त्यांना चांगले ठाऊक होते की, हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक जात म्हणते एकएक मजलाच; पण त्या मनो-यात शिडी नाही. म्हणुन एक मजल्यावरुन दुस-या मजल्यावर जाण्यासाठी मार्ग नाही. ज्या मजन्यात त्यांनी जन्म घ्यावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो त्याला खालच्य मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्राज्ञा नाही आणि या सर्व गोष्टींच्या

मागे धर्म आहे हे त्यांना निश्चित माहीत होते. म्हणून त्यांना या संदर्भात काहीतरी करावे असे सतत वाटत होते. या संदर्भात बाबासाहेब म्हणत, "धर्माची आवश्यकता गरीबांनाच आहे. पीडित लोकांना धर्माची आवश्यकता आहे. गरीब मनुष्य जगतो तो आशेवर. जीवनाचे मुळ आशेत आहे. ही अशाच नष्ट झाली तर जीवन कसे होईल? धर्म आशावादी बनवतो व संदेश देतो."[2] "ज्या धर्मात व्यक्तिला प्राधान्य नाही, तो धर्म मला स्वत:ला मान्य नाही. व्यक्तिच्या जीवनाला समाजाची जशी आवश्यकता असली तरी समाजाची धारणा हे धर्माचे अंतिम धेय्य होऊ शकत नाही. व्यक्तिचा विकास हेच धर्माचे खरे धेय्य आहे. धर्माचे प्रयोजन हे या विश्वाची पुनर्रचना करणे हे आहे."[3] तसेच पुढे या संदर्भात आंबेडकर आपले मत व्यक्त करतांना म्हणतात की, "ज्या देशातील लोक मानसिक संस्कारापेक्षा भाकरीला जास्त महत्व देतात, त्या देशाशी मी संबंध ठेवणार नाही.[4] पुढे बाबासाहेब जात निर्मुलनाच्या कामी, धर्मांतर कसे कामी पडु शकते, यावर भाष्य करतात व म्हणतात, "जात ही भावना आहे, मनाची अवस्था आहे; म्हणून तिचे निर्मुलन हे बाहय अडथळयाचे निर्मुलन नव्हे. जात पाळतात म्हणून लोक दोषी आहेत असे नाही. चूक काय असेल तर तो त्यांचा धर्म.[5] " जातींची भावना त्यांच्या मनावर बिंबविणारा धर्म. त्यांचे म्हणणे होते," गो-या लोकांच्या हातून निग्रो लोकांचा जितका छळ होतो, त्याच्या शतपट स्पृश्यांच्या हातून अस्पृश्यांचा होतो. फरक एवढाच की, निग्रो गुलामांचा छळ शारीरीक असतो आणि अस्पृश्यांचा मानसिक असतो. गो-या लोकांनी निग्रो लोकांचे देह मारले असले तर स्पृश्यांनी अस्पृश्यांची मने मारली आहेत आणि देह मारण्यापेक्षा मने मारणे जास्त भयंकर असे कोणीही म्हणेल.[6]

परंतु येथील हिंदु धर्माने अस्पृश्य समाजाचे माणूसपण नाकारले, असा धर्म पितृधर्म या नात्याने त्यांच्यावर लादलेला होता. या धर्मात काही चांगले काही वाईट आहे. कुणी असे म्हणतील की सर्वच धर्मात तसे काही चांगले काही वाईट असते ; परंतु इतर कुठल्याच धर्मात अस्पृश्यतेसाठी अमानवीय परंपरा , जातीयतेसारखी भयानक विषमता नाही.

डॉ. आंबेडकरांनी लहानपणापासूनच अनुभवले होते की, हिंदु धर्माच्या आधारे हिंदु समाज हा स्पृश्य वर्ग अशा दोन वर्गात विभागलेला आहे. स्पृश्य वर्ग अस्पृश्य वर्गाशी अस्पृश्यतेचे पालन करुन अस्पृश्य वर्गावर अनेक प्रकारे अन्याय व अत्याचार करीत असल्याचे त्यांनी पाहिते होते आणि पाहतही होते. म्हणून उच्च विद्याविभूषित व ज्ञानसंपन्न डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता नष्ट करण्याच्या उद्देशाने स्पृश्यवर्गाशी लढण्याचा निश्चय केला आणि त्यासाठी त्यांनी पिण्याच्या पाण्यासाठी आणि मंदीर प्रवेशासाठी सत्याग्रह सुरु केला. पण त्यांना सत्याग्रहापासून अस्पृश्यता नष्ट करण्यात यश मिळाले नाही.

डॉ. आंबेडकरांच्या मनात धर्मांतराचा विचार येऊ लागला कारण हिंदु समाज खिस्ती धर्माच्या व मुसलमान धर्माच्या लोकांना सार्वजनिक ठिकाणी पाणी भरु देतो व मंदिरातही येऊ देतो, असे जर असेल तर अस्पृश्यांनीही धर्मांतर केले तर अस्पृश्यता आपोआप नष्ट होईल आणि त्यांनाही हिंदू समाज समानतेने वागवील. अशा विचारानेच त्यांनी १३ ऑक्टोंबर १९३५ रोजी येवले येथे अस्पृश्यांच्या सभेत "अस्पृश्यांनी धर्मांतर करावे" अशी जाहीर घोषणा केली. त्यानंतर त्यांनी मुंबई येथे ३० मे १९३६ रोजी अस्पृश्यांच्या जाहीर सभेत धर्मांतराचे महत्तव पटवून देणारे अत्यांत महत्वपूर्ण भाषण करुन अस्पृश्यांना धर्मांतर करण्यास प्रवृत्त केले.

धर्मांतराची आवश्यक्ता प्रतिपादन करतांना धर्मांतराच्या परिणामांचे दलितांच्या वर्तमानावर आणि भविष्यावर होणा-या परिणामांचे बाबासाहेबांनी सखोल चिंतन केले होते. त्यांनी आपल्या भाषणात सांगितलेल्या धर्मांतरांच्या ऐहिक कारणांमध्ये ते म्हणतात की, तुमच्यावर होत असलेल्या जुलमाच्या कहाणींची तुम्हाला आठवण करुन देणे मला आवश्यक वाटते. सरकारी शाळेत मुळे घालण्याचा हक्क सांगीतल्यामुळे, विहीरीवर पाणी भरण्याचा हक्क सांगितल्यामुळे वरात घोडयावरुन नेण्याचा हक्क सांगीतल्यामुळे, स्पृश्य हिंदुंनी मारहाण केल्याची उदाहरणे नेहमीच घडत असल्याकारणाने ती सर्वांच्या डोळयापुढे नेहमी असतात. परंतु मारहाण करण्याची दुसरी अशी अनेक कारणे आहेत की ज्याचा उल्लेख केला असता हिंदुस्तानच्या बाहेरील लोकांना तरी त्यांचा विस्मय वाटेल. उंची पोशाख घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. जमीन खरेदी केल्यामुळे जाळपोळ केल्याचे उदाहरण देता येईल. जाणव घातल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. मेली गुरे न ओढल्यामुळे व मेलेल्या गुरांचे मांस न खाल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण देता येईल. पायात बुट व मोजे घालुन गावातुन गेल्यामुळे, भेटलेल्या स्पृश्य हिंदुस जोहार न घातल्यामुळे, शौचाला जातांना तांब्यात पाणी नेल्यामुळे छळ झाल्याचे उदाहरण देता येईल. पंचाच्या पंक्तीत चपाती वाढल्यामुळे मारहाण केल्याचे उदाहरण नुकतेच घडले आहे. वरील प्रकारचे जोरजुलम झाल्याची, तुम्हाला अमानुष त-हेने वागविल्याची अनेक उदाहरणे तुमच्या ऐकिवात असतील व तुमच्यापैकी काहींना तर त्यचा प्रत्यक्ष अनुभवही असेल. जेथे मारहाण करण्यासारखे नसेल तेथे बहिष्काराच्या शस्त्राचा तुमच्या विरुध्द कसा उपयोग करण्यात येतो हेही तुम्हाला अवगत आहेच.

रानातुन गुरांना जाऊ द्यावयाचे नाही. माणसांना गावात येऊ द्यायचे नाही. मोजमजुरी मिळु द्यावयाची नाही वगैरे सर्व प्रकाराची बंदी करुन सस्पृश्य हिंदू लोकांनी तुमच्या लोकांस जेरीस आणल्याची आठवण तुमच्यापैकी पुष्कळांना असेल. परंतु असे का घडते, याच्या मुळाशी काय आहे, ही गोष्ट माझ्या मते अत्यंत आवश्यक आहे.[7] जनावरांना जिथे पाणी पिण्याचा अधिकार आहे त्या पाणवठ्यावर माणसांना पाणी पिण्याचा अधिकार नाही किंवा जिथे किडया मुंग्यांना साखर दिली जाते तिथे माणसांना एक एका दाण्याकरीता तडफडावे लागते, जिथे पशुचा स्पर्श झाला तर चालु शकतो पण माणसांचा स्पर्श झाला असता काही अमंगल झाल्याची भावना निर्माण होते. तेव्हा या शत्रुत्वाने भरलेल्या वातावरणात राहून तुमचा काय फायदा होणार आहे? असा सवाल डॉ. आंबेडकर विचारतात आणि ते म्हणतात की सहानुभूती हवी असेल तर धर्मांतर करा!

डॉ. आंबेडकर म्हणतात की, अस्पृश्यांकडे पाहण्याची दृष्टी आणि रक्तपितीने भरलेल्या माणसाबद्दल लोकांच्या मनात किळस जरी असला तरी त्यांच्या बद्दल सहानुभुती तरी असते! पण तुमच्याविरुध्द सहानुभुती तर नसतेच परंतु किळस मात्र असते. रक्तपितीने भरलेल्या माणसापेक्षा देखील तुमची स्थिती हीन आहे. अजूनही खेडेगावात एखादा स्पृश्य माणूस उपास सोडीत असतांना जर महाराचा शब्द कानावीर पडता तर तो अन्नग्रहण करीत नाही. एवढा कलंक तुमच्या शरीराला, एवढा कलंक तुमच्या शब्दाला आहे. "अस्पृश्यता हिंदू धर्मावरील कलंक आहे असे काही लोक म्हणत आहेत पण हिंदू धर्मावरील कलंक आहे असे काही लोक म्हणत आहेत पण हिंदू धर्म कलंकित आहे असे एकही हिंदू मानत नाही."[8] आणि म्हणून इतका छळ होत असतांना त्याच धर्मात राहणे चुकीचे आहे. जोपर्यंत आपण या धर्माचा त्याग करणार नाही तोपर्यंत आपली त्यांच्या जाचापासून सुटका होऊ शकणार नाही आणि म्हणुन धर्मातरण हाच त्यावरील एकमेव उपाय आहे असे प्रतिपादन डॉ. आंबेडकर करतात. १९५० साली त्यांनी स्पष्टपणे अस्पृश्य समाजाला प्रश्न विचारला होता की, आपण अस्पृश्य म्हणून राहावयाचे की धर्म बदलावयाचा याविषयी विचार करण्याची वेळ आली आहे. कारण धर्म हा माणसास आवश्यक आहे. त्याशिवाय प्रगती होत नाही. म्हणून ज्या धर्मात प्रगती होईल तो धर्म स्विकारणे आवश्यक आहे.[9] राजकीय साधनाव्दारे एकता प्रस्थापीत करण्यात आणि अस्पृश्यता निवारण करण्यात डॉ. आंबेडकर यांना राजकीय क्षेत्रात यश प्राप्त झले असले तरी सामाजिक क्षेत्रात मात्र परिस्थितीत फारसा फरक पडला नव्हता. यामुळे डॉ. आंबेडकर यांना अस्पृश्य समाजाच्या विकासासाठी हिंदू धर्माचा त्याग करण्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नव्हता. त्यांनी १९३५ मध्ये धर्मातराची घोषणा केली होती. परंतु प्रत्यक्षात १९५६ मध्ये त्यांनी स्वत: आणि आपल्या बांधवांसह बौध्द धर्माचा स्विकार केला. १९३५ ते १९५५ या विस वर्षाच्या कालखंडात त्यांना अस्पृश्यता निवारण्याबाबत अतिशय कटु अनुभव आला होता. जोपर्यंत अस्पृश्य हे हिंदु धर्मात आहे तोपर्यंत हे महारच म्हणवल्या जातील अशी त्यांना खात्री पटली. त्यांनी "धर्मपरिवर्तनाशिवाय दुसरा मार्ग नाही कां?" या प्रश्नाचे उत्तर देतांना धर्माची आवश्यकता आणि महत्व प्रतिपादन केले होते. डॉ. आंबेडकर यांच्या मते मानवी समाजाला धर्माने मुख्यत: दोन देणग्या दिल्या आहेत.

1) मानवी जीवनात ऐक्य प्रस्थापित करणारी मानसिक प्रेरणा निर्माण करणे आणि

2) समाजात समता निर्माण करणे.

हे कार्य केवळ धर्मच करु शकतो. या दोन महत्वाच्या तत्वांच्या आधारावर सद्य परिस्थितीत समता निर्माण करुन चांगल्या त-हेने लोकशाही राबवावयाची असेल तर धर्माची अत्यंत आवश्यकता आहे.

हिंदु धर्माचा त्याग का केला, या प्रश्नाचे उत्तर डॉ. बाबासाहेबांनी वेळोवेळी दिले. चातुर्वर्ण्य आणि जाजिव्यवस्थेने अस्पृश्यांचा माणूस म्हणून अमानविनय छळ हजारो वर्षे केला. त्याची परिणती म्हणजे धर्मांतर होय. या छळवादाचे चटके बाबासाहेब यांसारख्या अतिउच्च , सुशिक्षीत विद्वानाससुध्दा लागले होते, मग इतरांची काय कथा ! एकाच धर्मातील एका समाज गटाने दुस-यास इतक्या कृरपणे, इतक्या दीर्घकाळ वागवावे हे जगाच्या सामाजिक इतिहासात कुठेही सापडत नाही. आता डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचा विचार करतांना प्रथमत: धर्मांतर म्हणजे काय? याचा अर्थ माहित असणे अगत्याची बाब आहे. "धर्मातराचा खरा अर्थ म्हणजे बदल, विधायक बदल, जुने सोडून नव्याचा स्वीकार, उच्चतेकडे होणारा विधायक प्रवास होय. याचा सरळ व साधा अर्थ नवीन जीवनमार्गाचा स्विकार करणे होय.[10] म्हणुन डॉ. बाबासाहेबांचे धर्मांतर हे पारंपारीक अर्थाने एक धर्म सोडून अन्य धर्मात जाणे नव्हते; तर पारंपारीक धर्मश्रध्देचा संस्कार स्वीकारणे होते; पण दुर्देवाने आम्ही "धर्मांतर म्हणजे एक धर्म सोडणे व दुसरा स्वीकारण असा त्याचा अर्थ लावला, जे उचित नव्हते."[11] धर्मांतराचा विचार पक्का केल्यानंतर डॉ. आंबेडकरांनी हिंदु धर्म सोडण्याचा निश्चय केला सर्व धर्माचा सखोलतेने वर्षोनुवर्षे अभ्यास करुन धर्मातराची फलश्रुती बुध्द धर्माचा स्वीकार करुन झालेली दिसते. संपुर्ण भारतच नव्हे तर संपुर्ण जग डॉ. आंबेडकरांच्या धर्मातरांचा धम्मक्रांती म्हणून मानु लागले. सर्वांचे लक्ष धर्मांतराच्या फलिताकडे वेधले गेले आहे. बौध्द धम्म खरोखरच निश्चितपणे विधायक बदल व

क्रांती घडवे शकेल काय? मानसिकरित्या गुलामगिरीत असलेल्या भारत देशाला या गर्तेतून बाहेर काढील काय? बुध्द, धम्म, आणि संघ या तीन रत्नाच्या माध्यमातून संपूर्ण मानवजात बुध्दत्वाकडे जाऊ शकेल काय? असे अनेक प्रश्न मनाच्या प्रक्रियेतून प्रतिबिंबीत झाल्याशिवाय राहत नाही. धर्मांतर करतांना हिंदू धर्माचा त्याग व बुध्द धर्माचा स्वीकार करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की, "जो धर्म आमची काळची घेईल, त्या धर्माकरीता आम्ही आमचे प्राण देऊ. जो धर्म आमची पर्वा करीत नाही त्याची पर्वा आम्ही कां करावी?"[12]

यासंदर्भात बाबासाहेब म्हणत, " जो धर्म तुमच्या माणुसकीस किंमत देत नाही त्या धर्मात तुम्ही कां राहता? जो धर्म तुम्हाला देवळात जाऊ देत नाही, त्या धर्मात तुम्ही कां राहता ? जो धर्म तुम्हाला शिक्षण घेऊ देत नाही, त्या धर्मात तुम्ही का राहता? माणुस धर्माकरीता नाही, तर धर्म माणसाकरीता आहे. माणुसकी प्राप्त करुन घ्याची असेल तर धर्मांतर करा.[13]

डॉ. आंबेडकरांचा "बुध्दधर्म" हा पारंपारीक बुध्द धम्मासारखा नाही. त्यांनी त्यातील तर्कावर उतरणारा, विज्ञाननिष्ठ मानणारा, शुध्द भौतिकवाद स्वीकारणारा असा धम्म स्वीकारलला आहे. अंधश्रध्दा, चमत्कार, कर्मकांड यांना फाटा देऊन इतर धर्मातुन आलेली विचारांची भेसळ काढून टाकली आहे. "बुध्द अँड हिज धम्म" या आपल्या अमूल्य ग्रंथात त्यांनी हे "धम्माचे जडवादी, भौतिकवादी, निरीश्वरवादी, अनात्मवादी तत्वज्ञान तर्कशुध्द पध्दतीने मांडले आहे. अशारितीने अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी बौध्द धर्माचा स्वीकार केला. ऐतिहासिक दृष्टीकोनातुन विचार केल्यास आंबेडकर यांनी भारतात फार मोठे परिवर्तन घडवून आणावे. आठ कोटी अस्पृश्य समाजाला त्यांनी नवीन तत्वज्ञान, नविन विचार देऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला.

धर्मातराच्या एकुणच आढाव्याने आपल्याला एक बाब लक्षात येते की, बाबासाहेबांनी समाजिक समतेसाठी मूलभूत मानवी अधिकारांसाठी हिंदू धर्माचा त्याग केला. ज्याप्रमाणे सर्व नद्या समुद्रात जाऊन एक होतात. त्याचप्रमाणे धम्म स्वीकारल्यावर सर्व मानवजात एकोप्याने राहु शकते, हे आंबेडकरांना अभिप्रेत होत. परंपरांगत धर्माच्या परिघावर ठेवीत जे लोक उभे राहु शकत नव्हते, अशा माणसांना आपल्या हक्काचे संपूर्ण वर्तुळ बहाल करुन नव्या मुल्यांचा एक स्वतंत्र पर्याय उभा केला. त्या मुल्यांतराने माणसांच्या मुक्तीचा अवरुध्द झालेला मार्ग परत अडीच हजार वर्षानंतर मोकळा करण्याचे सहकार्य डॉ. आंबेडकरांनी केले. अत्यंत जाचक असणारी अस्पृश्यता आणि माणसांना माणसांपासून तोडणारी जातीयता, यातून माणसाची सुटका व्हावी, यासाठी झुंजणा-या आंबेडकरांना धम्म हा पर्याय वाटला, तो त्यांनी आपल्या चिंतनामधुन निश्चित केला आणि स्वीकारला सुध्दा डॉ. आंबेडकर हे प्रखर बुध्दिनिष्ठ होते. म्हणूनच त्यांनी बौध्द साहित्याची कठोर चिकित्सा केली. डॉ. आंबेडकरांनी पुर्ण विचाराअंती व जाणीवपूर्वक बौध्द धम्माचा स्वीकार केला व संपुर्ण जगाला शांतीचा संदेश देणा-या अखिल मानवजातीला दु:ख मुक्तीचा मार्ग दाखविणा-या गौतम बुध्दाजवळ ते नतमस्त झालेत. बौध्द धम्माचा स्वीकार केल्यामुळे पुर्वश्रमीच्या अस्पृश्यांना धार्मिक स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे. समाजात त्यांना समानता मिळाल्यामुळे त्यांच्यात स्वाभिमान निर्माण झाला आहे. त्यांना आपल्या जीवनाचे मुल्य कळुन चुकले आहे. आपण कुणाचे गुलाम नाही ही भावना त्यांच्या वाढीला लागली आहे. आपल्या प्रगतीचा मार्ग आपणच शोधला पाहिजे यासाठी ते प्रयत्न करु लागले आहेत.

संदर्भ ग्रंथ सुची:-

1. महामानव – डॉ. भिमराव रामजी आंबेडकर – डॉ. ज्ञानराज काशीनाथ गायकवाड, राजवंश पब्लिकेशन, मुंबई-२००७, पृ.क्र. ३९२

2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारधन, श्री. दिक्षित, प्रकाश विठ्ठल रघुवंशी, श्री. गजानन बुक डेपो, कबुतर खाना, दादर मुंबई, प्रथम आवृत्ती, १९८६, पृ.क्र. ४०

3. उक्त ग्रंथ पृ.क्र. ४१

4. उक्त ग्रंथ पृ.क्र. ४२

5. उक्त ग्रंथ पृ.क्र. १२

6. उक्त ग्रंथ पृ.क्र. १३

7. "मुक्ती कोन पथे ?" डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ५-६

8. कित्ता पृ. क्र. १२

9. "आधुनिक भारतीय विचारवंत (राजा राममोहन रॉय ते डॉ. आंबेडकर)" – डॉ. शांताराम कृ. भोगले, शिवशंकर प्रकाशन, औरंगाबाद १९८५, पृ.क्र. २६०

10. डॉ. बाबासाहेबांची धम्मक्रांती – माहस्थवीर संघरक्षित, त्रिरत्न ग्रंथमाला पुणे १९८४, पृ.क्र. १-१९

11. "बाबासाहेब गौरवग्रंथ"- संपादक, प्रा.रो. ए. गवळी, प्रा.सु. हिरवळे, डॉ. पी.ए. गवळी, प्रा.सु. गव्हाणे, प्रचार प्रकाशन, कोल्हापुर, १९९१, पृ.क्र. ५६७

12. उक्त ग्रंथ पृ.क्र. 606

13. उक्त ग्रंथ पृ.क्र. 606

14. दलित साहित्याचे नामांतर आंबेडकरवादी साहित्य – डॉ. यशवंत मनोहर युगसाक्षी प्रकाशन, नागपूर – २००५.

15. पाश्चात्य व भारतीय राजकीय विचार काषकर्त – स.मा. गर्गे, प्रा.चिं.ग. द्यांगरेकर, प्रा.र.घ. वराडकर आणि व्हि.एस. क्षीरसागर, के. सागर पब्लि. पुणे. २०११.

16. महाकवी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रा. वामत निंबाळकर, प्रबोधन प्रकाशन, नागपूर – २००५.

गोपाळ कृष्ण गोखले यांचे राजकीय व सामाजिक कार्य

प्रा. डॉ. काशिनाथ शिवराव मानमोडे

महात्मा गांधी कला—वाणिज्य महाविद्यालय,पारशिवनी

सारांश

गोपाळ कृष्ण गोखले हे उदारमतवादी नेते होते. त्यांना सशस्त्र क्रांतीचा मार्ग मान्य नव्हता. ते सनदशिर व घटनात्मक मार्गाने अर्ज विनंत्या करून स्वातंत्र्य प्राप्त करू इच्छित होते. राजकीय सुधारणांइतकेचे किंबहुना त्यापेक्षा जास्त महत्व सामाजिक सुधारणांचे आहे असे त्यांचे ठाम मत होते. १९०२ मध्ये गोखले यांची केंद्रीय कायदेमंडळात निवड झाली. कायदेमंडळात अर्थसंकल्पावर त्यांनी बारा भाषणे दिली. १९०५ मध्ये भारत समाज सेवक समाजाची स्थापना करून त्यांनी समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक व राजकिय स्थिती याबाबत आपले मत मांडण्याचा प्रयत्न केला

शोधनिबंधाची उद्दिष्टे —

१. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

२. कॉंग्रेसमधील गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सनदशीर मार्गाचा अभ्यास करणे.

३. भारत सेवक समाजाच्या माध्यमातून राष्ट्रभक्ती रूजविण्याच्या कार्याचा परिचय करून देणे

गृहितके

गोपाळ कृष्ण गोखले यांचा सनदशिर मार्ग आजही महत्वपूर्ण आहे.

प्रस्तावना

१९ व्या शतकाच्या शेवटी पुण्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्रात ज्या राष्ट्रपुरूषांचा उदय झाला व आपले कार्य राष्ट्रीय स्तरावर पोहचविले त्यापैकी एक गोपाळ कृष्ण गोखले होय. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्हयातील कोतळूक येथे ९ मे १८६६ मध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कागल येथे झाले. त्यानंतर इंग्रजी शिक्षण घेण्याकरीता ते कोल्हापूरला आले. अशातच १८७९ मध्ये त्यांच्या वडीलाचा मृत्यू झाला. त्यावेळी त्यांचा मोठा भाऊ गोविंद १८ वर्षाचा व गोपाळ १३ वर्षाचा होता. वडीलांच्या मृत्यूनंतर एक वर्षातच १८८० मध्ये गोपाळरावचा विवाह त्यांचे काका अंताजीपंतांनी लावून दिला. त्यांच्या वडील भावाने कागल संस्थानात नोकरी करून गोपाळच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. मॅट्रीकची परीक्षा पास झाले त्यावेळी त्यांचे वय १५ वर्षाचे होते.

१८८२ मध्ये कोल्हापूरला राजाराम कॉलेजमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. वयाच्या १८ व्या वर्षी ते बी.ए. ची परीक्षा पास झाले. यावेळी त्यांना सहज नोकरी मिळाली असती. परंतु समाजसेवेच्या पिंडामुळे त्यांनी विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी सुरू केलेल्या पुणे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये ३५ रू. पगारावर नोकरी सुरू केली. या शाळेत ५ वर्षे नोकरी केल्यानंतर ऐवढया कमी पगारावर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होणार नाही या जाणिवेतून त्यांनी खाजगी शिकवणी वर्ग सुरू केले. आता त्यांना ७०— ७५ रू मासिक उत्पन्न मिळू लागले.

पुढे फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राचार्यपदावर त्यांची नियुक्ती झाली. १९०३ मध्ये तेथून ते निवृत्त झाले. पुण्यातील सार्वजनिक सभेचे ते सदस्य होते. न्यायमूर्ती रानडेंना ते गुरू मानत असे. काही काळ सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकाचे संपादक म्हणून त्यांनी कार्य केले. १८८७ मध्ये ते सभेचे सचिव होते. काही काळ सुधारक या पत्राचे सहसंपादक म्हणून त्यांनी कार्य केले.

राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष

गोपाळ कृष्ण गोखले मवाळ नेते असले तरी कॉंग्रेसच्या अधिवेशनात त्यांनी ब्रिटिश सरकारच्या ब—याच धोरणावर टीका केली. १८९२ च्या कौन्सिल कायदयामुळे भारतीय जनतेच्या आशाआकांशा पूर्ण होवू शकत नाही असे त्यांनी सरकारला खडसावले. १८९५ मध्ये ते राष्ट्रीय सभेचे चिटणीस बनले. तर १९०५ मध्ये गोखले राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झाले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी भारताला वसाहतीचे स्वराज्य मिळायला पाहीजे व ते आपले अंतिम उद्दीष्ट आहे असे जाहीर केले. यावेळी बंगालच्या फाळणीमुळे सर्व देश पेटून उठला होता. परकीय मालावरील

बहीष्काराची चळवळ तिव्र झाली होती. अशास्थितीत गोखले यांनी सरकारविरोधी बहिष्काराच्या चळवळीला आपला पाठिंबा जाहीर करून बहिष्कार चळवळीचे समर्थन केले.

वेल्बी कमिशन आणि गोखले

भारतात लष्करी व मुलकी खात्याचा खर्च कसा काय केला जातो याचा अभ्यास करण्यासाठी वेल्बी कमिशन नेमण्यात आले. भारत सरकार आणि ब्रिटिश सरकार यांच्यात खर्चाची वाटणी कशी करायची हे ठरविणे कमिशनचे काम होते या कमिशनमध्ये १४ सभासदांपैकी ११ सभासद सरकारी होते भारतातून या कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशन व डेक्कन सभेचे सचिव म्हणून गोपाळ कृष्ण गोखले यांना इंग्लंडमध्ये पाठविण्यात आले. यासाठी गोखले यांनी संपूर्ण अभ्यास केला.इंग्लंडमध्ये गेल्यानंतर ते दिन्शा वाच्छा यांच्याकडे राहू लागले येथेच त्यांची भेट दादाभाई नौरोजी यांच्याशी झाली. याचवेळी त्यांनी मोर्ले यांची भेट घेतली. त्यांच्याकडून इंग्लंडमधील शिक्षण पध्दती त्यांनी जाणून घेतली. वेल्बी कमिशनमुळे गोखले राजकीय व आर्थिक क्षेत्रात प्रसिध्दीस आले.

कमिशनपुढे साक्ष देतांना ते म्हणाले. भारतातील जमा होणारा बहुतेक वसूल लष्कर सरकारी अधिकाऱ्याचे पगार व पेन्शन यावरच खर्च होतो. फारच कमी भाग शिक्षण, आरोग्य, कालवे व शेतीवर खर्च होतो. इंग्रज अधिकारी व व्यापाऱ्यांचे हीत कशात आहे हे बघितले जाते. मात्र ज्यांच्याकडून कर प्राप्त होतो त्यांच्याकडे काहीच लक्ष दिले जात नाही. युध्दावर होणारा खर्च सुध्दा भारतियांकडून वसूल केला जातो. यामुळे इंग्रजांचे साम्राज्य वाढते परंतु यात पैसा व प्राण भारतियांचे जातात. दुसऱ्याचे प्राण घेऊन आपले हित साधने हे अन्यायाचे आहे. भारतिय कारखानदारांना अनेक अडचणीतून जावे लागते. तरीही इंग्लंडहून भारतात येणाऱ्या मालावर जकात माफ केल्यामुळे भारतियांचेच नुकसान होते. भारतात रेल्वेचा विकास इंग्रज व्यापारी व व्यापारी संस्थाच्या हितासाठी केला जातो. तसेच इंग्रज सरकारने ज्या लष्करी मोहीमा काढल्या त्याचा खर्च भारतियांवर लादू नये. आय. सी. एस. परिक्षेबाबतही त्यांनी १५७ आय. सी.एस. जागांपैकी फक्त ५ जागांवर भारतीय आहेत. इतर खात्यांबाबतही कसा भेदभाव केला जातो हे त्यांनी सांगितले १२व १३ एप्रील १८९७ रोजी गोखले यांची साक्ष झाली. त्यांच्या साक्षीवर दादाभाई नौरोजी खूप खूश झाले.

राजकिय कारकिर्द

१८८९ पासून कॉग्रेसशी अविरत त्यांचा संबंध होता. १८९० मध्ये त्यांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला. रानडेच्या सहवासामुळे त्यांनी राजनितीचे धडे गिरविले. याचवर्षी त्यांनी कलकत्ता येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात लहान परंतु तडफदार भाषण दिले. यावेळी ते २४ वर्षाचे होते. १८९१ च्या नागपूर अधिवेशनातही त्यांनी भाषण दिले. देशात सुधारणा कराव्यात अशा मागण्या आपण ब्रिटिश सरकारकडे कराव्यात म्हणजे रास्त मार्गाने सरकारशी झगडायचे ही रानडयांची शिकवण गोपाळरावनी आयुष्यभर पाळली. १९९० पासून आपल्या मृत्यूपर्यंत गोपाळराव कधी प्रांतीक तर कधी वरिष्ठ असे कोणत्या ना कोणत्या कौन्सिलचे सभासद होते. अशास्थितीत १६ जानेवारी १९०१ रोजी न्यायमूर्ती रानडेंचा मृत्यू झाला त्यावेळी गोपाळरावच्या मनाची स्थिती विचित्र झाली. परंतु गुरूने रडावयास शिकविले नाही तर रडणे गिळून काम करता—करता पडावयास शिकविले हे त्यांना आठवले व स्वत:ला त्यांनी सावरले.

१९०१ मध्ये प्रांतिक कौन्सिलची बैठक सुरू झाली. या बैठकीत दोन महत्वाची बिले पास झाली. या दोन्ही बिलाच्या चर्चेत गोखलेनी भाग घेतला. गोपाळराव पुणे म्युनिसिपलमध्ये अनेक दिवस सभासद असल्यामुळे त्यांनी डिस्ट्रीक्ट म्युनिसिपल बिलाच्या वेळी चांगला सहभाग घेतला. १८८४ च्या कायदयाने सरकारला अर्धे सदस्य ज्या अल्पसंख्याक जातींना प्रतिनिधीत्व मिळाले नाही त्यातून निवडण्याचा अधिकार प्राप्त झाला. यावेही स्वतंत्र जागा काढू नका असे त्यांनी सुचविले दुष्काळ, साथीचे रोग यासारख्या गंभीर प्रकरणात सुध्दा म्युनसिपालिटीवर कामे सोपवून सरकार मात्र मोकळे होते. यातून कितीही श्रीमंत म्यनिसिपालिटी जेरीस येईल. अशी त्यांनी टिका केली.

वयाच्या ३६ व्या वर्षी ते केंद्रिय कायदेमंडळाचे सदस्य बनले. गोखले यांनी अर्थशास्त्र,राज्यशास्त्र, तर्कशास्त्र, समाजशास्त्र इ. विषयात चांगले अध्ययन केले होते. ते उत्तम वक्ते होते. त्यांच्या अभ्यासपुर्ण भाषणामुळे त्यांना प्रचंड प्रसिध्दी मिळाली. कोणत्याही विषयावर बोलतांना

ते सखोल व सर्वांगीण अभ्यास करीत होते. १९०२ साली केंद्रिय विधीमंडळात अर्थसंकल्पावरील आपल्या पहील्याच भाषणात त्यांनी या क्षेत्रातील आपले कार्य किती आहे दाखवून दिले.

आपल्या सरकारी तिजोरीतील शिल्लक असणारी रक्कम भारतीय जनतेच्या कल्याणासाठी कशी वापरता येईल, जनतेवरील कर कसा कमी करता येईल, भारतासारख्या गरीब देशात अंदाजपत्रक कसे असावे, कोणत्या वर्गाकडून किती कर घ्यावा, भारतीय नेत्यांच्या हाती देशाचे जमाखर्चाचे नियंत्रण दिल्यास ते देशाचा आयव्यय कसा करतील इ. अनेक विषयातील त्यांची भाषणे कायदेमंडळात गाजली. या त्यांच्या कार्यामुळे देशाच्या कारभाराचे सत्य दर्शन सुशिक्षित भारतीय वर्गास घडून आले याशिवाय शेतकऱ्यांवरील कराचा बोझा कमी करावा, मीठावरील कर रद्द करावा, भारतीय लोकांना वरच्या जागा दयाव्या, राज्यकारभारावरील कर कमी करावा, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत दयावे याविषयी कायदेमंडळात त्यांनी वारंवार आग्रह धरला.

गोखले बोलू लागले की, आपल्यापुढे गुलाबपूष्पाचा सडा पडतो आहे असे वाटे. असे सी. वाय चिंतामणी म्हणत. गोखले कितीही कटू सत्य आपल्या मृदू शब्दात सांगत असे. त्यांनी मीठावरील करावर प्रचंड टिका केली एक पैशाचे मिठ कसे पाच आण्यात विकण्यात येते हे त्यांनी सांगितले. एकीकडे इंग्रज आम्हाला बरोबरीचा दर्जा देत आहे असा भास निर्माण करत. परंतु वास्तविक स्थिती पाहता त्यांनीच उच्च पदे काबीज केली.

भारत सेवक समाज —

१९०५ साली गोपाळ कृष्ण गोखले यांनी पुण्यात भारत सेवक समाजाची स्थापना केली. भारतियांमध्ये असा एक समाज निर्माण करणे की, जे पूर्णपणे समाजसेवेसाठी समर्पित राहतील. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत वसाहतीचा दर्जा प्राप्त करणे हे भारत सेवक समाजाच्या सदस्यांचे ध्येय होते. हे कार्य सनदशिर मार्गाने करण्यासाठी या समाजाच्या सदस्यांनी काही गोष्टीचे पालन करणे आवश्यक होते. ध्येयप्राप्तीसाठी या समाजातील सदस्याने अविश्रांत परिश्रम करायला पाहीजे हे कार्य पवित्र आहे असे समजायला पाहीजे. नि:स्वार्थपणे हे काम करायला पाहीजे या कार्यापुढे इतर गोष्टी तुच्छ समजायला पाहीजे.

सनदशिर मार्गाने चळवळ करून, देशाच्या सर्वांगीण प्रगतिसाठी देशातील तरूणांना तयार करणे हे भारत सेवक समाजाचे ध्येय होते. यासाठी यातील सदस्यांना खालील पाच गोष्टीचे पालन करणे आवश्यक होते.

१. स्वत:च्या सदाचाराने लोकांमध्ये देशभक्ती निर्माण करणे. त्यांना नि:स्वार्थ बनविणे.
२. जनतेला राजकीय शिक्षण देवून त्यांना चळवळीसाठी सिध्द करणे.
३. जातीभेद नष्ट करून समाजात सलोखा व प्रेमभावना निर्माण करणे.
४. मागास जातींमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे.
५. अस्पृष्यांच्या स्थितीत सुधारणा करणे.

प्रत्येक विद्यार्थ्यास पाच वर्षे शिक्षण देण्यात येई. या समाजात प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक सभासदाला "मी देशाच्या कल्याणासाठी वाहून घेईन, स्वार्थ मनात ठेवणार नाही सर्व हिंदी लोकांना बंधू समजेन, जातपंथ बाजूला ठेविन, मला किंवा माझ्या कुटूंबाला जे काही देईल त्यात समाधानी राहील, माझे खाजगी जीवन पवित्र ठेविन, कोणासोबत भांडणार नाही. सोसायटीचे ध्येय नेहमी डोळयासमोर ठेवीन"अशाप्रकारची प्रतिज्ञा घ्यावी लागत असे. या समाजाच्या माध्यमातून अनेक निस्वार्थी कार्यकर्ते तयार करण्याचे काम गोपाळ कृष्ण गोखले यांनी केले.

निष्कर्ष —

आपल्या सौम्य स्वभावामुळे अनेक वेळा जहालांकडून तर कधी सरकारकडून गोपाळ कृष्ण गोखले यांच्यावर प्रचंड टिका झाली. मात्र त्यांनी कॉग्रेस व सरकारमध्ये समन्वय घडवून आणण्यांची भूमिका ठेवली. जनतेच्या भावना सरकारला निवेदन करणाऱ्या मध्यस्थाची त्यांची भूमिका असल्याने त्यांच्यावर दोन्ही बाजूकडून टिका झाली. जहाल तर नेहमी त्यांच्यावर टिका करीत. मात्र विरोधकांनी सुध्दा त्यांच्यात असणाऱ्या गुणांचा गौरव केला. टिळकांनी गोखले यांच्या निस्वार्थ देशसेवेचा, गाढ व्यासंगाचा, लोककल्याणच्या कळकळीचा, प्रखर कर्तव्यनिष्ठतेचा व प्रांजलपणचा आवर्जुन उल्लेख केला. लॉर्ड कर्झनने तर गोखल्यांना परमेश्वराने विपुल गुणसंपत्ती दिली असुन ती ते देशाच्या

सत्कारणी लावत आहे. असे गौवरवाचे उद्‌गार काढले. महात्मा गांधीनी त्यांना गंगेच्या पवित्र पात्राची उपमा दिली.

संदर्भ ग्रंथ —

१.साने गुरूजी — ना. गोपाळकृष्ण गोखले
२.डॉ. विभा अनिल आठल्ये —आधुनिक भारत
३.आधुनिक भारताचा इतिहास — डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर
४.डॉ. मधुकर वि. पाटील, सुनिल भा. पाटील — भारतिय स्वांतत्र्य चळवळीचा इतिहास
५.डॉ. सोमनाथ रोडे— आधुनिक भारत १८१८ ते १९७५
६.बी. एल. ग्रोवर, यशपाल— आधुनिक भारत का इतिहास
७.तुकाराम जाधव— संपादक — वार्षिकी २०१२ महाराष्ट्र
८.प्रा. जयसिंगराव भाऊसाहेब पवार— हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य संग्रामाचा इतिहास

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDIII) 403
ISSN : 2278-9308
March, 2023

बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे उभरते राजकीय नेतृत्व

महेन्द्र देवरावजी भलमे
संशोधनकर्ता
E-mail. mahendrabhalme11@gmail.com

सारांश :—

भारतीय समाजव्यवस्थेत महिलांना दुय्यम स्थान राहिले आहे. त्या आजपर्यंत संतेविना प्रतिष्ठेविना राहिला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात महिलांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात आले. तरी अपेक्षीत यश प्राप्त झाले नाही, त्यांच्या गुणांची कदर कोणीही केली नाही. आयुष्यभर चुल आणि मुल याच जबाबदारीत त्यांनी आपले जीवन व्यथीत केले. स्वयं सहाय्यता बचत गटामुळे महिलांच्या आयुष्यात परिवर्तन होत असून त्यांच्या मध्ये असणाऱ्या सुप्त गुणांना बचत गटामुळे चालना मिळाली आहे.

स्वयंसहाय्यता बचत गटाच्या प्रत्येक महिण्याला मासीक बैठका होत असतात तसेच प्रभाग संघ, ग्राम संघाच्या नियमित बैठका होत असतात. या बैठकामध्ये महिला आपली भुमिका मांडत असतात, वेगवेगळे निर्णय घेत असतात, वेगवेगळे ठराव पारीत करीत असतात. त्यामुळे महिलांमध्ये संघटनात्मक कौशल्य निर्माण होत आहे. महिला गटामध्ये आपले विचार मांडत असल्यामुळे आज त्यांच्यात वक्तृत्व कौशल्य, लिखान कौशल्य, व्यवस्थापन कौशल्य निर्माण होत आहे. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिलांमध्ये असणाऱ्या सुप्त गुणांना चालना मिळत आहे. त्यांच्यात जबरदस्त आत्मविश्वास, धाडसीपणा, निर्णय क्षमता इ. अनेक गुणांचा विकास होत आहे.

आज महिलांचे राजकीय क्षेत्रात प्रवेशाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. जरी संसदेमध्ये राज्य विधीमंडळात महिला लोक प्रतिनिधीचे प्रमाण कमी असले तरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांचे प्रमाण वाढत आहे. शिक्षणाचे वाढते प्रमाण, समाजात राजकीय जागरूकता यामुळे अनेक कुटूंब महिलांना राजकारणात सहभागासाठी प्रेरित करतात. बचत गटात महिला वेगवेगळे पद भुषवित असल्यामुळे त्यांच्या नेतृत्व गुण निर्माण होत आहे. आज बचत गट एक प्रभावी दबाव गट म्हणून समोर येत आहे. ग्रामीण जीवन उन्नती अभियान (उमेद) अंतर्गत बचत गटाचे मजबुत संघटन तयार झाले आहे. या संघटनाचा फायदा व्हावा म्हणून प्रत्येक लोकप्रतिनिधी प्रत्येक गावात बचत गटाच्या ग्रामसंघाला भेट देतात. त्यामुळे महिला व लोकप्रतिनिधीच्या संपर्कामुळे लोकप्रतिनिधीच्या सहकार्याने अनेक महिला राजकारणात प्रवेश करीत आहे.

प्रस्तावना :—

समाजामध्ये स्त्रीची सतत त्यागाची भुमिका राहीली आहे. कन्या, पत्नी, माता, सामाजिक संस्कार यामध्ये स्त्रीयांचे जीवन खर्च होत आहे. स्त्रीयांना घराबाहेर पडून विविध क्षेत्रात नेतृत्व करावे , समाजात वेगवेगळया जबाबदाऱ्या पार पाडाव्या, अर्थोत्पादन करावे असा समाजाचा आग्रह नाही. त्यांनी चुल आणि मुल याच जबाबदारीत आपले आयुष्य काढावे हीच अपेक्षा आजही लोक व्यक्त करीत असतात.

स्त्रीयांमध्ये स्वत:च्या समस्या सोडविण्याची क्षमता असूनही त्यांना समाजात कुटूंब व्यवस्थेत संधी जात नाही. महिलांकडे एक अबला म्हणून पाहिजे जाते आणि अबला कधीच सबला होवू शक नाही, याच मानसिकतेतून महिलांकडे पाहिले जाते आणि सतत अन्याय सहन करत ती आपले जीवन जगत असते. कुटूंबाच्या निर्णयात स्त्रीयांचा सहभाग नसतो. स्त्रीकडे एक भोगवस्तू म्हणून पाहीले जाते. कामाच्या जागी लैंगिक शोषणाच्या अनेक घटना समाजात आज घडत असतात. महिलांना हिन दर्जाची कामे, असुविधानापूर्वक कामे दिली जातात. अशा स्थितीत कामे पार पाडत असतांना तीला कुटूंबाची जबाबदारी सुध्दा पार पाडावी लागते. या दुहेरी भुमिकेमुळे महिलांचे आयुष्य तणावग्रस्त बनले आहे. राजकीय क्षेत्रात सुध्दा महिलांचे निर्णय पुरूषांकडून घेतले जातात व स्त्रीला नाममात्र भुमिका पार पाडावी लागते.

कुटूंबासाठी, समाजासाठी, राष्ट्रासाठी, जागतिक विकास व प्रगतीसाठी स्त्री सक्षमीकरण होणे काळाची गरज आहे. आज शासनाच्या अनेक योजनाच्या माध्यमातून स्त्री सक्षमीकरणासाठी प्रयत्न

होतांना दिसत आहे. बचत गटाच्या माध्यमातून अनेक वर्ष ग्रामीण भागातील कृषिजीवन पध्दतीत एकत्रीत कुटूंबात कन्या, सुन, पत्नी, आई अशा अनेक प्रकारच्या भुमिका बजावणारी महिला बचत गटाच्या माध्यमातून काटकसर पध्दतीची कास धरूण आर्थिकदृष्टया सक्षम व समर्थ होत आहे.

सरकार बचत गटाच्या संदर्भात विविध योजना राबवित असल्यामुळे महिलांचा आर्थिक विकास होत आहे. कारण प्रत्येक समस्येचे मुळ आर्थिक असते. जोपर्यंत महिला आर्थिकदृष्टया सक्षम होणार नाही, तोपर्यंत त्या सामाजिक, राजकीय अशा कुठल्याही क्षेत्रात प्रगती करणार नाही. म्हणून महिलांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनवून महिलांचे समाजातील स्थान मजबुत करण्यासाठी स्वयंसहाय्यता बचत गटाची भुमिका महत्वपूर्ण आहे.

भारतात स्वातंत्र्यानंतर स्त्रियांना प्रौढ मताधिकार देवून राजकीय नेतृत्व करण्याची संधी दिली. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीकोनातून स्थानिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर शासनामार्फत विविध प्रयत्न करण्यात येत आहे. लोकशाही विकेंद्रीकरण व स्त्रियांचा स्थानिक राजकारणात, निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी १९९२ साली भारतीय संविधानात ७३ वी घटनादुरूस्ती करून १९९३ पासून तिची अंमलबजावणी करण्यात आली. त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या तसेच मागासलेल्या जाती—जमातीसाठी एकुण आरक्षित जागापैकी १/३ जागा स्त्रियांसाठी आरक्षित करण्यात याव्या अशी तरतुद करण्यात आली तसेच २००९ मध्ये महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण विधेयक मंजूर करून महिलांना पंचायत राज संस्थेत ५० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. त्यामुळेच आज राजकारणात स्त्रियांचा सहभाग हळूहळू वाढतांना दिसत आहे.

भारतात महिलांचा सहभाग १ टक्का एवढा आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना ३३ टक्के आरक्षण असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांची संख्या वाढली आहे. पण राष्ट्रीय पातळीवर स्त्रीया आजही उपेक्षितच आहे असे म्हणावे लागेल. पक्षांतर्गत महिलांना मोठमोठी आश्वासन दिली जातात पण त्यांच्या पदरी निराशाच येते. राजकीय नेत्याचे औक्षण करणे, मोर्चात सहभागी होणे, सतरंज्या उचलणे, यापलिकडे महिलांच्या वाटयाला अजूनपर्यंत दुसरे काहीही आले नाही. १७ व्या लोकसभेत महिलांचे प्रमाण १४.९२ टक्के एवढे नगण्य आहे. या आकडेवारीवरून आपल्या लक्षात येते की सध्या राष्ट्रीय राजकारणात महिलांचे प्रमाण किती नगण्य आहे. महिलांना लोकसभेत ३३ टक्के आरक्षण मिळावे यासाठी राज्यसभेत २०१० ला महिला आरक्षण विधेयक (१०८ वी घटनादुरूस्ती विधेयक) व मार्च २०१० ला मंजूर केले पण ते आजपर्यंत लोकसभेत प्रलंबीतच आहे. त्यामुळे महिलांच्या ३३ टक्के आरक्षणाचा विषय आजही प्रलंबीत आहे. अनेक राजकीय पुढारी महिलांच्या हक्काविषयी बोलतात पण महिला आरक्षणाविषयी आग्रही भुमिका मांडत नाही.

बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा आर्थिक विकास होत असल्यामुळे आणि बचत गट, प्रभाग संघ, ग्रामसंघ यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, कृषीसखी, पशुसखी, मत्ससखी, कृषी संगम अशा वेगवेगळया स्वरूपाच्या भुमिका बचत गटाच्या माध्यमातून महिला आज बजावत असल्यामुळे त्यांच्यात नेतृत्व गुणाचा विकास होण्यास मदत होत आहे. त्यामुळे आज अनेक गावामध्ये महिला ग्राम पंचायतमध्ये सरपंच, उपसरपंच, सदस्य, पंचायत समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य, विविध राजकीय पक्षात पदाधिकारी अशा पदावर कार्य करीत आहेत.

उद्दिष्टये :—

१) स्त्रियांचे राजकीय व्यवस्थेत सहभागाचे स्वरूप काय आहे ते पाहणे.

२) बचत गटाच्या माध्यमातून राजकारणात स्त्रियांचा सहभाग कितपत प्रभावी आहे ते पाहणे.

गृहितकृत्ये :—

१) महिला बचत गटामुळे राजकीय नेतृत्व उदयस आले आहे.

२) बचत गटामुळे स्त्रियांचे आर्थिक जिवनमान उंचावले आहे.

शोध लेखाची संशोधन पध्दती :—

या शोध लेखात आवश्यकतेनुसार ग्रंथालय, संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्र, मासिक व अनुभवाच्या आधारे विश्लेषण या तंत्र व अध्यापन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

महत्व :—

स्त्री सक्षमीकरणामध्ये बचत गटाची भुमिका महत्वपूर्ण आहे. बचतगटामुळे स्त्रीयांचा सर्वांगिण विकास होण्यास मदत होत आहे. आज अनेक बचत गट सामाजिक उपक्रमात भाग घेवून समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. अनेक गावातील महिलांनी दारूबंदी गटाच्या माध्यमातून प्रभावीपणे राबविली आहे. बचत गटामुळे अत्याचार, हुंडाबळी अशा प्रथांना आळा बसला आहे. समाजात जागृती होत आहे. समाजात बचत गटाच्या माध्यमातून दबावगट तयार करून आपल्या मागण्यासाठी मोर्चा, आंदोलने करू लागल्या आहे. त्यामुळे त्यांच्यात असणाऱ्या सुप्त गुणांना चालना मिळत आहे. त्यामुळेच त्यांच्यात नेतृत्व गुण विकसीत होवून त्या राजकीय क्षेत्रात आपले नशिब आजमावतांनी दिसत आहे.

स्वयंसहाय्यता बचत गटामुळे आर्थिक दुर्बल घटकांना सावकाराच्या पाशातून सुटका होण्यास मदत होत आहे. गटामार्फत महिलांना संघटीत करून त्यांना स्वअस्तीत्वाची जाणीव करून देण्यास बचत गटाची भुमिका महत्वूपर्ण आहे. ग्राम विकासात स्वयंसहाय्यता बचत गटाचा सहभाग वाढत आहे. अनेक महिला स्वयंसहाय्यता बचत गटांनी सामुहिक उद्योग करून समाजात आपली छाप पाडली आहे. बचत गटामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहे.

महिलांचे जीवनमान उंचावण्यात महिला बचत गटाची भुमिका महत्वपूर्ण आहे. स्वयंसहाय्यता बचत गटामुळे महिला राजकारणात सहभागी होत आहे. त्यामुळे पंचायतराज संस्थेत महिलांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

सुचना आणि शिफारशी :—

१) महिला सक्षमीकरणासाठी बचत गटातील महिलांसाठी स्वतंत्र महिला बचत बॅक स्थापन करावी.
२) स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांना पंचायतराज व्यवस्थेअंतर्गत स्वतंत्र प्रशिक्षण द्यावे.
३) महिलांना उद्योगासाठी प्रेरित करून त्यांना प्रशिक्षण द्यावे.
४) स्थानिक स्वराज्य संस्थेत कायद्याव्दारे जशा जागा राखीव असतात त्याच धर्तीवर संसदेत, राज्य विधीमंडळात महिलांना जागा राखीव ठेवाव्यात.

संदर्भ ग्रंथ सूची :—

१) प्रा. मुलाणी एम. यु. — अल्पबचत नियोजन
२) डॉ. खेखाडे ना. रा. — राजकीय नेतृत्व
३) प्रा. बाळसराफ कुसुम — महिला बचत गट सद्यस्थिती आणि भविष्य
४) प्रा. मुलाणी एम. यु. — महिला स्वयंसहाय्यता बचत गट
५) प्रा. बसु. डी. डी. — भारतीय संविधान

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDIII) 403
ISSN : 2278-9308
March, 2023

वैदर्भीय ग्रामीण कादंबरी : एक वास्तव

विजया विनायकराव वानखेडे
E.mail. tumanevijaya@gmail.com
M.G. College Parseoni

घरांचा समुह म्हणजे ग्राम, ग्राम म्हणजे खेडेगाव. या खेडेगावाची उलाढाल म्हणजेच वास्तव जीवन. या वास्तव जीवनात राजकीय, सामाजिक, आर्थिक समस्यांना झुंज देत जीवन जगावे लागते, हीच या ग्रामीण लोकांच्या जीवनाची वास्तविकता होती व आजही आहे. त्या वास्तविकतेची जाणीव एका साच्यात बसविली गेली. कादंबरीच्या स्वरुपात ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण हेच ग्रामीण लोकांचे जीवनचित्रण होय. ग्रामीण कादंबरी हा समाजाचा पाया आहे.

१८८५ते १९३० हा कादंबरी लेखनाचा पहिला टप्पा मानला जात असला तरी पहीली मराठी ग्रामीण कादंबरी "पीराजी पाटील" ही १९०३ साली प्रसिध्द झाली. या काळात तारुण्याच्या उंबरठ्यवर असणाऱ्या तरुणांमध्ये काही काळाने परिपक्वता येते. या आशयाचे कांदबरी लेखन या काळात केल्या गेले. १९३०नंतरच्या काळात कादंबरी लेखनाच्या दुसऱ्या टप्प्यात प्रामुख्याने नागरी, ग्रामीण, प्रादेशिक या कादबंऱ्याचा दिशा रुंदावत गेल्या. विशेष म्हणजे वैदर्भीय ग्रामीण कादंबरीच्या माध्यमातुन विदर्भातील विविध प्रदेशातील संस्कृती, सामाजीक चाली रिती, समाजजीवन, स्वभावचित्रण, बोलीभाषा इ. चे चित्रण विविध कादंबऱ्यातुन केले आहे. वास्तविकतेची जाणीव ही खेडेगावातुन होणारा कोंडमारा, सात्वीक वृत्ताची होरपळ, ग्रामीण भागातील हुकुमशाही प्रवृत्ती सत्तेची आकांक्षा, सत्तेचे विकेंद्रीकरण या सर्वातुन उदयास आलेली गुंडागीरी प्रवृत्ती, हेच ग्रामीण कादंबरीचे वास्तव आहे.

१९४५नंतर मराठी कादंबरी काही प्रमाणात निर्माण होऊ लागली. १९६०साली उध्दव शेळके यांची 'धग' या कांदबरीतुन ग्रामीण जीवन जगणाऱ्या जनतेचे हुबेहुब चित्र रंगवले आहे. ग्रामीण कादंबरीतील व्यक्तीरेखा या बर्हिमुख, अंतर्मुख, प्रतिनीधीक, विश्वात्मक अशा अनेक प्रकारच्या असतात. कृषीप्रधान संस्कृतीतील जीवन रहाटीमध्ये जुन्या पिढीची माणसे दिसतात. त्यांचे कारुण्या (दु:ख) नजरेत भरणारे आहे. ग्रामीण लोकांचे जीवनात दारिद्र्य, उपासमार, अज्ञान, कटाला बांधलेले जीवन, कौटुंबिक ताणतणाव यामुळे त्यांचे आयुष्य करपुन जाते. ही जीवनाची शोकांतिका आहे.

तत्कालीन स्त्री ही पुरुषी अहंकारामुळे सर्वत्र भरडली जाते. अगतिकतेचे जीवन जगते. आणि अशाही परिस्थीतीत जगण्याचा मार्ग शोधतच राहते. नायक—नायिका यांच्या चित्रणातुन ग्रामीण भागातील पारंपारिक वृत्ती—प्रवृत्तीवर कांदबरीकार प्रकाश टाकतात. ग्रामीण लोकांचे दु:ख सहानुभूतीने रेखाटतात. गरीब, मध्यम, श्रीमंत अशा तिन्ही वर्गातील लोक यात दिसून येते. श्रीमंताचे चित्रण वरळ असून मध्यमवर्गीय शहरी वाटतात. पण मुळचे ग्रामीण भागातील कष्टकरी, गरीब उपासमारीने गांजलेले ग्रामीण लोकांचे जीवन हेच कादंबरीचे वास्तव ठरते.

ग्रामीण कादंबरी म्हणजे "धगधगत्या ग्रामीण समाजाचे भेदक चित्रण होय"शेतकरी हा या कृषीव्यवस्थेत पिचला जाणारा घटक, इंग्रजांच्या एकछत्री राजवटीत रयतवारी, यहालवारी, कायमधरा, या करारपध्दती कायमच कर्जाच्या ओझ्यखाली दबला गेला असंघटीत असलेला शेतकरी नोकरशाहीच्या तुलनेत कनिष्ठ ठरतो. हा या कृषी व्यवस्थेचा जुनाट रोग विकोपास जावुन औषधोपचाराने बरा होणारा नाही. म्हणुन त्यावर शस्त्रक्रिया हाच एकमेव उपाय आहे. अशा प्रतिक्रिया आमच्या वैदर्भीय भागातून (ग्रामीण कादंबरीतुन) दिसु लागल्या.

वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतून शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या, "आधी पेरले तर पिकत नाही, आणि पिकले तर विकत नाही."अशा अस्मानी व सुल्तानी गर्तेत शेतकरी सैरभैर झाला आहे. शेतकरी कुटुंबातील स्त्रियांच्या वेदना, समाजात वाट्याला येणारी प्रतारणा कर्जबाजारी होऊन

शेतकऱ्यांची झालेली आत्महत्या ही कृत्ये भ्याडपणाची वाटत असली तरी उत्पादन खर्च हा उत्पन्नापेक्षा अधिक होतो. तेव्हा कर्जाच्या ओझ्याखाली चिंताग्रस्त झालेला शेतकरी आधी आत्म्याची व नंतर देहाची हत्या करतो. कारण समाज व्यवस्थेच्या वर्तुळात पहिले आणि शेवटचे टोक 'कुटूंब' हेच आहे. हेच ग्रामीण कादंबरीतील वास्तव आहे.

ग्रामीणते बरोबरच विशिष्ट प्रदर्शनाचे वर्णन व्यक्त होणारी प्रादेशिक कादंबरी 'मनुष्य आणि निसर्ग'यांचे कथन हाच केंद्रबिंदु मानते. या कादंबरी लेखनातून विविध जाती, जमाती, उपजाती आणि गावकुसाबाहेरील उपेक्षित थर यांच्या आयुष्याची होणारी परवड व्यक्त केली आहे. ग्रामीण जीवनाचे नवे दर्शन घडवणारा कादंबरीकार म्हणुन वैदर्भीय कादंबरीकार समोर आला, व विदर्भाचे कृष्ण कथेशी असणारे गोड नाते म्हणजेच, आपल्या सौदर्याने नलराजस स्वत:कडे आकृष्ट करुन घेणारी दमयंती ही विदर्भकन्याच होती. म्हणुनच विदर्भाची रसिकभुमी गुणवंताची, संतांची, महंतांची व प्रतिभावंताची मानली जाते. या वैदर्भीय ग्रामीण कादबंरीकारांचे ठसठशीत, भरीव व मुल्यगर्भ योगदान वास्तवतेत कांदबरी लेखनातुन व्यक्त होते.

कादबंरी म्हणजे समाज व निसर्ग याविरुध्द व्यक्तिंचा चाललेला संघर्ष होय. ग्रामीण कादंबरी मागे ग्रामीण जीवन असते. ग्रामीण जीवनाचे प्रश्न, ग्रामीण माणसांची सुख–दु:खे, आशा–आकांक्षा या सर्वांचे प्रतिबिंब वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतून व्यक्त होतांना दिसते. आजच्या यंत्राधिष्ठीत, शहरी, उद्योगप्रधान संस्कृतीपेक्षा ग्रामीण जीवन अत्यंत निराळे आहे. ग्रामीण जीवन शेतनिष्ठ, ग्रामीण व्यक्तिंच्या मनाचा ठाव घेणारे आहे.

ग्रामीण कांदबरीचे वास्तव जाणुन घेण्यासाठी चौकस दृष्टी ठेवणे आवश्यक असते. वैशिष्ट्यपुर्ण व्यक्तिरेखा, चित्तवेधक प्रसंग, कादंबरीचे कथानक, पात्रांचे स्वभाव विश्लेषण, पात्रांचे संवाद, सृष्टीवर्णन आणि भाषा या घटकांचा स्वतंत्र अंगाने विचार करणे आवश्यक ठरते. ग्रामीण कादंबरीत कथानक म्हणजे लेखकाची वाचकांवर पडणारी छाप, आकर्षकपणा महत्वाची असते. प्रसंग आणि स्वभावदर्शन ही दोन अंगे ग्रमीण कादंबरीची परस्वरावलंबी व परस्पर परिपोषक असावी लागतात. वाचकांची जिज्ञासा कायम ठेवणे हे जास्त महत्वाचे असते. ग्रामीण कादबंरीतुन नाट्य तंतोतंत उभे राहावे म्हणुन संवादाची गरज आहे. कादंबरीची गोडी वाढावी म्हणुन सृष्टीसौदर्य वर्णन केले जाते.

ग्रामीण जीवनातील वास्तवता ग्रामीण कादबंरीतून व्यक्त होत असतांनाच काही कादंबरीकाराच्या प्रादेशिकतेची जोड असलेल्या कादंबऱ्यात सुसंस्कृततेच्या दोषापासुन मुक्त असलेला मनुष्य आणि निसर्ग हाच या कादंबरीची केंद्रवस्तु ठरतो. कथा ही ग्रामकथाच असते. आणि या ग्रामकथेचा क्षेत्रीय जीवनाशी संबंध जुळलेला असतो. प्रादेशिक–ग्रामीण संस्कृतीला प्रदेशाची मर्यादा असते. झोपडपट्टी ही शहराचा एक भाग असली तरी आपल्या देशाचा शासन, अर्थ, शिक्षण व्यवस्थेने निर्माण झाली आहे.

शहरी आणि ग्रामीण यामध्ये शिक्षण व्यवस्थेने प्रचंड दरी निर्माण झाली आहे. दरी म्हणजे "विषमता" औद्योगिक भरभराट झालेल्या शहरांच्या अंगावरील क्षतांसारख्या या झोपडपट्ट्या वाढत जातात. झोपडपट्टीतील जीवन हा शहरांना लाभलेला शाप असला तरी आपले स्वरुप जपण्याचा प्रयत्न ग्रामजीवन करीत असते.मराठी वाङमयात जसे लेखक समिक्षांचे योगदान आहे. तसेच ग्रामीण कादंबरीत वैदर्भीय कादंबरीकाराचे योगदान दिसुन येते. हेच ग्रामीण कादंबरीचे जागृत वास्तव आहे.

कादबंरी हा जीवन प्रवाहाबरोबर चालणारा वाढणारा–बदलत जाणारा असा साहित्यप्रकार आहे. यात घटना, कथानक, पात्रे, निवेदन शैली, भाषा इत्यादी घटकांनी कादंबरीची संरचना उभी राहते. कादबंरी हा निवेदनप्रधान वाङमयप्रकार असल्यामुळे त्यात सांगण्याजोगा मजकुर भरपुर असतो. या मजकुरालाच आपण कथानक असे म्हणतो. कादंबरीच्या कथानकातच घटना, प्रसंग, पात्रे, प्रस्तुतीकरण पध्दती या सर्वांशी संबध येतो कथानक हे घटक एकजिनसीपणाने येत असते. म्हणुनच कथानक एकात्म होते. कथानकाच्या माध्यमातुन अनेक घटना व पात्रे यांच्या परस्परसंबधातुन विविध क्रिया घडत जावून कथानक पुढे सरकत जातो. कथानकाचा अत्यंत लहान घटक म्हणजे घटना. अशा घटना नैसर्गीक व मानसिक स्वरुपाच्या असतात. या घटना तयार (आयत्या) नसुन पात्रांकडुन प्रसंगी, विशिष्ट ठिकाणी, विशिष्ट काळी घडत असतातत्र

कादंबरीत लेखक, निवेदक व अन्य पात्रे यांच्या हेतुमधील व जीवनसृष्टीमधील देवघेव करीत असते. कादंबरीत या तिघांचे हेतु साकार होत असते. प्रारंभापासुन अखेरपर्यंत कथानकाची व्याप्ती असते. कथानक हे प्रवाही ठेवावे लागते. एका घटनेतुन दुसरी घटना अशी साखळी असावी लागते. आशयाला अनुरुप अशी भाषा वापरत कादंबरीतील उत्कंष, हुरहुर व विस्मय या तिन्ही घटकांनी कथानकाला आकर्षक बनवायचे असते. कादबंरीतील विशिष्ट हेतुंनी इतिहासकालीन, पुराणातील वातावरण उभारुन तत्कालीन जीवनदर्शक घडवून ती ऐतिहासिक व पौराणिक बनलेली असते. विशिष्ट, प्रदेश, ग्रामीण भुभाग या माध्यमातुन प्रादेशिक, ग्रामीण बनलेली दिसुन येते.

कादंबरीत कथानकाला गतिमान करण्याचे काम पात्रांच्या माध्यमातुनच केले जाते. एखाद्य कादंबरीत किती पात्रे असावीत, याला ठराविक नियम नाही. कादबंरी हा वाङमयप्रकार समाजजीवनाबरोबर वाढत राहणारा असल्यामुळे समाजजीवनातील व्यवहार, माणसा—माणसांतील परस्परसंबध राग, लोभ, हर्ष, खेद या भावना यांच्या केंद्रस्थानी 'माणुसच' असतो व्यक्तीव्यक्तींच्या संबधाच्या जाळयांनीच समाज घडतो. समाजाचे खरे दर्शन व्यक्तींच्या विविध कृती—उक्तीद्वाराच घडते. या कृती उक्ती व्यावहारीक तसेच मानसिक असतात. कादंबरीतील पात्रे ही खरी नसुन खऱ्या असल्याचा आभास निर्माण केलेला असतो. एकाच कादंबरीकाराने त्या निर्माण केलेल्या असतात. पत्येक पात्राला विशिष्ट व्यक्तीमत्व दिले जाते. लेखकाने आपले विविध अनुभव पात्रांमध्ये वाटुन दिलेले असतात. काही पात्रे नैसर्गीक व मानसिक दृष्ट्य खुप समृध्द असतात. अशा रंगवलेल्या पात्रांना "कागदी पात्रे" असे म्हणतात.

कादंबरीत येणाऱ्या पात्रांचे ढोबळमानाने मुख्य पात्रे व गौण पात्रे असे वर्गीकरण केले जाते. मुख्य पात्रात नायक, नायिका, खलनायक, प्रतिनायक यांचा समावेश होतो. तर गौण पात्रात इतर सर्वसाधारण पात्रांचा समावेश होतो. कादंबरीतील मुख्य गौण दोनही पात्रे महत्वाची असतात. कादबंरीतील पात्रे जशी मानवी असतात, तशी अमानवी देखील असतात. एखाद्य वैज्ञानिक कादंबरीत एखादे यंत्र पात्र असेल, निसर्ग पात्ररुपी असेल, विशिष्ट व्यक्तिंशी निगडीत असलेला एखादा संदर्भ देखील पात्ररुप होतो.

कादंबरी हा जीवनप्रवाहाशी समांतर चालणारा व वाढणारा वाङमयप्रकार आहे. एका व्यक्तीचे व व्यक्तींचे जीवन समाजप्रवाहाशी जुळवत, टक्कर देत जगत असते. या जगण्याच्या धडपडीत समाजाशी विविध स्थळी व विविध काळी अनेक नात्यांनी बांधले जात असते. यामुळे मानवी जीवनातला बाह्यंत्राने सुध्दा आपोआपच गुंतागंत प्राप्त होते. या गुंतागुंतीची उकल मानुस ढोबळ घटनाप्रसंगाद्वारे जशी करतो, तशीच अंतर्मुख होवुन मनात विचार करुन मानसिक दृष्ट्यही करतो. कधी निसर्गाच्या विराट स्वरुपाशी नाते जुळवुन गुंतागुंत उकलण्यासाठी प्रयत्न करतो. हे जीवन जगण्याचे एकुण स्वरुप आहे. यातुनच वातावरण आपोआपच निर्माण होते. कादंबरीकार घटना, प्रसंग, व्यक्ती यांच्याद्वारे कथानक निर्माण करतो. त्या कथानकाला वास्तवता, अस्सलपणा प्राप्त होण्यासाठी वातावरण निर्मीतीची आवश्यकता असते. विशिष्ट स्थळ व काळ यांची निर्मीती करुन व्यक्तीच्या हालचालीस वाव देण्याची गरज असते. ही स्थलकालनिर्मीती पुर्णत: काल्पनिक असली तरी वातावरण निर्मीतीमुळे वास्तव किंवा खरी वाटायला लागते.

समाजाचे जीवन आणि काळ हे दोन्ही गतिमान असतात. दर काहात समाज जीवनात छोट्य—मोठ्य गोष्टी घडतात. संवेदनशील कलावंत या गोष्टीची दखल घेतो. त्याला जमावलेल्या व भावलेल्या अशा गोष्टींची नोंद घेवुन हाताळतो व कादंबरीत त्यांचे प्रतिबिंब पडत असते. हे प्रतिबिंब म्हणजेच वातावरण होय. मानवी जीवनाची गुंतागुंत तो मानवी व्यक्तींच्या जगण्याच्या संदर्भातच उकलु शकतो. मानवी जीवनाचा जगण्याच्या संदर्भ फार व्यापक असतो. सुचकता हा कुठल्याही साहित्याचा आवश्यक गुण आहे. सुचकतेमुळे साहित्याला कलात्मक प्राप्त होते. अशा कलात्म साहित्याच्या वाचनासयाठी वाचकांची रसिकताही कारणी लागत असते. व त्याला कलाकृतीचा आनंद मिळतो. सुचकता ही मुख्यत्वे वातावरण निर्मितीच्या द्वारे निर्माण केली जाते. वातावरणामुळे कादंबरीला संदर्भ प्राप्त होवुन व्यापक आलोक किंवा फलक प्राप्त होतो.

कादंबरी हा जीवनाशी समांतर जाणारा वाङमयप्रकार आहे. जीवनातल्या लयीप्रमाणेच हा वाङमयप्रकारही लयबध्द होतो. जीवनातल्या लयीतील हेलकाव्याचे प्रतिबिंब या वाङमयप्रकारात

पडते. कादंबरी संरचनेतील विविध घटकांमध्ये घटना हा सर्वात लहान घटक. या घटना नैसर्गीक तसेच मानसिक स्वरुपाच्या असतात. कादंबरीतील विशिष्ट वातावरणात पात्रांकरवी घडत असतात. स्वाभाविकच या घटनांमागे विविध पात्रांचे विविध प्रकारचे हेतु प्रतिबिंबीत होत असतात. या घटनांमागे लेखकाची जीवनसारणी व मुल्यप्रणाली उभी असते. कादंबरीची शब्दार्थमय संसारकहाणी कादंबरीतील निवेदक पात्रांकडुन सांगितली जाते. या निवेदक पात्राची एक जीवनदृष्टी, कथाहेतु असतो पण निवेदकांच्या या हेतुमागे लेखकाची व्यापक भुमिका असते. ही भुमिका मुल्याधिष्ठीत व कलाप्रेरित असते. लेखक आपल्या दृष्टीकोणानुसार त्यांच्या अंत:स्थ हेतुंची, मुल्यांचा, कलात्मकतेचा अविष्कार करण्यासाठी कांदबरीची रचना करुन त्यात पात्रे, वातावरण भाषा इ. घटकांना संयोजित करीत असतो.

कादंबरीकाराचा दृष्टीकोन व कादंबरीचे रुप म्हणजे रचना यांचा परस्पर संबंध असतो. आत्मशोध व जीवनशोध या साहित्याच्या प्रेरणा होत. कादंबरीत आत्मशोधाची म्हणजे स्वत:चा शोध घेण्याची प्रेरणा अद्‌भुत रम्यता—स्वप्नरंजन—रोमॅटिक—वास्तवाच्या पलीकडच्या अवस्थेत प्रकटलेली दिसते. जीवनशोधाची प्रेरणा मात्र काही कादंबऱ्यात समकालीन जीवनशोध व कादंबरीचे रुप यांचे नाते विस्कळुन केवळ तंत्रमंत्रात्मक वाढलेली दिसते. त्यामुळे जीवन—जाणीवा या जीतक्या तीव्रतम स्वरुपात अविष्कृत व्हायल्या होत्या तेवढ्य त्या कादंबऱ्यात झाालेल्या दिसत नाही. शैलीनिष्ठ, तंत्रनिष्ठ समजुन सजवुन वापरलेली भाषा या तांत्रिक भोवऱ्यात बऱ्याच कादंबऱ्या अउकलेल्या दिसतात.

कादंबरी हा निवेदनप्रधान वाङमयप्रकार आहे. कादंबरीला कथानक असते. हे कथानक निवेदन या प्रसुतीकरण पध्दतीच्या द्वारे सांगावे लागते. हे निवेदन करण्यासाठी प्रथमपुरुषी (मी, आम्ही) निवेदक असतो. कधी तृतीयपुरुषी (तो, ती, ते, त्या, ती) निवेदक असतो. निवेदक हे कथानकातील सर्व घटनाप्रसंग यांना धरुन येते, म्हणुन त्यात वर्णन येते. पात्रापात्रात संभाषण असते. कधी एकाच पात्राच्या मनातील स्वभाषण असते. निवेदनात घटनाप्रसंगावरची भाष्ये असतात. या निवेदनाची वेगवेगळी माध्यामे असतात. निवेदक एका प्रकारे सर्वज्ञ व सर्वसाक्षी असतो. सर्व घटनाप्रसंगाच्या वेळी जणु काही तो उपस्थित असतो. पात्रांच्य अंतस्थ हालचालीही त्याला कळत असतात. प्रथमपुरुषी निवेदनात निवेदकांच्या चिंतनाला व अंतर्मुखतेला अधिक वाव असतो.

भाषा ही खास मानवी संवादाची व्यवस्था आहे. यामुळे भाषेला एक पायाभुत सामाजिक संस्था म्हटले जाते. मानवाच्या बाह्य व्यवहारासोबतच भाषा मनातील आंतरिक व्यवहारही पार पाडते. भाषा ही सर्वच मानवाची समान मक्तेदारी असल्यामुळे व्यापक असते. पण समान हितसंबंधी गटात व्यवहारासाठी किंवा व्यक्तीच्या वैयक्तीक राग—लोभाही भावनांना धरुन तीचा हेतुपुर्वक व गरजेनुरुप वापरही होतो. अशा वापरातील भाषा ही व्यापक व स्थिरुप प्राप्त झालेल्या भाषेपेक्षा निराळी असते. म्हणजे तीला अस्थिर रुप प्राप्त होते. शेतकरी, व्यापारी, हमाल, वगैरे मंडही त्यांच्या गरजा प्रमाणे भाषेचा वापर करुन भाषेची अस्थिररुपे निर्माण करतात. बदल हा भाषेचा मुख्य गुण आहे. म्हणुन ती सतत प्रवाही असते. याला कारण भाषा ही व्यक्तीपरत्वे, जातीजमातीनुसार, भौगोलिक प्रदेशानुसार व कालगणिक बदलते.

साहित्याची निर्मीती, आकलन, आस्वाद व समिक्षा ही भाषेद्वाराच होते असते. भाषेमुळे डोळ्यसमोर एखादी आकृती उभी राहते. कारण शब्दांना संकेताने प्रतीकात्मक अर्थ चिकटलेले असतात. साहित्यकृती ही शब्दरुप असते. हे शब्दरुप काव्य, कथा, नाट्य इ. प्रकारचे असते. साहित्यीकाची प्रतिभा या रुपाद्वारे प्रकट होत असते. म्हणुन साहित्यकृती ही एक भाषिक घटना असते. कादंबरी हा खुप मोठा भाषिक आवाका असलेला वाङमयप्रकार आहे. या भाषिक आवाका रुढार्थाने गद्यमय असतो. कविता हा मर्यादित भाषिक आवाका असलेला पद्यमय वाङमयप्रकार आहे. वाङमयप्रकारात गणिक भाषा आपली रुपे बदलते कवितेतील भाषा संवादाचे प्रधान कार्य सांभाळुन भाव तीव्रतेने व्यक्त करण्यासाठी साधनरुप न राहता माध्यम होते. म्हणुन कादंबरी हा रुढार्थाने गद्य वाङमयप्रकार असला तरी तो काव्यात्म होवु शकतो.

कादंबरी हा जीवनप्रवाहाबरोबर वाहात, वाढत विकसित होत जाणारा वाङमयप्रकार आहे. जीवनातील अनेक घटना, माणसामानसातील विविध प्रकारचे संबंध, एकाच व्यक्तीच्या मनातील विचारांची गुंतागुंत ही कादंबरीच्या माध्यमातुन चांगल्या प्रकारे व्यक्त होवु शकते. यासाठी

भाषा ही आशयसुत्राला अनुसरुन वापरली जाते. घटनाप्रसंगाची वर्णने मानवी मनातील भावनांची स्पंदने, स्थळप्रदेशाची वर्णने ही भाषेद्वारे केली जाते. यामुळे भाषेला आशयानुरुप वास्तव, अतिवास्तव सौदर्यलक्षी अशी परिमाणे प्राप्त करुन घ्यावी लागतात. प्रत्येक वाङमयप्रकाराला स्वत:ची अशी एक चौकट असते. तिला आपण शब्दसंहिता म्हणु ही शब्दसंहिता विशिष्ट भाषिक रुपांद्वारा घडविली जाते. उदा. कवितेच्या शब्दसंहितेत शब्द, वाक्ये, कडवी, प्रतिभा, रुपके, प्रतिके, लय अशी भाषिक रुपे असतात. तर कादंबरीत शब्द, वाक्ये, परिच्छेद, जीवन आशय इत्यादी रुपे असतात. यावरुन आपल्याला कालाकृतीच्या एकात्म अनुभव घेता येतो.

मराठी साहित्यात असा एक प्रवाह ग्रामीण म्हणुन ओळखला जातो. 'ग्रामीण' हे साहित्यातील अभिव्यापक आशयाचे वर्णनात्मक विशेषण आहे. म्हणुनच १९६०नंतर ग्रामीण कादंबऱ्यातुन समाजविषयीचे कुतुहल व्यक्त करुन पीळदार भाषेत, गावरान ठसका, आणि रुबाब न्यारा असणाऱ्या कादंबऱ्या वाचकासमोर आल्या आधुनिकीकरणामुळे ग्रामीण जीवनात घडणारे स्थित्यंतर १९६० नंतरच्या कादबंरीतुन घडते. प्रादेशिक बोलीभाषा व तिची ताकद पाहुन लेखकांनी कादंबरी लेखन केले आहे.

वैदर्भीय ग्रामीण कादंबरीतुन समाजातील सत्य परिस्थितीचे चित्रण व ग्रामीण जीवणाचे हुबेहुब चित्रण रेखाटले आहे. गरीब जनतेवर होणारा अन्याय अत्याचार हेच या ग्रामीण कादंबरीचे वास्तव आहे.

संदर्भग्रंथ :—

१) काळुंखे रामचंद्र — ग्रामीण कादंबरी : आकलन आणि विश्लेषन
२) कुलकर्णी मदन — मराठी प्रादेयिाक कादंबरी : तंत्र आणि स्वरुप
३) ठाकुर रविंद्र — मराठी ग्रामीण कादंबरी : दिलीपराज प्रकाशन, पुणे
४) बोराडे. रा. र. — ग्रामीण साहित्याची रुपरेषा
५) रसाळ रामदास — ग्रामीण साहित्यांक (म. भा. भोसले)

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDIII) 403

ISSN : 2278-9308 March, 2023

राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक स्वातंत्र्य यातील प्राधान्यक्रमामध्ये असलेल्या ब्रिटीशकालीन वैचारिक संघर्षाचे विश्लेषण

डॉ. अशोक जाधव

सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय,

कारंजा (लाड) जि. वाशिम. 9021661009

प्रस्तावना:

ब्रिटिशांनी भारतामध्ये शैक्षणिक क्षेत्रातील केलेल्या बदलामुळे फार मोठा सुजान वर्ग निर्माण झाला. या वर्गाला ब्रिटिशांच्या दास्यात्वाची जाण झाली. त्यामुळे ब्रिटिशांकडून आपण राजकीय स्वातंत्र्य मिळविले पाहिजे असे वातावरण निर्माण झाले. आपल्या देशातील स्वशासन आमच्याकडेच असले पाहिजे असा विचार पुढे यायला सुरुवात झाली. त्यामुळे ब्रिटिशाकडून राजकीय स्वातंत्र्य मिळाले पाहिजे ही कल्पना ऐतदेशीय विचारवंतांना वाटली. राजकीय स्वातंत्र्य मिळावे या हेतूने विविध विचारवंत आपले विचार व कार्य करायला लागले. परंतु या विचार व कार्यासोबतच राजकीय स्वातंत्र्याच्या आधी सामाजिक स्वातंत्र्य हेही तेवढेच महत्त्वाचे असल्यामुळे सामाजिक स्वातंत्र्य प्रथमत: मिळावे व त्यानंतर राजकीय स्वातंत्र्य मिळावे. अशा दोन प्रकारच्या भूमिकेतून आपला विचार व्यक्त करणारे विचारवंत निर्माण होऊ लागले. प्रस्तुत शोधनिबंधात दोनही वर्गाच्या विचारवंताच्या विचारांचा परामर्श घेऊन त्याचे विश्लेषण करण्यात आले आहे.

राजकीय स्वातंत्र्याचा आग्रह:

ब्रिटिशांच्या शैक्षणिक सुधारणांमुळे निर्माण झालेल्या भारतीय विचारवंतांवर पाश्चात्य तसेच उदारमतवादी विचारांचा प्रभाव पडलेला दिसतो. ब्रिटिशांनी शिक्षणासोबतच भारतीयांचा राजकीय सहभाग वाढविण्याच्या हेतूने राष्ट्रीय महासभेचे ई. स. 1885 ला निर्माण केले. उदारमतवादी विचारवंतांनी सुरुवातीला वसाहतींच्या राज्याची, त्याचप्रमाणे राजकीय सहभागाची पाठराखण केली. पूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळाले पाहिजे अशी मागणी ई. स. 1928 च्या फैजपूर काँग्रेस अधिवेशनातून समोर आलेली दिसते. त्या अगोदर केवळ राजकीय सहभाग आणि ब्रिटिशांनी भारतीयांप्रती काय केले पाहिजे याविषयीचीच मागणी राष्ट्रीय सभेने केलेली दिसते. राजकीय स्वातंत्र्याच्या कल्पनेला ई. स.1916 साली होमरूल लीग चळवळीने प्रथमत: उभारी दिल्याचे दिसते. स्वराज्य हा माझाजन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळविणारच असे प्रसिद्ध उदगार टिळकांनी यावेळी केले. मात्र त्यांचा सामाजिक स्वातंत्र्याला टोकाचा विरोध दिसून येतो. प्रामुख्याने त्यांची प्राथमिकता राजकीय स्वातंत्र्याला होती. "कोणताही समाज जेव्हा राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करेल तेव्हाच तो खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा उपयोग घेवू शकेल. स्वातंत्र्य शिवाय समाजाची उन्नती होऊ शकत नाही समाजाची प्रगती आर्थिक, राजकीय व सामाजिक स्वातंत्र्यावरच अवलंबून असते"[1] राष्ट्रीय सभेच्या मंचावरून सामाजिक स्वातंत्र्याची चर्चा व्हावी असा विचार राष्ट्रीय सभेच्या न्यायमूर्ती रानडे या उदारमतवादी नेत्यांनी मांडला होता. परंतु टिळकांनी या विचाराचा कडाडून विरोध केला. सोबतच ब्रिटिश करीत असलेल्या सामाजिक सुधारणा कायद्यांवर सुद्धा टिळक नाखुश होते. ब्रिटिशांचा हिंदू धर्मामध्ये हस्तक्षेप करण्याला त्यांचा विरोध होता. त्यांचे म्हणणे होते की, राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आम्ही आमच्या सामाजिक व्यवस्थेमध्ये स्वतः बदल घडवून आणू. "राजकीय स्वातंत्र्य प्राप्त केल्याशिवाय समाज सुधारणेच्या मागे धावू नये. त्यामुळे राजकीय स्वातंत्र्यापासून समाजाचे लक्ष विचलित होईल. राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी आवश्यक असलेले शक्ती कमी पडेल."[2] असे त्यांचे मत होते.

टिळक व आगरकर यांच्यातील वैचारिक संघर्ष:

आगरकर व टिळक यांच्यामध्ये मतभेद हे याच कारणामुळे होते. राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक स्वातंत्र्य याबाबतीत टिळक व आगरकर यांच्यातील मतभेद प्रसिद्ध आहेत. "आधी राजकीय सुधारणा तर आधी सामाजिक सुधारणा या मुद्द्यावर एकमत न झाल्याने त्यांच्यात मतभेद होऊन दुरावा निर्माण झाला"[3] टिळक व आगरकर यांची मैत्री घट्ट होती परंतु वैचारिक मतभेदामुळे ते एकत्र राहू शकले नाही. समाजाचा भाग असलेल्या स्त्रिया या गुलाम

म्हणून समजल्या जात होती. पुरुषसत्ताक कुटुंब पद्धती असल्याने स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते. महाराष्ट्राच्या प्रबोधन काळात स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर विचार विमर्श होऊ लागला. लॉर्ड विल्यम बेटिंग ने अनिष्ट सती प्रथेची परंपरा कायदा करून नष्ट केली. बालविवाह, केशवपण तसेच स्त्रियांचे समाजातील स्थान दुय्यम स्वरूपाचे होते. ब्रिटिशांनी मुलीच्या लग्नाचे वय नऊ वरून बारा केल्याने टिळक संतापले त्यांनी या कायद्याचा विरोध केला. त्या उलट आगरकरांनी या कायद्याचे समर्थन केले. "कायद्याने मुला मुलींच्या विवाहाचे वय निश्चित केले पाहिजे. त्यामुळे बालविवाह मुळे होणारे अनर्थ टाळण्यास मदत होईल. ऋतु पूर्व पुरुष समागम शास्त्र संमत नाही अशी आगरकरांची भूमिका तर कायद्यामुळे अंमलबजावणीस अनेक अडथळे येतील, त्यामुळे कायदा नकोच. तसेच सांप्रत धर्मरूढी पद्धतीनेच विवाह पद्धती शास्त्रसंमत आहे अशी टिळकांची भूमिका होती"[4] केशवपणाच्या बाबतीतही टिळक व आगरकर यांच्या विचारात मत भिन्नता दिसते. मयत झालेल्या पुरुषाच्या पत्नीचे केस कापण्याची प्रथा म्हणजेच केशवपण. आधीच पुरुषी वर्चस्वाखाली असलेली स्त्री तिच्या पतीच्या निधनाने सामाजिक बहिष्कारास पात्र ठरत असे. त्यामुळे स्त्रीचे स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठी आगरकर प्रयत्नशील होते." विधवा स्त्रीला जबरदस्तीने विद्रूप करून तिचे अभिजात स्वातंत्र्य व सौंदर्य हिरावून घेणे होय ही प्रथा कायद्याने बंद करावी असे आगरकरांचे मत होते तर विधवेला केशवपणाने समाजात शुद्धी प्राप्त होते व तिला कुटुंबात मोकळेपणाने वावरता येते त्यामुळे ही प्रथा कायद्याने बंद होऊ नये असे टिळकांचे मत होते".[5] शारदा सदन नावाची संस्था पंडिता रमाबाई यांनी चालवली होती. ही संस्था विधवा स्त्रिया व त्यांच्या शिक्षण व पुनर्वसनाकरिता कार्य करत होती. शारदा सदन व पंडिता रमाबाई यांच्या ख्रिस्ती असण्यावरून टिळकांचा यास विरोध होता."पंडिता रमाबाई ख्रिस्ती आहेत म्हणून त्यांना विरोध करू नये, उलट स्त्री शिक्षण व विधवा पुनर्वसनास शारदा सदन मुळे मदतच होत आहे, असे आगरकरांचे मत होते. तर ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठी रमाबाईंनी शारदा सदन काढले आहे असे टिळकांचे मत होते".[6] ई. स. 1887 मधील दादाजी विरुद्ध रखमाबाई प्रकरण या संदर्भाने खूप गाजलेले दिसते. या प्रकरणाची पूर्वपिठीका अशी की, दादाजी व रखमाबाई पती-पत्नी होते त्यांच्यामध्ये बेबनाव निर्माण होऊन त्यांनी कौटुंबिक वाद न्यायालयापुढे सादर केला. हिंदू शास्त्रानुसार नवरा कसाही असला तरी स्त्री त्याचा त्याग करू शकत नाही. त्यामुळे न्यायालयाचा निकाल दादाजी च्या बाजूने लागला व रखमाबाईला निकाल मान्य नसल्यास चार महिन्याच्या कैदेची शिक्षण सुनावली. या प्रकरणात महिलेची बाजू आगरकर घेतात तर पुरुषाची बाजू टिळक घेताना दिसतात."रखमाबाई स्त्री स्वातंत्र्याच्या तत्त्वानुसार जर पती पसंत नसेल तर घटस्फोट मिळण्यास हरकत नसावी, ही आगरकरांची भूमिका होती"[8]

राजर्षी शाहू महाराजांची सामाजिक स्वातंत्र्याविषयी भूमिका:

राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक स्वातंत्र्याला महत्त्व दिल्याचे दिसून येते, सामाजिक स्वातंत्र्य की राजकीय स्वातंत्र्य याबाबतीत आपले विचार त्यांनी 15 एप्रिल 1920 रोजी नाशिक येथे श्री उदाजी मराठा विद्यार्थी वस्तीगृहाच्या इमारतीच्या कोनशिला समारंभाच्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून आपले विचार व्यक्त करताना म्हटले की, "आधी राजकीय सुधारणा की आधी सामाजिक सुधारणा हा वाद समंजसपणाचा नाही, या सुधारणा स्वतंत्र नाहीत. एकात एक गुंतलेल्या आहेत. जणू काय या दोन सुधारणा राष्ट्रोनतीच्या गाड्याची दोन चाकेच आहेत. एक चाक लावून गाडा सुरक्षित नेणे शहाणपणाचे होईल काय? या गोष्टी विचाराने सिद्ध आहेत. पाश्चात्य देशांचा अनुभवही हेच सांगतो राजकीय सुधारणा अगोदर पाहिजे सामाजिक सुधारण्याची तुर्त जरुरी नाही, असे प्रतिपादन ऐकू येते तेव्हा तेथेच काहीतरी पाणी मुरत आहे असे समजावे. हे बोलणे कपटी व काव्याचे आहे"[9] यावरून सामाजिक स्वातंत्र्याच्या संदर्भात राजर्षी शाहू महाराज आग्रही दिसतात. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात कल्याणकारी राज्यव्यवस्था ब्राह्मणेत्तर वर्गाला आरक्षण दिले. अनेकांना वकिलीच्या सनदा दिल्या तसेच शिक्षणासाठी शाळा व वसतिगृहे निर्माण केली. सामाजिक स्वातंत्र्याकरिता केवळ कायदे करून चालणार नाही म्हणून त्यांनी आदर्शवत कृतीही केलेली दिसते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सामाजिक स्वातंत्र्याविषयी भूमिका:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही सामाजिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. राजकीय स्वातंत्र्यासाठी सामाजिक स्वातंत्र्याची पूर्व अट त्यांच्या विचारातून दिसून येते. हिंदू समाजातल्या अस्पृश्य मानलेल्या जातींना सार्वजनिक ठिकाणी पाणी पिण्याचे स्वातंत्र्य ही नव्हते. स्पृश्य व्यक्ती तसेच जनावरे वरील ठिकाणचे मनसोक्त स्वातंत्र्य उपभोगत होते मात्र अस्पृश्यांना हे स्वातंत्र्य उपभोगण्याची मनाई करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे या समूहाला हिंदू असून

देखील हिंदूंच्या मंदिरामध्ये प्रवेशवर्ज करण्यात आला होता. म्हणून ते पारतंत्र्यातून मुक्त होईल तेव्हाच त्यांना राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा अर्थ कळेल अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची होती. त्यांचे याबाबतीत असे मत होते की,"नुसत्या राजकीय स्वातंत्र्याने जनतेचे कल्याण होईल, हा भ्रम आहे. इंग्रज गेला की आपण सुखी होऊ अशी खात्री कोणासही देता येणार नाही. जगातील अनेक स्वतंत्र देशातील जनता आजही दुःखी कष्टी आहे, असे अनुभवाने दिसून येते. रूमानिया, अलबेनिया, सर्विया व युगोसलावाकिया हे देश स्वतंत्र आहेत. पण ते सुखी आहेत काय? फीनलंड व रशिया यांची स्थिती आपल्या डोळ्यापुढे आहेच. ज्या राष्ट्रात समाजस्थिती सुव्यवस्थित तेच राष्ट्र स्वातंत्र्य मिळवून टिकवू शकते"[10] म्हणून कोट्यवधी समाज आजही सामाजिक पारतंत्र्यांमध्ये आहे त्याला यातून दूर काढणे गरजेचे आहे. मनुष्याला जगण्यासाठी प्राथमिक गरज अन्न पाणी लागते. परंतु हिंदू समाजातील अस्पृश्य बांधव तहान लागल्यावरही आपली तहान भागू शकत नाही याला काय म्हणावे. त्याचप्रमाणे तो देवाला नमस्कार करण्याकरिता मंदिरात जाऊ शकत नाही याला काय म्हणावे असा प्रश्न उपस्थित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक स्वातंत्र्याचा आग्रह धरताना दिसतात यासाठी मंदिर प्रवेश चळवळी व सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्री स्वातंत्र्य यावर जी बंदी घालण्यात आली किंवा एकूणच ब्राह्मणेतर समाजाचे नुकसान ज्या ग्रंथाने केले त्या मनुस्मृतीचे दहन डॉ. आंबेडकर यांनी केले.स्त्रिया व ब्राह्मणेत्तर समाजाचे स्वातंत्र्य ज्या धर्मग्रंथाने हिरावून घेतले तो धर्मग्रंथ म्हणजे मनुस्मृती होय. म्हणून त्यांनी तिचे प्रतीकात्मक दहन ई. स. १९२७ ला महाड येथे केले. हिंदू धर्मातील धर्मशास्त्राचे उदात्तीकरण त्यांना मान्य नव्हते. त्यानुसारच समाजव्यवस्था वर्णवादी व जातीव्यवस्थाक बनल्यामुळे समाजात आर्थिक, सामाजिक, राजकीय, तसेच न्यायिक विषमता निर्माण झाली असल्यामुळे बहुसंख्यांक भारतीय समाजाला सामाजिक स्वातंत्र्य उपभोगता येत नाही. त्यामुळेच अश्या धर्मशास्त्राचा निषेध डॉ. आंबेडकर यांनी केलेला दिसतो.

मूल्यमापन:

ब्रिटिशकालीन कालखंडात,जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेठ, दादाभाई नौरोजी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, महात्मा ज्योतिराव फुले, डॉ. भाऊ दाजी लाड, लोकहितवादी, ग.वा. जोशी, विष्णुशास्त्री भांडारकर, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, पंडिता रमाबाई, दादोबा तरखडकर, छत्रपती शाहू महाराज, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, यासह अनेक विचारवंतांनी सामाजिक स्वातंत्र्याला अग्रक्रम दिलेला आहे. भारताच्या स्वातंत्र्याची मागणी करणे असा विचार खऱ्या अर्थाने ई. स. 1916 नंतरच होमरूळ चळवळीतून समोर आलेला दिसतो. तत्पूर्वी ब्रिटिशांकडून भारतीयांसाठी सुधारणात्मक उपायोजना करण्यासंबंधी अर्ज विनंती करण्याची भूमिका राष्ट्रीय सभेकडून व इतरही संस्था व संघटने कडून घेतल्या गेली. ई. स. 1916 नंतरच स्वातंत्र्याच्या मागणीचा जोर धरण्यात आला. राजकीय स्वातंत्र्याचा प्रथमता आग्रह धरला तो बाळ गंगाधर टिळकांनी हे कबूल करावे लागते. परंतु त्यांच्या सामाजिक स्वातंत्र्य संदर्भात जाणीवा खुजा वाटतात. त्यांनी राजकीय स्वातंत्र्याला प्राथमिकता दिलेली दिसते. राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सामाजिक स्वातंत्र्याचा विचार त्यांनी मांडला होता हे देखील कबूल करावे लागेल. परंतु स्वातंत्र्यानंतरचा कालखंड पाहता आजही सामाजिक स्वातंत्र्याची गळचेपी झाल्याचे दिसून येत आहे. आजची परिस्थिती लक्षात घेऊन टिळकांनी सुद्धा सामाजिक स्वातंत्र्यालाच महत्व दिले असते. महात्मा फुले, आगरकर, महर्षी कर्वे, यासह अनेकांनी सामाजिक स्वातंत्र्याला अग्रक्रम दिला. स्त्रियांचे स्वातंत्र्य तसेच कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे स्वातंत्र्य मिळविता येण्यासाठी त्यांनी चळवळी उभारल्या. या चळवळी व आंदोलनाची फार आवश्यकता होती याची जाणीव या निमित्ताने होते. सामाजिक स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय राजकीय स्वातंत्र्याला अर्थ मिळणार नाही हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विधान आजही प्रासंगीकच वाटते. त्यामुळे राजकीय स्वातंत्र्याच्या मागणी बरोबरच सामाजिक स्वातंत्र्याची मागणीचा पुरस्कार केला असता तर वर्तमानातील राजकीय स्वातंत्र्याचे चित्र वेगळे दिसले असते.

संदर्भग्रंथसुचि:

1. देशपांडे श्रीकांत वि, भारतीय राजकीय विचारवंत, मंगेश प्रकाशन नागपूर द्वितीय आवृत्ती 2009 पृ. क्र. 20
2. पूर्वोक्त. पृ. क्र. 19
3. पाटील रामचंद्र, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, दीपस्तंभ प्रकाशन जळगाव 2017, पृ. क्र. 116.
4. पूर्वोक्त पृ. क्र. 116

5. पूर्वोक्त पृ. क्र. 117
6. पूर्वोक्त पृ. क्र. 117
7. पूर्वोक्त पृ. क्र. 117
8. पूर्वोक्त पृ. क्र. 117
9. संपादक, जाधव ग. बा. आधुनिक भारतीय पुरोगामी राष्ट्रवादाचे जनक राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे, लोकवाङ्मय गृह चौथी आवृत्ती 2009 पृ. क्र. 65
10. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग 2 1937 ते 1945, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती महाराष्ट्र शासन पृ. क्र. 332

कोविड-19 महामारीमध्ये ग्रंथालय उपक्रम

डॉ. सुखलाल राठोड,

ग्रंथालय, गोदावरी कला महाविद्यालय अंबड, जि. जालना.

प्रस्तावना :

संपूर्ण जगाची गती कोविड 19 या महामारीने स्थिर केली आहे. गेल्या दोन वर्षापासून जगावर या महाभयानक महामारीची काळोखछाया पडली आहे. यामुळे येथील जवळ-जवळ 10 लाख 6 हजार 379 लोकांचा मृत्यु झाला आहे. सर्वत्र भयाण वातारण निर्माण झाले आहे. हि परिस्थीती घालवण्यासाठी या महामारीवर योग्य संशोधन करुन उपाय शोधले पाहिजे. संशोधनासाठी आवश्यक घटक म्हणजे 'ग्रंथालय' आहे. हि ग्रंथालये हि बंदिस्त झाली आहेत ती नव्यानं वेगवेगळया उपक्रमाच्या माध्यमातून सुरु झाली पाहिजेत. ग्रंथालयांचे मुख्यत: सार्वजनिक ग्रंथालय आणि शैक्षणि ग्रंथालय असे प्रकार पडतात. सर्व शैषणिक संस्था बंद झाल्या कारणाने ग्रंथालये हि बंद झालीत. ती कोविड 19 चा सामना करत सुरु झाली पाहिजेत. याचा आढावा प्रस्तुत संशोधन लेखात घेतला आहे.

ग्रंथालयाची माहिती :

ग्रंथालय म्हणजे ग्रंथसंग्रहाचे स्थान आहे. याचा उगम प्राचीन काळातच झालेला आहे. इष्टिका, पपायर्स व चामडे यावर माहिती चित्रित व मुद्रित केली जात होती. हि एक सामाजिक संस्थाच असून ती मानव संस्कृतीशी निगडित आहे. यामध्ये ग्रंथ, वाचक आणि ग्रंथालयातील कर्मचारी यांचा समावेश होतो. ग्रंथालयांनी प्राचीन काळापसून मानवी संस्कृती प्रगल्भ करण्याचे कार्ये केले आहे. कालानुरूप त्यात बदल होत आला आहे. आज मुद्रण प्रणाली अतिशय विकसित झायाने हजारो नवनवीन ग्रथांची निर्मिती झपाटयाने होत आहे. या ग्रंथांना योग्य पध्दितीने वर्गीकरण करुन क्रमवार साठवून ठेवून वाचकांना त्यांच्या मागणीनुसार ग्रंथ उपलब्ध करुन देण्याचे कार्ये ग्रंथालय करत असते.

ग्रंथालयाचे कार्ये :

ग्रंथालय हे सामाजिक संस्थेचा भाग असल्याने समाजोपयोगी वेगवेगळी कार्ये करत असतात ती म्हणजे.

शैक्षणिक कार्ये :

ग्रंथालयाचे हे सर्वा महत्वाचे कार्ये आहे. शिक्षणातील अत्यावश्यक घटक म्हणून ग्रंथालयाकडे पाहिले जाते. कोणत्याही प्रकारचे शिक्षण असो त्यासाठी माहितीची उपलब्धता आवश्यक असते. ती मिळवून देण्याचे कार्ये ग्रंथांच्या माध्यमातून ग्रंथालय करत असतात. शैक्षणिक ग्रंथालचे असो वा सार्वजनिक ग्रंथालय, यातून ज्ञान प्राप्त होत असते. म्हणूनच ग्रंथालय हे महाविद्यालयाचा आत्मा आहे असे म्हटले जाते.

संशोधनात्मक कार्ये :

शिक्षण घेतलेला व्यक्ती नवनवे संशोधन करुन आपल्या ज्ञानात भर टाकत असते. जगाच्या प्रगतीसाठी वेगवेगळया विषयावर संशोधन होणे आवश्यक असते. या संशोधनाचा मूळ पाया हा ग्रंथालयापासूनच सुरु होतो. ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथांचे वाचन करुनच पुढील संशोधन होत असते.

राजकिय कार्ये :

राजकारण हा प्रत्येक माणसाच्या जीवनाशी निगडित विषय आहे. कोणत्याना कोणत्या मार्गाने त्याचा संबंध राजकारणाशि येत असतो. राजकीय परिस्थीती कशा पध्दतीची आहे याचे ज्ञान ग्रंथालयातून होत असते. जगातील प्रभावी व्यक्तिंनी महत्वपूर्ण ग्रंथांचे वाचन करुन आपले विचार लोकांना पटवून देऊन सत्ता प्रस्थापित केली आहे. म्हणजे राजकीय कार्ये हि ग्रंथालयात करत असते.

औद्योगिक कार्ये :

औद्योगिकरण हे जगाच्या विकासाचे सर्वात महत्वपूर्ण साधन आहे. वेगवेगळी कारखाने निर्माण होऊन मानवाचे जीवन अधिक सुखकर करण्याचे कार्ये यातून होते. या औद्योगिकरणासाठी योग्य मार्गदर्शन लिखित स्वरुपात ग्रंथालयात उपलब्ध असते. म्हणुन औद्योगिकरण करण्यासाठी ग्रंथालय कार्य करत असते.

सांस्कृतिक कार्ये :

ग्रंथालय हे मानवी जीवनाशी अतिशय निगडीत आहे. मानवाच्या वेगवेगळया चालीरिती, संस्कृती या ग्रंथालयात मुद्रित झालेले आहेत. वेगवेगळी धार्मिक ग्रंथालये, भाषा, साहित्य यामधून मानवी संस्कृतीचे जतन होत असते. अशी ग्रंथ ग्रंथालय उपलब्ध करुन देते म्हणजे जे सांस्कृतिक कार्ये करते.

शैक्षणिक ग्रंथालय :

ग्रंथालयाचे मुख्यत: दोन प्रकार पडतात. 1) सार्वजनिक ग्रंथालय आणि शैक्षणिक ग्रंथालय. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे सर्व वाचकांसाठी ते खुले असते. यामध्ये वय, हुद्दा, वर्ग, वर्ण असा कोणताही भेद येथे नसतो, तर शैक्षणिक ग्रंथालये हि केवळ शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच खुले असते. शैक्षणिक ग्रंथालय हि अतिशय महत्वपूर्ण असून, ती विस्तृत प्रमाणात असतात. कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा प्रमुख घटक ग्रंथालय असतो. शालेय व महाविद्यालयीन ग्रंथालये विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकणारे महत्वपूर्ण कार्ये करत असतात. नवीन शैक्षणिक धोरणात देशाच्या समृध्दीसाठी विद्यार्थ्यांचा हातभार कसा लावता येईल, यावर भर देण्यात आला आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना अधिकाधिक जगभरातील ज्ञान सहजासहजी उपलब्ध करुन देण्याचे कार्ये ग्रंथालयेच करु शकतात. मात्र सध्या सुरु असलेल्या परिस्थीतीत हे कार्य करणे शक्य होत नाही.

कोविड 19 महामारी आणि ग्रंथालय :

जगभरात कोविड 19 म्हणजेच कोरोना या भयाण महामारीने हाहाकार माजवला आहे. अनेक लोकांचे प्राण गेले आहेत. सगळीकडे अतिशय भीतीयुक्त वातावरण तयार झाले आहे. आतापर्यंत अनेक रोग आले ते हि घातकच आहेत, मात्र याचे वास्तव खूप वेगळे आहे. हा अतिसंसर्गजन्य रोग आहे. खूप लवकर त्याचे संक्रमण होत आहे, आणि अद्यापपर्यंत तरी यावर कोणालाही औषधीय उपाय शोधता आलेला नाही. परिणामी याच्या संक्रमणामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या झपाटयाने वाढत आहे. भारताचा विचार केला तर, आतापर्यंत 3 लाख 53 हजार 528 लोकांनी कोरोनामुळे जीव गमावला आहे. अशा भयानक रोगापासून स्वरक्षण म्हणून एकमेकांपासून दूर राहणे हाच प्रभावी उपाय यावर सांगितला जातो. हे शक्य नव्हते, म्हणून लॉकडाऊन लावण्यात आले. यामध्ये सर्व कार्यालये, दळणवळणाची साधने बंद करण्यात आली. यामुळे माणूस आपोआपच बाहेर न पडता घरीच राहु लागला. तरीही या रोगाने दुसऱ्या लाटेत भयाण रुप धारण करुन अनेकांना यमसदनी पाठवले. कोरोना विषाणूचा बाधा झालेल्यांसाठी त्यांना विलगीकरणात ठेवण्यात येऊ लागले. अशा परिस्थीतीत ग्रंथालये बंद झाली.

ग्रंथालये हे ज्ञानसाधना, मनोरंजनाचे व मनोविकासाचे प्रभावी साधन आहे. ती पूर्णपणे बंद करणे हिताचे नाही. हे लक्षात घेऊन, काही प्रमाणात ग्रंथालये खुली करण्यात आली आहेत. काविड 19 चे लॉकडाऊन शैक्षणिक संस्थांना हि लागू आहे. दोन वर्षापासून शाळा, महाविद्यालये बंद आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे बौध्दिक नुकसान होत आहे. कारण त्यांना ग्रंथालयात जाऊन ग्रंथ वाचन करता येत नाही. काही काळानंतर कोविड परिस्थीती सुधारतांना दिसत आहे. मात्र पूर्णपणे निवळली नाही. अशा परिस्थीतीत ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग शोधण्यात आला. हे शिक्षण सुरु हि झाले. मात्र यामध्ये अनेक अडथळे आहेत. प्रत्येक विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेऊ शकत नाही. कारण तशी साधने त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. जरी उपलब्ध झाली तरी, त्यातून पुरेसे ज्ञान मिळत नाही. म्हणून विद्यार्थ्यांच्या

विकासासाठी ग्रंथालयांनी नवनवीन उपक्रम राबवून, ग्रंथ त्यांच्यापर्यंत पोहचवली पाहिजेत. जगभरातील ग्रंथालयांना निर्बंधापासून ते पूर्ण बंद होईपर्यंत कोण-कोणत्या सेवा द्यावयाच्या या भयानक समस्येचा सामना करावा लागत आहे. ग्रंथालये सुरु ठेवायची असतील तर पुढील उपाय करणे आवश्यक आहे.

1. **हात सॅनिटायझर करणे :**

ग्रंथालयात प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाने आपले हात योग्यरित्या सॅनिटायझर करुन घ्यायला पाहिजेत. याबरोबरच मुखपट्टी सतत वापरली पाहिजे. आणि योग्य अंतर ठेवले पाहिजे. ग्रंथालय व सर्व साधने स्वच्छ ठेवली पाहिजेत. कोरोना हा विषाणू भयानक आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याला नष्ट करण्यासाठी उपाय केले पाहिजे. यासाठी सर्व परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. सॅनिटायझर केला पाहिजे. संगणक व इतर साधने हि स्वच्छ ठेवून सतत सॅनिटायझर केले पाहिजेत.

2. **परत केलेली पुस्तके वेगळी ठेवणे :**

वाचकांनी परत केलेली पुस्तके, वेगळी ठेवून त्यांचे हि निर्जंतुकरण केले पाहिजे.

3. **कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे :**

ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांची नेहमी तपासणी करुन प्रवेश दिला पाहिजे. यासाठी त्याला कोरोना प्रतिबंधात्मक साधने मोफत मिळाली पाहिजेत. याबरोबरच त्याला वेळेवर वेतन हि मिळण्याची व्यवस्था केली पाहिजे.

4. **वाचनकर्त्यांची संख्या मर्यादित करावी :**

ग्रंथालये हि खूप मोठी असतात. येथे रोज अनेक वाचक येत असतात. मात्र या काळामध्ये यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. वेगवेगळे दिवस ठरवून प्रत्येकाने ठरलेल्या दिवशीच ग्रंथालयात यावे, असे नियोजन करुन एकत्र होणारी गर्दी कमी करुन कोविड काळात हि ग्रंथालये सुरु ठेवता येतील.

5. **दूरस्थ सेवांचा अधिक वापर :**

ग्रंथालयामध्ये ज्ञान मिळविण्यासाठी, पुस्तके घेण्यासाठी विद्यार्थी येत असतात. हे कोरोना काळात योग्य नाही. महणून विद्यार्थ्यांना शक्य तो घरपोच ग्रंथ मिळण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

6. **ऑनलाईन माहिती पुरवणे :**

विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाची सवय झाली आहे. ऑनलाईन वर्ग घेतले जात आहेत. मात्र ग्रंथालय उपलब्ध होत नाहीत. म्हणून विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी ग्रंथ ऑनलाईन स्वरुपात पुरवली पाहिजेत. यासाठी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर सहज पुस्तके उपलब्ध करुन दिली पाहिजेत. विद्यार्थ्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक घेऊन वर्गनिहाय ग्रुप बनवून सर्व विद्यार्थ्यांसाठी एक पुस्तके अनेकांनी वाचता येईल. असे नियोजन केले पाहिजे.

कोरोना घडामोडींची योग्य माहिती देणे :

कोरोना हि महामारी दिवसेंदिवस घातक ठरत आहे. तिला नियंत्रणात आणण्यासाठी होणाऱ्या नवनवीन उपयांची माहिती एकत्र करुन प्रत्येक ग्रंथालयांनी ऑनलाईन सहजरित्या उपलबध होईल, अशी संकेतस्थळावर संकलित केली पाहिजे.

सांराश :

अशाप्रकारे कोविड 19 या महामारीने त्रस्त झालेल्या जगाला सावरण्यासाठी ग्रंथालय उपयुक्त ठरु शकतात. शैक्षणिक ग्रंथालयातील अफाट ग्रंथसाठा त्यांच्या वापराविना अज्ञान पसरण्यास वेळ लागणार नाही. म्हणुन शैक्षणिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्य योग्यरित्या पार पाडली पाहिजेत. कोरोना ग्रस्त लोकांसाठी ग्रंथ उपलब्ध करुन देण्याचे प्रयोग काही ठिकाणी यशस्वी झाले आहेत. ग्रंथ वाचनामुळे विलगीकरणातील कोरोना रुग्णांना बौध्दिक मेजवानी मिळाल्याने त्यांनी कोरोनावर मात केल्याचेही निदर्शनास आले आहे. म्हणून बौध्दिक मेजवानी मिळाल्याने

त्यांनी कोरोनावर मात केल्याचेही निदर्शनास आले आहे. म्हणून वाचन संस्कृती कायम टिकवून ठेवण्यासाठी विद्यार्थी दशेतच विद्यार्थ्यांना वाचनाची ओढ लावण्याचे शैक्षणिक ग्रंथालये कार्ये करु शकतात. म्हणून अधिकाधिक विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करणे हाच कोविड 19 महामारीच्या काळातील प्रभावी उपक्रम असेल.

संदर्भ :

1. नरगुंडे रेवती, ग्रंथालये आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन, पूणे.
2. कुंभार रा., ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन, पुणे युनिव्हर्सल प्रकाशन 2015.
3. काटे ना.रा. ग्रंथालय संदेशवहन आणि समाज, अरुणा प्रकाशन लातूर 2012.
4. शेटकर ग. भारतीय शिक्षणाचा इतिहास, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
5. Pooja P. Dadhe, Library Services Provided During Covid-19 Pandemic : Content Analysis of websites of Premier Technological institute of India.
6. www.worldmeters.info/coronavirus.
7. दैनिक लोकसत्ता वृत्तपत्र.
8. दैनिक महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्र.

भारतीय बॅकिंग क्षेत्र — आव्हाने व संधी

डॉ. गजानन सोमकूंवर

बॅरि. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय खापरखेडा जि. नागपूर.

सारांश

भारतातील बॅकिंग उदयोगाचा इतिहास हा फार मोठा आहे. यामध्ये पारंपारीक बॅकेपासून ते ब्रिटीशाचा काळ ,स्वातंत्रयानंतरचा काळ, राष्ट्रीयकरनानंतरचा काळ ते खाजगीकरण व आता परदेशी बॅकेची वाढती संख्या असा हा दिर्घकालीन प्रवास भ ारतीय बॅकेचा आहे. बॅकिंग क्षेत्रात फार मोठया प्रमानात सूंधारना झालेल्या आहेत. ग्राहकांना आधूनिक सुविधा देण्यासाठी अनेक बदल करण्यात आलेले आहे.भारत स्वातंत्र झाल्यानंतर बॅकां हया खाजगी स्वरुपाच्या होत्या . सामाण्य मानसाना बॅकिंग सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी बॅकांचे राष्टीयकर करण्यात आले.त्यांनतर खाजगीकरण , उदारीकरण व जागतीकीकरण धोरण स्विकारल्यानंतर बॅकिंग क्षेत्रात खजगीकरणाला वाव देण्यात आला. व त्यानंतर खाजगी बॅका ग्राहक सेवेसाठी उपलब्ध करुन देण्यात आल्या. त्यामूळे सार्वजनिक बॅकां व खाजगी बॅका यामध्ये स्पर्धा निर्माण होवून ग्राहकाना उच्च दर्जाची सेवा मिळण्याची स्रधी प्राप्त झाली. भारतीय बॅकिंग क्षेत्रात अनेक बदल झालेले आहेत. बॅकांच्या आधूनिक सुविधामूळे बॅक आता प्रत्येक घराघरात पोहचली आहे मग ते ग्रामिण क्षेत्र असो वा शहरी क्षेत्र असो. सध्या बॅकिंग क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमानात करण्यात येत आहे. त्यामूळे धोके व समस्या सुध्दा मोठया प्रमानात वाढलेल्या आहेत. त्यामूळे बॅकेला ग्राहकाच्या भविष्याचा विचार करुन खबरदारी घेणे आवश्यक आहे.हा लेख तीन भागात विभागला गेला आहे. पहिल्या भागात बॅकिंग उदयोगाचा परिचय व इतिहाय, दूस—या भागात बॅकेसमोरिल आव्हाने व संधी आणि तीस—या भागात निष्कर्ष घेतलेला आहे. एन.पी. ए. ही बॅकिंग क्षेत्रासमोरिल फार मोठी समस्या आहे. त्यासाठी सरकारने अनेक बॅकांचे विलीनीकरन करायला सुरवात केलेली आहे.तसेच भारतामध्ये खानगी बॅकांच्या शाखा मोठया प्रमानात स्थापन होत आहे.

प्रस्तावना

बॅकिंग क्षेत्राची सुरवात ब्रिटिश काळात १७ व्या शतकात झाली. ब्रिटिशानी भारतात व्यापार करण्याकरीता प्रवेश केला. भारतीय पेढयावर त्यांचा नसलेला विश्वास आणि भाषेची अडचन असल्यामूळे त्यांना भारतीय पेढयाबरोबर व्यवहार करणे जमले नाही. यामूळे ब्रिटिशांनी एजंसीगृहे तयार केली. ही एजंसीगृहे म्हणजेच आजच्या बॅक व्यवसायायाची सुरवात होय. इंग्रजानी सर्वप्रथम १७७० मध्ये कलकत्ता येथे बॅक ऑफ हिदूस्थान ची स्थापना केली. त्यानंतर बॅक ऑफ बंगाल,बॅक ऑफ बॉम्बे आणि बॅक ऑफ मद्रास ची स्थापना केली. १९२१ मध्ये या सर्व प्रेसिडेंसी बॅकेचे एकत्रीकरण करुन इंम्पीरिअल बॅक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. रिझर्व्ह बॅकेच्या स्थापनेपूर्वी इंपिरिअल बॅक मर्यादित प्रमानात केद्रीय बॅकेचे कार्य करीत होती. रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाचा कायदा १९३४ मध्ये मंजूर करण्यात आला असून १ एप्रील १९३५ मध्ये रिझर्व्ह बॅक ऑफ इंडियाची स्थापना झाली.बॅकिंग नियमन कायदा १९४९ लार मंजूर करण्यात आला व या नियमाने रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया सरकारी नियंत्रणखाली आणल्या गेली. या कायदयाअंतर्गत रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया ला बॅकांच्या पर्यवेक्षण आणि नियंत्रणाखाली विस्तृत अधिकार मिळालेत.

स्वातंत्रयापूवी बॅकांवर मोजक्याच लोकांचे नियंत्रण होते.सामाण्य जनता बॅकापासून बरिच दूर होती. त्यामूळे स्वातंत्रयानंतर भारत सरकारने १९५५ इंपिरिअल बॅकांचे राष्ट्रीयकरण करुन स्टेट बॅक ऑफ इंडियाची स्थापना केली. १९६९ मध्ये ज्या बॅकांच्या ठेवी पन्नास कोटी पेक्षा जास्त

आहे अशा १४ बॅकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. व बॅक व्यवसाय हा सामान्य माणसापर्यन्त पोहचविण्याचा प्रयत्न सरकारने केला. त्यानंतर १९८० मध्ये ज्या बॅकांच्या ठेवी २०० कोटीपेक्षा जास्त आहे अशा ६ बॅकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले व बॅक व्यवसाय सामान्य मानसापर्यन्त पोहचविण्याचा प्रयत्न सरकारने कलेला आहे.

बॅकांना सक्षम बनविण्यासाठी १९९१ मध्ये रिझर्व्ह बॅकेचे माजी गव्हर्नर एम. नरसिहमं यांच्या अध्यक्षेतेखाली समिती स्थापन करण्यात आली.या समितीने १९९२ मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वीकृत बूॅकींग पद्वती लागू करण्यासाठी बॅकिंग क्षेत्रासाठी व्यापक सुधारना सूचविल्या होत्या. १९९३ मध्ये बॅकिंग रेग्यूलेशन कायदयातील दुरस्ती मूळे नविन खाजगी क्षे.त्रातील बॅकेचा समावेश झाला. १९९८ मध्ये बॅकिंग सेंवा सुधारण्यासाठी नरसिहंम याच्या अध्यक्षतेखाली पून्हा समीती स्थापन करण्यात आली..या समीतीने बॅकिंग क्षेत्रातील स्वायत्ता देशातील ४ स्तरिय बॅकिंग व्यवस्था,विहीत भांडवली पर्याप्त व्यवस्था निकष वाढविणे आणि परदेशी बॅकांच्या प्रवेशसंबधी या समीतीने शिफारशी केलेल्या होत्या.

भारतातील बॅक्किंग उदयोगाचा विकास गेल्या काही वर्षामध्ये फार मोठया प्रमानात झालेला आहे. पतविस्ताराचा उच्च वेग, विकसित बाजारपेठेतील बॅकांप्रमाने नफा, उत्पादकतेत वाढ,,गैरकार्यक्षम मालमत्तेचे प्रमाण कमी, आर्थिक सर्वसमावेशक लक्ष,यामूळे भारतीय बॅकींग व्यवस्था मजबूत बनत आहे. या पेपरमध्ये बॅकिंग उदयोगाला समोर जाण्यासाठी शक्यता असलेल्या विविध आव्हानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

उदिष्टे

बॅकिंग क्षेत्राची ऐतिहासीक प्राश्र्वभूमी तपासणे

बॅकिंग क्षेत्रातील आव्हानाचा अभ्यास करणे

बॅकिंग क्षेत्रातील विकासासंबधी उपाय सूचविणे

संशोधन पद्वती

प्रस्तूत संशोधन पेपरसाठी वर्णनात्मक संशोधन पद्वतीचा वापर करण्यात आलेला

ऐतिहासिक पार्श्भूमी

भारतामध्ये सर्वप्रथम बॅक ऑफ हिदूस्थानची स्थापना १८७० मध्ये झाली.ही भारतातील सर्वप्रथम बॅक होय. त्यानंतर प्रेसिडेन्सी बॅकेच्या अधिनियम अंतर्गत १८७६ मध्ये बॅक ऑफ कलकत्ता.बॅक ऑुफ बॉम्बे, बॅक ऑफ मद्रास या तीन बॅकाची स्थापना करण्यात आली.१९२१ मध्ये या सर्व प्रसिडेन्सी बॅकांचे एकत्रीकरण करुन इंम्पिरिअल बॅक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. भारत स्वातंत्र झाल्यानंतर बॅक व्यवसाय हा खाजगी होता.सामाण्य मानसापासून हा व्यवसाय कोसो दूर होता. ही उनिव लक्षात घेवून १९६९ मध्ये ज्या बॅकांच्या ठेवी ५० कोटीपेक्षा जास्त होत्या अशा १४ बॅकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. बॅक व्यवसाय सामाण्य मानसासाठी उपलब्ध करुन देण्यात आला.त्यानंतर १९८० मध्ये ज्या बॅकांच्या ठेवी २०० कोटी पेक्षा जास्त आहे अशा ६ बॅकांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले त्यानंतर १९९१ मध्ये रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया चे माजी गव्हर्नर एम. नरसिहम याच्या अध्यक्षतेखाली समीती नियूक्त केलेली होती.व पून्हा १९९८ मध्ये एम. नरसिहम यांच्या अध्यक्षतेखाली समीती नियूक्त केलेली होती. या समीतीने चार स्तरिय बॅकिंग संरचना,विहित भांडवली निकष वाढविणे, आणि खाजगी बॅकांना प्रवेश अशा प्रकारच्या शिफारशी केलेल्या होत्या.सर्व शिफारशिची अंमलबजावणी तात्काळ करण्यात आलेली नाही परंतू ही समीती बॅकिंग क्षेत्रातील सुधारण्यामध्ये एक प्रमूख घटना असल्याचे सिद्व झालेले आहे.

भारतातील बॅक्किंग क्षेत्र हे भारतीय रिझर्व्ह बॅकेच्याक्षेत्राखाली कार्य करते.नियामक— केंद्रिय बॅक, शेडयूल व नॉन शेडयूल बॅकां असलेल्या बहूस्तीय नेटवर्कसह बॅक आधारीत वित्तीय प्रणालीचे

अनूकरण करता. या शेडयूल व नॉनशेडयूल बॅका विविध श्रेणीमध्ये कार्य करतात. ज्यात मोठया सरकारी बॅका, जून्या खाजगी बॅका,नविन खाजगी बॅका, परदेशी बॅका, प्रादेशिक ग्रामीण बॅका,सहकारी बॅका,बिगर बॅकिंग वित्तीय संस्था आणि विकास वित्तीय संस्था. अत्यंत उपयूक्त आणि अपरिहार्य अशी व्यवहारीक बॅकिंग संरचना भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीमध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे.

१९८८ मध्ये सी. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली बॅकांच्या संगणकीकरणावर समीती स्थापन करण्यात आलेली होती. व तेव्हापासूनच भारतात डिजिटल बॅकिंगची सूरवात झालेली होती.व भारतातील बॅकाच्या कामकाजात झापाटयाने बदल झालेला आहे. एमआयसिआर,आधारीत चेक,ई बॅकिग मोबाईल बॅकिंग, अशा प्रकारचे अनेक नवनविन तंत्रज्ञान बॅकिंग क्षेत्रात वापले जात आहे. व ग्राहकाना नवनविन प्रकारच्या सेवा बॅक ग्राहकांना देत आहे.

बॅकिंग क्षेत्रापुढील आव्हाने

१. एन.पी.ए. हे बॅकेसमोरिल सर्वात मोठे आव्हान आहे. एन.पी.ए. ला बूडित कर्ज असेही म्हणतात.देशातील एकूण एन.पी.ए. मध्ये ७० टक्के पेक्षा जास्त वाटा हा कॉपोरेट क्षेत्राचा आहे. भारतीय बॅकांना हा सर्वात मोठा धोका आहे.गेल्या काही वर्षात अर्थव्यवस्थेतील मंदीमूळे एन.पी.ए . मध्ये मोठया प्रमाणत वाढ झालेली आहे. ही कर्ज परत मिळत नसल्यामूळे बॅकांचे फार मोठया प्रमानात नूकसान होत आहे. जेव्हा कर्जदार कर्ज फेडण्यास तयार नसतो जेव्हा बॅक दिर्घ कालावधिसाठी परतफेड करण्यासाठी कर्ज अधिक लवचिक बनवते. तेव्हा पुनर्रचित मालमत्तेमूळे बॅकेच्या नफयावर परिणाम होतो. आय.एम.एफ. च्या अहवालानूसार भारतातील एकूण कर्जापैकी ३६.९ कर्जाला धेाका आहे.तरीही भारतामधील बॅकामध्ये ६.९ टकके नूकसान शोषण्याची क्षमता आहे.जर कर्ज वाईट झाली तर बॅकांना फार मोठया नुकसानीला समोर जावे लागते.

२. जोखीम व्यवस्थापन प्रणाली सुधारने आर.बी.आय.ने १९९ मध्ये बॅकामधील मालमत्ता दाईत्व व्यवस्थापन आणि जोखीम व्यवस्थापन प्रणालीवर मार्गदर्शन तत्वे जाहीर केली होती. आणि ऑक्टो२००२ मध्ये क्रडिट जोखीम व्यवस्थापन व बाजार जोखीम व्यवस्थापनावर मार्गदर्शन नोटस आणि २००५ मध्ये ऑपरेशन रिक्स मॅनेजमेंटसवर नोटस जाहीर केलेली होती.जोखीमीवर लक्ष केंदीत केले तर त्याची अंमलबजावनी स्वत:च एक अंत म्हणूनपाहिले जावू शकत नाही. सध्याचे व्यावसाईक वातावरण जोखीम व्यवस्थापनासाठी एकात्मीक दृष्टीकोनाची मागणी करते.प्रत्येक जोखीम स्वतंत्रपणे व्यवस्थापीत करणे यापूढे पूरेशे नाहीत. भारतातील बॅका वयक्तीक संगमेट सिस्टममधून एंटरप्राईझवाईड रिस्क मॅनेजमेटकडे जात आहे. यामूळे बॅकेतील जोखीम व्यवस्थापन कौशल्याची अधिक मागणी होत आहे.आणि क्षमता वाढविण्याची गरज समोर आलेली आहे. प्रथम प्राध्यान्य संपूर्ण जोखीम एकत्रीकरणाच्या इष्टतेकडे देखिल लक्ष देणे आवश्यक आहे.

३. भारतातील बहूसंख्य जनता ग्रामीण भागात राहते.सध्याग्रामीण भागात बॅकेच्या पूरेशा शाखा नाहीत.एटीएम नाहीत. बॅकिग क्षेत्राकडे अजूनही ग्रामीण भागातील बाजारापर्यन्त पोहचण्यासाठी पायाभूत सुविधा नाहीत. ज्या शाखा ग्रामीण भागात आहे त्या शाखेमध्ये तांत्रीक सुधारण्याचा अभाव आहे. शहरातील बॅकामध्ये असलेल्या सेवा ग्रमीण भागात आढळून येत नाही. बॅकांना स्पर्धा करावयाची असेल तरहे सर्व आवश्यक आहे. .

४. फसवणूक हे कर्जदाराद्वारे केलेले जानूनबूजून केलेल कृत्य आहे. यामध्ये गुतविलेल्या निधिचा घेाटाळा दिसून येता .या फसवणूकीमध्ये अकाउट फसवणूक,डीमांड ड्रॉप फसवणूक विमा नसलेल्या ठेवी, बिल डिस्केकटिग फसवणूक फसवे कर्ज इ. उदाहरणे आहेत.

५. भारतीय बॅकांनी संगणीकृत कामकाज सूरु केलेले आहे आणि इतरही तांत्रीक सुधारना केलेल्या आहेत.परंतू त्या पूरेशा आहेत काय मोठया शहरातील बॅकेकडे पूरेशे तंत्रज्ञान आहे परंतू

ग्रामीण बॅकेकडे नाही त्यामूळे मोठया शहरातील बॅका व ग्रामीण क्षेत्रातील बॅका च्या शाखेची तूलना करता येणार नाही.

६. सध्या सार्वजनिक क्षेत्रातील बॅकेमधून अधिक कर्मचारी निवृत्त होत आहे.तर कनिष्ठ स्तरावरील तरुण कर्मचारी अधिक अनूभव असणा—याची जागा घेत आहे.परिणामत:हा मध्यम व वरिष्ठ पातळीवर एक आभासी पोकळी निर्माण होत आहे.

७. ग्राहक सेवा बॅकिग पद्धतीबाबत चिंता आहे. ज्यात लोकसंख्येच्या मोठया वर्गाला विशेष: निवृत्ती वेतनधारक, स्वयरोजगार आणि असंघटीत क्षेत्रात काम करणा—या वगळले जाते. बॅकानी लोकसंख्येच्या सर्व वर्गाना समानतेच्या आधारावर समान बॅकिंग सेंवा देने अपेक्षित आहे.ग्राहकां च्या हिताना केव्हा केव्हा पूर्ण संरक्षण दिले जात नाही.त्यांच्या तक्रारीची योग्य दखल घेतली जात नाही.

८. भांडवल पर्याप्तेचे प्रमाण बॅकेत कीती भांडवल आहे.यावरुन कळते.जेव्हा भांडवल कमी पडते. तेव्हा बॅकेला पैसे उधार घ्यावे लागतात किंवा ठेविदाराचे पैसे कर्ज देण्यासाठी वापरावे लागतात. हा पैसा मात्र बॅकेच्या स्वत:च्या भांडवलापेक्षा जोखीमीचा आणि धोकादायक असतो. सीआरएआर मधील घसरण चिंताजनक आहे. सीआरएआर मध्ये सातत्याने घट होत आहे. बॅका सहजपणे उभारु शकत नाही. विशेष: सार्वजनिक क्षेत्रातील बॅका ज्याच्याकडे जास्त कर्ज आहे.जर बॅकानी आपले भांडवल वाढविले नाही.तर बॅका आ.बी.आय. ने ठरविलेल्या किमान भांडवलाची आवश्कता पूर्ण करण्यास अपयशी ठरतात अशावेळी बॅकांना गंभिर समस्याना समोर जावे लागते.

संधी

१. ग्रामीण भागातील लोक अजूनही अध्यावत तंत्रज्ञानासह सुसज्य नाहीत.नवकल्पनासाठी ही संधी आहे.या संधीचा वापर करण्यासाठी काही नाविण्यपूर्ण मार्ग शोधण्यासाठी ग्रामीण जनतेला तंत्रज्ञानासह सुसज्य ठेवले पाहिजे. ग्रामीण बाजारपेठेत प्रवेश करण्यासाठी नवकल्पना आवश्यक आहे.

२. कोविड नंतरच्या काळानंतर ब—याच संस्थाना हे समजले की काही परिस्थितीमध्ये घरुनच कामकरणे अधिक उत्पादनक्षम असू शकते. म्हणून संस्थानी त्यांच्या कार्यक्षक्तीचा एक महत्वाचा काहीना घरी काम करण्याची संधी प्राप्त होवू शकते एकीकडे कर्मचा—याची व्यस्तता ,समाधान काम करण्याच्या वेळा कमी त्यामूळे बॅकेच्या खर्चात लक्षणिय बचत होवू शकते.

३. बॅकातील अनेक ग्राहकापैकी बरेच ग्राहक डिजीटल बॅकींग सेवेचा लाभ घेत आहे. बॅकांनी या सर्व डिजीटल ग्राहकांना सर्व संकटापासून दूर ठेवण्याची एक मोठी संधी आहे

४. बॅकानी त्यांची संसाधने पूनगठीत शाखा,नेटवर्क कमी, कमी झालेले मनूष्यबळ, आस्थापना खर्चात नाटयमय घट, कर्मचा—याच्या कौशयाचा सन्मान आणि प्रतीभावंत व्यवस्थापकीय पूल आकर्षित करण्याच्या नाविण्यपूर्ण मार्गाच्या रुपात पूनरचना करावी लागेल.

५. भारतीय बॅकींग प्रणलीमध्ये सर्वात मोठी संधी ग्राहक आहे.भारतीय ग्राहक आता आपल्या जिवनशैलीच्या आकांशा लहानवयात पूर्ण करु पाहात आहे. त्यात इक्विटी आणि कर्जाच्या इष्टत्तम संयोगाने अधिक उपभोक्ता आणि मालमत्ता निर्मीतीसाठी स्पर्धात्मक अत्याधूनिक रिटेल बॅकिंग सेवांची मागणी वाढत आहे.ग्रहक विविध उत्पादने व सेवांच्या बाजारपेठेचे प्रतीनिधित्व करतो.ग्राहक उपयोगी वस्तू कंपण्या या संभावतेचा वापर करण्यास तयार आहे. बॅकांनी त्याचा जास्तीत जास्त फायदा घ्यावयाचा आहे.

भारतातील बॅकिंग क्षेत्राच्या विकासासाठी उपाय

एन.पी.ए. व्यवस्थापन

ग्राहक संबध व्यवस्थापन

व्यावसाईक दृष्टीकोन

शाखा विस्तार
मालमत्ता पूनरर्चना
कर्ज देण्याच्या प्रक्रीयेत बदल
विलीनीकरण
गुणवत्ता व्यवस्थापन
नाविण्य पूर्णउत्पादन ऑफर
घरोघरी सेवा देण्याचा दृष्टीकोन

निष्कर्ष

बॅकिंग क्षेत्र हे भारतीय अर्थव्यवस्थेमधील महत्वाचे क्षेत्र आहे. हे क्षेत्र भारतीय अर्थव्यवस्थेला आर्थिक बळ देण्याचे कार्य करते. भारतातील ग्रामीण व शहरी क्षेत्रात या क्षेत्राचा प्रसार झालेला आहे. परंतू तरीसुद्वा तळागळात बॅकेची शाखा दिसून येत नाही.त्याकरीता बॅकेने भरीव कामगीरी करणे आवश्यक आहे.खाजगीकरण,उदारीकरण,व जागतीकीकरणाच्या धोरणमूळे बॅकीग क्षेत्रात अनेक बदल झालेले आहेत. व बॅकेने आपल्या क्षेत्राचा विकास व विस्तार मोठया प्रमानात केलेला आहे. व यासाठी बॅकेला अनेक मोठया संधी प्राप्त झालेल्या आहेत. आज डिजीटल बॅकिंगमूळे बॅक घरोघरी पोहचलेली आहे. परंतू तेवढया मोठया प्रमानात धोका सूदधा निर्माण झालेला आहे.त्यामूळे बॅकेला सुरक्षितता ठेवून मोठया प्रमाणत कार्य करण्याची गरज आहे व ग्राहकाच्या हिताचे सक्षण करणे ही सुदधा जबाबदारी बॅकेची आहे.

संदर्भ

Goyal K.A. and Joshi V.2011 merger in banking Industry of Indian :same emerging issues Asian Joural of business and manegment science 1(2)157-165
Bartel A.P. 2004 Human Resource management and organization perfor mance .evidence from retail21 Bankingindustrial and labour relationreview 57(@0181-203
Sharma N.L. and shekher –Indian banking Indrustry challehge and opportunities
Manikyam R.C.- Indian Banking sector –challehgs and opportunities
Rbi.org.in
http;maharastratimes.com
yojana 2018

छत्रपती संभाजी महाराजांचे व्यापारविषयक धोरण : एक अभ्यास

प्रा.डॉ.साईनाथ शेटोड

इतिहास विभागप्रमुख शंकरराव चव्हाण महाविद्यालय, अर्धापूर.

ई-मेल - sainathrahatikar@gmail.com मो.क्र. 9284479220

प्रस्तावना :-

मराठ्यांच्या इतिहासाचे प्रामुख्याने दोन कालखंडात विभाजन करण्यात येते. पहिला 'शिवकाळ' आणि दुसरा 'पेशवेकाळ'. इ.स. 1630 ते 1707 हा शिवकाळ होय. शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व छत्रपती शिवाजी तिसरे यांनी राज्य केले. शिवकाळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारसरणीचा प्रभाव शासन व्यवस्थेवर दिसूनयेतो. तर पेशवेकाळात पेशव्यांचा.

छत्रपती संभाजी महाराजांचा कालावधी तसा खूप छोटा आहे अन् तोही धामधुमीचा. त्यांच्या इ.स. 1681 ते 1689 या नऊ वर्षांच्या काळात पोर्तुगीज, सिद्धी, इंग्रज व मोगल या बलाढ्य शत्रुंनी स्वराज्यावर हल्ले सुरू केले. तसेच अंतर्गत गटातूनही त्यांच्याविरूद्ध विविध 'कट कारस्थाने' ही रचण्यात आली. त्यामुळे छत्रपती संभाजी महाराजांना एकाचवेळी परकीय व अंतर्गत शत्रुंच्याविरूद्ध संघर्ष करावा लागला आहे. अशा परिस्थितीत सुद्धा संभाजी महाराजांनी आपल्या राज्याचे संरक्षण केले आणि स्वराज्यातील व्यापार-उदीम पूर्ववत चालू असल्याचे दिसूनयेते.

छत्रपती संभाजी महाराजांच्या व्यापारविषयक धोरणाचा अभ्यास करताना प्रामुख्याने अंतर्गत व्यापारी धोरण व परकीयव्यापारी धोरण अशा दोन भागांचा अभ्यास करावा लागतो. हा विषय अत्यंत व्यापक आहे. परंतु प्रस्तुत ठिकाणी छत्रपती संभाजी महाराजांच्या केवळ अंतर्गत व्यापारी धोरणांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

गृहितके :-

(1) छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यात अंतर्गत व्यापाराच्या विकासाचे व संरक्षणाचे धोरण स्वीकारले होते.

उद्दिष्ट्ये :-

(1) छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्यातील अंतर्गत व्यापाराच्या विकासासाठी कोणते धोरण स्वीकारले?

(2) व्यापार व व्यापारी यांच्या संरक्षणासाठी काय केले? या संदर्भात जाणून घेणे प्रस्तुत शोधनिबंध लेखनाचा उद्देश आहे.

संशोधन पद्धती व संदर्भ साधने :-

प्रस्तुत शोध निबंध लेखनासाठी संदर्भ संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या व्यापारविषयक धोरणाचा अभ्यास करण्यासाठी विविध साधने उपलब्ध आहेत. त्यामध्ये काही प्राथमिक तर काही दुय्यम साधनांचा समावेश आहे. प्रस्तुत शोध निबंध लेखनासाठी दुय्यम संदर्भ साधनांचा आधार घेतला आहे.

सतराव्या शतकातील महाराष्ट्राची व्यापार स्थिती :-

शिवकालीन महाराष्ट्रात खेडे स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण होते. त्या काळात व्यवसाय हे जातीवर आधारित असून जातीबाहेरचे व्यवसाय करण्याची फारशी प्रथा नव्हती. कसब्याच्या ठिकाणी आठवडी बाजार भरत असे. तेथे पंचक्रोशीतील लोक आपले वस्तू खरेदी-विक्री करत असत.

सतराव्या शतकात दळणवळणाची फारशी व्यवस्था असल्याचे दिसूनयेत नाही. पायवाटा, गाडीवाटा यांचा अधिक भरणा होता. कोकणात जलमार्ग होते. देश आणि कोकण यांना जोडणारे अनेक घाटमार्ग होते. त्यांचा वापर

व्यापारासाठी आणि वाहतुकीसाठी होत असे. चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, राजापूर, वेंगुर्ला, पेण इत्यादी व्यापारी केंद्रे प्रसिद्ध होती.

छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. व्यापारवृद्धी शिवाय राज्य भरभराटीला येणार नाही याची त्यांना खात्री होती. म्हणून त्यांनी आपल्या राज्यातील व्यापाऱ्यांना अनेक सवलती आणि जकातीत सूट दिल्याची उदाहरणे आढळतात. आज्ञापत्रामध्ये त्यांचे व्यापारविषयक धोरण सूत्ररुपाने आले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराजांकडे स्वराज्यांची जबाबदारी आली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर सर्वाधिक प्रभाव शिवाजी महाराजांचा होता. त्यामुळे त्यांच्या व्यापारी धोरणावरही छत्रपती शिवाजी महाराजांच्या धोरणांचा प्रभाव दिसूनयेते.

छत्रपती संभाजी महाराजांचे व्यापारी धोरण :-

(1) व्यापाऱ्यांना सवलती :-

इ.स.1685 मध्ये जंजिरेकर सिद्धी याने चेऊल प्रांतात लुटालूट केली. त्याबद्दल तेथील देशमुखांनी सुभेदार रायाजी सदक प्रभुला सांगितले की, "गनिमांनी येऊन शहर जाळून, लूटमार केल्यामुळे रयत परागंदा झाली आहे. 'व्यापारी व सराफी' गाव सोडून गेले आहेत. त्यांना कौल मिळाला तर तेही पुन्हा तेथे येऊन आपला धंदा सुरू करणार होते. तेव्हा सुभेदाराने पंतप्रधानांचा कौलनामा आणून देतो असे सांगून पुन्हा वसाहत करूनव्यापार, शेती करण्यास सांगितले. त्यानुसार 30.10.1687 रोजी हा कौलनामा सादर करण्यात आला होता."[1] हा कौलनामा खूप मोठा असला तरी त्यातील व्यापारविषयक कलमांचे येथे विवेचन करणे योग्य राहील.

(अ) शेतीप्रमाणेच गनिमांमुळे व्यापाऱ्यांचेही नुकसान झालेले होते. चेऊल प्रांत दोन वर्ष ओसाड पडला होता. तेथील व्यापारी, सोनार निरनिराळ्या जागी निघून गेले होते. त्यामुळे व्यापार उदीम बसला होता. तेव्हा त्यांची विनंती मान्य करून त्यांनाव्यापारासाठी सवलती दिल्या.

(2) काही व्यापाऱ्यांचे मागील कर्ज दिवाणाकडे, मामलाकडे व महालाकडे होते. ते कर्ज मिळाल्यावर व्यापार सुरू करणार होते. त्यांच्याही मागण्या मान्य करण्यात आल्या.

(3) चेऊल शहरात वसाहत आल्यावर सोनार, सराफ तेथे वस्ती करणार होते. त्यांच्याकडून कोणी कर्ज व उसनेपासने मागणार नाही असे सरकारकडून आश्वासन देण्यात आले.

(4) दिवाण लोक कामे करवून घेऊन त्याची मशागत देत नसत. म्हणून जे कामे करतील त्यांना मजूरी मिळण्याची व्यवस्था करण्यात आली.[2]

अशाप्रकारे चेऊलच्या व्यापाऱ्यांना व वसाहत करणाऱ्यांना दि. 30.10.1687 रोजी सादर करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या राज्यातील व्यापाराच्या विकासासाठी या कौलनाम्यास मान्यता दिली. यावरून ते व्यापाराच्या विकासासाठी किती सकारात्मक होते हे समजते.

(2) कारखान्याची उभारणी :-

"छत्रपती संभाजी महाराजांनी इंग्रज व फ्रेंचाकडून दारूगोळा व तोफांची मागणी केली, परंतु इंग्रजांनी टाळाटाळ करून दारूगोळा दिला नाही. अन् फ्रेंचाकडूनयोग्यवेळी व्यापाराची पूर्तता होत नसे. म्हणून त्यांनी इ.स. 1682 मध्ये 'डिचोली' आणि 'कुडाळ' येथे दारूगोळ्याचे दोन कारखाने उभारण्यासाठी लागणारा गंधक, सोरा वगैरे साहित्य कर्नाटक आणि मलबार येथून आणल्याचे दिसूनयेते."[3]यावरून संभाजी महाराजांनी दोन कारखाने काढल्याचे उल्लेख कागदपत्रात सापडतात.

असे असले तरी 1684 मध्ये छत्रपती संभाजी महाराजांनी इंग्रजांकडे 'दारूगोळा व तोफांची' मागणी केली होती, असे कॅप्टन केजवीनयांच्या पत्रातून उल्लेख सापडतो. दि. 28.01.1684 रोजी कॅप्टन केजविनने आपल्या

राजाला लिहिलेल्या पत्रात म्हणतो, "आपल्या शेजारी असलेल्या बलवान संभाजी राजाने पोर्तुगीजांच्या 40 मैल लांबीचा प्रदेश बेचिराख केला आहे. आता तर त्याने आपल्या ताब्यातील 'एलिफंटा' आणि 'करंजाही' घेतला आहे. 30,000 (तीस हजार)सैन्य घेऊन तो सरहद्दीवर आपल्याला धमकी देत आहे. छत्रपती संभाजी महाराजांनी आमच्याकडून 400 पिपे बंदुकांची दारू, 60 मोठ्या तोफा, 4000 पौंड कथिल, 400 वार कापड, 150 लहान बोटी आणि एक मोठी बोट इत्यादी गोष्टींची मागणी केली आहे."[4]

केजविनच्या या पत्रावरून छत्रपती संभाजी महाराजांना दारूगोळयांची व तोफांची किती गरज होती हे लक्षात येते.

(3) अंतर्गत व्यापाराचे संरक्षण :-

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या अंतर्गत व्यापाराचे संरक्षण करण्याचे धोरण अंगिकारले होते. स्वराज्याला सागरी किनारपट्टीवरील आरमारी शक्तीशी लढा देऊनच आपल्या व्यापाराचे संरक्षण करावे लागत होते. त्यांनी पोर्तुगीज, सिद्दी व इंग्रज या परकीयांशी लढण्यासाठी आपली आरमार शक्ती वाढवित राहिले आणि आपल्या व्यापाराचे संरक्षण केले.

16 मे 1682 च्या मुंबईकर इंग्रजांनी सुरतकरांना लिहिलेल्या पत्रात छत्रपती संभाजी महाराजांच्या आरमारी शक्तीचा उल्लेख आढळतो. त्यावेळी संभाजी महाराजांकडे 85 गलबते 5 हजार माणसे, 57 युद्ध नौका (छोट्या होड्या वगळून), 5 हजार सौनिकांचे तळ, तीन शिडांची गुराबे इ. होते.[5]

थोडक्यात सांगायचे म्हणजे छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या रयतेच्या, व्यापार व शेतीच्या संरक्षणासाठी अद्यावत असे आरमारी सामर्थ्य वाढविले होते. या शक्तीच्या जोरावरच त्यांनी स्वराज्याचे व स्वराज्यातील शेती, उद्योग, व्यापार व लोकांचे संरक्षण केले होते, असे म्हणता येईल.

(4) व्यापारवृद्धीसाठी प्रयत्न:-

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या राज्यातील व्यापाराच्या वृद्धीसाठी प्रयत्न केले होते. मराठी व्यापारी केवळ आपल्या राज्यातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले वस्तू पाठवावेत म्हणून त्यांनी प्रयत्न केले होते. "इ.स. 1681 च्या ऑक्टोबर महिन्यात मराठ्यांचे एक जहाज 'पोर्टो-नोव्हो' येथून कापड घेऊन 'मलाक्काला' (हे आता मलायाच्या संघराज्यात आहे) गेले. तेथे जहाजातील सर्व माल विकण्यात आला. कोरोमंडलचा डच गव्हर्नर पिट याच्या विनंतीमुळे या जहाजाच्या नावाड्यास (Nakhuda) सर्व प्रकारचे सहाय्य देण्यात आले."[6] असा उल्लेख डच पत्रव्यवहारात आढळतो.

यावरून छत्रपती संभाजी महाराज आपल्या राज्याच्या व्यापारवृद्धीसाठी प्रयत्न होते असे म्हणता येईल.

सारांश :-

छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या राज्यातील व्यापाऱ्यांना सवलती देऊन त्यांना आपापल्या पेठेत व्यापार करण्यासाठी सांगितले. आपल्या व्यापाराच्या संरक्षणासाठी देखील ते तत्पर होते. त्यांनी आपली आरमार शक्ती अद्ययावत ठेवली होती. त्यामार्फत व्यापारी व रयत यांचे संरक्षण करत होते.

छत्रपती संभाजी महाराजांनी 'डिचोली' आणि 'कुडाळ' येथे दारूगोळयाचे दोन कारखाने काढल्याचा उल्लेख कागदपत्रामध्ये सापडतो. तसेच आपले व्यापारी आंतरराष्ट्रीय स्तरावरूनव्यापार करावेत म्हणून त्यांनी प्रयत्न केल्याचे दिसूनयेते. त्यांच्या या धोरणाचा परिणाम म्हणून इ.स. 1681 मध्ये मराठ्यांचे एक जहाज 'पोर्टो नोव्हो' येथून कापड घेऊन मलाक्काला गेले आणि तेथे त्यांचा सर्व माल विकण्यात आला.

थोडक्यात, छत्रपती संभाजी महाराजांनी स्वकीयव्यापाराच्या विकासाबरोबरच तिच्या संरक्षणासाठी आणि वृद्धीसाठी अतोनात प्रयत्न केले होते असे म्हणता येईल.

संदर्भ :-

(1) गोखले डॉ.कमल, 'शिवपुत्र संभाजी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, 2014, पृ.क्र. 379.

(2) कित्ता, पृ.क्र. 381-382

(3) कित्ता, पृ.क्र. 416-419

(4) कॅप्टन केजविन, 'टु द किंग', दि. 28.01.1684

(5) बॉम्बे टु सुरत, दि. 16.05.1682.

(6) डच रेकॉर्डस्, डग रजिस्टर, भाग-29, 1681, पृ.क्र. 641

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDIII) 403

ISSN : 2278-9308 March, 2023

भारतीय अर्थव्यवस्थेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान

प्रा. निलेश अरूण दूर्गे

सहाय्यक प्राध्यापक(अर्थशास्त्र विभाग) भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय

एटापल्ली, जि.गडचिरोली

मो.नं. 9421115541 profnadurge@gmail.com

सारांश

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख केवळ राज्यघटनेची निर्मिती व दलितांच्या उद्धारापुरती मर्यादित नसून आज जगात एक महान अर्थतज्ञ म्हणून ओळखले जाते. डॉ.आंबेडकरांनी देशातील अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांचे कार्य अतुल्य आहे. आंबेडकरांचे विचार अर्थशास्त्रातील पॅरेटोच्या महत्तम कल्याणच्या विचाराची सुसंगत आहेत. ज्यात प्रत्येक नागरिकाचे महत्त्व कल्याण साधण्याचे उद्दिष्ट आहे. आंबेडकरांचे विचार कृषी, उद्योग या पुरतीच नाही तर देशातील आर्थिक नियोजन, कल्याणकारी अर्थशास्त्र, कामगार विषयक कायदे, चलन निर्गमन, विदेशी विनिमय, रिझर्व अधिकोष, बजेट आणि राजस्व इत्यादी विषयावर त्यांचे प्रभुत्व आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला निर्धारित करणाऱ्या अनेक क्षेत्राचे काम व त्या क्षेत्रात कार्य करताना त्यांचा उद्देश सर्व भारतीय नागरिकांचे कल्याण व हित साधने हेच होते. आर्थिक नियोजनासाठी देशातील राष्ट्रीय उत्पन्नात भर घालने, ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांना विशेष सवलती देऊन आर्थिक सत्ता व संपत्तीचे विकेंद्रीकरण करणे, महिला वर्गाचे सर्वांगीण विकासाकरता संधी उपलब्ध करून देणे आणि स्वावलंबन व गरिबी दूर करणे इत्यादी आर्थिक नियोजन सुचवले. आर्थिक कल्याणासाठी देशांमध्ये राष्ट्रीय योग्य निती राबवण्यावर त्यांनी भर दिला. देशातील कामगाराच्या हितासाठी विविध कामगार कल्याण कायद्यात सुधारणा केले. ज्यामुळे श्रमिक वर्गाला योग्य न्याय प्राप्त करून देता आला. देशातील अर्थव्यवस्थेचे हित जोपासण्यासाठी आणि न्यायसंगत बजेट आणि राजस्व डॉ.आंबेडकरांनी मान्य केले. म्हणूनच भारतीय अर्थव्यवस्थेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वपुर्ण आहे.

बीजशब्द:- आर्थिक नियोजन, कल्याणकारी अर्थशास्त्र, कामगार कायदे, बजेट आणि राजस्व

प्रस्तावना

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक बहुआयामी प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपले संशोधन व चिंतन अर्थशास्त्राच्या अभ्यासाने सुरू केले. सन 1923 साली "द प्रॉब्लेम ऑफ रुपी, इट्स ओरिजन अँड इट्स सोल्युशन", तर 1935 साली " दि इवोल्युशन ऑफ प्रोव्हेन्शिअल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया" ही दोन पुस्तके प्रकाशित केली. त्यांनी निमितपणे अर्थशास्त्राच्या विविध विषयावर व्याख्याने देऊन त्याचबरोबर आंबेडकरांचे लिखाण, चिंतन हे सामाजिक क्षेत्रातील विद्यमान समस्या, राजकारण, कायदे, धार्मिक व नैतिक विषयाच्या दिशेने सुरू होते. वेगवेगळे विद्यापीठातून त्यांनी व्याख्याने दिली तसेच घटना सभेच्या बैठकीतून दिलेले त्यांचे व्याख्याने प्रकाशित झाली या विविध स्त्रोतामधून त्यांचे आर्थिक चिंतन दिवसेंदिवस अधिक समृद्ध होत गेले. डॉ.आंबेडकरांनी देशातील अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांचे कार्य अतुल्य आहे.

डॉ.आंबेडकरांनी आर्थिक नियोजनासाठी देशातील राष्ट्रीय उत्पन्नात भर घालने, आर्थिक कल्याणासाठी देशांमध्ये राष्ट्रीय योग्य निती राबविणे, देशातील कामगाराच्या हितासाठी विविध कामगार कल्याण कायद्यात सुधारणा, देशातील अर्थव्यवस्थेचे हित जोपासण्यासाठी आणि न्यायसंगत बजेट आणि राजस्वचा स्वीकार तसेच उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी कृषी क्षेत्रातील विकासावर भर देण्याची गरज डॉ.आंबेडकरांनी मान्य केले आहे. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय अर्थव्यवस्थेत योगदान किती आहे, याचा अभ्यास करणे योग्य ठरते.

संशोधनाचे उद्दीष्टये

1. डॉ. आंबेडकरांची आर्थिक नियोजन ही संकल्पना अभ्यासणे.
2. भारतीय कामगार विषयक कायद्यात डॉ.आंबेडकरांचे यांचे योगदान तपासणे.
3. डॉ.आंबेडकरांच्या कल्याणकारी अर्थशास्त्राचे विचार अभ्यासणे.
4. डॉ.आंबेडकरांच्या कृषी क्षेत्रविषयी योगदान अभ्यासणे.

संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन लेखासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला असुन यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विविध ग्रंथ, पुस्तके, मासिके, नियतकालिके, वर्तमानपत्र व इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान

1. आर्थिक नियोजन

डॉ.आंबेडकरांनी देशातील आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी देशाने एक योग्य असे आर्थिक नियोजन स्वीकारणे गरजेचे होते. भारतात ब्रिटिशांनी जवळपास 190 वर्ष ब्रिटिश राजवटीतून देशातील आर्थिक पिळवणूक केली. परंतु भारत 1947ला स्वतंत्र झाल्यानंतर देशातील मुख्य पक्ष असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि प्रथम पंतप्रधान पंडित जवारलाल नेहरूच्या प्रेरणादायी नेतृत्वात आर्थिक नियोजनाशी आपली प्रगती व्हायला पाहिजे होती, परंतु आर्थिक नियोजन नसल्याने हवी तेवढी प्रगती झालेली नाही. पण डॉ.आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताचे पहिले मजूर मंत्री असताना त्यांनी देशाच्या विकासाकरिता आर्थिक नियोजनाची काही ठळक वैशिष्ट्ये सांगितली आहेत. त्यामध्ये भारतातील वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागण्यासाठी अन्नधान्याचे उत्पादन वाढ करणे, राष्ट्रीय उत्पन्नात भर घालने, भविष्यातील आर्थिक विकासाचा पाया असणाऱ्या औद्योगीकरणाचा वेग वाढवणे, श्रमिक आणि सुशिक्षित तरुणांसाठी अनेक रोजगार संधी उपलब्ध करून देणे, तंत्रज्ञानाचा वापर करून अधिकाधिक रोजगार निर्माण करणे, ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांना विशेष सवलत देऊन आर्थिक सत्ता व संपत्तीचे विकेंद्रीकरण करणे आणि शहरी व ग्रामीण भागातील आर्थिक असमानता दूर करून सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या दलित, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्यांक व महिला वर्गात सर्वांगीण विकासाकरिता संधी उपलब्ध करून देणे आणि स्वावलंबन व गरिबी दूर करणे इत्यादीचा समावेश आर्थिक नियोजनात डॉ.आंबेडकर यांनी केलेला आहे.

2. कल्याणकारी अर्थशास्त्राचे विचार

अर्थशास्त्र हे मानवी कल्याणाच्या उद्दिष्टांनी तयार झाले असल्याने अर्थशास्त्राला धनसंपदाची शास्त्र म्हणून ओळखली जाते. आंबेडकरांचे विचार अर्थशास्त्रातील पॅरेटोच्या महत्तम कल्याणच्या विचाराची सुसंगत आहेत. ज्यात प्रत्येक नागरिकाचे महत्त्व कल्याण साधण्याचे उद्दिष्ट आहे.डॉ.आंबेडकरांच्या मते, कल्याणकारी अर्थशास्त्र हे राष्ट्रीय उत्पन्न, बेरोजगारांच्या संधी, सामाजिक व आर्थिक विषमता, दारिद्र्य निर्मूलन यांची गणना व मापन करण्याबाबतही मानवी विकास साधताना कल्याणकारी असावे. तसेच याविविध योजना या वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वपूर्ण असाव्यात तसेच व्यक्तीचे हक्क व त्यांचे कल्याण हवा यासारख्या समस्या चर्चा करून विश्लेषणात्मक दृष्टीने चर्चा विचार करावे, असे त्यांचे मत होते. देशातील दारिद्र्य रेषेखालील लोकांची लोकसंख्या मोजण्यासाठी दारिद्र्य रेषा प्रणाली त्यांनी मान्य केली होती. दारिद्र्य रेषेचे मोजमाप हे गणितीय पद्धतीने दाखवणे आवश्यक मानले होते.

3. कामगार विषय कायदे

भारतामध्ये ब्रिटिशांच्या काळात उद्योगातील कामगारांचे शोषण केल्या जात होते ते शोषण दूर करण्यासाठी भारतामध्ये विविध कामगार कल्याण कायदे अस्तित्वात आणण्याचे कार्य आंबेडकरांनी केले. संपूर्ण अर्थव्यवस्थेत विकासासाठी श्रम आवश्यक आहे, परंतु कामगाराचे जर शोषण होत राहिले, तर देशाच्या विकासावर त्याचा दुर्गामी परिणाम होणे निश्चित आहे. कामगाराच्या शोषणाला दूर करण्यासाठी केवळ कामगारच नव्हे तर त्या माध्यमातून देशाच्या विकासासाठी औद्योगिक विकासाची पायाभरणी आंबेडकरांनी केलेली आहे. आज कामगाराच्या हक्काच्या लढाई करण्यासाठी जे विविध कायदे व्यवस्था निर्माण झाली आहे. त्यावेळेस तिला या देशात लागू करण्याचे कार्य डॉ.आंबेडकरांनी केले. डॉ.आंबेडकर मजूर मंत्री असताना कामगाराच्या हिताच्या दृष्टीने कामगार कायद्यात अनेक सुधारणा घडवून आणले आहे. स्त्रियांना कामगार कायद्याने रात्र पाळीचे काम करण्यास बंदी घातली, स्त्रियांना प्रसूतीच्या काळात विशेष भरपगारी रजा मिळावी म्हणून विशेष प्रयत्न केले.तसेच कामगारांना महागाईच्या निर्देशांकाच्या आधारावर महागाई भत्त्याची पूर्तता मिळवून दिली.

डॉ.आंबेडकरांनी मध्यवर्ती शासनाचे कामगार विषय कायदे उदा. कारखाने अधिनियम, इंडियन ट्रेड युनियन कायदा, स्त्री प्रसुती लाभ कायदा, पगार देण्याचा कायदा, भ्रमक खान कामगार कल्याण कायदा, औद्योगिक कलह कायदा, इंडियन बॉयलर ऍक्ट, मोटर वाहन कायदा, अपघात नुकसान भरपाई कायदा इत्यादी कामगार विधेयक कायदे जे कामगाराला अन्यायकारक होते. त्या कायद्यात बदल करण्याचे कार्य आंबेडकरांनी केले आहे. त्यासाठी त्यांनी विधिमंडळात कामगार हितासाठी कामगार विषय कायदे सुधारणा केलेली आहे.

डॉ.आंबेडकरांनी भारतीय संविधानामध्ये जे नागरिकांना मूलभूत हक्क प्रदान केले आहे, त्यात मागासवर्गीय व दुर्बल घटकांच्या हिताचे रक्षण करण्याची तरतूद केली.तसेच "राज्य धोरणांची निर्देशक तत्वे" याचाही घटनेत समावेश केला. त्यात कामाचा, शिक्षणाचा आणि विवाक्षित बाबतीत सरकारी सहाय्यता अधिकार, कामाबाबत न्याय व मानवोचित परिस्थिती आणि प्रसूतीसहाय्य यांची तरतूद, कामगारासाठी निर्वाह वेतन, उद्योगधंद्याच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग, बालकांकरिता मोफत व सक्तीच्या शिक्षणाची तरतूद, स्त्री आणि पुरुषांना समान वेतन इत्यादी कामगार कल्याण धोरणाचा उल्लेख केलेला आहे. कामगारांच्या हितासाठी तुम्ही संघटन उभारले पाहिजे अशा स्वरूपाचे डॉ.आंबेडकरांचे मत होते. केवळ कामगार संघटनेच्या बळावर मालकांच्या विरोधात कामगार विजय होऊ शकत नाही ते अनुभवाने सिद्ध झालेले आहे. कारण कामगार संघटनांनी राजकारणात शिरले तर शासन सत्तेवाचून कामगाराच्या हिताचे रक्षण करणे अशक्य आहेत.

4. बजट आणि राजस्व

प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत दरवर्षी वित्तीय वर्षात बजट त्या देशातील संसद किंवा विधानसभेमध्ये वित्तमंत्री मांडत असते. डॉ.आंबेडकरांच्या मते, प्रत्येक बजटमध्ये एक नवीन आणि पर्यायी वित्तीय नीतीचे निर्धारण होणे आवश्यक असते, ज्यामुळे देशाची अर्थव्यवस्था प्रगतिशील होऊ शकते. बजटचा मुख्य भाग राजस्व असून कोणतेही राजस्व व्यवस्थेचा न्यायसंगत व प्रतिपादित असणे आवश्यक असते. देशातील कोणत्याही बजेटमध्ये कर दात्याला महत्त्वपूर्ण स्थान असते. जर दोन कर असेल तर त्याची व वसुलीच्या गती विधीमध्ये तफावत असली पाहिजे.

डॉ.आंबेडकरांच्या मते, प्रत्येक बजेट न्यायसंगत व प्रतिपादित असायला हवा, परंतु तो बजेट तोटा देणारा नसावा. बजेट सादर करताना बजेटमध्ये अनिवार्य शिक्षण, आरोग्य सुविधा दारूंच्या व्यसनातून लोकांची मुक्ती, आणि जीवनाची सुख सुविधा प्रदान करण्यासाठी जर बजेट तोट्यात असेल तरी तो बजट न्यायोचित्त राहील, असे आंबेडकरांचे मत होते. आंबेडकरांनी बजेटच्या संदर्भात अशी भावना व्यक्त केली की, खर्चाच्या त्या पदांना प्राथमिकता दिली जाईल. ज्यामुळे देशाच्या प्रगत करण्यात मदत मिळेल.

5. कृषी क्षेत्र

डॉ.आंबेडकर यांनी 1918 मध्ये The Journal of Indian Economic Society मध्ये "Small Holdings in India and Their Remedies" हा लेख प्रकाशित केला. या लेखामध्ये शेतीला एक महान राष्ट्रीय उद्योग म्हणून दृष्टिकोन ठेवला. तसेच धारण क्षेत्राचा आकार आणि छोट्या धारण क्षेत्राचे आकडेवारी याविषयी सविस्तर विश्लेषण केलेले आहे. "छोट्या धारण क्षेत्राचे एकत्रीकरण करून आकार वाढविल्यास शेतीची उत्पादकता सुद्धा वाढण्यास मदत होईल",असे आंबेडकर यांचे मत होते. यंत्रप्रधान शेती, विस्तृत शेती, सहकारी व सामुदायिक शेती इत्यादी शेतीचा उत्पादन वाढीसाठी पुरस्कार केला. जमीन मालकाकडून शेतीच्या वहिवाटीचे हक्क काढून घेऊन त्या बदल्यात त्यांना नुकसान भरपाई द्यावी आणि जमिनीचे एकत्रीकरण करून सामूहिक शेती विकसित करावी. भारतीय परंपरेनुसार जात, धर्म, पंथ इत्यादीचा विचार न करता देशात जमिनीचे वाटप करताना ग्रामीण भागाकरिता शेतकरी, शेतमजूर, कुळ अशा प्रकारचे वर्ग निर्माण होणार नाही,याची काळजी घेणे आवश्यक मानले. डॉ.आंबेडकरांच्या मते, पडित जमीन लागवटीखालील आणल्यास भूमिहीनांचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्यात मदत मिळेल. तसेच शेतीचे प्रश्न सोडवण्यासाठी औद्योगीकरण हा प्रगती व खात्रीशीर मार्ग मानला आहे.

डॉ.आंबेडकरांनी शेतीच्या शेतसारा वसुलीच्या पद्धतीला दोष देऊन अन्यायपूरक व्यवस्था म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या ऐपतीनुसार शेतसारा लागल्यास गरीब शेतकऱ्यांना न्याय प्राप्त होईल व शेतकऱ्यांचे शोषण संपुष्टात येईल. शेतसारा वसूल संबंधी त्यांनी काही उपाय सुचवले, ज्यामाध्यमातून शेतकऱ्यांना न्याय प्राप्त करून देता येईल. आणि शेती विकासात याधोरणामुळे मदत होईल. भारतातील सर्व शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणारे डॉ.आंबेडकर हे देशातील पहिले अर्थतज्ञ होते. डॉ.आंबेडकरांनी ग्रामीण भागात शेतीच्या वितरणातील विषमतेमुळे बहुसंख्य शेतकऱ्यांच्या वाट्याला अत्यल्प जमीन आली, त्यांच्या आधारावर जीवन जगणे कठीण जाते. शेतीचा आकार हा आर्थिक स्वरूपाचा असायला पाहिजे. डॉ.आंबेडकरांच्या मते, "शेतीच्या उत्पादनातून खर्च वजा जाता ते उत्पन्न शेतकरी व त्यांच्या कुटुंबाच्या पोषणासाठी आवश्यक असते. तो शेतीचा आकार आर्थिक समजावा." केवळ धारण क्षेत्र मोठे असले तरच ती आर्थिक आहे व लहान आकाराची शेती अनार्थिक आहे. शेतीची उत्पादकता धारण क्षेत्रावर नाही तर भांडवल, सिंचन व शेतीच्या इतर उत्पादन अवलंबून असते. डॉ.आंबेडकरांच्या आर्थिक धोरणाची संकल्पना भारताच्या स्वातंत्र्यानंतर लागू करण्यात आली.

आज कृषी क्षेत्राचा विचार करता सरकारने कृषी विकासाचे व शेतकऱ्यांच्या प्रश्नांना अधिक गांभीर्याने घेतले नाही. शेतीच्या विकासासाठी ज्या सक्षम धोरणाची आवश्यकता आहे. त्याविषयी मात्र सरकारचे योग्य निर्णय झाले

नाही. त्यामुळे आजचा शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होताना दिसून येत आहे. म्हणून आज भारतीय कृषीसंबंधी प्रश्न सोडवण्यासाठी डॉ.आंबेडकरांच्या विचारांची व धोरणाची गरज आहे.

निष्कर्ष :-

एकंदरीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात जे विचार मांडले, त्यामध्ये आर्थिक नियोजन, कल्याणकारी अर्थशास्त्राचे विचार, बजेट आणि राजस्व, कामगार विषयक कायदे आणि कृषी क्षेत्रातील विकास इत्यादी विषयावर विचार मांडले. आर्थिक नियोजन हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी आवश्यक मानले ज्यामुळे देशातील वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी अन्नधान्याचे उत्पादन वाढवणे, राष्ट्रीय उत्पन्नात भर घालने, ग्रामीण भागातील लघु व कुटीर उद्योगांना विशेष सवलती देऊन आर्थिक सत्ता व संपत्तीचे विकेंद्रीकरण करणे. महिला वर्गाचे सर्वांगीण विकासाकरता संधी उपलब्ध करून देणे आणि स्वावलंबन व गरिबी दूर करणे इत्यादी आर्थिक नियोजन सुचवले तसेच यादेशातील आर्थिक कल्याणासाठी देशांमध्ये राष्ट्रीय योग्य निती राबवण्यावर त्यांनी भर दिला. देशातील कामगाराच्या हितासाठी विविध कामगार कल्याण कायद्यात सुधारणा केले. ज्यामुळे श्रमिक वर्गाला योग्य न्याय प्राप्त करून देता आला. देशातील अर्थव्यवस्थेचे हित जोपासण्यासाठी आणि न्यायसंगत बजेट आणि राजस्व डॉ.आंबेडकरांनी मान्य केले. डॉ.आंबेडकरांनी भारतीय शेती मागासली असल्याचे कारण भारतीय शेतीची उत्पादकता कमी आणि धारण क्षेत्राचे लहान लहान तुकडे हे कारण मान्य केले. तसेच उद्योग क्षेत्राचे विकासासाठी कृषी क्षेत्राचे विकासावर भर देणे गरजेचे मान्य केले आहे अशा प्रकारे डॉ.आंबेडकरांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध घटकावर प्रकाश टाकून आर्थिक विचाराचे योगदान भारतीय अर्थव्यवस्थेला दिल्याचे दिसून येत आहे.

संदर्भ:-

1. कुलकर्णी बी.डी.ए.,ढमढेरे एस.व्ही., आर्थिक विचार व विचारवंत, डायमंड पब्लिकेशन, पुणे 2008
2. ठक्कर प्रा.के.एच.,अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूरसप्टेंबर 2005
3. कीर धनंजय, डॉ.आंबेडकर लाईफ ॲण्ड मिशन, बॉम्बे पापुलर प्रकाशन, मुंबई
4. जाधव डॉ.नरेंद्र, डॉ.आंबेडकर आर्थिक विचार आणि तत्वज्ञान, सुगावा प्रकाशन, पुणे 1992
5. आंबेडकर बी. आर., बाबासाहेब आंबेडकर राईटिंग्ज ॲंड स्पिचेस, (BAWS) भाग 1 व भाग13, वसंत मून, शिक्षण विभाग, महाराष्ट्र-मूंबई 1979
6. आंबेडकर डॉ.भीमराव लिखित दलितांनी आर्थिक उन्नती कशी साधावी?, राजेश प्रकाशन, पुणे
7. योजना मासिक (मराठी)ः- जानेवारी 2014 , डिसंेबर 2013, एप्रिल 2011
8. विकीपीडीया वेबसाईट https://mr.wikipedia.org/s/3jq7

महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प 2023 : कृषी विकासातून समृद्धीकडे

डॉ सुनिता कलाखे,

सहाय्यक प्राध्यापक व विभाग प्रमुख अर्थशास्त्र विभाग, श्री शिवाजी विज्ञान व कला म.हाविद्यालय चिखली, जिल्हा बुलढाणा महाराष्ट्र.

Email: dr.sunitakalakhe@ gmail.com

सार(Abstract):

प्रस्तुत संशोधन पेपर मध्ये महाराष्ट्र शासनाचा दिनांक नऊ मार्च 2023 रोजी राज्याचे वित्तमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला अर्थसंकल्पाचे विश्लेषण करण्यात आले आहे या अर्थसंकल्पातील ठळक तरतुदीचा प्रस्तावनेत चर्चा करण्यात आली आहे संशोधन पेपर चा मुख्य गाभा शेतकरी हिताच्या तरतुदीवर करण्यात आला असून शेती संदर्भात करण्यात आलेल्या15 प्रमुख बाबींचा ऊहापोह करण्यात आला आहे.

शोध शब्द (Key words): अर्थसंकल्प, शेती, दुग्ध, मत्स्य, उत्पादन, सिंचन प्रकल्प, कृषी विकास, पिक विमा,

प्रस्तावना:

महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक पाहणी अहवालानंतर राज्य सरकारचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला यामध्ये शेतकऱ्यांना थेट लाभाच्या अनेक योजनांची घोषणा करून शेतकरी वर्गांना खुश करण्याचा प्रयत्न अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते एक रुपयात पिक विमा मागेल त्याला शेततळे शेडनेट हरितगृह आधुनिक पेरणी यंत्र कॉटन बेडर उपलब्ध करून देण्यासाठी 1000 कोटी रुपयांची तरतूद करून आणि नागपुरात कृषी सुविधा व विदर्भासाठी संत्रा प्रक्रिया केंद्र उभारण्यास सोबत 50 कोटीचा मत्स्य विकास कोश ही सरकारने देण्याचे कबूल केले आहे त्यासोबतच शेळी मेंढी पालनासाठी सुद्धा 1000 कोटीची तरतूद करून शेतकरी हिताचा अर्थसंकल्प बनवण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय राज्यातील सर्व महिलांना बस प्रवासात ५० टक्क्यांची सवलत, एक कोटी १५ लाख शेतकऱ्यांना नमो शेतकरी महासन्मान निधी अंतर्गत केंद्राप्रमाणे दरवर्षी अतिरिक्त सहा हजार रुपये थेट अनुदान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील सर्व विद्यार्थ्यांना इयत्ता आठवीपर्यंत मोफत गणवेश, शिष्यवृत्तीत वाढ, शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विम्याचे कवच, मुलगी जन्मल्यानंतर वयाच्या पाच टप्प्यांवर तिला रोख आर्थिक मदत यासह असंख्य घोषणांचा पाऊस पाडत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी वित्तमंत्री म्हणून आपला पहिला अर्थसंकल्प विधानसभेत दिनांक 9 मार्च 2023 रोजी सादर केला,

केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्याच्या अमृतकाळातील पाच ध्येयांवर आधारित अर्थसंकल्प सादर करीत असल्याचे सांगत फडणवीस यांनी समाजाच्या विविध घटकांना सुखावणारा आणि भरघोस सोईसुविधा देणारा अर्थसंकल्प मांडला. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतपेरणी करणारा हा अर्थसंकल्प असल्याचे त्यातील लोकप्रिय तरतुदींमधून स्पष्ट दिसते. संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावण बाळ योजनेतील लाभार्थीच्या अर्थसाह्यात वाढ करण्यात आली आहे. आर्थिक पाहणी अहवालाने राज्याच्या अर्थस्थितीबाबत चिंता व्यक्त केली असूनही फडणवीस यांनी घोषणा करीत पेटारा उघडला. एकाच अर्थसंकल्पात एवढ्या मोठ्या घोषणा होण्याची ही पहिलीच वेळ. महापुरुषांची स्मारके, धार्मिक स्थळे यांच्यासाठी भरीव तरतूद केली आहे.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील स्मारकासाठी ७४१ कोटी रुपये तर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकासाठी ३५१ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

बाळासाहेबांच्या 'स्मारकासाठी निधीची घोषणा करीत एकनाथ शिंदे गटाला खूश करण्यात आले तसेच उद्धव ठाकरे गटाला 'करून दाखविले'चा संदेशही दिला आहे.

शेती विषयक प्रमुख तरतुदी:

1. 'शेतकरी महासन्मान निधी योजना :

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्यात नमो 'शेतकरी महासन्मान निधी योजना सुरु करण्यात येणार आहे. यात शेतकऱ्याला प्रतिवर्ष ६००० रुपये राज्य सरकार देणार आहे. आता शेतकऱ्याला केंद्राचे ६००० व राज्याचे ६००० असे १२,००० रुपये प्रतिवर्ष मिळतील. १.१५ कोटी शेतकरी कुटुंबांना याचा लाभ मिळेल. त्यासाठी ६९०० कोटींचा भार सरकार उचलणार,

2. एक रुपयांत पीकविमा :

शेतकऱ्यांवर कोणताच भार न देता राज्य सरकार शेतकऱ्यांचा विमा हप्ता भरणार आहे. शेतकऱ्यांना केवळ १ रुपयांत पीकविमा मिळणार असून यापोटी ३३१२ कोटी रुपयांचा भार राज्य सरकार उचलणार आहे.

3. काजू बोंडूवर प्रक्रिया केंद्र:

कोकणासाठी काजू बोर्ड स्थापन होणार असून त्यासाठी २०० कोटी रुपयांचे भांडवल दिले जाईल. उत्पन्नवाढीसाठी कोकणात काजू बोंडू प्रक्रिया केंद्र सुरु केले जाणार आहे. कोकण, चंदगड तसेच आजरा (जि. कोल्हापूर) येथे काजू फळ विकास योजनाही राबवली जाणार आहे. यासाठी ५ वर्षांसाठी १३२५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

4. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन:

सेटिय शेतीला प्रोत्साहन 'देण्याची घोषणा करताना ३ वर्षांत २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट अर्थसंकल्पात ठेवण्यात आले आहे. यासाठी १००० जैवनिविष्ठा स्रोत केंद्र स्थापन करणार असून डॉ. पंजाबराव देशमुख जैविक शेती मिशनची. व्याप्ती वाढवली जाणार आहे. यासाठी ३ वर्षांत १००० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

5. कृषी सुविधा,व संत्राप्रक्रिया केंद्र:

नागपुरात डॉ. पंजाबराव देशमुख कृषी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय कृषी सुविधा केंद्र स्थापन करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. कृषी क्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रसार हा याचा उद्देश असून या केंद्रासाठी २२८ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. नागपूर जिल्ह्यातील नागपूर, काटोल, कळमेश्वर, अमरावती जिल्ह्यात मोर्शी, तसेच बुलढाणा जिल्ह्यात आधुनिक संत्रा प्रक्रिया केंद्रे उभारली जाणार असून त्यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

6. श्री अन्न उत्कृष्टता केंद्र:

आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्षानिमित्त महाराष्ट्रात 'श्रीअन्न अभियान' राबवले जाणार आहे. यासाठी २०० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली असून सोलापुरात श्री अन्न उत्कृष्टता केंद्र स्थापन केले जाणार आहे. 7. महाकृषिविकास अभियान:

राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी महाकृषिविकास अभियान राबविण्यात येणार आहे. पीक, फळपीक घटकाच्या उत्पादनापासून ते मूल्यवर्धनापर्यंतचे काम यात केले जाणार असून तालुका, जिल्हानिहाय शेतकरी गट, समूहांसाठी ही योजना असेल. यात एकात्मिक पीक आधारित प्रकल्प आराखडा तयार केला जाणार असून यासाठी ५ वर्षांत ३००० कोटी रुपये उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

8. 30%कृषी वीजवाहिन्यांचे सौरऊर्जीकरण:

वीज ट्रान्सफॉर्मर नसल्याने पाणी असूनही शेतक-यांची गैरसोय टाळण्यासाठी ट्रान्सफॉर्मर योजना सुरू केली जाणार आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत हेक्टरी ७५,००० रुपये वार्षिक भाडेपट्टा दिला जाणार आहे. दिवसा वीजपुरवठ्यासाठी ३ वर्षांत ३० टक्के कृषी वीजवाहिन्यांचे सौरऊर्जीकरण केले जाणार असून, यासाठी शेतक-यांना ९.५० लाखांचा लाभ दिला जाणार आहे.

प्रधानमंत्री कुसुम योजनेतून १.५० लाख सौर कृषीपंप, प्रलंबित ८६,०७३ कृषीपंप अर्जदारांना तत्काळ वीजजोडणी देण्याची घोषणा करण्यात आली तसेच उपसा जलसिंचन योजनेतील शेतक-यांना वीजदर सवलतींची मुदत आता मार्च २०२४ पर्यंत वाढवण्यात आली आहे.

9. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यात अन्नधान्याऐवजी रोकड:

विदर्भ, मराठवाड्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील केशरी शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याऐवजी प्रतिवर्ष प्रति शिधापत्रिकाधारकांच्या आधार बँक खात्यात थेट १८०० रुपये जमा केले जाणार आहेत.

10. शेतक-यांसाठी निवारा भोजन:

कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतमाल विक्रीसाठी येणा-या शेतक-यांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारले जाणार आहेत. तसेच या ठिकाणी शिवभोजन थाळी उपलब्ध होणार आहे.

10. शेतकरी अपघात विम्यात वाढ:

गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना यापूर्वी विमा • कंपन्यांकडून राबवली जात होती. आता गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राबवली जाणार आहे. त्यामुळे शेतक-यांचा त्रास वाचणार असून अपघातग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबांना आता २ लाख रुपयांपर्यंत लाभ मिळणार आहे

11.. गोसेवा, गोसंवर्धन :

देशी गोवंशाचे संवर्धन, संगोपन, संरक्षणासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना केली जाणार आहे. या आयोगामार्फत गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना, गोमय मूल्यवर्धन योजना राबविली जाणार आहे. देशी गोवंशाच्या संवर्धनासाठी भ्रूण बाह्यफलन, प्रत्यारोपण सुविधेत वाढ केली जाणार आहे. विदर्भ- मराठवाड्यातील ११ जिल्ह्यांत दुग्ध विकासाच्या दुस-या टप्प्यासाठी १६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अहमदनगर जिल्ह्यातं नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालय उभारण्याची घोषणा अर्थसंकल्पात केली आहे.

12. मत्स्यविकास कोष:

प्रकल्पबाधित मासेमारांना नुकसानभरपाईसाठी धोरण राबविणारे महाराष्ट्र पहिले राज्य असून प्रकल्पामुळे विस्थापित वा तात्पुरत्या प्रभावित मासेमार कुटुंबांना मदत देण्यासाठी प्रकल्पाच्या २ टक्के वा ५० कोटी रुपयांचा मत्स्यविकास कोष तयार केला जाणार आहे. तसेच मासेमारांना डिझेल अनुदानासाठी यांत्रिक नौकेच्या १२० अश्वशक्तीची अट काढण्यात आली असून, त्यामुळे ८५ हजार अधिकच्या मासेमारांना लाभ होणार आहे. तसेच अनुदानाचा वर्षानुवर्षांचा अनुशेष यावर्षी दूर केला जाणार आहे. यासाठी २६९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पारंपरिक मासेमारी करणा-या मासेमार बांधवांसाठी केंद्राच्या मदतीने ५ लाखांचा विमाही उतरवला जाणार आहे.

13. शेळी मेंढी पालनासाठी भरीव निधी:

महाराष्ट्र मेंढी, शेळी सहकार विकास महामंडळाची स्थापना करण्याची घोषणा करतानाच या महामंडळातर्फे १० हजार कोटी रुपयांचे बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून देण्याची घोषणाही अर्थमंत्र्यांनी केली. अहमदनगर येथे या

महामंडळाचे मुख्यालय •असणार आहे. तसेच धनगर समाजासाठी १००० कोटी रुपयांच्या तरतुदीची घोषणा करण्यात आली आहे. धनगर समाजाच्या २२ योजनांचे एकत्रीकरण करून मंत्रिमंडळ शक्तिप्रदत्त समितीमार्फत त्याची अंमलबजावणी केली जाणार आहे. तसेच राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेत मेंढीपालनासाठी भरीव निधी देण्याचे आश्वासनही अर्थसंकल्पात देण्यात आले आहे.

14. सिंचन प्रकल्पासाठी ११,६२६ कोटी रुपये :

१७.७२ लाख कुटुंबांना नळजोडणी देणार गोसीखुर्दसाठी जून २०२४ ची नवी मराठवाडा वॉटर ग्रीडचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविला आहे.

राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात सिंचनाची आकडेवारी न देणाच्या सरकारने सिंचन प्रकल्पाच्या या अर्थसंकल्पात अनेक घोषणा केल्या आहेत. यात प्रामुख्याने रखडलेले प्रकल्प जलदगतीने पूर्ण करणे, कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी ११,६२६ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता, ५ हजार गावांमध्ये जलयुक्त शिवार योजना, नदी जोड प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड, गोसीखुर्द प्रकल्प पूर्ण करण्याची नवी तारीख आदींचा समावेश आहे.

तापी महापुनर्भरण:

पश्चिम विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रासाठी महत्त्वपूर्ण असलेला तापी महापुनर्भरण प्रकल्प राबवण्याची घोषणा करतानाच या योजनेसाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी जाहीर केले आहे.

कृष्णा-मराठवाडा सिंचन:

कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पासाठी ११,६२६ कोटी रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. या प्रकल्पातून धाराशिव, बीड जिल्ह्यातील १३३ गावांना सिंचन लाभ होणार आहे.

मराठवाडा वॉटरग्रीड:

मराठवाडा वॉटरग्रीडचे प्रस्ताव केंद्र सरकारकडे मान्यतेला पाठवण्याचे अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर, वैजापूर, पैठण तालुक्यांना जायकवाडी धरणातून पाणी उपलब्ध करून देण्याचे- तसेच बीड, लातूर जिल्ह्यांसाठी जायकवाडी, माजलगाव, उर्ध्वमनार धरणातून पाणी उपलब्ध करून देण्याची घोषणा करण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यासाठी उजनी सीना कोळेगाव, निम्न तेरणा धरणातून पाणी दिले जाणार आहे.

रखडलेले प्रकल्प पूर्ण करणार:

नव्या सरकारने मागील ८ महिन्यात २७ सिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. चालू २६८ पैकी ३९ सिंचन प्रकल्प यावर्षी पूर्ण करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतील ६ प्रकल्प आणि बळीराजा जलसंजीवनी योजनेतील २४ प्रकल्प पूर्ण केले जाणार आहेत. गोसी राष्ट्रीय प्रकल्पास यावर्षी १५०० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली असून, हा प्रकल्प जून २०२४पर्यंत पूर्ण करण्याचे उदिष्ट ठेवण्यात आले आहे. कोकणच्या सिंचन सुविधासाठी विशेष कृती कार्यक्रम तयार करून खारभूमी बधायाच्या कामांना गती दिली जाणार आहे.

१५. जो जे वांचील:

मागेल त्याला शेततळे योजनेचा व्यापक विस्तार करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. आता. मागेल त्याला शेततळे,फळबाग, ठिबक सिंचन, शेततळयांचे अस्तरीकरण, मागेल त्याला शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणीयंत्र, कॉटन श्रेडर उपलब्ध करून दिले जाणार आहे. यासाठी सरकार १००० कोटी. रुपये खर्च करणार आहे.

समारोप:

महाराष्ट्र शासनाच्या या अर्थसंकल्पनामध्ये शेतकरी वर्गांना खुश करण्याचा प्रयत्न करण्याचा प्रयत्न केला आहे शेतकऱ्यांसाठी पिक विमा कवच महासन्मान निधी योजनेमध्ये सहा हजार रुपयांची वाढ त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना आता 12 हजार रुपये मिळणार असले तरी पाच लाख 47 हजार कोटीच्या अर्थसंकल्पामध्ये 29 हजार 163 कोटी रुपयाची शेतीसाठी तरतूद करण्यात आली आहे या सोबतच 11,626 कोटी रुपये सिंचन सिंचन प्रकल्पासाठी खर्च होणार असल्यामुळे ही तरतूद सुद्धा शेतीसाठी असल्याचे आपल्याला दिसून येते. पर्यावरण पूरक विकासासाठी 13437 कोटी रुपये खर्च होत असल्याचे या अर्थसंकल्पात आपल्याला दिसून येते एकंदरीत संपूर्ण अर्थसंकल्पाच्या दहा टक्के पेक्षा जास्त खर्च हा शेती क्षेत्रावर होत असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी हा अर्थसंकल्प अधिक प्रभावी असल्याचे दिसून येते. परंतु अर्थसंकल्पात हमीभाव हमीभाव निर्यातीसाठीचे प्रयत्न निर्यातीसाठीचे अनुदान याबाबत कुठेही वाचता दिसून येत नाही शेतकऱ्यांच्या मालाला अधिक चांगला भाव मिळावा यासाठी शासनाने काहीही तरतूद केलेल्या दिसत नाहीत. अर्थसंकल्पावर विरोधी पक्षनेते आणि शेतकरी संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी मात्र विकासाच्या बड्या बड्या वाता आणि शेतकऱ्याला लाथा अशा शब्दात अर्थसंकल्पावर टीका केल्याचे आपणास दिसून येते.

संदर्भ: 1.Government of Maharashtra. (2023) ANNUAL SCHEME 2023-2024 (Department wise) Maharashtra state Planning Department department

2. Government of Maharashtra. (2023) अर्थसंकल्पीय भाषण (2022-23) BUDGET SPEECHhttp://mls.org.in/budget-2022/

3. MAHARASHTRA STATE BUDGET 2023 24 The Economics Times10 April, 2023, 10:24 AM IST

शेरशहाच्या शासन व्यवस्थेचे मुल्यमापन

प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर,
(सहयोगी प्राध्यापक) इतिहास विभाग प्रमुख स्व.निर्धन पाटील वाघायेकला व विज्ञान महाविद्यालय,सौंदड जि.गोंदिया –४४१८०६
E-mail – bhandarkarpriyansh@gmail.com Mobil No. – 9765889913/ 7620959936

प्रस्तावणा :–

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात पठाण शासनक शेरशहाची कारकीर्द अतिशय महत्वाची समजली जाते. मोगल बादशहा हुमायूनचा चौसा आणि बिलग्रामच्या लढाईमध्ये दनदनीत पराभव करून दिल्लीवर पठाणाची सत्ता इ.स. १५४० मध्ये स्थापन केली. आणि इ.स. १५४५ पर्यंत शेरशहाकडे दिल्लीची सत्तासुत्रे होती. सत्ता हाती आल्यानंतर शेरशहाने उत्तर भारतात काही मोहिमा आखून साम्राज्य विस्तार केला. जवळ–जवळ संपुर्ण उत्तर भारत शेरशहाच्या वर्चस्वाखाली होता. शेरशहाची कारकिर्द त्याने शासन व्यवस्थेमध्ये ज्या सुधारणा केल्या त्यासाठीच प्रसिध्द आहेत.

शेरशहाची शासन व्यवस्था/राज्यकारभार विषयक सुधारणा :–

शेरशहा हा केवळ शौर्यशाली योध्दाच आणि यशस्वी विजेताच नव्हता तर तो एक प्रतिभा संपन्न असा पठाण शासक होता. शेरशहाला फक्त ५ वर्षाची कारककिर्द लाभली असली तरी त्याने राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने प्रशासनात अशा काही महत्त्वपुर्ण सुधारणा घडवून आणल्या की, शेरशहाच्या सुधारणा इतिहासकारांचा वादाचा विषय बनला आहे. डॉ. कानूनगो. शेरशहाच्या शासन व्यवस्थेविषयी रचनात्मक प्रतिभा संपन्न शासक होता'' तर काही इतिहासकारांच्या मते, शेरशहाने अल्लाउद्दीन शासन खिलजीच्या व्यवस्थेचे अनुकरण केले असे म्हटले जाते. शेरशहा प्रजा हित दक्ष राजा असल्यामुळे त्याने राज्यकारभारात अतिशय महत्तपुर्ण सुधारणा घडवून आणून एक आदर्श निर्माण करून ठेवला. म्हणुनच शेरशहाला त्याच्या शासन व्यवस्थेचा शिल्पकार म्हटले जाते.

१) केंद्रीय शासन व्यवस्था :–

साम्राज्याची संपुर्ण सत्ता शेरशहाच्या हातामध्ये केंद्रीत झाली असली तरी, शेरहशने त्या सत्तेचा कधिही दुरूपयोग केला नाही. प्रजेचे कल्याण आणि साम्राज्याची सुरक्षितता या दोन गोष्टीकडे लक्ष ठेवून शेरशहाने आपले केंद्रीय शासन व्यवस्थेचे आयोजन केले. राजाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी चार प्रमुख मंत्री विभाग निर्माण केले. त्यामध्ये

अ) दिवाण – ए – वजारथ (प्रधानमंत्री) :– या विभागाचा प्रमुख वजीर राहत असून राजा नंतर संपूर्ण साम्राज्यावर देखरेख ठेवण्याचे कार्य आणि अर्थ खाते सांभाळण्याचे कार्य सुध्दा वजीराला करावे लागे.

ब) दिवाण – ए – आरिज (सैन खाते) :– हे सैन्य खाते असून या विभागाच्या प्रमुखाला आरीज–ए–मुमालिक म्हटले जाई. सैन्य व्यवस्थेच्यासर्व जबाबदाऱ्या खात्याच्या प्रमुखाचा असते.

क) दिवाण – ए– रसालत (परराष्ट्र खाते) :– हे परराष्ट्र खाते असून परराज्याशी पत्रव्यवहार करण्याचे कार्य या विभागाचे असे.

ड) दिवाण – ए – इन्शा :– या विभागाकडे अंतर्गत पत्र व्यवहाराची कार्ये सोपविल्या गेले होते. वरिल चार मंत्र्याशिवाय दिवाण – ए – काझा (न्याय खाते) तसेच दिवाण–ए–बारिव (गुप्त हेर खाते) इ. प्रमुख विभाग शेरशहाने केंद्रीय शासन योग्य रितीने चालविण्यासाठी निर्माण केले होते.

२) प्रांतीय शासन :–

शेरशहाने आपल्या संपुर्ण साम्राज्याचे ४७ प्रांतात विभाजन केले होते. प्रांत प्रमुखाला राज्यपाल म्हटले जाई. पुन्हा याप्रांताचे सरकार मध्ये (जिल्हा) विभाजन केले जाई. सरकारमधील अंतर्गत शांतात व सुव्यवस्था ठेवण्यासाठी सिखदार व मुंशी हे दोन अधिकारी नियुक्त केले जात. सरकारचे पुन्हा परगण्यामध्ये (तालुका) विभाजन केले जाई. त्यावर सिखदार (सैन्यप्रमुख) अमिन (जमीन, महसुल व्यवस्था) पोतदार (कोषाध्यक्ष) आणि दोन कारकून इ. कर्मचारी वर्ग परगण्याचा

कारभार पाहण्यासाठी ठेवले जात असत. परगण्याचे पुन्हा ग्रामामध्ये विभाजन केले जाई. त्यावर पाटिल, मुकद्दम, कोतवाल इ. कडे ग्रामाची व्यवस्था सोपविली होते.

३) सैन्यखाते :—

शेरशहा स्वत:च अतिशय उत्कृष्ठ सेनापती आणि योध्दा असल्यामुळे त्याची सैन्य/लष्कर व्यवस्था अतिशय कार्यक्षम होती. शेरशहाच्या सैन्यामध्ये अफगानांची संख्या जास्त प्रमाणात होती. त्याच्या सैन्यामध्ये पायदळ, घोडदळ, हत्तीदळ आणि तोफखाना यांचा समावेश होता. खास सैन्य व्यवस्थेसाठी शेरशहाने दिवाण—ए—आरिज हे स्वतंत्र खाते निर्माण करून त्यावर आरिज—ए—मुमालीक या अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. या सेनापतीकडे सैन्यसंचालीत करता मोहिमा इ.ची जबाबदारी असली तरी शेरशहा याकडे स्वत: लक्ष देत असे. सैनीकांना त्यांच्या योग्यतेनूसार रोख वेतन दिले जाई. शेरशहाने चेहरा रजिस्टर पध्दत आणि घोडयांना डाग देण्याची पध्दत सुध्दा अमलात आणली होती. अल्लाउददीन खिलजीप्रमाणे शेरशहाने राजधानीच्या ठिकाणी प्रचंड असे स्थायी सैन्य सरंक्षणासाठी तयार ठेवले होते. शेरहशहा लष्कराचे महत्व ओळखून असल्यामुळे वारंवार लष्करांची पाहणी करत असे. शेरशहाणे मोगल बादशहा हुमायूणचा पराभव करून दिल्लीवर पठाणाची सत्ता स्थापण केली. ती केवळ आपल्या सैन्याच्या भरवशावरच. यावरून शेरशहाची सैन्य व्यवस्था किती कार्यक्षम असेल याची कल्पना आपल्याला येवू शकते.

४) जमीन महसूल व्यवस्था :—

शेरशहा आपल्या जमीन महसूल व्यवस्थेबाबद विशेष प्रसिध्द आहे. भारत हा कृषीप्रधान देश असल्याने जमीन महसूल हेच फार मोठे उत्पन्नाचे साधन असते. याची कल्पना शेरशहाला होती. त्यामुळे शेरशहाने राज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यामध्ये क्रांतीकारक बदल घडवून आणले.

शेरशहाने संपुर्ण जमिनीची दोर खंडाच्या सहाय्याने मोजणी करून उत्पन्नाच्या आधारावर उत्कृष्ठ, मध्यम आणि कनिष्ठ असे तीन वर्ग पाडले आणि एकणू उत्पन्नाच्या १/३ जमीन महसूल शेतकऱ्यांकडून घेतले जाई. शेतकऱ्यांवरील कर रोख किंवा धान्याच्या स्वरूपात घेतला जाई. शेतजमीन आणि जमीन महसूल यांची नोंद पट्टापत्रावर करून त्यावर शेतकऱ्याची सही घेतली जात असे. याशिवाय शेरशहाने जमीन महसुलाच्या पुन्हा तीन पध्दती अंमलात आणल्या.

१) बटाई पध्दत :—

बटाई पध्दतीचे पुन्हा तीन प्रकार पाडण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे —

अ)**<u>खेत बटाई</u>**—

खेत बटाई म्हणजे शेतात पिक उभे असतांना शासन आणि शेतकरी यांच्यात शेतसारा ठरविला जाई.

ब)<u>लंक बटाई</u> :—

शेतातील पिक खळण्यात आल्यानंतर ठरविला जाणारा शेतसारा म्हणजे लंक बटाई पध्दत होय.

क)<u>रास बटाई :—</u>

रास बटाई म्हणजे धान्य साफ केल्यानंतर ठरविला जाणारा शेतसारा म्हणजे रास बटाई होय.

२) नस्क पध्दत :— (कणकुत)

यात जमिनीचे उत्पन्न ढोबळमानाने विचारात घेवून त्यानूसार शेतसारा आकारला जाई.

३) नगदी पध्दत :—

या पध्दतीत तीन किंवा अधिक वर्षाचा करार करून शेतसारा ठरत असे. हि पध्दत शेतकऱ्यांना अतिशय उपयुक्त होतो.

याशिवाय जरी बाणा — जमीन मोजणीकर तर तहसीलांना शेतसारा वसुलीचा कर इ. कर शेतकऱ्यांना दयावे लागे. शेरशहाच्या महसूल व्यवस्थेत काही दोष असले तरी त्या काळाचा आणि इतर शासकाच्या तुलनेत शेरशहाची महसुल सुधारणा उत्कृष्ठ होती असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

५) न्याय व्यवस्था :— (दिवाण—ए—काजा)

शेरशहा न्यायप्रिय शासक असून अतिशय नि:पक्षपाती होता. न्यायदानासाठी दिवाण—ए—काजा हे स्वतंत्र खाते शेरशहाने निर्माण केले होते. आणि त्यावर काजी या न्यायधिशांची

नेमणुक केली होती. विशेष प्रसंगी शेरशहा सुध्दा न्याय दानाचे कार्य करीत असे. शिक्षेचे स्वरूप अत्यंत कडक स्वरूपाचे होते. जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी न्यायदानासाठी वेगवेगळे अधिकारी होते. शेरशहाच्या न्याय व्यवस्थेविषयी निजामुद्दीन अहमद म्हणतो''शेरशहाच्या दरारामुळे आणि न्याय प्रियतेमुळे चोर व लुटारू देखील व्यापाऱ्यांचा मालाची राखण करीत असत.''

६) चलन व्यवस्था :—

भारतीय चलन व्यवस्थेच्या इतिहासात शेरशहाची कारकिर्द महत्वपूर्ण मानली जाते. त्याने 'दाम' नावाची चांदीचे सिक्के प्रचारात आणले तसेच १९५ ग्रॅम वजनाचा चांदीचा रूपया चलनात आणला. डॉ. स्मिथच्या मते, ''हा रूपया म्हणजे ब्रिटिश मुद्रा प्रणालीचा आधार होता.'' तसेच शेरशहाने काही सोन्याचे सिक्केही तयार केले.

७) पोलिस व गुप्तहेर विभाग :—

साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी शेरशहाने पोलिस विभाग निर्माण केले परंतू हे कार्य शेरशहाने सैनिकाकडेच सोपविले होते. प्रांत प्रमुख, सरकार प्रमुख, परागणा प्रमुख, ग्राम प्रमुख हे प्रमुख अधिकारी होते. यांच्या हाताखाली सैन्य ठेवले जाई. प्रत्येक अधिकाऱ्यांना आपल्या परिसरातील गुन्हयाचा शोध घ्यावा लागे. अधिकारी वर्गांनी गुन्हयाचा शोध न लागल्यास त्यांना कठोर शिक्षा शेरशहा देत असे. त्यामुळै गुन्हेागार चोर, लुटारू तसेच अधिकाऱ्यावर वचक असल्यामुळे शेरहशच्या साम्राज्यात शांतता निर्माण झाली.

गुप्तहेर विभाग :— (दिवाण—ए—खास)

या खात्याच्या प्रमुखास दरोगा—ए— डाक चौकी म्हटले जाई, याव्दारे शेरशहाला साम्राज्यातील बारीक—बारीक बातम्या वेळोवेळी मिळत होत्या. शेरशहाच्या साम्राज्यात त्याच्या गुप्तहेर विभागाचा महत्वाचा वाटा आहे.

८) व्यापार व दळणवळण :—

शेरशहाने इतर सुधारणाबरोबरच परकिय चलण प्राप्त करण्यासाठी व्यापार आणि दळणवळणच्या क्षेत्रामध्ये अतिशय महत्वपूर्ण सुधारणा केला. व्यापाराची भरभराट व्हावी म्हणुन पूर्वी व्यापारावर असलेले अनेक बंधने काढुन घेतली. अंतर्गत आणि बहिर्गत व्यापारावर जकात कर आकारल्या जात असे. त्यामुळे व्यापारात वृध्दी/वाढ घडून आली.

व्यापार वाढीमध्ये दळणवळणाची साधने महत्वाची असल्यामुळे शेरशहाने दळणवळणाच्या साधनात सुध्दा वाढ केली. बंगाल मधील सोनार गावपासून तर दिल्ली, आग्रा आणि सिंधू नदीपर्यंत तीन हजार मैल लांबीची एक पक्की सडक बांधून काढली याशिवाय दिल्ली ते आग्रा, लाहोर ते मुलताण इ. प्रमुख रस्ते शेरशहाने बांधून काढले.

९) इतर सुधारणा :—

शेरशहा शिक्षणप्रेमी असल्याने त्याने आपल्या काळात शिक्षणासाठी अनेक मदरसे स्थापन केली. हिंदु आणि मुस्लीमासाठी शिक्षणाच्या वेगवेगळया सोयी होत्या. याशिवाय शेरशहाने धर्मार्थ दवाखाने निर्माण केले. धर्मशाळामध्ये आणि संपुर्ण राज्यामध्ये योग्य रितीने पत्रव्यवहार व्हावा म्हणून सैनिकांची नियुक्ती केली. त्याचबरोबर शेरशहाने भारताच्या वायव्य सिमेवर रोहतागचा किल्ला बांधला. दिल्लीचा पुराणा किल्ला तसेच बिहार राज्यातील संसाराम येथे स्वत:चा मकबरा (समाधी) बांधून काढला.

शेरशहाच्या धार्मिक धोरणात्मक इतिहासकारात मतभेद असलेले दिसून येतात. परंतू शेरशहाने हिंदूवर धार्मिक अत्याचार केले नाही.

मुल्यमापण :—

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात पठाणशासक शेरशहाची फक्त पाच वर्षांची कारकिर्द अतिशय अविस्मरणीय ठरली. शेरशहाने स्वत:च्या कर्तबगारीने शुन्यातून पठाणाची सृष्टी निर्माण केली. यावरून शेरशहा किती पराक्रमी आणि मुत्सद्दी असेल याची कल्पना आपल्याला येवू शकते. शेरशहा यशस्वी विजेता असला तरी तो आपल्या अंतर्गत सुधारणासाठी इतिहासामध्ये विशेष प्रसिध्द आहे. प्रशासनाच्या सर्व क्षेत्रामध्ये शेरशहाने अतिशय महत्त्वपूर्ण सुधारणा करून जनकल्याण आणि साम्राज्याचे संरक्षण या दोन गोष्टी साध्य केल्या.

शेरशहाचे उत्कृष्ठ असे केंद्रीय शासन आणि त्याच धरतीवर असलेली प्रांतीय शासन व्यवस्था, शेरशहाने उभारलेले कार्यक्षम असे लष्कर, त्याची इतिहास प्रसिध्द महसूल व्यवस्था, त्याची नि:पक्षपाती न्यायव्यवस्था, व्यापार आणि दळणवळण क्षेत्रात देशाच्या भरभराटीच्या दृष्टीने केलेल्या सुधारणा अतिशय महत्त्वपूर्ण समजल्या जातात. एकंदरीत शेरशहाच्या सुधारणाचा विचार करताना प्रशासनाचा असा एकही अंश सुटला नाही. कि त्या अंगाला शेरशहाने स्पर्श केला नाही. शेरशहाने सत्ताधारासाठी अगोदरच भुमी तयार करून ठेवली होती. म्हणुनच शेरशहाला अकबराचा अग्रगामी दुत असे म्हटले जाते.

शेरहशच्या शासन व्यवस्थेसंबंधी इतिहासकार कीन म्हणतो ''या पठाणा एवढा शहानपणा कोणत्याही शासकाने दाखविला नाही.ब्रिटिशांनी सुध्दा दाखविला नाही.''तर कानून गो म्हणतात ''शेरशहा आणखी जास्त वर्ष जगला असता तर त्याने शासनामध्ये असे काही सुधारणा केल्या असत्या की अकबराच्या सुधारणांना जागाच राहिली नसती.''

संदर्भ ग्रंथ सुची :—

१. प्रा. बाळकृश्ण सा.बारगळ, 'मध्यमकालीन भारत' इ.स. १२०६ ते १७०७
२. नी.सी.दिक्षीत, 'भारताचा इतिहास प्रारंभापासून' इ.स. १७६१ पर्यंत, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, महाल नागपूर तीसरी आवृत्ती जून २००८
३. प्रा.प्रभाकर कृ. ढवळे, भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती १९८७
४. डॉ.एम.एल.शर्मा, 'मुगल साम्राज्यका उदय और वैभव'
५. डॉ.आर.एस.शर्मा, 'भारत में मुगल साम्राज्य'
६. डॉ. आर.पी.त्रिपाठी, 'मुगल साम्राज्यका उत्थान व पतन'

ऑनलाइन व्यापार व त्याचे त्याचे परिणाम

प्रा. डॉ. जयंत पोरे,

गो.से .महाविद्यालय, खामगाव

प्रस्तावना

भारतीय व्यावसायिक परिस्थिती आता कशी आहे आणि काही वर्षांपूर्वी ती कशी होती याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, भारतीय व्यावसायिक रचनेत गेल्या काही वर्षापासून निश्चितच बदल झाला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने औद्योगिकीकरणावर जास्त लक्ष केंद्रित केल्या गेले आहे भारतीय व्यावसायिक परिस्थितीच्या परिवर्तनात सरकारची(केंद्र व राज्य) मोठी भूमिका आहे. यामध्येच काही वर्षात ऑनलाइन व्यापार होय. ऑनलाईन व्यापार हा नव्याने उदयास आलेला व्यापार आहे .

ऑनलाइन व्यापाराची संकल्पना सर्वप्रथम 1990 मध्ये आली. ज्या काळात भारतात इंटरनेट उपलब्ध नव्हते. तथापि 90 च्या दशकाच्या उत्तरार्धात, अधिकाधिक लोक इंटरनेट बद्दल जागृत झाली आणि त्याद्वारे व्यापार सुद्धा केला जाऊ शकतो हे माहीत झाले. बहुतेक भारतीयांसाठी काही वर्षापर्यंत ते एक लक्झरी व्यापार म्हणून होता. 2020 मध्ये (IRCTC) ने ऑनलाईन आरक्षण प्रणाली सुरू केली तेव्हा लोकांनी इंटरनेटला काहीतरी उपयुक्त साधन म्हणून स्वीकारण्यास सुरुवात केली. लोकांना (AMAZON)ॲमेझॉन बद्दल माहिती मिळाली आणि त्यामुळे भारतात ई कॉमर्स चा उदय झाला .

ई-कॉमर्स कंपन्यांच्या आगमनानंतर भारतात अशा अनेक अशक्य गोष्टी सहज साध्य होताना दिसत आहेत. लोकांनी ई-कॉमर्स उद्योगाचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे .औषधे किराणा सामान यासारख्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तू त्यांना घरपोच मिळत आहेत.

विविध ऑफर च्या माध्यमातून हा उद्योग दिवसेंदिवस वाढत आहे .वर्षभरामध्ये साधारणतः तीन ते चार ऑफर देण्यात येतात. त्यामध्ये मुख्यतः 15 ऑगस्ट, 26 जानेवारी व दिवाळी ह्या मुख्य असतात .वस्तूची ऑनलाइन खरेदी हा आजकालच्या तरुण पिढीला आवडता विषय झाला आहे. मोबाईलवर इंटरनेटची सुविधा असल्याने खरेदीचा प्रचंड प्रमाणात वेग घेतला आहे. वॉच, कपडे ,बूट इत्यादींची मागणी वाढत आहे. पुढील काही वर्षात ऑनलाईन व्यापाराचे प्रमाण वाढेल असे मत तज्ञ व्यक्त करीत आहे .जसजसा ऑनलाइन व्यापार वाढत आहे त्या प्रमाणात किरकोळ व्यापाऱ्यांची चिंता वाढत आहे. त्याच कारणाने किरकोळ व्यापारी ऑनलाइन व्यापारावर बंदी घालण्याची मागणी करीत आहेत. इंटरनेट माध्यमातून वस्तूंची वैशिष्ट्ये ,किंमत, छायाचित्रे पाहिली जातात त्यातून वस्तूंची तुलना केली जाते. बाजारातील दुकानांच्या ज्या किमती असतात त्यापेक्षा कमी किमतीला व घरपोच या वस्तू मिळतात त्या कारणाने ऑनलाइन व्यापार वाढत आहे .

संशोधनाचा उद्देश :-

1. ऑनलाइन खरेदी विक्रीच्या वाढत्या प्रमाणाचे अध्ययन करणे .
2. ऑनलाईन खरेदीमुळे लहान व्यवसायिकांच्या व्यवसायावर होणाऱ्या परिणामाचे अध्ययन करणे.
3. ऑनलाईन खरेदीमध्ये होणाऱ्या फसवणुकीचा शोध घेणे.

संशोधनाची गृहिते :-

1.ऑनलाईन शॉपिंग खरेदी तसेच विक्रीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

2. ऑनलाईन व्यवसायाने लहान व्यवसायिकांना हानी सहन करावी लागत आहे .
3. ऑनलाईन खरेदीने ग्राहकांची फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत आहे .

संशोधन पद्धती :-

वस्तुस्थिती जाणून घेण्याकरिता एखाद्या विषयाचा सूक्ष्म रीतीने समिक्षात्मक अभ्यास करणे होय. या संशोधनासाठी प्रमाणित केल्या पद्धतीला संशोधन पद्धती असे म्हणतात. प्रस्तुत शोधनिबंधासाठी द्वितीय सामग्रीवर आधारित असून यामध्ये प्रामुख्याने पुस्तके, मासिक, वर्तमानपत्र व शासकीय अहवाल तसेच इंटरनेट इत्यादींचा आधार घेण्यात आला आहे

भारतीय अर्थव्यवस्था ही आजही अमेरिका व चीन सारख्या देशापेक्षा मागे आहे .या दोन्ही देशांमध्ये PWC च्या 2014 च्या संशोधनानुसार ई-कॉमर्सने 150 अब्ज पेक्षा जास्त विक्री केली आहे. 2020 मध्ये डिजिटल कॉमर्स 360 च्या अंदाजानुसार ऑनलाइन व्यापाऱ्यांनी राज्यांमध्ये वर्षानुवर्षे 44% वाढ केली आहे तसेच किरकोळ विक्रीत $ 4.04 ट्रिलियन पर्यंत वाढली जी 1999 नंतरची सर्वात जास्त वाढ आहे.

गेल्या काही वर्षापासून भारतीय अर्थव्यवस्था किंवा व्यापार एक प्रकारे डिजिटल क्रांतीतून जात आहे. देशाच्या 50% पेक्षा जास्त लोकसंख्येकडे आता इंटरनेट उपकरणे उपलब्ध आहेत भारतातील प्रचंड लोकसंख्य तही जास्त लोकसंख्येचा वापर इंटरनेटचा पोहोचला आहे. इंटरनेटचा सर्वात जास्त फायदा ई कॉमर्स ला झाला आहे .इंडिया बँक इक्विटी फाउंडेशन (IBFF) च्या अहवालानुसार देशातील ई-कॉमर्स उद्योगातून मिळणारा महसूल 2020 पर्यंत US $100 पेक्षा जास्त राहील असा अंदाज आहे.

भारतात ऑनलाइन व्यापार वाढत आहे. त्याचबरोबर या व्यापारात फसवणुकीचे प्रमाण ही वाढत आहे. ऑनलाइन व्यापारा ची कार्यालय देशभरात कुठेही असतात त्या कारणाने ग्राहकांनी तक्रार कुठे करायची याची माहिती ग्राहकांना नसते. ग्राहक संरक्षण कायद्याने ग्राहकांना संबंधित ठिकाणाच्या ग्राहक मंचात दावा दाखल करण्याचे म्हटले आहे. मात्र ऑनलाईन खरेदी करताना असे संरक्षण नाही ग्राहकांच्या काही अडचणी असल्यास त्यासंबंधी तक्रार कंपनीच्या कार्यालयातच करावी लागते. आज तरी ऑनलाईन व्यापारात ग्राहकांच्या फसवणुकीचे प्रमाण वाढत आहे असे असून सुद्धा भारतीय अर्थव्यवस्थेत व बाजारात ऑनलाईन व्यापार फुफावत आहे .

निष्कर्ष व उपाय

भारतीय व्यापार किरकोळ व्यापार हा जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वात मोठा उद्योग आहे आणि तो वेगाने वाढत आहे .भारतातील किरकोळ विक्री मध्ये गेल्या काही दशकांमध्ये अनेक उल्लेखनीय कामगिरी व वाढ झालेली आहे आणि किरकोळ व्यापार हा अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे. मध्यमवर्गीयांची उत्पन्न वाढले आहे व जीवनशैलीत बदल होत आहे. किरकोळ व्यापाऱ्याला मॉल संस्कृती किंवा ऑनलाईन बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी स्पर्धा करावी लागत आहे परंतु स्पर्धेत टिकून राहणे तेवढे सोपे नाही कारण ग्राहक हा हुशार झाला आहे कंपन्यांकडून विविध ऑफर्स ब्रँडेड वस्तू व सेवा शोधत असतो व ग्राहकांच्या अपेक्षा दिवसेंदिवस वाढत आहेत हे अंतर ओळखून किरकोळ विक्रेत्यांनी ते अंतर कमी केले पाहिजे त्यामुळे ग्राहकांची समाधानाची पातळी वाढेल .

ऑनलाइन खरेदीचे जसे फायदे आहेत तसेच तोटे सुद्धा आहेत ऑनलाइन वस्तू सतत स्वस्त मिळत असल्या तरी त्याच्या दर्जाबाबत कोणतीही शाश्वती नसते. किरकोळ व्यापाऱ्यात आपण वस्तू ताबडतोब घेऊ शकतो. ऑनलाइन मध्ये वस्तू यायला तीन ते चार दिवस लागतात पारंपारिक दुकानातून वस्तू खरेदी केली तर वस्तूंची वॉरंटी गॅरंटी व परत करणे सहज शक्य होते याउलट ऑनलाईन वस्तू परत करणे अवघड असते या सर्व अडचणी येतात.

संदर्भसूची

1. भारतीय अर्थव्यवस्था:- क. डॉ .स. श्री .मु. देसाई व डॉ. सौ. निर्मला भालेराव
2. ई-कॉमर्स मूलभूत सिद्धांत :-नीता फडणवीस
3. ई कॉमर्स :- विवेक मेहत्रे
4. ई-कॉमर्सची मूलतत्त्वे :_डॉ.
5. www.ecommerce.com
6. संकेतस्थळ www.google.com

कृषि पर्यटन में अपार संभावनाएं

डॉ. एम.आर. दातीर
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र) जगदंब महाविद्यालय,अचलपूर
मो.नं.9623739904

भारत में कृषी केवल आजीविका का साधन नही, बल्कि जनमानस में रची-बसी एक पुरातन संस्कृति है | उत्तम खेती, मध्यम बान, निषिद चाकरी, भीख निदान की परंपर वाले हमारे देश में कृषक को 'अन्नदाता' और धरतीपुत्र कह कर सम्मानित किया गया | परंतू औद्योगीकरण, शहरीकरण और आधुनिकीकरण के वर्तमान दौर में कृषिक्षेत्र और जोत आकार संकुचित होनेसे कृषकों के आर्थिक-स्तर पर चोट पडी | अपेक्षाकृत कम लाभदायकताके कारण कृषक परिवरों में पुश्तैनी खेती से विमुख होने का सिलसिला शुरू हो गया है | मुख्य रूप से कृषि पर टिकी हमारी अर्थव्यवस्था के लिए यह एक बुरा संकेत है | जो भविष्य में हमारे लिए अनेकसामाजिक-आर्थिक विपदाओं का कारण बन सकता है | इसलिए कृषि और कृषकों के आर्थिक उध्दार के मकसद से अनेक मंचों पर विमर्श प्रारंभ हुआ है | कृषि और कृषि उद्यमों से इतर भी सोचा-विचारा गया है | लीक से हटकर कुछ नए अवसरतलाश करने की कोशिश की गई है | और इन्ही प्रयासों का परिणाम है 'कृषि पर्यटन', जिसे एग्री-टूरिज्म,एग्रो-टूरिज्म या फार्म टुरिज्म भी कहा जाता है | कुछ देशों मे इसे एग्रीमेंट का नाम दिया गया है |

गांव-गांव पर्यटनः-

जैसा कि नाम से स्पष्ट है 'कृषि पर्यटन' एक ऐसा उधम है, जिसमें कृषि और पर्यटन के बीच एक विवेकपूर्ण और संतुलित सामंजस्य स्थापित करकेपर्यटकों के मनोरंजन एवं विश्राम की व्यवस्था की जाती है | इस विषय पर चर्चा से पूर्व आवश्यक है कि इन दोनों क्षेत्रों की यथास्थिती पर एक नजर डाली जाए | भारत मे कृषि आधी से अधिक जनसंख्या के लिए रोजगार और आजीविका का साधन है | परंतू सकल घरेलू उत्पाद (GDP) में इसका योगदान लगभग 17-18 प्रतिशत आंका गया है | कृषि की महत्ता इसतथ्य से भी आंकी जा सकतीहै कि देश में कुल भौगोलिक क्षेत्र के लगभग 43 प्रतिशत क्षेत्र पर बुआई कर खेती की जाती है | सन 2011 की जनगणना के अनुसार देश में किसानों की संख्या लगभग 11.9 करोड है | जबकि लगभग 14.4 करोड कृषि श्रमिक इस कार्य में सीधे जुडे है | भारत में विश्व की लगभग सभी प्रकार की जलवायु और मिट्टी पाई जाती है | जिससे यहां अनुठी और अतुलनीय जैव-विविधता मौजुद है | यह प्राकृतिक वरदान भारतीय कृषि को अपार संभावनाओ वाला क्षेत्र बनता है | दुसरी और पर्यटन हमारे देश का उभरता हुआ व्यवसाय है | जिसने सन 2018 में देश के जीडीपी (GDP) मे 9.2 प्रतिशत और रोजगार मे 8.1 प्रतिशत का योगदान दिया है | पर्यटन क्षेत्र में 6.9 प्रतिशत की वार्षिक वृध्दि दर देखी जा रही है | सन 2018 मे देश मे कुल 88.9 लाख विदेशी पर्यटक आए थे | जिनकी संख्या दिन बदिन बढती जा रही है | पर्यटन की दृष्टि से विश्व के 136 देशो में भारत का 40 वा स्थान है | परंतू पर्यटन की प्रतिस्पर्धी कीमतों के नजरिए से 10 वा स्थान है | इस विवेचन से स्पष्ट है कि भारत में कृषि और पर्यटन दोनों ही क्षेत्रों मे विकास तथा विस्तार की संभावनाएं मौजूद है | जिनका लाभ कृषि पर्यटन के उभरते उधम को मिल सकता है |

भारतीय पर्यटन उद्योग में कृषि पर्यटन एक नए अवसर के रूप में सामने आया है | जिनका मुख्यकारण सामाजिक दशाओ मे हो रहा बदलाव है | आजकल शहरी जीवन आपा-धापी से भरपूर और जटिल हो गया है | आमदनी बढी है | लेकिन साथ मे तनाव भी लाई है | शहरी व्यस्तता के कारण लोग अपनी जडों यानी गांवो से दूर होते जा रहे है | एक सर्वेक्षण के अनुसार लगभग 35 प्रतिशत शहर निवासियो का गांव में अब कोई संबंधी नही रह गया है और 43 प्रतिशत कभी गांव नही गए है| इसका सबसे बुरा प्रभाव बच्चों पर पड रहा है | बडे और आधुनिक स्कूल उन्हे किताबी

ज्ञान तो दे रहे है | परंतू वे प्रकृति से दूर होते जा रहे है | उन्हे नही पता कि उनकी थालीमेआने वाली रोटीकिसतरह खेत से यात्रा शुरू करकेउनकीरसोई तक पहुंचती है | गाय-भैंस से दूध कैसे निकलता है | खेत खलिहानो, ताल-तलैयों और पशू-पक्षियों से उनकासंबंध टूट गया है |या कमजोरपड गया है | इस कारण शहर के निवासीअब अपना कुछ समय गांवमेबितानाचाहतेहै | भले ही पर्यटक के रूप में लगभग इन्ही कारणों से विदेशी पर्यटक भी हमारे गाँवों में आकर अपनी छुट्टीया बिताना चाहते है |

कृषि पर्यटन के अंतर्गत शहरी क्षेत्रों और विदेशी पर्यटको के लिए खेतों को खोलना और ग्रामीण जीवन का अनुभव लेना शामिल है | उन्हे विभिन्न फसलों के बारे मे बताना, फसलो को कैसे बोया और काटा जाता है | फसलो को स्वयं काटने का अनुभव महिलाओ को गेहूँ अथवा अन्य फसलों को साफ करने का अनुभव बच्चों को भेड, बकरी, मुर्गी के साथ खेलना एवं स्वयं स्पर्श करना, साथ ही बैलगाडी पर सवारी, बकरियों के छोटे बच्चो को गोद में खिलाना, बत्तखों के पीछे दौडना, मुर्गियां को भाग कर पकडना शहरो मे मॉल मे घुमने, कार्टून तथा मोबाईल पर विडिओ गेम खेलने से ज्यादा रोमांचित करता है | इन अनुभवों को वे जीवन पर्यंत याद रखते है | साथ ही गाँवों का पारम्परिक भोजन और उसको पारम्परिक बर्तनो मे तैयार करने की कला के साथ-साथ हस्तकला, संस्कृति, संगीत और भाषा से दो-चार होने का अवसर मिलता है |

कृषि पर्यटन क्यों :-

1) कृषि पर्यटन विश्व के साथ-साथ हमारे देश में उभरते क्षेत्रों मे से एक है | कृषि पर्यटन जैसी अवधारणाएं उत्तम दर्जे की उत्पाद एवं जानकारियां उपलब्ध कराती है |

2) यात्रा और पर्यटन के कुल योगदान में भारत 184 देशों मे 11 वे स्थान पर है |

3) यात्रा और पर्यटन क्षेत्र में कुल रोजगार का 9 प्रतिशत योगदान देने मे सक्षम है |

आज की खेती पारम्परिक खेती नही रह गई है | बल्कि खेती से समुचित लाभ लेने के लिए नई-नई तकनीको का प्रयोग करना पड रहा है | जिसके कारण खेती दिन-पर-दिन महंगी होती जा रही है | जनसंख्या के दबावमे खेती पर बढते दबाव के कारण भूमी की उर्वरता दिन-पर-दिन कम होती जा रही है | ऐसी स्थिती में यदि कृषि पर्यटन के माध्यम से खेतीमे होनेवाले परिश्रम और लगने वाली लागत को शहर के व्यक्ति एवं बच्चे स्वयं अनुभव करेंगे तो उनके मन मे किसानों के प्रति एक आदर का भाव उत्पन्न होगा और वे अनाज की महत्ता को समझेंगे और उसे बेकार करने से बचेंगे |

विश्व में कृषि पर्यटनका विकास बहुत जोर-शोर से हो रहा है कृषि पर्यटन को विभिन्न रूपो मे देखा जा रहा है | कृषि पर्यटन लोगों को ताजी हवा में सांस लेने, ग्रामीण परिवेश को जानने, घुडसवारी, बैलगाडी सवारी, ताजे फलों का सेवन, जानवरों के साथ खेलना, दुध निकालने का अनुभव, खेतो मे कटाई का अनुभव, खेतो से ताजे फल, सब्जी काटने व खरीदने का अनुभव, फलो को पेडों से तोडकर खाने का अनुभव कृषि पर्यटन को अन्य पर्यटनों के मुकाबले मे एकदम अलग-सा अनुभव देता है | यह मनोरंजन के साथ-साथ शैक्षणिक एवं अधिगम प्रक्रिया भी है |

भारत एक कृषि प्रधान देश है | शहरी आबादी दिन-प्रति-दिन बढतीजा रही है | आजकल शहरी बच्चों की दुनिया एक बंद दरवाजे वाले स्कूलों, कक्षाओं, टेलिविजन पर कार्टून कार्यक्रमों, वीडियो गेम, इंटरनेट तक ही सीमित होकर रह गई है | उन्होने मदर नेचर को केवल टीवी स्क्रीन अथवा नेशनल ज्योग्राफिक चैनलो में ही देखा है | यह भी देखागया है की शहरो मे रहने वाले 25 प्रतिशत लोगों का गाँवो से कोई सम्पर्क ही नही है | और नही उनके रिश्तेदार गाँवों मे है | लगभग 34 प्रतिशत लोग कभी गाँव ही नही गए है |

कृषि पर्यटन के उद्देश (शोध पत्रीका के उद्देश):-

1) देश मे कृषि पर्यटन को बढावा देने के लिए चल रही कृषि पर्यटन पहल और मौजूदा योजनाओं का अध्ययन करना |

2) कृषि पर्यटन मे मौजूदा व्यापार मॉडल का दस्तावेजीकरण व्यवहार्य मॉडल सुझाव देना |

3) कृषि पर्यटन के निर्वाह में विस्तार और सलाहकार सेवाओं की रणनीतिक भूमिका का पता लगाने हेतू |

❋कृषि पर्यटन-एक संभावना :-

1) खेती उद्योग और जीवनशैली के बारे मे जिज्ञासा :--

गांवो में जडे रखने वाली शहरी आबादी को हमेशा भोजन, पौधों, जानवरों, कच्चे माल जैसे लकडी, हस्तशिल्प, भाषा, संस्कृति, परम्परा, कपडे और ग्रामीण के बारे में जानने की जिज्ञासा रहती है | कृषि पर्यटन जो किसनों, गांवो और कृषि के चारोंओर घुमता है | आबादीके इस क्षेत्र की जिज्ञासा को संतुष्ट करने की क्षमता रखता है |

2) एक सस्ता प्रवेश व्दार :- कृषि पर्यटन मे भोजन, आवास, मनोरंजन और यात्रा की लागत कम से कम है | यह पर्यटक आधार को बढाता है | यात्रा और पर्यटन की वर्तमान अवधारणा शहरी और समृध्द वर्ग तक सीमित है जो आबादी का केवल एक छोटा हिस्सा है | कृषि की अवधारणा यात्रा और पर्यटन को बडी आबादी तक ले जाती है | और लागत प्रभावशीलता के कारण यह पर्यटन के दायरे को चौडा करती है |

3) परिवार उन्मुख मनोरंजन गतिविधियों के लिए मजबूत मांग :-

गांव सभी आयु वर्गों यानी बच्चों, युवा, मध्यम और बूढे पुरूष, महिला पुरे परिवार को सस्ती कीमत पर मनोरंजक अवसर प्रदान करते है | ग्रामीण खेल, त्यौहार, भोजन, पोशाख और प्रकृति पूरे परिवर को विभिन्न प्रकार के मनोरंजन प्रदान करते है |

4) शांतिऔर शांति के लिए इच्छा :- आधुनिक जीवन विविध सोच और विविध गतिविधियों का एक संकलन है | हर व्यक्ति आधुनिक सुख-सुविधाओं का आनंद लेनेके लिए और अधिक पैसा कमाने के लिए अलग-अलग दिशाओंमे काम करने का प्रयास करता है | इसलिए शांति हमेशा अपने तंत्र से बाहर है | पर्यटन शांतिपूर्ण स्थान खोजने का एक साधन है | कृषि पर्यटन में शांति और शांति का समावेश है क्योंकि यह शहरी क्षेत्रों से दूर है और प्रकृति के करीब है |

5) प्राकृतिक वातावरण में रूचि :-

व्यस्त शहरी आबादी प्रकृति की ओर झुक रही है क्येांकि, प्राकृतिक वातावरण व्यस्त जीवन से हमेशा दूर रहता है | पक्षी, जानवर, फसल, पहाड, जल निकाय, गांव शहरी आबादी को पूरी तरह से एक अलग वातावरण प्रदान करते है | जिसमे वे अपने व्यस्त शहरी जीवन से कुछ समय के लिए मानसिक शांति और संतोष का अनुभव कर सकते है |

6) भीड-भाड वाले रिसोर्ट और होटलों से मोहभंग :-

भीड-भाड वाले होटल एवं रिसोर्ट शांति चाहने वाले लोगों के लिए परेशानी का सबब बनते जा रहे है | इसीलिए फार्म हाउसों के माध्यम से उप-शहरी क्षेत्रों मे गांव जैसा माहौल बनाने का प्रयास करते है | आजकल फार्म हाउसों में की जाने वाली शादीया और पार्टिया इसका ज्वलंत उदाहरण है |

7) ग्रामीण मनोरंजन :-

गांव त्यौहारों ओर हस्तशिल्प के माध्यम से शहरी लोगों को विभिन्न प्रकारके मनोरंजन प्रदान करते है | ग्रामीणों की जीवन शैली, पोशाक, भाषाएं, संस्कृति एवं परम्पराएं उन्हे आकर्षित करती है | किसानों के आसपास का कृषि वातावरण और पूरी उत्पादन प्रक्रिया शहरी शिक्षाके बीच जिज्ञासा पैदा कर सकती है | कृषि महत्व के स्थान जैसे उच्चतम फसल उपजाने वाले खेत, उच्चतम पशू उपज देने वालेखेत,प्रसंस्करण इकाईयों, खेत जहां नवाचारों ने पर्यटकों को आकर्षित करने की कोशिश की, कृषि उत्पादों जैसे फार्म गेट, ताजा बाजार,प्रसंस्कृत खाद्य पदार्थ, जैविक खाद्य शहरी पर्यटकों को लुभा सकते है |

8) कृषि पर्यटन का शैक्षिक मूल्य :-

कृषि पर्यटन शहरी स्कूली बच्चों के बीच ग्रामीण जीवन और कृषि विज्ञान के बारे में जिज्ञासा पैदा कर सकता है | यह स्कूल पिकनिक के लिए सबसे अच्छा विकल्प प्रदान करता है | यह कृषि में शहरी कॉलेज के छात्रों के लिए अनुभव करके सीखने का अवसर प्रदान करता है | यह भविष्य के किसानों को प्रशिक्षण प्रदान करने का एक साधन है | यह कृषि क्षेत्र के अधिकारियों को प्रशिक्षित करने के लिए शैक्षिक और प्रशिक्षण उपकरण के तौर पर प्रभावी रूप से उपयोग किया जाएगा | यह मनोरंजन के माध्यम से शिक्षा के लिए अव्दितीय अवसर प्रदान करता है | जहां सीखना मजेदार और आसान है |

कृषि पर्यटन को बढावा देने के लिए रणनीति:-

1) उत्पाद :-

कृषि पर्यटन मे उत्पाद देखना, विश्वास करना और अंततः अनुभव करना | यह अनुभव अव्दितीय और बेजोड है | पेड पर चढना, बैलगाडी में सैर और खेत मे गन्ने के रस का आनंद लेनेका अनुभव अपने आप मे अनुठा है और कोई भी मिलियन डॉलर का पर्यटन केंद्र इस तरह के अनुभव नही दे सकता |

2) मूल्य :-

कृषि पर्यटन इकाईयां पीक सीजन मे यानी नवंबर से जनवरी तक अधिक चार्ज कर सकती है |और बाकी अवधि के दौरान कम चार्ज रख सकती है | ग्रामीण त्यौहारों के दौरान या महत्वपूर्ण घटनाओं के समय एग्रो-टुरिज्म इकाईया अधिक चार्ज कर सकती है |

3) स्थान :-

वह स्थान जहां पर्यटकों को ठहराया जाता है | मूल्य निर्धारण को भी प्रभावित करता है | यदि पर्यटकों को किसानो के साथ गांवों मे ही समायोजित किया जाता है | तो शूल्क कम हो सकता है | जबकी खेतो में आवास की लागत अधिक होती है | क्योंकि विशेष रूप से पर्यटक प्रयोजन के लिए बुनियादी ढांचा खेत मे बनाया जाता है | जबकी गांव में किसानों के घर मे मौजुदा सुविधाओं का उपयोग किया जाता है |

4) प्रचार :-

कृषि पर्यटन को बढावा देना और रणनीति गठबंधन तीन स्तरों पर हो सकताहै |

i) एयर लाइनों, टूर ऑपरेटरों और विदेशी दुतावासों के साथ गठबंधन करके

ii) होटल उद्योग के साथ मे गठबंधन करके

iii) कृषि पर्यन युनिटस व्दारा किया गया प्रमोशन यह बढावा देनेकी रणनीति हो सकती है |

कृषिपर्यटन को बढावा देने के लिए सुझाव :-

1) संचार :-

एक दुरस्थ कृषि पर्यटन इकाई को प्रचार प्रदान करना मुश्किल है | इसलिए या तो सामुहिक रूप से एग्री-टूरिज्म ऑपरेटर्स प्रचार कर सकते है | या आईटीडीसी, राज्यपर्यटन विकास निगम, एनजीओ प्रेस और टूर ऑपरेटर जैसे संगठन इस जिम्मेदारी को उठा सकते है | कृषि पर्यटन को बढावादेनेमें सूचना प्रोद्योगिकी बहुत महत्वपूर्ण भूमिका निभा सकती है |

2) परिवहन :-

ग्रामीण इलाकों मे पहुँच मार्ग की कमी और खराब परिवहन सुविधाओं के कारण दूरस्थ कृषि पर्यटन इकाईयो तक पहुंचना सबसे बडी चुनौती रहा है | इंटरनेट कनेक्टिविटी और सडक, हवाई और रेलमार्ग संयोजकता जैसी सुविधाएं कृषि पर्यटन के विकासके लिए जरूरी है | ग्रामीण क्षेत्रों में सडके, परिवहन और दूरसंचार विशेष रूपसे जहां कृषी पर्यटन इकाईयां प्राथमिकता के आधार पर स्थापित की जाती है | ये प्रयास साझेदारी मोड में निजी भागीदारी के साथ प्रभावी हो सकता है |

3) आवास :-

कृषि पर्यटन मे सुरक्षित और स्वच्छ आवास होना चाहिए | शहरी और विदेशी पर्यटक इन न्युनतम सुविधाओं की तलाश करते है | एक ओर एग्री टूर आपरेटरों को उन्मुख करना और दूसरी ओर ऐसे प्रयासों को प्रोत्साहन प्रदान करना आवश्यक है | नियमित रूप से साफ पानी की आपूर्ति और स्वच्छ शौचालय महत्वपूर्ण है |

4) नेटवर्किंग :-

दूरस्थ स्थान पर कृषि पर्यटन ऑपरेटरकी सहायता के लिए राष्ट्रीय और राज्य स्तर पर सार्वजनिक और निजी हितधारको की नेटवर्कींग आवश्यक है | इस नेटवर्क से एग्री टूरिज्म इकाईयों को नीति समर्थन,बुनियादी ढांचा और प्रचारमिल सकता है |

5) किसानों की क्षमता का निर्माण :-

किसानों की सुविधाओं, आतिथ्य और सार्वजनिक संबंधोके रखरखाव की ओर उन्मुख होना चाहिए |

6) पर्यटकों की सुरक्षा :-

कृषि पर्यटन इकाईयां सुदूर क्षेत्रों मे स्थित है जिसमे सडक,चिकित्सा सुविधा, दूरसंचार का अभाव है | और कभी-कभी चोरी और जंगली जानवरों से खतरा होता है | इसलिए आपातकालीन चिकित्सा देखभाल के लिए सुविधाओं के अलावा स्थानीय आबादी का समर्थन होना चाहिए |

7) सार्वजनिक-निजी भागीदारी :-

कृषि व्यवसायी, किसान संगठन, सहकारी समितीयां, एन.जी.ओ. और एग्रीबिजनेस कंपनीया किसानों और सरकारी एजेंसीयो के टूर ऑपरेटरों की मदत से इन उपक्रमों को अपना सकती है | ट्रांसपोर्टर्स और हॉस्पिटैलिटी इंडस्ट्री को भी इस प्रक्रिया मे फायदा होगा |

❋ निष्कर्ष :-

भारत में प्राकृतिक परिस्थितियों और विभिन्न प्रकार के कृषि उत्पादों के साथ-साथ ग्रामीण परम्पराओं, त्यौहारों की विविधता के कारण कृषि पर्यटन के विकास की काफी सम्भावनाएं है | देश की आबादी का एक बडा हिस्सा शहरी क्षेत्रों में रहता है | ग्रामीण जीवन का आनंद लेना चाहता है | ग्रामीण जीवन के बारे में जानना चाहता है | देश में कृषि पर्यटन व्यवसाय विकसित करने का यह एक अच्छा अवसर है | लेकिन किसानों में इस व्यवसायके बारे में कम जागरूकता के साथ-साथ वित्त और उचित दृष्टिकोण की समस्या है | इसलिए जिलों के कृषि विज्ञान केंद्रों एवं कृषि विश्वविद्यालयों को'कृषि पर्यटन' के विकास एवं विस्तार हेतू प्रयास करना चाहिए और 'कृषि पर्यटन' के संबंध में कुछ नवीन विचारों का आदान-प्रदान करना चाहिए | सरकार को अनुदान और संस्थागत वित्त व्दारा कृषि पर्यटन गतिविधियों के लिए इष्टतम वित्तीय सहायता प्रदान करने का प्रयास करना चाहिए |

❋ संदर्भ ग्रंथ सूची :-

1) डॉ. संजय कुमार शर्मा, पर्यटन एवं पर्यटन उत्पाद, तक्षशिला प्रकाशन
नई दिल्ली
2) डॉ. जगमोहन तेगी, पर्यटन मार्केटिंग एवं विकास, तक्षशिला प्रकाशन,
नई दिल्ली
3) हरीश कुमार खत्री, पर्यटन भूगोल, प्रकाशक – कैलाश पुस्तक सदन,
भोपाल
4) कुरूक्षेत्र-जून 2022
5) योजना-

ग. दि. माडगूळकरांचा सिध्दहस्त लेखनीचा सौंदर्यात्सव : 'चैत्रबन'

प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने

मु. जेवनाळा, पो. गुरठा, तह. लाखनी, जि. भंडारा

मराठी विभाग प्रमुख, स्व. नि. पा. वाघाये महाविद्यालय, एकोडी, ता. साकोली, जि. भंडारा

मो. नं. 7875684461 Email. ID: lambkanecs@gmail.com

प्रस्तावना :—

प्रतिभावंत साहित्यिक, लेखक, कवी, गीतकार म्हणून ग. दि. माडगूळकर संपूर्ण महाराष्ट्राला सूपरिचित आहेत. १ ऑक्टों. १९९९ ते १४ डिसेंबर १९७७ हा त्यांचा जिवित कालखंड आहे. त्यांच्या नावावर एकूण ९ काव्य गीतसंग्रह, १० कथा संग्रह, २ कादंबऱ्या, नाटक, आत्मचरित्र व्यक्तिचित्रणसंग्रह व ललितलेख संग्रह प्रसिध्द आहेत. गीतरामायणकार गदिमांनी मराठी चित्रपट गीतकार, कथा—पटकथा, संवादलेखक म्हणूनही नावलौकिक मिळविला आहे. 'चैत्रबन' या त्यांच्या गीत संग्रहात मराठी चित्रपटांसाठी त्यांनी लिहिलेल्या एकून २७८ वैविध्यपूर्ण गीतांचा समावेश केलेला आहे.

कवी, गीतकार ग. दि. माडगूळकर :—

महाराष्ट्रात प्राचीन काळापासून गीत हे काव्य व संगीत कलांची गंगोत्री समजल्या जाते. गीतांमुळेच काव्ये व संगीत अमर आहे. सूर, ताल, लयींसह व्यक्त होणाऱ्या गीतांमुळे मनुष्याला अपार आनंद प्राप्त होतो. साध्या, सोप्या, सरळ शब्दरचनेतील गीतांमुळे रसिकमन रिझविल्या जाते.

आधुनिक मराठी गीत परंपरा भा. रा. तांबे, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगावकर, वसंत बापट, ग. दि. माडगूळकर, शांता शेळके, सुरेश भट, आरती प्रभू, ना. धो. महानोर, ना. घ. देशपांडे, ग्रेस, राजा बढे, पी. सावळाराम, जगदिश खेबुडकर, गंगाधर महांबरे, रमेश अढाऊ या कवी गीतकारांनी प्रवर्तीत केली आहे. ग. दि. माडगूळकरांनी १९४१ ते १९६१ या २० वर्षात विविध मराठी चित्रपटांसाठी गीते लिहिली. त्यापैकी निवडक २७८ गीते 'चैत्रबन' या गीतसंग्रहात समाविष्ट केली आहेत. गदिमांची ही गीते, लोकपरंपरा, लोकधारणा, लोकसंस्कृती, लोकश्रध्देच्या परिपेक्ष्यातून आविष्कृत झाली आहेत. समाजातल्या सुखदु:खाचे, भावभक्तीचे, निसर्गाचे, प्रितीचे, देशभक्तीचे, शैशवसृष्टीचे रम्यचित्रण या गीतांमधून व्यक्त झाले आहेत. "फुलपाखरा सारख्या गदिमांच्या तरल प्रतिभेने भावनांच्या तारा नाजुकपणे छेडून, शब्दांचा आणि स्वरांचा गोड मेळ तीन तपे मराठी मनात सतत गुंजत ठेवला आहे. त्यामुळेच ही चित्रपट गीते श्रवणिय व लोकमानसाच्या चीत्तांत रूंजी घालणारी ठरलेली आहेत. असे गौरवोद्गार प्रसिध्द कवयित्री, गीतकार शांता शेडके यांनी काढले आहेत.

चैत्रबनाच्या परिसरात :—

चैत्रबनात समाविष्ट केलेली गीते वेगवेगळया मराठी चित्रपटांसाठी गदिमांनी प्रसंगानुसार लिहिलेली गीते आहेत. ही गीते खेडयापाडयातून, मंदिरातून, शाळांमधून, भजिनीमंडळातून, रेडीओ, लाऊडस्पिकर, ग्रामोफोनद्वारे, सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे स्वरांचे लेणे घेऊन त्याकाळी आणि आजही फिरतांना दिसतात. माडगूळकर बालपणापासून निसर्गात, जनमानसात समरस झाले होते. त्यांचे प्रत्यंतर या गीतांमधून येते.

प्रेमसाफल्य :—

'आली प्रितीची पहिली रात' या प्रेमगीतातून प्रेयसीच्या जीवनात बहरलेलया प्रितीच्या पहिल्या रात्रीचे वर्णन आले आहे. इथे प्रियकराला पाहताच प्रेयसीच्या भावना प्रफुल्लीत झाल्या आहेत. त्या व्यक्त करतांना गदिमा म्हणतात,

'आली प्रीतीची पहिलीच रात बहारांत!
गगनाच्या अंगणी प्रियकर बघूनी
फुलली तारांराणी सदनांत ।

(चैत्रबन पृ.११)

प्रेमसाफल्याने मनोमनी भरून आलेली प्रेयसी प्रियकराच्या प्रेमानुभवाचे वर्णन माहेरच्या माणसांना 'रूणझुणत्या पाखरा' या गीताद्वारे पाठविले,

'सांग जा आईला, तू सांग जा आईला
संग जा वहिनीला, तू सांग जा बहिणीला
गुणांची मी गुणवती आवडते भरतारा!
(चैत्रबन पृ.४०)

प्रियकराकडून अपार प्रेम लाभल्याने नखशिखान्त शहारलेली प्रेयसी प्रियकराला म्हणते,

कुणी म्हणेल वेडा तुला?
कुणी म्हणेल वेडी मला
या वेडाची गोडी ठाऊक
तुझी तुला अन् माझी मला
(चैत्रबन पृ.५६)

अशी ही प्रेयसी प्रियकरावरून जीव ओवाळून जननिंदेलाही अव्हेरते. त्यामुळे प्रियकर सुध्दा एकनिष्ठेने 'डोळयांत वाच माझ्या' या गीतातून उद्‌गारतो,

"पद्‌मासन जन्में, हे काव्ये जीवनी या
या जीवनांत काव्ये, काव्यात जीवने या
गंधात धुंद वारा, वाऱ्यांत गंध नाचे
डोळयांत वाच माझ्या, तूं गीत भावनांचे"
(चैत्रबन पृ.१२१)

भक्तीगीते :–

चैत्रबनांतील भक्तीगीते भक्तीरसाने ओथंबलेली आहेत. भक्तीतील उत्कटता, आर्तता, आराधना, अनन्यशरणता, परमेश्वराशी सायुज्यता साध्या, सोप्या, रसाळ शब्दांमधून गदिमांनी व्यक्त केली आहे. 'कबीराचे विनतो शेले' या गीतातून रामभक्त कबीरासाठी प्रभूराम दासांचाही दास होतो हे सांगतांना गदिमा म्हणतात,

'कबीराचे विणतो शेले कौशल्येचा राम
भाबडया या भक्तासाठी देव करी काम
राजा घनश्याम!'
(चैत्रबन पृ.५५)

भक्तांच्या मदतीला धावनू जाणाऱ्या विठ्‌ठलाला गदिमा आळविता,

'फिरत्या चाकावरती देसी मातीला आकार!
विठ्‌ठला तू वेडा कुंभार!
घटाघटांचे रूप आगळे
प्रत्येकाचे दैव वेगळे
तुझ्याविना ते कोणा ना कळे
मुखी कुणाच्या पडते लोणी, कुणा मुखी अंगार!'
(चैत्रबन पृ.३२२)

सर्वशक्तीमान परमेश्वराला आळवितांना गदिमांची गीतामधली स्त्री भाबडेपणाने गाते,

'नाचनाचुनी अती मी दमले, थकले रे नंदलाला!
निलाजरेपण कटिस नेसले, निसुगपणाचा शेला
आत्मस्तृतीचे कुंडल कानी, गर्व जडविला भाला
उपयोगांच्या शत कमलांची, कंठी घातली माला
थकले रे नंदलाला!
(चैत्रबन पृ.२८५)

परमेश्वराजवळ आपली तक्रार नोंदवितांना गदिमांचा भक्त गातो,

'उध्दवा, अजब तुझे सरकार!
लहरी राजा प्रजा आंधळी, अधांतरी दरबार

लबाड जोडती इमले माझ्या
गुणवंतांना मात्र झोपडया
पतिव्रतेच्या गळयांत धोंडा, वेश्येला मनिहार!
(चैत्रबन पृ.२८३)

महाराष्ट्रीयन लोकमानसात मुरलेल्या आणि त्याला व्यापून राहिलेल्या भक्तीभावाला गदिमांनी चैत्रबनातील गीतांतून अजरामर केले आहे.

देशभक्तीपर गीते :—

साताऱ्याचे क्रांतीसिंह नाना पाटील, जी. डी. लाड, नाथा लाड, शाहीर निकम, नागनाथ नायकवडी, यांच्या उत्कट देशभक्तीचा सहवास गदिमांना लाभला होता. १९४२ च्या चलेजाव आंदोलनातील शाहीर निकमांची गाणी गदिमांच्या लेखनीतून उतरली होती. 'वेदमंत्राहूनी आम्ही वंन्दे वंन्दे मातरम्!', 'जिंकु किंवा मरू, माणुसकीच्या शत्रूसंगे युध्द आमचे सुरू' ही त्यांची राष्ट्रीयभावना वेळोवेळी त्यांनी व्यक्त केली आहे. इंग्रजांच्या गुलामगिरीतून 'भारतमातेला मुक्त करण्यासाठी तिच्या मुक्ती यज्ञात लाखो क्रांतीविरांनी प्राणांची आहूती दिली. त्यातूनच भारतमातेची मुक्तता शक्य झाली. गदिमा म्हणतात,

माऊलीच्या मुक्तेचा यज्ञ झाला भारती
त्यांत लाखो वीर देती जीवीतांच्या आहुती
आहूतिंनी सिध्द केला मंत्र 'वंदे मातरम्'
(चैत्रबन पृ.२६)

'यत्न तो देव जाण राणी' या चैत्रबनातील देशभक्तीपर गीतातून गुलामीत अडकलेल्या जनसमुदायाला गदिमा धीर देतांना म्हणतात,

'उदंड झाली उदासीनता, जळ हाटे नयनी
यत्न तो देव जाण राणी!
आठव त्यांच्या पुण्य प्रतापा
विझता वन्ही चेतव फिरूनी आनंदवनभुवनी'
(चैत्रबन पृ.२२३)

देशमुक्तीची तळमळ, गुलामगिरीविरूध्द चीड, गदिमांच्या देशभक्तीपर गीतांतून व्यक्त झाली आहे.

चैत्रबनातील लावण्या :—

शाहीर गदिमांची ती लावणी गीतात, 'जय मल्हार', शाहीर रामजोशी या मराठी चित्रपटापासून गदिमांनी अनेक चित्रपटांना लावणीचा शृंगारसाज चढविला आहे.

'कोठेवाडी घोडयावरून पुढयात घ्या हो मला
राजसा, जाऊ या जेजूरीला!
किंवा
'माझ्या व्हटाच डाळींब फुटल,
सांगा राघू मी नाही कधी म्हटल'

या चैत्रबनातील लावण्या फार प्रसिध्द आहेत. गदिमांची लावणी गीतातील स्त्री धीट, शृंगारीक भाव व्यक्त करणारी व मर्द गडयांचा रांगडा स्वभाव, मर्दीनी देहावर भाळून प्रेमाची कबुली देणारी आहे. 'बुगडी माझी सांडली ग' या लावणीतील प्रेयसी म्हणते,

'बुगडी माझी सांडली ग जातां साताऱ्याला
चुगली नका सांगू ग माझ्या म्हाताऱ्याला
घरात तेव्हा नव्हते बाबा
माझा मजवर कुठला ताबा
त्याची धीटाई तोबा—तोबा!
वितळू लागे ग लोणी बाई बघता
निखाऱ्याला!
(चैत्रबन पृ.२६८)

गदिमांनी शृंगाराप्रमाणे मीलन व विरहाच्या लावण्याही लिहिल्या आहेत.

समारोप :—

चैत्रबनात गदिमांनी भक्तीकाव्ये, प्रेमकाव्ये, निसर्गकाव्ये, लावण्या, बालगीते, सवाल—जवाब अशी वैविध्यपूर्ण गीत रचना निर्माण केली आहे. गीताच्या सर्व अटी समर्थपणे पूर्ण करू शकणारा मराठीतील पहिला गीतकार म्हणजे ग. दि. माडगूळकर होय. असे गौरवोद्गार डॉ. अक्षयकुमार काळे यांनी काढले आहेत. मराठी भावमनाचा इतका अचूक वेध घेणारा कवी विरळाच. चिरेबंद घाटदार रचना, अचूक शब्द योजना, भावनेची अकृत्रिम आर्तता व प्रसन्नता, संगीतासाठी आपल्या भावनात्मक आशयाची मोडतोड करण्याची कधीही न भासलेली आवश्यकता ही गदिमांच्या गीतांची वैशिष्टये लक्षणिय आहेत.

निष्कर्ष :—

१) चैत्रबनातील मराठी चित्रपट गीतांमुळे गदिमांना मानाचे स्थान लाभले आहे.
२) चैत्रबनातील गीतांमध्ये नादमाधुर्ये व लालित्य यांचा सुरेख संगम साधला आहे.
३) चैत्रबनातील गीतांमध्ये आत्मनिष्ठा, भावनेची निर्मळता व उत्कटता दिसून येते.
४) अत्यंत प्रसन्न, प्रासादिक, सोपी, रसाळ गीत रचना ही चैत्रबनातील गीतवैशिष्टये होय.
५) चैत्रबनातील गीतांमधला शब्द मोठा झाला तो आशयाच्या बहुमखी सांस्कृतिक संपन्नतेमुळे.
६) चैत्रबनातील गीतांमधून चित्रमयता, सूचकता, दृकप्रत्ययाची प्रभावी क्षमता गदिमांनी उजागर केली आहे.

संदर्भ ग्रंथ सूची :—

१) चैत्रबन : ग. दि. माडगूळकर, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती, १९६१.

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्याची प्रेरणा

सहा.प्रा.दीपक स.वानखडे

मराठी विभाग प्रमुख महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती.

परिचय :—

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे हे मराठी साहित्यातील एक बहुप्रसवा साहित्यिक असून त्यांचा जन्म वर्धा जिल्हयातील खडकी या गावी ११ नोव्हेंबर १९३२ रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव चंद्रभानजी तर आईचे नाव अन्नपूर्णा होते. १९५८ साली शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या नोकरीची सुरूवात केली आणि १९९१ साली पुणे येथील एस.सी.ई.आर.टी. या संस्थेतून वर्ग एक राजपत्रित अधिकारी म्हणून ते निवृत्त झाले. यादरम्यान त्यांनी काव्य, कथा, कादंबरी, चरित्र, प्रवासवर्णन, वैचारिक व संपादित अशा विविध साहित्य प्रकारांमध्ये लेखन करून ३० पुस्तकांची निर्मिती केली आहे. सद्यस्थितीत ते अमरावती येथे राहत असून आज वयाच्या ९१ व्या वर्षीसुद्धा त्यांचे लेखन कार्य चालूच आहे. त्यांची आत्मकथन व सत्यार्जवी धर्माभियान: एक अस्वस्थ शुभ वर्तमान अशी दोन पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये त्यांच्या साहित्याची प्रेरणा कोणती आहे हे शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. याकरिता त्यांच्या आजपर्यंतच्या साहित्यनिर्मितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्यनिर्मितीचा संक्षिप्त आढावा :—

१९५९ साली कांग्रेसच्या नागपूर येथील अधिवेशनात भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांचे आष्टी स्वातंत्र्य संग्रामाची कहानी सांगणारे 'अभिषेक' नावाचे प्रथम पुस्तक प्रकाशित झाले. त्यांचे हे पुस्तक हिंदी भाषेमध्ये होते. त्यांच्या हया पुस्तकानेच त्यांच्या वाङ्.मयीन प्रवासाला सुरूवात झाली. १९५८ मध्ये शिवाजी विधी महाविद्यालय, अमरावती येथे शिकत असतांनाच त्यांनी हया पुस्तकाच्या लेखनाला सुरूवात केली होती. पुढे १९५८ च्या आक्टोबर महिन्यात त्यांनी नया अकोला येथील जनपद हायस्कूलमध्ये नोकरी स्वीकारली आणि १९६१ मध्ये त्यांचे लग्नही झाले. त्यामुळे त्यांच्या वाङ्.मय निर्मितीमध्ये काही काळ खंड पडला.

१९५४ मध्येच त्यांनी अमरावती येथील कंवर नगरातील महानुभाव आश्रमाचे महंत कविश्वर कुळाचार्य श्री. मुरलीधर बाबा कारंजेकर यांच्याकडून गुरूमंत्र घेऊन उपदेश घेतला होता. येथूनच त्यांच्या महानुभाव जीवन प्रवासाला सुरूवात झाली व त्यांनी महानुभाव साहित्याचे वाचन व संशोधनालाही सुरूवात केली. हयाच कालावधीत डॉ. वि.भि. कोलते यांचे 'महानुभाव संशोधन : १' हे पुस्तक प्रकाशित झाले. डॉ. कोलत्यांनी हया पुस्तकाव्दारे महानुभाव पंथ हा अवैदिक असल्याची मांडणी केली तेव्हा त्यांचे हे मत खोडून काढण्याकरिता प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांनी १९६७ साली 'वादप्रवाद' हे पुस्तक प्रकाशित केले. त्यानंतर महानुभाव पंथीय तत्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असलेला कवी विश्वनाथ व्यास बाळापूरकर कृत 'ज्ञानप्रबोध' हा ग्रंथ त्यांनी १९७१ मध्ये संपादित केला. त्यानंतर वारकरी कीर्तनकार ॲड. ल.सि. चौधरी यांच्या महानुभाव पंथावरील 'महात्मा उर्फ मानभाव पंथ व चक्रधर' या टीकात्मक पुस्तकाला उत्तर म्हणून १९७२ साली त्यांनी 'महानुभाव:एक आव्हान' हे पुस्तक प्रकाशित केले. याचवर्षी अष्टमहासिध्दी हया महानुभाव तीर्थस्थळाचे महात्म्य वर्णन करणारे 'अष्टमहासिध्दी महात्म्य तथा स्तोत्र' हे पुस्तक त्यांनी प्रकाशित केले.

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे हे अमरावती जिल्हयातील चिखलदरा येथील विद्यानिकेतन पब्लिक स्कूलमध्ये रेक्टर म्हणून काम करीत असतांना चिखलदरा येथे प्रौढ शिक्षणाचे एक साहित्यनिर्मिती शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्या शिबिरामध्ये त्यांनी 'पिवया मोती' हे पुस्तक लिहिले जे जुलै १९७८ मध्ये प्रकाशित झाले. त्यानंतर फेब्रुवारी १९८२ मध्ये श्रीचक्रधर स्वामी यांच्या जीवनावरील 'जय श्री चक्रधरा' ही कादंबरी व जुलै १९८२ मध्ये श्री चक्रधरस्वामी यांचे जीवन, कार्य व तत्त्वज्ञान यांचे सम्यक व सर्वांगीण दर्शन घडविणारा 'श्री. चक्रधर दर्शन' हा ग्रंथ डॉ.वि.भि.

कोलते, महंत श्री. नागराज बाबा महानुभाव व डॉ. यु.म. पठाण यांच्यासह संपादित केला. तसेच १९८३ साली त्यांची 'जय श्री चक्रधरा' ही कादंबरी हिंदी भाषेत प्रकाशित झाली.

अमरावती जिल्हा प्रौढ शिक्षण प्रकल्पाधिकारी म्हणून काम करीत असतांना १९८५ मध्ये त्यांनी प्रौढ शिक्षण वर्गातील प्रौढांकरिता 'सूर्य उगवला' ही प्रबोधनात्मक पुस्तिका प्रकाशित केली. तर १९८६ मध्ये महानुभाव तीर्थ आणि प्रसादांची माहिती देणारे 'तीर्थप्रसाद' व प्रौढ शिक्षण वर्गातील प्रौढांकरिता 'रिवाज तोडो' ही प्रबोधनात्मक हिंदी पुस्तिका प्रकाशित केली सोबतच लीळाचरित्राचाच अंगभूत भाग असलेल्या पण स्थळनिर्देश नसलेल्या लीळांचा 'अज्ञात लीळा' हा ग्रंथ डॉ. व.दि. कुळकर्णी यांच्यासह तसेच लग्नविधी व हिंदू धर्मातील इतर महत्वाचा धार्मिक विधींचे संकलन असणारे 'पौरोहित्य' हे पुस्तक त्यांनी संपादित केले. १९८७ साली पुन्हा प्रौढ शिक्षण वर्गातील प्रौढांकरिता 'शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख' ही छोटेखानी चरित्रात्मक पुस्तिका व 'पंचकृष्ण' हा महानुभाव पंथातील पंचकृष्णांचा चरित्रात्मक ग्रंथ प्रकाशित केला. यानंतर त्यांचा महानुभाव पंथावर विविध लेखकांनी, कीर्तनकारांनी, तत्त्वचिंतकांनी केलेले आरोप खोडून काढणारा व महानुभाव पंथ व महानुभाव तत्त्वज्ञानाची सुयोग्य अशी मांडणी करणारा त्यांच्या एकूणच साहित्यातील अत्यंत महत्वाचा असा 'पुनर्शोध' हा ग्रंथ मार्च १९९१ मध्ये प्रकाशित झाला.

१९९९ साली शेतकरी आंदोलनाच्या निमित्ताने त्यांनी युरोपचा दौरा केला व हया दौऱ्याचे वर्णन करणारे 'बा युरोपा' हे प्रवास वर्णन त्यांनी लिहिले; परंतु काही कारणास्तव हे प्रवास वर्णन प्रकाशित होऊ शकले नाही. पुढे ९ जानेवारी २००० रोजी रिध्दपूर येथील महाचिंतनीतील, 'चक्रधरोक्त सूत्रातील आरोग्य चिंतन' हे भाषणरूपी पुस्तक त्यांनी प्रकाशित केले.

श्रीचक्रधर स्वामींच्या लोकोत्तर कार्याची ओळख करून देणारा तसेच त्यांच्या जीवन—कार्याची आटोपशीर व नेटक्या स्वरूपात माहिती देणारा 'सर्वज्ञ श्री चक्रधर' हा त्यांचा ग्रंथ जून २००२ मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईने प्रकाशित केला.''पंढरी संदेश या साप्ताहिकाच्या दि. ०४/१२/२००२ च्या आळंदी विशेषांकात महानुभाव संप्रदायाची निंदानालस्ती करणारे, अत्यंत, शिवराळ, असभ्य भाषेतील 'चार लेख' प्रसिध्द करण्यात आले. त्यातील मजकूर आणि भाषा दोन्ही निषेधार्ह आहेत''[१] या लेखास उत्तर म्हणून जुलै २००३ मध्ये त्यांचा 'पंढरीस संदेश' हा ग्रंथ तर ऑगस्ट २००३ मध्ये तळवेळ जि. अमरावती येथील भैयासाहेब देशमुख यांचे 'तळवेळीतला नरसिंह' हे चरित्रात्मक पुस्तक त्यांनी प्रकाशित झाले.

''टाकळी जि. औरंगाबाद येथील आचार्य श्री. विद्याधर बाबा पंजाबी यांच्या आश्रमाच्या विशाल प्रांगणात पार पडलेल्या धर्मसभेत श्री. बाबुराव वाघ लिखित 'वारकरी संप्रदाय विजय' सारख्या निंदात्मक प्रकाशनास आणि महानुभावांच्या निंदा करणाऱ्या प्रयत्नास पंथीयांचे वतीने साधार उत्तर तयार करून ते प्रकाशित करण्याचे ठरविले होते''[२] त्यानुसार १ सप्टेंबर २००८ मध्ये प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांनी 'धर्मजय' हा ग्रंथ लिहून प्रकाशित केला. सप्टेंबर २०१५ मध्ये त्यांच्या 'जय श्री चक्रधरा' हया श्रीचक्रधर स्वामींच्या जीवनावरील २४ वर्ष फौजदारी केस चाललेल्या कादंबरीचीच 'उत्तरयात्री' ही आवृत्ती प्रकाशित झाली. तर नोव्हेंबर २०१५ मध्ये त्यांची अचलपूरचा राजा रामदरण्याचा इतिहास वर्णन करणारी 'दरणा' ही कादंबरी व सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या १२४४ सूत्रांचा ससंदर्भ अर्थ सांगणारा, महानुभाव तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत मोलाचा असा 'ब्रम्हविद्या : सूत्रार्थ प्रकाश' हा ग्रंथ प्रकाशित झाला.

महानुभाव संप्रदाय हा हिंदुधर्मांतर्गत असलेला 'हिंदू संप्रदाय' नसून तो स्वतंत्र व परिपूर्ण असा धर्म आहे. हया गंभीर विचाराची मांडणी करणारा 'महानुभाव एक स्वतंत्र व परिपूर्ण धर्म' हा ग्रंथ मार्च २०१७ मध्ये तर लीळाचरित्र, सिध्दांत सूत्रपाठ, दृष्टांतपाठ आणि उध्दरणाच्या प्रक्रियेस उपयुक्त अशा सूत्रांचे सार्थ विवरण देणाऱ्या 'सार्थक लीळाचरित्र' हया ग्रंथाची मराठी आणि हिंदी आवृत्ती एप्रिल २०१७ प्रकाशित झाली.

मराठी भाषेतील पहिला गद्य ग्रंथ जो महानुभाव पंथीयांचा सर्वात महत्वाचा ग्रंथ असून ज्याला 'महानुभाव पंथीयांची गीता' असेही म्हटले जाते. असा म्हाइंभटकृत 'लीळाचरित्र' हा ग्रंथ जानेवारी २०१८ मध्ये आणि उपदेश करतांना श्रीचक्रधर स्वामींनी सांगितलेल्या दृष्टांताचे संकलन असलेला कोशिराजबासकृत 'दृष्टांत पाठ' हा ग्रंथ त्यांनी सप्टेंबर २०२१ मध्ये संपादित केला.

याशिवाय प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांनी 'ओज' हया साप्ताहिक पत्रिकेचे अनेक वर्ष संपादक म्हणून कार्य केले असून त्यांनी 'महानुभाव' मासिकाच्या संपादक मंडळातही कार्य केले आहे ते महानुभाव साहित्य महामंडळाचे अध्यक्ष असून हया मंडळाने आजवर एकूण १४ महानुभाव साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. अशाप्रकारे प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांचा साहित्य प्रवास असून त्यांचे महानुभाव पंथाच्या प्रचार व प्रसाराचे कार्य आणि साहित्य लेखन आजही चालूच आहे. त्यांनी श्रीचक्रधर स्वामी यांच्या संपूर्ण जीवन कार्याचे वर्णन करणारा 'सत्यार्जवी धर्माभियान : एक अस्वस्थ शुभ वर्तमान' हा ग्रंथ नुकताच लिहून पूर्ण केला असून हया ग्रंथासह त्यांचे आत्मकथन प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्य निर्मितीची प्रेरणा :—

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांचे समग्र वाङ्मय महानुभाव साहित्य विश्वाला पर्यायाने मराठी साहित्याला मौलिक योगदान देणारे आहे. एकूणच त्यांचे लेखन समाजप्रबोधनासाठी उपकारक असेच आहे. त्यांच्या लेखन प्रपंचामुळे सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे तत्त्वज्ञान व समाजोध्दारक विचार सर्व समाजापर्यंत पोहचविण्यास मोलाची मदत झाली आहे.

प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या साहित्याची प्रेरणा महानुभाव पंथाचे प्रणेते सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांचे समाजोध्दारक तत्त्वज्ञान हीच आहे. सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या क्रांतिकारी विचारातच त्यांच्या लेखनामागील प्रेरणा दडलेल्या आहेत. सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींना तत्कालीन समाजातील सर्व सामान्यांचे दु:ख दिसले, त्यांची पीडा दिसली, तत्कालीन समाजातील विषमता दिसली, दैन्य दिसले, दास्य दिसले. देवा—धर्माच्या नावावर सर्वसामान्यांची होणारी लुबाडणूक व शोषण दिसले. अंधश्रध्दा, यज्ञयाग, कर्मकांड यामध्ये आकंठ बुडालेला व अनेकानेक देविदेवतांच्या पूजेमध्ये गुरफटलेला सर्वसामान्य वर्ग व त्यामुळे त्यांचे होणारे धार्मिक अध:पतन हे सर्व सर्व पाहून त्यांचे मन करूणेने ओथंबून गेले आणि मग त्यांनी हया सर्व दु:खाच्या मुक्तीचा मार्ग सांगितला. ते म्हणजेच त्यांचे महानुभावीय तत्त्वज्ञान होय.

ज्या काळामध्ये संपूर्ण समाजावर वर्णव्यवस्थेचा पगडा होता व ब्राहमण हाच सर्वश्रेष्ठ वर्ग आणि महार मांगादी जातींना नीच आणि कनिष्ठ समजल्या जात होते. अशा काळात 'शिखासूत्रांचा त्याग करून, महारवाडयावरून धर्म काढा' असे सांगणे म्हणजे त्याकाळी किती मोठा विद्रोह होता ? म्हणून अशी शिकवण देणारा महानुभाव पंथ म्हणजे केवळ एक संप्रदायच नव्हता तर ती एक चळवळ होती. अशाप्रकारे ''परंपरेला न स्वीकारता एक स्वतंत्र जीवनधारेचा मार्ग चक्रधरांनी अनुसरला व आपल्याबरोबर हजारोंना ते घेऊन गेले''[३] सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या हयाच जीवन व कार्याचा प्रभाव प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या जीवनदृष्टीवर पडलेला आहे. त्यामुळे महानुभाव तत्त्वज्ञान हीच त्यांच्या साहित्याची वैचारिक प्रेरणा आहे. त्यांच्या हया वैचारिक तळमळीतूनच वादप्रवाद. महानुभाव : एक आव्हान धर्मजय, पुनर्शोध, लीळाचरित्र, दृष्टांतपाठ, ब्रम्हविद्या सूत्रार्थ प्रकाश, सार्थक लीळाचरित्र, हया वैचारिक संशोधनात्मक व संपादित ग्रंथाची निर्मिती झाली आहे. एका महानुभाव कुटुंबात जन्माला आल्यामुळे अगदी जन्मापासूनच त्यांच्यावर धार्मिक संस्कार होतेच. शिवाय त्यांच्या वडिलांचा आष्टी येथील स्वातंत्र्यसंग्राम चळवळीत असलेला सक्रीय सहभाग; हयामुळे त्यांचे मन अगदी लहानपणापासूनच सर्वज्ञ श्रीचक्रधरांच्या स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाच्या विचाराने संस्कारित झाले होते. शिवाय १९५४ साली त्यांनी अमरावती येथील कंवर नगरातील महानुभाव आश्रमाचे महंत कविश्वर कुळाचार्य श्रीमुरलीधर बाबा कारंजेकर यांच्याकडून उपदेश घेतला होता. याच काळात त्यांच्या महानुभाव साहित्य वाचनालाही सुरूवात झाली होती. पुढे १९५८ मध्ये त्यांनी शिक्षकाची नोकरी स्वीकारली. या काळात त्यांच्या वाचनातही भरगच्च अशी वाढझाली आणि १९५९ पासून त्यांनी वाङ्मय निर्मितीलाही सुरूवात केली. अशाप्रकारे श्रीचक्रधर स्वामींच्या स्वातंत्र्यवादी विचारांच्या प्रेरणेतूनच 'अभिषेक' हया आष्टीच्या स्वातंत्र्य संग्रामाची कहाणी सांगणाऱ्या हिंदी भाषेतील त्यांच्या प्रथम पुस्तकाची निर्मिती झाली.

पुढे काही काळानंतर त्यांची मुख्याध्यापकपदी नियुक्ती झाली आणि त्यानंतर ते प्रौढ शिक्षण अभियानांतर्गत अमरावती जिल्हा प्रौढ शिक्षण प्रकल्पाधिकारी म्हणून नियुक्त झाले. हयाच काळात त्यांची प्रौढ शिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रौढांसाठी गद्य वाचन म्हणून १९८६ साली 'सूर्य उगवला' हे मराठी भाषेतील व 'रिवाज तोडो' हे हिंदी भाषेतील जुन्या रीती—रिवाज परंपरांना छेद देणाऱ्या व

अंधश्रध्दांना विरोध करणाऱ्या प्रबोधनात्मक कथांची पुस्तके प्रकाशित झाली. त्यांच्या हया पुस्तकामागेही सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या प्रबोधनात्मक विचारांचीच प्रेरणा असल्याचे दिसून येते.

सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामीचे कार्य बघता त्याकाळी येथील कर्मठ धर्मपंडितांनी जे ब्रहमज्ञान संस्कृत भाषेच्या कडीकुलुपांमध्ये बंदिस्त करून ठेवले होते, त्या ब्रहमज्ञानाला संस्कृत भाषेच्या कडिकुलुपातून मुक्त करून मराठीसारख्या लोकभाषेमध्ये सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी आपले तत्वज्ञान लांकोसमोर मांडले. एवढेच नाही तर वर्णव्यवस्था, जातिभेद, कर्मकांड यांना कट्टर विरोध करून सर्व जातिपातीच्या लोकांना हृदयाशी धरले. तसेच स्त्रीशूद्रांनाही आपल्या धर्माची व्दारे मोकळी करून दिली. एका मातंगाच्या हातचा लाडू स्वत: खाऊन ब्राह्मण शिष्यांनाही प्रसाद म्हणून खायला दिला. अशा या थोर महापुरूषांविषयी मनामध्ये श्रध्दा व भक्ती निर्माण होणे साहजिकच आहे. म्हणून हा महापुरूष व त्याचे कार्य सहज सोप्या भाषेत लोकांपर्यंत पोहोचावे याकरिता प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांनी 'जयश्री चक्रधरा' व 'उतरयात्री' अशा कादंबऱ्यांची तसेच 'सर्वज्ञ श्री चक्रधर' 'पंचकृष्ण' इ. चरित्रात्मक पुस्तकांची निर्मिती केली. यातून त्यांची सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामीवरील श्रध्दा, भक्ती व पंथनिष्ठा अगदी स्पष्टपणे दिसून येते.

अशाप्रकारे प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांचे साहित्य पंथनिष्ठेच्या प्रेरणेतूनच निर्माण झालेले असून त्यांच्या साहित्यानिर्मितीमागे सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या वैचारिक प्रेरणेचा भक्कम असा पाया असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

निष्कर्ष :—

१) प्रा. पुरूषोत्तम नागपुरे हे मराठी साहित्यातील एक महत्वपूर्ण व बहुप्रसवा साहित्यिक आहेत.

२) प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांनी वैचारिक संशोधित, संपादित व ललित अशा विविध प्रकारात साहित्य निर्मिती केली आहे.

३) प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांनी आपल्या साहित्यनिर्मितीची सुरूवात आष्टी येथील स्वातंत्र्यसंग्रामाची कथा सांगणाऱ्या 'अभिषेक' या हिंदी पुस्तकाने केली.

४) प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांनी १९५४ साली वयाच्या २२ व्या वर्षी महानुभाव पंथाचा उपदेश घेतला.

५) महानुभाव पंथाचा उपदेश घेतल्यानंतर त्यांनी महानुभाव साहित्याचे वाचन व संशोधनाला सुरूवात केली.

६) प्रा. पुरूषोत्तम नागपुरे हे महानुभाव साहित्य परंपरेतील एक महत्वपूर्ण साहित्यिक असून त्यांनी आपल्या वैशिष्टपूर्ण साहित्यनिर्मितीने महानुभाव साहित्यामध्ये आपले अढळ असे स्थान निर्माण केले आहे.

८) महानुभाव असल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर महानुभाव तत्त्वज्ञान व सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या विचारांचा प्रभाव आहे व या प्रभावातूनच त्यांनी साहित्यनिर्मिती केली आहे.

९) प्रा. पुरूषोत्तम नागपुरे यांच्या संपूर्ण साहित्याचे अवलोकन केले असता पंथनिष्ठा हीच त्यांच्या साहित्यनिर्मितीची प्रेरणा असून त्यांच्या साहित्यनिर्मितीमागे सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचे समाजोध्दारक तत्त्वज्ञान व वैचारिक प्रेरणेचा भक्कम असा पाया असल्याचे दिसून येते.

संदर्भसूची :—

१) प्रा.नागपुरे पुरूषोत्तम, 'पंढरीचा संदेश', प्रकाशक म. श्री. हंसराजदादा खामनीकर, विश्वस्त अध्यक्ष, सर्वज्ञ विद्यापीठ, माडवाडगाव जि.अहमदनगर, प्रथमावृत्ती जुलै २००३ पृष्ठ क्र. १

२) प्रा.नागपुरे पुरूषोत्तम, — धर्मजय, प्रकाशक — म.श्री. येळमळकर बाबा महानुभाव, आंबेवडगाव जि. जळगावख प्रथमावृत्ती सप्टेंबर २००८, पृष्ठ क्र. २२.

३) डॉ. देशमुख उषा माधव, माया प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर, प्रथमावृत्ती जून २००५, पृष्ठ क्र. ४०

कोविड-19 महामारीमध्ये ग्रंथालय उपक्रम

डॉ. राठोड सुखलाल शामराव,

(ग्रंथपाल), गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय अंबड, जि. जालना.

प्रस्तावना :

संपूर्ण जगाची गती कोविड 19 या महामारीने स्थिर केली आहे. गेल्या दोन वर्षापासून जगावर या महाभयानक महामारीची काळोखछाया पडली आहे. यामुळे येथील जवळ-जवळ 10 लाख 6 हजार 379 लोकांचा मृत्यु झाला आहे. सर्वत्र भयाण वातारण निर्माण झाले आहे. हि परिस्थीती घालवण्यासाठी या महामारीवर योग्य संशोधन करुन उपाय शोधले पाहिजे. संशोधनासाठी आवश्यक घटक म्हणजे 'ग्रंथालय' आहे. हि ग्रंथालये हि बंदिस्त झाली आहेत ती नव्यानं वेगवेगळया उपक्रमाच्या माध्यमातून सुरु झाली पाहिजेत. ग्रंथालयांचे मुख्यत: सार्वजनिक ग्रंथालय आणि शैक्षणि ग्रंथालय असे प्रकार पडतात. सर्व शैषणिक संस्था बंद झाल्या कारणाने ग्रंथालये हि बंद झालीत. ती कोविड 19 चा सामना करत सुरु झाली पाहिजेत. याचा आढावा प्रस्तुत संशोधन लेखात घेतला आहे.

ग्रंथालयाची माहिती :

ग्रंथालय म्हणजे ग्रंथसंग्रहाचे स्थान आहे. याचा उगम प्राचीन काळातच झालेला आहे. इष्टिका, पपायर्स व चामडे यावर माहिती चित्रित व मुद्रित केली जात होती. हि एक सामाजिक संस्थाच असून ती मानव संस्कृतीशी निगडित आहे. यामध्ये ग्रंथ, वाचक आणि ग्रंथालयातील कर्मचारी यांचा समावेश होतो. ग्रंथालयांनी प्राचीन काळापसून मानवी संस्कृती प्रगल्भ करण्याचे कार्ये केले आहे. कालानुरूप त्यात बदल होत आला आहे. आज मुद्रण प्रणाली अतिशय विकसित झायाने हजारो नवनवीन ग्रथांची निर्मिती झपाटयाने होत आहे. या ग्रंथांना योग्य पध्दितीने वर्गीकरण करुन क्रमवार साठवून ठेवून वाचकांना त्यांच्या मागणीनुसार ग्रंथ उपलब्ध करुन देण्याचे कार्ये ग्रंथालय करत असते.

ग्रंथालयाचे कार्ये :

ग्रंथालय हे सामाजिक संस्थेचा भाग असल्याने समाजोपयोगी वेगवेगळी कार्ये करत असतात ती म्हणजे.

शैक्षणिक कार्ये :

ग्रंथालयाचे हे सर्वा महत्वाचे कार्ये आहे. शिक्षणातील अत्यावश्यक घटक म्हणून ग्रंथालयाकडे पाहिले जाते. कोणत्याही प्रकारचे शिक्षण असो त्यासाठी माहितीची उपलब्धता आवश्यक असते. ती मिळवून देण्याचे कार्ये ग्रंथांच्या माध्यमातून ग्रंथालय करत असतात. शैक्षणिक ग्रंथालचे असो वा सार्वजनिक ग्रंथालय, यातून ज्ञान प्राप्त होत असते. म्हणूनच ग्रंथालय हे महाविद्यालयाचा आत्मा आहे असे म्हटले जाते.

संशोधनात्मक कार्ये :

शिक्षण घेतलेला व्यक्ती नवनवे संशोधन करुन आपल्या ज्ञानात भर टाकत असते. जगाच्या प्रगतीसाठी वेगवेगळया विषयावर संशोधन होणे आवश्यक असते. या संशोधनाचा मूळ पाया हा ग्रंथालयापासूनच सुरु होतो. ग्रंथालयात असणाऱ्या ग्रंथांचे वाचन करुनच पुढील संशोधन होत असते.

राजकिय कार्ये :

राजकारण हा प्रत्येक माणसाच्या जीवनाशी निगडित विषय आहे. कोणत्याना कोणत्या मार्गाने त्याचा संबंध राजकारणाशि येत असतो. राजकीय परिस्थीती कशा पध्दतीची आहे याचे ज्ञान ग्रंथालयातून होत असते. जगातील

प्रभावी व्यक्तिंनी महत्वपूर्ण ग्रंथांचे वाचन करुन आपले विचार लोकांना पटवून देऊन सत्ता प्रस्थापित केली आहे. म्हणजे राजकीय कार्ये हि ग्रंथालयात करत असते.

औद्योगिक कार्ये :

औद्योगिकरण हे जगाच्या विकासाचे सर्वात महत्वपूर्ण साधन आहे. वेगवेगळी कारखाने निर्माण होऊन मानवाचे जीवन अधिक सुखकर करण्याचे कार्ये यातून होते. या औद्योगिकरणासाठी योग्य मार्गदर्शन लिखित स्वरुपात ग्रंथालयात उपलब्ध असते. म्हणुन औद्योगिकरण करण्यासाठी ग्रंथालय कार्य करत असते.

सांस्कृतिक कार्ये :

ग्रंथालय हे मानवी जीवनाशी अतिशय निगडीत आहे. मानवाच्या वेगवेगळया चालीरिती, संस्कृती या ग्रंथालयात मुद्रित झालेले आहेत. वेगवेगळी धार्मिक ग्रंथालये, भाषा, साहित्य यामधून मानवी संस्कृतीचे जतन होत असते. अशी ग्रंथ ग्रंथालय उपलब्ध करुन देते म्हणजे जे सांस्कृतिक कार्ये करते.

शैक्षणिक ग्रंथालय :

ग्रंथालयाचे मुख्यत: दोन प्रकार पडतात. 1) सार्वजनिक ग्रंथालय आणि शैक्षणिक ग्रंथालय. सार्वजनिक ग्रंथालय म्हणजे सर्व वाचकांसाठी ते खुले असते. यामध्ये वय, हुद्दा, वर्ग, वर्ण असा कोणताही भेद येथे नसतो, तर शैक्षणिक ग्रंथालये हि केवळ शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच खुले असते. शैक्षणिक ग्रंथालय हि अतिशय महत्वपूर्ण असून, ती विस्तृत प्रमाणात असतात. कोणत्याही शैक्षणिक संस्थेचा प्रमुख घटक ग्रंथालय असतो. शालेय व महाविद्यालयीन ग्रंथालये विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकणारे महत्वपूर्ण कार्ये करत असतात. नवीन शैक्षणिक धोरणात देशाच्या समृध्दीसाठी विद्यार्थ्यांचा हातभार कसा लावता येईल, यावर भर देण्यात आला आहे. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना अधिकाधिक जगभरातील ज्ञान सहजासहजी उपलब्ध करुन देण्याचे कार्ये ग्रंथालयेच करु शकतात. मात्र सध्या सुरु असलेल्या परिस्थीतीत हे कार्य करणे शक्य होत नाही.

कोविड 19 महामारी आणि ग्रंथालय :

जगभरात कोविड 19 म्हणजेच कोरोना या भयाण महामारीने हाहाकार माजवला आहे. अनेक लोकांचे प्राण गेले आहेत. सगळीकडे अतिशय भीतीयुक्त वातावरण तयार झाले आहे. आतापर्यंत अनेक रोग आले ते हि घातकच आहेत, मात्र याचे वास्तव खूप वेगळे आहे. हा अतिसंसर्गजन्य रोग आहे. खूप लवकर त्याचे संक्रमण होत आहे, आणि अद्यापपर्यंत तरी यावर कोणालाही औषधीय उपाय शोधता आलेला नाही. परिणामी याच्या संक्रमणामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांची संख्या झपाटयाने वाढत आहे. भारताचा विचार केला तर, आतापर्यंत 3 लाख 53 हजार 528 लोकांनी कोरोनामुळे जीव गमावला आहे. अशा भयानक रोगापासून स्वरक्षण म्हणून एकमेकांपासून दूर राहणे हाच प्रभावी उपाय यावर सांगितला जातो. हे शक्य नव्हते, म्हणून लॉकडाऊन लावण्यात आले. यामध्ये सर्व कार्यालये, दळणवळणाची साधने बंद करण्यात आली. यामुळे माणूस आपोआपच बाहेर न पडता घरीच राहु लागला. तरीही या रोगाने दुसऱ्या लाटेत भयाण रुप धारण करुन अनेकांना यमसदनी पाठवले. कोरोना विषाणूचा बाधा झालेल्यांसाठी त्यांना विलगीकरणात ठेवण्यात येऊ लागले. अशा परिस्थीतीत ग्रंथालये बंद झाली.

ग्रंथालये हे ज्ञानसाधना, मनोरंजनाचे व मनोविकासाचे प्रभावी साधन आहे. ती पूर्णपणे बंद करणे हिताचे नाही. हे लक्षात घेऊन, काही प्रमाणात ग्रंथालये खुली करण्यात आली आहेत. काविड 19 चे लॉकडाऊन शैक्षणिक संस्थांना हि लागू आहे. दोन वर्षापासून शाळा, महाविद्यालये बंद आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे बौध्दिक नुकसान होत आहे. कारण त्यांना ग्रंथालयात जाऊन ग्रंथ वाचन करता येत नाही. काही काळानंतर कोविड परिस्थीती सुधारतांना दिसत आहे. मात्र पूर्णपणे निवळली नाही. अशा परिस्थीतीत ऑनलाईन शिक्षणाचा मार्ग शोधण्यात आला. हे शिक्षण सुरु हि झाले. मात्र यामध्ये अनेक अडथळे आहेत. प्रत्येक विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण घेऊ शकत नाही. कारण तशी

साधने त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. जरी उपलब्ध झाली तरी, त्यातून पुरेसे ज्ञान मिळत नाही. म्हणून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी ग्रंथालयांनी नवनवीन उपक्रम राबवून, ग्रंथ त्यांच्यापर्यंत पोहचवली पाहिजेत. जगभरातील ग्रंथालयांना निर्बंधापासून ते पूर्ण बंद होईपर्यंत कोण-कोणत्या सेवा द्यावयाच्या या भयानक समस्येचा सामना करावा लागत आहे. ग्रंथालये सुरु ठेवायची असतील तर पुढील उपाय करणे आवश्यक आहे.

1. **हात सॅनिटायझर करणे :**

ग्रंथालयात प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाने आपले हात योग्यरित्या सॅनिटायझर करुन घ्यायला पाहिजेत. याबरोबरच मुखपट्टी सतत वापरली पाहिजे. आणि योग्य अंतर ठेवले पाहिजे. ग्रंथालय व सर्व साधने स्वच्छ ठेवली पाहिजेत. कोरोना हा विषाणू भयानक आहे. त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्याला नष्ट करण्यासाठी उपाय केले पाहिजे. यासाठी सर्व परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. सॅनिटायझर केला पाहिजे. संगणक व इतर साधने हि स्वच्छ ठेवून सतत सॅनिटायझर केले पाहिजेत.

2. **परत केलेली पुस्तके वेगळी ठेवणे :**

वाचकांनी परत केलेली पुस्तके, वेगळी ठेवून त्यांचे हि निर्जंतुकरण केले पाहिजे.

3. **कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे :**

ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांची नेहमी तपासणी करुन प्रवेश दिला पाहिजे. यासाठी त्याला कोरोना प्रतिबंधात्मक साधने मोफत मिळाली पाहिजेत. याबरोबरच त्याला वेळेवर वेतन हि मिळण्याची व्यवस्था केली पाहिजे.

4. **वाचनकर्त्यांची संख्या मर्यादित करावी :**

ग्रंथालये हि खूप मोठी असतात. येथे रोज अनेक वाचक येत असतात. मात्र या काळामध्ये यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. वेगवेगळे दिवस ठरवून प्रत्येकाने ठरलेल्या दिवशीच ग्रंथालयात यावे, असे नियोजन करुन एकत्र होणारी गर्दी कमी करुन कोविड काळात हि ग्रंथालये सुरु ठेवता येतील.

5. **दूरस्थ सेवांचा अधिक वापर :**

ग्रंथालयामध्ये ज्ञान मिळविण्यासाठी, पुस्तके घेण्यासाठी विद्यार्थी येत असतात. हे कोरोना काळात योग्य नाही. महणून विद्यार्थ्यांना शक्य तो घरपोच ग्रंथ मिळण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

6. **ऑनलाईन माहिती पुरवणे :**

विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाची सवय झाली आहे. ऑनलाईन वर्ग घेतले जात आहेत. मात्र ग्रंथालय उपलब्ध होत नाहीत. म्हणून विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी ग्रंथ ऑनलाईन स्वरुपात पुरवली पाहिजेत. यासाठी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर सहज पुस्तके उपलब्ध करुन दिली पाहिजेत. विद्यार्थ्यांचे भ्रमणध्वनी क्रमांक घेऊन वर्गनिहाय ग्रुप बनवून सर्व विद्यार्थ्यांसाठी एक पुस्तके अनेकांनी वाचता येईल. असे नियोजन केले पाहिजे.

कोरोना घडामोडींची योग्य माहिती देणे :

कोरोना हि महामारी दिवसेंदिवस घातक ठरत आहे. तिला नियंत्रणात आणण्यासाठी होणाऱ्या नवनवीन उपयांची माहिती एकत्र करुन प्रत्येक ग्रंथालयांनी ऑनलाईन सहजरित्या उपलबध होईल, अशी संकेतस्थळावर संकलित केली पाहिजे.

सांराश :

अशाप्रकारे कोविड 19 या महामारीने त्रस्त झालेल्या जगाला सावरण्यासाठी ग्रंथालय उपयुक्त ठरु शकतात. शैक्षणिक ग्रंथालयातील अफाट ग्रंथसाठा त्यांच्या वापराविना अज्ञान पसरण्यास वेळ लागणार नाही. म्हणुन शैक्षणिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्य योग्यरित्या पार पाडली पाहिजेत. कोरोना ग्रस्त लोकांसाठी ग्रंथ उपलब्ध करुन देण्याचे प्रयोग काही ठिकाणी यशस्वी झाले आहेत. ग्रंथ वाचनामुळे विलगीकरणातील कोरोना रुग्णांना बौध्दिक

मेजवानी मिळाल्याने त्यांनी कोरोनावर मात केल्याचेही निदर्शनास आले आहे. म्हणून बौध्दिक मेजवानी मिळाल्याने त्यांनी कोरोनावर मात केल्याचेही निदर्शनास आले आहे. म्हणून वाचन संस्कृती कायम टिकवून ठेवण्यासाठी विद्यार्थी दशेतच विद्यार्थ्यांना वाचनाची ओढ लावण्याचे शैक्षणिक ग्रंथालये कार्ये करु शकतात. म्हणून अधिकाधिक विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा लाभ मिळावा यासाठी प्रयत्न करणे हाच कोविड 19 महामारीच्या काळातील प्रभावी उपक्रम असेल.

संदर्भ :

1. नरगुंडे रेवती, ग्रंथालये आणि सामाजिक विकास, युनिव्हर्सल प्रकाशन, पूणे.
2. कुंभार रा., ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन, पुणे युनिव्हर्सल प्रकाशन 2015.
3. काटे ना.रा. ग्रंथालय संदेशवहन आणि समाज, अरुणा प्रकाशन लातूर 2012.
4. शेटकर ग. भारतीय शिक्षणाचा इतिहास, चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
5. Pooja P. Dadhe, Library Services Provided During Covid-19 Pandemic : Content Analysis of websites of Premier Technological institute of India.
6. www.worldmeters.info/coronavirus.
7. दैनिक लोकसत्ता वृत्तपत्र.
8. दैनिक महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्र.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDIII) 403

ISSN : 2278-9308 March, 2023

कुसुमाग्रजांच्या कवितेचा अन्वयार्थ

प्रा. डॉ. विनोद नामदेव इंगळे

ग. भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगाव.

वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज हे मराठीतील महत्त्वपूर्ण कवी आहेत.

कुसुमाग्रजांच्या काव्याच्या कालखंड हा स्वातंत्र्यपूर्व आहे या कालखंडातील तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील वेगवेगळ्या प्रवृत्तींचा अभ्यास, चिंतन, जाणीवा त्यांची कविता मांडत जाते. त्या कालखंडामध्ये वावरणारा एकंदरीत समाज व त्या समाजातील वेगवेगळ्या अडचणी, समस्या, प्रश्न कुसुमाग्रजांच्या संवेदनेतून सुटत नाहीत. कुसुमाग्रज मराठी साहित्याला एक कवी म्हणून जरी परिचित असले तरी, त्यांना एका वाङ्मय प्रकारापुरते मर्यादित करता येणार नाही. त्यांनी नाटक,कादंबरी,कथा, लघुनिबंध इत्यादी प्रकार अत्यंत सूक्ष्म रीतीने हाताळले आहेत. असे बहुआयामी व्यक्तिमत्व असले तरीही कुसुमाग्रजांना एक ओळख प्राप्त झाली ती त्यांच्या कवितेच्या माध्यमातून. त्यांचा विशाखा हा काव्यसंग्रह त्यांना यशो शिखरावर घेऊन जाण्यात महत्त्वाचा ठरला. विशाखा या काव्यसंग्रहातील काव्य विश्व हे बहुविध आहे. कुठे एका विषयामध्ये कुसुमाग्रजांची कविता गुंतून पडत नाही तर वेगवेगळ्या विषयांचे बारकावे ती शोधत जाते. व इच्छित ध्येय गाठते. कुसुमाग्रजांच्या प्रतिमा आणि त्यांची भाषा ही सहज उलगडत जाणारी असून वाचकांना खेळवून ठेवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. कुसुमाग्रजांची कविता ही प्रेमाचा आलेख जसा निर्माण करते अगदी तसाच ती राष्ट्रविषयक विषयांच्या कवितांच्या माध्यमातून राष्ट्रप्रेम स्पष्ट करते. राष्ट्र, प्रेम, निसर्ग,समाज या सर्वांचा उद्गार ती व्यक्त करते.

'अहीनकुल, हिमलाट आणि आगगाडी आणि जमिन ' या तिन्ही कवितांचे चेहरे वेगवेगळे आहेत. असेअसले तरीही त्यातून अभिव्यक्त होणारा अर्थ हा सामाजिक अस्वस्थतेचा आणि आर्थिक शारीरिक मानसिक आणि बौद्धिक विषमतेचा एक वेगळा विचार व्यक्त करतो. कुसुमाग्रज कवितांमधून वेगवेगळ्या प्रवृत्तींचा विचार सातत्याने मांडत जातात. एका अर्थाने विचार केला तर सर्वसामान्य माणसांचा एक प्रतिनिधी म्हणूनच उद्गार व्यक्त करताना कुसुमाग्रजांची कविता दिसून येते. आयुष्याच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर योग्य मार्गदर्शन आणि त्या मार्गदर्शनाची आशावादामध्ये होणारी परिणती या दोघाचा एक वेगळा समन्वय कुसुमाग्रजांची कविता व्यक्त करताना दिसून येते. अनुकूल मधील नकुल हिमलाट मधील सर्व समान माणूस आणि आघाडी आणि जमीन मधील जमीन या प्रार्थनेतिक संवेदना समाजाच्या एका नेमक्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचतात. त्या टप्प्यावर आपलं जीवन आहे त्या अवस्थेमध्ये केवळ व्यतीत करणारा माणूस नाउमेद झालेला जेव्हा कुसुमाग्रजांच्या कवितेचे लक्ष होतो, तेव्हा त्याच्या जीवनाला आशावादाचे नवे धुमारे फुटू लागतात. कुसुमाग्रजांच्या अहीनकुल या कवितेमध्ये सुरुवातीला सर्व काही ठीक आहे, असे वाटत असले, तरीसुद्धा ही कविता जसजशी पूर्णत्वाकडे जात राहते, तशी ती वैश्विक रूप प्राप्त करते. मानवता हा महत्वपूर्ण बाणा कुसुमाग्रजांच्या या कवितेचा आहे.

' कधी लवचिक पाते खड.गाचे लवलवते
कधी वज्र धरेवर गगनातून कडकडते
कधी गर्भ रेशमी पोत मध्ये जरतार
प्रमदेचे मादक वस्त्र जणू सळसळते. '

एकाच वेळेस सौंदर्य आणि भयानकता कुसुमाग्रजांच्या अहिन कुल या कवितेची प्रचिती आणून देतात. या कवितेतील अहि हा सुंदर आहे देखणा आहे परंतु अमानुष आहे. त्याचं दिसणार सौंदर्य हे विषारी आहे. त्याच्या अत्याचाराला सीमा नाही ते अमर्याद आहे. तो अन्याय करणार आहे. त्याचा मुकाबला काही एकट्या फुलविली करू शकणार नाहीत. त्यासाठी हवाय उदंड आत्मविश्वास तो त्यांच्यामध्ये नाही. म्हणून तो अहि समग्र वातावरण विषारी करत मोठ्या एठदारपणे जात राहणार.आहे. जोपर्यंत त्याचा बंदोबस्त करणारा त्याच्यासमोर येऊन उभा ठाकत नाही तोपर्यंत. कुसुमाग्रज त्याच्या सौंदर्याचे केवळ वर्णन करून थांबत नाही तर, तर नकूलाच्या माध्यमातून एक नवा आशावाद सजीवांमध्ये पेरत जातात. नकुल हा उद्दाम नाही. गर्विष्ठ नाही. संधी साधू आणि श्रेय लाटणारा नाही. कदाचित सामाजिक नेतृत्वाची एक कल्पनाच कुसुमाग्रजांनी नकूलाच्या माध्यमातून केली असावी ते म्हणतात,

' हा थांब कुणाची जाळीमध्ये चाहूल
अंगार कणापरी नयन कुणाचे लाल
आरक्त ओठ ते ध्वज जणू रक्ताच्या
रे नकुल आला आला देख नकुल. '

आपल्या धुंदीत साऱ्या वातावरणाला कमी लेखणाऱ्या नागाला आपल्या मरणाची गंधवार्ता येते, आणि तो स्वतःला वाचविण्यासाठी सज्ज होतो. शब्दशः या कवितेतील अहि आणि नकूलाच्या प्रतिमांना आपण बघितले तर, नैसर्गिक पातळीवरील पारंपरिक वैरत्व आपणास पाहायला मिळते. साप आणि मुंगूस यांचे शत्रुत्व हे सर्वश्रुतच आहे. पण कुसुमाग्रज त्यातून जो सामाजिक आढावा घेतात ते महत्त्वाचे आहे या कवितेच्या शेवटी कुसुमाग्रज म्हणतात की,

' क्षणि धुळीत गेली वाहत ती विषधार
शतखंडित झाले ते गर्वन्नत उर
विच्छीन्न तनुतुनी उपुसूनी काढुनी दात
वाऱ्या परि गेला नकुल वनातून दूर. '

सत्य असत्य, नीति अनीती, मानवता आणि अमानुष्यता यांचा चाललेला संघर्ष अखेर संपतो,आणि विजय हा सत्याचा, नीतीचा, आणि मानवतेचा होतो हे सर्व झाल्यानंतर उर बडवून विजयाचे श्रेय लाटण्याचे प्रयत्न नपुलाकडून होत नाही. हे सर्वात महत्त्वाचे. समाज निर्मितीचे हे चित्र कवी बांधिलकीच्या अंगाने निर्माण करतो.

' हिमलाट ' ही कुसुमाग्रजांची अत्यंत महत्त्वाची कविता आहे. समाजामध्ये सातत्याने घडून येत असणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक विषमतेचे चित्र त्यांची ही कविता उभी करते. सामाजिक जीवन जगत असताना समाजात दोन स्तर दिसून येतात ते म्हणजे गरीब आणि श्रीमंत यांच्यामध्ये चाललेला संघर्ष कुसुमाग्रज या कवितेच्या माध्यमातून उभा करतात.

' हिमलाट पहाटे पहा जगावर आली
श्रीमंत महाली तिथे हिला ना थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावून पळते कापत हीच थरारा
हो काय दरारा कणकाचा भयशाली. '

शोषक आणि शोषित यांचा संघर्ष हा सनातन आहे. कामगार आणि भांडवलदार या रूपाने तो सातत्याने व्यक्त होतो. एका बाजूला झोपड्या तर दुसऱ्या बाजूला टोलेजंग इमारती आहेत. यामध्ये ऐश आरामी जीवन जगणारी माणसे आहेत. माणूस हा नैसर्गिक दृष्ट्या एकसारखा असला तरी, त्याच्या राहणीमानामध्ये असणारा मोठा फरक कुसुमाग्रज दाखवितात. या फरकामागे असणारा त्यांचा आर्थिक दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. जोपर्यंत सर्वांचा विचार आर्थिक दृष्टिकोनातून समानतेच्या अंगाने होणार नाही, तोपर्यंत समाजामध्ये संघर्ष हा होत राहील याची जाणीव कुसुमाग्रजांची कविता व्यक्त करते. समाजात निर्माण झालेला असमतोल नष्ट करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावे लागतील याची जाणीव ही कुसुमाग्रज सर्वसामान्य माणसांना करून देण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. त्यासाठीचे एक आवाहन ते करतात,

' ज्योतीतून धावत या तेजःकण सारे
या यज्ञातील अन सरणातील निखारे
अरे ढाळ नभा तव ते ज्वाला मय तारे
पेटवू वा वणवा कणाकणात मशाली
हिमालाट पहाटे पहा जगावं आली. '

हिमलाट ही कुसुमाग्रजांची एक सामाजिक वळणाची कविता आहे. जुने आणि नवे मूल्य यांचा संघर्ष समाजात पाहायला मिळतो. नवे मूल्य आपण स्वीकारले पाहिजेत, यासाठीची एक परिस्थिती तयार करण्यासाठीची मानसिकता या कवितेमधून व्यक्त होताना दिसून येते. सर्व एकत्र आलो तर, या हिमलाटेचा प्रतिकार आपणास सहज करता येईल, यासाठी कुसुमाग्रज सर्वसामान्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहताना दिसून येतात.

हिमलाट ही कविता जशी वेगळ्या चेहऱ्याने अवतीर्ण होते, अगदी वेगळा चेहरा घेऊन आगगाडी आणि जमीन ही कुसुमाग्रजांची कविता प्रतीकात्मक स्वरूपामध्ये मानवतावादाचे चित्र रंगवताना दिसून येते. या कवितेमध्ये दोन प्रवृत्ती प्रकर्षाने दिसून येतात. पहिली सुष्ट आणि दुसरी दुष्ट. दुष्ट प्रवृत्तीची मांडणी करीत असतानाच, तिची क्षणिकता आणि सुष्ट प्रवृत्तीची अमर्यादता ते सांगत जातात. जमिनीची उदारता हे तिचे दुबळेपण नाही याची जाणीव कुसुमाग्रज या कवितेमध्ये करून देतात. गाडी ही जुनून करणाऱ्या तर जमीन ही सहन करणाऱ्या शक्तीचे प्रतीक म्हणून त्यातील संघर्ष नाट्यमयरित्या चित्रीत करीत जाताना कुसुमाग्रज दिसतात. ते आपल्या कवितेमध्ये म्हणतात की,

' नको ग नको ग आक्रंदे जमीन
पायाशी लोळत विणवी नमुना
दुबळे अशीच खुशाल ओरड
जगावे जगात कशाला भेकड!
दुर्बळ भेकड त्वेषाने पुकारी
घुमले पहाड घुमल्या कपारी
उलटी पालटी होऊन गाडी ती
हजार शकले पडली खालती. '

आपल्या ठिकाणी असणाऱ्या सामर्थ्याचे उदाम प्रदर्शन नाही तर नम्रपणा हा स्वभाव जमिनीचा आहे त्यामुळे आघाडीला विनंती आहे परंतु आगगाडीकडूनच त्याचा चुकीचा अर्थ काढला जातो व मुद्दामपणे ती आपल्याच तोऱ्यात दावत सुटते. उद्दामता हे सर्वनाशाचे कारण आहे याची जाणीव कुसुमाग्रजांची कविता करून देते. शोषितांना आपल्या ठिकाणी असणाऱ्या सामर्थ्याची जेव्हा जाणीव होते तेव्हा समाजामध्ये परिवर्तन हे निश्चित असते. आगगाडी आणि जमीन हे जीवनाचे दोन वेगवेगळे अंग आहेट. यातील कुठल्याही अंगाचा अव्हेर होता कामा नये, याची दक्षता समाजातील समंजस प्रवृत्तीला घ्यावा लागतो. कुसुमाग्रजांची कविता प्रतिमांमध्ये बोलत असली तरी साधेपणा हे तिचे सामर्थ्य आहे. हेच सामर्थ्य वाचकांना खिळवून ठेवते.

संदर्भ :

१. विशाखा : कुसुमाग्रज
२. कुसुमाग्रजांचा सामाजिक साहित्य विचार : डॉ. देवानंद सोनटक्के
३. कुसुमाग्रज/शिरवाडकर : डॉ. द. दि. पुंडे

ृषी उत्पन्न आि ा उर्जा स्त्रोत

डॉ.अर्चना शिवाजी वाघमारे
भू ोल विभा ा
सरस्वती महाविद्यालय, ंज, ता. ंज जि.बीड

डॉ.राम प्र.ताटे
राज्यशास्त्र विभा ा,
महिला ला महाविद्यालय,बीड

पृथ्वीची विभा ा ी दोन ोलार्धात होते पृथ्वीच्या भ्रम ामुळे वाऱ्यांच्या दिशा निश्चित होतात.उत्तर ोलार्धात उन्हाळा असतो तेव्हा भारतावर नेऋत्य दिनेशने वारे वाहु ला ातात.नेऋत्य दिशेला हिन्ही महासा ार आहे.त्यामुळेहे वारे या समुद्रावरील बाष्प घेऊन येतात.म्ह ून भारतात वर्षातले दोनते चार महिने पाऊस पडतो.दि ा ा ोलार्धात उन्हाळा असतो तेव्हा हे वारे दिशा बलतात.उत्तरे डून दि ा ा डे वाहु ला ातात हे वारे थंड आि ा ेरडे असतात.मात्र आंध्रप्रदेश, तामिळनाडु आि ा ंरळमधील ाही भा ातात हे वारे बं ालच्या उपसा ारावरुन येतात.त्यामुळे तिथे बं ालच्या उपसा ारावरुन येतात.त्यामुळे तिथे ऑक्टोंबर ते डिसेंबर या ाळात पाऊस पडतो.

ृषी उत्पन्न आि ा उर्जा स्त्रोतहासंशोधन पेपर लि ा ामध्ये प्राथमि संशोधन तंत्रामध्ये ाही निवड संदर्भ ंथांचा अवलंब र यात आलेला आहे.तर द्वितीयसंशोधन तंत्रामध्ये मासि ंसाप्ताहि ं, वर्तमानपत्र आदीसंशोधन तंत्राचा वापर रुन सदरीलसंशोधन पेपर लिहि याचा प्रयत्न र यात आला आहे.

भारत सर ारच्या पर्यावर ा, वने आि ा हवामान बदल मंत्रालयाच्या अ ात्यारीतील ंद्रीय प्रदुष ा नियंत्र ा मंडळाच्या सं तस्थळावर असलेल्या मान ांनुसार हवेच्या दर्जा ुा ां (एअर क्वालिटी इंडेक्स अर्थात एक्युआर) आि ा त्याचे मानवी जीवनावर हो ारे परि ाम पाहिले ी याचे ांभीर्य ल ात येतेहा ुा ां 0 ते 50 असेलतरीती हवा चां ाली असते. अशा हवेचे मानवी शरीरावर मीत मी अनिष्ट परि ामहोतात ि वा होत नाहीत 51 ते 100 पर्यंत ुा ां असल्यास हवा समाधान ार मानली जाते.अशा हवेत श्वसनाचे ि र ोळ त्रास उद्भवू श तात. विशेषत: दम्याच्या रु ांना उंचीवरील मजल्यावर रहावे ला ात असल्याची जा ीव निर्मा ा होते. हवेचे ुा ां 101 ते 200 असल्यास ती हवा मध्यम दर्जाची मानतात.अशा हवेत श्वसन, दमा, हृदयरो ा रु ांना श्वसन सुरळीत न होऊन अस्वस्तता निर्मा ा हो याची शक्यता जास्त असते.हाच ुा ां 201 ते 300 च्या दरम्यान असल्यास हवा ाराब मानली जाते या हवेमध्ये जास्त ाळ राहिल्यास निरो ी मा ासालाही श्वसनाचा त्रास सुरु होतो.301 ते 400 ुा ां अस ारी हवा आ ा ी ाराब मानली जाते.अशा हवेमध्ये श्वसनाचे दीर्घ ालीन त्रास उद्भव याची शक्यता असते.400 ते 500 ुा ां अस ारी हवा अतिशय ाराब असते.या हवेमध्ये निरो ी मा ासे आजारी पडतात आि ा आजार ग्रस्त लो ांना मृत्यू संभवतो तरत्यापे ा जास्त ुा ां असल्यास ती हवा मानवी वस्तीसाठी अयो य मानली जाते.

उर्जा मी ार्चात मिळव यासाठी ला ूड, द ाडी ोळसा, ानिज तेल आि ा नैर्सा ि वायूचा वापर मोठ्या प्रमा ात ंला जातो. यासाठी जं ालाची त्तलहोते.द ाडी ोळसा, ानिज तेल वायुचा मोठ्या प्रमा ात उपसा र यात येतो.यांच्या ज्वलनातून उर्जा मिळवतात वाहने, ार ानेते घर ुती वापर सर्वत्र यांच्या ज्वलनातून उर्जा मिळवली जाते या संसाधनांचा उर्जा मिळव यासाठी जाळत असताना हवेत पू ा ज्वलन झाल्यास ार्बन डाय ऑक्साईड जातो. ानिज तेल आि ा द ाडी ोळशामध्ये इतरही घट असतात.सल्फरसार ा पदार्थाचे अर्थवट ज्वलन होते आि ा सल्फरडाय ऑक्साईडसार े वायुही वातावर ात मिसळतात.द ाडी ोळसामध्ये पारा, शिसे, सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साइड जड धातु आि ा इतरही घट असतात ते सर्व वातावर ात मिसळतात.

ानिज तेलातून अने घट ाटून टा याची प्र्रि या र यात येते.त्याहीपे ा नैर्सा ि वायु आ ा ी मी प्रदुष ं वातावर ात सोडतो. मात्र मूळ ार्बन डायऑक्साईड प्रत्ये इंधनाच्या ज्वलनातून बाहेर पडतोच ार ान्यांच्या सं येतील वाढ, घर ुती ऊर्जा वापरातील वाढ आि ा वाहनांचा सं येतील वाढ यामुळे इंधनाचा वापर मोठ्या प्रमा ात वाढला आहे. त्यामुळे प्रदुष ाचे प्रमा ा भयान वे ाने वाढत आहे.सर्व प्रा यांच्या श्वसनातून ार्बन डायऑक्साईडचे प्रमा ा वाढत जाते.वातावर ात मिसळ ाऱ्या या प्रदुष ांमुळे ऑक्सिजनचे प्रमा ा घटते यामुळे हवा श्वसनास अयो य बनते.शेत री दे ील शेतातील पि ांचा वापर यो य नसलेला भा ा उचलूनत्याचे ात न बनवता थटे शेतात जाळतात. ही प्रमा ात हवा प्रदुष ासहा घट ही ार ीभूत ठरतो.

महाराष्ट्रात 1022 पासून भारतात राष्ट्रव्यापी दुष ाळांची रां ा ाला ालेली दिसते.1022, 1033 व 1052 असे सल ा तीन भीष ा राष्ट्रव्यापी दुष ाळ भारतात पड याची नोंद आहे.दुष ाळांचे सत्र येथेच थांबले नाही 12 वे ते 1930 पर्यंत जवळपास 250 पे ा अधि प्रदेशनिहाय दुष ाळ भारतात पडले याची नोंद डच व्यापारी व्हॅन ट्विस्टने रुन ठेवली आहे.मृत प्रा ी धी मृत मा ासेही ाऊन ज ायची वेळ या दुष ाळांनी आ ालीहोती.त्यात 1396 ते 1407 या ाळात पडलेल्या दु ार्दिवीच्या भयं र दुष ाळाची नोंद जा ति पातळीवर घेतली ेली.एवढा तो प्रलयं ारीहोता.समग्र अर्थव्यवस्था भुईसपाट र ाऱ्या या दुष ाळाने निर्मा ा त्यांना रस्त्यावर आ ूनसोडले नसतेतर नवल वाटयला न ो.

आर्थि पर्यावर ा सुदृढहोईल अशी आंदोलने झालेली नाहीत. आर्थि पर्यावर ात अर्थ र ांचे रजांचे आि भवितव्याचे सर्वां ा व सार्वत्रि भान याचा समावेश होतो. त्या दृष्टीने आज समाज प्रयत्न रतो हा प्रश्न निर्मा ा होतो.अर्थ र हा राज र ाचा भा ा असला तरी अर्थ र ाचे राज र ा धीहीहोऊ द्यायचे नाही.तरच अर्थ र ा व्यवस्थित चालु श ल. यात शं ा नाही आज सर्वा डे एवढी आधुनि साधने आली परंतु त्याचा वापर आम्ही आमच्या व्यक्ति ात अर्थव्यवस्थेला हातभार र यासाठी ि ती रतो आि अनुत्पाद ार्यासाठी ि ती रतोहे समजावून घेतले पाहिजे.

भा री लहान आहे वाटा मा ा ारे अधि आहेत अशी आजच्या अर्थव्यवस्थेची रचना आहे.शोषित-वंचितांचे अर्ध र ा से बदलायचे हे मात्र आम्हाला अजूनहीसमजलेले नाही.उलट नित्य नवे समाज आम्हीही मा ास आहोत असे म्ह ात आपल्या व्यथा मांडू ला ालो आहोत. आर ा ा मा ू ला ाले असलेतरी याचे ंभीर र ा आपल्याला आहे ा ? यात ाहीसमाजांचे राज र ा आहे ा?हाही प्रश्न निर्मा ा होतो.

भारतातील शेती ेत्राचे ए ू ा चित्र बरेच ुंता ुंतीचे दिसून येतात. देशात 2020-2021 मध्ये ए ू ा अन्नधान्याचे उत्पादन 30 ोटी 80 ला ा टन अशा वि मी पातळीपर्यंत पोचले प ा अन्नधान्याची दरडोई उपलब्धता 1991 मध्ये वार्षि 186.2 ि लो ॅमहोतीती आज तीस वर्षानंतर जवळपास तित ीच म्ह ाजे दरडोई वार्षी 187.1 ि लो आहे. बां ाला देशामध्येती 200 ि लोतर चीनमध्येती 450 ि लो आहे.2021-2022 मधील भारताचे अन्नधान्य उत्पादन 315-72 मॅट्रि टन आहे.

ज ातील सर्वाधि पी घनता भारतात आहे.ि बहुना भारताच्या भू ोल, हवामान आि माती ारूप वैशिष्ट्यपू ा आहे.नैर्सा रित्या ृषी मालच्या विस्तृत जातीचे, वा ांचे उत्पादन र यासाठीहीस्थिती उत्ृष्ट आहे.असे प्रतिपादनतोमर यांनी ले आहे.तोमर यांच्या मते जर भारताची सर्वाधि पी घनता उत्ृष्ट असे म्हटलेतर 2006 मध्ये स्वामीनाथन आयो ाच्या अहवालावरुन भारतातील 40 टक शेत री शेतीसोडून विघरशेती नो री व्यवसाय र याच्या मानसि तेत आहेतते ारीठरले. ेल्या 15 वर्षात अंदाजे दीड ोटी शेत ऱ्यांनी शेतीसोडली आहे.त्यामुळे ारिबी, नैराश्य, बेरोज ारी शहरां डीलस्थलांतर यात वाढ झालेली आढळते.त्याच वेळेस शेतमंजूराच्या सं येत मात्र जलद वाढ दिसत आहे.राष्ट्रीय उत्पन्नात शेतीच्या उत्पन्नाचा वाटा मी आहे.प ा शेतमंजूरांच्या उत्पन्नाचा वाटा जास्त आहे असे दिसून येते.देशातील अन्नधान्याचा साठा भारतीयांना अन्न महामंडळातर्फे रा ाला जातो.त्यातून सर्वाधि वितर ा व्यवस्थेमार्फत अन्नधान्यांचे देशात वितर ा होते.

जा ति पातळीवर हवा प्रदुष ात महासत्ता बनल्याचा अधिर्भावात मिरव ाऱ्या चीनने आघाडी घेतली आहे.याचे र ा म्ह ाजे प्रत्ये राष्ट्राला, राष्ट्रातील बहुतांश ना ारि ांना स्वार्थाने पछाडलेले आहे.प्रत्ये राष्ट्र दरडोईस ल उत्पन्न वाढव याचा प्रयत्न रत आहे.ज्यांचे आज दरडोई उत्पन्न चां ाले आहे.ते आ ा ी जास्त र याच्या म्ह ाजेचश्रीमंतहो याच्या मा ो धावत आहेत.ते दरडोई उत्पन्न ि ती रायचे माहिती नाही र ा जास्त हा शब्द सापे ा असतो.दरडोई उत्पन्न वाढवि यासाठी उत्पन्न जास्त रायला जाहिजे. उत्पादन वाढवायचे तर जास्त उर्जा मिळवायला हवी उर्जा जास्त मिळव यासाठीसंसाधने हवीत त्यातही उत्पादनापासून जास्त नफा हवा असेलतर ार्च मी रायचातर मी ार्चाचे इंधन वापरुन पुरेशी उर्जा मिळायला हवी. म्ह ूनच राष्ट्राच्या प्र ातीचा मापदंड म्ह ून दरडोई उर्जेचा वापर पाहिला जातो.

उर्जा मी ार्चात मिळव यासाठी ला ू ड, द ाडी ोळसा, ानिज तेल आि नैर्सा वायूचा वापर मोठ्या प्रमा ात ला जातो.यासाठी जं ालांची त्तलहोते.द ाडी ोळसा, ानिज, तेल आि वायुचा मोठ्या प्रमा ात उपसा र यात येतो.यांच्या ज्वलनातून उर्जा मिळवतात.वाहने, ार ानेते घर ुती वापर सवत्र यांच्या ज्वलनातून उर्जा मिळवली जाते.या संसाधनांना उर्जा मिळव यासाठी जाळत असताना हवेत पू ि ज्वलन झाल्यास ार्बन डाय ऑक्साईड जातो. ानिज तेल आि द ाडी ोळशामध्ये इतरही घट असतात.सल्फरसार या पदार्थाचे अर्धवट ज्वलन होते आि सल्फर डाय ऑक्साईडसार े वायुही वातावर ात मिसळतात.द ाडी ोळशामध्ये पारा, शिसे, सल्फर डाय ऑक्साईड, नायट्रोजन डाय ऑक्साईड जड धातू आि इतरही घट असतात.ते सर्व वातावर ात मिसळतात.

संदर्भ ंथ :-

1) विठ्ठल पुं ाडे - भू ोल व पर्यावर ा (भारत व ज ा) वैदि पब्लि शन
2) जयेंद्र शे ार ुप्ता - भौति व जैवि पर्यावर ा शि ा, जैन प्र ाश मंदीर
3) प्रतियो िता मासि जानेवारी 2023
4) साधना साप्ताहि पु ो मार्च 2023

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDIII) 403
ISSN : 2278-9308
March, 2023

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाअस्पृश्यता विषयक विचार व कार्य

प्रा. मनोहर शामराव वागतकर
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी बु. अकोला
मो.क्र. ९८९०९७२५३० E-mail :manoharwagatkar@gmail.com

प्रस्तावना :

अस्पृश्य मानले गेलेले लोक त्यांना अस्पृश्यतेला शिक्का लावण्यापूर्वीच सुरुवातीपासून गावाबाहेर राहत असत आणि त्यांच्यावर नंतरच्या काळात अस्पृश्यता लादल्यानंतरही त्यांनी गावाबाहेर राहणे सुरूच ठेवले, अशीच शक्यता अधिक विचाराह आहे, परंतु यातून एक अतिशय कठीण प्रश्न निर्माण होतो. तो असा, ते गावाबाहेर का राहात होते ? असे करण्यासाठी त्यांना कोणी भाग पाडले किंवा जबरदस्ती केली? सर्व जगामध्ये आदिम समाजाचे रूपांतर आधुनिक समाजामध्ये कोणत्या कारणामुळे झाले हे समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना माहीत आहेतच त्याच कारणांमुळे हे अस्पृश्य लोकही सुरूवातीपासूनच गावाबाहेर राहत होते, असे गृहित धरणेच या प्रसंगी स्वाभाविक ठरते व हेच या प्रश्नाचे उत्तर होय.

प्रारंभिक समाजाचे रूपांतर आधुनिक समाजामध्ये कोणत्या कारणामुळे झाले हे कदाचित स्पष्ट करून सांगितल्यावाचून बऱ्याच लोकांच्या ध्यानात येणार नाही व त्यामुळे वरील निष्कर्ष स्वाभाविक कसा आहे हे त्यांना कळणार नाही. या विषयाची योग्य जाण येण्यासाठी प्रारंभिक समाज हा आधुनिक समाजाहून दोन बाबींमध्ये वेगळा होता हे ध्यानात बाळगले पाहीजे. प्रारंभिक समाजामध्ये भटक्या जमातींचा समावेश असे, परंतु आधुनिक समाजामध्ये स्थायी जमातींचा समावेश आहे. दुसरी गोष्ट अशी की आदिम समाजातील समाजात प्रादेशीक संबंधावर आधारित स्थानिक जमातींचा अंतर्भाव असतो. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे, प्रारंभिक समाजाची उत्क्रांती होऊन त्याचे आधुनिक समाजात रूपांतर होत असताना दोन दिशांनी त्याचा विकास झाला. एका दिशेच्या उत्क्रांतीमधून भटक्या जमातीऐवजी प्रादेशिक जमातीचा उदय झाला. अशा प्रकारचा बदल घडून आला याबद्दल शंकेला जागा असू शकत नाही. राजांच्या अधिकार प्रणालीमध्ये या बदलाचे स्पष्ट प्रत्यंतर पाहावयास मिहते. इंग्लिश राजांची कार्य पद्धती उदाहरणादाखल घेऊया स्वत:ला इंग्लंडराजा संबोधणारा किंग जान हा पहिला पुरूष होय. त्याच्या पूर्वीचे राजे स्वत:ला सामान्यतय इंग्लिश लोकांचा राजा असे संबोधत असत. पहिल्या विधानात प्रादेशीक प्रतिनिधीत्व निहित आहे. एके काळी इंग्लंड हा असा देश होता की त्यात इंग्लिश लोक वास्तव्य करून होते. परंतु आता इंग्लिश लोक हे एक राष्ट्र असून ते इंग्लंड मध्ये वास्तव्य करून आहेत. अशाच प्रकारचा बदल फ्रेंच राजांच्या पद्धतीतही घडून आलेला दिसून येईल. एकेकाळी फ्रेंच राजांना 'फ्रेंच लोकांचा राजाश असे संबोधण्यात येत असे. परंतु नंतर श्फ्रान्सचा राजाश असे संबोधण्यात येऊ लागले. प्रारंभिक समाजामध्ये असलेल्या भटक्या जमातींच्या जागी उत्क्रांतीच दुसऱ्या प्रवाहाने स्थायी जमाती निर्माण केल्या. याशिवाय हा बदल इतका निश्चित व प्रभावी आहे की त्याने प्रत्यक्षातील अस्तित्व पटवून देण्यासाठी कोणत्याही स्पष्टीकरणाची आवश्यकता उत्तर नाही.

अहिंदूतील अस्पृश्यता :—

अस्पृष्य लोक कोण आहेत आणि अस्पृश्यतेचे मुळ कारण काय? या दोन मुख्य विषयांचे संशोधन या प्रबंधाच्या पुढील पानांमध्ये करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. संशोधनाला प्रत्यक्ष सुरूवात करण्यापूर्वी काही प्राथमिक प्रश्नांचा, उहापोह करणे आवश्यक आहे. त्यातील पहिला प्रश्न असाय संपूर्ण जगामध्ये केवळ हिंदू लोकच अस्पृश्यता पाळतात काय? दुसरा असा, जर अहिंदू लोकही अस्पृश्यता पाळत असतील तर अहिंदूतील अस्पृश्यता व हिंदूतील अस्पृश्यता यातील तुलनात्क अध्ययनातून कोणत्या गोष्टी निष्पन्न होतात? दुर्दैवाची गोष्ट अशी की आजपर्यंत अशा प्रकारच्या तुलनात्मक अध्ययनाचा प्रयत्न करण्यात आला नाही. याचा परिणाम असा झाला की हिंदूतील अस्पृश्यतेच्या अस्तित्वाबद्दल बऱ्याच लोकांना जाणीव असली तरी तिची खास वैशिष्ठये त्यांना माहीत नाहीत. तथापि तिच्या खास वैशिष्ठयांच्या अद्भूत स्वरूपाची जाणीव केवळ अस्पृश्य लोकांची स्थिती समजून घेण्यासाठीच आवश्यक आहे.

प्राचीन व आदिम समाजामध्ये या बाबतीत कशी स्थिती होती हे तपासून पाहण्यासाठी सुरूवात केल्यास अधिक चांगले होईल. त्याची अस्पृश्यतेलामान्यता होती काय? याबाबतीत अस्पृश्यता म्हणजे काय याची नीट कल्पना आपणास सुरूवातीस असणे आवश्यक आहे. या मुद्यावर मतभेद असू शकत नाहीत. विटाळ, भ्रष्टता, वाटणे आणि अशा प्रकारच्या विटाळातून मुक्त होण्याची भावना हीच अस्पृश्यतेमध्ये अंतर्भूत आहे, हे सर्वजन मान्य करतील.

वर उल्लेखलेल्या अर्थाने आदिम समाज अस्पृश्यतेला मान्यता देत होता की नाही हे पाहण्यासाठी आदिम लोकांचे सामाजिक जीवन तपासून पाहिले तर त्यांचा अशा प्रकारच्या विटाळाच्या कल्पनेवर विश्वास होता एवढेच नव्हे तर या विश्वासापोटी त्यांनी धार्मिक कर्मकाडेही निर्माण केली होती याबद्दल शंका उरत नाही. पुढील गोष्टीमुळे विटाळ होतो, अशी प्राचीन मनुष्याची कल्पना होती.

(१) काही विशिष्ट घटणा घडल्यामुळे

(२) काही विशिष्ट वस्तूंचा स्पर्श झाल्यामुळे आणि

(३) काही विशिष्ट व्यक्तीला स्पर्श झाल्यामुळे..

एका माणसापासून दुसऱ्या माणसास स्पर्शामुळे अपवित्रता संचार करते अशीही प्राचीन मनुष्याची श्रद्धा होती. अपवित्रतेचे असे संक्रमन होण्यासाठी खाणे, पिणे इत्यादी स्वाभाविक प्रसंग विशेषत: अधिक धोकादायक आहेत, असे त्याला वाटत होते. ज्याप्रसंगी हुकमी अपवित्रता निर्माण होऊ शकेल अशा घटनांमध्ये आरंभिक मनुष्याच्या मते पुढील प्रसंगांचा समावेश होत असे.

गर्भवती स्त्रिया अपवित्र असून त्या अपवित्रता पसरविण्यास कारणीभूत ठरतात, असे मानले जात असे. आईची अपवित्रता बालकापर्यंतही विस्तारीत करण्यात आली होती.

हि स्त्री किंवा पुरूषाच्या सामाजिक व वैवाहिक जीवनास सुरूवात झाल्याची लक्षणे म्हणजेच पुरूषांचा संस्कारविधी व स्त्रियांची रजस्वला होण्याची स्थिती होय. त्यांना एकांतवासात राहावे लागत असे अंगाला उटणे आदी लावावे लागत असे आणि सुतेप्रमाणे अंग विच्छेदनही करून घ्यावे लागत असे. अमेरिकेतील टोळयांतील लोकांमध्ये अशा संस्काराचे वेळी केवळ विशेष प्रकारचे भोजन घ्यावे लागत असे, तर ठराविक वेळेच्या अंतराने वांतीकारक औषधही घ्यावे लागत असे.

विवाहाच्यावेळी जे विधी करण्यात येत असत त्यावरून लग्न ही एक अपवित्र बाब आहे, असा आदिम मनुष्याचा समज होता, असे दिसते. ऑस्ट्रोलियन पद्धतीप्रमाणे कधी कधी वधूला आपल्या टोळीतील पुरूषांशी शरीरसंबंध करावा लागे किंवा अमेरिकेतील रिवाजाप्रमाणे टोळीतील वैद्यांशी किंवा पूर्व आफ्रिकेतील, प्रघाताप्रमाणे वराच्या मित्र मंडळीशी तिला संभोग व्यवहार करावा लागत असे. काही टोळयांमध्ये वराने वधूला तलवारीने हळूच ओरबडण्याची प्रथा होती. हुंडा सारख्या काही लोकात वराशी लग्न होण्यापूर्वी प्रथम वधूचे लग्न एका झाडाशी करण्याची रूढी होती. विवाहातील हे सर्व रितीरीवाज लग्नातील अपवित्रता घालवून तिच्यापासून व्यक्तीचे रक्षण करण्यासाठीच पाळण्यात येत असत.

पावित्र्याची कल्पना केवळ वस्तुपुरतीच मर्यादित नव्हती. काही विशिष्ट लोकांचे वर्गही पवित्र मानले जात असत. कारण त्यांना दुसऱ्या एखाद्या माणसाने स्पर्श करणे म्हणजे त्यांना वाटविण्यास कारणीभूत ठरत होते. पोलिनेशिअन लोकांमध्ये अशी रूढी होती की त्यांच्या प्रमुखाला एखाद्या खालच्या दर्जाच्या माणसाने स्पर्श केल्यास अपवित्र समजले जात असे. तथापि त्याचा दंड मात्र त्या हीन दर्जाच्या माणसाला भरावा लागत असे. याउलट इफत मध्ये अधी प्रथा होती की पवित्र माणसाचा संबंध जर श्नागिनश शी (संस्कारासबंधी अपवित्रता) आला तर त्याचे पावित्र्य नष्ट होत असे युगांडामध्ये नवीन देऊळ बांधण्यापूर्वी लोकांना स्वत:ला शुद्ध करून घेण्यासाठी चार दिवसाचा अवधी देण्यात येत असे. काही अन्य ठिकाणी गटप्रमुख आणि त्यांच्या वस्तू बहुधा इतक्या पवित्र माणण्यात येत असत की खालच्या दर्जाच्या लोकांनी त्यांना स्पर्श केल्यास त्याना त्या धोकादायक ठरत असत टांगा बेटामध्ये जो मनुष्य प्रमुखाला स्पर्श करीत तो भ्रष्ट झाला असे समजण्यात येत असे, आणि हा दोष केवळ डच्च दर्जाच्यामुखाच्या तळपायाला स्पर्श केल्याने नष्ट हो असे. मलाया पेनिन्सुलामध्ये प्रमुखाचे पावित्र्य राजाचिन्हामध्ये असते अशी समजूत हाती आणि त्याला स्पर्श करणाऱ्यास गंभीर स्वरूपाचा आजार किंवा मृत्यु येतो, अशी समजूत होती.

विदेशी माणसांचा स्पर्श विटाळाला कारणीभूत ठरतो अशी आदिम लोकांची समजूत होती.

दक्षिण आफ्रिकेतील बायोग या लोकांची अशी श्रद्धा होती की परदेशात प्रवास करणाऱ्यांना परदेशी भूतात्म्याची भूतबाधा होण्याचा विशेष धोका असतो. परदेशी माणसे भ्रष्ट असतात. कारण ते विचित्र देवांची पूजा करून चमत्कारिक प्रभाव प्राप्त करून घेत असतात, असा त्यांचा समज होता. म्हणून त्यांना धूप देण्यात येत असे किंवा अन्य उपायांनी त्याचे शुद्धिकरण करण्यात येत असे डीयरी आणि लगतच्या जमातीमध्ये त्या जमातीचाच एखादा माणूस परदेशाचा प्रवास करून परत आला तर त्याला परका समजण्यात येत असेय आणि जोपर्यंत तो खाली बसत नाही तोपर्यंत त्याच्याकडे मुळीच लक्ष देणध्यात येत नसे.

परदेशातून आलेल्या माणसापासून जेवढी धास्ती बाळगण्यात येत असे तितकीच धास्ती परदेशात जाण्याबद्दलही बाळगण्यात येत असे. आस्ट्रोलियात जेव्हा एक टोळी दुसऱ्या टोळीजवळ जात असे तेव्हा त्या टोळीतील लोक हवेच्या शुद्धिकरणासाठी हाती पेटत्या मशाली घेऊन जात असे तेव्हा त्याच्यासमोर वेदीतील पवित्र अग्नी घेऊन काही सैनिक सरहद्दीकडे जात असत.

हिंदूतील अस्पृश्यता :—

अपवित्रतेच्या बाबतीत आदिम लोक किंवा पुरातन लोक यांच्यापेक्षा हिंदूमध्ये भिन्न अशी कोणतीही बाब नाही त्यांना अपवित्रतेची कल्पना मान्य होती याचे विपुल पुरावे मनुस्मृतीमध्ये आहेत. शारीरिक अपवित्रता व मानसिक पवित्रताही मनूला मान्य आहे.

मनूने जन्म, मृत्यु आणि मासिक धर्म यांना अपवित्रतेचे जनक मानलेले आहे. मृत्युसंबंधीची अपवित्रता विस्ताराने फारच व्यापक होती. रक्ताच्या नात्याप्रमाणे तिचा विस्तार कमी अधिक होत असे. सुतक (अपवित्रता) येते त्यात केवळ आईवडील नातेवाईकांचाच उदा मामा समावेश होत असे असे नव्हे तर दूरच्या नात्यातील लोकांचाही समावेश होत असे इतकेच नव्हे तर त्याचा विस्तार गुरू, गुरूपत्र,गुरुपत्नी, शिष्य, सहपाठी, क्षेत्रिय, राजा, मित्र, कुटूंबातील लोक, आणि शव वाहक लोक अशा गैरनातेवाईक लोकांपर्यंतही पाहोचत असे.

अपवित्रतेच्या टप्यामध्ये येणारी कोणतीही व्यक्ती त्यापासून सुटू शकत नसे. काही विशिष्ट व्यक्तींनाच त्यातून सूट मिळत असे. पुढील श्लोकांमध्ये मनूने त्यांना वगळले असून त्यांना वगळण्याचे कारणेही त्यात दिलेली आहेत.

अध्याय ५ श्लोक९६ जे राजा व अन्य व्रतधारी लोक आणि यज्ञ कार्यात रस असलेले लोक सुतकातून मुक्त राहतात. कारण राजा हा इंद्रासनावर बसलेला असतो आणि अन्य दोन्ही प्रकारचे लोक सदैव ब्राह्मणांप्रमाणे पवित्रच असतात.

श्लोक ९४ राजा महान सिंहासनावर आरूढझालेला असल्यामुळे व प्रजेचे रक्षण करण्यासाठीच तो सिंहासनावर आरूढझालेला असल्यामुळे त्याला पवित्र करून घेण्याची तातडीची व्यवस्था करण्यात आली आहे.

अध्याय ५ श्लोक ९६ जे लोक युद्धात किंवा बंडामध्ये ठार झाले त्यांच्या नातेवाईकांना हाच नियम लागू आहे. त्याचप्रमाणे वीज पडून मरण पावलेल्यांच्या नातेवाईकांना, राजाने देहदंड दिलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांना, गोब्राह्मणांच्या रक्षणासाठी मरण पावलेल्यांच्या नातेवाईकांना हाच नियम लागू असून ज्यांना त्वरित शुद्ध करून घ्यावे अशी राजाची इच्छा असेल त्यांनाही हा सद्य शौचांचा नियम लागू आहे.

अध्याय ५ श्लोक ९६ जगाच्या आठ संरक्षण देवता—चंद्र, अग्नी, सूर्य, वायू, इंद्र, कुबेर, वरूण आणि यम यांचा राजा हा अवतार आहे.

अध्याय ५ श्लोक ९७ वरील देवतांची अधिष्ठापना राजाच्या ठायी असल्यामुळे ऐहिक जगातील पवित्रता, अपवित्रता त्याला बाधत नाही. कारण मृत्युलोकातील मानवाची पवित्रता व अपवित्रता यांना देवताच निर्माण व नष्ट करतात. ष

यावरून हे स्पष्ट दिसून येते की मनूच्या मताप्रमाणे उदात्त कार्यासाठी ज्यांना मृत्यु आला त्यांच्या नातेवाईकांना, राजाला व राजाने तशी कोणाला सवलत दिल्यास त्यांना सुतकाच्या सर्वसामान्य नियमाची बाधा होत नसे. श्ब्राह्मण सदैव पवित्र असतोश हे मनूचे विधान सर्वापेक्षा श्रेष्ठ असे पद ब्राह्मणांना असल्याचे दर्शविण्यासाठी सर्वसामान्य अर्थाने वापरलेले आहे, हे ध्यानात

घ्यावयास हवे. ब्राह्मण अपवित्रतेपासून सदैव मुक्त होता, असा त्याचा अर्थ. कारण तो तसा नव्हता. अब्राह्मणाना लागू होते केवळ ब्राह्मणांनाच लागू होणाऱ्या निषेधांनी व अशुद्धतेबद्दल अज्ञांनी मनुस्मृती पुरेपूर ठासून भरलेली असून ब्राह्मणाला त्यांचे पालन करणे अनिवार्य होते व त्यांचे पालन करण्यास तो चुकला तर तो अपवित्र होत असे. अशुद्धतेसबंधी मनूच्या ज्या कल्पना होत्या त्या केवळ काल्पनिक नसून प्रत्यक्ष व्यवहारात चालू होत्या. कारण अशुद्ध व्यक्तीद्वारा देण्यात आलेले भोजन त्याने अग्राह्य ठरविले आहे.

याशिवाय मनूने सुतकाचा काळही ठरवून दिलेला आहे. तो विभिन्न आहे. सपिडाच्या मृत्युबद्दल हाकाळ दहा दिवसांचा आहे. लहान बालकासाठी तीन दिवसांचा व सहपाठी मित्रासाठी एक दिवसाचा अवधी त्याने सांगितलाआहे. केवळ नेमून दिलेला काळ लोटण्याने अपवित्रता जात नाही तर या काळाच्या शेवटी प्रसंगानुरूप एक शुद्धिकरणाचा विधीही करावा लागतो.

अस्पृश्योन्नती व स्त्रियांची जबाबदारी :—

महाड येथे दलित पुरुषांच्या बरोबर सत्याग्रह करण्यासाठी दलित— अस्पृश्य महिला स्त्रियाही प्रचंड संख्येने हजर होत्या. त्या सत्याग्रही स्त्रियाना उपदेश करताना डॉ. बाबासाहेब सांगतात. आपण या सभेत आल्याबद्दल मला अत्यंत आनंद होत आहे. घरप्रपंचाच्या अडचणी ज्याप्रमाणे स्त्री व पुरुष मिळून सोडवितात, त्याप्रमाणे समाजातील (संसारातील) अडचणी स्त्रीपुरुषांनी मिळून सोडवावयास पाहिजेत. पुरुषांनीच हे काम अंगावर घेतले तर ते पार पाडण्यास त्यांना अवधी लागेल याबद्दल शंका नाही...जो पुरुषवर्ग हे काम करीत आहे त्यांच्याशी सहकार्य केल्याशिवाय राहू नये. यासाठी तुम्ही यापुढे नेहमी परिषदेस हजर राहिले पाहिजे, असे माझे तुम्हास सांगणे आहे. खरे म्हटले तर अस्पृश्यता निवारण्याचा प्रश्न पुरुषांचा नसून तो स्त्रियांचाच आहे.

तुम्ही आम्हा पुरुषांना जन्म दिला आहे. आम्हाला इतर लोक कसे जनावरा— पेक्षाही कमी लेखनात हे तुम्हास ठाऊक आहे. काही ठिकाणी आमची सावलीसुद्धा घेत नाहीत. इतर लोकांना कोर्टकचेऱ्यांमध्ये मानसन्मानाच्या जागा मिळतात. परंतु तुमच्या पोटी जन्मलेल्या आम्हा मुलांना पोलिस खात्यातील शिपायाचीही नोकरी मिळत नाही. इतका आमचा हीन दर्जा आहे. हे सर्व तुम्हास ठाऊक असताना तुम्ही आम्हास जन्मास का घातले असा प्रश्न तुम्हास कोणी केला तर त्याचे उत्तर तुम्ही काय देऊ शकाल ? या सभेत बसलेल्या कायस्थ व इतर स्पृश्य बायांच्या पोट जन्मलेल्या मुलात, व तुमच्या पोटी जन्मलेल्या मुलात काय अंतर आहे ? तुम्ही विचार करावयास पाहिजे की, ब्राह्मणांच्या स्त्रियांत जेवढे शील आहे, तेवढे तुमच्या तही आहे. आणि तुमच्यात जेवढे मनोधैर्य, करारीपणा, व धमक आहे, तितकी ब्राह्मण स्त्रियांत नाही. असे असताना ब्राह्मण स्त्रियांच्या पोटी जन्मलेले बालक का सर्वमान्य व्हावे, व तुमच्या पोटी जन्मलेले बालक सर्व ठिकाणी का अवमानिले जाये ? त्याला साध्या साध्या माणुसकीचा हक्क असू नये याचा तुम्ही कधी विचार केला आहात काय ? मला वाटते, तुम्ही त्याचा कधीच विचार केला नाही. तुम्ही जर विचार केला असता, तर पुरुषांच्या आधी तुम्ही स्त्रियांनी सत्याग्रह केला असता कारण तुमच्यापोटो जन्म घेतला एवढेच पातक आमच्या हातून घडले आहे. व त्याच पातकामुळे आम्हास ही अस्पृश्यतेची शिक्षा भोगावी लागत आहे. तेव्हा तुम्ही विचार करावयास पाहिजे की, तुमच्या पोटी जन्म घेणे हे पाप का ठरले जावे. व इतर स्त्रियांच्या पोटी जन्म घेणे पुण्यप्रद का व्हावे. या प्रश्नाचा जर तुम्ही विचार केला, तर तुम्हांला एक तर प्रजा उत्पत्ती बंद करावी लागेल किंवा तुमच्यामुळे त्यांना लागत असलेला कलंक तरी तुम्हास धुऊन टाकावा लागेल. या दोहोंपैकी कोणतीतरी एक गोष्ट तुम्ही करावयाला लागले पाहिजे.

तुम्ही प्रतिज्ञा करा की, अशा कलंकित स्थितीत आम्ही पापुडे जगणार नाही. समाजोपती करण्याचा जसा पुरुषांनी निश्चिय केला आहे, तसाच तुम्ही करा. दुसरी गोष्ट आपणास जी सांगावयाची आहे ती ही की, तुम्ही सर्वांनी जुन्या व गलिच्छ चालीरीती सोडून दिल्या पाहिजेत. खरे म्हटले असता, अस्पृश्य माणसान तो अस्पृश्य आहे अशी ओळख पटविणारा शिक्का त्याच्या कपाळावर मार नाही. परंतु अस्पृश्य लोकांच्या ज्या काही चालीरीती आहेत, त्या चालीरीतीय लोक अमूक एक माणूस अस्पृश्य जातीपैकी आहे, हे चटकन ओळखतात. ह्या पा रीती एकेकाळी आपणावर सक्तीने लादण्यात आल्या होत्या असे माझे मत आहे. परंतु इंग्रज सरकारच्या राज्यात तशी सक्ती होऊ शकत नाही. म्हणून ज्या गोष्टी— मुळे लोक आपण अस्पृश्य आहोत, असे ओळखतात त्या सान्या गोष्टी तुम्ही आता बंद केल्या पाहिजेत. तुमची लुगडी नेसण्याची पद्धती ही

तुमच्या अस्पृश्यतेची स आहे. ती साक्ष तुम्ही बुजविली पाहिजे. वरिष्ठ वर्गाच्या बाया ज्या पद्धतीने नेसतात, त्या पद्धतीने तुम्ही लगडी नेसण्याचा प्रघात पाडला पाहिजे तसे करण्यात तुमचे काही खर्चत नाही. त्याचप्रमाणे गळयात भाराभर गळसन्या व हातांत कोपले भर पावे या चांदीचे गोटयाटस्या ही देखील तुम्हास याची खूण आहे. एका पेक्षा अधिकांची जरुरी नाही. त्याने नवयाचे आयुष्य वाढते किंवा आपल्या शरीराला शोभा येते, अशातला काही भाग नाही. दागिन्यांपेक्षा कपालाच अधिक शोभा आहे. तेव्हा कलाच्या किंवा चांदीच्या दागिन्यात पैसे सर्च करण्याऐवजी चांगल्या कपडयात पैसे खर्च करा. दागिना घालायचाच असला तर सोन्याचा करून पाळावा नाहीतर पाहू नये. त्याचप्रमाणे स्वच्छतेने वागण्याची खबरदारी घ्यावी.

तुम्ही घरच्या गृहलक्ष्मी आहात. घरात कोणीही अमंगळ गोष्टी होऊ न देणे याबद्दल तुम्ही काळजी वाहिली पाहिजे. गेल्या मार्च महिन्यापासून सर्व लोकांनी मेलेल्या जनावरांचे मांस खाणे बंद केले आहे. ही गोष्ट आनंदाची आहे. पण एखाद्या घरी तसे झाले नसल्यास ते घडवून आणण्याची जबाबदारी तुम्ही आपल्या अंगावर घेतली पाहिजे. जो नवरा मेलेल्या जनावराचे मांस घरात आणील, त्यास तुम्ही स्पष्ट सांगा की, असला प्रकार माझ्या घरी चालणार नाही. आणि माझी खात्री आहे की, ही गोष्ट तुम्ही मनावर घ्याल तर हा अमंगळ प्रकार अजिबात बंद होणार आहे. तसेच तुम्ही आपल्या मुलांनाही शिक्षण दिले पाहिजे.

ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरुषासाठीच नाहीत. त्या स्त्रियांनाही आवश्यक आहेत. ही गोष्ट आपल्या पूर्वजांनीही ओळखली होती. नाहीतर जे जे पलटणीत राहिले त्या त्या लोकांनी आपल्या मुलांना ते शिक्षण दिले नसते. साग वशी माती ही गोष्ट ध्यानात ठेवून आपली पुढील पिढी जर तुम्हास सुधारावयाची असेल, तर तुम्ही मुला—मुलींना शिक्षण दिल्याशिवाय राहू नका. हा जो उपदेश मी तुम्हाला केला आहे, तो तुम्ही वान्यावर सोडणार नाही, अशी मला आशा आहे.

अस्पृश्यांच्या करिता संरक्षण

स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत अल्पसंख्य व दुर्बल समाजाच्या हित संबंधाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने आवश्यक अशी घटनात्मक निर्बधे व त याकडे दुर्लक्ष करण्यात येत असेल तर ते आम्हास मान्य होणार नाही. राजकीय प्रश्नांचे काही अभ्यासक विचारवंत असे मान्य करतात की, हे (सामाजिक समस्यांचे)प्रश्न सोडविण्याचा तडजोडीचा मार्ग शोधणे आवश्यक आहे. ते अभ्यासक विचार असेही मान्य करतात की, अशा प्रकारे मान्य झालेल्या तडजोडीचा राज्यघटनेत अंतर्भाव कराया..

आपले हितसंबंध सुरक्षित राखण्याचा खात्रीलायक उपाय माझ्या मते बसा आहे की, स्वतंत्र भारताच्या भाषी मंत्रीमंडळावर नियंत्रण ठेवण्याचा आपल्या हातात असला पाहिजे आणि जेव्हा तुम्हाला देशाच्या कायदेमंडळा योग्य प्रतिनिधित्व मिळेल तेव्हाच हे शक्य आहे.

योग्य प्रतिनिधित्वाच्या बदलात दुसरे काहीही आम्हाला मान्य होणार नाही. आणि देशाच्या राजकीय घटनात्मक बदलामध्ये तुम्हाला पुरेसे प्रतिनिधित्व देया हमी जर त्यात नसेल, तर अशा घटनात्मक बदलास जर तुम्ही आपली संमती देण्याचे नाकाराल, तर तसे करणे हे पूर्णत: तुमच्या अधिकारातले आहे.

अस्पृश्य वर्गाचे स्वतंत्र संघटन

माझ्या अनेक स्नेही मंडळींनी मला असे सूचित केले की, माझ्या या तटस्थ भूमिकेमुळे अस्पृश्यवर्गाचे हित धोक्यात येईल. त्याकरिता अस्पृदयगति एकतर ब्रिटिश सरकारशी सलोख्याचे संबंध ठेवावेत अथवा राष्ट्रीय काँग्रेसशी सहकार्य करावे, मी या प्रश्नाचा पुन: पुन्हा विचार केलाय आणि पूर्ण विचारांती अशा निर्णयाप्रत आलो आहे... काँग्रेस अस्पृश्यता मानीत नाहीय व जनतेची ती एकमेव संघटना आहे. असे मानण्यात येते. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने अस्पृश्यताविरोधी: ठराव संमत केला होता, यात काही शंका नाही. परंतु प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने काँग्रेसने काय केले? काँग्रेसने आपल्या कार्यक्रमात काँग्रेसच्या सभासदांनी खादी वापरण्याची अट घातली. त्याप्रमाणे अस्पृश्यता निवारण्याची आपल्या सभासदावर काँग्रेसने का घातली नाही ? हे कार्य त्यांना सहज करता आले असते.

यावरून असा निष्कर्ष निघतो की, आपला मार्ग आपणच निवडला पाहिजे. तो देखील स्वत:वर विसंबून राहून. काहींना हा मार्ग स्वीकारण्याचे होणार नाही. याची मला जाणीव आहे.

सरकार किंवा काँग्रेस यांच्यावर विसंबून राहण्यात काय फायदा आहे, असा माझा तुम्हाला सवाल आहे?... अस्पृश्य जनतेसमोर प्रश्न आहे तो हा की, ते स्व एक शक्ती कसे बनू शकतीलय की ज्यामुळे इतरांना त्यांचे अस्तित्व मान्य करणे भाग पडावे आणि त्यांच्या मताला हवकसंबंधांना हरएक प्रसंगी प्राधान्य मिळावे आता अशी वेळ आलेली आहे की, अस्पृश्यवर्गाने जागृत होऊन आपल्या मतांना वाचा फोडता येईल आणि ज्याच्या माध्यमातून एकसूत्रीपणे कार्य करता येईल अशी श्अखिल भारतीय संघटना, स्थापन करणे आवश्यक आहे.

अस्पृश्य वर्गाची उन्नती

केवळ राजकीय अधिकार प्राप्त झाल्याने अस्पृश्यांच्या समस्त दु:खाचे निवारण होणार नाही. त्याकरिता त्यांचा सामाजिक स्तर उंचावणे हाच खरा उ होय. अपनी सबंध अनिष्ट आचारांचा त्याग केला पाहिजे. त्यांच्या राहण्याच्या पद्धतीत सुधारणा केली पाहिजे. त्यांना शिक्षण देऊन सुशिक्षित केले पाहिजे.

शेवटी अस्पृश्यवर्गाने सर्व दृष्टीनी निर्भय होण्याकरिता इतरांच्या बरोबरीने माणुसकीचे अधिकार कृतीत आणण्याचा प्रयास सुरू करण्याकरिता त्यांना प्रोत्साहित करणे व दमदार शक्तिमान बनवणे आवश्यक आहे.

संदर्भ :—

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मथा, संपादन शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य, पुणे.
२. अस्पृश्य मूळचे कोण आणि ते अस्पृश्य कसे बनले?, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राज प्रकाशन, यवतमाळ.
३. बहिष्कृत भारतातील अकरा लेख, संपादक प्रा. सतीष तराळ, डॉ. चिंतामण कांबळे, मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती.

महिलांसाठी कायदे व योजना आणि महिला सक्षमीकरण

प्रा.डॉ.आसाराम दि.चव्हाण

सौ.के.एस.के.महाविद्यालय, बीड

सारांश : भारतामध्ये महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात मुलींची संख्या कमी होत आहे. ही चिंताजनक बाब आहे. महाराष्ट्रात 1991 मध्ये दर 1000 मुलांमागे मुलींचे प्रमाण 946 होते, ते प्रमाण 2001 मध्ये ३३ ने कमी होऊन 913 झाले व 2011 च्या जनगणनेनुसार मुलींचे प्रमाण आणखी 30 ने कमी होऊन ते 883 एवढे झाले आहे. आज मुलगी जन्माला येण्याचा हक्कच हिरावून घेतला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग (दुरुपयोग) करुन जन्माआधीच मुली मारल्या जात आहेत, ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे भविष्यात अनेक सामाजिक अडचणी निर्माण होणार आहेत.

प्रस्तावना पुरोगामी महाराष्ट्राने देशात सर्वात प्रथम म्हणजे 1988 मध्येच लिंग निवडीस प्रतिबंध करणारा कायदा केला होता, त्यानंतर केंद्र शासनाने 20 सप्टेंबर 1994 मध्ये हा कायदा केला. सन 2003 मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली. या कायद्यांतर्गत गर्भलिंग निदान करणाऱ्यावर प्रतिबंध केला आहे म्हणूनच या संवेदनशील विषयाबद्दल, समाजातील सर्व स्तरांमध्ये जागृती व्हावी. दुसरी गोष्ट कायद्याची कठोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

बीजसंज्ञाः- महिला, जन्मदर, मृत्युदर, वयोगट, वर्ष, कायदे, अनुदान.

लिंगगुणोत्तर प्रमाण – भारत व महाराष्ट्र

अ.क्र.	देश/राज्य	0 ते 6 वर्ष वयोगटातील बालकांच्या लिंग गुणोत्तर प्रमाणाचा तक्ता	
	वर्ष	2001	2011
1.	भारत	927	914
2.	महाराष्ट्र	913	883

स्त्री-पुरुषांच्या समानतेचा पुरस्कार सध्या सगळ्या (सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इ.) क्षेत्रात होताना दिसतो. पण प्रत्यक्षात वस्तुस्थिती मात्र फारच वेगळी दिसते.

देशाच्या सन 2011 च्या जनगणनेचा आढावा घेतला असता 0-6 वर्षे वयोगटामधील लिंगण गुणोत्तर, सन 2001 मध्ये 927 व सन 2011 मध्ये 914 असे झालेले आहे. सन 2001 पासून हे प्रमाण 2011 पर्यंत 13 अंकांनी कमी झालेले आहे. 2011 च्या जनगणनेनुसार ६ वर्षाखालील बालिकांचे प्रमाण 30अंकांनी कमी झाल्याचे धक्कादायक बाजू पुढे आलेली आहे. महाराष्ट्रातील 6 वर्षाखालील बालिकांचे दर हजार बालकांशी प्रमाण 2001 मधील 913 पासून 2011 मध्ये 883 पर्यंत म्हणजे 30 अंकांनी कमी झाले आहे. ही अतिशय गंभीर व चिंताजनक बाब आहे. सर्व साधारणपणे लिंग गुणोत्तर 952 असावे. हा दर गृहित धरला तर 2011 च्या जनगणनेनुसार 0 ते 6 वर्षे वयोगटातील असलेल्या 883 या लिंग गुणोत्तरानुसार गेल्या दहा वर्षात राज्यात अंदाजे 468680 इतक्या स्त्री भ्रुणहत्या झालेल्या आहेत.

महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांमध्ये लिंग गुणोत्तराचा आढावा घेतला असता त्यामध्ये सुद्धा विविधता दिसून येते. जिल्हानिहाय आकडेवारी पाहता 2001 जनगणनेशी तुलना करता बीड जिल्ह्यामध्ये हे प्रमाण सर्वात जास्त म्हणजेच 93 अंकांनी घसरले असून गडचिरोली जिल्ह्यामध्ये सर्वात कमी म्हणजेच 10 अंकांनी घसरले आहे. राज्यातील फक्त 4 जिल्ह्यामध्ये हे प्रमाण काही अंकांनी वाढले आहे. ते जिल्हे सातारा (3 अंक), कोल्हापुर(6 अंक), सांगली (11 अंक) व चंद्रपुर (6 अंक) असे आहेत.

गृहितकेः- 1. महिला आरक्षणामुळे महिलांचा विकास होतो.

2. स्त्री नेतृत्वावर पुरुष प्रधान संस्कृतीचा पगडा दिसून येतो.

उद्देशः- 1. महिला समुहाच्या माध्यमातून संघटीत करणे.

2. समुहातील महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.

3. समाजातील लैंगिक भेदभाव नष्ट करुन स्त्री-पुरुष समानता निर्माण करणे.

संशोधन पद्धतीः- सदर निबंधांचा अभ्यास करतांना द्वितीय साधन सामुग्रीचा आधार घेतलेला आहे. त्यामध्ये जिल्हा न्यायालय, महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, विविध बँकामधील बचतगट, महिला तक्रार निवारण कार्यालय, पोलीस अधिक्षक कार्यालय या सर्व शासकीय कार्यालयातील दुय्यम प्रकारची माहिती घेतलेली आहे.

जिल्हा निहाय महाराष्ट्र राज्यातील तुलनात्मक लिंग गुणोत्तरः-

0 ते 6 वर्षे वयोगटातील बालकाचे लिंग गुणोत्तर प्रमाण (जनगणना 2001, 2011)

अ. क्र.	जिल्हा वर्षे	0 ते 6 वर्षे वयोगटातील बालकांचे लिंग गुणोत्तर प्रमाण		2001 ते 2011 मधील फरक
		2001	2011	
1	ठाणे	931	918	-13
2	रायगड	939	924	-15
3	रत्नागिरी	952	940	-12
4	सिंधुदुर्ग	944	910	-34
5	नाशिक	920	882	-38
6	धुळे	907	876	-31
7	जळगाव	880	829	-51
8	अ.नगर	884	839	-45
9	पुणे	902	873	-29
10	सोलापूर	895	872	-23
11	सातारा	878	881	3
12	कोल्हापूर	839	845	6
13	सांगली	851	862	11
14	औ.बाद	890	848	-42
15	जालना	903	847	-56

16	परभणी	923	866	-57
17	हिंगोली	927	868	-59
18	लातूर	918	872	-46
19	उ.बाद	894	853	-41
20	बीड	894	801	-93
21	नांदेड	929	897	-32
22	अकोल	933	900	-33
23	वाशिम	918	859	-59
24	अमरावती	941	927	-14
25	यवतमाळ	633	915	-18
26	बुलढाणा	908	842	-66
27	नागपूर	942	926	-16
28	वर्धा	928	916	-12
29	भंडारा	956	939	-17
30	गोंदिया	958	944	-14
31	चंद्रपुर	939	945	6
32	गडचिरोली	966	956	-10
33	मुंबई (उप)	923	910	-13
34	मुंबई	922	874	-48
महाराष्ट्र राज्य		**913**	**883**	**-30**

स्त्रियांना संरक्षण देणारे भारतीय दंड विधानातील विशेष कायदे

अ. क्र.	अपराधाचे स्वरुप	कलम भा.दं.वि.	अधिकाधिक शिक्षा
1	स्त्रीकडे पाहून अश्लिल किंवा असभ्य हातवारे करणे	294	तीन महिन्याची सजा किंवा दंड
2	हुंडाबळी	304 बी	जन्मठेप
3	स्त्रीच्या संमतीशिवाय गर्भपात	313	जन्मठेप किंवा 10 वर्षे सजा
4	अल्पवयीन मुलींना विवाहासाठी पळवणे	366 अ	10 वर्षे सजा व दंड
5	बलात्कार	376	7 ते 10 वर्षे सजा किंवा दंड
6	अवैधरित्या दुसरी पत्नी करणे	495	7 वर्ष सजा किंवा दंड

महिला विकासासंबंधी विविध शासकीय योजना

1.निराश्रित महिलांसाठी शासकीय संरक्षणगृहे. 2. व्यावसायिक प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्यावेतन.

3. देवदासी अनुदान, 4. निराधार, निराश्रित व विधवा महिलांच्या मुलींच्या विवाहाकरिता अनुदान

5.कामधेनू योजना, 6.हुंडा निर्मुलन 7.नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतीगृहे.

8.राष्ट्रीय महिला कोष. 9.अनैतिक व्यापारातून महिला व अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण थांबवण्यासाठी पथदर्शी प्रकल्प. 10. रॉकेल विक्रीचे नवीन किरकोळ परवाने. 11. शिधावाटप/रास्तभाव दुकानाचे वाटप. 12.सावित्रीबाई फुले कल्याण योजना. 13 महिलांसाठी व्यवसाय शिक्षणाचे प्रशिक्षण. 14. महिला महाविद्यालय. 15. तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये.

केंद्र शासनाच्या योजनाः

1. स्वयंसेवी संघटनांना सर्वसाधारण अनुदान
2. रस्त्यावरील मुलांच्या कल्याणाची योजना.
3. राष्ट्रीय शिशू कक्ष निधी योजना. (पाळणाघर)
4. बालगृह/ विशेष बालगृहे
5. बालसदन
6. बालकाश्रम

महिला सक्षमीकरणः-

प्राचीन कालखंडापासून महिला अन्याय अत्याचाराला बळी पडत आहे. तिला नेहमीच चार भिंतीच्या आत कुटुंबांच्या गोतावळयात डांबून ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. राजकारण आणि महिला यांचा काहीही संबंध असू शकत नाही अशी समज असतांना महिलांना राजकारणातील आरक्षणामुळे महिला सर्व बंधने जुगारुन राजकारणात आलेल्या आहेत. अनेकवेळा पर्याय नसल्यामुळे महिलांना राजकारणामध्ये सहभागी करुन घ्यावे लागते किंवा अनेक पदावर महिलांची नेमणूक करावी लागते. त्यामुळे निश्चित महिलांचा राजकीय सहभाग वाढलेला आहे. महिला आता सत्ताधारेत आल्या आहेत. त्यामुळे पुरुषांशी चर्चा करणे, सल्ला विचारणे, निर्णय घेणे, पुरुषाबरोबर विविध समित्यावर काम करणे. ह्या सर्व बाबींमध्ये महिला सहभागी होऊ लागल्या आहेत. सभेमध्ये भाषण करणे, चर्चा करणे, निर्णय प्रक्रियेमध्ये भाग घेणे, आपले मत मांडणे इत्यादी. एकंदरीतच महिला आरक्षणामुळे महिला राजकीय दृष्ट्या सक्षम होतांना दिसून येतात.

संदर्भ ग्रंथ सूचीः-

1. महाराष्ट्र शासन – 2001-2011 जनगणना.
2. लोकसंख्या भुगोल - एस.एल.कयास्ता, जयपूर.
3. लोकसंख्या भुगोल – डॉ.विठ्ठल घारपुरे.

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDIII) 403

ISSN : 2278-9308 March, 2023

वाशिम शहरातील घरकाम करणाऱ्या महिलांच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थितीचे अध्ययन

प्रा. डॉ. जयश्री पंजाबराव काळे

श्री रामराव सरनाईक समाजकार्य महाविद्यालय, वाशिम

सारांश

'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती देशाते उद्धरी' अशी विद्वानांनी केलेली विधाने ऐकली म्हणजे स्त्रियांचा दर्जा पुरुषां इतकाच किंबहुना पुरुषांपेक्षा उच्च दर्जाचा आहे हे कोणासही कबूल करावे लागेल. पण प्रत्यक्ष व्यवहारात स्त्रियांची स्थिती आज तशी नाही हेही प्रत्येकास कबूल करावे लागेल.

आज स्त्री नोकरीच्या ठिकाणी असो वा असंघटित क्षेत्रात काम करताना असो प्रत्येक ठिकाणी तिला डावलले जात असल्याचे दिसून येते. एकीकडे स्त्री शिक्षणाकडे अग्रेसर होत प्रत्येक मोठ्या पदावर पोहोचत आहे तर भारतातील बराच मोठा महिला वर्ग अशिक्षित आहे. व गरिबीमध्ये खितपत पडलेला असल्याचे दिसून येते. गरीबीमुळे ह्या स्त्री वर्गाला कामाशिवाय गत्यंतर नाही. त्या मिळेल ते काम करण्यास तयार असतात. आज कामाच्या निमित्ताने बरेच लोक खेड्याकडून शहराकडे जात आहेत. शहरांमध्ये सहज करू शकणारं काम म्हणजे घरकाम. घरकाम करण्यासाठी स्त्रीला प्रशिक्षण घ्यावं लागत नाही. ते ती सहज करू शकते. शहरांमध्ये पती-पत्नी दोघेही कमावते असल्यामुळे त्यांना घरकामगार महिला हवीच असते. आणि शहरांमध्ये त्या सहज उपलब्ध देखील होतात.

घरकामगारमहिला शिक्षणाच्या अभावामुळे कमी वेतनामध्ये घरकाम करतात. सात ते आठ तासापेक्षा जास्त काम या महिला करतात. सततचे घरकाम, जेवणाचा निकृष्ट दर्जा यामुळे त्यांच्या शरीरास आवश्यक ती पोषक तत्वे प्राप्त होत नाहीत. त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत असल्याचे दिसून येते. असंघटित क्षेत्रातील अतिशय महत्त्वाचा वर्ग असलेल्या घरकामगार महिलांना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. शिक्षणाचा अभाव, आरोग्याच्या प्रचंड समस्या, कायद्याच्या संरक्षणाचा अभाव आणि अत्यल्प वेतन अशा समस्येने त्या वेढलेल्या असतात.

प्रस्तावना

मोलकरीण व घरकामगार ही अशी व्यक्ती असते जी एखाद्या व्यक्तीच्या निवासस्थानाच्या आत कार्य करत असते. 'घरगुती सेवा' हा शब्द समान व्यापारासाठी लागू आहे. घरगुती कामगार एखाद्या व्यक्तीसाठी स्वच्छता करणे, घरगुती देखभाल किंवा स्वयंपाक, लॉन्ड्री आणि इस्त्री, मुलांचा आणि वृद्धांचा सांभाळ करण्यापासून इतर घरगुती कामासाठी विविध प्रकारच्या घरगुती सेवा करतात. अशी कामे नेहमीच केली जाणे आवश्यक आहे. परंतु औद्योगिक क्रांती आणि कामगार बचत उपकरणांच्या आगमनाच्या आधी ते शारीरिक दृष्ट्या खूप कठीण होते.

काही घरगुती कामगार त्यांच्या मालकाच्या घरातच राहतात. काही प्रकरणांमध्ये, ज्या नोकरदारांच्या कामात मोठ्या घरांमध्ये जटील व्यवस्थापनाची कामे गुंतलेली असतात. अशा वेळेस घरेलू कामगारान्चे कौशल्य अत्यंत मूल्यवान आहे. तथापि बहुतेक वेळा घरगुती कामांची मागणी असते आणि बहुतेक वेळा आवश्यक असूनही सामान्यतः कमी मानले जाते. जरी अनेक देशात घरेलू कामगारांना संरक्षण देण्याचे कायदे चालू असले तरी बहुतेक वेळेस त्यांची अंमलबजावणी मोठ्या प्रमाणात होत नाही. बऱ्याच ठिकाणी घरगुती कामाचे नियमन नियमित केले जात नाही आणि घरगुती कामगार गुलामगिरी सह गंभीर अत्याचारांच्या आधीन असतात.

शिक्षणामुळे माणूस प्रगल्भ बनत जातो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, आणि ज्याने ते पिले तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही' या त्यांच्या उक्तीप्रमाणे शिक्षित व्यक्ती स्वतःवर अन्याय होऊ देत नाही. भारतात आज विशेष करून शहरी भागात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. आज प्रत्येक क्षेत्रात

स्त्रिया कार्यरत आहेत. परंतु आजही जर आपण भारताची तुलना इतर विकसित देशांशी केली तर आपल्या लक्षात येईल की, महिलांना शिक्षित करण्यास आपण किती मागे आहोत? जरी आज प्रत्येक गावागावात शिक्षण पोहोचले आहे, तरीही देशातील काही ठिकाण असेही आहेत जेथे स्त्रियांना शिकवणे व्यर्थ मानले जाते, आणि याच प्रवृत्तीमुळे मोठ्या संख्येमध्ये महिला आज अशिक्षित आहे. याच अशिक्षितपणामुळे असंघटित महिला कामगारांच्या संख्येत वाढ होत आहे. याच असंघटित महिला वर्गापैकी एक म्हणजे महिला घरकामगार होय. घरकामगार महिलांमध्ये अशिक्षितपणाचे प्रमाण मोठे आहे आणि या अशिक्षितपणामुळे त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण सुद्धा अधिक असल्याचे दिसून येते. त्यांना संघटनाचे महत्त्व माहिती नाही. त्यांना हक्क व अधिकारांची जाणीव नाही. अशिक्षितपणामुळे त्यांच्यावर अवाजवी निर्बंध घातले जातात.

स्त्रीवर तिचे कुटुंब निर्भर असते. स्त्री जर सुशिक्षित असली तर निश्चितच ती तिच्या अपत्याला शिक्षित करू शकते. चांगले आचार विचार देऊ शकते, तसेच ती जर सुदृढ व निरोगी असली तर ती चांगल्या प्रकारे कुटुंबाची देखभाल करू शकेल. परंतु असंघटित महिला कामगारांपैकी घरकाम करणाऱ्या महिलांच्या आरोग्यावर त्यांच्या कामाचा परिणाम होत असल्याचे दिसून येते. 92 % घरकामगार स्त्रिया आरोग्याच्या समस्येने ग्रस्त आहेत. यात पाठदुखी, कंबरदुखी, हातपाय दुखणे या समस्यांसह 70% स्त्रियांमध्ये अशक्तपणा, 38% स्त्रियांमध्ये हाता पायांना भेगा पडणे व 50 % स्त्रियांमध्ये चक्कर येण्याचे आजार आहेत. बऱ्याच स्त्रियांमध्ये ॲनिमिया थैलेसिमिया इत्यादी आजारांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. घरकामगार महिला या असंघटित व असुरक्षित आहेत. त्यामुळे त्यांना शिक्षित करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देण्यास प्रोत्साहित करणे गरजेचे आहे.

उद्देश

1. घरकाम करणाऱ्या महिलांच्या वैयक्तिक व कौटुंबिक स्थितीचे अध्ययन करणे.
2. घरकाम करणाऱ्या महिलांच्या शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.
3. घरकाम करणाऱ्या महिलांच्या आरोग्यविषयक स्थितीचे अध्ययन करणे.

साहित्याचे पुनरावलोकन

डॉ. सोनवणे मधूलिका (2016) यांनी आपला संशोधन लेख 'घरकाम करणाऱ्या महिलांच्या कामाचा त्यांच्या कौटुंबिक जीवनावर होणारा परिणाम' याअंतर्गत नमूद केले आहे की, भारतातील असंघटित कामगारांपैकी घरकामगारांना गणले जाते. हे असंघटित कामगार कायद्याच्या संरक्षणापासून वंचित आहेत. हे घरकामगार बऱ्याचदा शहरात स्थलांतरित झालेले दिसतात. त्यांच्या कामामुळे या महिला त्यांच्या कुटुंबाला आर्थिक हातभार लावतात. या सर्वांमागे त्यांची गरिबी आहे. काम आणि त्यांचे कौटुंबिक जीवन यामध्ये सांगड घालणे हे खूप कठीण आहे. कामाचे ठिकाण व घरातील वातावरण यामध्ये बरीच तफावत दिसून येते.

पटनायक चंद्रमोहन (2017) यांनी आपल्या संशोधन लेखांतर्गत नमूद केले आहे की भारतातील अर्थव्यवस्था विकसित करण्यामागे संघटित आणि असंघटित कामगारांचा फार मोठा वाटा आहे. संघटित कामगारांमागे त्यांची संघटना ही त्यांचे हक्क कायदे व अधिकार याविषयी जागरूक असते. परंतु असंघटित कामगार संघटित नसल्यामुळे त्यांच्यावर बरेच अन्याय व अत्याचार होतात.

अध्ययन क्षेत्र

संबंधित विषयाच्या अध्ययनासाठी वाशिम शहर हे क्षेत्र म्हणून निवडण्यात आले. वाशिम हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा आहे. हा जिल्हा जुलै 1998 रोजी स्थापन झाला. जिल्ह्याची लोकसंख्या 10 लाख 20 हजार 216 इतकी आहे. वाशिम जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय वाशिम शहर आहे. ही वाकाटकांची राजधानी होती.

वाशिम शहराचे प्राचीन नाव वत्सगुल्म आहे. जिल्ह्यातील मुख्य पिके सोयाबीन, गहू, ज्वारी, बाजरी, तुर, कापूस, ऊस, हळद ही आहेत.

अध्ययन पद्धती

वाशिम शहरातील घरकाम करणाऱ्या महिलांच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थितीचे अध्ययन करण्याकरिता तथ्य संकलनाच्या प्राथमिक व दुय्यम अशा दोन संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला. तसेच नमुना निवडीच्या गैरसंभाव्यता नमुना निवड पद्धतीतील श्रृंखला पद्धतीद्वारे वाशिम शहरातील 400 घरकामगार महिलांची निवड करण्यात आली. कारण सर्वच महिला घरकामगार एका ठिकाणी मिळणे कठीण होते.

निष्कर्ष

घरकाम करणाऱ्या महिलांचे मत जाणून घेतले असता असे निदर्शनास आले की, सर्वाधिक घरकामगार महिला अशिक्षित असून त्यांचे कौटुंबिक सदस्य सुद्धा अशिक्षित आहेत. सर्वाधिक घरकामगार महिला ह्या दारिद्र्यरेषेखाली येतात. महत्तम घरकामगार महिला च्या कामाचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. सर्वाधिक घरकामगार महिला यांना पाठदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी, चक्कर येणे, वात येणे, एनिमिया इत्यादी आजाराचा त्रास होतो.

संदर्भ ग्रंथ सूची

1. mr.m.wikipedia.org
2. www.iosrjournals.org
3. www.researchgate.net
4. The impact of work life of women domestic workers on their family life IOSR journal of Business and Management, ISSN 2278-487×, VOLUME 18 AUG 2016, page no. 47-50.
5. International research journal of human resource and social sciences, ISSN 2349-4085 volume 4, 9 sep 2017.

मराठा- ऐक्येच्छू सभा : कृष्णराव केळूसकर

प्रा. मोहन बाबुराव चव्हाण

लक्ष्मीबाई भाऊराव पाटील, महिला महाविद्यालय, सोलापूर

प्रास्ताविक:

कृष्णराव केळुसकर यांचा जन्म वेंगुर्ले तालुक्यातील केळूस या गावी 20 ऑगस्ट 1860 रोजी झाला. 1881 साली मुंबईतील विल्सन हायस्कूलमधून मॅट्रिक झाले आणि लगेच त्यांनी इस्त्रायली शाळेत चार वर्षे शिक्षकांची नोकरी केली. त्यानंतर त्यांची 1886सालच्या नोव्हेंबर महिन्यापासून विल्सन हायस्कूलचे ते अध्यापक म्हणून काम पाहिले. तेथे त्यांनी अनेक वर्षे निष्ठेने काम केले. एक प्रामाणिक व कुशल निष्ठावंत ध्येयवादी नि: आदर्श शिक्षक म्हणून त्यांची सर्वत्र किर्ती झाली. गरीब निराश्रित व होतकरु विद्यार्थ्यांना मिळविण्यासाठीते सतत त्यांच्या इतर अडचणी दूर करण्यासाठी सधन गृहस्थांकडे याचना करीत हिंडणे हा जणू त्यांचा दैनंदिन कार्यक्रमच होता. परंतु या दयाबुध्दीबरोबर त्यांची कर्तव्यबुद्धीही तितकीच जागृत असे. त्यांची शिस्त फार कडक असे. त्यांचे नाव ऐकताच गडबड, गोंधळ करणारी मुले थरथर कापत असत, त्यांची ज्ञानसंपन्नता कर्तव्यतत्परता, उद्योगशीलता व मुलांची उन्नती नि:प्रगती साधण्यासाठी अखंड परिश्रम करण्याची तळमळ ह्या गुणांमुळे त्यांचे व्यक्तिमत्व व कार्य त्या शाळेत उठून दिसे. त्यांनी इंग्लंड, जर्मनी व अमेरीका या देशातील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करण्याचा ठरविला होता व त्याचवेळी अनेक शाळांनी त्याचा फायदाही घेतला, ही गोष्ट त्यांना भूषणास्पद आहे.

शोधनिबंधाचा उद्देश:

कृष्णराव केळुसकर यांचे व्यक्तिमत्त्व व कार्यांचा अभ्यास करणे, हा प्रस्तुत शोधनिबंधाचा उद्देश आहे.

ज्ञानाजर्नाचा कणा:

ज्ञानार्जन ज्ञानदान नि: मागासवर्गीय व दलितांचा उद्धार हेच आपले जीवितकार्य असल्याचे कृष्णरावांनी ठरविल्यामुळे त्याला पोषक होईल असे वाचन करणे हे अखंडपणे सुरूच असे. शाळेत शिकवून, शिकवण्या करून, ते आपला उरलेला प्रत्येक क्षण ज्ञानाचे कण टिपण्यात वेचीत. ते पहाटे उठून समुद्रावर जाऊन वाचन करीत. रहदारीचे रस्ते नसतील तेथून जाता येता वाचन करायचे. सुट्टीच्या दिवशी आगगाडीतून बसून पहिल्या स्थानकापासून शेवटच्या स्थानकापर्यंत वाचीत जायाचे, असा त्यांचा उरलेला परिपाठ असे. याशिवाय त्यांची वाचनस्थळे अनेक ठिकाणी होती. राणीचा बगीचा, मुंबई विद्यापीठ बगीचा, चर्नी रोड येथील बाग ही त्यांची प्रशांत वाचनस्थळे, 'वाचन-वाचन' असा जप करीत अफाट वाचनतृष्णा तृप्त करण्यासाठी धडपडणारा हा कोणी आधुनिक ब्राम्हीच असावा. असे लोकांवाटे तेथे हातातील पिशवीमधून ग्रंथ बाहेर काढून ते वाचन सुरू करायचे आणि खिशातील वही काढून शब्द, वाक्यप्रयोग, मुद्दे, माहिती यांची टिपणे काढायचे. सुभाषिते, वचने, म्हणी यांचाही त्यात समावेश करत या स्वाध्यायशीलतेमुळे ते चालते बोलते एक ग्रंथभांडारच झाले होते. म्हणावा वाचन संपवून सकाळी ते चौपाटीवर पोहायला जात. ज्ञानसागरात व सिंधूसागरात पोहणे हाच त्यांचा छंद होता.

केळूसकर यांचे आदर्श चिपळूणकर:

आपल्या कर्तबगारीने मराठीचा व्यासंगपूर्ण सखोल अभ्यास करून त्यांनी तांत्रिक ग्रंथावर शुद्धमराठीत ग्रंथ लिहून आपले लेखनकार्य महाराष्ट्राच्या प्रत्ययास आणून देईन, अशी त्यांनी त्याक्षणीच आपल्या मन: प्राप्ती प्रतिज्ञा केली. मराठी भाषेचे "शिवाजी"विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या निबंधमालेंचा आदर्श त्यांनी समोर ठेवला. परंतु कृष्णशास्त्री गोडबोले यांच्या वाणीचा व बुद्धिप्रामाण्यवादी विचारसरणीचा त्यांच्यावर अधिक प्रभाव पडल्यामुळे चिपळूणकरांच्या विलक्षण प्रभावी च भावनाप्रधान भाषाशैलीतील व विचारातील त्वेष व तुच्छता विकारवशता व आत्मप्रौढी यांचे

वळण त्यांनी उचलले नाही. शिवाय विष्णुशास्त्रींची विचारसरणी त्यांना मान्य नव्हती. केळूसकरांच्या लेखनात विकारवशतेपेक्षा विवेक आणि उष्णतेपेक्षा उजेड अधिक आहे हे त्यांच्या ग्रंथावरून दिसून येते.

विनायकराव ओकांचा अहंकार हा त्या काळातील ब्राम्हणी दुराभिमानाचा प्रतीक होता. ब्राम्हणेतर मनुष्याच्या अंगी कर्तृत्ववान व बुद्धिमान ब्राम्हणा इतकी बुद्धिमत्ता व कर्तृत्ववानता नसते. अशी अहंकार भावना त्याकाळी केवळ ओकांसारख्याच व्यक्ती बाळगीत होत्या, असे नाही. त्यानंतर न्यायमूर्ती रानडेही त्या अहंकारापासून मुक्त झाले नव्हते हे आश्चर्य नव्हे काय? राजर्षी शाहू छत्रपतींनी भास्करराव जाधव यांची कोल्हापूर संस्थानात 1895 साली दंडाधिकारी म्हणून नेमणूक केल्यावर न्यायमूर्ती कोल्हापूर संस्थानांचे दिवान सबनीस यांना विचारले की, "काय हो सबनीस, जाधव तुमच्या तुमच्या आमच्यासारखे काम करू शकेल का?"अशा प्रश्नातून अनेक अंगी व्यक्तित्व बाजू मांडले जात, यामुळे वैचारिक कसोटी समजून येते.

त्यानंतर "सुबोधपत्रिका, दिनबंधू, शेतकऱ्यांचा कैवारी" इत्यादी साप्ताहिकांत कृष्णरावांचे तेजस्वी व विचार प्रवर्तक लेख प्रसिद्ध होऊ लागले. त्यापैकी एक लेख "राजकीय ऋषी"मामा परमानंद यांनी वाचला व तो लेख वामनराव मोडकांनी लिहला आहे असे समजून त्यांनी मोडकांचे अभिनंदन केले. केळूसकरांनी धर्मशास्त्र, समाजसुधारणा, स्वदेशाभिमान, इतिहास, आरोग्यशास्त्र, अर्थशास्त्र या विषयांवर आपले सखोल व विवेकी विचार प्रसिद्ध केले आहेत. 1893 सालच्या डिसेंबरमध्ये लिहिलेल्या आपल्या स्वदेशाभिमान या लेखात ते म्हणतात की, "मनुष्यास जसा स्वाभिमान तसा राष्ट्रास स्वदेशाभिमान त्यात ते पुढे म्हणतात. "आपल्या देशाचा नाश किंवा स्वातंत्र्य अपहार करण्यास कोणी प्रवृत्त झाल्यास त्यांना आपल्या सुखाची. वित्ताची व आप्तजनांची किंवा जीविताची बिलकूल पर्वा न करता युद्धाचा प्रसंग करुन स्वदेशाचे किंवा स्व:स्वातंत्र्याचे रक्षण करण्यास जो झटतो तो मनुष्य खरा स्वदेशाभिमानी होय. असा त्यांचा विचार व ही वृत्ती कोणास प्रवृत्त करील. तर तिला निंदा व घातक स्वरूप प्राप्त झालेअसे समजावे.

मागासवर्गाच्या उध्दाराची चळवळ:

केळूसकरांनी आपल्या विचारातून व ज्ञानतपातून कनिष्ठ वर्गाच्या उन्नतीसाठी त्यांनी ज्या तरुणांना काम करण्याची इच्छा होती. त्यांना चालना दिली. त्यांचे मित्रपरिवार डॉ. ल. व. धारगळकर, ध.म. फडतरे, दा. कृ. दळवी व स्वत: कृष्णराव या सर्वानी मिळून 1887 साली "मराठा-ऐक्येच्छू सभा"नावाची संस्था स्थापन केली. विद्येत मागासलेल्या मराठी भाषा बोलणाऱ्या हिंदू लोकात म्हणजे मराठे, वाणी भंडारी कुणबी, तेलगु, आगरी, माळी, कोळी, बंजारी, शिंपी, तेली, गवळी, सुतार, लोहार, कुंभार वगैरे शेतकरी व कारागीर लोकांत विद्येचा प्रसार करणे, त्यांच्यामध्ये असलेल्या वाईट चालीरीती सुधारण्याविषयी झटणे, त्यांचे आर्थिक, राजकीय इतर हितसंबंध व हक्क यांचा पुरस्कार करण्यास झटणे मागासलेल्या निरनिराळया जातीत परस्परांविषयी समता, प्रेम व ऐक्यभाव या वृत्ती वृद्धिंगत होतीलअसे करण्यास झटणेया संस्थेची ध्येय होते. सी.के. बोले, ह.वि. राजवाडकरादी मंडळी या संस्थेचे कार्य 1890पासून करू लागले. नारायणराव मेघाजी लोखंडे हे या सभेचे 1890 ते 1895 पर्यंत पाच वर्ष अध्यक्ष होते. ते महात्मा फुले यांचे सत्यशोधक चळवळीतले उजवे हात होय. भारतीय कामगारांच्या उद्धारासाठी चळवळ करणारी कामगार संस्थाही सत्यशोधक समाजाची एक संस्था असून समाजाच्या वतीने 1884सालापासून लोखंडे यांनी कामगारांच्या हितार्थ व उन्नतीसाठी चळवळ सुरू केली.

मुंबई सत्यशोधक समाजाच्या चळवळीत स्वतः कृष्णराव केळूसकर यांनी भाग घेतलेला होता. मराठा-ऐक्येच्छू सभा ही सत्यशोधक समाजाच्या मागून सामान्य जनतेच्या उद्धारासाठी निघालेली मुंबईतील दुसरी मोठी संस्था आहे. केवळ एकाच जातीच्या उन्नतीसाठी निघालेली "ब्राम्हणसभा"तिची स्थापना 16 जून 1888साली झाली. ब्राम्हण सभेच्या स्थापनेची पार्श्वभूमी मांडताना "ब्राम्हणसभेची गेली साठ वर्षे या ग्रंथाचे लेखक वा. रा. गुळवणे म्हणतात, "जोतीराव फुले यांनी स्थापना केलेल्या सत्यशोधक समाजाने ब्राम्हण समाजावर प्रखर हल्ले सुरू केले होते. वेद, मुर्तिपूजा, चातुर्वर्ण्य आणि

पौरोहित्य ही सर्व झुगारून दिली पाहिजेत धार्मिक गुलामगिरी नष्ट झाल्याशिवाय त्यांची उन्नती होणे शक्य नाही. ब्राम्हण समाजाचे नाक खाली करण्याचे जणू सत्यशोधक समाजाने विडाच उचलेला होता, असे म्हणण्यास हरकत नाही, ही महात्मा फुले यांच्या कार्याची बोलकी पावतीच आहे.

मुंबईत 1904 साली काँग्रेसचे अधिवेशन भरणार होते. सरकारने प्राथमिक शिक्षण मोफत करावे, असा ठराव काँग्रेस करणार काय याची चौकशी करावी असा ठराव मराठा ऐक्येच्छू सभेने केला. याच शिक्षणाची चळवळ मुंबईत येऊन राहीलेल्या महाराष्ट्रीयांच्या जिल्हानिहाय समित्या स्थापन झाल्या. शेवटी काँग्रेसने मुंबई अधिवेशनात प्राथमिक शिक्षणाचा प्रसार लोंकामध्ये करावा व प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्याच्या दृष्टीने कार्य आरंभ केले. कृष्णरावांनी आणखी दुसऱ्या एका संस्थेला मार्गदर्शन केले. "मराठा प्राव्हिडंट फंड"व तिसरी संस्था "डेक्कन □ग्रिकल्चर रिलीफ ॲक्ट" 1889 साली रत्नागिरी येथे काढले असे कृष्णराव केळुसकरांनी दिलेल्या एका मानपत्रात अभिमानाने नमूद करुन ठेवण्यात आले आहे. त्या काळी दारिद्र्यात पिंचलेल्या शेतकऱ्यांच्या स्थितीचा पाठपुरावा केला. कामगार गरीब जनतेची गाऱ्हाणी सरकारपुढे मांडीत, सामाजिक पुरुषांना चेतावणी देतसन 1888साली सरकारने मिठावरील कर वाढवला, त्याचा भार शेतकऱ्यांवर अधिक पडणार होता. त्या कराविरुद्ध चळवळ करण्याविषयी दाजीराव दळवी यांना 23 मार्च 1988 रोजी पत्र पाठवून कृष्णरावांनी आग्रहाची विनंती केली की,"आपल्या सभेचा हेतू गोर-गरीब शेतकऱ्यांचे हरएक प्रकारचे दु:ख निवारण करण्याचा आहे. सध्या मिठावरील कर वाढविल्यामुळे चोहीकडे शेतकऱ्यांचे हाल सुरू आहेत. त्यासाठी आपल्यास या गोष्टीचा विचार करून इष्ट व योग्य तो मार्ग निवडावा व शेतकऱ्यांचा अर्ज सरकारास पाठविण्याची तजबीज करावी ही विनंती."

कोकणातील खोती-पद्धतीविरुद्ध पुढे सा. के. बोले, आनंदराव सर्वे, कृष्णराव केळुसकर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चळवळ केली. हे सर्व नेते जमीनदार व सावकारी नष्ट करण्याच्या चळवळीचे अग्रदूत होते. मुंबईतील एका विख्यात संस्थेत आदर्श शिक्षक म्हणून गाजलेला हा ज्ञानी पुरुष लोकसंग्रह करून शेतकऱ्यांची गाऱ्हाणी व दु:खे निवारण्यासाठी कसा शांतपणे झटत होता, हे दिसून येते.

कामगार नेता:केळूसकर

मुंबईतील सत्यशोधक समाज"मराठा-ऐक्येच्छू सभा"व "मराठा प्राव्हिडंट फंड"या संस्थांनी कनिष्ठ वर्गात शिक्षण प्रसारासाठी फारच मोठे प्रयत्न केले. त्यांचे सामाजिक, धार्मिक, अर्थिक, व सांस्कृतिक जीवन सुधारावे म्हणून पराकाष्ठा केली.

त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना सहाय्य व मार्गदर्शन केले. "मराठा ऐक्येच्छू"सभेने 24 सप्टेंबर 1905 रोजी मुंबईत कामगारांची जाहीर सभा घेऊन कामगारांच्या कामाच्या वेळेला मर्यादा घालावी, तास कमी करावेत, अशा मागण्या केल्या. कामाची वेळ बारा तासाची करावे असे मत व्यक्त केले. परंतु त्यावेळी निर्णय झाला नाही.

सामान्य जनतेत जनजागृती करण्याचे कार्य व्याख्यानांद्वारे होईल. त्यावेळी नारायण राव लोखंडे, विठ्ठलराव वंडेकर, केळूसकर व बोले हे प्रमुख वक्ते असायचे. अशाच एका सभेत आमचे लोक गरीब का आहेत? या विषयावर 13 जानेवारी 1895 रोजी बोलताना केळूसकर म्हणाले की,"आमचे लोक म्हणजे अर्थात ज्यास हल्ली मागासलेले लोक म्हणतात त्यांची गरिबी. ते गरिबी असण्याचे कारण जमीन सरकारची असल्यामुळे शेतकीचा बराच भाग सरकारला द्यावा लागतो. रयतवारी पद्धतीप्रमाणे ज्या जमिनी गरिबांच्या ताब्यात होत्या त्या हळूहळू त्यांच्या हातातून जात चालल्या आहेत. दुसरे कारण गुरांची कमतरता व जंगलाचा जुलमी कायदा असल्यामुळे शेतात मिळावे असे खत व राब मिळत नाही व त्यामुळे जमिनी बेकस होत चालल्या आहेत. तिसरे कारण आमच्या लोकांचे जबरदस्त अज्ञान. आमचे जवळजवळ शेकडो नव्याण्णव लोक अशिक्षित असल्यामुळे त्यास सरकारी दिवाणी. देवघेव वगैरे व्यवहार चांगले हुशारीने करता येत नाहीत. शिवाय आपले हक्क काय, आपले नुकसान कशात आहे व फायदा कशाने होणार आहे. हे त्यांना कळत नाही". यासाठी आमच्यापैकी ज्यांना ऐपत असेल त्यांनी शिक्षणप्रसार करण्यास झटावे. परंतु, "शिक्षणाकडे अधिक पैसा खर्च करण्यास आमचे सरकार समर्थ

नाही. असा जबाब प्रतिवर्षी मिळत असे. लष्करी खात्याकडे खर्च करण्याच्या बाबतीत त्यांचा हात फारच सढळ दिसतो. हे खाते यथास्थित राखल्यावाचून आपल्या येथील सत्तेची त्यांना शाश्वती न वाटने सहाजिकच आहे. अशी केळूसकरांनी सरकारवर टिका केली आहे."

सामाजिक संस्थाचे जनकत्व केळूसकर:

1912 साली डिसेंबर महिन्यात "मराठा ऐक्येच्छू सभेच्या विद्यमाने विद्येत मागासलेल्या हिंदू जातीच्या हितार्थ अपूर्व अशी एक परिषद मुंबईच्या टाऊन हॉलमध्ये भरली होती. जव्हारचे राजे कृष्णशहा पतंगशहा अध्यक्ष होते. राजे कृष्णशहा पतंगशहा यांनी अध्यक्षीय भाषणात त्यांनी या ऐक्येच्छू सभेचा गौरव केला म्हणाले. "विजांसारखा अंकुर" ही म्हण आजच्या परिषदेसंबंधाने पूर्णपणे लागू पडते. हिचा उद्भव ज्या मराठा सभेने घेतला त्या निरनिराळ्या जातीच्या व परिषदाच्या प्रमुख गृहस्थांसही किर्ती वाटत आहे. हे स्पष्ट होते आणि माझ्यासमोर जो हा निरनिराळ्या जातीच्या प्रतिनिधींचा संघ दिसत आहे त्यावरुन याबाबतीत आता वादच उरला नाही. ही प्रचंड परिषद भरविण्याची कल्पना केळूसकरांचीच होती. ती यशस्वी करण्यासाठी केळूसकर व सी. के. बोले हे रात्रदिवस खपत होते. स्वत: पाठीमागे राहून मागास समाजाच्या परिषदातील कामकाजाचे संचालन करायचे. असा गुरुवर्याचा क्रम असे. ते कार्य करीत असताना त्यांनी श्रेयाची हाव व क्षमाची कधी तमा बाळगली नाही. 1917 साली अन्न-धान्याची टंचाई पडली, त्यावेळी ह. वि. राजवाडकर यांनी मुंबईत सहकारी पेढी काढली व सहकारी दुकाने काढली. त्या सहकार चळवळीत गुरुवर्य त्यांचे सहकारी व सल्लागार होते."

मराठा ऐक्येच्छू सभेच्या कार्याचा प्रसार व परिणाम महाराष्ट्रातील मागासलेल्या व दलित समाजावर कसा झाला त्याविषयी आपल्या 1913 ते1917 पर्यंतच्या प्रतिवृत्तात मराठा ऐक्येच्छू सभेचे कार्यवाहक मोठ्या अभिमानाने म्हणतात. ही संस्था स्थापन झाल्यास एवढा काळ म्हणजे तीस वर्षापर्यंतच काळ ही अस्तित्वात राहून तिच्याकडून मागासलेल्या जातीच्या हिताची अशी अनेक प्रकारची कामे होत राहीली आहेत. याबद्दल कोणालाही समाधान वाटणार नाही. अज्ञान, भोळ्या व गरिब लोकांची स्थिती सुधारण्याचा यत्न करण्यास प्रवृत्त व्हावयास मनाला सुसंस्कार व्हावा लागतो व लोकहितबुद्धी विशेष प्रकारे विकास पावावी लागते. अशी योग्य माणसे आमच्या मागासलेल्या समाजात उत्तरोत्तर अधिकाधिक निर्माण होत आहेत. ही एक मोठी समाधान माणण्याजोगे गोष्ट होय आणि आधुनिक पद्धतीचा, शिक्षणाचा,प्रचार, प्रसार जस-जसा जास्त होत जाईल तसतशी स्व:जनांचे व अखिल जनवृदांचे हित साध्य करण्यास योग्य व कार्यक्षम उपायाची योजना करण्यास समर्थ व तत्पर अशी परोपकारी माणसांची संख्या वाढतच जाणे साहजिक आहे.

समारोप

अशा पद्धतीने विविध विधायक चळवळी सुमारे तीस-पस्तीस वर्षे भाग घेतल्यावर केळूसकरांनी सामान्य जनतेचे जागृती होऊन तिची जी प्रगती झाली होती ती पाहून 1918 च्या दरम्यान तुकाराम जावजी चौधरी यांच्या चरिताप्रारंभी थोडे समाधान व्यक्त केले. ते म्हणाले की, "ब्रिटिश रियासत या देशात स्थापित होऊन सर्व जातीच्या, धर्माच्या व दर्जाच्या लोकांस समतेने वागविण्याची व्यवस्था पाश्चात्त्य राजनीतीस अनुसरून होऊ लागल्यामुळे वेगवेगळ्या लोकांस त्यांच्या गुणांनुसार व कर्तबगारीने नावलौकिक संपादण्याचा सुयोग प्राप्त झाला आणि हिंदू समाजातल्या कित्येक जाती ज्या विद्याकलादिकास निरंतरच्या पारख्या झाल्या होत्या त्यास यथोचित्त उत्तेजन मिळवून त्यातल्या थोड्याशा लोकांनी त्या सुसंधीचा पूर्ण लाभ घेतलेल्या आजमिताला दुग्गोचर होत आहे आणि यापुढे असे लोक अधिकाधिक समोर येतील असे वाटू लागलेले आहे, असे कृष्णराव केळूसकर यांनी म्हटलेले आहे."

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDIII) 403

ISSN : 2278-9308 March, 2023

Effectiveness of Activity Based Learning Methodology of pedagogy subject

Dr. Ranjana V. Tijare

(Asst. Professor) Shri Vasant College of Education, Nagpur

देणार आहात यांविषयीची स्थूल दिशा ठरविता येते .संशोधन साहित्याचा आढावा घेतल्या नंतर संशोधकाला विविध संदर्भाच्या अभ्यासावर आधारलेली माहिती प्राप्त होते. संशोधनपर विषयासंदर्भात ऐतिहासिक आणि समकालीन कोणते प्रवाह सुरु आहेत याची सुद्धा संशोधकाला माहिती मिळते. संशोधनपर विषयाच्या इतर उपविषयाची सुद्धा माहिती प्राप्त होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, सर्व प्रकारचे दुय्यम स्रोत व संबंधित कोशवाङ्गमय हे संशोधन साहित्याचा आढावा घेत असताना तपशीलवार व बारकाईने नजरेखालून घातल्यानंतर एक प्रारंभिक स्वरूपाची संदर्भग्रंथ सूची (बिब्लिओग्राफी) हाती तयार होते जी उर्वरित संशोधन कालखंडभर उपयोगी ठरते . दुय्यम स्रोतांचे अवलोकन करणे ही संशोधन कार्याची पूर्वतयारी असून यास शोधकार्याच्या प्रारंभीचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. दुय्यम साहित्याला मुख्यतः प्रकाशित लिखित कामाचासंग्रह असल्याचे गृहीत धरले जाते; मात्र अलीकडे दुय्यम साहित्याची व्याख्या अधिक व्यापक झाली आहे. त्यामध्ये अप्रकाशित प्रबंध, मौखिक साहित्य, दृक-श्राव्य माध्यम, वृत्तपत्र, इंटरनेट वरील स्रोत, भाषांतर आणि लिप्यांतर साहित्य यांचादेखील समावेश करण्यात आला आहे; मात्र, हे सर्व वाङ्गय सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध असणे ही दुय्यम स्रोत म्हणून दाखलपात्र होण्याची पूर्वअट आहे. अशा विविध स्रोतांचा आधार घेऊन उपलब्ध साहित्याचे वर्णन, सारांश आणि चिकित्सक मूल्यमापन करणे म्हणजेच दुय्यम संशोधनपर साहित्याचा आढावा घेणे होय.

संशोधन आढावा संदर्भाची वैशिष्टे -

वैशिष्ट्ये : फिंक आर्लेन यांनी संशोधन साहित्य आढावासंदर्भात काही वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

- जुन्या साहित्याचा नव्याने अन्वयार्थ लावला जाण्याची अथवा नवीन साहित्याचा जुन्या पद्धती वापरून अन्वयार्थ लावला जाण्याची शक्यता विस्तारते.
- साहित्य आढावा भविष्यातील संशोधनास दिशादर्शक म्हणून काम करतो.
- साहित्य आढावा संबंधित क्षेत्रातील मुख्य वादविवाद तसेच सैद्धांतिक, संकल्पनात्मक प्रगतीविषयी माहिती अद्ययावत करतो.
- साहित्य आढावा पुढील संशोधन करण्यासाठी ठोस पार्श्वभूमी अथवा पाया निर्माण करतो.
- उपलब्ध संशोधनातील कच्चे दुवे स्पष्ट होण्यास मदत होते. न उलगडलेले प्रश्न दृष्टीपथात येतात.
- संशोधकास सैद्धांतिक आणि पद्धतिशास्त्रीय नांचा नव्याने तपास घेण्यास चालना मिळू

संशोधन साहित्य आढावा घेतानाचे महत्त्वपूर्ण मुद्दे :- साहित्याचा आढावा घेत असताना संशोधक म्हणून तुम्ही नवीन असाल तर, इतर संदर्भ साहित्याचा आधार घेऊन त्यांनी कशाप्रकारे साहित्य आढावा पार पाडला, हे पाहणे उद्बोधक ठरू शकते. आजवरील दुय्यम संशोधनपर लिखाणातील वादविवाद, निष्कर्ष, मुख्य युक्तिवाद, सैद्धांतिक व संकल्पनात्मक मांडणी, पद्धतिशास्त्र आणि पद्धती यांविषयी सारांश रूपात मूल्यमापन मांडणे. साहित्य आढावा घेताना वाचनात आलेल्या प्रत्येक लिखाणाविषयी लिहिणे आवश्यक नसते. जे विषयाशी किंवा संशोधन विषयाच्या उद्दिष्टांशी निगडित आहे, त्याविषयी लिहिणे अपेक्षित असते. त्यामुळे निवडक साहित्य विचारात घ्यावे आणि मांडणी करत असताना उपलब्ध संशोधन साहित्याची आवश्यकता असते. त्यामुळे निवडक साहित्य विचारात घ्यावे जे विषयाशी किंवा संशोधन विषयाच्या उद्दिष्टांशी निगडित आहे, त्याविषयी लिहिणे अपेक्षित आणि मांडणी करत असताना उपलब्ध संशोधन साहित्य संशोधन कर्ता करीत असलेल्या संशोधनाशी कसे निगडित आहे, यावर भर द्यावा. त्याच प्रमाणे आढावा लिहिताना एक पुस्तक आणि त्यातील महत्त्वाचे युक्तिवाद, दुसरे पुस्तक व त्यातील युक्तिवाद असे न करता सर्व वाचलेल्या साहित्यामध्ये क्रम लावून अथवा दुवा प्रस्थापित करून लिखाण करावे.• उपलब्ध संशोधनातील कमतरता अधोरेखित करत, तुम्ही करत असलेले संशोधन कशाप्रकारे अस्तित्वात असलेल्या ज्ञानामध्ये भर घालणारे आहे, कोणते विषय तुम्ही कशाप्रकारे हाताळणार आहात यांविषयी मांडणी करावी.

निष्कर्ष -

१. आधुनिक संशोधन प्रक्रियेतील संशोधन साहित्याचा आढावा हि संशोधन प्रक्रियेतील अत्यंत महत्वाची पायरी आहे.
२. पूर्व संशोधनाचा आढावा नवोदित संशोधन कर्त्याने घटला असता त्यास त्याच्या संशोधांची व्याप्ती समजून येण्यास मदत होते.
३. पूर्व साहित्याचा नव्याने अन्वयार्थ लावला जाण्याची अथवा नवीन साहित्याचा जुन्या पद्धती वापरून अन्वयार्थ लावला जाण्याची शक्यता विस्तारते.
४. संशोधन साहित्य आढावा भविष्यातील संशोधनास दिशादर्शक म्हणून काम करतो.

Scanned with CamScanner

ISSN 2454-1974

५. संशोधन साहित्याचा आढावा संबंधित क्षेत्रातील मुख्य वादविवाद तसेच सैद्धांतिक, संकल्पनात्मक प्रगतीविषयी माहिती अद्ययावत करतो.

६. संशोधन साहित्याचा आढावा पुढील संशोधन करण्यासाठी ठोस पार्श्वभूमी अथवा पाया निर्माण करतो.

७. संशोधन साहित्याचा आढावा संशोधन कर्त्याला उपलब्ध संशोधनातील कच्चे दुवे स्पष्ट होण्यास मदत करतो

संदर्भ :

१. संत, दु. का., संशोधन : पद्धती, प्रक्रिया, अंतरंग, पुणे, १९६६.

२. फडिया,बी.एल.: शोध पद्धतींया ,साहित्य भवन पब्लिकेशन,आग्रा, २०१९

३. शर्मा ,वीरेंद्र प्रकाश: रिसर्च मेथडॉलाजी, पंचशील प्रकाशन, जयपूर ,२०१५

४. Arlene, F., Conducting Research Literature Reviews: From the Internet to Paper, London, 2005.

५. लेखकाची ची स्वत:ची निरक्षने व लेखन

Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2020





Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 240 (CCXL)
ISSN : 2278-9308
July,2020

महात्मा गांधी : प्रमुख सत्याग्रह आणि तत्त्वज्ञान

डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे
इतिहास विभाग प्रमुख डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

सारांश :

म.गांधीजी हे विसाव्या शतकातील राजकारणी, स्वातंत्र्य संग्राम सैनिक, युगप्रवर्तक व महान, मानसतज्ज्ञ होते. जनतेशी निगडीत विविध समस्यांची त्यांना जाणीव होती. सन 1920 ते 1948 हा कालावधी गांधी युग म्हणून भारतीय इतिहासात अजरामर आहे. त्यांनी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच भारताला स्वातंत्र्य प्राप्त व्हावे यासाठी सक्रिय सहभाग नोंदविला तसेच विविध रचनात्मक, सकारात्मक कार्याद्वारा भारतीय स्वातंत्र्य चळवळीला चालना दिली, प्रेरणा दिली. विविध राजकीय आयुधांचा आजीवन उपयोग केलेला दिसून येतो. सत्याग्रह हे त्यापैकीच एक महत्त्वाचे आयुध (शस्त्र) होय. सत्याग्रहाचा मूलअर्थ सत्यासाठी आग्रह हा होतो. सत्याग्रहाचा मूलाधार सत्य, अहिंसा व मानसीक परिपक्वता हा होता. सत्याग्रहाद्वारा जनतेमध्ये जनजागृती निर्माण होऊन स्वातंत्र्यप्राप्तीची चळवळ अधिक गतीमान होऊ शकते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. कोणताही सत्याग्रह म.गांधीजींनी व्यक्तिगत स्वार्थासाठी केलेला आढळून येत नाही. सत्याचा आग्रह अहिंसेच्या मार्गाने प्रतिपक्षाची मानसिकता बदलविण्यासाठी करावा असे ते म्हणत असत. म.गांधीजींचा सत्याग्रह आंदोलनाची पायाभरणी दक्षिण आफ्रिकेत झालेली असून रचनात्मक प्रयोग भारतभूमीवर केलेले आढळून येतात. निःशस्त्र प्रतिसाद आणि निष्क्रीय प्रतिवेध या मार्गाने सत्याग्रह आंदोलन उभारले जात असे. या तत्त्वास ठेच पोहचताच म.गांधीजी सत्याग्रह आंदोलनात माघार घेतलेली दिसून येते. सत्य, अहिंसा सत्याग्रह आंदोलनाचा मूलाधार होता. सत्याग्रहाद्वारा प्रतिपक्षाचा मानसिकतेत बदल झाला पाहिजे असे म.गांधी म्हणत असत. चंपारण्य, खेडा, मिठाचा सत्याग्रह हे महत्त्वपूर्ण सत्याग्रह आहेत ज्याद्वारा म.गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याला रचनात्मकता उपलब्ध करून दिली व जनजागृती निर्माण करून स्वातंत्र्य लढ्याला वेगवान केले. अंततः म. गांधीजींनी स्वातंत्र्य लढ्यात सत्याग्रह या आयुधाचा वापर करून सक्रिय सहभाग नोंदविलेला दिसून येतो.

भारतात जन्मलेले महात्मा गांधी हे जागतिक पातळीवरचे महान व्यक्तिमत्त्व अत्यंत कर्मठ मिमांसक प्रयोगशील, स्वाभिमानी, सत्यनिष्ठ, अहिंसावादी, धर्मप्रिय, अभ्यासू, चिकित्सक व्यक्तिमत्त्व. २ ऑक्टोंबर १८६९ ला जन्मलेले भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी हे विसाव्याशतकातील जागतिक पातळीवरचे महान व्यक्तिमत्व कॉंग्रेसचेच राष्ट्रीय नेते नव्हते तर संपूर्ण भारताचे राष्ट्रीय नेते होते. म. गांधीचे योगदान विचार कृती त्यांनी केलेले सत्याचे प्रयोग यासर्व बाबींचे प्रतिबिंब जनसामान्यांच्या मनावर खोलवर आजतागयत रु जलेले दिसून येते. त्यांच्या विचारांचा पगडा भारतीय राजनितीवर एवढा मोठा होता की त्यांना त्यांचे समकालीन व्यक्ति महात्मा या उपाधीने गौरवांकीत संबोधनाने संबोधित करीत असत. ६ जुलै १९४४ ला नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी सर्वप्रथम रंगुन रेडीओ स्टेशनवरुन म. गांधी यांचा उल्लेख राष्ट्रपिता असा केलेला आढळून येतो तर महात्मा महान.असा आत्मा हा सन्मानसूचक शब्द सर्वप्रथम राजवैद्य जीवराम कालीदास यांनी आपल्या संबोधनात वापरलेला, व्यक्त केलेला आढळतो. महात्मा, राष्ट्रपिता आणि बापू या तीन सन्मानसंचक शब्दातूनच त्यांचे कर्तृत्व उजागर होते. म. गांधी यांना त्यांच्या जन्म-मृत्यु ऐसा त्यांचे भारतीय स्वातंत्र्य लढयातील योगदान, त्यांची आंदोलने, सत्याग्रह, सत्य, अहिंसा, शांती, स्वदेशी, स्वराज्य, ग्रामविकास, स्वच्छता, प्रेम, शिक्षण, समाजसेवा, भूतदया, बंधुता, अस्पृश्यता, निर्मुलन, गरीबी निर्मुलन, सांप्रदायिक ऐक्य, राष्ट्रीय पुर्ननिर्माण, प्रौढशिक्षण, ग्रामोद्योग, महिला , कृष्ठसेवा, आदिवासी विकास, इत्यादी विषयावर फक्त चिंता व्यक्त न करता त्या विचारावर अनुसरण सुध्दा जीवनभर केलेले दिसून येते. म. गांधीचे व्यक्तीमत्वच मुळात एक चालते बोलते विद्यापीठ होते.

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya,Amravati

Scanned with CamScanner

Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

CERTIFICATE

ISSN 2278-9308

Impact Factor 7.675 (SJIF)

This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs./Ms. डॉ.ओमप्रकाश बोबडे

Of डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

has published a paper on समाजशास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर

Peer Reviewed International Research Journal B.Aadhar Issue no, 249. Published on Dated 1, October - 2020.

Prof. Virag Gawande
Director
Aadhar Social Research &
Development Training Institute,
Amravati

Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya,Amravati

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO249 (CCXLIX)
ISSN : 2278-9308
October, 2020

समाजशास्त्रज्ञ डॉ.बाबासाहेब आंबेडकर

डॉ.ओमप्रकाश बोबडे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

सारांश :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अर्थतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, कायदेपंडीत, संविधान निर्माते तर होतेच याचबरोबर समाजातील विविध घटकांचा समाजाचा सखोल अभ्यास केलेला असल्यामुळे तसेच समाजातील विविध समस्यांची, प्रश्नांची जाणीव त्यांना असल्यामुळे व त्या समस्या, प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी केलेले शास्त्रशुद्ध प्रयत्न पाहता डॉ.बाबासाहेब उच्चकोटीचे समाजशास्त्रज्ञ ठरतात. त्यांनी समाजातील विविध प्रश्नावर आपले सडेतोड विचार जगासमोर मांडलेत. शिका, संघटीत व्हा आणि आपल्या मानविय अधिकारासाठी संघर्ष करा असा मोलाचा संदेश दिला. विविध प्रसंगी बाबासाहेबांनी सामाजिक परिवर्तनासाठी वृत्तपत्राचे संपादन, संप, सत्याग्रह, आंदोलने इत्यादी आयुधांचा जीवनभर उपयोग केलेला दिसून येतो. सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षणाचे महत्त्व त्यांनी जाणले होते. म्हणूनच सामाजिक परिवर्तनाचा मूलाधार शिक्षण हेच असे ते म्हणत असत. समाजाची रचना स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व यावर आधारीत असली पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. न्याय्य समाजव्यवस्था हा बाबासाहेबांच्या सामाजिक चिंतनाचा मुख्य विषय होता. डॉ.बाबासाहेबांनी लोकशाही समतामूलक मूल्ये आणि समाजवादी मूल्ये यांची सांगड घालण्याचा जीवनभर प्रयत्न केलेत. सामाजिक अभ्यासाच्या दृष्टीने त्यांचा 'ॲनहिलेशन ऑफ कास्ट' हा महत्त्वाचा ग्रंथ होय. त्यांची समाजविषयक तळमळ, समाजोन्नती विषयक विचार, त्यांनी समाज विकासासाठी खर्ची घातलेले जीवन मार्गी लावलेले सामाजिक प्रश्न पाहता डॉ.बाबासाहेब आंबेडकर ही केवळ व्यक्ती नसून समाजसुधारणेचा विचार आहे हे स्पष्ट होते आणि त्यांच्या संपूर्ण परिवर्तनवादी सामाजिक कार्याचा आढावा घेतला असता डॉ.बाबासाहेब एक थोर समाजचिंतक, समाजशास्त्रज्ञ होते हे सिद्ध होते.

"मला विचाराल तर माझा आदर्श समाज म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वावर आधारीत समाज असेल" – डॉ.बाबासाहेब आंबेडकर. स्वातंत्र्य, समता व बंधुता या संदर्भात डॉ.बाबासाहेबांनी वरील मत ॲनिहिलेशन ऑफ कास्ट या ग्रंथात उद्धृत केले आहे. तत्कालीन परिस्थितीत उद्धृत केलेले भाष्य आज सद्यपरिस्थितीत सुद्धा अगदी तंतोतंत लागू पडते.

सद्यस्थितीत सर्वसांमान्य माणसाचे, कष्टकरी मजुराजे, शेतकऱ्याचे जगणे पाहिले तर डॉ. बाबासाहेबांनी सरकार कडून व्यक्त केलेली अपेक्षा आजही वाजवीच दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत. तसेच डॉ.बाबासाहेब हे प्रख्यात कायदेपंडित, समाजशास्त्रज्ञ, नामवंत, शिक्षणतज्ञ, उत्कृष्ट संसदपटु, संपादक, समाज क्रांतीकार, अर्थशास्त्रज्ञ, स्वातंत्र्य भारताचे प्रथम कायदामंत्री, उत्कृष्ट लेखक होते. प्रामुख्याने डॉ.बाबासाहेबांनी आपले विचार सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि धार्मिक घटकांवर मांडलेत. हे जरी खरे असले तरी डॉ.बाबासाहेबांनी कृषी क्षेत्रावर वा शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी व्यक्त केलेले विचार पाहून डॉ.बाबासाहेब हे जणजाति दर्जाचे कृषीतज्ज्ञ ठरतात. वस्तुतः त्यांच्या नावासमोर लावाव्यात तेवढ्या उपाधी कमीच पडतील एवढं मोठं त्यांचं उत्तुंगं व्यक्तिमत्त्व होतं. ते सार्वभौम, स्वाभिमानी व्यक्तिमत्त्वाचे होते. सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब अर्थशास्त्राचे अभ्यासक व प्राध्यापक अर्थशास्त्रातील पदव्यामुळेच डॉ.बाबासाहेब प्रख्यात सिडनहॅम महाविद्यालयात प्राध्यापक झाले होते. डॉ. बाबासाहेबांनी अर्थशास्त्राअतर्गत बी.एस.सी., पी.एच.डी., डी.एस.सी., एम.एस.सी. ह्या पदव्या प्राप्त केल्या होत्या. डॉ.बाबासाहेबांचा शिकविण्याचा मुख्य विषय राजकीय अर्थशास्त्र हा होता. डॉ.बाबासाहेबांनी आर्थिक संशोधनाअंतर्गत "ॲडमिनिस्ट्रेशन ॲंड फायनांस ऑफ दी ईस्ट इंडिया कंपनी", "डिव्हॅल्युएनशन ऑफ

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya,Amravati

Scanned with CamScanner

INDEX

No.	Title of the Paper	Authors' Name	Page No.
1	उत्तम कांबळे यांच्याकथांमधील समाजदर्शन	प्रा.डॉ.विवेक कमलाकर खरे	1
2	स्वामी विवेकानंदांचा युवकांना एकाग्रतेचा संदेश.	डॉ.ओमप्रकाश बोबडे	5
3	भारतातील शेतकऱ्यांची चळवळ आणि कारणीभुत घटक	डॉ.दामोदर दुधे	8
4	संत गाडगे बाबा	सहा. प्रा. प्रफुल ढोके	12
5	मराठी भाषिक (पत्रकारीतेतील) कोरोना	प्रा. डॉ. राजेश चवरे	15
6	राष्ट्रसंतांच्या प्रबोधन कार्यात संगीताची भूमिका	प्रा. डॉ. ज्वाला नागले	21
7	कोरोना आणि मानसिक आरोग्य	प्रा.डॉ.मंगला अजाबराव कडवे	27
8	भारतीय शेतीव्यवसायाच्या आधुनिकतेच्या वाटचालीतील अडचणी	प्रा. डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे	31
9	कोरोनाकाळातील आदिवासींचे जीवन	डॉ.सतिश हरलाल पारधी	35
10	राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शैक्षणिक विचार	चोपराम लक्ष्मण गडपायले /डॉ.अमोल मांडेकर	39
11	महारांचा इतिहास	प्रा. डॉ. राजेंद्र ज. कांबळे	44
12	वैवाहिक जीवनातील स्वास्थाकरिता जोडीदाराची विवेकी निवड	डॉ. माधुरी झाडे	47
13	ग्रामपंचायतमधिल निर्वाचित महिला प्रतिनिधींची ग्रामविकासात भुमिका	डॉ. मनोज श्रीकृष्णराव पवार	53
14	गर्भवती व दुग्धसृजन करणाऱ्या स्त्रियांकरिता पोषक आहाराची भूमिका	प्रा.रंजना अ. नक्षिणे	57
15	शिक्षणतज्ञ लोकमान्य टिळकांची राष्ट्रीय शिक्षणाबाबत विचार आणि कार्यसंपदा – एक अभ्यास	प्रा. डॉ.सौ.वंदना राजेश शिदि	61
16	नव्या कृषी कायदया विषयी शेतकऱ्यांच्या मताचे अध्ययन	प्रा.डॉ. प्रशांत रा. देशमुख	70
17	भारतीय अर्थव्यवस्थेतील बदलाचा देशातील व्यवसायावर झालेला परिणाम	प्रा.डॉ.जयंत डी.पोरे	74
18	सार्वजनिक आरोग्य संदर्भ covid १९:– कोरोना महामारीमुळे महिलांच्या स्वास्थ्यावर होणारा परिणाम.	प्रा. नितु जि. शेंडे	77
19	''श्रावणधारा''(१९७०)	डॉ.सी.एस.राणे	82

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Asurvali

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 270 (CCLXX)
ISSN : 2278-9308
January, 2021

स्वामी विवेकानंदांचा युवकांना एकाग्रतेचा संदेश

डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे
इतिहास विभाग प्रमुख डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

सारांश :

स्वामी विवेकानंदाचे व्यक्तिमत्त्व मानवातीत पुरुषोत्तम स्वरुपाचे होते. त्यांच्या उदात्त वाणीने त्यांनी असंख्य लोकांच्या, तरुणांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणलेले आहे. तरुणांच्या व्यक्तिमत्त्वाला एक सकारात्मक नवीन दृष्टी दिली. त्यांची प्रतिभा प्रगल्भ होती. त्यांनी विविध विषयावर वेळोवेळी तत्कालीन परिस्थितीत समस्त भारतीयांना स्फुर्तीदायक आणि शक्तिशाली विचाराने प्रेरित केले होते व आजही केलेले आहे. स्वामी विवेकानंदांनी तरुणांना दिलेला एकाग्रतेचा संदेश हा प्रत्येक क्षेत्रांत काम करणाऱ्या तरुणाकरिता मोलाचा व प्रेरणादायी आहे. तसाच तो कोणताही व्यवसाय करणाऱ्या करीता ही आवश्यक आहे असे स्वामी विवेकानंद म्हणत असत. तरुणांस जर यश हवे असेल तर त्यांनी मनाची एकाग्रता ठेवूनच कार्य करावयास हवे. मनाची एकाग्रत राखण्याचे उपाय देखील स्वामीजींनी स्पष्ट केलेले दिसून येतात. श्रद्धा आणि प्रेम याद्वारा साधली जाणारी एकाग्रता ही स्वाभाविक स्वरुपाची असते असे स्वामीजी म्हणत असत. पापी आणि दुष्ट विचारापासून दूर राहिल्यास मनाची एकाग्रता सहज निर्मित होते असेही स्वामीजी म्हणत असत. अंततः सर्व प्रकारच्या ज्ञानाचा पाया एकाग्रता असल्याने स्वामी विवेकानंदांनी तरुणांना एकाग्र होवून कर्म (कार्य) करण्याचा, अध्यापन करण्याचा मोलाचा संदेश दिलेला दिसून येतो.

12 जानेवारी हा युवक दिन. हा दिवस नरेन्द्रनाथ दत्त उफ स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिवस स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिवस स्वामी विवेकानंद तरुणांचे आदर्श होते. आजही आहेतच. स्वामी विवेकानंदांनी भारतीय संस्कृती अंतर्गत ज्ञान, साधना, सेवा, मनाची एकाग्रता याविषयी मोलाचा संदेश तत्कालीन तरुणांना दिलेला आहे. तो संदेश आजही तेवढाच महत्त्वाचा दिसून येतो जेवढा की तो तत्कालीन तरुणांसाठी होता. स्वामी विवेकानंद म्हणत असत "एकाग्रता हा सर्व प्रकारच्या ज्ञानाचा पाया आहे." तिच्या अभावी काहीच करता येणार नाही. युवकांनी सतत अध्ययनशील असले पाहिजे तें जे काही शिकत आहेत ते त्यांनी मनाच्या एकाग्रतेने आत्मसात केले पाहिजे. सद्यःस्थितीत भारतीय युवा वर्ग भरकटलेला दिसून येतो अनेक तरुण एकाग्रतेच्या अभावी ज्ञान साधनेच्या मार्गातून भटकून समाज विघातक कार्यात गुंतलेले दिसून येतात. आजचा तरुण व्यसनाच्या आहारी गेलेला दिसून येतो. ज्ञानाअभावी, अनेक वाईट सवयी, व्यसने भारतीय तरुणांना जडलेली दिसून येतात. तरुण वयातच आत्महत्या करण्याचे प्रमाण सुद्धा वाढलेले दिसून येते. आजचे युवक आपल्या मातृभूमिला काळीमा फासणारे कृत्य करणारे दिसून येतात. एकाग्रतेच्या विचारधनाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा होय. स्वामी विवेकानंदांचे विचार आजही भारतीय युवकास प्रेरक व मार्गदर्शक ठरणारे आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात अखिल भारतीय समाजाला योग्य दिशा देवून राष्ट्रहितासाठी स्वामीजींनी प्रेरित केले होते. त्यांची प्रखर ज्ञानसाधना, अत्यंत उच्च कोटींचे विचार यांची अनुभूती झाल्यावर महाराजा अजीतसिंग खेत्री यांनी नरेन्द्रनाथ दत्तास 10 मे 1883 रोजी स्वामी विवेकानंद हे नाव दिले. सुमारे 39 वर्षे जगलेल्या स्वामींनी भारतातच नव्हे तर भारताबाहेर सुद्धा आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर नवयुवकांमध्ये जागृती निर्माण केली होती. स्वामी विवेकानंद एक विद्वान, जाणकार, ज्ञानोपासक, प्रखर वक्ते होते. बौद्धिक क्षेत्रात स्वामी विवेकानंद जेवढे तरबेज होते तेवढेच ते कुस्ती, तलवारबाजी, व्यायाम या प्रकारात पारंगत होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वगुण संपन्न होते. स्वामीजींचा स्वभाव हसतमुख होता. त्यापेक्षाही स्वामीजी प्रखर आणि प्रचंड देशाभिमानी होते. संन्यास स्वीकारल्यावर स्वामीजींनी भारतभर भ्रमण केले. त्यांनी भारतीय आणि पाश्चात्य संस्कृतीचा अभ्यास केलेला होता. स्वामीजींना भारतीय जनतेस विशेषतः तरुण वर्गास प्रेरित करुन

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

April -2021

ISSUE No- (CCLXIX) 285







Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 285 (CCLXXXV)
ISSN : 2278-9308
April, 2021

महाराष्ट्राच्या तिसऱ्या महिला धोरणाची फलश्रुती : एक आढावा

डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,अमरावती.
मो.नं. ९८६०८८२४५६ Email:omprakashbobade@gmail.com

सारांश :

महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असून महाराष्ट्राला पुरोगामी, सामाजिक व राजकीय सुधारणांची प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. असंख्य विभूतींनी महाराष्ट्राची जडणघडण केलेली आहे. त्याचाच परिपाक म्हणजे आजची महाराष्ट्रीयन स्त्रियांची प्रगती व उन्नती होय. स्त्री विकासास हातभार लावणाऱ्या चळवळी ह्या महाराष्ट्राच्या भूमीतच विकसीत झालेल्या दिसून आल्यात. विविध स्त्रीविषयक चळवळीची जन्मभूमी महाराष्ट्र राज्यच होय. महाराष्ट्रातील काही ज्ञान व अज्ञात स्त्री समाजसुधारकांनी विविध चळवळींच्या, समाजसुधारणेच्या माध्यमातून स्त्रियांच्या विकासास हातभार लावलेला दिसून येतो. याचीच पुढची पायरी म्हणजे शासकीय स्तरावरून राबविण्यात येणारी धोरणे होत. विविध शासकीय धोरणांचे प्रेरणास्थान हे विविध ज्ञान–अज्ञात समाजसुधारकच होत. म्हणूनच महाराष्ट्र सरकारने आजपर्यंत तीन महिलाविषयक धोरणे राबविलीत. तिसरे महिला धोरण अत्यंत सकारात्मक व उपक्रमशील धोरण ठरले. या तिसऱ्या महिला धोरणामुळेच महिला सक्षमीकरणच्या प्रक्रियेला महाराष्ट्राच्या भूमीत चालना मिळाली. महिलांना शासकीय स्तरावरून दिलासा–आधार मिळाला. समाजाचा एक परिपूर्ण आणि समान घटक म्हणून स्त्रीस समान स्थान प्राप्त व्हावे यासाठी हे तिसरे धोरण अत्यंत प्रभावशाली ठरले. शासनाने 2001 हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून जाहीर केले होते. फक्त महिला सक्षमीकरण वर्ष साजरे केल्याने किंवा जाहिर केल्याने महिलांना सर्वांगिण विकास होतच असे नाही. त्यासाठी अनेक उपक्रम शासकीय पातळीवर एन.जी.ओ. पातळीवर राबवायचे असतात. त्याशिवाय महिला सक्षमीकरण होत नसते. स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटीत करण्याची क्षमता, मतप्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपक, आर्थिक व्यवहार इत्यादी करण्याची क्षमता व आवड–निवड निर्माण होणे यास महिला सक्षमीकरण म्हणतात. अशी युनोने केलेली व्याख्या आहे. मुळात सक्षमीकरण ही प्रक्रिया उपेक्षित आणि वंचित घटकांशी निगडीत असते. समाज विकासाच्या प्रक्रियेत जे घटक बाजूला किंवा वंचित राहिलेत, विकासापासून दूर राहिलेत. ज्यांच्यावर समाजबंधने, गुलामगिरी लादण्यात आली. त्या सर्व वंचितांना (वंचित घटकांस) मानवी हक्क मिळवून देण्याची प्रक्रिया म्हणजेच सक्षमीकरण होय. विविध शासकीय धोरणाद्वारा, योजनाद्वारा महिलांना सक्षमीत केले जात आहे. त्याचाच एक भाग म्हणजे राज्य महिला धोरणे होत. विकासामध्ये महिलांची सहभागीता वाढावी यासाठी आजपर्यंत तीन धोरणे राज्य स्तरावर आखण्यात, राबविण्यात आलीत. सन 1994 मध्ये तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांच्या पुढाकाराने पाहिले. महाराष्ट्र राज्याचे महिला धोरण राबविण्यात आले. महिलांच्या विकासासाठी राज्य स्तरावर धोरण बनविणारे महाराष्ट्र हे पहिले आणि पुरोगामी राज्य ठरले. या महिलांचे धोरण आखणीत महाराष्ट्रातील तमाम महिला संघटनांनी सहभाग घेतलेला होता असे दिसून येते. या धोरण राबविण्याने महाराष्ट्रात महिला सक्षमीकरणात बरीच प्रगती झालेली दिसून आल्यामुळे सन 2001 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांचे नेतृत्वाखाली दुसरे राज्य महिला धोरण राबविण्यात आले. किंवा तयार केले होते. या दोन्ही धोरणामुळे महिलांना प्रगतीकरिता अनेक चांगले निर्णय झालेले दिसून येतात. काही चांगली सकारात्मक योजनाही राबविण्यात आलेल्या दिसून येतात. अनेक चांगले उपक्रम राबवून महिलाविषयक दृष्टीकोनाला सकारात्मक दिशा लाभलेली दिसून येते. दुसरे धोरण जाहीर होऊन 12 वर्षे झाल्यावर काळानुरुप व न्यायाच्या अधिक जवळ

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

Scanned with CamScanner

Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

May -2021

ISSUE No- (CCLXX) 292







Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr.Dinesh W.Nichit
Principal
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

Executive Editor:
Dr.Sanjay J. Kothari
Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collag
Chandur Bazar Dist. Amravati

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

B.Aadhar International Peer-Reviewed Indexed Research Journal | ISSN : 2278-9308
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 285 (CCXCII) | May 2021

अचलपूर शहर परिसरातील इमादशाहीकालीन वास्तू अवशेष

डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती.
मो.नं. 9860882456 Email:omprakashbobade@gmail.com

सारांश :

अचलपूर हे प्राचीन शहर असून या शहराच्या नगररचनेचा विकास मध्ययुगीन कालखंडात झालेला दिसून येतो. सन 1050 पासून 1947 पर्यंतच्या कालखंडात विविध शासकांनी अचलपूर शहरावर शासन केल्याचे आढळून येते. अशा सत्तांपैकीच एक सत्ता इमादशाहीची होती. इमादशाही घराण्याचे वऱ्हाड प्रांतावर सुमारे 90 वर्ष शासन होते. इमादशाहींची मुलकी राजधानी अचलपूर शहर असून लष्करी राजधानी ही गाविलगड होती. इमादशाही शासकांनी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अशी विभागणी केल्याचे दिसून येते. इमादशाहीचा कालखंड हा इ.स.1490 ते 1572 हा जरी असला तरी इमादशाहीचा संस्थापक फतह-उल्ला-इमादशहा हा बहमनी सुलतानांकडून वऱ्हाडावर इ.स.1471 पासून शासन करीत होता. त्याचेच कारकिर्दीत विविध वास्तूंची निर्मिती अचलपूर परिसरात झालेली दिसून आली. त्याचेद्वारा निर्मित वास्तुंमध्ये प्रामुख्याने किल्ले, किल्ल्यांची तटबंदी, सराया, धर्मशाळा, धार्मिक वास्तू (मशिदी, दर्गे, कबर, मकबरे व प्रशासकीय भवन) व पाणीपुरवठा करणाऱ्या नळयोजना इत्यादींचा समावेश होतो. प्रशासकीय इमारती आज सद्यस्थितीत अचलपूर येथील जुन्या किल्ल्याचा आलमगीर चौकातील एकमात्र बुरुज आढळून आला आहे. तोही सर्व बाजूंनी अतिक्रमणाच्या विळख्यात सापडलेला आहे. इतर सर्व वास्तू फक्त भग्नावशेष स्वरुपात दिसून आल्यात. नळयोजना नादुरुस्त आढळून आली. गाविलगडच्या पायथ्याशी असणाऱ्या गावामधील इमादशाहीकालीन सर्व वास्तू सुद्धा भग्नावशेष स्वरुपात आढळून आल्यात. बारवांचे अस्तित्व सुद्धा नष्ट होतांना दिसून आले. या सर्व इमारती निर्मिती स्थानिक काळ्या पाषाणातूनच केलेली आढळून आली. अचलपूर हे ऐतिहासिक शहर आहे. ऐतिहासिक पर्यटन वाढिस लागावे यासाठी विविध कालखंडात निर्मित वास्तूंचे जतन करुन पर्यटनास चालना द्यावयास हवी. ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून अचलपूर शहराचा विकास होणे गरजेचे दिसून आले. अंततः इमादशाही कालीन अत्यंत मोलाचा वास्तू अवशेषाचा ऐतिहासिक वारसा नष्ट होईल यात शंका नाही. शासकीय स्तरावरुन त्याचे जतन व संरक्षण करणे गरजेचे दिसून आले.

अचलपूर शहराचा ऐतिहासिक परिचय :

अचलपूर शहराला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. अचलपूर शहाराला स्वतःचा राजकीय वारसा असून मध्यकालीन एक प्रमुख राजकीय केंद्र तसेच शहर असल्यामुळे या शहराची स्वतंत्र अशी संस्कृती निर्माण झाली होती. या शहराची आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशी स्वतंत्रपणे वैशिष्ट्ये विकसित झाली होती. मध्ययुगातील संपूर्ण वैशिष्ट्ये तथा प्रवृत्तींनी युक्त असे संपूर्ण विकसित केंद्र म्हणजे अचलपूर शहर होते. महाराष्ट्र राज्यातील विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूर हे ऐतिहासिक शहर तसेच प्राचीन संस्कृतीचे एक केंद्र. अचलपूरचा अक्षवृत्तीय व रेखवृत्तीय विस्तार अनुक्रमे 210160 उ. ते 770330 पू. दरम्यान आहे. तसेच समुद्रसपाटीपासून 1200 फुटावर उंच आहे. सांप्रत अमरावती या जिल्ह्याच्या ठिकाणापासून 30 मैल (50 कि.मी.) उत्तरेस असून शहराचे क्षेत्रफळ 8 चौरस

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

Scanned with CamScanner

7

CERTIFICATE

OF PARTICIPATION

डॉ. ओमप्रकाश सां. बोबडे

Has successfully contributed and published a paper entitled here with

अचलपूर शहरातील प्रमुख वीरगळ

In an

International Peer Reviewed & Refereed

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

Principal
Dr. Babasaheb Ambedkar

Dr. Yashpal D. Netragaonkar
Editor in Chief for S R Journal's

ISSN 2319-4766 SJIF 2021 = 7.380 APRIL - JUNE 2021 VOLUME 10/ISSUE 51

Scanned with CamScanner

Lok Shikshan Sanstha, Waroda's

LOKMANYA MAHAVIDYALAYA, WARORA

Dist.Chandrapur (Maharashtra)

Affiliated to

Gondwana University, Gadchiroli (Maharashtra)

CERTIFICATE

This is to certify that Dr./Mr./Mrs. डॉ. ओमप्रकाश सा. बोबडे *of* डॉ. बाबासाहेब आंबेडकर महा., अमरावती. *has attended One-Day National E-Seminar on "Recent Trends in Modern History" organized by Department of History, Lokmanya Mahavidyalaya, Warora, Dist.Chandrapur on 05 June 2021, Saturday.*

He/She has presented a paper entitled अचलपूर शहरातील प्रमुख वीरगळ *and published in an International Peer Reviewed and Referred Journal, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies, Impact Factor - 7.380, ISSN 2319-4766.*

Dr. Dipak P. Lonkar
Convener & Head, Dept. of History
Lokmanya Mahavidyalaya, Warora

Dr. Subodh Kumar Singh
Principal & Chief Organizer
Lokmanya Mahavidyalaya, Warora

Dr. Babasaheb Ambedkar

Scanned with CamScanner

अचलपूर शहरातील प्रमुख वीरगळ

डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती. मो.नं. 9860882456
Email : omprakashbobade@gmail.com

सारांश

महाराष्ट्र राज्यातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूर हे एक प्रसिद्ध ऐतिहासिक शहर. प्राचीन संस्कृतीचे एक केंद्र तसेच हे शहर मध्ययुगीन बेरार (वर्हाड प्रांत) प्रांताच्या राजधानीचे शहर. अचलपूर शहरावर प्राचीन कालखंडापासून ते मध्ययुगापर्यंत विविध शासकांनी शासन केले. विविध घराण्याचे शासन अचलपूर शहरावर होते. अशाच विविध घराण्यातील वीरांच्या स्मृतींबाबत अचलपूर शहरात वीरगळ कोरलेला दिसून येतात. प्रामुख्याने अस्तित्वात असलेल्या वीरगळ ह्या मुसलमानपूर्व काळातील आहेत. त्यांची निर्मिती ही राष्ट्रकुट ते यादव या कालखंडातील असून त्या वीरगळ ह्या काळ्या पाषाणात आयताकृती तसेच एकाच बाजुने कोरलेल्या आहेत. तर काही वीरगळ ह्या सतराव्या व अठराव्या शतकातील दिसून आल्यात. या वीरगळींमध्ये सतीशिळांचा सुद्धा समावेश होतो. प्रसिद्ध प्राचीन श्री.अमिनाथ मंदिर परिसरातील वीरगळ ह्या सुस्थितीत असून त्यांना देव्हार्यात स्थान दिलेले दिसून येते. या स्मृतीशिळांना शेंदूर व चूना माखलेला दिसून येतो. वीरगळच्या सर्व प्राप्त लक्षणांनी अचलपूर येथील वीरगळ परिपूर्ण आहेत. या वीरगळीवर सुर्य, चंद्र, ढाल, तलवार, घोडा व कुत्रा ही अंकने आहेत. श्री अमिनाथ मंदिर परिसर वगळता इतरत्र अचलपूर शहरातील वीरगळ भग्नावस्थेत आहेत व अस्ताव्यस्त पडलेल्या आहेत. स्थानिक नागरिक आपल्या गतवैभवाविषयी अनभिज्ञ दिसून येतात. नागरिकांमध्ये वीरगळच्या इतिहासाबाबत उदासिनता दिसून येते. या वीरगळींच्या संरक्षणासाठी तसेच जतनासाठी शासकीय स्तरावरून प्रयत्न करणे गरजेचे दिसून येते. अचलपूर शहरातील वीरगळ सुबक, सुंदर व रेखीव असून त्यांच्या जतनासाठी सामुदायिक प्रयत्न करणे सुद्धा गरजेचे असून त्यांच्या जतनासाठी संग्रहालय निर्मित करून पर्यटनास चालना द्यावयास हवी. पर्यटन स्थळ म्हणून ऐतिहासिक अचलपूर शहराचा विकास झाल्यास स्थानिक नागरिक स्वतःच्या इतिहासाबाबत व गौरवशाली वास्तूबाबत, वीरगळबाबत जागरुक होतील व शासकीय तसेच सामाजिक सहभागीतेच्या माध्यमातून ऐतिहासिक स्थळांचा विकास साधण्यात मदत करतील यात शंका नाही. सारांशतः विदर्भात सुद्धा वीरगळचे अस्तित्व आहे. किंबहुना वीरगळ विदर्भात सुद्धा आहेत हे अचलपूर शहरातील प्रमुख वीरगळवरून दिसून येते

अचलपूर शहराचा ऐतिहासिक परिचय : अचलपूर शहराला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. अचलपूर शहाराला स्वतःचा राजकीय वारसा असून मध्यकालीन एक प्रमुख राजकीय केंद्र तसेच शहर असल्यामुळे या शहराची स्वतंत्र अशी संस्कृती निर्माण झाली होती. या शहराची आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशी स्वतंत्रपणे वैशिष्ट्ये विकसित झाली होती. मध्ययुगातील संपूर्ण वैशिष्ट्ये तथा प्रवृत्तींनी युक्त असे संपूर्ण विकसित केंद्र म्हणजे अचलपूर शहर होते. महाराष्ट्र राज्यातील विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूर हे ऐतिहासिक शहर तसेच प्राचीन संस्कृतीचे एक केंद्र. अचलपूरचा अक्षवृत्तीय व रेखवृत्तीय विस्तार अनुक्रमे 210160 उ. ते 770330 पू. दरम्यान आहे. तसेच समुद्रसपाटीपासून 1200 फुटावर उंच आहे. सांप्रत अमरावती या जिल्ह्याच्यां ठिकाणापासून 30 मैल (50 कि.मी.) पश्चिमेस असून शहराचे क्षेत्रफळ 8 चौरस मैल आहे. शहराच्या मध्यातून सापण व बिच्छन नद्या वाहतात. नद्यांच्या काठी अनेक ऐतिहासिक स्थळांचा विकास झालेला दिसून येतो. शहराच्या पूर्वेस चांदूर बाजार, दक्षिणेस अमरावती, पश्चिमेस अकोट, धारणी ही तालुक्याची शहरे असून उत्तरेस मध्यप्रदेशातील बैतुल जिल्ह्याची सिमा लागून आहे. अचलपूर या सांस्कृतिक केंद्राला पौराणिक धर्मस्थळापासून तर आधुनिक काळातील इंग्रजांच्या राजवटीपर्यंत स्वतंत्र अस्तित्व होते व आहे ही पौराणिक काळामध्ये रामायणाच्या किष्किंधा कांडामध्ये वर्णित ऋष्यमुक पर्वताचा भाग म्हणजे आजच्या अचलपूर क्षेत्राचीच ओळख होय. तसेच हा दंडकारण्याचा प्रदेश म्हणून सुद्धा पुराणामध्ये वर्णित आहे. शंकराचे ज्येष्ठ पुत्र कार्तिक यांनी केलेल्या घोर तपस्येने ही भूमी कार्तिकेयाची भूमी म्हणूनही ओळखली जाते. प्रारंभापासून अचलपूर शहर ह विदर्भातील प्रमुख प्रसिद्ध शहर असून हे बेरारच्या राजधानीचे शहर होते. महाभारताच्या कालावधीमध्ये ही भूमी भगवान श्रीकृष्णाच्या पदस्पर्शाने पावन झाल्याची आख्यायिका आहे. नलदमयंतीच्या प्रेमकहाणीमुळे सुद्धा ही भूमी प्रसिद्ध आहे. प्राचीन मौर्य साम्राज्याच्या अंतर्गत ही भूमी अशोक राज्याच्या 272 ते 231 इ.स. पूर्व अप्रत्यक्ष अंमलात होती. प्राचीन मौर्य साम्राज्याच्या अस्तानंतर ही भूमी रुद्रदामन राज्याच्या अंमलाखाली आली. वाकाटक आणि राष्ट्रकुटाच्या काळामध्ये ही भूमी भोजकट राज्याचा भाग होती. भोजकट हे राज्य जहागिरी स्वरुपाचे होते. त्यानंतर पुलकेशि-प्रथमच्या कालावधीत हा भाग चालुक्य राज्याचा अंतर्गत भाग होता. पुढे चालुक्यांच्या पतनानंतर या भूमीवर यादवांचे अधिपत्य प्रस्थापित झाले. सन 1058 मध्ये अचलपुरला इल नावाचा जैनधर्मिय राजा राज्य करीत होता. त्याने दुल्हा रहमान गाजी सोबत युद्ध केले. युद्धात दोघांचा मृत्यु झाला. ईल राजाची सत्ता संपुष्टात आली. 12 व्या शतकात अचलपूर येथे देवगीर यादवांचा

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

Scanned with CamScanner

Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL
March 2021
Special Issue 261(B)

Use of ICT in Teaching - Learning
Opportunities and Challenges



Guest Editor of the Issue :-
Dr. P. D. Hudekar
Act. Principal
Vidarbha Mahavidyalaya, Buldana
Dist – Buldana [M.S.] INDIA

Executive Editor of the Issue :-
Prof. Sangita K. Pawar
Vidarbha Mahavidyalaya, Buldana

Chief Editor : Dr. Dhanraj T. Dhangar

Co Editors of the Issue :-
Prof. Vaibhao G. Waghmare
Prof. M. T. Jamaiwar
Prof. S. H. Dandade
Prof. N. D. Raut
Prof. I. R. Shirale
Prof. S. V. Kalne
Shri. S. G. Pande

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Scanned with CamScanner

29	माहिती तंत्रज्ञानाची शिक्षणातील उपयुक्तता जाणीव जागृती	प्रा. गोकुल डामरे	133
30	माहिती साक्षरतेमध्ये महाविद्यालयीन ग्रंथालयाची भूमिका	प्रा.निलेश राउत	140
31	अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाची उपयुक्तता व महत्त्व	डॉ.अंजली पांडे	143
32	उच्च शिक्षणात माहिती तंत्रज्ञान उपयुक्तता व महत्त्व	प्रा. दिनेश ढगे, डॉ. सतीश राणे	151
33	अध्ययन व अध्यापनात माहिती संप्रेक्षण तंत्रज्ञाची (ICT) भूमिका	सौ. हर्षदा वाघोने	154
34	संगीत क्षेत्रात माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व व उपयोगिता	डॉ.सुनिल पटके	157
35	माहिती तंत्रज्ञान, वृत्तपत्रे आणि मराठी भाषेची उपयोगिता	डॉ. अविनाश मेश्राम	160
36	नवीन शैक्षिणिक धोरण व माहिती व तंत्रज्ञांनाची भूमिका	प्रा.पी.पी. सानप	165
37	माहिती व तंत्रज्ञानाच्या युगातील ग्रंथालयात कन्साॅरशियाचे महत्त्व	डॉ. कविता इंगळे	167
38	शिकवणे आणि शिकण्यामध्ये माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर : संधी आणि आव्हाने	डॉ. नंदकिशोर राऊत	171
39	शिक्षण क्षेत्रातील माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाची भूमिका : फायदे व तोटे	डॉ. विष्णू गुमटकर	175
40	माहिती तंत्रज्ञान आणि शिक्षण	श्री.विलास टाले	179
41	अध्ययन व अध्यापनात माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाची उपयुक्तता व महत्व	डॉ.लक्ष्मण शिराळे	184
42	अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत - माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा उपयोग व समस्या	प्रा. मुनेश्वर जमईवार	190
43	ब्लेंडेड लर्निंग - उच्च शिक्षणात अपेक्षित आधुनिक अध्यापन पद्धती	डॉ. ओमप्रकाश बोबडे	194
44	ऑनलाइन शिक्षणाचे फायदे व तोटे	पुरुषोत्तम चाटे	197
45	माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा शिक्षकाला होणारा उपयोग- एक अभ्यास	डॉ.पी. डी. हुडेकर	200
46	कोव्हिड -१९ च्या लॉकडाऊनमुळे क्रीडा व शारीरिक शिक्षणामध्ये विविध तंत्रज्ञान शिकविण्यासाठी इंटरनेटचा उपयोग	प्रफुल्ल वानखेडे	207
47	अध्ययन अक्षमता आणि दृकश्राव्य माध्यम - एक अभ्यास	डॉ. सौ. माधुरी देशमुख	210
48	विविध क्षेत्रामध्ये माहिती तंत्रज्ञानाची उपयुक्तता	प्रा.सीमा कालने	214
49	संगीत शिक्षणावर तंत्रज्ञानाचा परिणाम	डॉ.मृणाल कडू	217
50	ग्रामीण भागात अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत माहिती तंत्रज्ञानाच्या संधी व आव्हाने	प्रा. सुधीर बनुबाकोडे	220
51	अध्ययन व अध्यापनात शैक्षणिक तंत्रज्ञानाचे महत्त्व	मनोहर चौधरी	224
52	शिक्षणात आंतरजालाचा वापर	प्रा. सागर दांदगे	229
53	तंत्रज्ञान आणि शिक्षण प्रक्रियेत झालेला बदल	डॉ.कामिनी मामर्डे	232
54	अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत माहिती व तंत्रज्ञानाची उपयुक्तता व महत्त्व	डॉ. सौ. आरती खडतकर	235
55	अध्ययन व अध्यापन माहिती तंत्रज्ञानाची उपयुक्तता	प्रा.कविता किर्दक	238
56	पारंपरिक अभ्यासक्रमात माहिती व तंत्रज्ञानाची गरज	प्रा.संगीता पवार	240
57	शिक्षा में सूचना व संचार प्रौद्योगिकी उपयुक्तता व महत्त्व	डॉ. शाहेदा मुनाफ	243
58	शारीरिक शिक्षामें सूचना तंत्रज्ञान का महत्त्व	डॉ. कैलास पवार	246

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 261 (B) : Use of ICT in Teaching - Learning
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March 2021

ब्लेंडेड लर्निंग-उच्च शिक्षणात अपेक्षित आधूनिक अध्यापन पद्धती

डॉ.ओमप्रकाश बोबडे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती
मो.९८६०८८२४५६
E-mail : omprakashbobade@gmail.com

ब्लेंडेड लर्निंग (मिश्रीत शिक्षा) पद्धती ही एक महत्त्वपूर्ण औपचारिक शिक्षण पद्धती आहे. या शिक्षा पद्धती मध्ये आधूनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून अध्यापन करणे तसेच पारंपरिक वर्ग अध्यापन या दोघोंचा मिश्रित स्वरुपात समावेश होतो. शिक्षण पद्धतीत परिवर्तन होणे ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. उच्च शिक्षणातील अध्यापनात विविध प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजीचा व टेक्नीक्सचा उपयोग करून आधुनिक पद्धतीने अध्यापन प्रक्रिया करणे काळाची गरज झालेली आहे. किंबहुना आधुनिक इलेक्ट्रॉनिक टेक्निकलचा उपयोग आधूनिक युगातील ज्ञानार्जन प्रक्रियेचा अविभाज्य आणि अनिवार्य अंग झालेला आहे. तसेच परंपरागत शिक्षण पद्धती सुद्धा तेवढीच विद्यार्थी विकासासाठी गरजेची आहे. ई–लर्निंग द्वारा विद्यार्थ्यांचा विविध आधूनिक टेक्निक द्वारा सर्वांगिण विकास होण्यास मदत होते. व्यक्तिगत आवडी–निवडीनुसार विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतो. अनेक संकल्पना स्पष्ट होण्यासाठी आधूनिक ई–लर्निंग पद्धती महत्त्वाची आहे. परंतु याचा अर्थ असाही नाही की आपण परंपरागत शिक्षण पद्धतीचा पूर्ण त्यागच करावा. या दोहोंचा परंपरांचा सुवर्णमध्य म्हणजे ब्लेंडेड लर्निंग (मिश्रीत शिक्षण पद्धती) होय. ब्लेंडेड लर्निंग पद्धतीमध्ये उच्च शिक्षण घेत असलेले विद्यार्थी आधूनिक ई–लर्निंग टेक्नॉलॉजी आणि टेक्निक तसेच परंपरागत शिक्षण पद्धती द्वारा परस्पर सहयोगाने उपलब्ध साधनाद्वारा आणि तज्ज्ञ मार्गदर्शनात निरंतर शिक्षण घेतात असे दिसून आल्यामुळे आधूनिक उच्च शिक्षणात ब्लेंडेड लर्निंग ही शिक्षण पद्धती अपेक्षित आधूनिक अध्यापन पद्धती ठरते.

शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेत सतत व निरंतर परिवर्तन होत असतात. वेळोवेळी शैक्षणिक मूल्यांमध्ये, अभ्यासक्रमामध्ये, शिक्षण पद्धतीमध्ये आणि शैक्षणिक साधनांमध्ये बदल होत असतात. उच्च शिक्षणात तर सतत परिवर्तन होत असते. मात्र उच्च शिक्षणात गुणात्मक बदल परिवर्तन आणण्याची जबाबदारी ही प्राध्यापकांवरच असते परंतु ही सर्व जबाबदारी त्यांना विविध अध्यापन पद्धती द्वाराच पार पाडावी लागते. अशातच परंपरागत शिक्षण पद्धती बरोबर उच्च शिक्षणात होणाऱ्या परिवर्तनानुरूप आधूनिक विविध तंत्रज्ञानाचा उपयोग करीत विद्यार्थ्यांना शिक्षा प्रदान करावी लागते. आधूनिक तंत्रज्ञानावर आधारीत संसाधनाचा अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत उपयोग करून घ्यावा लागतो. परंपरागत शिक्षण पद्धती बरोबर आधूनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून, संसाधनाचा उपयोग करून सर्वांगिन विद्यार्थी विकास साधावा लागतो. शिक्षण क्षेत्रातील निरंतर परिवर्तनाचा एक परिणाम म्हणजे ब्लेंडेड लर्निंग पद्धती होय. ब्लेंडेड म्हणजे मिश्रित. या पद्धतीमध्ये पारंपरिक शिक्षण पद्धती बरोबरच आधूनिक टेक्नॉलॉजी आणि टेक्निक्स (ज्मबीदवसवहल – ज्मबीदपुनमे) ने परिपूर्ण संसाधनाचा वापर करून शिक्षण देणे याबाबीचा समावेश होतो. ब्लेंडेड लर्निंग ही संकल्पना सर्वप्रथम २००६ मध्ये बॉक आणि ग्राहम द्वारा लिखित पुस्तकामध्ये मांडलेली आहे. ब्लेंडेड लर्निंग मध्ये मिश्रित शिक्षण पद्धतीचा विद्यार्थी उपयोग करीत असल्याने विद्यार्थ्यामध्ये वैयक्तिक पातळीवर शिक्षण घेण्याची स्वायत्तता प्राप्त होते. ई–लर्निंग द्वारा उच्च शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थी स्वयंअध्ययनाकडे वळलेले दिसून येतात. उत्कृष्ट साधनांची निवड कशी करावी त्यांचा उपयोग शिक्षणात कसा करावा याबाबत विद्यार्थ्यामध्ये पात्रता निर्माण होते. परंपरागत शिक्षण पद्धतीच्या तुलनेत ई–लर्निंग मध्ये विद्यार्थ्यास अधिक स्वतंत्रता प्राप्त होते यामुळे विद्यार्थ्याची अध्ययन

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati
Scanned with CamScanner

Impact Factor - 0.241 | Special Issue - II June 2021 | ISSN 2250 - 0383

Itihas Sankalan Patrika

SHODHANKAN

International Half Yearly
Peer Reviewed Referred
Research Journal

Special Issue on

Ancient Indian Iconography & Architecture

Organized by

Sarda Education Society (Trust)'s
(A Linguistic Minority Educational Institute)

SMT RADHABAI SARDA
ARTS, COMMERCE &
SCIENCE COLLEGE
ANJANGAON SURJI - 444705,
DIST - AMRAVATI (Maharashtra)
(Affiliated to Sant Gadge Baba Amravati
University, Amravati)

Executive Editor
Dr Nitin Ulhasrao Saraf

Guest Editor
Dr Arvind Sontakke

Guest Publisher
Dr Bashisth Choubey
Principal

Scanned with CamScanner

SHODHANKAN International Half Yearly Peer Reviewed & Refereed Research Journal | ISSN – 2250-0380
Impact Factor – 0.241 | JUNE 2021
Special Issue – II, Ancient Indian Iconography and Architecture.

INDEX

Sr. No.	Article Name	Author	Pg. No.
1	सिंधू संस्कृती कालीन मूर्तिकला	डॉ. गिरिधर नागोराव सोमवंशी	12
2	सातगाव भुसारी येथील मूर्ती शिल्प : एक चिकित्सक अभ्यास	डॉ किशोर मारोती वानखडे	14
3	मथुरा आणि गंधार कलाशैलीतील बुद्ध मूर्तीकलेच्या वैशिष्ट्यांचा तौलनिक अभ्यास	प्रा. डॉ. लता सुभाष मोरे (सुरवाडे)	18
4	छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकिल्ल्यांवरील शिवालये	डॉ मधुकर व्ही जाधव	21
5	खान्देशातील दुर्लेक्षित मुर्ती	श्री महेश सुरेश जोशी	25
6	अंबाजोगाईच्या योगेश्वरी मंदिरावरील वैनायकीची प्रतिमा	प्रा. डॉ. देवर्षी मुकुंद अरविंद	27
7	परभणी जिल्ह्यातील नृसिंह मंदिरे	श्री नागेश सखारामपंत जोशी	30
8	महाराष्ट्रातील किल्ले निदर्शक विरगळ	श्री अनिल किसन दुधाने	34
9	जैन धर्मातील मानस्तंभ एक अभ्यास	सौ छाया नितीन जिंतूरकर.	41
10	अष्टविनायक - स्थापत्य कला आणि मूर्तीकला यांचा मिलाफ	प्रा. दिपक हिंदूराव तडाखे	44
11	सिंधुकालीन मूर्तीकला	प्रा. डॉ. मंजूषा ह. धापूडकर	46
12	सुधागड तालुक्यातील ठाणाळे (लीपा) लेणी	डॉ एस व्ही पाथरकर	49
13	जीर्ण किंवा खंडित झालेल्या मूर्तींचा वज्रलेप	श्री उमाकांत नागजीभाई राणिंगा	51
14	महाराष्ट्रातील दुर्लक्षित सतीशिळांचा चिकित्सक अभ्यास	प्रा. विकास भानुदास टकले	54
15	जेजुरीगड (गडकोट) खंडोबा मंदिर वास्तु व शिल्पकलेचा अजोड नमुना - एक अभ्यास	डॉ वंदना राजेश शिंदे	57
16	बळसाने, ता.साक्री , जि .धुळे येथील विरगळ एक अभ्यास	श्री ओजस बोरसे	62
17	मंदिर स्थापत्यातील सुरसुंदरींचे महत्व	डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे	66
18	मराठवाड्यातील प्राचीन मंदिर स्थापत्य	प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने	68
19	वेताळवाडी किल्ल्यावरील द्वारशिल्पे	प्रा. डॉ. दीपक शिरसाठ प्रा डॉ प्रशांत देशमुख	71
20	वीरगळ इतिहासाचे अबोल साक्षीदार	डॉ उर्मिला क्षीरसागर	76
21	अचलपूर शहरातील भग्न मूर्तीशिल्पे	डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे	78
22	इतिहासाचे मूक साक्षीदार - वीरगळ	डॉ.प्रल्हाद अ. कुलकर्णी	81
23	नांदेड जिल्ह्यातील मातृदेवता मूर्तीचा अभ्यास :एक अवलोकन	डॉ राजाराम रा पिंपळपल्ले	84
24	विदर्भातील भंडारा परिसरातील जैन प्रतिमा	प्रा. डॉ. संजय गोपाळराव ठवळे	87
25	बुद्धकालीन मुर्तीकला	प्रा. डॉ. सारिका विष्णु केदार	90
26	गणेश प्रतिमांचे प्रकार	प्रा. शोभा राजेंद्र भिकाने	93
27	श्री चक्रधरांची प्रणितातीरावरील भ्रमंती मार्गावरील मंदिरे व मुर्तीशिल्प	प्रा. डॉ. श्रीहरी रंगनाथराव पितळे	96
28	पश्चिम विदर्भातील बालाजी मंदिरे	प्रा. डॉ. सिद्धार्थ शिवाजी वाठोरे	99
29	कंधार येथील क्षेत्रपाल: ऐतिहासिक अवलोकन	सिंधू निवृत्ती लोणकर	102
30	विष्णू मूर्ती ओळख	प्रा. स्मिताल रावसाहेब मोरे	104
31	येरगी गावातील मूर्तीशिल्प	श्रीमाला के.जी.	108
32	हूपरीची ग्रामदेवता श्री अंबाबाई	डॉ सुप्रिया चंद्रशेखर खोले	110
33	सिंधू संस्कृतीकालीन मूर्ती शास्त्राचा अभ्यास	कु. सानिया सर्फराजखान पठाण	3

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

Scanned with CamScanner

SHODHANKAN International Half Yearly Peer Reviewed & Refereed Research Journal | ISSN – 2250-0380
Impact Factor – 0.241 | JUNE 2021
Special Issue – II, Ancient Indian Iconography and Architecture.

अचलपूर शहरातील भग्न मूर्तीशिल्पे

डॉ.ओमप्रकाश सा. बोबडे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती.
Email:omprakashbobade@gmail.com

सारांश :

अचलपूर हे प्राचीन शहर असून या शहराच्या नगररचनेचा विकास मात्र मध्ययुगीन कालखंडात झालेला आढळून येतो. तसेच पूर्व मध्यकालीन विविध राजकीय सत्तेचे सुद्धा अचलपूर हे एक प्रमुख केंद्र होते. कलचुरी, राष्ट्रकुट यांच्या कारकिर्दीत अचलपूर हे प्रमुख सांस्कृतिक केंद्र झाले होते. हिंदू व जैन धर्मातील विविध मंदिरांची व मूर्ती शिल्पांची निर्मिती ही मूसलमान पूर्व कालखंडातच झालेली दिसून येते. भग्नमूर्ती शिल्पे, मूर्ती ह्या अचलपूर शहरात सर्वत्र आढळून येतात. विशेषतः भग्न मूर्तीशिल्पे बिच्छण व सापण नदीच्या काठावर व काठावरील मंदिरांमध्ये आढळून आलीत. अचलपूर शहरातील भग्न मूर्तीशिल्पे, मूर्ती ह्या अत्यंत सुरेख, रेखीव, आकर्षक व सुंदर आहेत. ही शिल्पे प्रामुख्याने काळ्या कडप्या दगडामध्ये तसेच स्थानिक प्राप्त काळ्या पाषाणामध्ये कोरलेली आहेत. श्री.अमिनाथ मंदिर परिसर व जिल्हापरिषद हायस्कूल परिसरातील श्री हनुमान मंदिरातील भग्नशिल्पे, टक्कर चौकातील श्री भगवान महावीर मंदिर परिसरातील जैन मूर्तीशिल्पे ही भग्न जरी असली तरी सुंदर व सुरेख आहेत. मध्ययुगीन कालखंडातील मुसलमानी आक्रमणास बळी पडू नये म्हणून तत्कालीन लोकांनी/भाषिकांनी मातीच्या ढिगाच्या खाली, विहीरीमध्ये तसेच नदीमध्ये दडपून/लपवून ठेवली ती मूर्तीशिल्पे आज भग्न स्वरुपात आढळून आलीत. या भग्न मूर्ती शिल्पाच्या संरक्षणाकरिता जनतेला सामुदायिक व शासकीय स्तरावरून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

अचलपूर शहराचा ऐतिहासिक परिचय :

अचलपूर शहराला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. अचलपूर शहाराला स्वतःचा राजकीय वारसा असून मध्यकालीन एक प्रमुख राजकीय केंद्र तसेच शहर असल्यामुळे या शहराची स्वतंत्र अशी संस्कृती निर्माण झाली होती. या शहराची आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशी स्वतंत्रपणे वैशिष्ट्ये विकसित झाली होती. मध्ययुगातील संपूर्ण वैशिष्ट्ये तथा प्रवृत्तींनी युक्त असे संपूर्ण विकसित केंद्र म्हणजे अचलपूर शहर होते. महाराष्ट्र राज्यातील विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूर हे ऐतिहासिक शहर तसेच प्राचीन संस्कृतीचे एक केंद्र. अचलपूरचा अक्षवृत्तीय व रेखवृत्तीय विस्तार अनुक्रमे 210160 उ. ते 770330 पू. दरम्यान आहे. तसेच समुद्रसपाटीपासून 1200 फुटावर उंच आहे. सांप्रत अमरावती या जिल्ह्याच्या ठिकाणापासून 30 मैल (50 कि.मी.) उत्तरेस असून शहराचे क्षेत्रफळ 8 चौरस मैल आहे. शहराच्या मध्यातून सापण व बिच्छन नद्या वाहतात. नद्यांच्या काठी अनेक ऐतिहासिक स्थळांचा विकास झालेला दिसून येतो. शहराच्या पूर्वेस चांदूर बाजार, दक्षिणेस अमरावती, पश्चिमेस अकोट, धारणी ही तालुक्याची शहरे असून उत्तरेस मध्यप्रदेशातील बैतुल जिल्ह्याची सिमा लागून आहे. अचलपूर या सांस्कृतिक केंद्राला पौराणिक धर्मस्थळापासून तर आधुनिक काळातील इंग्रजांच्या राजवटीपर्यंत स्वतंत्र अस्तित्त्व होते व आहे ही पौराणिक काळामध्ये रामायणाच्या किष्किंधा कांडामध्ये वर्णित ऋष्यमुक पर्वताचा भाग म्हणजे आजच्या अचलपूर क्षेत्राचीच ओळख होय. तसेच हा दंडकारण्याचा प्रदेश म्हणून सुद्धा पुराणामध्ये वर्णित आहे. शंकराचे ज्येष्ठ पुत्र कार्तिक यांनी केलेल्या घोर तपस्येने ही भूमी कार्तिकेयाची भूमी म्हणूनही ओळखली जाते. प्रारंभापासून अचलपूर शहर ह विदर्भातील प्रमुख प्रसिद्ध शहर असून हे बेरारच्या राजधानीचे शहर होते. महाभारताच्या कालावधीमध्ये ही भूमी भगवान श्रीकृष्णाच्या पदस्पर्शाने पावन झाल्याची आख्यायिका आहे. नलदमयंतीच्या प्रेमकहाणीमुळे सुद्धा ही भूमी प्रसिद्ध आहे.

प्राचीन मौर्य साम्राज्याच्या अंतर्गत ही भूमी अशोक राज्याच्या 272 ते 231 इ.स. पूर्व अप्रत्यक्ष अंमलात होती. प्राचीन मौर्य साम्राज्याच्या अस्तानंतर ही भूमी रुद्रदामन राज्याच्या अंमलाखाली आली. वाकाटक आणि राष्ट्रकुटाच्या काळामध्ये ही भूमी भोजकट राज्याचा भाग होती. भोजकट हे राज्य जहागिरी स्वरुपाचे होते. त्यानंतर पुलकेशि-प्रथमच्या कालावधीत हा भाग चालुक्य राज्याचा अंतर्गत भाग होता. पुढे चालुक्यांच्या पतनानंतर या भूमीवर यादवांचे अधिपत्य प्रस्थापित झाले. सन 1058 मध्ये अचलपुरला इल नावाचा जैनधर्मिय राजा राज्य करीत होता. त्याने दुल्हा रहमान गाजी सोबत युद्ध केले. युद्धात दोघांचा मृत्यु झाला. ईल राजाची सत्ता संपुष्टात आली. 12 व्या शतकात अचलपूर येथे देवगीर यादवांचा मांडलिक म्हणून रामदरणा याचा तत्कालीन एलिचपूर येथे राज्यकारभार होता. सन 1312 च्या फेब्रुवारी महिन्यामध्ये अल्लाउद्दीन खिलजी ने अचलपूर शहर जिंकले. अल्लाउद्दीन खिलजीच्या वतीने अचलपूर शहराचा प्रशासक म्हणून कुतुबुद्दीन अल्वी याची नेमणूक केली होती. अचलपूर शहराचा सर्वप्रथम मुस्लिम प्रशासक कुतुबूद्दीन अल्वी होय. सन 1339 मध्ये खेरला येथील गोंड राजा नरसिंग देव याने अचलपूर शहर जिंकून घेतले मात्र राज्यकारभार केला नाही. इ.स. 1490 च्या सुमारास बहामनी सत्तेचा वऱ्हाड प्रांताचा सुभेदार फतेउल्ला इमाद-उल-मुल्क याने बेरार या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. पुढे हे घराणे 82 वर्ष टिकले. सन 1574 नंतर इमादशाही नष्ट झाली. सन 1632 नंतर अचलपूर शहरावर मुगलांचा अप्रत्यक्ष अंमल. हैद्राबादच्या निजामाचा मुळ पुरुष याचा उदयही अचलपूर येथेच झाला. अचलपूरच्या स्वतंत्र नबाब घराण्याचा उदय त्यात इस्माईखानपन्ही. सलाबतखान. नामदारखान हे राज्यकर्ते पुरुष प्रसिद्ध त्यांच्याच राज्यकारभारामध्ये अचलपूरच्या स्थापत्याचा विकास. असा स्पष्ट उल्लेख सेंट्रल प्रोव्हिन्सेस डिस्ट्रीक्ट गॅझेटियर्स, अमरावती डिस्ट्रीक्ट 1911 या ग्रंथामध्ये येतो. सन 1853 पर्यंत अचलपूर शहर हैद्राबादच्या निजामाच्या राज्याचा भाग होते. निजामाचे अधिकारी स्थानिक प्रशासन चालवित असत. सन 1853 मध्ये निजामाने कर्जापोटी फेडिस्तव आणि तैनाती फौजेच्या पगारापोटी वऱ्हाड प्रांत (अचलपूर शहरासहित) इंग्रजाजवळ अनामत म्हणून ठेवल्यामुळे अचलपूर शहर अप्रत्यक्ष इंग्रजांच्या ताब्यात होते. सन 1853 ते 31.08.1905 [illegible] शहरासहीत वऱ्हाड प्रांत कायम पटट्याने इंग्रजांकडे तसेच सन 1867 पासून 31.08.1905 पर्यंत अचलपूर या शहाराला [illegible]

Principal
Dr. Babasaheb Ambedkar
Mahavidyalaya, Amravati

Scanned with CamScanner

डॉ. बाबासाहेब आंबेडकर : काळाच्या पलीकडील महापुरुष



॥ प्रकाशक व मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. अंजनकुमार सहाय

श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचालित

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती, महाराष्ट्र – ४४४ ६०६

॥ सहयोगी संपादक

प्रा. शुद्धोधन कांबळे

॥ सहायक संपादक

डॉ. पी. जी. राठोड

डॉ. वर्षा गावंडे

Scanned with CamScanner

पत्रकार तथा आदर्श संपादक डॉ. बाबासाहेब आंबेडकर

डॉ.ओमप्रकाश बोबडे
डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सामाजिक क्रांती प्रवाहाचे कृतीशील विचारवंत व नेते होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारीता ही प्रामुख्याने लोकपत्रकारीता होती. पत्रकारीता हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे हे बाबासाहेब जाणून होते. वृतपत्र हे अमोघ अस्त्र आहे याची त्यांना जाणीव होती. समाज प्रबोधन हा पत्रकारितेचा मुख्य हेतू होता. बाबासाहेबांची पत्रकारीता ही समाजाभिमुख होती. तसेच समाज परिवर्तनासाठी होती. बाबासाहेबांच्या पत्रकारीतेचा समाज परिवर्तन, समाजसुधारणा हाच मुख्य हेतू दिसून येतो. संपादक म्हणून त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्वाचे आहे. त्यांनी पत्रकारीतेच्या माध्यमातून भारतातील दीन-दलित व अस्पृशांच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक तसेच राजकिय जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी तसेच सामजिक पुनरर्चनेसाठी व बहूजनांच्या मनात स्वाभिमान जागृत करण्यासाठी त्यांनी तमाम भ्रारतीयांना वृतपत्राच्या माध्यमातून सुशिक्षित होण्याच्या सल्ला दिला. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी निर्भीड पत्रकारिता ही लोकपत्रकारीता डॉ. बाबासाहेबांनी निर्भीडपणे, निस्वार्थपणे आजीवन केलेली दिसून येते. मानवी समाजाचे ऐक्य लोकपत्रकारीतेला अभिप्रेत असते असे बाबासाहेब म्हणत असत. स्वातंत्राचा हक्क, सामाजिक विषमता आर्थिक सामाजिक विषमता, अस्पृश्याना समान वागणूक,विविध सामाजिक, राजकिय, सांस्कृतिक विचार त्यांनी आपल्या लिखाणातून मांडलेले दिसून येतात. शेवटी बाबासाहेबांनी दलित, बहुजनांच्या उद्धारासाठी व्यक्त केलेले विचार व विचारानुसार दिलेले योगदान पाहून डॉ. बाबासाहेब उच्च कोटीचे पत्रकार व संपादक ठरतात.

लोकतत्व : लोकसाहित्याचा पर्याय

डॉ. पंडित जी. राठोड
मराठी विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
अमरावती, जि. अमरावती

Research Paper - Marathi

प्रस्तावना

'लोकतत्व' ही संकल्पना स्पष्ट करताना डॉ.रा.चिं. ढेरे लिहितात— 'लोकसाहित्य हे लोकमानसाच्या सर्व अंगांचे अभिव्यंजन करतें. त्यांत लोकसंस्कृति पूर्णशाने प्रतिबिंबित झालेली असते. लोकसाहित्याचा लोकसंस्कृतीशी इतका घनिष्ठ संबंध आहे की, ती दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजूंसारखी आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यतचे जीवनसंस्कार, सण—ठत्सव, यात्रा—जत्रा, कला—क्रिडा, देव—धर्म या लोकजीवनाच्या सर्व अंगाशी लोसाहित्याचा अविच्छत्र संबंध आहे. अभिजात साहित्य किंवा नागर साहित्य हे लोकसाहित्याच्या अपेक्षेने समाजजीवनाशी तितके संबंद्ध नाही. अभिजात साहित्य किंवा नागर साहित्य हे नागर संस्कृतीचे एक अंग आहे तर लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीचे सर्वस्व आहे, तसे नागर साहित्य नागर संस्कृतीचे समग्र दर्शन घडवू शकणार नाही.

लोकसाहित्य हे लोकजीवनाला गवसणी घालणारे असल्यामुळे, त्यात लोकांच्या भाव—भावना इच्छा—आकांक्षा सुख—दु:ख, श्रद्धा—धारणा, राग—द्वेष, आचार—विचार अनावृत्त स्वरुपांत व्यक्त होत असल्यामुळे अभिजात साहित्याला त्याच्यापासून जीवनरस प्राप्त करणे शक्य होते. त्याचमुळे आपणास या दोन्ही प्रकारच्या साहित्यांची तौलनिक पाहणी करता असे दिसून येते कि अभिजात साहित्यात लोकसाहित्याचे आणि तन्मूलक लोकतत्त्वाचें (थ्वसा म्समउमदजे) उपादान आढळल्यावाचून राहत नाही.'

लोकतत्व : लोकसाहित्याचा पर्याय:

'लोकतत्त्व' ही संज्ञा लोकसाहित्याचा पर्याय म्हणून सुध्दा वापरली जाते असे डॉ.रा.चिं. ढेरे प्रारंभीच्या काळात म्हणत होते. त्याचा हा दाखला— 'संत साहित्य' ही संज्ञा जशी 'संतसंस्कृती' चे द्योतक घडविण्यासाठी योजलेली आहे, त्याचप्रमाणे

CamScanner

'लोसाहित्य' ही संज्ञाही 'लोकसंस्कृती'चे द्योतन घडविण्यासाठीच वापरलेली आहे. आज आपण 'लोकसाहित्य' हा शब्द इंग्रजीतील 'फोकलोअर' (थ्वसासवतम) या इंग्रजी शब्दाचा मराठी पर्याय म्हणून वापरतो. वास्तविक 'फोकलोअर' याचा अर्थ लोकविद्या, लोकविषयक आणि लोकप्रचलित बाबींच्या अभ्यासाचे शास्त्र असा होईल. साहित्य हा शब्द मराठीत 'ललित वाङ्.मय' (Imaginative or Creative Literature) या अर्थाने प्रतिष्ठत झालेला असल्याने 'लोकसाहित्य' हा शब्दही लोकनिर्मित ललित वाङ्.मय' असा अर्थ सुचविणार, हे उघड आहे. परंतु अनेक अभ्यासकांनी आता 'लोकसाहित्य' हा शब्द 'फोकलोअर' चा मराठी पर्याय म्हणून स्वीकारलेला असल्यामुळे, ही परिभाषेची संदिग्ध ाता सध्या तरी पत्करूनच पुढे जायला हवे. वास्तविक 'फोकलोअर' चा लोकविद्या' हा पर्याय अधिक अन्वर्थक आहे.

'लोक' हा शब्द इंग्रजी 'फोक (थ्वसा) चा पर्याय आहे. पण मराठीतील 'लोक' हा शब्द इंग्रजी 'फोक' पेक्षा अधिक व्यापक आहे. त्याच्यामागे वेदकालापासूनच्या परंपरेने लाभलेली व्यापक आशयाची बैठक आहे. प्राचीन भारतीय वाङ्मयात 'लोक' हा शब्द अनेक वार 'वेदा'च्या सापेक्षतेने वापरलेला आढळतो.

'लोकतत्त्व' ही संज्ञाही मी 'लोकसाहित्या' चा पर्याय म्हणून वापरली आहे. 'पुरातत्त्व' ही संज्ञा जशी 'पुराणवस्तूसंशोधनशास्त्र'साठी आता सर्रास रूढ झोलेली आहे, तशीच 'लोकतत्त्व'ही संज्ञाही 'लोकसाहित्य' साठी रूढ व्हायला काही हरकत नाही.'

लोकतत्त्व : परंपरेच्या प्रवाहाचे प्रकट रूप :

पुरातत्त्व आणि लोकतत्त्व ह्या दोन संकल्पनांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करताना डॉ.रा.चिं.ढेरे लिहितात— 'या परंपरेच्या प्रवाहाचे प्रकट रूप आजच्या लोकजीवनात तर संचारलेले असतेच, परंतु कालच्या वाङ्मयातही रसरशीतपणे उमटलेले असते. यालाच मी लोकतत्त्व म्हणून संबोधतो. लोकगंगेचे गोठून खंडित झालेले प्रवाह पुरातत्त्व पाहते, तर तिचे अखंड वाहते रूप लोकतत्त्वाला दिसते. पुरातत्त्व पुरातन वस्तू—वास्तूचे जडत्व दवडू शकत नाही, मौन मोडू शकत नाही; परंतु लोकतत्त्वाच्या संजीवक स्पर्शाने भूतकालाची जडता निखळून पडते, त्याच्या कणाकणात तरल चैतन्य थरथरू लागते, त्याच्या मौनाला सहस्त्र जिव्हा फुटतात! आणि म्हणूनच पुरातत्त्वाने लोकतत्त्वाशी मैत्री साधली पाहिजे, असे मला वाटते.

डॉ. वासुदेवशरण अग्रवाल या महामनीषीचे लेखन वाचताना मला पुरातत्त्व आणि लोकतत्त्व यांच्या अनुबंधाचे महत्त्व एकसारखे जाणवत राहते. 'प्रत्यक्षदर्शी

लोकनां सर्वदर्शी भवेन्नरः।' या महर्षी व्यासांनी गर्जून सांगितलेल्या महामंत्राने त्यांनी जीवनभर अनुष्ठान केले आणि ज्ञानाच्या समप्रतेने भान जिज्ञासूंना घडविले.

१९७१ मध्ये महाराष्ट्रातील एका उत्खननात पुरातत्त्वज्ञांना उपलब्ध झालेल्या काही वस्तूंच्या संदर्भात मला वासुदेवशरणांच्या लोकतत्त्वज्ञ दृष्टीने महत्त्व पुन्हा एकदा प्रकर्षाने प्रतीत झाले, पुरातन लोकजीवन समजावून घेण्यात त्या पुरातत्त्वीय पुराव्यांचे नेमके महत्त्व काय, हे लोकतत्त्वाच्या आश्रयावाचून उलगडणार नाही, असे मला वाटले. या दृष्टीने, वासुदेवशरणांच्या पाऊलखुणांना शरण जाऊन पुढील काही विचार जाणत्यापुढे मांडण्याचे साहस केले आहे.'

लोकतत्त्व : लोकसंस्कृती दर्शन :

लोकतत्त्वाचा संबंध लोकसंस्कृतीशी आहे. लोकतत्त्वाचे नाते लोकपरंपरेशी आहे. ही बाब स्पष्ट करताना डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात– 'वाङ्मय निर्मात्याला ज्यावेळी लोकसमाजाचे आणि लोकसंस्कृतीचे दर्शन घडवायचे असते त्यावेळी समाजात प्रचलित असलेल्या लोकसाहित्याचा त्याला स्वीकार करावा लागतो. एवढेच नाही तर लोकसंस्कृतीचे दर्शन घडविण्याचा त्याचा हेतू नसतानाही त्याच्या निर्मितीत लोकसाहित्यातील काही भाग नकळत प्रकट होणे उपरिहार्य असते. कोणताही वाङ्मयनिर्माता समकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणात जीवन जगत असतो त्याच्या व्यक्तिमत्त्वाची घडण लोकपरंपरेने केलेली असते. त्यामुळेच त्याच्या अनुभवविश्वाचा आविष्कार होत असताना लोकतत्त्वे (थ्वसा मसमउमदजे) प्रकट होत असतात.'

लोकतत्त्व : लोकसंकेत :

लोकतत्त्वीय सामुग्रीत समाविष्ट घटकांबद्दल डॉ. प्रभाकर मांडे लिहितात– 'ललित वाङ्मयात अनेकदा लोकतत्त्वीय सामग्री आलेली असते. समाजामध्ये रूढ असलेले विधी, आचारविचार, शुभाशुभ कल्पना, शकुनापशकुनाच्या कल्पना इत्यादी कितीतरी लोकसाहित्यासंबंधीची सामग्री वाङ्मयात विखुरलेली आहे.'

लोकतत्त्व : रसडोळसता :

लोकतत्त्वीय अभ्यासाने रसिक अधिक रसडोळस होतो असे विधान करीत डॉ. तारा भावळकर म्हणतात– 'संत नामदेवांचाच नव्हे, तर सर्वच संतवाङ्मयाचा, प्राचीन आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा अभ्यास लोकतत्त्वीय अभ्यासाअभावी अपुरा ठरेल. ही जाणीव नव्याने होत आहे. ही जाणीव मराठी सारस्वताच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. लोकतत्त्वीय अभ्यासाने रसिक अधिक रसडोळस होतो. संतवाङ्मय हे लोकवाङ्मयाचीच नव्हे, तर समग्र लोकसंस्कृतीची प्रेरणा घेऊन जन्माला आले आहे.'

CamScanner

लोकतत्त्व : त्रिकाल प्रभाव :

पुढे त्या लिहितात—'नामदेवाच्या 'बालक्रीडा' — पदांतून घडणाऱ्या लोकसंस्कृतीचे हे समग्र दर्शन नव्हे, हे प्रारंभी स्पष्ट केलेच आहे. परंतु अशा प्रकारच्या लोकतत्त्वीय दृष्टिकोनामुळे साहित्याचे आकलन अधिक सखोल आणि व्यापक होण्यास मदत होतेच, पण आपल्याच जीवनात आजही विद्यमान असलेल्या अनेक रूढी—कल्पनांचे, चाली—रीतींचे गुंतवळे उलगडण्यास मदत होते. जीवन एकीकडे बदलत असते हे जरी खरे असले, तरी त्याची काही मुळे आदिमतेत पक्की रुजलेली असल्याचेही भान येते आणि आपलेच जीवन आपण अधिक डोळसपणे पाहू शकतो. लोकतत्त्वीय दृष्टीमुळे केवळ 'भूता' चाच उलगडा होतो असे नव्हे तर भूताचा वर्तमानाशी असलेला अनुबंध स्पष्ट होतो. आणि भविष्याचाही डोळस वेध घेण्यास मदत होते.

सतांच्या वाङ्मयातील लोकतत्त्वीय घटकांमुळे संतवाङ्मय प्रभावी ठरले, वर्तमानातही ते वेध लावते आणि भविष्यातही त्याची मोहिनी संपणार नाही, याची खात्री पटते.

लोकतत्त्व : लोकपरंपरागत आविष्कार :

डॉ. प्रभाकर मांडेच्या शब्दांचे अनुसरण करीत डॉ. सौ. अनिता मुजुमदार लिहितात—'वाङ्मयनिर्माता जेव्हा लोकाभिमुख असतो त्यावेळी त्याला समाजातील पारंपरिक बाबींशी आपल्या निर्मितीचा अनुबंध कायम राखावा लागतो. वाङ्मयनिर्माता समकालीन सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणात जीवन जगत असतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाची घडण लोकपरंपरेने केलेली असते. त्यामुळे त्याच्या अनुभवाचा आविष्कार होत असताना त्यात लोकतत्त्वे (थ्वसा म्समउमदजे) प्रकट होत असतात.'

लोकतत्त्व : लोकाभिमुख भुमिका :

याच संदर्भात पुढे त्या लिहितात— 'प्राचीन मराठी संत साहित्याची निर्मिती ही लोकाभिमुख भूमिकेने प्रामुख्याने लोकांसाठीच केली गेली असल्यामुळे लोकभाषेतून झाली. समाजातील पारंपारिक लोकाभिव्यक्तीच्या माध्यमातून झाली. कथाकथन, प्रवचन, कीर्तन गीतगायन, आदी तत्कालीन रूढ लोकप्रकटन संस्थाचा तिने आधार घेतला आणि त्याला अनुरूप अशी वाङ्मय निर्मिती केली. अशा प्रकारे लोकभाषेतून, लोकमाध्यमांच्या आधारे, लोकाभिमुख भूमिकेतून महाराष्ट्रातील वाङ्मय निर्मात्यांनी विशेषत: संतांनी वाङ्मयनिर्मिती केली असल्यामुळे त्यातून लोकतत्त्व अवतरले.'

लोकतत्त्व : काही विशेष:

प्राचीन मराठी वाङ्मयाच्या संदर्भात काही लोकतत्त्वीय विशेषांची मांडणी

डॉ. सौ. अनिता मुजुमदार यांनी केली ती अशी–

१. प्राचीन मराठी वाङ्मयावर पुराणांचा फार मोठा प्रभाव आहे.

२. प्राचीन मराठीवाङ्मयनिर्मित्यांनी वाङ्मयनिर्मिती करताना पुराणसरणीचा अंगीकार केला आहे.

३. सर्वसाधारणपणे वक्ता–श्रोता–संवादाची सरणी प्राचीन मराठी वाङ्मयात दिसून येते.

४. कथात्मक वाङ्मय किंवा गीतरचना याकडे सश्रद्ध भाविकतेने पाहण्याची भूमिका दिसून येते व त्याची पारलौकिक आणि इहजीवनाच्या संदर्भात काही फलश्रुती असते अशी धारणा आहे.

५. समाजजीवनातील परंपरेने चालत आलेल्या लोकप्रकटनसंस्थांचा फार मोठा प्रभाव प्राचीन मराठी वाङ्मय निर्मित करणाऱ्यांवर व त्यांच्या वाङ्मयनिर्मितीवर पडलेला दिसतो.

६. प्राचीन मराठी साहित्यात पारंपरिक कथाचे त्याचप्रमाणे निरनिराळया लोककथाप्रकाराचे व लोकगीत व लोकगीतांचे उपयोजन केलेले आहे.

७. लोकाभिमुख भूमिका स्वीकारलेल्या प्राचीन मराठी संतकवींनी केवळ लोकभाषेतूनच निर्मित केली नाही तर पारंपरिक छंदांचा व गीतप्रकारांचा अंगीकार केला व आपली रचना केली.

८. प्राचीन मराठी वाङ्मयात लौकिक गीतांची एक समृद्ध आणि विविधपूर्ण परंपरा असून तिच्यांत लोकगीतांची अनेक स्वरूपदर्शने आढळतात.

९. प्राचीन मराठी वाङ्मयातून निर्मितीकालीन लोकसंस्कृतीचे दर्शन घडणे शक्य असते.

संदर्भ सूची :-

१. लोकसाहित्याची संकल्पना व स्वरूप – डॉ. शरद व्यवहारे, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, १९९९, पृष्ठ क्र. २४.

२. लोकसाहित्याचे स्वरूप – डॉ. प्रभाकर मांडे, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, १९७८, पृष्ठ क्र. ३४३

३. लोकसाहित्य एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र – डॉ. ग.ना. मोरजे, दास्ताने प्रकाशन, दुसरी आवृत्ती, १९९३, पृष्ठ क्र. २८.

४. मांडे प्रभाकर , लोकसाहित्याचे स्वरुप, द्वि.आ. औरंगाबाद १९८९, पृष्ठ क्र. ३२९

CamScanner



[illegible]

[illegible]

[illegible]

INDO WESTERN RESEARCH JOURNAL

(UGC Approved Referred, Peer Reviewed & Indexing Research Journal)

Impact Factor [illegible]

([illegible])

[illegible]

[illegible]

DR. NILAM CHHANGANI

CamScanner

IMPACT FACTOR 3.50

ISSN 2454-3292

International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for All Subjects

INDO WESTERN RESEARCH JOURNAL

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XV, Vol. I

Year- VIII,Bi-Annual (Half Yearly)

(Sept. 2021 To Feb. 2022)

Editorial Office :

'Gyandev-Parvati',

R-9/139/6-A-1,

Near Vishal School,

LIC Colony,

Pragati Nagar, Latur

Dist. Latur - 413531.

(Maharashtra), India.

Website

www.irasg.com

Contact : - 02382 - 241913

09423346913 / 09637935252

09503814000 / 07276301000

E-mail :

visiongroup1994@gmail.com

interlinkresearch@rediffmail.com

mbkamble2010@gmail.com

Published by :

Indo Asian Publication,

Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

EDITOR IN CHIEF

Dr. Nilam Chhangani
Head, Dept. of Economics, S. K. N. G. Mahavidyalaya,
Karanja Lad, Dist. Washim (M.S.) India

EXECUTIVE EDITORS

Dr. Subhash Deshmukh
Head, Dept. of Economics,
Dada Patil Rajale Mahavidyalaya,
Adhinathnagar, Dist. Ahmednagar(M.S.)

Dr. Balaji G. Kamble
Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur (M.S.)

DEPUTY EDITOR

Dr. P. T. Pawar
Dept. of Commerce,
Shivaji College,
Renapur, Dist. Latur (M.S.)

Dr. Lalita Chandratre
Dean, Sanskrit and Education,
K. K. Sanskrit University,
Ramtek, Dist. Nagpur (M.S.)

CO - EDITOR

Vanita Jadhav
Mother Terasa B.Ed. College,
Dharwad, Dist. Dharwad
(Karnataka)

Dr. Vinayak R. Waghmare
Head, Dept. of Commerce,
Shri Kumarswami Mahavidyalaya,
Ausa, Dist. Latur (M.S.)

MEMBER OF EDITORIAL BOARD

Dr. Mohmmad T. Rahaman
Dept. of Biomedical Science,
International Islamic University,
Mahkota (Malasiya)

Dr.Bhaskar S. Wazire
Head, Dept. of History,
Sitabai Arts College,
Akola, Dist. Akola (M.S.)

Dr.Satyenkumar P. Sitapara
Principal
Commerce & BBA College,
Amreli, Dist. Amreli (Gujrat)

Dr. M. S. Kamble
Dept. of History,
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Dr. Sivappa Rasapali
Dept. of Chemistry & Biochemistry,
UMASS. Wesport Road,
Dartmouth, MA (U.S.A.)

Dr.Sarjerao R. Shinde
Principal
B. K. D. College,
Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Ambuja Malkhedkar
Gulbarga, Dist. Gulbarba
(Karnataka)

Dr. Prashant Kshirsagar
Dept. of Marathi
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

CamScanner

Issue : XV, Vol. I
IWRJ
IMPACT FACTOR 3.50
ISSN 2454-3292
Sept. 2021 To Feb. 2022

INDEX

Sr. No	Title for Research Paper	Page No.
1	Impact of FDI in Retail Industry in India **Dr. Balaji Narayan Devkate**	1
2	Study of When I Hid My Caste: BaburaoBagul'sshort stories **Suhas Bhikaji Vidyagar**	8
3	Indian Culture and Motherhood: A Study through the poem 'The Night of Scorpion' by Nissim Ezekiel **Pooja Anil Bokade**	12
4	Elements of madness in shakespeare's dark tragedies **Sachin Ganeshrao Mahajan, Dr. Manojkumar S. Prakash**	15
5	Impact of Covid-19 pandemic on Higher Education in Maharashtra **V. R. Waghmare**	18
6	Library Automation : An Overview **Dr. Dipali R. Deshmukh**	21
7	हिंदी साहित्य में आदिवासी विमर्श **डॉ. अनिलकुमार रामधन राठोड**	28
8	विभिन्न युगों में भारतीय संगीत का अध्यात्मिक स्वरुप **पल्लवी प्रभुराज कुलकर्णी**	31
9	छत्रपती शाहू महाराजाचे शेतीविषयक विचार **डॉ. वालाजी ग्यानोबा कांबळे**	35
10	नवीन कृषी कायदे आणि महाराष्ट्रातील शेतकरी **डॉ. अरुण पांडुरंगजी चांदूरकर**	39
11	जैन दर्शनातील नैतिक संकल्पना : एक चिकित्सक अभ्यास **डॉ. कल्पना गो. तायवाडे**	42

CamScanner

12	महात्मा गांधी व शेतकरी आंदोलन **डॉ. ज्ञानदेव राऊत**	46
13	आजचे मराठी साहित्य आणि युवक **डॉ. पंडित जी राठोड**	49
14	राष्ट्र संत तुकडोजी महाराजांचे राष्ट्रवादासंबंधी विचार **डॉ. उल्हास एन. राठोड**	52
15	कोवीड-१९ आणि स्थलांतराचा रोजगारावरील परिणाम **डॉ. प्रदीप लक्ष्मणराव अंबोरे**	55
16	समाजाचा लोक संस्कृतीतील प्रथा, परंपराविषयक दृष्टीक्षेप **डॉ. अनिल विजयराव देशमुख**	59

CamScanner

IMPACT FACTOR 5.50
www.irasg.com

ISSN 2454-3292
Indo Western Research Journal (IWRJ)
Issue : XV, Vol. : I
Sept. 2021 To Feb. 2022

Research Paper 13 Marathi

आजचे मराठी साहित्य आणि युवक

डॉ. पंडित जी राठोड
मराठी विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
अमरावती, जि. अमरावती

प्रस्तावना

साहित्याच्या स्वरूपाचा अभ्यास आज युवक विविध पातळयावर करतांना आपल्याला आढळतो आहे. 'साहित्य' हे शब्दापासूनच तयार होत असते म्हणून प्रत्येक शब्दाला साहित्य म्हणता येत नाही परंतु शब्द हे साहित्याचे घटक आहे. साहित्य हे फक्त एकाच प्रकारचे नसते. परस्परांपासून ते वेगळे असते. या वेगळे असणाऱ्या संवेदनेतूनच आज युवक मराठी साहित्याकडे आकृष्ठ होतांना आपल्याला दिसत आहे. 'साहित्य म्हणजेच भाषेचे सुध्ा ारीत रूप होय'. साहित्य म्हणजेच लेखन होय. साहित्याला वांड्:मय हा पर्यायी शब्द आहे. परंतु साहित्याच्या मापदंडानूसार, 'जे–जे लिखीत ते ते साहित्य' ठरत नाही. आज इंग्रजी शिक्षण घेतलेली महाराष्ट्रातील सशिक्षित पिढी अनेक कविता, कथा नाटक, आत्मवृत्ते या मराठीच्या साहित्यातील अंतरंगांना स्पर्श करीत असल्याचे आढळून येत आहे. विशेषता मानवी जीवनाशी, मानवी संघर्षाशी प्रत्यक्ष परिणामकारक संबंध असलेले अनेक आत्मवृत्ते, कथा, कादंबरी या विषयाला आजचा युवावर्ग हाताळतांना दिसतो आहे. आजच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात 'उदई', 'बिलदर', 'बिराड', 'उपरा', 'बक्त', 'अक्करमाशी' ह्या सामाजीक कादंब–या महत्वाच्या ठरतात. आजचा युवक हा सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, बौध्दीक, अज्ञान, अंधश्रध्दा हयाचे निरसन करणारी ताकद डॉ. नरेन्द्र दाभोळकरांच्या साहित्यात आपणांस पहावयास मिळते. एक नवा आचार आणि नवी आचारपद्धती डॉ. नारळीकरांच्या साहित्यातून युवकांसाठी प्रतिबिंबित झाल्याचे प्रर्केशाने जाणवते. त्या दृष्टीने त्यांचे साहित्य प्रभावी ठरते. अनेक साधकबाधक विचार करण्याची आणि निर्णय घेण्याची बौध्दिक पात्रता वाढीस लागते. त्यातून एक गतिशिल समाज निर्माण होतो आहे. दाभोळकर, पानसरे, नरेन्द्र जाधव यांच्या साहित्यात बाणेदारवृत्ती, लेखनप्रवृत्ती आढळते. शुध्द वैचारीक लिखानाचा पायंडा प्रस्थापित होतो. महाराष्टाच्या साहित्याच्या वैचारिक चळवळीला उत्कृष्ठ स्तरावर पोहचवण्याचे कार्य यांनी केले. सामाजीक न्यायबुध्दी वाढीस आवश्यक वातावरण तयार होत आहे. अन्यायाविरूध्द सनदशीर मार्गाने दिशा दाखवण्याचा प्रयत्न केला. त्यातून मराठी युवकांची चिकित्साबुध्दी आणि जिज्ञासा वाढली. बहुश्रृतता प्राप्त झाली. वास्तवदृष्टी निर्माण केली. या वृत्तीतून नवा आशय आणि नवे आविष्कारतंत्र घेऊन मराठी साहित्याला उभारी मिळाली. ती आजच्या विज्ञान युगात.

दाभोळकरांच्या साहित्यातून 'काजवा रात्री कसा चमकतो?' 'समुद्रावर लाटा कश्या निर्माण होतात?' असा प्रश्न विचारला आहे. यातून मराठी साहित्यातून वैज्ञानीकता निर्माण झाल्याची जाणीव प्राप्त होते. माणूस कितीही मोठा

CamScanner

झाला तरी त्याने मराठी साहित्य व मराठीतील विज्ञानाची नाळ तोडू नये असे सुचविले आहे.

आजच्या युवकाला सांगायाचे आहे ते साहित्यातून

आजचे सर्व स्तरातील युवक हे मोबाईल, इंटरनेट, टी.व्ही. व अभ्य माध्यमात गुंतून पडले आहे. यातून ते सर्व पाहतात व ऐकतात. म्हणून साहित्यातून त्यांना वेगळे काय मिळणार ? असा प्रश्न पडतो. परंतू या प्रश्नाचे उत्तर सोपे आहे जी ही माध्यमे देवू शकत नाही जे साहित्य देते. आजच्या युवकाला काहीतरी सांगायचे आहे. त्याला समजावून घ्यावे हा त्याचा प्राथमिक हेतू आहे. त्याला साहित्याच्या माध्यमातून अभिव्यक्त व्हायचे आहे. उदा. बाळशास्त्री जांभेकरांनी वयाच्या २१ व्या वर्षी 'दर्पण' आणि वयाच्या २६ व्या वर्षी 'दिग्दर्शन' हे मासीक सुरू केले होते. वृत्तपत्रातून युवकांच्या अंतरंगातील प्रतिबिंब चांगल्याप्रकारे वृत्तपत्रीय पुरवठयामधून वाचायला मिळत आहे. ते सुध्दा साहित्याचा एक भाग आहे. ती युवकांची मनोवृत्ती वृत्तपत्रीय साहित्यातून डोकावते आहे. तशीच मनांची घालमेल सुध्दा पहायला मिळत आहे. या सर्व वाचनीय दृश्यांतून तरूणाईला, युवकांना कोठे, कसे, केव्हां जावे याचे, कोणत्या पद्धतीने वागावे, खरे सूख कश्यात आहे या पारंपरीक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी साहित्यासारखे सक्षम माध्यम हवे आहे. या युवकांच्या मनातील अंतरंगात उठणारी वादळे शमविण्याची ताकद युवकांच्या साहित्यात आहे. मान्य आहे आजच्या युवकांना बंडखोरीचे आकर्षण आहे, समवयस्क बंडखोरीचे अप्रुप आहे. असे काहीतरी करून दाखवण्यासाठी साहित्य आवश्यक आहे. आजची तरूण पिढी ही मराठी साहित्यातील 'नव्वोदत्तर' च्या पुढील कालखंडातील ठरते. १९९० च्या नंतर जन्माला आलेले युवक आहेत. त्यांना फ्रस्टेशन येणार नाही, त्यांना सिनेमाचे वाटे लागणार नाही यासाठी साहित्य फार आवश्यक आहे. त्यासाठी युवकांचे साहित्य संमेलन सुध्दा व्हायला पाहिजे. त्यातून जनजागृती करता येईल. अपेक्षीत बदल जो युवकासाठी आवश्यक आहे तो साहित्य संमेलनातून घडवता येईल. विज्ञानाच्या नियमनानुसार परस्परविरोध व परस्परबदल (अनुकुल–प्रतिकूल) हा सतत निरंतर सुरू असतो. हे अधोरेखीत करण्यासाठी साहित्य संमेलन आवश्यक ठरते. उत्साही वातावरणात अशी संमेलने युवकांनी युवकांसाठीच भरवायला हवीत. त्या माध्यमातून त्यांच्या भावनांना आवाहन करता येईल. युवकांचे आरोह–अवरोह टिपले जातील. विचारांची सुसंगत मांडणी होईल. तथा त्याचप्रमाणे त्यांच्या मूलत: व्यक्तिनिष्ठ, भावप्रेरीत, कल्पना, प्रतिभानिर्मिती सौंदर्यसृष्टीचे अनुसरण करता येईल. युवकांनी घेतलेला जीवनानुभव साहित्यकृतीतून आविष्कृत होईल. युवकांच्या मनातील अंतरीक घालमेल अभिव्यक्त होण्यासाठी साहित्य महत्वाची भुमिका बजावते. युवकांचे अनुभव विश्व उलगडण्यासाठी, उलगडून दाखविण्यासाठी साहित्याला पर्याय नाही.

निष्कर्ष :–

साहित्याचा अभ्यास करतांना साहित्यिकाच्या व्यक्तिमत्वाचा अभ्यास केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. कारण युवा साहित्यिक हा प्रतिभावंत असल्यामुळे सर्वसामान्य माणसाला प्रतीत होऊ न शकलेले सत्य, अनुभव, जगण्यातील परिणामकारकता, सौंदर्यविश्व युवा कवी व लेखकाला जाणवते. या सत्याच्या व सौंदर्याच्या आविष्कार साहित्यकृतीच्या माध्यमातून लेखक कवी करत असतात. अर्थातच हा साहित्यीक आविष्कार लेखकाच्या स्वभावपरत्वे अथा दृष्टिकोणाच्या वेगळेपणामुळे प्रत्येकाच्या अनुभवाचा रंग भिन्न–भिन्न होतो. व्यक्तीपरत्वे, कालपरत्वे, हेतुपरत्वे साहित्याचे स्वरूप सतत बदलत असते. परंतू जेव्हां मराठी साहित्य आणि युवक यांचा विचार केला जातो तेव्हां काही समान प्रवृत्ती वेगवेगळया काळातील व देशातील साहित्यात दिसून येतात व त्यातून भिन्न स्वरूपाच्या प्रवृत्ती सिध्द होतात.

CamScanner

संदर्भ सूची :-

१) रा.भा. पाटणकर : 'सौंदर्यमीमांसा' कॉटिनेंटल प्रकाशन पुणे, दुसरी आवश्त्ती–१९८१.
२) प्रभाकर पाध्ये : 'मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा' मौज प्रकाशन गश्ह, मुंबई–१९७६.
३) संपा : गंगाधर पाटील, म.सु. पाटील : 'प्रभाकर पाध्ये वाङ्मयदर्शन', मौज प्रकाशनगश्ह, मुंबई–१९९३.
४) प्रभाकर पाध्ये :'सौंदर्यानुभव' इस्थेटिक सोसा. व मौज प्रकाशनगश्ह,मुंबई–१९७९.
५) रा.भा.पाटणकर : 'साहित्य विचार आणि सौंदर्यशास्त्र' मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन, मुंबई प्रथम आवृत्ती २००१.
६) प्रभाकर पाध्ये 'पाटणकरांची सौंदर्य मीमांसा' मौज प्रकाशनगश्ह, मुंबई–१९७६.

ज्योतीचंद्र पब्लिकेशन, लातूर.

ISBN नंबर नुसार पुस्तक प्रकाशनाची सुवर्ण संधी

वैशिष्ट्ये :-

१) विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व इतर लेखकांचे पुस्तक 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर ISBN नंबर नुसार प्रकाशित करणे.
२) संशोधक, प्राध्यापक यांच्या M.Phil, Ph.D. संशोधनात्मक पुस्तकांना विशेष प्राधान्य.
३) यु.जी.सी. च्या नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार उच्च शिक्षणामध्ये कार्यरत संशोधनार्थी व प्राध्यापक यांना आपले पुस्तक ISBN नुसारच प्रकाशित करणे आवश्यक आहे. तरी, संशोधनार्थी व प्राध्यापक यांनी आपले मौलिक साहित्य ISBN नुसार प्रकाशित करून घ्यावे, ही विनंती.

- संपर्कासाठी पत्ता -

प्रकाशक,
ज्योतीचंद्र पब्लिकेशन
"ग्यानदेव-पार्वती", R-9/139/6, विशाल शाळेजवळ,
एल.आय.सी. कॉलनी, प्रगती नगर, लातूर.
ता. जि. लातूर - 413531.(महाराष्ट्र),भारत
ऑफिस फोन नं. - 02382 - 241913
मो. नं.9423346913, 9503814000, 9637935252, 7276301000

ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

VISION
RESEARCH REVIEW

CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

CamScanner

IMPACT FACTOR 5.20

ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

VISION
RESEARCH REVIEW

UGC APPROVED, REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XXIII, Vol. - I
Year-XII, Bi-Annual(Half Yearly)
(June 2022 To Nov. 2022)

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Contact : 02382 -241913
9423346913 / 7276301000
9637935252 / 9503814000

E-mail :
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@ gmail.com
mbkamble2010@gmail.com

Published By :
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (M.S.)

Price : ₹ 200/-

CHIEF EDITOR

Dr. Balaji G. Kamble
Professor & Head,
Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar College,
Latur, Dist. Latur (M.S.)India

SPECIAL EDITOR

Dr. E. Sivanagi Reddy
'Sthapathi'
Dept of Archaeology & Museums,
Hyderabad (A.P.)

EXECUTIVE EDITORS

Dr. Sachin Napate
Pune, Dist. Pune M.S.

Verena Blechinger Talcott
Director, Dept. of History
& Cultural Studies, University of Berlin,
Berlin, (Jermany)

Michael Strayss,
Director,
International Relation & Diplomacy,
Schiller International University,
Paris. (France)

Dr. Deelip S. Arjune
Professor, Head, Dept. of History
J. E. S. Mahavidyalaya,
Jalna, Dist. Jalna (M.S.)

Dr. Nilam Chhangani
Dept. of Economics,
S.K.N.G. College,
Karanja Lad, Dist. Washim(M.S.)

Dr. Rajendra R. Gawhale
Head, Dept. of Economics,
G. S. College,
Khamgaon, Dist. Buldana (M.S)

DEPUTY EDITORS

Dr. Rajendra Ganapure
Professor,Head, Dept. of Economics,
S. M. P. Mahavidyalaya,
Murum, Dist. Osmanabad (M.S.)

Dr. B. K. Shinde
Professor, Head, Dept. of Economics,
D. S. M. Mahavidyalaya,
Jintur, Dist. Parbhani (M.S.)

Dr. Vijay R. Gawhale
Head, Dept. of Commerce,
G.S. Mahavidyalaya,
Khamgaon, Dist. Buldana (M.S.)

Bhujang R. Bobade
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Institute, Hyderabad. (A.P.)

Dr. Mahadeo S. Kamble
Dept. of History
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed (M.S.)

Dr. S. R. Patil
Professor, Dept. of Economics,
Swami Vivekanand Mahavidyalaya,
Shirur Tajband, Dist. Latur(M.S.)

CO - EDITORS

Dr. Allabaksha Jamadar
Professor, Head, Dept. of Hindi,
B.K.D. College,
Chakur, Dist. Latur (M.S.)

Dr. Murlidhar Lahade
Dept. of Hindi,
Janakas Mahavidyalaya,
Bansarola, Dist. Beed (M.S.)

Dr. Shyam Khandare
Dept. of Sociology,
Gondawana University,
Gadchiroli, Dist. Gadchiroli (M.S.)

Dr. M. Veeraprasad
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, Dist. Anantpur (A.P.)

CamScanner

Issue : XXIII, Vol. I
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2250-169X
June 2022 To Nov. 2022

INDEX

Sr. No	Title for Research Paper	Page No.
1	Multiculturalism in Kiran Desai's The Inheritance of Loss **O. S. Pawar**	1
2	Johannes Kepler : An Astronomer **Dr. Premdas Manohar Rathod**	8
3	Effect Of Practicing Sports Among People with Various Heart Diseases **Khan Nehal Ahemad**	17
4	किन्नरों की सामाजिक अवहेलना **डॉ. विलास नागोराव कांबळे**	22
5	गरोदर स्त्रियांसाठी आहार- एक अभ्यास **डॉ. मिनल गावंडे**	27
6	संत साहित्य : तौलनिक अभ्यासाच्या दिशा **डॉ. पंडित जी. राठोड**	33
7	भटक्या विमुक्तांच्या जीवन जाणिवांचा वेध घेणारा समर्थ लेखक : अशोक पवार **गणेश काकडे**	42
8	भारतीय क्रीडाप्रकारात मुस्लीम खेळांडुचे योगदान **डॉ. प्रभाकर आबाजी पंडित**	48
9	डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा समाजशास्त्रीय अभ्यास **डॉ. प्रदिप लक्ष्मणराव अंबोरे**	53
10	डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राष्ट्रवाद **डॉ. श्याम दुतोंडे**	62

CamScanner

6

संत साहित्य : तौलनिक अभ्यासाच्या दिशा

डॉ. पंडित जी. राठोड
मराठी विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
अमरावती, जि. अमरावती

Research Paper - Marathi

तौलनिक साहित्याभ्यास ही एक आंतरविद्याशाखीय अभ्यासपद्धती म्हणून आज संशोधनात उतरणारी, रोजचे नवनवे अभ्यासविषय बहुआयामी ज्ञानशाखा आहे. जागतिक पातळीवर तौलनिक साहित्याभ्यासाची एक विशिष्ट आणि विस्ताशील अशी अभ्यासपद्धतीही रूढ झाली आहे. ज्ञानाची क्षेत्रे आज इतक्या झपाट्याने वाढत आणि विकसित होत आहेत की, एकावेळी तिचा विशेष बोलबाला होता ती विशेषज्ञतेची (Specialization) कल्पना, तिच्यातील परावलंबित्वाच्या मर्यादा स्पष्ट झाल्याने आता कालबाह्य नसली तरी कालविसंगत वाटू लागली आहे. जगभर वाढत असलेला बहुसंस्कृतीवाद, जागतिकीकरणाचा अटळ आणि अपरिहार्य रेटा, विविध ज्ञानशाखांच्या वेगाने परिवर्तीत होणाऱ्या सीमा यामुळे आंतरविद्याक्षेत्रीय अभ्यासाचे महत्त्व वाढले आहे. भारतात मात्र या अभ्यासशाखेचे मोल आणि महत्त्व अलिकडे ध्यानात येऊ लागले आहे. मराठीत तर अधिकच अवघड अवस्था आहे. तौलनिक अभ्यासाला वाहिलेले एकही मराठी नियतकालिक नाही. Yadavpur Journal of Comparative Literature सारखा उपक्रम इथल्या विद्यापीठानेही हाती घ्यायला हवा. प्रा. वरंत बापट, डॉ. चंद्रशेखर जहागीदार, डॉ. भालचंद्र नेमाडे, डॉ. आनंद पाटील आणि डॉ. श्रीपाल सबनीस, डॉ. पृथ्वीराज तौर यांचे चार-पाच फार तर आठ-दहा प्रयत्न वगळता मराठीत तौलनिक अभ्यासावर संदर्भ साहित्यही नाही.

मराठी साहित्याचा एक भाग म्हणजे संतसाहित्य. अर्थात संतसाहित्य ही एकट्या मराठीचीच मक्तेदारी आहे अरो नाही. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेल्या या देशातल्या अठरापगड जातीजमातींमधून जन्मलेल्या विविध भाषिक संतांनी, भक्तांनी आपापल्या श्रद्धेप्रमाणे, ज्ञानाप्रमाणे आपले आराध्यदैवत समोर ठेवून विपुल साहित्यनिर्मिती केली आहे. या साहित्याचे स्वरुप विविधांगी आहे. ईश्वरभेटीची आर्तता व्यक्त करणारे भक्तांचे आर्त अनुभव त्यत आहेत. त्याचप्रमाणे वेद,

CamScanner

उपनिषदे आणि ग्रंथांतील तत्त्वज्ञान आणि घटपटादी परिभाषेची चर्चाही त्यात आहे. ईश्वरगुणवर्णनाची प्रेरणाही आहे. जीव, जगत आणि जगदीश यांच्या सायुज्य एकतेकडे, मानवाचा भक्त-साधक-सिद्ध-मुक्त असा चढता प्रवास करता होत जातो याचा मनोहारी आलेखही आहे. त्याचप्रमाणे आराध्य, उपास्य दैवताच्या कधी बालरूपाचा तर कधी युवा-पौढ रूपाचा मोह संतांच्या प्रतिभेला पडला आहे. दक्षिणेतील आळणावार आणि नायनमार परंपरा, महाराष्ट्राची वारकरी परंपरा, उत्तरेतील कबीर, नानकांची निगुर्ण परंपरा, बंगालातील चैतन्य परंपरा, बसवेश्वरांची वीरशैव लिंगायत परंपरा ..... अक्षरक्ष: शेकडो भरतील इतके अध्यात्माच्या प्रांतातले विविध संप्रदाय, त्या संप्रदायांचे आचार्य आणि त्या आचार्यांची गीता, रामायण, महाभारत, वेद-उपनिषदांवरील भाष्ये, इथल्या भक्तीपरंपरांवर आणि साहित्यावर असणारा चार्वाक, बौद्ध, जैन आदि मते आणि दर्शनांच्या प्रभावाच्या शक्यता, प्रदेश विशिष्ट संस्कृतीतून उद्भवणाऱ्या आध्यात्मिक परंपरा, उपासनाप्रकार हा सारा भारतीय संतसाहित्याचा, भक्तिसाहित्याचा पट एवढा विशाल आणि प्रचंड आहे, त्याला इतके ताणेबाणे आहेत आणि त्यातील भारतीयत्व इतके उत्कट आहे की या बहुभाषी, बहुआयामी आणि बहुपरंपरांचे वाहन असणारे संतसाहित्य - भक्तीसाहित्य गुरुदेव रवीन्द्रनाथ ठाकूरांच्या 'विश्वंभवत्येक नीडस्' चाच आदिम-प्राचीन उच्चार आहे. अनेक विचारधारा, अनेक परंपरा आणि अनेक मानसिकता ह्या संतसाहित्याच्या विशाल आणि व्यापक पटात समाविष्ट आहेत. तरीही हे 'भारतीय' आहे. एकात्म आहे. तयातून ध्वनित होणारा हा एकच आहे. माणसाला मुक्तीच्या पथावर अग्रेसर करणे आणि भक्त व भगवंत यांच्यातील अंतर कमी करणे हे उदात्त - पवित्र उद्देश या समग्र रचनामागे आहेत. त्याचबरोबर हे साहित्य हा त्या संत - भक्त कवींचा उत्कट आत्माविष्कारही आहे.

आजवर संतसाहित्याचा तौलनिक अभ्यास झालाच नाही असे नाही. मराठीत सुमारे १५, हिंदीत ३१ आणि इंग्रजीत २ इतके पीएच. डी. चे प्रबंध 'संतसाहित्य - नवे सिद्धान्त आणि उपयोजन' या ग्रंथाला जोडलेल्या परिशिष्टावरुन दिसते. काही प्रबंध त्यांच्या नजरेतून सुटले आहेत. या तौलनिक संशोधनामध्ये दोन किंवा अधिक संत- भक्तकवींची तुलना केलेली आढळते. अभ्यासविषय असलेले कवी कधी भिन्नभाषिक तर कधी एकभाषिक आहेत. परंतु आजवर संतसाहित्याला, भक्तिसाहित्याला तौलनिक अभ्यासाचे संशोधनक्षेत्र म्हणून यथार्थ न्याय मिळाला आहेच असे म्हणण्याचे धाडस करवत नाही. तौललिक साहित्याभ्यासाच्या संतसाहित्यात किती शक्यता आहेत? संतसाहित्याच्या तौलनिक अभ्यास किती विविध अंगानी करता येऊ शकेल. संतसाहित्याचा अभ्यास हा संस्कृती अभ्यास कसा ठरू शकेल? याच्या काही शक्यता मांडणे हे प्रस्तुत शोधनिबंधाचे प्रयोजन आहे.

संतसाहित्य : मध्ययुगीन साहित्याचा मुख्य प्रवाह :

संतसाहित्य हे मध्ययुगात जन्माला आले. साधारणत: नव्या जाणिवांची चिन्हे दिसू लागली.

तेव्हा त्याची निर्मिती पूर्णपणे थांबली. परंतु आजही समाजमनाच्या एका मोठ्या भागाशी संतसाहित्याचे नाते अतूट आणि अभिन्नत्वाचे आहे. धर्मजीवन हेच मध्ययुगात लोकजीवन होते. धर्म हीच जीवनाची प्रेरणा आणि धर्माचरण हीच जीवनपद्धती होती. संतसाहित्य आणि धर्मजीवनाचा इतिहास हाच मध्ययुगीन समाजजीवनाचा आणि सांस्कृतिक जीवनाचा इतिहास ठरतो.

मध्ययुगात आध्यात्मिक प्रेरणेतून पद्य आणि ऐहिक व राजकीय जाणिवेतून गद्य जन्माला आले. गद्याच्या तुलनेत पद्य अधिक काळ टिकले. गद्याचे स्वरुप तात्कालीन, प्रासंगिक राहिले. बखरींचा किरकोळ अपवाद आहे. त्यामुळे गद्य ही मध्ययुगाची युगशैली व युगपद्धती मानता येत नाही. तुलनेत संतांचे साहित्य हा मध्ययुगीन जनमानसावर अधिराज्य गाजविणारा प्रवाह ठरतो. ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरीची, कबीरांच्या वाणीची, तुलसींच्या रामचरितमानसाची, रामदासांच्या करुणाष्टके आणि मनाच्या श्लोकांची व तुकोबांची अंभगवाणी जनमानला पडलेली मोहिनी आणि अनआवाहकता मध्ययुगात विशेषत्वाने परिणामकारक राहीली. संत लोकांचा श्वास बनले. मध्ययुगात निर्माण झालेल्या अन्य वाङ्मयप्रकारांपेक्षा, अध्यात्मसंबंद्ध पंडिती साहित्यापेक्षा संतांची कविता लोकप्रिय ठरली म्हणून संतसाहित्य हाच मध्ययुगीन साहित्याचा मुख्य प्रवाह ठरतो.

संतसाहित्य : तौलनिक अभ्यासाची आवश्यकता :

आजवर भारतीय संतसाहित्याचा भरपूर अभ्यास झाला. संत आणि संतसाहित्य यावर अनेकांनी संशोधन करुन जाडजूड ग्रंथ लिहिले. आजवर झालेला संतसाहित्याचा अभ्यास हा एकतर संहिता चिकित्सेच्या अंगाने झाला. त्यातून विविध ग्रंथांच्या संशोधित पाठचिकित्सक आवृत्ती सिद्ध झाल्या. काही संतांच्या कवितेने वाङ्मयीन मूल्यमापन करण्याचाही प्रयत्न झाला. संतसाहित्यातील तत्त्वज्ञानाचेही विवेचन झाले. धार्मिक भूमिकेतून श्रद्धायुकत अंत:करणाने पारायणे तर असंख्य झाली. आजही ही घाऊक प्रमाणावर होत असतात. इथल्या कीर्तनाश्रयी प्रबोधनपरंपरेने संत आणि समाज यांचा सांधा जीवंत ठेवला. आत्मा, ईश्वर, मोक्ष, भक्ती इत्यादी आध्यात्मिक अंगांनीही संतसाहित्याचे व्यापक परिशीलन झाले. हे सारे होत असताना संतांकडे, त्यांच्या जीवनकार्याकडे, साहित्याकडे खऱ्या निरपेक्षपणे आणि तटस्थतेने पाहिले जाण्याची उदाहरणे दुर्मिळ आहेत. संतांच्या अभ्यासात अभिनिवेश हा भागही आहे. महाराष्ट्र संस्कृतीचे केंद्रबिंदू ज्ञानेश्वर की तुकाराम असा वाद माजण्याचे कारण असा अभिनिवेदश हेच म्हटले पाहिजे. संतांचे प्रबोधन, त्यांची तत्त्वदृष्टी आणि त्यांचे कल्याणकार्य अशी अनेकविध परिणामे या विषयास आहेत. मात्र या परिमाणांना न्याय मिळालाच नाही. त्यामुळे संतांच्या कार्याची फलश्रुती मांडण्याचे प्रयत्न अपुरे ठरतात. इथल्या समाजशास्त्रीय अभ्यासाला असलेली मार्क्सवादी दृष्टीची मर्यादाही नजरेआड करता येत नाही. एकूण भारतीय परिप्रेक्ष्यांत तर अशा प्रकारचे कार्य वा अध्ययन अभावानेच आढळते. आजवरच्या अभ्यासातल्या ह्या सर्व त्रुटी भरून काढून संतसाहित्याला खरा आणि सम्यक न्याय देण्याची ताकद

CamScanner

फक्त संतसाहित्याच्या तौलनिक अभ्यासातच आहे. म्हणून संतसाहित्याच्या रूपाने विद्यमान असणाऱ्या ह्या भारतीय सांस्कृतिक संचिताचे यथामूल आणि नेमके स्वरूप समजावून घेण्यासाठी संतसाहित्याच्या तौलनिक अभ्यासाची नितांत आवश्यकता आहे. कारण तौलनिक अभ्यासातूनच संत साहित्याच्या मीमांसेची आणि मूल्यमापनाची प्रमेये मांडता येतील आणि मांडलेली प्रमेये संतसाहित्याच्या अंतरंग दर्शनाच्या प्रकाशात तपासून पाहता येतील.

संतसाहित्याचे आशयसूत्र

संतसाहित्याच्या तौलनिक अभ्यासाच्या शक्यतांची चर्चा करताना संतसाहित्याचा समग्र आशय ध्यानात घेणे आवश्यक आहे. संतांची कविता आणि आध्यात्मिकता यांचा संबंध अभिन्नत्वाचा आहे. संतसाहित्याचा आशय सोयीसाठी तीन भागांत विभागता येऊ शकेल.

संतसाहित्याची दार्शनिक व आध्यात्मिक बाजू

संतसाहित्याचा आशय नियत करणारी बाब म्हणजे त्यातील दार्शनिक तत्त्वज्ञानात्मक आणि आध्यात्मिक विचार. बहुतेक सगळे संतकवी हे त्यांच्या मर्यादित परिप्रेक्ष्यांत का होईना पण उच्च दर्जाचे साधक असण्याबरोबरच महान तत्त्ववेत्तेही होते. विश्वाचे नियंत्रण करणाऱ्या अज्ञात, नित्यनूतन तरीही सनातन सत्याचा शोध संतांनी घेतला आहे. ब्रह्म, माया, जीव, जगत, जगदीश आणि मोक्ष हे संतांच्या दार्शनिक चिंतनाचे मूलभूत विषय राहिले आहेत. संतसाहित्य हा एका वैश्विक सत्याचा शोध आहे. संतांनी आत्मचिंतन करताना परमसत्याच्या प्राप्तीच्या प्रयत्न केला आणि हा शोध लोककल्याणाची दृष्टी ठेवली.

संतसहित्याची सामाजिक बाजू

संतसाहित्याच्या निर्मितीमागे 'बुडते हे जन न देखवे डोळा म्हणून कळवसा येतसे' ही भावनाही विशेषत्वाने कार्यरत आहे. संतांनी समकालीन समाजाचे सूक्ष्म निरिक्षण केले. समाजाचे गाडे रूढींच्या चिखलात फसले आहे हे त्यांच्या ध्यानी आले. समाजाच्या स्थितीगतीचे निरिक्षण करीत त्यांनी धर्माचे, ईश्वराचे त्यांना आकलन झालेले सत्स्वरूप समाजापुढे ठेवले. संत हे धार्मिक विचारवंत ते होतेच पण त्यापेक्षाही अधिक ते लोकशिक्षण होते. एच.जी. वेस्कॉटने कबीरांना Religious Teacher असे म्हटले आहे. वेस्टकॉटचे हे विधान सगळ्या संतांना लागू पडते. संतांनी बहुदेवतोपासनेच्या निषेध केला. सगुण निगुर्ण एक गोविंदाच आहे असे सांगून अध्यात्माच्या प्रांतातील संभाव्य वैचारिक संघर्षाला मूठमाती द्यायचा प्रयत्न केला. बाह्यावडंबराचा निषेध केला. कर्मकांडाची निंदा केली. पंढरीच्या वाळवंटापुरती का असेना सामाजिक-आध्यात्मिक लोकशाही स्थापन केली. एकता, समता आणि ममतेचा संदेश दिला. संतसाहित्याची ही प्रबोधनपर बाजूही महत्त्वाची आहे.

संतसाहित्याची भावनिक बाजू

संतांच्या संवेदनशील मनाचा आविष्कार म्हणूनही संतसाहित्याचा आशय तपासून पाहता

येतो. संतांच्या ठिकाणी वसणारी सर्व भूतांबद्दलची सर्व भूतांबद्दलची प्रेमभावना तर तिथे अभिव्यक्त होतेच पण ईश्वराबद्दलची प्रेमभावनाही तशाच ताकदीने अभिव्यक्त होताना दिसते. कृष्णरंगात स्वतःला रंगविणारी मीरा, आपल्याच घरपूंक मस्तीत रमणारे मस्तमौला कबीर, ईशचिंतनात रंगून गेल्यावर अंगारवच्या कपडयांचेही भान न राहणारी काश्मीरातील आंदाल, परदुःख पद्मानेन उत्तनो सुखमिच्छती । वैर संसग संसट्ठो वेरा पमुच्यती' या बुद्धवचनाचा पडसादच आपल्या "कोणही जीवाचा न घडो मत्सर वर्म सर्वेश्वर पूजनाचे" या अंभगामधून उमटविणारे तुकाराम, मधुराभक्तीत रंगून गेलेले ज्ञानदेव, कीर्तनरंगी नाचणारे नामदेव.. संतांची कविता ही विशुद्ध भावकविता म्हणूनही महत्त्वाची आहे.

संतसाहित्याचा साहित्यप्रकार ---- म्हणून आकृतीबंधाचा विचार ही अभ्यासाची चौथी बाजू होऊ शकेल. संतसाहित्याची उपरोक्त आशयसूत्रे तौलनिक अभ्यासाच्या दृष्टीनेही महत्त्वाची आहेत. सगळेच संत हे कुणा ना कुणातरी भाष्यकरांना वाट पुसणारे आहेत. त्यामुळे आशयाचा शोध घेताना प्रभावाचाही शोध घेता येऊ शकतो. संतांवर असलेला तत्त्वज्ञांच्या विचारांचा आणि पारंपारिक तत्त्वज्ञानांचा असणारा विविधांगी आणि बहुआयामी प्रभाव तुलनेचे प्रचंड संशोधनक्षेत्र अभ्यासकांपुढे खुले करतो.

संत आणि विविध मतप्रणालींचा प्रभाव

सगळ्याच संतसाहित्याचे एक समान वैशिष्ट्य म्हणजे संतांवर कोणत्या ना कोणत्या सत्पुरुषाचा, संताचा, गुरुचा वा विशिष्ट विचारधारेचा प्रभाव आहेच आहे. भारतीय भक्तिसाहित्याचा इमला सिद्ध करण्यासाठी नारदीय भक्तीसूत्रे शांडिल्याची भक्तिसूत्रे, योगवासिष्ठ इत्यादींचा पाया लाभला आहे. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीची रचना करताना भाष्यकारांना वाट पसल्याचे प्रसिद्ध आहेच. गुरुपरंपरेने नाथपंथी असलेल्या ज्ञानदेवांनी आदिनाथ शिवाऐवजी वैष्णव परंपरेतील विठ्ठलाचा आराध्य दैवत म्हणून स्वीकार केला. हा बदल मतप्रणालीच्या प्रभावातूनच झाला असला पाहिजे. काश्मीरी शैव दैवत अंगिकार करणारे ज्ञानदेव आणि अंभगातील ज्ञानदेव वेगळे वाटतात. ते या प्रभावातील बदलामुळेच. ज्ञान्याचा एका, नाम्याचा तुका आवि कबीराचा शेखा हया एकेश्वरवाद, सगुणोपासना, निर्गुणोपासना.. भक्तीच्या प्रांतात मतामतांचा प्रचंड गलबला आहे. संतावर असलेल्या या विविध मतप्रवाहांच्या प्रभावातूनच या संतांची वाङ्मयीन श्रीमूर्ती घडली आहे. संतांनी त्यांच्यावर असणारा, विविध मतप्रणालीचा प्रभाव आपल्या विशाल व्यक्तिमत्त्वात कसा जिरवून टाकला, कशा सहजतेने त्यांनी ही मते हाताळली, कसा सारासार विचार केला याचा अभ्यास संतांच्या तौलनिक अभ्यासातूनच होऊ शकतो. मध्ययुगात भारतीय समाजमनाचे आध्यात्मिक, धार्मिक आणि नैतिक भरणपोषण करणाऱ्या संतांनी तत्कालीन धर्मजीवनाला आकार देण्याचा प्रयत्न केला. नाथसंप्रदायाचा संतांवर विशेष प्रभाव आहे. नाथासंप्रदायाचे अध्वा गोरक्षनाथांनी मध्ययुगीन

भारतीय धर्मप्रेरणेला सुविहीत आकार दिला. कर्मकांडी अवडंबरावर आघात करुन भारतीय साधना सोपान - देहात नवी प्राणशक्ती पुफली. त्यातून उत्तरकालीन महापुरुषांच्या जीवनकार्याच्या प्रेरणा निश्चित झाल्या. गोरक्षनाथांचा विराट आत्मा चक्रधरांच्या नाडीतून वाहातो आहे. ज्ञानेश्वरांच्या श्वसनातून दरवळतो आहे. कबीरांच्या कंठातून हुंकारतो आहे. नानकांच्या समदृष्टीतून बरसतो आहे. संतवाणीतून गंगेसारखा धावतो आहे.'[२] डॉ. ढेरेंच्या या विधानाचे मर्म, संतांवरील नाथसंप्रदायाला तौलनिक सुंदर उदाहरण आहे. भावार्थ रामायण लिहून रामोपासना करणारे नाथ गुरूपरंपरेने दत्तसांप्रदायिक, आचाराने भागवत सांप्रदायिक आणि ज्ञानदेवांच्या प्रभावाने नाथ सांप्रदायिक ठरतात. कबीर - नानकांवरील सुफी मतांचा प्रमुख लक्षात घेतल्याखेरीज कबीरांची उलटवाँसी समजतच नाही. तौलनिक अभ्यासातूनच या आणि अशाच अनेक प्रश्नांचा उलगडा होईल.

संतसाहित्य : साधर्म्य - वैधर्म्याचा विचार

तौलनिक अभ्यासात साधर्म्य आणि वैधर्म्याचे सूत्रही अत्यंत महत्त्वाचे असते. संतसाहित्य या तौलनिक साहित्याभ्यासाच्या संशोधनक्षेत्राचाही अपवाद नाही. उदाहरणार्थ ज्ञानेश्वरी ही इ ाानेश्वरांनी लिहिलेली गीता टीका. अशाच अनेक गीताटीका भारतभर अनेकांनी लिहिल्या आहेत. ज्ञानेश्वरी हे संस्कृतेतर गीताभाष्य. अन्य संतांनीही गीतातत्त्वाचे स्वतंत्रपणे वा आपल्या अन्य रचनेत अनुशील, अनुसरण केलेले आढळते. ही गीताभाष्ये जशी साधर्म्यसाठी तशीच वैधासाठी तपासता येतील. मराठी आध्यात्मिक संस्कृतीचे केंद्रबिंदु म्हणून ज्ञानेश्वर आणि बंगालातील आध्यात्मिक संस्कृतीचे केंद्रबिंदु म्हणून चैतन्य महाप्रभू यांच्या रचनेत, तत्त्वविचारात आणि संघटनात्मक कार्यात काय साधर्म्य वैधर्म्य आढळते याचा शोध घेता येईल. भारतभरात सुमारे पन्नास इतके तुलनायोग्य महापुरुष गृहित धरले तरी एकाची एकोणपन्नासांशी तुलना संभवते आणि २४०१ शोधविषय संभवतात. साधर्म्य आणि वैधाचा या सूत्राच्या अनुषंगाने संतसाहित्याच्या परिक्षप्रेक्ष्यांत संशोधन तुलनेच्या अनंत शक्यता संभवतात.

आराध्य दैवताचा रूपशोध :

भारतीय संतमंडळींनी पूजलेल्या दैवतांचा अभ्यास हेही तौलनिक संतसाहित्याभ्यासाचे एक संशोधनक्षेत्र ठरू शकेल. सगळ्या संतांची विभागणी एकतर सगुणोपासक किंवा निर्गुणोपास अशी दोन विभागांत करता येऊ शकेल. मराठी परंपरेत सगुण आणि निगुर्ण अशा दोन्ही उपासकांन संत अशीच संज्ञा आहे. हिंदीत मात्र सगुणोपाकस तुलसीदास, सूरदास, मीरा, नामदेव यां भक्तकवी तर निर्गुज्ञोपासक नानक कबीर, दादू, धन्ना यांना संतकवी म्हटले आहे. सगुणोपासकां भर मुर्तीपूजेवर होता. एकटी श्रीकृष्ण ही देवता घेतली तर महाराष्ट्रीय संतांचे श्रीकृष्णरूपा आकलन श्रीविठ्ठलरूपात अभिव्यक्त होते. उत्तरेत श्रीकृष्णाच्या बालरूपाचीच पूजा होते. भक्तकवींच पूजेतला श्रीकृष्ण बालरूपच आहे तर निर्गुणी संतांनी परमेश्वराचे रूप वर्णितांना राम-कृष्ण

नामभिधाने ईश्वरतत्त्वाचे द्योतक म्हणून वापरली असली तरी त्यांना तेथे रामायणातील राम आणि महाभारतातील श्रीकृष्ण अभिप्रेत होतेच असे म्हणता येत नाही. या संदर्भात कबीरांच्या कवितेवर भाष्य करताना डॉ. मनोरमा प्रकाश म्हणतात -"निराकार ब्रह्मके निराकार और विराट रूपसे संतोष न हो सका । युगीन भक्ती आंदोलनसे प्रभावित होकर भक्तीके आवेशने उसे सगणात्मक पौरणिक नामोंसेभी अभिहित किया है । अवतारवाद में विश्वास न रखते हुओ भी राम, हरी, गोविंद, मुरारी आदि नामोंसे उसे पुकारकर साकार रूपमें विवेचित किया है। परन्तु यहाँ यह भी स्पष्ट है उल्लेखनीय है की, कबीर क ये नाम केवल नाम है । इनमें पौराणिक अवतारोंका संबंध नही है। कबीरका राम दशरथ का पुत्र नहीं है। वरन् स्मृति में रमने की शक्ती के कारण उसे राम संज्ञा दी गई है ।'[३]

दैवतांच्या रूपशोधात संशोधन मुद्दा श्री विठ्ठलाच्या संबंधात संभवतो. मुळात भक्तीचे आंदोलन दक्षिणेमधून उत्तरेकडे सरकत गेले. वैष्णव आळवार आणि शैव नायनमार संतानी लावलेली ही भक्तीची धारा उत्तरेत सरकताना त्या- त्या प्रदेशाची रूपवैशिष्ट्ये आपल्यात जिरवत गेली. 'कानडा' 'करनाटकू' विठोबा मराठमाळा झाला तो अशाच स्वीकार प्रक्रियेतून विठ्ठलाबद्दल सविस्तर विवेचन डॉ. रा.चिं. ढेरेंनी केले आहे. भक्त नामदेव हे विठ्ठलभक्त. पंजाबात गेल्यावरही ते विठ्ठलभक्ती विसरले नव्हते. परंतु श्रीगुरू ग्रंथसाहेबातील नामदेव निर्गणोपासक आहेत. उत्तरेतील नामियाना मंडळीत विठ्ठलाबद्दल अनादर नसला तरी त्यांच्याकडून विठ्ठलाची पूजाही होत नाही. हे तथ्य इथे लक्षात घेतले की, दैवतांच्या रूपशोधाच्या अनेक दिशा दिसू लागतात. संतसाहित्याचा ह्या अंगाने तौलनिक अभ्यास झाला तर अनेक आजवर न आकळलेली सत्ये आणि तथ्ये समोर येऊ शकतील.

संतकविता आणि पंडिती कविता :

मराठी कवितेच्या प्रांतात कवींची संत, पंत आणि तंत अशी तीन प्रकारांत विभागणी केली जाते. संतसाहित्य आणि पंडिती वळणाचे साहित्य ह्यात समान सूत्र हे की दोन्ही प्रकारच्या रचनांमागे धर्म ही प्रधान प्रेरणा आणि भक्ती हे प्रमुख सूत्र दिसते. त्यामुळे पंडिती कवितेचा विचार संतांच्या बरोबर करावा का? हा प्रश्न उभा राहू शकतो. अर्थात धर्म ही प्रेरणा आणि भक्ती हे सूत्र समान असले तरी दोघांच्या वाङ्मयनिर्मितीमागील भूमिकेत मुलभूत फरक आहे. पंडिती कवितेत संतत्वाच्या काही खुणा कुठे-कुठे दिसत असल्या तरी त्यात उत्कटतेपेक्षा कारागिरीचा भाग अधिक आहे. पंडित कवींनी मुख्यत्त्वे संस्कृत कवितेचा आदर्श समोर ठेऊन त्या धर्तीवर आणि त्या कथानकांनुसार रचना केली. आपली बहुश्रुतता, आपले पांडित्य आणि आपले रचनाकौशल्य दाखविण्यासाठी त्यांनी अलंकारिकता आणि भाषिक चमत्कृतीचा आश्रय घेतला. त्यामुळे पांडिती कविता पुराणाश्रयी कीर्तनपरंपरेचा आधार आणि अभिव्यक्तीचा कच्चा माल बनली. पंडितांच्या

CamScanner

तुलनेत संतांची कविता अधिक उत्कट, अधिक नैसर्गिक आणि लोकभाषेचा आश्रय करणारी आहे. पंडिताची कविता ही विशेषकरून ब्राह्मणांसाठी तर संतांची कविता त्रैवर्णिकांसाठी आहे. वेदांचा अधिकार नसलेल्यांसाठी संतांनी शोधलेला पर्याय म्हणजे वेदांतरचाचे अनुसरण करणारे संत साहित्य. सगळे पंडितकवी ब्राह्मण आहेत तर संत अठरापगड जातीतून आणि सर्वच सामाजिक स्तरांतून आले होते. ही लक्षणीय आहे. संतांची आणि पंतांची कविता ही अशा विविध अंगांनी तपासून पाहण्यासारखी आहे. प्रेरणा, प्रवृत्ती, निर्मिती- प्रक्रिया, आशय, रचनेचा आकृतिबंध, भाषा निवेदनपध्दती, व्यक्तीचित्रण अशा अनेक निकषांवरही संत आणि पंतांची कविता सांगी तुलना होऊ शकते. शाहीरांची रचनाही काही प्रमाणत अध्यात्मसंबध्द आहे. त्या अंगानेही तुलना होऊ शकेल.

संत साहित्याच्या तौलनिक अभ्यासाच्या काही दिशा येथे सूचित केल्या आहेत. साहित्याचे अनेक दिशा संभवतात. शैलीवैज्ञानिक दृष्टी, तौलनिक समाजशास्त्रीय अध्ययन, तौलनिक मानसशास्त्रीय विश्लेषण, तौलनिक संहिता चिकित्सा... कितीतरी विषय या निबंधत स्पर्शिले गेले नाहीत. भारतीय संतसाहित्याचा पट विशाल आहे. आजवर पुष्कळ काम झाले हे खरे पण त्यापेक्षाही अधिक 'नांगरल्याविणं भुई' अधिक आहे, हेही तितकेच खरे आहे.

निष्कर्ष :

१. विविध ज्ञानशाखांच्या परिवर्तीत होणाऱ्या सीमांमुळे आंतरविद्याक्षेत्रीय अभ्यासाचे महत्व वाढत चालले आहे.

२. संतांनी जीव-जगत आणि जगदीश यांच्या एकतेकडे मानवाचा मुक्त चढता प्रवास कसा होत जातो याचा आलेख साहित्यातून अधोरेखित केला.

३. विविध विचारधारा, अनेकपरंपरा आणि अनेक मानसिकता ह्या संतसाहित्याच्या विशाल आणि व्यापक पटात समाविष्ट होतात.

४. मानसाला मुक्तीच्या पटावर अग्रेसर करणे आणि भक्त व भगवंत यांच्यातील अंतर कमी करणे हा पवित्र व उदात्त विचार संतसाहित्याच्या निर्मितीमागे आहे.

५. आजवरच्या अभ्यासातल्या सर्व त्रुटी भरून काढून संतसाहित्याला खरा आणि सम्यक न्याय देण्याची ताकद फक्त संतसाहित्याच्या तौलनिक अभ्यासातच आहे. म्हणून संतसाहित्याच्या रूपाने विद्यमान असणाऱ्या भारतीय सांस्कृतिक संविताचे यथामूल आणि नेमके स्वरूप समजावून घेण्यासाठी संतसाहित्याच्या तौलनिक अभ्यासाची नितांत आवश्यकता आहे.

६. संतसाहित्याचे एक समान वैशिष्ट्य म्हणजे संतांवर कोणत्या ना कोणत्या सत्पुरुषाचा संताचा, गुरुचा वा विशिष्ट विचारधारेचा प्रभाव आहेच आहे.

७. पंडितांच्या तुलनेत संतांची कविता अधिक उत्कट, अधिक नैसर्गिक आणि लोकभाषेचा आश्रय करणारी आहे.

संदर्भ सूची :-

१. Wescott H.G. : Kabir and Kabir Panth.
२. डॉ. रा.चिं. ढेरे - मराठी भक्तीपरंपरा आणि रामकृष्ण विवेकानंद.
३. डॉ. मनोरमा प्रकाश - 'आधुनिक हिंदी कवितापर कबीर का प्रभाव'
४. संतसाहित्य आकलन आणि अध्यापन, (संपा.), प्रा. वसंत आबाजी उहाके आणि इतर.
५. तुकाराम दर्शन : डॉ. सदानंद मोरे.
६. संतपरंपरा : विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर.
७. अभंग नवनीत : डॉ. हे. वि. इनामदार.
८. पाच संतकवी : डॉ. शं. गो. तुळवुळे.
९. भक्तिपंथ नवचिंतन : डॉ. हे. वि. इनामदार.
१०. संतसाहित्य आणि लोकसाहित्य :काही अनुबंध, रा. चिं. ढेरे.
११. संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती : गं. बा. सरदार.

CamScanner

ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

Hi-TECH RESEARCH ANALYSIS

(Refereed, Peer Reviewed & Indexing Research Journal)

Year - XI, Issue - XXII, Vol.- II

Impact Factor 6.20
(GRIFI)

Feb. 2021 To July 2021

EDITOR IN CHIEF

DR. BALAJI KAMBLE

IMPACT FACTOR 6.20

ISSN 2231- 6671

International Registered & Recognized

Research Journal Related to Higher Education for all Subjects

Hi-TECH RESEARCH ANALYSIS

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue : XXII, Vol. - II
Year - XI, (Half Yearly)
Feb. 2021 To July 2021

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Contact : 02382 - 241913
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

Website
www.irasg.com

E-mail :
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

Published by :
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

Price : ₹ 200/-

CHIEF EDITOR

Dr. Balaji G. Kamble
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (**Mob. 09423346913**)

EXECUTIVE EDITORS

Dr. Sunanda Rodge
Principal
Govt. B.Ed. College,
Nanded, Dist. Nanded (M.S)

Scott. A. Venezia
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

Dr. Omshiva V. Ligade
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

Bhujang R. Bobade
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,

Dr. Dileep S. Arjune
Professor & Head, Dept. of Economics
J. E. S. College,
Jalna, Dist. Jalna(M.S.)

Dr. U. Takataka Mine
Tokiyo (Japan)

Dr. Babasaheb M. Gore
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

Dr. Nilam Chhanghani
Dept. of Economics,
KNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

DEPUTY-EDITOR

Dr. G . V. Menkudale
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

Dr. C.J. Kadam
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

Dr. Balaji S. Bhure
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

Dr. Bharat S. Handibag
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

Dr. S.B. Wadekar
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

Dr. Shivaji Vaidya
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

CO-EDITORS

Dr. R.N. Salve
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

Ghansham S. Baviskar
Dept. of English,
RNC & NSC College,
Nasik, Dist. Nasik.(M.S.)

Dr. Kailash Tombare
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

Dr. Kailash R. Nagulkar
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
Barshi Takli, Dist. Akola.(M.S.)

Issue : XXII, Vol. II
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.20
ISSN 2231- 6671
Feb. 2021 To July 2021

INDEX

Sr. No	Title for Research Paper	Page No
1	Induced Mutation on Green Pod yield in Okra (Abelmoschus esculentus L. Moench **Manik Madhav Pethkar**	1
2	Credit Co-operatives and Financial Sector Reforms **Dr. Dadasaheb Jogdand**	11
3	Performance of District Central Co operative Banks in Maharashtra **C. P. Kothawale**	15
4	Microbiological Quality of Marketable Raw Mutton in Latur City and its public health significance **G. S. Biradar, Dr. L. M. Karanjkar**	22
5	Prevalence and antibiotic sensitivity pattern of Pseudomonas aeruginosa in urinary tract infections in hospitals of Omerga region (Maharashtra), India **S. B. Mali, S. M. Dulange**	28
6	हिन्दी कहानियों में नारी का पारिवारिक परिवेश **डॉ. रामचंद्र ज्ञानोबा केदार**	37
7	वृद्धावस्थेतील वाढत्या शारीरिक व मानसिक समस्या आणि समायोजन **नलिनी अनिल बोडखे**	42
8	मराठवाड्यातील सामाजिक आधारभूत संरचनेतील पेयजल पुरवठ्याचा विकास **डॉ. सुरेश वसंतराव खोंड**	47
9	महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा समाजशास्त्रीय अभ्यास **डॉ. प्रदिप लक्ष्मणराव आंबोरे**	54

Issue - XXI, Vol. II
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 6.05
ISSN 2231- 6671
Aug. 2020 To Jan. 2021

9

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा समाजशास्त्रीय अभ्यास

डॉ. प्रदिप लक्ष्मणराव आंबोरे
समाजशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
अमरावती, जि. अमरावती

Research Paper - Sociology

प्रस्तावना :

भारतामध्ये स्वांतत्र्योत्तर काळामध्ये कल्याणकारी योजना आखल्या गेल्या. यामध्ये मुख्यत्व म्हणजे ग्रामीण भागातील विकासासाठी व ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी तसेच मजुर यांच्या हाताला काम मिळावे म्हणुन ग्रामीण रोजगार हमी योजना सुरू झाली. या योजनेचा उद्देश हा आहे की, ग्रामीण भागातील बेरोजगार मजुरांना काम मिळावे. १९७२ च्या भीषण दुष्काळात महाराष्ट्राला अंतर्मुख होऊन विचार करायला लावला निसर्गाच्या फटक्यांनी सर्वच गमावलेल्या माणासांना परागंदा होण्याची वेळ येऊ नये. शहराकडे येणारा लोंढा थांबवायला हवा. मागेल त्याला काम त्यांच्या गावात द्यायला हवं. याची जाणीव झाली निसर्गाच्या लहरीवर ज्यांचं पोट आहे. असे राबविणारे हातच आपले पोट भरतात. आपलयासाठी दाणा पिकवणारे हे हात जगवायचे असतील तर आपणच आपल्या उत्पादनाचा वाटा दिला पाहिजे. अशी जाणीव उत्पन्नाची हमी असलेल्या नोकरदार, दुकानदार वर्गात निर्माण केली पाहिजे. एकूण भारतीय लोकसंख्ये पैंकी ६८.७४ टक्के लोकसंख्या ६,४०,८६७ खेड्यात राहते." या वरून देशाचा विकास हा ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासावर अवलंबून आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेकडे दुर्लक्ष करून भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास शक्य नाही. त्यासाठी अगोदर ग्रामीण भागाचा विकास होणे गरेजेचे आहे. जर ग्रामीण भागाचा विकास झाला तर त्यामधुनच शहरी भागाचा विकास होईल. ग्रामीण भागात जे काही शेतीवर अवलंबुन आहेत किंवा दुसऱ्याच्या शेतीवर जाऊन काम करतात त्यांना निश्चित रोजगार नाही तसेच रोजगाराची हमी नाही त्यासाठी योग्य ती योजना राबविणे गरजेचे आहे. जेणे करून ग्रामीण भागाचा विकास होईल. ग्रामीण रोजगार हमी योजनेचे मुळ पाहिले तर ते एप्रिल १९६५' मध्ये सांगली जिल्ह्यात तासगाव तालुक्यातील ११ खेडे गावात सुरू करण्यात आली. ही योजना 'विलास सखाराम पागे' यांनी सुरूवात केली. पुढे

ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

EDITOR IN CHIEF
Dr. BALAJI KAMBLE

IMPACT FACTOR 6.10

ISSN 2229-4406

UGC Approved International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects

UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

UGC APPROVED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

Issue - XXI, Vol. IV
Year - XI (Half Yearly)
Sept. 2020 To Feb. 2021

Editorial Office :
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

Contact : 02382 -241913
9423346913 / 9503814000
9637935252 / 7276301000

Website
www.irasg.com

E-mail :
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

Publisher :
Jyotichandra Publication
Latur, Dist. Latur - 413531. (MS)

Price : ₹ 200/-

CHIEF EDITOR

Dr. Balaji G. Kamble
Professor & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur(M.S.)India.

EXECUTIVE EDITORS

Dr. E. Siva Nagi Reddy
Director, National Institue
of Hospitality & Tourism Management,
Hyderabad (A.P.)

Dr. D. Raja Reddy
Chairman, International Neuro Surjery
Association,
Banjara Hill, Hayderabad (A.P.)

Dr. Rajendra R. Gavhale
Head, Dept. of Economics,
G. S. Mahavidyalaya,
Khamgaon, Dist. Buldhana

Dr. Nilam Chhangani
Head, Dept. of Economics,
SKNG Mahavidyalaya
Karanja Lad, Dist. Washim (M.S.)

Dr. Yu Takamine
Professor, Fafulty of Law & Letters,
University of Ryukyas,
Okinawa, (Japan).

Dr. A. H. Jamadar
Chairman, BOS Hindi,SRTMUN &
Head, Dept. of Hindi, BKD
